म. ग्रं. स. ठाणे
विषय
सं. क्र. 2
REFBK-0003456

श्रीमंत होळकर-सरकार-पुस्तकमाला.

[ पुस्तक २० वें ]

मराठी भाषेचे

# व्याकरणकार

व

# व्याकरण-प्रबन्धकार

१००९४

३४५६

REFBK-0003456

लेखक—

मोरेश्वर सखाराम मोने, (शिक्षक, 'अध्यापिकाशाला' हिंगणें बु० पुणें)

प्रस्तावनालेखक—

रा० ब० काशीनाथ नारायण साने, बी० ए०

सन १९२७

किंमत दोन रुपये.

मुद्रक व प्रकाशकः—
शंकर नरहर जोशी.

प्रसिद्धिस्थलः—
चित्रशाळा, १०२६
सदाशिव पेठ, पुणें सिटी.

# अभिप्राय.

[ १ ]

रा० रा० मोरेर सखाराम मोने यांनीं “ मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरण–व्युत्पत्ति-स्खलनशुद्धि–प्रबन्धकार ” या नांवाचें आपलें पुस्तक मला वाचून दाखविलें. पुस्तक माझ्या मतें फारच उपयोगाचें झालें आहे. प्रत्येक सुधारलेल्या देशांत भाषेचें व्याकरण हें सुसंस्कृततेचें उत्तम लक्षण आहे, असें मानितात; त्याप्रमा आपल्या मराठी भाषेचें व्याकरण रचण्यांत व त्यांत सुधारणा करण्यांत ज ज्या गृहस्थांनीं हातभार लाविला, त्यांचीं चरित्रें एकात्रेत व्हावयास पाहिजेच तीं; तीं रा० मोने ह्यांनीं फार परिश्रमानें मिळवून, ह्या पुस्तकांत घेतली आहे; व बहुतेक गृहस्थांचे फोटोही मिळविले आहेत; ह्यामुळें हें पुस्तक अतिशय मूल्यवान् झालें आहे. या पुस्तकांत ज्या गृहस्थांचीं चरित्रें दिलीं आहेत, त्यांचा पयोग आजच्या पिढींत जरी कदाचित् दिसला नाहीं, तरी २०।२५ वर्षानंतरया गृहस्थांची आठवण असणारेदेखील लोक उरणार नाहींत; त्यावेळीं ह्या पुस्तकाची उपयुक्तता जास्त प्रत्ययास येईल. परवां ( मे १९२६ ) किबे यांचा वाडा जळून गेल्यामुळें, नामदार गोखले यांच्या जीवन-स्मृतींचीं कांहीं टिपणें जळून गेलीं, असें ऐकितों; तेव्हां अशा पुस्तकांच्या रूपानें तरी जुन्या प्रसिद्ध व्यक्तीची माहिती एकत्र असणें अगत्याचें आहे. त्यांपैकीं एका अंगापुरतें काम रा० मोने यांनीं अत्यन्त मेहनत घेऊन केलें आहे, त्या-बद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. वेळोवेळीं व्याकरणांत जे फरक घडून आले व या शास्त्राची उन्नति आतांपर्यंत कशी झाली, याविषयींदेखील रा० मोने यांनीं एक स्वतंत्र, शोधपूर्वक व उपयुक्त निबन्ध जोडिला आहे; यामुळें हें पुस्तक महाराष्ट्रीय विद्वानांस मान्य व प्रत्येक वाचनालयास संग्राह्य होईल, अशी माझी खात्री आहे.

जुनागड, (काठेवाड)
ता० ५ जून १९२६

**महादेव मल्हार जोशी**, ( एम्. ए. )
[ प्रोफेसर ऑफ संस्कृत; बहा–उद्दीन कॉलेज–जुनागड ]

[ २ ]

रा० मोने यांनीं तयार केलेला ' मराठी भाषेचे व्याकरणकाव व्याकरण-प्रबंधकार ' हा ग्रंथ मीं ( मूळ लिखित ) वाचून पाहिला. र मोने ह्यांनीं मोठ्या परिश्रमानें तो तयार केला आहे, असें ग्रंथ वाचतांच :णासहि वाटेल. त्यांस वेळोवेळीं केलेल्या सूचनांचाहि त्यांनीं काळजीनें विचारं योग्य स्थानीं आदरहि केल्याचें दिसून आलें.

मराठी व्याकरणाची बन्दिस्ती अद्यापि पक्की झालेली नाीं. मात्र गेल्या शें-पाऊणशें वर्षांत या विषयावर पुष्कळ विद्वानांचे श्रम झाले आहेत. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश व मराठी अशा सर्व परंपरांचे प्रवाह कोठून, :से, कोठवर वहात येऊन, प्रस्तुतची महाराष्ट्र व्याकरणाची महानदी सिद्ध झालीआहे, याचें आलो-डन अद्यापिहि नीटसें झालेलें नाहीं. राजवाडे यांचे प्रयत्न म्त्र फार धडाडीचे व जोरकस झाले; तसे आणखी व्हावयास पाहिजेत. केवळ मराठीचाच नव्हे, तर इतर प्रमुख देशी भाषांचाहि विकास आपण अभ्यासालास पाहिजे आहे. परंतु हें प्रचंड काम एकाएकीं व्हावयाचें नाहीं. आज झ॰ आहे, तेंच एकत्र पहावयाचें म्हटलें, तर सहज साधत नाहीं; इतकी ही :ाहिती इकडे-तिकडे विखुरलेली आहे. ती सर्व संकलित करण्याचें दगदगीचें ॒म रा० मोने यांनीं केलें आहे. रा० मोने यांचा ग्रंथ या दृष्टीनें पाहतां, फार ॑चनीय व महत्त्वाचा झाला आहे. शालोपयोगी व्याकरणकारांचा शाळापुरता निर्देश करून खऱ्या विद्वान् पंडितांच्या परिश्रमाची अधिक माहिती देण्याचें ॑रण रा० मोने यांस-हि मान्यच आहे. व्याकरणकारांपेक्षां चर्चिक हे एक प्रकारें प्रगतीला मोठे साह्याय्यक होतात; म्हणून त्यांची जी माहिती रा० मोने यांनीं दिली आहे, ती फार उपयुक्त होईल. युरोपियन व्याकरण-विमर्शकांचीही कांहीं चरित्रें रा० मोने यांनीं आपल्या पुस्तकांत समाविष्ट केलीं आहेत, हें योग्यच झालें.

रा० मोने यांच्या ग्रंथावरून झालेल्या प्रयत्नांची चांगली कल्पना येईल; आणि ती आली म्हणजे पुढील प्रयत्नाची आखणी अधिक पद्धतशीर आणि चौरस करितां येईल.

रा० मोने यांस अवश्य तें उत्तेजन मिळून, त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झालेला पाह-ण्यास, मी मोठा आतुर झालों आहें.

पुणें, मार्गशीर्ष व० १२
शके १८४८.

दत्तो वामन पोतदार.

# प्रस्तावना.

ग्रंथकर्त्यानें आपल्या ग्रंथास प्रस्तावना लिहिणें ती स्वतः लिहावी. दुसऱ्या कडून प्रस्तावना लिहून घेण्याचा प्रघात अलीकडे पडत चालला आहे, तो मला पसंत नाहीं. ग्रंथकर्त्यानें ग्रंथाबद्दल आधीं काय लिहिणें तें लिहून निवेदन करावें हा उत्तम मार्ग होय; परंतु रा० मोरोपंत मोने ह्यांची उत्कट इच्छा कीं, "मराठी भाषेचे व्याकरणकार आणि व्याकरणविषयक प्रबन्धकार" ह्या त्यांच्या ग्रंथास मींच प्रस्तावना लिहावी. ती त्यांची इच्छा मला मोडवेना, म्हणून खालीं दिलेले दोन शब्द मी लिहीत आहें.

व्याकरणादिकांसारख्या विषयाकडे लक्ष्य देणारे एकंदर जन-समूहांत अगदीं थोडेच सांपडणार. तो विषय भाषाशास्त्राचा चांगल्या प्रकारें परिपोष करणारा आणि उपकारक आहे खरा, पण तें सामान्य लोकांच्या लक्ष्यांत येत नाहीं. "या विषयामध्यें लक्ष्य घालणें व त्यावर कांहीं लिहिणें हा कालापव्यय होय, असें पुष्कळांस वाटतें." असें वाक्यमीमांसेंत आगरकरांनीं लिहिलें आहे. "जीस मी जननीप्रमाणें मानितों, तिच्या ऊर्जिताविषयीं झटणें, तींत व्याकरण-कोशादिकांची भर घालणें, माझें कर्तव्य आहे." असें दादोबा आपल्या मोठ्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंत लिहितात. सामान्य लोकांची, सर्व काळीं अशीच भाषेच्या संबंधीं उपेक्षात्मक दृष्टि असली, तरी निरपेक्षतेनें कर्तव्य करणारे तें करीतच असतात.

रा० मोने ह्यांचा हा प्रयत्न अशासारखाच आहे. व्याकरणकार आणि व्याकरण-प्रबन्धकार यांचीं चरित्रें आणि छायाचित्रें जमविणें, हें रा० मोने ह्यांनीं आपल्याला लावून घेतलेल्या छंदाचें फळ आहे. सामान्यतः पाहतां, त्यांनीं ह्या कामीं बहुत परिश्रम केलेले आढळून येतील. मराठींत अगदीं प्रारंभीं व्याकरण हा शब्दसुद्धां नव्हता, व सतराव्या शतकांत फादर स्टीफन्स यानें रोमन लिपींत व मराठी भाषेंत ख्रिस्तपुराण लिहिलें, त्यावेळीं मराठीचे कांहीं नियम बसवून, आपल्या पुस्तकांत त्यानेंच प्रथम ग्रथित केले, असा समज आहे; परंतु ती गोष्ट बरोबर नसून, फादर स्टीफन्सच्याही अगोदर तेराव्या शतकांतील महानुभाव पंडित भीष्माचार्य ह्यांनीं, मराठी भाषेसंबंधानें व्याकरणविषयक कांहीं प्रकरणें लिहिलीं आहेत, व अकराव्या शतकांतील महानुभावीय व्याकरण-

कारांचा आपल्या ग्रंथांत उल्लेख केला आहे, हें आतां कळून आलें आहे. इतकेंच नव्हे, तर रा० मोने ह्यांस,उमरावती जिल्ह्यांतलि रुद्रपुर येथील महानुभावीय मठाचे अधिपति महंत श्री गोपीराज महानुभाव ह्यांजकडून नुक्तेंच जें पत्र आलें आहे, त्यावरून पंजाब, दक्षिण-देश, वऱ्हाड, इ० लांबवर पसरलेल्या महानुभावांच्या मठांतून आणखीही बऱ्याच महानुभावीय पंडितांनीं लिहिलेल्या व्याकरणविषयक ग्रंथांचा, प्रकरणांचा आणि कोशादिकांचासुद्धां सुगावा लागण्याचा संभव आहे. त्यांचे त्या विषयावरचे ग्रंथ ठिकठिकाणीं आहेत, असे महंत गोपीराज ह्यांनींच कळविलें आहे. हे ग्रंथ उतरण्यास किंवा निदान पाहण्यास मिळविण्याचा रा० मोने ह्यांचा प्रयत्न चालू आहे. रा० मोने ह्यांच्या ह्या ग्रंथांत अगदीं अश्रुतपूर्व अशी किती तरी माहिती जागजागीं दिलेली आढळेल. उदाहरणार्थ, महानुभावीय पं० कवीश्वर व्यास व पं० भीष्माचार्य इत्यादिकांचीं किंवा वे० शा० सं० राजश्री रघुनाथशास्त्री गोडबोले ह्यांचें चरित्र पाहावें. त्यांतील हकीकत पूर्वी कधीं कोणास माहीत होती ? असो.

व्याकरण, व्युत्पत्ति, छंदःशास्त्र, इ० जवळ जवळच्या शास्त्रांनीं मराठींत कोठपर्यंत मजल गांठली आहे व त्यासाठीं कोणीं कोणीं काय काय प्रयत्न केले, हें रा० मोने ह्यांच्या ह्या पुस्तकावरून एकत्रित केलेलें आढळून येईल. निरनिराळ्या वाङ्मयविषयक किंवा शास्त्रविषयक क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्ति आपल्या डोळ्यांपुढून नाहींतशा झाल्या, म्हणजे मागून त्यांची माहिती मिळविणें दुष्प्राप्य होतें. दर वर्षी ह्या निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रमुख व्यक्तींची माहिती मिळवून, ती प्रसिद्ध करण्याचा रा० मोने ह्यांचा हेतु आहे; तो स्तुत्य आहे. अशा प्रकारची निरनिराळ्या विषयांच्या ग्रंथकारांची चरित्ररूप माहिती मिळवून, ती प्रसिद्ध करणें अवश्य होतें; तें ह्या व्याकरण-क्षेत्रांतील काम, रा० मोने ह्यांनीं चांगलेंच केलें आहे.

यापेक्षां ज्यास्त कांहीं लिहवत नाहीं. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें, आणखी लिहिणें अगदींच अशक्य झालें आहे. रा० मोने ह्यांच्या पुस्तकाचें स्वरूप लक्षांत घेतां,असलीं कामें कोणीं तरी करावयास पाहिजेच आहेत,हें उघड आहे. आतां ह्या लिहिलेल्या चार ओळी त्यांस प्रस्तावनेदाखल पुरेत; अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं. शुद्धलेखन, छपाई, व छायाचित्रें ह्यांच्या चांगुलपणाकडे, लेखक तसेंच प्रकाशक ह्यांनीं फार लक्ष्य पुरवावें.

माझ्या अल्प मतीप्रमाणें रा० मोने ह्यांचा हा ग्रंथ उत्तम वठला आहे; आणि तो मराठीविषयीं सर्व अभिमान बाळगणारांच्या, किंबहुना सकल महाराष्ट्र-भाषा बोलणारांच्या, आश्रयास सर्वथैव पात्र आहे; असें माझें स्पष्ट मत आहे. रा० मोने यांस विश्वेश्वर अशा कामीं सुयश देवो.

कल्याण,<br>रविवार माघ शु० ११<br>शके १८४८.

काशिनाथ नारायण साने.

---

# नि वे द न.

१. आजकाल एखाद्या प्रवेश-वर्गांत जाऊन, सहज प्रश्न विचारला कीं, "मराठीचे दोन-चार प्रमुख व्याकरणकार कोणते ?" तर मुलांकडून ह्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळणें कठीणच आहे, असें वाटतें. अशा स्थितींत हिंगणें येथील अध्यापिका-शाळेंतील वर्गास, व्याकरण हा विषय शिकवीत असतां मीं हौसेनें बऱ्याच मराठी व्याकरणकारांचीं चरित्रें जमविलीं; व प्रकाशकांनीं तीं छायाचित्रांसहित छापण्याचें मान्य केलें; त्याचें प्रस्तुत पुस्तक हें फळ आहे.

वस्तुतः लहान तोंडीं मोठा घास घेऊन या कामास हात घालणें बरें नाहीं, हें जाणत असूनही, मी "अकरणान्मन्दकरणं श्रेयः" या नात्यानें यांत पडलों-आहें व हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें धाडस करीत-आहें, तें आणखी दोघां सद्‌गृहस्थांच्या प्रोत्साहनानेंच होय; हें मात्र कृतज्ञताबुद्धीनें मला कबूल केलें-पाहिजे. यांपैकीं **प्रो० रामचंद्र कृष्ण लागू**, एम्. ए. हे एक; व दुसरे **प्रो० दत्तो वामन पोतदार**; हे होत. ह्या उभयतांनीं अनेक प्रकारें सक्रिय सहानुभूति दाखविली-नसती, तर हें माझें लिखाण मला तसेंच दडवून ठेवणें प्राप्त होतें.

शिवाय, ह्या माझ्या लिखाणांतून जाड्या विद्वान् व बहुश्रुत वाचकांस जरी कांहीं नवीन न मिळालें, तरी बऱ्याच वाचक-वर्गास निरनिराळ्या ठिकाणीं विखरून पडलेलें लेखन ह्या पुस्तकांत एकत्र पहावयास सापडेल; ह्या कारणानेंही मीं मराठी व्याकरणकारांची मिळाली तेवढी माहिती संग्रहित करण्याचा प्रयत्न केला-आहे.

ज्यांनीं आपलीं व आपल्या पूर्वजांचीं चरित्रें स्वतः लिहून-दिलीं, त्यांचीं तीं जशींच्या तशींच छापिलीं-आहेत. त्यामुळें प्रमुख व्यक्तींच्या चरित्रांचे बाबतींत त्रोटकपणा, व दुसऱ्या कांहींच्या बाबतींत पाल्हाळ वाटण्याचा संभव आहे, पण त्यास उपाय नाहीं. चरित्र-लेखनासाठीं ज्यांस मीं तसदी दिली, त्यांच्या लेखनांत फिरवाफिरव करण्याचें धार्ष्ट्य माझ्या हातून झालें-नाहीं, याबद्दल वाचक मला क्षमा करतील; अशी आशा आहे.

२ मराठीच्या निव्वळ 'व्याकरणकारां'चाच ह्या पुस्तकांत समावेश केल्यानें, कृष्णशास्त्री चिपळूणकर, आगरकर, ह्यासारख्यांनीं जरी मराठीचीं प्रत्यक्ष व्याक-

रणें लिहिलीं–नसलीं,तरी त्यांनीं इतर व्याकरण–विषयक अंगांवर व उपांगांवर जें महत्त्वाचें चर्चात्मक वाङ्मय लिहून, ह्या शास्त्राची प्रगति केली–आहे, त्यांना मुळींच विसरल्यासारखें होईल; म्हणून 'व्युत्पत्ति,' 'लेखनशुद्धि,' 'वाक्यमीमांसा' आणि अन्य व्याकरण–विषयक उपांगांवर ज्यांनीं ज्यांनीं कांहीं लिहिलें–आहे, त्या सर्व प्रबन्धकारांचा समावेश ह्यांत बुद्धया केला–आहे.

३. मराठीच्या व्याकरण–विषयक प्रयत्नांत विदेशीयांचें ( त्यांच्या धर्मप्रसारासाठीं का होईना ) असलीं पुस्तकें लिहिण्याचें धाडस मात्र अपूर्व आढळून येतें! डॉ० कॅरे (carey) ह्यानें ख्रिस्ती धर्मप्रसाराकरितां हिंदुस्थानांतील ४० भाषांत बायबलाचीं भाषान्तरें करविलीं, व ह्याच्यासारख्याच फादर स्टीफन्स आदिकरून अनेकांनीं त्याच कामाकरितां देशी भाषांचे कोश व व्याकरणें निर्माण करण्याचा प्रयत्न केला ! या लोकांच्या सहस्रांश जरी आमचे प्रयत्न होतील, तरी आम्हांस उन्नतावस्था प्राप्त झाल्याशिवाय राहणार–नाहीं.

४. हे लेख लिहीत असतां, चरित्रें देण्याच्या, सूचना करण्याच्या व अन्य सामग्री मिळवून देण्याच्या कामी, ज्या गृहस्थांनीं साह्य केलें–आहे, त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच. त्यांचीं नांवें व ज्या पुस्तकांचे आधार घेतले–आहेत, त्या ग्रंथांचा नामनिर्देश स्वतंत्रपणें केला–आहे.

५. ह्या पुस्तकाचे एकंदर **सहा** विभाग पाडिले–आहेत.

**पहिल्या विभागांत**—( १ ) मराठी व्याकरणेतिहासासंबंधीं त्रोटक टिपणी, ( २ ) व्याकरणादिकांची आवश्यकता, ( ३ ) मराठींतील संयुक्त क्रियापदें, व ( ४ ) मराठीवर अन्य भाषांचा परिणाम, हे चार निबंध आहेत.

**दुसऱ्या विभागांत**—महानुभावीय व्याकरणकारांसंबंधीं माहिती स्वतंत्रपणें दिली आहे.

**तिसऱ्या विभागांत**—दोन पोटभाग करून, पहिल्या (अ) पोटभागांत प्रमुख महाराष्ट्रीय व्याकरण–प्रगति–कारांचीं चरित्रें दिलीं आहेत; दुसऱ्या (आ) पोटभागांत. शालोपयोगी व अर्थदृष्टीनें लहान–सान व्याकरण–पुस्तकें ज्यांनीं लिहिलीं–आहेत, त्यांपैकीं माहिती मिळाली, तेवढ्यांचा समावेश केला–आहे. गंगाधरशास्त्री फडके, जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, इत्यादिकांचीं छायाचित्रें ( फोटो ) व माहिती नागांवास त्यांच्या मूळ गांवींही कांहींच मिळाली–नाहीं म्हणून ही मंडळी निरुपायानें केवळ नामनिर्देशापुरती येथें दाखल केली–गेली–आहे.

**चौथ्या विभागांत**—मराठी व्याकरण-व्युत्पत्ति-लेखन-शुद्धि व छंदः-शास्त्र इत्यादिकांचे प्रवन्धकार, ह्यांपैकीं मिळाली तेवढ्यांची माहिती दिली-आहे. छंदःशास्त्रासंबंधीं अधिक विचार **परशुरामतात्यां**नंतर प्रो० **माधव त्रिंबक पटवर्धन** व **गणेशशास्त्री लेले** इ० दोघां-तिघांच गृहस्थांनीं केलेला आढळतो; व त्यांचा परामर्श घेणें योग्य आहे, म्हणून हीं चरित्रें घेतलीं-आहेत; कोशकारांचीही माहिती वस्तुतः या विषयाचे अन्तर्गत म्हणून देण्यास हवी; परंतु विस्तार फार होणार म्हणून ह्या पुस्तकांतच ती ग्रथित करितां-आली-नाहीं; आणखी त्याबद्दल स्वतंत्रच पुस्तक लिहावयास-पाहिजे.

**पांचव्या विभागांत**—मराठीचे युरोपियन व्याकरण-प्रबन्ध-निवन्धकार यांपैकीं कांहींचा समावेश केला-आहे.

**सहाव्या विभागांत**—राजवाडे; इत्यादि पूर्व-ग्रंथकारांच्या ग्रंथांतील व विविधज्ञान-विस्तार वगैरे मासिकांतील महत्त्वाचे उतारे दिले आहेत.

प्रस्तुत पुस्तकासंबंधीं एवढें लिहिल्यावर, आणखीही कांहीं निवेदन करणें जरूर वाटल्यानें, तें करीत आहें.

६. आपल्या महाराष्ट्रांत निरनिराळ्या प्रकारें वाङ्मयसेवा व अन्य प्रकारची राष्ट्रसेवा करणारी मंडळी बरीच आहेत; त्यांविषयीं व त्यांच्या कामगिरीविषयी थोड्क्यांत माहिती लिहून ठेवण्याची पद्धति अजून फारशी रूढ झालेली दिसून-येत-नाहीं. ज्ञानकोशासारख्या ग्रंथांत टिळकांसारख्यांना कोठें दहा-पांच ओळी मिळाल्या तर नशीब, असा प्रकार आढळून-येतो; मग इतरांची काय कथा? राजकीय आखाड्यांत, देशसेवेच्या अनेक कार्यांत, आणि वाङ्मयविषयक प्रयत्नांत, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीची मंडळी, डेक्कन् एज्युकेशन् सोसायटीची मंडळी आणि टिळकानुयायी मंडळी व आणखी किती तरी इतिहास-संशोधनासारखें उपयुक्त काम करणारी मंडळी, आपापल्यापरी महाराष्ट्रांत जिवाची धडपड करून-राहिलेली-आहेत; त्यांच्या नांवांची व कार्यांची भावी पिढीस वार्ताही नसणें, हें योग्य नव्हे; असें मनांत येऊन निरनिराळ्या शाखेंत काम करणाऱ्या प्रमुख व्यक्तींसंबंधीं व त्यांच्या प्रयत्नांसंबंधीं, त्यांच्या छाया-चित्रांसहित माहिती मिळवून, ती प्रस्तुतच्या प्रकाशकांसारख्यांनीं मनावर घेतल्यास, प्रतिवर्षी ह्या पुस्तकाप्रमाणेंच एकादें पुस्तक प्रसिद्ध करून, ह्या दिशेनें स्वशक्त्यनुसार मी प्रयत्न करणार-आहें.

७. असा थोडासा प्रयत्न " बालबोध "कार विनायक कोंडदेव ओक ह्यांनीं केला–होता; परंतु तो किती अपुरा पडत–आहे, हें कोणासही आज स्पष्ट दिसून–येईल. आपलीच आपण टिमकी वाजवूं–नये, हें खरें; पण कोणाच्याही कामगिरीचें योग्य कौतुक व्हावें, निदान त्यांच्या कामगिरीचा उल्लेख कोठें तरी असावा, हें राष्ट्राच्या कृतज्ञताबुद्धीचें निदर्शक होय; परंतु आपल्या ह्या परवशतारूपी निरयगतीच्या सद्यःस्थितीत, किती देशहितैषी लोकांच्या, अनाक्षेपक अशाही कामांचा चुराडा होऊन–राहिला–आहे, हें कोणास सांगणें नकोच. अर्थात् ह्या मंडळींचें अंशतः उतराई होण्याच्या इच्छेनें, वर उल्लेखिलेल्यासारख्या संस्थांतील पूर्व व विद्यमान महाराष्ट्रीय व्यक्तींचीं त्रोटक चरित्रें यानंतर दुसऱ्या पुस्तकाच्या रूपानें महाराष्ट्रास सादर करण्याचा मी हेतु धरीत–आहें;व आपण होऊन, कांहीं चरित्रें मजकडे कोणीं पाठविल्यास त्यांचा मी अवश्य स्वीकार करीन.

८. प्रस्तुत चरित्रांकरितां "विविधज्ञानविस्तार "व इतर नियतकालिकें यांतील मिळाले तेवढे लेख चाळून–पाहिले; पण " ज्ञान–प्रकाश " सारख्या पत्रांतील मृत्युलेखांवरून या पुस्तकांतील जुनीं चरित्रें कांहीं अंशीं पडताळून पाहतां–आलीं–असतीं; तें ज्ञानप्रकाश छापखाना गेल्या वर्षी जळाल्यामुळें जमलें नाहीं; अर्थात् वर्तमानपत्री न टिकणाऱ्या वाङ्मयापेक्षां ग्रंथांतील वाङ्मयाची शाश्वतता थोडी अधिक; हें मनांत येऊनही,निरानिराळ्या शाखांतील कार्यकर्त्यांचीं चरित्रें संग्रहित करण्याचें काम मला प्रिय वाटूं–लागलें–आहे व तें यथामति ह्या पुस्तकाच्या रूपानें मी प्रकट करीत–आहें.

९. ह्या पुस्तकांत आणखीही कांहीं विशेष आढळून–येतील. ' विविधज्ञान–विस्ताराचीं मागील छप्पन्न वर्षांचीं पुस्तकें चाळून, त्यांत ह्या विषयासंबंधानें जें संग्रहणीय वाटलें त्याचा उताऱ्यांत व अन्यत्र जागोजाग संग्रह केला–आहे; त्याच–प्रमाणें ठाणें व विशेषतः मुंबई येथील ग्रंथसंग्रहालयांत बरींच जुनीं व्याकरण–पुस्तकें पहावयास सांपडलीं. त्यांचे कर्ते, काल, व त्या पुस्तकांचें सामान्य स्वरूप हीं "मराठी व्याकरणाचा त्रोटक इतिहास"ह्या निबंधांत टीपा जोडून व पुरवणी–रूपानें जोडून निर्दिष्ट केलीं–आहेत; ह्या दोन्ही ग्रंथसंग्रहालयांच्या व्यवस्थापकांचे येथें प्रेमपूर्वक आभार मानणें इष्ट आहे.

१०. लेखनशुद्धीसंबंधीं ह्या पुस्तकांत समजून उमजून कांहीं निराळे प्रकार अवलंबिले–आहेत. ' विस्तारां 'तील "मराठी भाषेवर अन्य भाषांपासून होणारे

परिणाम " हे लेख वाचनीय असून केवळ अन्य भाषांच्या आपल्या भाषेवरील डोईजड सासुरवासामुळें, आपल्या राष्ट्रावर कशी अनर्थपरंपरा कोसळली जाण्याचा सम्भव आहे, हें त्यांत उत्तम प्रकारें दर्शविलें-आहे. मीं त्या लेखांतील थोडासा उतारा ह्या पुस्तकांत घेतला-आहे. वाचकांनीं तो मूळांतच पहावा, अशी माझी नम्र विनंति आहे. त्याच्या वाचनानें कांहीं अंशीं आपले डोळे उघडतील, व 'चंचुप्रवेशे मुशलप्रवेशः' असा प्रकार भाषेवरही होऊन, त्यामुळें अखेर स्वत्वाला व स्वतःच्या संस्कृतीलासुद्धां मनुष्य कसा पारखा होतो: हें आढळून-येईल. यास उदाहरण देशी ख्रिस्त्यांचें घ्या. तें युरोपियन नाहींत, हें उघड आहे. धर्मानें ख्रिस्ती म्हणून ते ख्रिश्चन संस्कृतीचा, इंग्रजी भाषेचा व इंग्रजांपासून मिळणाऱ्या नोकऱ्यांसाठीं त्यांचा अभिमान धरणार; अर्थात् हे लोक राष्ट्रदृष्ट्या आपले हिंदी बांधव असून, केवळ परकी अनुकरणानें स्वत्वाला व स्वाभिमानालाही कसे मुकले-आहेत पहा ! असो. मीं ह्या पुस्तकांत सहजगत्या आपल्या बोलण्यांत व लेखनांत जे परकी शब्द येतात, ते शक्य तेवढे टाळले-आहेत.

" मराठींतील संयुक्त क्रियापदें " ह्या माझ्या निबन्धावरून, मी संयुक्त-क्रियापदें मानण्याच्या मताचा आहें, हें दिसून-येईल; अर्थात् त्या निबंधांत विवेचन केल्याप्रमाणें, ज्यांस संयुक्त क्रियापद म्हणावयाचें, त्या जोड-शब्दांमध्यें सामासिक शब्दांमधल्या रेघेप्रमाणें एक लहान रेघ दिली-आहे.

अनुस्वाराचा खणखणींत उच्चार व केवळ नाकांतील उच्चार यांच्या स्पष्टीकरणासाठीं, खणखणीत उच्चाराचे ठिकाणीं संस्कृत शब्दांत सामान्यतः व्यंजन व नाकांतील उच्चाराचे ठिकाणीं टिंब, ह्यांची योजना केली-आहे; पण पुस्तक सर्व लिहून झाल्यावर, हें शोधन करावयाचें मनांत आल्यामुळें, ह्यांत पुष्कळ ढिलेपणाही झाला-आहे; हें मीं स्वीकृत करितों.

११ शेवटीं,ह्या पुस्तकाचे प्रस्तावनालेखक कै० रा० ब० **काशिनाथ नारायण साने** ह्यांचे मीं किती उतराई व्हावें हें मला समजत नसल्यानें, त्याविषयीं मला कांहीं अधिक लिहितां-येत-नाहीं. बाबासाहेब साने अलीकडे अतिशय आजारी, तशांत मीं त्यांस भीड घातली, माझ्या पुस्तकांतील विषयही त्यांच्या आवडीचा, म्हणून त्यांनीं पुस्तक बारीक-सारीक गोष्टींकडेही लक्ष देऊन, वाचलें; त्यांत शोध जागजागीं दर्शविले; ह्या वाचनाच्या नादामुळें त्यांस त्रास होईल, म्हणून मध्यंतरीं जवळच्या मंडळींनीं तीन-चार वेळां मला भेटही-दिलें-नाहीं; अशा स्थितींत बाबासाहेबांनीं प्रयत्नी व आपल्या प्रांतांतील या नात्यानें मी आप्त मनुष्य

१०५९४

आहें, असेंच मला समजून, प्रस्तावना दिली; त्यांचे आभार शब्दांनीं मानतां येणें शक्य नाहीं. ह्या पुस्तकास प्रस्तावना लिहिणें हें त्यांचें वाङ्मयविषयक शेवटचेंच काम होय; कारण, पुढें थोड्याच दिवसांनीं बाबासाहेबांच्या निधनाचें दुःखदायक वर्तमान कानावर आलें !

१२ कै० बाबासाहेबांनीं जे शोध ठिकठिकाणीं करून-ठेविले, ते सर्व विचारांत घेऊन योग्य तो बदल केला; परंतु चरित्रें किंवा अन्य लेख यांचे जेथें जेथें उतारे घेतले-आहेत, तेथें त्यांची मूळांतील भाषा फिरावेणें योग्य नाहीं म्हणून बाबासाहेबांच्याच अनुज्ञेनें ती फिरविली-नाहीं. त्याचप्रमाणें प्रमुख व्यक्ति व गौणव्यक्ति यांच्या चरित्रांमध्यें त्या त्या मानानें कमी-ज्यास्ती स्थलगौरव असावयास पाहिजे; ही प्रो० पोतदार यांची सूचना मान्य करूनही, मागवून घेतलेल्या सन्माननीयांच्या लेखांचे बाबतींत जागेची फारशी काटकसर दाखविली-नाहीं; बाकी त्यांचेही सर्व शोध विचारांत घेतले-आहेत; व त्याप्रमाणें फरक केला-आहे.

१३ ह्या पुस्तकाप्रीत्यर्थ जवळ जवळ दोन वर्षें माहिती संकलित करीत असूनहि अजून नवीन माहिती उपलब्ध होत-आहे व उत्तरोत्तर उपलब्ध होत-राहणार; ह्यामुळें ह्या पुस्तकांत न्यूनता राहणें साहजिक आहे. ती पुढील लेखक भरून-काढतीलच; म्हणून सध्यां हें पुस्तक जमलें तसेंच हातावेगळें करून-टाकीत-आहें. उदाहरणार्थ,-(१) **कवीश्वर व्यास**, (२) **आनेराज व्यास**, (३) पं० **भीष्माचार्य** व ( ४ ) श्री० **विश्वनाथ वर्धनस्थ**, ह्या महानुभावीय व्याकरण-कारांचीं व व्याकरण-प्रबन्धकांचीं नांवें नवीनच उपलब्ध झालीं आहेत; व हे सर्व फादर स्टीफन्सच्या पूर्वीचे आहेत. ही माहिती **महन्त गोपीराज महानुभाव** ( ऋद्धिपुर ) व **यशवंत खुशाल देशपांडे** एम्. ए. एल्. एल्. बी. वकील ( यवतमाळ ) यांच्या कृपेनें आम्हांस मिळाली; त्याचा उल्लेख महानुभावीय प्रकरणांत केलाच आहे; येथें त्यांचे शतशः आभार मानितों.

१४ पुस्तकाचे प्रकाशक यांनीं, छपाईच्या व पुस्तकाच्या अन्तर्बाह्य सुन्दरतेच्या दृष्टीनें काळजीपूर्वक काम केलें, ह्याबद्दल त्यांचेही आभार मानून हा निवेदन-लेख पुरा करितों.

"अध्यापिकाशाला"<br>हिंगणें बु०, पुणें.

सर्वांचा नम्र,<br>**मोरेश्वर सखाराम मोने.**

# माहिती देणाऱ्या साहाय्यकांचीं नांवें.

प्रो॰ रामचंद्र कृष्ण लागू; एम् . ए. ( न्यू पूना कॉलेज. )
प्रो॰ दत्तो वामन पोतदार; (हस्तलिखित प्रतींचें वाचन, शोधन व आभिप्राय)
प्रो॰ महादेव मल्हार जोशी; एम् . ए (बहा-उद्दीन कॉलेज,जुनागड. अभिप्राय)
रावबहादुर काशीनाथ नारायण साने; बी. ए. ( प्रस्तावना )
प्रो॰ धोंडो केशव कर्वे; बी. ए. ( रा॰ भि॰ जोशी च॰ )
मिस् ॰ आर॰ नवलकर;सुप॰ ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन,पुणें. (नवलकर च॰)
रा॰ रा॰ त्र्यंबक गंगाधर धनेश्वर, वकील—अहंमदनगर ( भारद्वाज च॰ (
,, ,, यशवंत खुशालराव देशपांडे;वकील-यवतमाळ. (पं॰भीष्माचार्य च॰)
,, ,, सीताराम केशव दामले; वकील—पुणें ( मो॰ के॰ दामले च॰ )
प्रि॰ विनायकराव आपटे; एम् . ए. ( आपटे घराण्याचा इतिहास )
रा॰ रा॰ विष्णु पांडुरंग नेने; बी. ए. ( बडोदें. चिपळोणकर फोटो )
रा॰ रा॰ शि॰ अ॰ शुक्र; एम् . ए. ( कों॰ एज्यु॰ सो॰ बापूशास्त्री शुक्र फोटो )
,, ,, धोंडोपंत शुक्र ( नागांव. बापूशास्त्री शुक्र च॰ )
प्रो॰ वासुदेव गोविंद मायदेव; एम् . ए. ( डॉ॰ गुणे च॰ )
श्री॰ कमळाबाई देशपांडे; जी. ए. (टिळकांचे व्याकरणविषयक लेख )
रा॰ रा॰ नागोपंत भिडे ( पुणें. रघुनाथ भास्कर गोडबोले च॰ व फोटो )
,, ,, वैद्य ( व्यवस्थापक ठाणें म॰ ग्रं॰ सं॰ )
,, ,, अं॰ गो॰ पुणतांबेकर; ( व्यवस्थापक मुंबई म॰ ग्रं॰ सं॰ )
महन्त गोविंदराज महानुभाव; ( पुणें. संपादक—" ज्ञानसिंह " )
,, गोपीराज महानुभाव; ( रुद्रपुर, जि॰ उमरावती )
रा॰ रा॰ मालशे ( सुपरिंटेंडेंट म॰ ए॰ सो॰ पुणें, खेर फोटो )
अहिताग्नि शंकरराव राजवाडे; बी. ए. (पुणें. राजवाडे च॰ व लेख)
रा॰ रा॰ तात्यासाहेब गद्रे; ( आगाशी. वे॰ पाध्ये यांची मृत्युतिथी
,, ,, गोपीनाथ विनायक ओक; ( मुंबई. वि॰ कों॰ ओक च॰ )

रा० रा० लक्ष्मण नारायण जोशी; (पुणें. ना० धों० जोशी च०)
रा० रा० आत्मारामपंत काळे, सातारा ( हातवळणे फोटो )
,, ,, विनायक शंकर हातवळणे ( सातारा. हातवळणे फोटो )
प्रो० वामन मल्हार जोशी; एम्. ए. (स्वचरित्र)
रा. रा. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी; एम्. ए. ( सातारा. स्वच० )
,, ,, नाना पावगी; ( पुणें. स्वच० )
,, ,, नारायण विठ्ठल आपटे; ( माजी शिक्षक ट्रे० कॉ० पुणें. स्वच० )
,, ,, गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर; ( मुंबई. स्वच० )
,, ,, गोविंद कृष्ण मोडक; ( सं० शिक्षक, न्यू स्कूल, पुणें. स्वच० )
,, ,. वासुदेव गोविंद आपटे; बी. ए. ( पुणें. स्वच० )
,, ,, विद्याधर वामन भिडे; बी. ए. ( पुणें. स्वच० )
कुलगुरु चिंतामण विनायक वैद्य; एम्. ए. एल्.एल्. बी. ( स्वच० )
प्रो० शिवराम महादेव परांजपे; एम्. ए. (स्वच०)
रा० रा० विठ्ठल रामजी शिंदे; बी. ए. ( डि० क्ला० मिशन, पुणें. स्वच० )
,, ,, " शणै गोयबाब " ( मुंबई, स्वच० )
डॉ० वि० पां० चव्हाण. ( ,, ,, )
रा० रा० पांडुरंग वामन काणे; एम्. ए. एल्. एल्. एम्. ( मुंबई स्वच० )
नामदार यादव माधव काळे वकील ( बुलढाणा. स्वच० )
कविभूषण बळवंत गणेश खापर्डे ( उमरावती. संपादक "उदय" स्वच० )
प्रो० लक्ष्मण गणेशशास्त्री लेले ( न्यू पुना कॉलेज, गणेशशास्त्री लेले च० )
प्रो० माधव त्रिंबक पटवर्धन; एम्. ए. ( पुणें. स्वच० )
रा० रा० यशवंत नरसिंह केळकर ( लेख-उतारा )
व्यवस्थापक "हंस-गुंफा" मठ:(परिंचें, जि० सोलापूर; र० भा० गोडबोले च०)
प्रो० हरि रामचंद्र दिवेकर; एम्. ए. आचार्य ( कांहीं गुरो० चरित्रें )

# प्रमाणग्रंथ.


१ मराठी गद्याचा इंग्रजी अवतार. ( प्रो० पोतदार )
२ बालबोध ( वि० कोंडदेव ओक )
३ नवयुग
४ विविधज्ञानविस्तार
५ मनोरंजन
६ गोडबोले यांचें व्याकरण
७ भिडे यांचें व्याकरण
८ मराठी भाषेची घटना. ( रा० भि० जोशी )
९ चित्रमयजगत्
१० ख्रिस्त पुराण ( फादर स्टीफन्स )
११ टिळक चरित्र ( न० के० केळकर )
१२ ज्ञानकोश
१३ पावगी यांचें आत्मचरित्र
१४ प्रो० कर्वे यांचें आत्मचरित्र
१५ ग्रंथमाला
१६ भाषाशास्त्र आणि मराठी भाषा ( कृ० पां० कुळकरणी )
१७ महानुभावीय वाङ्मय ( य० खु० देशपांडे वकील, यवतमाळ )
१८ स्वरव्यंजन व्यवस्था ( वे० पां० ज० पाध्ये )
१९ आपटे घराण्याचा इतिहास.
२० व्युत्पत्तिप्रदीप ( गो० शं० बापट व गो० कृ० मोडक )
२१ दादोबांचें मोठें व्याकरण
२२ वाक्यमीमांसा ( आगरकर )
२३ हंसकोश ( र० भा० गोडबोले )
२४ नवीन मराठी कोश ,,
२५ भारतवर्षीय प्राचीन कोश ,,

२६ भारतवर्षीय अर्वाचीन कोश ,,
२७ व्याकरणावरील निबंध ( कृ० शा० चिपळूणकर )
२८ बर्जेसचें व्याकरण.
२९ अगदीं सोपें व्याकरण ( ओक )
३० गुंजीकर यांचें सुबोध व्याकरण
३१ जांभेकर यांचें बाल व्याकरण
३२ शास्त्रीय मराठी व्याकरण ( दामले )
३३ सुबन्त विचार ( राजवाडे )
३४ तिङ्गंत विचार ,,
३५ ज्ञानेश्वरी मराठीचें व्याकरण ,,
३६ संकीर्ण लेख ,,
३७ फडके ह्यांचें महाराष्ट्र भाषेचें व्याकरण
३८ गं० रा० टिळक यांचें व्याकरण
३९ नवलकर यांचें व्याकरण
४० मराठी भाषेचें व्याकरण ( रा० रा० भागवत )
४१ व्याकरण ( पाणंदीकर )
४२ वाक्यरचना ,,
४३ निबंधमाला ( विष्णुशास्त्री चिपळूणकर )
४४ " महाराष्ट्र सारस्वत " ( भावे )
४५ लेख व भाषणें ( चिं० वैद्य )
४६ मराठी भाषेची लेखन-पद्धति ( साने )
४७ ,, ,, ,, ,, ( हातवळणे )
४८ शुद्धलेखनसुधारणा ( दामले )
४९ मराठी शालापत्रक
५० मराठी लेखनशुद्धि ( प्रो० राजा० भागवत )
५१ मराठी भाषेचें शुद्धीकरण ( बॅ० सावरकर )
५२ मराठी भाषेची लेखनपद्धति ( डॉ० चिपळोणकर )
५३ वि० रा० शिंदे यांचें चरित्र
५४ वऱ्हाड शालापत्रक ( ज्युबिली अंक )

५५ मराठी व्याकरणव्याख्यानमाला ( जोशी )
५६ विद्यार्थ्यांचा व्याकरणमित्र ( ओक )
५७ मराठीच्या माहेराचें सिंहावलोकन (प्रो० पाटणकर सें० हिं० कॉ० बनारस)
५८ मराठी व्याकरण पाठ करण्याचें सुलभ साधन ( बिर्जे )
५९ व्याकरणमंजरी ( काळे )
६० लघुत्तम मराठी विक्षिप्त व्याकरण ( कृ० य० गोडबोले )
६१ तेरा भाषा व ३१ भाषांचे मासले ( द० गो० सडेकर )
६२ संगीत लघुव्याकरणबोध ( आठवले )
६३ महानुभाव महाराष्ट्र ग्रंथावली ( विनायकराव भावे )
६४ किर्लोस्कर खबर
६५ मराठी भाषेची मूळ पीठिका [ कर्त्याचें नांव नाहीं. ठा० सं०]
६६ " हंस-पद्धति " [ हस्तलिखित पोथी ]
६७ छंदोमंजरी [ मा० त्रिं० पटवर्धन ]
६८ ' पंचवार्तिक ' ( हस्त० पोथी, प० भीष्माचार्य )

# अनुक्रमणिका.


## प्रास्ताविक ( पृष्ठें १ ते १६ )

अभिप्राय
प्रस्तावना
निवेदन
साहाय्यक
प्रमाणग्रंथ

## विभाग पहिला, ( पृष्ठें १७ ते ६८ )

### निबंध.

१ मराठी भाषेच्या व्याकरणाचा त्रोटक इतिहास.
२ व्याकरणादिकांची आवश्यकता.
३ मराठींतील संयुक्त क्रियापदें.
४ आपल्या भाषेचें पुढें काय होणार ?

---

## विभाग दुसरा, ( पृष्ठें ६९ ते ११८ )

### महानुभावीय व्याकरणकार.

१ कवीश्वर व्यास
२ आनेराज व्यास
३ पंडित भीष्माचार्य
४ विश्वनाथ वर्धनस्थ
दत्तराज महानुभाव
गोपीराज महानुभाव
पंडित भीष्माचार्यकृत "पंचवार्तिक"

---

## विभाग तिसरा. ( पृष्ठें ११९ ते २१० )

### [ अ ] महाराष्ट्रीय प्रमुख व्याकरणकार व व्याकरण-चर्चिक.

५ पंडित वैजनाथशास्त्री नागपूरकर
६ रा० ब० दादोबा पांडुरंग तर्खडकर
७ कृष्णशास्त्री गोडबोले
८ कृष्णशास्त्री चिपळूणकर
९ रामचंद्र भिकाजी जोशी
१० आप्पाजी काशीनाथ खेर
११ रामचंद्र भिकाजी गुंजीकर
१२ प्रि० गोपाळ गणेश आगरकर
१३ मोरो केशव दामले
१४ विश्वनाथ काशीनाथ राजवाडे
१५ वेदमूर्ति पांडुरंग जनार्दन पाध्ये
१६ परशुराम हरि थत्ते

## [ आ ] शालोपयोगी व्याकरणकार.

१७ गंगाधरशास्त्री फडके
१८ जगन्नाथशास्त्री क्रमवंत
१९ बाळशास्त्री जांभेकर
२० गंगाधर रामचंद्र टिळक
२१ रेव्हरेंड् गणपतराव नवलकर
२२ प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत
२३ नारायण धोंडदेव जोशी
२४ नारायणशास्त्री साठे
२५ रावजी सदाशिवशास्त्री गोडबोले
२६ विनायक कोंडदेव ओक
२७ बाळकृष्ण विष्णु भिडे
२८ गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर
२९ नारायण विठ्ठल आपटे
३० विनायक गोपाळ भावे
३१ सदाशिव नारायण कुलकर्णी
३२ घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर
३३ प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले
३४ मोरेश्वर सखाराम मोने

---

## विभाग चौथा, ( पृष्ठें २११ ते २९४ )

### [ क ] व्याकरण-प्रबन्धकार.

३५ बापूशास्त्री शुक्र
३६ रघुनाथ भास्कर गोडबोले
३७ डॉ० रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर
३८ विष्णु कृष्ण चिपळूणकर
३९ गोविंद शंकरशास्त्री बापट
४० चिंतामण विनायक वैद्य
४१ बाळ गंगाधर टिळक
४२ शिवराम महादेव परांजपे
४३ विद्याधर वामन भिडे
४४ रा० ब० काशीनाथ नारायण साने
४५ शंकर रामचंद्र हातवळणे
४६ रामचंद्र परशुराम गोडबोले
४७ प्रो० नारायण दासो बनहट्टी
४८ वासुदेव गोविंद आपटे
४९ नारायण भवानराव पावगी
५० हरि नारायण आपटे
५१ शिवराम एकनाथ भारदे
५२ डॉ० पांडुरंग दामोदर गुणे
५३ विठ्ठल रामजी शिंदे
५४ डॉ० वि० पां० चव्हाण
५५ वामन रघुनाथ वर्दे वालावलीकार
५६ पांडुरंग वामन काणे
५७ गोविंद कृष्ण मोडक
५८ कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी
५९ ना. यादव माधव काळे
६० कविभूषण बळवंत गणेश खापर्डे
६१ वामन मल्हार जोशी
६२ बॅ० विनायकराव सावरकर
६३ नारायण गोविंद चापेकर

### [ ख ] छन्दःशास्त्रकार.

६४ रामजोशी
६५ परशुरामतात्या गोडबोले
६६ गणेशशास्त्री लेले
६७ रंगाचार्य रड्डी शास्त्री
६८ माधव त्रिंबक पटवर्धन

---

## विभाग पांचवा, ( पृष्ठें २९५ ते ३०८ )

### मराठी भाषेचे युरोपियन प्रबन्धकार.

६९ फादर स्टीफन्स
७० डॉ० वुइल्यम कॅरे
७१ कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस
७२ जॉन बीम्स
७३ ऑगस्टस् फ्रेड्रिक रुडाल्फ हार्न्ले
७४ डॉ० सर जॉर्ज ग्रियर्सन
७५ प्रो० ब्लोक

## पुरवणी, ( पृष्ठें ३०९-१० )

७६ डॉ० विष्णु गोविंद चिपळोणकर

## विभाग सहावा, ( पृष्ठें ३११ ते ३५६ )

### उतारे.

१. पूर्व व्याकरणकारांची सम्भावना, २. मतामतांचा गलबला ३. संयुक्त-क्रियापद, ४. मराठीच्या धातुपाठाची आवश्यकता, ५. मराठींतील स-ला-तें प्रत्यय, ६. कार्योत्साहकांस इशारा, ७. अ-संयुक्त क्रियापदांविषयीं हट्ट, ८. वाक्यांतील उद्देश्य-व्यवस्था, ९. शब्दांचा सप्त-संख्यात्मक जाति-विभाग, १०. लेखन-शुद्धि-संभ्रम, ११. प्रौढी, १२. लोकाग्रहास्तव, १३. भावे प्रयोगांत उद्देश्यच नाहीं ! १४. शुद्धाशुद्ध विचार, १५. टिळकांचे भाषा गुरू ! १६. महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, १७. पुणेरी मराठीचें वैशिष्ट्य, १८ सुबोध व्याकरणाची आवश्यकता, १९. अप्रत्यक्ष-निवेदन-पद्धति, २०. रे० नवलकर यांच्या व्याकरणांतील विशेष, २१ भाषादूषण, २२. भाषा-दूषणाचे प्रकार, २३. शुद्धलेखन-परिषदेची कुळकथा ! २४. शुद्धलेखन-परिषदेची कुळकथा-उत्तरार्ध, २५. पूर्वींच्या अप्रसिद्ध शब्दांचें पुनरुज्जीवन, २६. फारसीचा मराठी भाषेवर परिणाम, २७. आपल्या भाषेचें पुढें काय होणार ? २८. निरंकुश कवि व व्याकरण.

# शोध.

( १ ) पृष्ठ १६ यांत ' छन्दोमञ्जरी ' या शब्दाबद्दल **छन्दोरचना** असा शब्द पाहिजे.

( २ ) पृष्ठ ६२ यांत [ १ ] हा कंस नको.

( ३ ) पृष्ठ ८९ मधील ' पञ्चवार्तिक ' ह्या मथळ्यांत ' **प** ' **ह्या अक्षरावर अनुस्वार नको.**

( ४ ) पृष्ठ १०६ मधील टीपेंत 'हीं वाकमदीगमाची गोष्ट पंचवार्तिका'च्या शेवटीं दिली आहे 'याऐवजीं '**आरंभीं पृष्ठ ८८ मध्यें दिली आहे**' असें हवें.

( ५ ) पृष्ठ १२१ यांत ' मराठी भाषेंतील पहिला लेख ' याऐवजी ' पहिला **छापील** लेख ' असें पाहिजे.

( ६ ) पृष्ठ १३१ मध्यें '**क्रीड**-पाटांगण' असें आहे, त्याऐवजीं ' **क्रीड-पाटांगण**' असें हवें.

( ७ ) पृष्ठ १३८ यांत " **रामभाऊ जोशी** हे ता० ७ सप्टेंबर १९२७ रोजीं मृत्यु पावले." हें वाक्य चरित्राचे शेवटीं पाहिजे.

( ८ ) पृष्ठ १५२ यांत शंकरराव रजावाडे, याऐवजीं **राजवाडे** असें हवें.

( ९ ) पृष्ठ १७९ यांत 'कै० गणपतराव नवलकर' असें आहे; त्याऐवजीं '**खिस्तवासी** गणपतराव नवलकर' असें पाहिजे.

( १० ) २३९ मध्यें रामचंद्र शंकर हातवळणे याऐवजीं **विनायक** शंकर हातवळणे असें हवें.

( ११ ) पृष्ठ २६६ यांत पां० वा० काणे यांच्या पुस्तकांचीं नांवें पुढील-प्रमाणें हवींतः— ( २ ) संस्कृत अलंकारशास्त्राचा इतिहास. ( ६ ) शंख व लिंखित कृत धर्मशास्त्र. बाकीचीं पुस्तकें भाषान्तरित व सटीक आहेत.

( १२ ) पृष्ठ ३०९ यांत डॉ० **त्रिपळोणकर** यांचे चरित्रास ७६ हा अंक पाहिजे.

—

# मराठी भाषेचे व्याकरणकार
## व
# व्याकरण-प्रबन्धकार.

## विभाग पहिला.

क्र. ३४५६

## १. मराठी व्याकरणाचा त्रोटक इतिहास.

आतांपर्यंत होऊन गेलेल्या मराठी व्याकरणकारांचीं व व्याकरण-व्युत्पत्ति-लेखन-शुद्धि-प्रबंधकारांचीं अल्प चरित्रें पुढें देण्यांत-आलीं-आहेत; ह्या चरित्र-कारांच्या कामगिरीवरून मराठी व्याकरणाच्या पूर्वपीठिकेसंबंधीं संक्षिप्त पण उप-युक्त तेवढीच माहिती येथें सादर करावयाची आहे. तथापि हें सांगणें अवश्य आहे कीं, आतांपर्यंत निरनिराळ्या मासिकांतून व साहित्यविषयक प्रबंधांतून जी माहिती पुढें आलेली-आहे, ती जमेस धरून हें विवेचन केलें-आहे. पुढें-मागें अधिक पुराव्यानिशीं सिद्ध अशी माहिती उपलब्ध झाल्यास, त्यांत फरक पडेल; व दुरुस्तीही करावी-लागेल; आणि तसें करण्यांत कांहीं कमीपणाही नाहीं.

मराठींतील आद्य-ग्रंथ कोणता, व मराठी आद्य-व्याकरण-ग्रंथ कोणता ह्याबद्दल विद्वानांची चर्चा मधून मधून चालूच असते. तिचा कायमचा निकाल होणें कठीणच आहे. शिवाय, पूर्वकालाच्या भाण्डारांत काय काय सांपडेल, हें कोणीं सांगावें ? म्हणून मिळेल तेवढी माहिती संग्रहित करणें एवढेंच सद्यःकर्तव्य उरतें. ह्यासंबंधीं आतांपर्यंत पुढें आलेल्या माहितीचा निष्कर्ष सामान्यतः खालील-प्रमाणें आहेः—

( १ ) पंडित **भीष्माचार्य** महानुभाव हे एक महानुभावीय मराठी व्याक-रण-प्रबंधकार १३ व्या शतकांत रामदेवराव जाधवांचे वेळीं होऊन-गेले.

ह्यांनीं व्याकरण–शास्त्रावर "नामाविभक्ति" व भाषा–शास्त्रावर "पंचवार्तिक" असे दोन ग्रंथ लिहिले–आहेत;व महानुभावांच्या अफाट ग्रंथ-सागरांत व्याकरणविषयक आणखी कांहीं ग्रंथ सांपडले–आहेत;त्यांवरून तूर्त एवढेंच म्हणतां-येईल कीं,मराठी व्याकरणविषयक प्रयत्नांत दादोबांच्या अगोदर पुष्कळांचे प्रयत्न थोडे–फार झाले–आहेत; त्यांत मानभावांचे प्रयत्न फारसे उपलब्ध झाले–नसले, तरी सर्वा-पेक्षां अगोदरचे आहेत.

ठाण्याचे विनायकराव भावे ह्यांनीं " महानुभाव कवि–काव्य–सूचि " या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध करून, त्यांत त्यांस मिळालेल्या महानु-भावीय हजारों ग्रंथांची व ग्रंथकारांची यादी दिली–आहे. ( किं० १ रु० ) ती चाळली असतां, तींत व्याकरण–विषयक कांहीं ग्रंथ असावे, असें पुस्तकांच्या नांवावरून वाटतें. पण ग्रंथ आपणां महाराष्ट्रीयांस उपलब्ध न झाल्यानें, त्यां-बद्दल निश्चित कांहींच लिहितां–येत–नाहीं. वरील सूचीच्या प्रस्तावनेंत विना-यकरावजी भावे म्हणतात—

" या महानुभावी ग्रंथांचा प्रचंड ठेवा आमच्या नजरेसमोर पडेपर्यंत ज्ञाने-श्वरापूर्वी मराठींत ग्रंथरचना झाली नाहीं, सभासदी बखरीपूर्वी मराठींत गद्य-ग्रंथ कोणीं लिहिले नाहींत, वामनानेंच अनेक वृत्तात्मक रचनेस प्रथम सुरवात केली, इंग्रजांच्या कृपा-प्रसादापूर्वी व्याकरणाचा कांहींही संस्कार मराठी भाषेला घडला नाहीं, इंग्रज सरकारनेंच आमच्या भाषेचा कोश करण्याची कल्पित प्रथमच योजून ती तडीस नेली, वगैरे वल्गना आपण हमेशा करीत होतों; आणि हा समज इतका दृढ झाला–होता कीं, लहानांपासून थोरां-पर्यंत त्याचे विरुद्ध विधान कोणास खरेंही वाटत नसे. वुइल्सन कॉलेज, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, वगैरे संस्थांत भाषणें करण्याचे प्रसंगीं, व इतर खासगी मंडळींतही ह्या दुर्ग्रहाचा चांगला अनुभव आल्यामुळें, या गोष्टीं-विषयीं वितंडवाद शहाण्यांच्या बैठकींत, फारसा करण्याच्या भानगडींत मी पडत नसें. पण आतां या यादीनें हे समज दूर होतील, असा मला अंधुक भर-वसा वाटतो. अंधुक म्हणण्याचें कारण एकदां करून घेतलेला ग्रह सोडून देणें हें फार दुरापास्त असतें. "

महानुभावीयांबद्दलच्या आमच्या वरील विधानास आणखी एक आधार मिळाला–आहे. महानुभावीयांच्या व्याकरणसंबंधीं ग्रंथांविषयीं चौकशी करीत असतां, रा० विठ्ठल रामजी शिंदे ह्यांनीं मला पुण्याचे महानुभाव मठांतील

अधिपति गोविंदराज ( ज्ञानसिंह-कर्ते ) यांचें नांव सुचविलें. त्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला; पण सहा महिन्यांनीं ते पंजाबांतून परत आल्यावर, त्यांचें पत्र आलें कीं, आपण रुद्धपुर ( अमरावती ) येथील महंत गोपीराज महानुभाव यांजकडे मागणी करावी. मजजवळ आमचे व्याकरण-ग्रंथ नाहींत. पुढें गोपीराज यांजकडून पत्र आलें; त्यांत खालील मजकूर आहे—

" श्रीयुत मान्यवर साविनय जयश्री चक्रधर आपुलें कार्ड मिळालें, व्याकरण विष्यावर ग्रंथकार पं० भीष्माचार्यादि दोन-चार महानुभाव संस्थेक लेखकार झाले आहेत. त्यांचे ग्रंथ उपलब्ध आहेत, परंतु त्या ग्रंथांचा संग्रह ज्या ज्या महात्म्यांजवळ आहे, ते दाखविण्यास किंवा ग्रंथ देण्यास राजू नाहींत. तरीपण मी या कामाची व ग्रंथ मिळविण्याची अतोनात खटपट करितों. परंतु हें काम जलदी होण्याचा संभव नाहीं. त्याचे कार्ण ग्रंथ पुणें प्रांतीस एकाजवळ तर दुसरा निजाम प्रांतीस, तिसरें वराड, तर चौथे फ्रॉंटीयर पंजाबमध्यें. मग त्या ग्रंथास प्राप्त करून-एकात्रित करण्यांस किंवा आपल्याकडे पाठविण्यांस, या संस्थेचे लोक अंधपरंपरेप्रमाणें दुसऱ्यास ग्रंथ दाखवीणें हें वेड डोक्यांतून निघत नाहीं. किंव्हां हा ग्रंथ पुनः माघारा मिळतो, किंव्हां नाहीं असे प्रकार बाधक्त देणारे आहेत. त्यांत अम्ही परदेशस्थ. परके समझून दक्षिणत्य लोक अलिकडे बरीच कागाळीही पण करूं लागले आहेत. असो. तरी तुमच्या कार्डप्रमाणें " नवसारी " उमरावतीजवळ १ कोसावर महानुभाव संस्थेचे लोक ५।६ हजार जमणार आहेत, तर त्या मंडळीपुढें हा कार्ड विषय मांडतो तर त्याचा काय उत्तर मिळतो ? नंतर आपणास कळवू.-नवसारीस २५।२।२७ ला महानुभाव लोक गोळा होणार आहेत. अभिष्कोत्सव भेटी मंगल काळ होणार आहे. मी त्या काळीं जरूर तेथें जातो, आणि आपणांस कळवीतो. "

ह्या पत्रावरून महानुभावांचे कांहीं व्याकरण-ग्रंथ, आहेत;एवढें निर्विवाद ठरतें. मग त्यांत विषयप्रतिपादन कशा प्रकारचें आहे, हा प्रश्न निराळा.

( २ ) **फादर स्टीफन्स** नांवाच्या एका इंग्रज गृहस्थांनीं "A Grammar of the Koukani Laguvage" या नांवाचें कोंकणी भाषेचें एक व्याकरण लिहिलें-होतें. त्याची पहिली आव्रात्ति फादर स्टीफन्सच्या मरणानंतर इ० स० १६४० त गोमांतकांत रायतूर ( पोर्टुगीज उच्चार राशील ) येथें निघाली. दुसरी आव्रात्ति १८५७ मध्यें निघाली. त्याची प्रत गोमांतकांत विद्या-

भिलाषी अनेक गृहस्थांजवळ अजूनही सांपडेल. आपण ज्या पुणेरी मराठीबद्दल नेहमीं व्याकरणांत लिहीत-असतों, त्या मराठीचें हें व्याकरण नसून, कोंकणी मराठीचेंच तें व्याकरण आहे, असें म्हणतात. ( 'भारद्वाज' वि०वि० जुलै १९१७ पृ० २८९ ).

(३) अनेक भाषाकोविद डॉ० **ग्रीयर्सन** यांच्या "Linguistic survey of india" ह्या पुस्तकांत मराठी भाषेचीं व्याकरणें व वाचन-पुस्तकें यांची यादी आहे, त्यांत "निजामशाही व आदिलशाही राज्यांतील बहुजनांच्या वहिवाटींत असलेल्या मराठीचें व्याकरण" ह्या पुस्तकाचें नांव आहे. हें पुस्तक १७७८ त प्रथम प्रसिद्ध झालें; व त्याची दुसरी आवृत्ति पोर्तुगालची राजधानी लिस्बन येथें १८२५ त प्रसिद्ध झाली. ( लेखक व प्रकाशक यांचीं नांवें कळत-नाहींत. ) हेंही व्याकरण आमच्या 'पुणेरी' मराठीचें आहे, असें म्हणतां-येत-नाहीं. ( न० यु० नोव्हें० १९१७, पृ० ७७, ना० र० वर्दे ).

( ४ ) यानंतर आणखी एक शोध अलीकडे पुढें आलेला आहे. कलकत्त्या-जवळ श्रीरामपुर हें एक पूर्वी डच लोकांचें ठिकाण होतें. तेथें डॉ० वुइल्यम **कॅरे** ( Carey ) नांवाचे एक मिशनरी गृहस्थ विलायतेहून आले. हे आपल्या मूळच्या गांवीं फाटके जोडे शिवण्याचें काम करीत-असत. तें काम घाणेरडें व त्यांना जमेना; परंतु हुशार असल्यामुळें १७९३ त धर्मोपदेशकाची जागा पत्करून ते हिंदुस्थानांत आले. पुढें १८०० मध्यें लॉर्ड वेल्सली यांनीं कलकत्त्यास फोर्ट वुइल्यम किल्ल्यांत, इंग्रज लोकांस देशी भाषा शिकविण्याकरितां "कलकत्ता कॉलेज" काढिलें; त्यांत डॉ० कॅरे यांस बंगाली, मराठी व संस्कृतचे प्रोफेसर नेमण्यांत-आलें. यापूर्वी श्रीरामपुर येथें त्यांनीं स्वतःचा छापखाना काढिला व बायबलाचीं ४० भाषांत भाषान्तरें छापिलीं. ह्याच गृहस्थांनीं सन १८०५ त मराठीचें व्याकरण श्रीरामपुर येथें छापिलें; तथापि हा ग्रंथही "मराठी व्याकरण" हा नसून, इंग्रजी भाषेंत छापिलेलें मराठीचें व्याकरण आहे. डॉ० कॅरे हे १८३४ त मृत्यु पावले. ह्यांच्या व्याकरणाचें मुखपृष्ठ व डॉ० कॅरेचे साह्यकर्ते भाषांतरकार, ह्यांचे फोटो उपलब्ध आहेत. डॉ० कॅरे यांचा मराठीचा मदतनीस भाषांतरकार पंडित **वैजनाथ** किंवा **वैजनाथ** शर्मा हा नागपूरकर भोंसल्यांचे वकील वेणीराम पंडित ह्यांचा आश्रित असावा, असें दिसतें. ( न० यु० फेब्रु० १९१४, सुं० वैद्य ).

वरील तिन्ही प्रयत्नांसंबंधीं विचार केल्यास, मिशनऱ्यांच्या अचाट उद्योगाचें कौतुक वाटल्यावांचून राहात-नाहीं. मराठी आद्य व्याकरणकार कोण ह्याचा

निर्णय करतेवेळीं जरी ह्या मूळ पीठिकेकडे लक्ष देणें जरूर आहे, तरी एका विचक्षण गृहस्थांनीं म्हटल्याप्रमाणें " ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांना एकादा नवीन विषय शिकवितांना जीं टांचणें तयार करितात, तसल्या प्रकारच्या टांचणवजा पुस्तकांना आद्यग्रंथ व त्यांच्या कर्त्यांना आद्यग्रंथकार म्हणतां येईल कीं काय " याची शंकाच आहे. असो. वरच्या पोर्तुगीज-मराठी व्याकरणाप्रमाणें फार तर हें इंग्रजी-मराठी व्याकरण म्हणतां-येईल; इतकेंच.

( ५ ) यानंतर आपल्यास महाराष्ट्रांतील प्रयत्नांकडे वळावें-लागतें. मराठींतील प्रारंभींचे ग्रंथ मानभावांचे आहेत, ही गोष्ट आतां सर्वसंमत झाली-आहे. मानभावांनीं आपल्या धर्मग्रंथांची भाषा मराठीच ठेविली असल्यामुळें ते आपल्या धर्मग्रंथांचें अध्ययन काळजीपूर्वक करीत; ह्यामुळें त्यांच्यांत प्रारंभीं मराठीचीं टिप्पण-वजा व्याकरणें झालीं-आहेत, हें साहजिकच आहे; त्यांपैकीं पंडित **भीष्माचार्य** महानुभावांच्या ग्रंथांचा पूर्वीं उल्लेख केलाच-आहे. तथापि ह्या लोकांनीं पुष्कळ दिवसपर्यंत आपलें वाङ्मय गुप्त ठेविल्यामुळें, वैद्यांच्या मात्रांप्रमाणें अथवा विहिरींतील खजिन्याप्रमाणें तें पुष्कळ दिवस पडीत राहिलें. अखेर वि० का० राजवाडे यांनीं मानभावी ग्रंथांच्या पेटीचें कुलूप आपल्या बुद्धिबलानें फोडिलें; त्याचप्रमाणें ठाण्याच्या विनायकराव भाव्यांच्या हातींही त्यांपैकीं कांहीं ऐवज लागला; आणि आतां तर यवतमाळचे वकील यशवंत खुशालराव देशपांडे ह्यांना त्यांचें बरेंच ग्रंथभाण्डार खुलें झालें-आहे. त्यांतून शोधतां शोधतां, मानभावांचे आणखी कांहीं जुने व्याकरण-ग्रंथ बाहेर आले-आहेत;*शब्दांचीं रूपें.समास व मानभावी ग्रंथांसाठीं ठरविलेली वाक्यरचना यांचे

---

* तारीख २१।३।२७ च्या पत्रांत महन्त गोपीराज ह्यांनीं महानुभावीय व्याकरणकारांपैकीं कांहींचीं नांवें लिहून पाठविलीं-आहेत; तीं:—

महानुभावीय व्याकरणकार.

( १ ) **आनेराज व्यास** व्याकरणशास्त्राचे लक्षणकार.
( २ ) **कवीश्वर व्यास** व्याकर्ण-निबन्ध-लेखकार.
( ३ ) पं० **भीष्माचार्य** व्याकरणकार ( तेरावें शतक; पोथी मनमाडनजीक कर्जगांव येथील मठांत आहे. )
( ४ ) पं० श्री **विश्वनाथ वर्धनस्थ** व्याकर्णप्रबन्धकार.

हे सर्व अर्थात् फादर स्टीफन्सच्या पूर्वींचे मराठी व्याकरण-चार्चिक आहेत, हें उघड आहे. यांविषयीं व यांच्या ग्रंथांविषयीं माहिती मिळाली, ती स्वतंत्रपणें दुसऱ्या विभागांत दिली आहे.

त्यांतून नियम आहेत; आतां हे प्रयत्न जमेस धरल्यावांचून गत्यन्तर नाहीं; आणि यांचे ग्रंथ पाहिल्यावांचून त्यांबद्दल कांहीं लिहितांही येत–नाहीं.

( ६ ) सन १८२२ मध्यें ह्या इलाख्यांत शाळा स्थापण्याचें सरकारनें ठरविलें. त्यावेळपर्यंत मराठी व्याकरणाची कोणास फारशी जरूरी वाटलेली दिसत–नाहीं. अगोदर सार्वत्रिक शिक्षणास अनुकूल अशी त्यावेळच्या पूर्वीची परिस्थिति नव्हतीच.. जिकडे–तिकडे धामधूम. परंतु पुढें पुढें ह्या इंग्रज सरकारची स्थिरस्थावर झाल्यानंतर व मुद्रण–कला विलायतेंतून इकडे आल्यानंतर शिक्षण–प्रसाराचें काम जास्त व्यवस्थित रीतीनें व जोरानें सुरू झालें; आणि त्यामुळें अनेक गोष्टींची जरूरी भासूं–लागली. त्याचप्रमाणें मराठी व्याकरणाकडेही कांहीं मंडळींचें लक्ष गेलें. त्यावेळपर्यंत म्हणजे १८२४ पर्यंत " महाराष्ट्र भाषेचें व्याकरण हा शब्द–देखील ऐकण्यांत नव्हता " असें **गंगाधरशास्त्री फडके** रा० प्रांत अष्टागर हे आपल्या १८५० सालीं छापलेल्या व्याकरणाच्या ४ थ्या आवृत्तींत म्हणतात– " १८२२ त नें० ए० सोसायटीचे प्रमुख सभासद अज्जम कर्नेल जॉर्ज जर्व्हिस ह्यांनीं तीन पंडित मजसुद्धां ठेविले. मग संस्कृत–व्याकरणाध्ययनबलेंकरून एका वर्षांत व्याकरण केलें. बारा वर्षें म्हणजे १८३६ पर्यंत हेंच चाललें. ह्याच्या हाती प्रती शेंकडों असत. १८३६ त सदर ग्रंथास संवादरूप देऊन, तो सुधारून छापिला. १८३८ त त्याची ' मजला न कळतां ' दुसरी आवृत्ति निघाली. तिसऱ्या आवृत्तीचे वेळीं दहा महिने श्रम केले व ...........सर्वांचे विचारें छापिला. " ह्या शास्त्रीमंडळांत जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे व गंगाधरशास्त्री फडके हे असून, शेवटच्या गृहस्थांनीं १८३६ त हें व्याकरण छापण्याचें श्रेय संपादिलें. त्यापूर्वी तें छापिलेलें नव्हतें, हें त्यांच्याच लिहिण्यावरून उघड दिसतें.

ह्याशिवाय मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांत एक लेखी व्याकरण आहे, त्यांतही असा उल्लेख आहे कीं, " जर्व्हिससाहेब यांच्या आज्ञेवरून वरील तिघां शास्त्र्यांनीं हें महाराष्ट्रभाषेचें व्याकरण पूर्ण करून छापिलें. याचा संक्षेप रामचंद्रशास्त्री जन्हवेकर यांनीं केला. त्याचप्रमाणें प्रति दुर्मिळ झाल्या म्हणून मी ( ? ) हा नवीन ग्रंथ फार संक्षिप्त केला. ह्यांत कुशाग्रबुद्धि जे बाळशास्त्री जांभेकर ( ह्यांनीं ज्या ) युक्ति सुचविल्या त्यांचा संग्रह करून, त्यांस दाखवून हा ग्रंथ

छापिला. " ( हें बहुधा गंगाधरशास्त्री फडक्यांचें वरील व्याकरणच दिसतें )*

१८२७ सालीं व्याकरण-शिक्षणाची स्थिति दादोबा येणेंप्रमाणें वर्णितातः—" **बापूशास्त्री शुक्ल** यांची आमचे शाळेंत नेमणूक होण्यापूर्वीं रामचंद्रशास्त्री व इतर एक-दोन पंडित ह्यांनीं प्रश्नोत्तररूपानें एक लहानसें मराठी व्याकरण लिहिलेलें होतें. मराठी शाळेच्या पहिल्या-दुसऱ्या यत्तेंत ह्या व्याकरणाच्या प्रति लिहून, त्यांवरून मुलें शिकत-होतीं. बापूशास्त्री आल्यावर त्यांनीं ह्या व्याकरणाची गरज न ठेवतां, आपण तोंडानें मुलांकडून वाक्यें वाचवून, त्यांचें व्याकरण ते सांगूं-लागले. ते आम्हांपाशीं म्हणत-असल्या भुसकट व्याकरणाची मला काय गरज आहे ? मी तुम्हांस स्वतंत्र रीतीनेंच व्याकरण सांगेन. " ( दादोबा आत्म० च०, पांगारकर).

वरच्या विवेचनावरून हें ध्यानीं येईल कीं, ( १ ) वरील बहुतेक शास्त्री मंडळी अष्टागर प्रांतांतील होती. ( २ ) जर्व्हिस साहेबासारख्यांनीं त्यांना हाताशीं धरून शिक्षणोपयोगी कामें करवून-घेतलीं. ( ३ ) १८२२ मध्यें शाळा सुरु करण्याचें ठरल्यानंतर शालोपयोगी ग्रंथांची जरूर भासूं-लागली. ( ४ ) मागें दिलेल्या तीन शास्त्र्यांनीं त्या सुमारास, जर्व्हिस साहेबांच्या प्रेरणेनें मराठी व्याकरण-रचना केली. ( ५ ) १८२४ पर्यंत मराठींत व्याकरण ग्रंथाचें नांवही नव्हतें. ( ६ ) त्यासालीं प्रथम रामचंद्रशास्त्री जन्हवेकर ह्यांनीं ह्या तीन शास्त्र्यांच्या मोठ्या व्याकरणाचा संक्षेप करून, त्यांच्या हातीं प्रति जिकडे तिकडे पसरल्या. ( ७ ) बारा वर्षें हाच क्रम चालू होता. ( ८ ) तीन शास्त्र्यांचें वरील मोठें व्याकरण छापण्यास योग्य झालें-होतें, परंतु छापलें-नव्हतें. ( ९ ) १८३६ त गंगाधरशास्त्री फडके ह्यांनीं आणखी संक्षेप करून व गुरु-शिष्य-संवादरूप देऊन, हें व्याकरण शिळाप्रेसवर प्रथम छापिलें.

---

*मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहाल्यांत गंगाधरशास्त्री फडके ह्यांच्या ह्या व्याकरणाची प्रत मला प्रत्यक्ष पाहण्यास मिळाली. ती सन १८९० मधील चौथी आवृत्ति आहे. गंगाधरशास्त्र्यांचें पहिलें संस्कृताध्ययनबलेंकरून केलेलें व ज्याच्या हातीं प्रति केल्या जात असत, तें व्याकरण विस्तृत असावें, असें दिसतें. कारण लाघवार्थ कमी करून दुसरी आवृत्ति गुरु-शिष्य-संवादरूप देऊन छापिली; असें त्यांनींच लिहिलें-आहे. ह्या व्याकरणांत वैशिष्ट्य असें कांहींच आढळून-आलें-नाहीं.

(१०)दादोबांच्या व्याकरणाच्या किती दिवस अगर महिने अगोदर कीं मागून, हें सांगतां-येत-नाहीं. ( ११ ) याच्या आणखीही आवृत्ति निघाल्या. *

( ७ ) यानंतरचा मराठी व्याकरणासंबंधींचा मोठा व नांव घेण्यासारखा आणि सु-संघटित प्रयत्न **दादोकृत** " महाराष्ट्र भाषेचें व्याकरण " हा होय. दादोबांचें स्वतंत्र चरित्र पुढें आलेंच आहे. त्याचप्रमाणें रा० रा० लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या संग्रहीं असलेलें त्यांचें आत्मचरित्र थोडेंसें प्रसिद्ध झालें-आहे. संपूर्ण चरित्र ते ( पांगारकरबुवा ) लौकरच प्रसिद्ध करणार-आहेत. त्या चरित्रांतील दादोबांच्या स्वतःच्या लिहिण्यावरून दादोबा हे खरोखरच महाराष्ट्र भाषेचे अभिमानी, शोधक, प्रेमळ व सालस गृहस्थ होते, असें मानण्यास कांहींच हरकत दिसत-नाहीं. आणि त्यांचा यशोदा-पांडुरंगी हा ग्रंथ त्यांच्या चिकित्सक व विवेचक-बुद्धीची साक्ष देतो. दादोबांचें व्याकरण सन १८३६ त गणपत कृष्णाजींच्या शिळा-प्रेसवर प्रथम छापलें-गेलें; व त्याची प्रत त्यांस माळव्यांत ' जावरा ' येथें रोजगारावर गेले असतां तिकडे मिळाली; हें त्यांच्या चरित्रांत आलेंच-आहे. तथापि दादोबांच्या ह्या व्याकरण-पुस्तकासंबंधींही त्यावेळीं कांहीं आक्षेप नव्हते, असें नाहीं; त्याविषयीं दादोबा थोडेसे रंजीस पावून म्हणतात-"अलीकडे परोत्कर्षासहिष्णु स्वभावाच्या कांहीं मंडळींनीं आमच्याविषयीं ' मयत बाळशास्त्री जांभेकर यांचे कागदपत्र हातीं लागल्यावर त्यावरून हें व्याकरण आम्हीं रचिलें व आपल्या नांवानें प्रसिद्ध केलें ' अशी कंडाळी उठविल्याचें ऐकितों. वस्तुतः त्या गृहस्थाच्या किंवा कोणाच्याही हातचा एक कागदाचा चिठोराही आम्हीं पाहिला-नाहीं !" दादोबांचें हें म्हणणें त्यांच्या कृतीवरून अगदीं प्रांजलपणाचें दिसतें. कारण, व्याकरण-ग्रंथ दुसऱ्याचे चिटोरे

---

* ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांत दादोबांच्या महाराष्ट्र भाषेच्या मोठ्या व्याकरणाची गणपत कृष्णाजींच्या शिळाप्रेसवर छापिलेली पहिली आवृत्ति पहावयास मिळाली; तींत प्रस्तावनेंत स्पष्ट टीप दिली-आहे कीं, " ह्या व्याकरणापूर्वीं दोन व्याकरणें प्रसिद्ध झालीं-आहेत. " आतां ह्यांपैकीं एक गंगाधरशास्त्री फडके यांचें हें उघड आहे; परंतु दुसरें कोणाचें छापलें-होतें, हें कळत-नाहीं. पुढें एका ठिकाणीं उल्लेख केल्याप्रमाणें रा० पिसुर्लेकरांचे "**सखाराम नारायण कामत**" किंवा रा० ' भारद्वाजां ' चे "**इब्राहीम कवि**" यांचीं तीं नाहींत, हें उघडच आहे; कारण, तीं मुळीं छापिलीं-गेलींच-नाहींत.

जमवून कितपत सुसंगत ग्रथितां–येईल, ही एक गोष्ट; दुसरें त्यांच्या व्याकरणांत किती तरी विचार व रचना येथून तेथपर्यंत त्यांची स्वतःचीच व स्वतंत्र अशी निःसंशय रीतीनें दिसून–येते. त्याचप्रमाणें मराठी भाषेच्या रूपांविषयीं त्यांचें स्वतंत्र वाचन व स्वतंत्र शोधन जागोजाग आढळून–येतें, ही तिसरी गोष्ट; आणि ज्याला एवढें सगळें स्वतंत्रपणें करतां–येतें, तो आपल्या लाभासाठीं दुसऱ्यांचीं चिठोरीं जमवून, त्यांचा नामानिर्देशही न करितां, बेधडक शिष्ट–असंमत अपमार्गप्रवतक होईल, हें विश्वसनीय नाहीं; ही चवथी गोष्ट. ह्या सर्वांवरून वरील कंडाळ्यांत कांहीं अर्थ नाहीं, असेंच त्रयस्थ वृत्तीनें आढळून—येतें. असो.

**दादोकृत** " महाराष्ट्र भाषेचें व्याकरण " हा ग्रंथ सर्वांस माहीतच आहे. मागील प्रत्येक व्याकरण व ह्यानंतरचीं व्याकरणें ह्यांत कमी–आधिक काय आहे, हें अन्यत्र संक्षेपतः सांगावयाचेंच आहे; ह्यामुळें पुढील प्रयत्नांची नोंद प्रथम करितों. एवढें मात्र खरें कीं, आतांपर्यंत (१८३६) झालेल्या मराठीच्या व्याकरण–पुस्तकांत दादोबांचेंच पुस्तक ग्रंथ या नांवास शोभणारें होईल, हें निर्विवाद आहे. दादोबांचा जन्म १८१४ त झाला; तेव्हां सन १८३६ त म्हणजे २२ व्या वर्षी त्यांनीं त्यांच्याच म्हणण्याप्रमाणें अल्पवयांत आपलें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें; ही त्यांच्या बुद्धिमत्तेची व मराठीच्या त्यांच्या अभ्यासाची आणि अभिमानाची निदर्शकच गोष्ट आहे, यांत शंका नाहीं. पुढें तें अपुरें पडलें, म्हणून सरकारी कमिटीतर्फे बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांच्या शिफारशीनें सुरतेस दुसरी विस्तृत आवृत्ति लिहून, दादोबांनीं १८५० त प्रसिद्ध केली. या ग्रंथाच्या आठांपेक्षां जास्त आवृत्ति निघाल्या–असाव्या. पुढें पुढें यांत पुरवण्यांची पुष्कळ भर पडत–गेली–आहे. *

( ८ ) १८३९त विलायतेंत मराठीचें एक हास्यास्पद असें व्याकरण प्रसिद्ध झाल्याचा दाखला सांपडतो. डॉ० कॅरेचें व्याकरण दुर्मिळ झालें, म्हणून एका

---

* मुंबईच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांतील आवृत्तींत दादोबांच्या मोठ्या व्याकरणाच्या आवृत्तींचे सन पुढीलप्रमाणें दिले आहेतः—पहिली आवृत्ति १८३६, दुसरी १८४५, चौथी १८६५.

ज्ञानकोशांत १८३६, १८५०, १८५६, १८६३, व १८६७ असे सन दिलेले–आहेत.

ब्राह्मण पंडिताच्या हस्तलिखिताचा ' विशेष ' उपयोग करून, कर्त्यानें हें व्याकरण प्रसिद्ध केलें-होतें. कॅरेचें व्याकरण समाधानकारक उतरलें-नाहीं; सबब, विलायतेंतील हेलिबरी येथील " ईस्ट इंडिया कॉलेज "च्या मराठी वर्गासाठीं हें पुस्तक कर्त्यानें निर्मिलें. यांतील मोडी अक्षरें कर्त्याच्या स्वदस्तुरचीं शिळेवर घातलेलीं असून, त्यांत पुढील मजकूर आहे—

" येके महाजनाने आपले पुत्रास अंतकालीं चार गोष्टी सांगून मेला जे अरे-पुत्रा राज्याचे अनुग्रहाचा विश्वास करू नको आणि कोत्वालाची प्रीति मनांत आणू नको आणखीन धाकटे लोकाशी मैत्री करू नको आणीक मनाची गोष्टी बायकोस सांगू नको "

हें लिहिणारा पंडित त्या विलायती व्याकरणकर्त्यास ब्राह्मणांपैकीं कोणी मिळाला--होता, कीं कोणी आपणास ब्राह्मण म्हणवून घेणारा घाटी त्यास पंडित म्हणून पैदा झाला-होता, ईश्वर जाणे!

( ९ ) वर सांगितलेले गंगाधरशास्त्री फडके ह्यांचें म्हणजे शास्त्री-मंडळाचें व्याकरण १८३६ तच छापलें-गेलें. त्याच वर्षी थोडे महिने मागून दादोबांचेंही मराठी भाषेचें व्याकरण प्रसिद्ध झालें. यानंतर हीं दोन्हीं व्याकरणें मोठीं म्हणून, संक्षेपतः व संवादरूपच असें **जांभेकरशास्त्र्यांचें** " बाल व्याकरण " प्रसिद्ध झालें. हें व्याकरण ताडून पाहतां शास्त्री-मंडळाच्याच व्याकरणाची ती सुधारलेली आवृत्ति आहे, असें दिसतें. आणि ह्या दोन व्याकरणांच्या प्रत्यक्ष दर्शनावरून व दादोबांच्या व्याकरणाशीं त्यांची तुलना करून पाहतां,वर उल्लेखिलेल्या दादोबांच्या संबंधीं कंडाळ्या निरर्थक आहेत, हें स्पष्ट होतें.

(१०) जांभेकर ह्यांच्याच सारखा प्रयत्न **गंगाधरशास्त्री टिळक** ह्यांनीं केला; व शाळांतील विद्यार्थ्यांकरितां सन १८५९ च्या सुमारास, दादोबांच्याच व्याकणाचा संक्षेप करून, त्यांनीं एक " लघु व्याकरण " छापविलें. त्या कालाच्या मानानें व अगदींच नाहीं त्यांत आहे तें बरें, या न्यायानें, वरील दोन्हीं व्याकरणें ( जांभेकर व टिळक यांचीं ) शाळांतून कित्येक वर्षें चालू होतीं; व त्यांच्या आवृत्त्याही अनेक निघाल्या.

( ११ ) सन १८४० च्या सुमारास रे० **बर्जिस** ह्यांचें मराठीचें व्याकरण झालेलें-आहे; तें इंग्रजीमध्यें आहे. " त्यांत सामान्यरूप प्रकरण चांगलें असून, पाश्चात्य पद्धतीवर ग्रंथकर्त्यानें व्याकरणाची शोधपूर्वक मांडणी प्रथमतः केली. तसेंच दादोबांना आपलें पुस्तक तयार करण्याच्या कामीं ह्या व्याकरणाचा उप-

योग फार झाला असावा; " असें विद्यमान व्याकरणकार रामभाऊ जोशी यांचें मत आहे. हें जरी खरें मानलें तरी १८३६ त दादोबांनीं मोठ्या व्याकरणाची जी पहिली आवृत्ति छापिली, त्यावेळीं तरी ह्या १८४० त छापिलेल्या व्याकरणाचा त्यांस उपयोग झाला–नाहीं, हें उघड आहे. १८५० मधील त्यांच्या दुसऱ्या अगर त्यापुढील आवृत्तींत कांहीं झाला असल्यास कोण जाणे !*

( १२ ) अमेरिकन मिशन् अहंमदनगर मार्फत दहा-बारा पंडितांकडून करविलेलें एक मराठी भाषेचें व्याकरण मुंबईस मराठी ग्रंथसंग्रहालयांत १८४८ मध्यें छापलेलें आहे. त्याविषयीं व त्याच्या कर्त्याविषयीं नगरच्या मिशनकडे चौकशी करितां कांहीं माहिती उपलब्ध झाली–नाहीं.

(१३) ह्यानंतरचा मोठा प्रयत्न म्हणजे **कृष्णशास्त्री गोडबोले** ह्यांचें "मराठी भाषेचें नवीन व्याकरण " हा होय. दक्षिणाप्राईज कमिटीनें संस्कृतापासून प्राकृताचे द्वारा मराठी कशी बनली, ह्याचा ज्यांत विचार केला-आहे, असें व्याकरण लिहिण्यासाठीं बक्षिस लावून जाहिरात दिली. त्याचे परिणामीं सन १८६७ त हें व्याकरण बाहेर पडलें. यामध्यें भाषेचा ऐतिहासिकदृष्ट्या व व्युत्पत्तिदृष्ट्या चांगला विचार केलेला–आहे, आणि त्याचप्रमाणें त्या व्याकरणांत वाक्यपृथक्करण, पद्यविचार आणि प्राकृत भाषेचें संक्षिप्त व्याकरण इत्यादि गोष्टी जास्त आहेत. अभ्यासकांस अजून त्याचा उपयोग पुष्कळच होणार आहे.

( १४ ) १८७० च्या सुमारास खुद्द दादोबांकडूनच सरकारनें त्यांच्या मोठ्या व्याकरणावरून, अतिसंक्षिप्त करून, शाळांसाठीं " लघु व्याकरण " तयार करविलें. हें व्याकरण, इतर व्याकरणें सरकारी शाळांतून मंजूर आहेत, तरी अद्यापि

---

* रे० बर्जेस (Burgess) यांनीं, सन १८५४ त, अमेरिकन मिशन-मुंबई, यांचे मार्फत, परशुरामपंत तात्या व पूना कॉलेजचें शास्त्रीमंडळ ह्यांच्या मदतीनें एक मराठीचें व्याकरण इंग्रजींत प्रसिद्ध केलेलें मु० म० ग्रं० सं० त आहे० त्याच्या प्रस्तावनेंत–१. डॉ० कॅरे (Carey), २ डॉ० बॅलेंटाईन ( Ballantyne ) ३. ले० कर्नल व्हान्स केनेडी ( Vans Kennedy ) व ४. फा० स्टीफन्स ह्या पूर्व व्याकरणकारांचें काम साधारणपणें अपूर्णच आहे; त्यांतल्या त्यांत स्टीफन्सचें अधिक बरें आहे, असें लेखकाचें म्हणणें आहे. नामें चालविण्याची पद्धति संस्कृताहून निराळी आहे व क्रियापद आणि वाक्यरचना यांबद्दलही ह्या पुस्तकांत निराळेपणा आहे, असें लेखकानें लिहिलें आहे.

धूमधडाक्यानें खपत आहे. आणि त्याच्याही लाख लाख प्रतींच्या दोन डझन तरी आवृत्ति छापल्या-गेल्या-आहेत; इतकें तें मोठें शास्त्रीय नसलें, तरी सुटसुटीत सुबोध, अल्पमोली, इ० गुणसंपन्न असल्यामुळें, अजून लोकप्रिय आहे.( १९१९ आवृत्ति २४ वी. )

( १५ ) सन १८७५ च्या सुमारास **कृष्णशास्त्री चिपळूणकर** हे पुण्याच्या मेल ट्रेनिंग् कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. त्यावेळीं त्यांनीं ट्रेनिंगमधील विद्यार्थ्यांस शिकविण्यासाठीं साहजिकच व्याकरण–विषयासंबंधीं अधिक विचार केला; व आपल्या विद्यार्थ्यांपुढें दादोबांचे व्याकरणावर जी चिकित्सा केली, ती निबन्ध-रूपानें " शालापत्रकांत " प्रसिद्ध केली. ते निबन्ध अत्यन्त मार्मिकपणें लिहिले असल्यामुळें, पुढील व्याकरणकारांस त्यांच्या सूचनांचा विचार करूनच पुढें पाऊल टाकावें–लागलें. हे निबन्ध जरी मार्मिक,सरस व सुरस आहेत,तरी त्यांच्या योगानें विषयपूर्ति झाली–नाहीं; ते अर्धवटच राहिले. त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांच्या हातून एकादा स्वतंत्र व्याकरण-ग्रंथ अथवा पुस्तकही बाहेर पडूं-शकलें–नाहीं.

( १६ ) ह्यानंतर १८८९ त **रामचंद्र भिकाजी जोशी** यांनीं प्रौढबोध व्याकरण रचिलें. या पुस्तकाची रचना थोड्या निराळ्या धर्तीवर त्यांनीं केली-आहे. प्रथमतः वाक्यापासून आरंभ करून नंतर ते शब्दविचाराकडे वळले-आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांनीं पुस्तक पृथक्करण-पद्धतीनें लिहिलें–आहे. त्याच-प्रमाणें वाक्यपृथक्करण यथासांग ( ? ) घातलें-आहे. " शास्त्रीय मराठी व्याकर-णाचे कर्ते" मोरो केशव दामले यांना "व्याकरणशास्त्र कशाशीं खातात, हें कळत नव्हतें " असें ते आपल्या ' मराठी भाषेच्या घटनें'त म्हणतात. तात्पर्य, दादोबांचें ' लघु व्याकरण ' लहान व असुधारक म्हणजे नवीन पृथक्करण–पद्धतिविरहित म्हणून; तसेंच दादोबांचें मोठें व्याकरण, गोड-बोल्यांचें व्याकरण, हे मोठे व विद्यार्थ्यांस अवघड ग्रंथ म्हणून; गंगाधरशास्त्री टिळक यांचें, दादोबांची संक्षिप्त आवृत्ति लघुव्याकरण, किंवा गंगाधरशास्त्री फडके यांचें व्याकरण, ह्यांत कांहीं नाविन्य राहिलें–नाहीं म्हणून; आणि ह्यां-शिवाय चिपळूणकरांचे निबंध हे टीकात्मक म्हणून; व आणखी जास्त चांगलें व्याकरण कोणाचेंच पुढें आलें–नाहीं म्हणून; जोशी ह्यांचें व्याकरण शाळा-खात्यांत मंजूर झालें. त्याचप्रमाणें शाळेंतल्या विद्यार्थ्यांकरितां रामभाऊ जोशी ह्यांचीं " बालबोध व्याकरणें "ही निघालीं व तीं अद्यापि शाळाखात्यांत चालू आहेत. त्यांच्या व्याकरणांतील धरसोडीचे कांहीं प्रकार पुष्कळांस पसंत पडण्या-सारखे नाहींत.

( १७ ) ज्याप्रमाणें दादोबांचें व्याकरणावर कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं टीकात्मक निबंध लिहिले,त्याप्रमाणेंच **रामचंद्र भिकाजी गुंजीकर** ह्यांनीं विविध-ज्ञानविस्तारांत रामभाऊ जोशी यांच्या व्याकरणावर टीकात्मक लेख लिहिले. तेही चिपळूणकरांच्या लेखांप्रमाणेंच अत्यन्त मार्मिक आहेत. "सुबोध व्याकरण" म्हणून त्यांनीं व्याकरणाचें एक लहानसें पुस्तकही लिहिलें-आहे.*

---

* रामचंद्र भिकाजी गुंजीकर ह्यांनीं " सुबोध व्याकरण " ह्या नांवाचें पुस्तक १८८६ त छापिलें-आहे. त्याची पृष्ठसंख्या ९० असून, मुखपृष्ठावर, फक्त ' रामचंद्रकृत ' असें म्हटलें आहे. यांत (१) " लहान मुलांना विनाकारण त्रास न व्हावा, म्हणून संधि-प्रकरण शेवटीं समासाचे वेळीं घातलें आहे; ( २ ) द्वितीया व चतुर्थी यांचे काल्पनिक भेद सोडून-देऊन, त्यांचे निरनिराळे प्रत्यय दिले-आहेत; ( ३ ) कर्तरि, कर्मणि, भावे, ह्या विलक्षण ( ? ) संज्ञा न योजितां, त्यांच्या जागीं कर्त्याचें, कर्माचें, किंवा क्रियेचें प्राधान्य, इ० संज्ञा दिल्या-आहेत. ( ४ ) ' आख्यात ' हा फार उपयोगी शब्द प्रचारांत आणिला-आहे; ( ५ ) तसेंच, उत्तम, मध्यम व अन्य पुरुष, ह्या प्राचीन रीतीला मिळत्या संज्ञा प्रचारांत आणिल्या-आहेत; " असें लेखक प्रस्तावनेंत म्हणतो.

या पुस्तकांत खालील प्रकारचें वैशिष्टय आढळून-आलें:—

( १ ) स्वर म्हणजे नुसते सूर; ते १४ आहेत.

( २ ) व्यंजनें ह्म० स्वरांच्या आश्रयानें राहणारे भरतीचे वर्ण. ( ? )

( ३ ) हें नांव पुरुषाचें व हें नांव स्त्रीचें, असा जो भेद तें लिंग.

( ४ ) विभक्तिप्रत्यय—

| | | |
|---|---|---|
| प्रथमा | — | — |
| द्वितीया | ला ( स ) | ना. ( ला, स ) |
| तृतीया | नें | नीं ( हीं ) |
| चतुर्थी | साठीं | साठीं |
| पंचमी | हून ( तूंन ) | हून, ( तूंन ) |
| षष्ठी | चा | चा |
| सप्तमी | तँ | तँ |
| संबोधन | — | नो |

( ५ ) अनेकवचनी प्रत्ययापूर्वी शब्दाचा अन्त्य स्वर अनुनासिक होतो. ( ! )

( १८ ) ह्यापेक्षां विशेष क्रांतिकारक असा मराठी व्याकरण-क्षेत्रांतील लहानसा ग्रंथ म्हणजे **आगरकर** ह्यांचें " वाक्य-मीमांसा " हें पुस्तक होय. हें कर्त्याप्रमाणेंच खरोखर बहुमोल किंमतीचें आहे. भाषेंतील शब्दरूपें कोणतें कार्य करितात, हें दाखविणें व्याकरणशास्त्राचें काम, तर भाषेंतील वाक्यांत बोलणारांचें ' उद्देश्य ' काय, व त्याचें त्या उद्देश्यासंबंधीं बोलणें, सांगणें, म्हणणें किंवा विधान काय, हें तंतोतंत रीतीनें दर्शविणें न्यायशास्त्राचें काम. इंग्रजीप्रमाणें ह्या दोहोंचीही सांगड जुळविणें आवश्यकच होतें. आगरकरांच्या वाक्यमीमांसेनें ह्या विषयास भरपूर चालना देण्याचें मोठें कार्य केलें-आहे; व आतां वाक्यपृथक्करण हें मराठी व्याकरणाचें एक अंग म्हणूनच त्याशीं निगडित झालें-आहे; तें आतां कोणास टाळतां येणें शक्य नाहीं. हें काम आगरकरांच्या ह्या लहानशा पुस्तकानें केलें-आहे. सन १८८८ मध्यें हें पुस्तक छापून प्रसिद्ध झालें.

( १९ ) सन १८९६ मध्यें पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांतील शिक्षकांच्या मदतीनें रावजीशास्त्री गोडबोले ह्यांनीं " मराठी भाषेचें **मध्यम व्याकरण** " प्रसिद्ध केलें. सरकारच्या आज्ञेवरून हें पुस्तक तयार करावयाचें-होतें; परंतु रावजी शास्त्र्यांच्या चिरंजिवांकडून अखेर जें पुस्तक बाहेर पडलें, त्याचा सरकारमार्फत अगर इतर रीतीनेंही कांहींच प्रसार झाला-नाहीं !

---

( ६ ) सर्वनामें सहा. मी, तूं, तो, हा, जो, कोण.

( ७ ) अव्ययांचे भेद—१. पदार्थक ( क्रि० वि० ), २. प्रत्ययार्थक ( श० यो० ), ३ वाक्यार्थक ( केवल० ), आणि ४. संयोजक (उभयान्वयी).

( ८ ) जो कोणी कांहीं करितो, तो त्या क्रियेचा कर्ता; कर्त्याची क्रिया ज्याला घडते, तें कर्म.

याप्रकारें ह्यांच्या व्याकरणांत मौज आहे. स्वतंत्र विचारही सांपडतील; परन्तु त्यांच्या भाषेवर व शास्त्रीय विधानांवर टीका न करणेंच बरें. गुंजीकरांनीं स्वतः ' विस्तारांत ' रामभाऊ जोशी यांच्या व्याकरणावर टीका लिहितांना जितकें कौशल्य दाखविलें-आहे, त्याचा अल्पांशही त्यांच्या ह्या व्याकरणांत आढळून-येत-नाहीं. यावरून टीकेपेक्षां कृति फार अवघड असते; हेंच खरें. त्यांस शोभेसें हें व्याकरण म्हणवत-नाहीं.

( २० ) इंग्रजींत **खेर** यांचें एक मराठीचें व्याकरण प्रसिद्ध झालें; तें स्कूल फायनलसाठीं नेमिलें होतें; व त्या विद्यार्थ्यांस ह्या व्याकरणाचा पुष्कळ उपयोग झाला-असावा, यांत शंका नाहीं.

(२१) रेव्हरेंड **गणपतराव नवलकर** ह्यांचेंही एक इंग्रजी-मराठी, व त्याचेंच भाषान्तर करून निव्वळ मराठी, अशीं दोन व्याकरण-पुस्तकें प्रसिद्ध झालीं. इंग्रजी-मराठी व्याकरणाचा परकी लोकांस मराठी भाषा शिकण्यासाठीं विशेष उपयोग व्हावा, असाच कर्त्यांचा हेतु असल्यामुळें, त्याचा सामान्य जनतेंत फारसा प्रसार झाल्याचें दिसत-नाहीं.

( २२ ) ह्याशिवाय १८९६ मध्यें हरि परशुराम वागळे ( शिक्षक, इस्लाइट स्कूल-मुंबई ) यांनीं " व्याकरणसार " नांवाचें एक पुस्तक छापिलें-होतें.

( २३ ) बाळकृष्ण विष्णु भिडे ( डे० ए० इन्स्पेक्टर, खानदेश ) यांनींही एक व्याकरण लिहिलेलें त्यांच्या पश्चात् १९०३ त प्रसिद्ध झालें. त्याचप्रमाणें—

( २४ ) विनायक कोंडदेव ओक ह्यांनीं १९०५ त " अगदीं सोपें व्याकरण " म्हणून एक पुस्तक लिहिलें-होतें. तसेंच—

( २५ ) १९०६ मध्यें गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर रिटायर्ड डे० ए० इन्स्पेक्टर यांनींही " सुलभ मराठी व्याकरण " म्हणून एक पुस्तक लिहिलें-होतें.

( २६ ) गोपाळ जिवाजी केळकर यांचेंही एक व्याकरण प्रसिद्ध झालेलें आहे.

( २७ ) कृष्णाजी गोविंद सोहनी ह्यांचें "व्याकरण-संवाद" नांवाचें एक पुस्तक आहे. ह्यांशिवाय आणखी कितीक प्रयत्न मागून आढळून-आले, त्यांपैकीं कांहींचा समावेश या निबन्धाचे शेवटीं पुरवणीरूपानें केला-आहे.

( २८ ) तथापि, अगदीं अलीकडच्या प्रयत्नांत दोन-तीन प्रयत्न नांव घेण्यासारखे आहेत; ते येथें स्वतंत्र नमूद करणें अवश्य आहे. **मोरो केशव दामले**, एम्. ए; यांचें " शास्त्रीय मराठी व्याकरण " हें आतांपर्यंतच्या सर्व प्रयत्नांत बरेंच-पुढारलेलें असून, सुमारें १००० च्या वर पृष्ठांचा हा ग्रंथ विवेचन, चिकित्सा व सांगोपांग विचारपरिप्लुत असा आहे. सन १९११ त हा छापिला. प्रस्तुत पुस्तकांतल्याप्रमाणें एकंदरींत आज तरी इतका खोल विचार दुसऱ्या कोणीं केलेला दिसून-येत-नाहीं. या पुस्तकासंबंधीं विद्वानांचा मतभेद असेल, परंतु प्रचलित अनेक पुस्तकांत यांचेच व्याकरण-विषयक विचार अधिक

योग्यतेचे आहेत, हें कोणासही मान्य होईल. या पुस्तकाची दुसरी आवृत्ति गेल्या वर्षी निघाली-आहे.

( २९ ) वि० का० **राजवाडे** ह्यांचें " ज्ञानेश्वरींतील मराठीचें व्याकरण " हा ग्रंथही असाच व्याकरण-विषयाचे बाबतींत मोठ्या योग्यतेचा आहे. हा सन १९०९ मध्यें प्रसिद्ध झाला. त्याचप्रमाणें राजवाड्यांचीं

( ३० ) ' सुबन्त-विचार ' व

( ३१ ) ' तिङन्त-विचार ' हीं दोन लहानशीं पुस्तकें दामले यांच्या शास्त्रीय व्याकरणावर टीका करण्याच्या उद्देशानें लिहिलीं-असलीं, तरी तीं राजवाड्यांच्या स्वतंत्र बुद्धिमत्तेचीं द्योतक असून, व्याकरण-विषयाचे बाबतींत अत्यन्त चिन्तनीय अशींच आहेत.

( ३२ ) १९११ त " स्वर-व्यंजन-व्यवस्था " नांवाचें एक पुस्तक आगाशीचे **पाध्ये भट्टजी** यांनीं मोठ्या मार्मिकपणानें लिहिलें-आहे.

( ३३ ) थोड्या वर्षांपूर्वी पुण्याच्या मेल ट्रेनिंग् कॉलेजांतील शिक्षक ना० वि० **आपटे** ह्यांनीं आपलीं दोन पुस्तकें शाळांत चालविण्यासाठीं म्हणून प्रसिद्ध केलीं-आहेत; तीं लायब्रऱ्यांसाठीं म्हणून सरकारनें मंजूर केलीं असून, अद्यापि मुं० इलाख्यांतील प्राथमिक शाळांकरितां मान्य झालेलीं-नाहींत. वऱ्हाड शाळाखात्यानें मात्र त्यांस मंजुरी दिली-आहे. त्यांनीं " व्याकरण-प्रबोध " नांवाचें एक छोटें पुस्तक आपल्या व्याकरणाच्या समर्थनार्थ लिहिलें-आहे. यांच्या पुस्तकांत राजवाड्यांचें धोरण बऱ्याच अंशीं स्वीकारलेलें दिसते.

( ३४ ) वऱ्हाडमध्यें विनायक गोपाळ भावे व सदाशिव नारायण कुळकर्णी यांनीं लिहिलेलें एक पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें-आहे; त्यांत दामले यांच्या " शास्त्रीय मराठी व्याकरण-"चाच सर्वस्वीं अनुवाद केला-आहे. हें पुस्तक वऱ्हाड शाळाखात्यानें मान्य केलें-आहे, त्यांत स्वतंत्र विचार कांहीं नाहीं.

( ३५ ) न्यू इंग्लिश स्कूल-पुणें यांतील शिक्षक घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर यांनीं " सुबोध मराठी व्याकरण " नुकतेंच छापिलें असून, तें सरकारनें प्राथमिक शाळांसाठीं मंजूर केलें-आहे. या पुस्तकांत शास्त्रीयतेपेक्षां सोपेपणावर भर अधिक दिलेला-दिसतो; परंतु शास्त्रीयता न सोडतां सोपेपणा आणणें शक्य आहे, व त्यांतच लेखकाचें खरें कौशल्य आहे.

मराठीच्या युरोपियन व्याकरण-प्रबन्धकारांत खालील मंडळी नामनिर्देश करण्यासारखी आहेत—

ग्रंथ संग्रहालय
१०८७८

१. फादर स्टीफन्स.
२. डॉ० व्हुइल्यम केरे.
३. कर्नल जार्व्हिस.
४. रेव्हरेंड बर्जेस.
५. जॉन बीम्स.
६. होर्नेल
७. डॉ० ग्रियर्सन.

आणखी पुष्कळ सापडतील, पण त्यांच्या कामगिरीच्या मानानें ही यादी आणखी लांबविण्याचें कांही कारण दिसत नाहीं.

* * * * * *

लेखनशुद्धीसंबंधींच्या प्रयत्नांत काशीनाथ नारायण साने, रामचंद्र परशुराम गोडबोले व शंकर रामचंद्र हातवळणे इत्यादि गृहस्थांनीं मोठीच कामगिरी बजाविली–आहे. रामचंद्र भिकाजी जोशी ह्यांचाही ह्यासंबंधीं सुधारक दृष्टीनें मोठाच कटाक्ष आहे. मोरो केशव दामले, विनायक कोंडदेव ओक, इ० प्रतिपक्षानेंही लेखनशुद्धीसंबंधीं साने यांच्या सरकारी कमिटीविरुद्ध पुष्कळ खळबळ उडवून-दिली-होती. बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर ह्यांनीं नुकतेंच मराठी लेखनशुद्धीसंबंधीं ‘ केसरीं ’त लेख लिहून, ह्या विषयाकडे महाराष्ट्रीयांचें स्वाभिमानपूर्वक लक्ष वेधण्याचें काम केलें-आहे.

व्युत्पत्ति–प्रकरणीं ज्यांनी विशेष लक्ष घातलें, त्यांत गोविंद शंकरशास्त्री बापट व त्यांच्याच व्युत्पत्तिप्रदीपाची नवीन आवृत्ति संशोधित करणारे गोविंद कृष्ण मोडक, रामभाऊ जोशी, कृष्णशास्त्री गोडबोले, विश्वनाथ काशीनाथ राजवाडे, शिवरामपंत परांजपे इत्यादि मंडळी प्रमुख व नामनिर्देश करण्यास योग्य अशी आहेत. त्याचप्रमाणें विठ्ठल रामजी शिंदे, व डॉ० विठ्ठल पांडुरंग चव्हाण ह्यांचेही ह्यासंबंधाचे लेख अलीकडे पुढें आलेले–आहेत.

ह्यांशिवाय, व्याकरणासंबंधी लेखनशुद्धीसंबंधीं, व्युत्पत्तीसंबंधीं,व पद्य-व्याकरण-संबधीं अनेक निबंध, प्रबन्ध, लहानसहान पुस्तकें, लेख, नकाशे, वगैरे प्रसिद्ध झालेले–आहेत, त्यांचीही यादी देत बसण्याचें कारण नाहीं.

ह्याप्रमाणें व्याकरणासंबंधीं व त्याच्या उपांगासंबंधीं प्रयत्नांचा आजवरचा त्रोटक इतिहास आहे.आतां शेवटीं एका गोष्टीचा विचार करून हें प्रकरण आटपूं.

* * * * * *

मराठीचा आद्य व्याकरणकार कोण यासंबंधींचा प्रश्न मधून मधून उपस्थित होत–असतो. एका गृहस्थांनीं ह्या बाबतींत जें लिहिलें–आहे, तें विचारांत

घेण्यासारखें आहे. तें म्हणतात–"ट्रेनिंग् कॉलेजांतून शिकवितांना टिप्पणें तयार करितात, त्यांच्या कर्त्यांना आद्य–व्याकरणकार म्हणावें, कीं तीं प्रथम छापून काढणारांना म्हणावें, कीं व्याकरणावर सोपपत्तिक ग्रंथ लिहून, प्रथम प्रसिद्ध करणाराला म्हणावें ?" त्याचे मतें ह्या शेवटच्या कर्त्याला आद्य–व्याकरणकार म्हणावें. ह्या दृष्टीनें दादोबांनीं प्रथम स्वतंत्र व्याकरण लिहिलें; व्यवस्थित पद्धतीनें त्याची मांडणी केली; तें प्रथम ग्रंथ या नांवास शोभेल अशा रीतीनें छापून प्रसिद्ध केलें; आणि परिणामीं त्यांच्याच व्याकरणानें मराठी भाषेच्या लेखनाला व वळणाला स्थैर्य आलें; ह्या गोष्टी निर्विवाद खऱ्या असल्यामुळें, मराठी आद्य–व्याकरणकाराचा मान दादोबांसच देणें योग्य आहे. पण हेंही मत मानभावांचीं व्याकरणें आतां पुढें आल्यामुळें मागें पडणार हें उघड आहे. असो. *

---

* "मराठी भाषेच्या व्याकरणाची मूळपीठिका" यावर वि० ज्ञा० वि० च्या ४८ व्या पुस्तकांत, विश्वनाथशास्त्री जोशी, दा० त्रिं० जोशी, दा० कृ० करंदीकर, वि० प० दिवेकर, व 'भारद्वाज' ह्यांचे लेख प्रसिद्ध झाले-आहेत. ह्यांशिवाय, पां० स० पिसुर्लेकर, वा० द० वर्दे, वा० अ० खलप, आणि एक बडोदकर हींही मंडळी विस्तारांतील ह्या वादांत भाग घेणारी होती. त्या वादविवादावरून, अखेरीस विस्तारकर्त्यांनीं आपलें म्हणणें खालीलप्रमाणें ग्रथित केलें आहे:—

"आद्य–व्याकरणकार होण्याला आतांपर्यंत एकंदर तीन उमेदवार पुढें आलेले आहेत. ( १ ) दादोबा, ( २ ) जांभेकर, व ( ३ ) गं० शास्त्री फडके. आमच्या मतें फडके हेच मराठी आद्य–व्याकरणकार ठरतात.

डॉ० कॅरेचे १८०५ मधील व्याकरण इकडे दुर्मिळ, कोणासच माहीत नाहीं; हीच स्थिति 'भारद्वाजां'च्या **इब्राहीम** कवीच्या व्याकरणाची आहे. 'भारद्वाज' यांनीं रोममध्यें १७७८ त छापलेल्या मराठी व्याकरणाचा उल्लेख केला आहे. त्याचें नांव 'Gramation marasta' असें आहे. हेंही उपलब्ध नसल्यानें विचारांत घेतां येत नाहीं.

सन १८१९ या वर्षी **सखाराम नारायण कामत** ह्यांनीं एक व्याकरण–ग्रंथ तयार केला होता, असें रा० पिसुर्लेकर म्हणतात; पण त्यांच्या म्हणण्याप्रमाणें तें कधींच छापलें नाहीं, सारांश, सध्यांच्या उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून गंगाधरशास्त्री फडके हेच मराठीचे आद्य–व्याकरणकार होत; असें आमचें मत आहे."

दादोबांच्या अगोदरचीं व्याकरणें कांहीं वाडें व कांहीं संक्षिप्त तर कांहीं संवादरूप व जंत्रीवजा म्हणून मागें पडलीं; दादोबांचें मोठें व्याकरण फार मोठें व लघु व्याकरण फार लहान, पृथक्करणपद्धति रहित म्हणून (विद्यार्थ्यांस पूर्वी पुष्कळ उपयुक्त होतीं तरी ) मागासलीं; गोडबोले, चिपळूणकर, दामले, गुंजीकर, इत्यादिकांचीं कांहीं प्रौढ व कांहीं निबंधात्मक टीकापर पुस्तकें शाळांतील विद्यार्थ्यांना झेपण्यासारखीं नव्हतीं, म्हणून शाळांतून त्यांचा प्रसार झाला-नाहीं; रामभाऊ जोशी ह्यांचीं पुस्तकें मात्र नवीन पृथक्करण-पद्धतीनें लिहिलेलीं असल्यामुळें, खूप प्रसृत झालीं; तथापि त्यांतीलही कांहीं धरसोड कमी व्हावी, म्हणून ना० वि० आपटे ह्यांचीं पुस्तकें शाळांतील विद्यार्थ्यांकरितां पुढें आलीं. त्यांत त्यांनीं धरसोड टाळण्याचा प्रयत्न केला, ही गोष्ट खरी; तरी संयुक्त क्रियापदांच्या मराठींत बाहेरून घुसलेल्या रूपांस व त्यांच्या रूढ अर्थ-योजनेस झुगारून दिल्यामुळें मराठीला व्याकरणकाराचा हा ताबा कितपत सहन होईल, याची शंकाच आहे. अर्थात् आजही नवीन, शास्त्रीय, पृथक्करण-पद्धतीस अनुसरून, सोप्या रचनेचीं, आटोपसर, एकेका वर्गापुरतीं, अनेक अंगांचा विचार केलेलीं, अशा व्याकरण-पुस्तकांची अद्यापि जरूरी आहे. प्रत्येक पाठाची योजना तोलून, मापून, सुबोध व नवीन शिक्षणपद्धतीच्या दृष्टीनें शिक्षकांस मार्गदर्शक व विद्यार्थ्यांस सुलभ, 'व्याकरण शिकतों-आहों' असें न भासविणारीं, आणि सोपेपणाच्या नांवाखालीं भरमसाठ अशास्त्रीय विधानें दडपून न दिलेलीं, अशीं पुस्तकें पाहिजे-आहेत. सध्यांच्या मत-मतांतरांच्या गलबल्यांत एकदमच अशीं पुस्तकें बाहेर पडतील व तीं सर्वमान्य होतील, ह्या गोष्टी अशक्य आहेत; ह्याप्रमाणें मराठी व्याकरणाचा त्रोटक इतिहास आहे.

# पुरवणी.

मुंबईच्या व ठाण्याच्या मराठी ग्रंथ-संग्रहालयांत वरीलपेक्षां जीं आणखी पुस्तकें पाहण्यांत-आलीं, त्यांचा नाम-निर्देश व त्यांतील विषयाचें स्वरूप या ठिकाणीं देण्यांत-येत-आहे. ह्यांशिवाय आणखी कितीक पुस्तकें, लेख, वगैरे प्रसिद्ध झालीं-असतील; पण तीं फारशीं आमच्या पाहण्यांत आलेलीं नाहींत.

( १ ) **मराठी व्याकरण व्याख्यानमाला**, परिच्छेद १ ला-हें पुस्तक गोविंद गणेश जोशी, स्कूलमास्तर चिंचवड; ह्यांनीं १८९७ त लिहिलेलें पाहण्यांत-आलें. मुलांना व्याकरणविषय पद्धतशीर रीतीनें कसा शिकवावा, ह्याविषयीं हीं व्याख्यानें आहेत, असें लेखकानें म्हटलें-आहे; प्रस्तावनेंत दादोबांच्या ( ल० व्या० ) पहिल्या ५० नियमांवरून, तिसऱ्या इयत्तेकरितां नेमिलेल्या शब्दांच्या आठ जाति ओळखण्यासंबंधानें मुलांचा कसा घोटाळा होतो, हें दिलें-आहे; परन्तु तो घोटाळा दूर करण्यासारखी पद्धति पुढें व्याख्यानांत उतरली-नाहीं. पुस्तकांत वैशिष्ट्यही कांहीं नाहीं.

दादोबांच्या शिक्षणपद्धतिरहित घोकंपट्टीमुळें, मुलांच्या होणाऱ्या घोटाळ्याचा मासला मात्र लेखकानें सुरेख दिला-आहे. त्यांतील कांहीं भाग येणेंप्रमाणें—

" चीन देशांत कोणी एक व्यापारी प्रामाणिकपणाविषयीं प्रसिद्ध होता " हें एक वाक्य आहे. परीक्षकांनीं परीक्षेंत विचारिलें कीं, या वाक्यांत " विषयीं हें काय आहे ? "

उत्तर—' विषयीं ' हें शब्दयोगी अव्यय.

परीक्षक--शब्दयोगी अव्यय म्हणजे काय ?

विद्यार्थी—शब्दयोगी म्हणजे ज्या शब्दाचा प्रयोग नामवाचक शब्दावरून होतो, आणि ज्या नामवाचक शब्दाशीं ह्याचा संबंध असतो, त्याचें ह्याच्या योगानें सामान्यरूप होतें.

परीक्षक—नामवाचक शब्द म्हणजे काय ?

विद्यार्थी—( अडखळतो. )

परीक्षक—बरें, ' शब्दाचा प्रयोग ' ह्म० काय !

विद्यार्थी—( येथेंही अडखळतो. )

परीक्षक—बरें, ' ज्या नामवाचक शब्दाशीं याचा संबंध असतो ' असें त्वां म्हटलें, तर येथें ' विषयीं ' याचा कोणत्या शब्दाशीं संबंध आहे ?

विद्यार्थी—' प्रामाणिकपणा ' ह्या नामाशीं.

परीक्षक—मग, नामाशीं व नामवाचक शब्दाशीं यांत काय फरक ?

विद्यार्थी—( घुटमळतो )

परीक्षक—' त्याचें ह्याच्या योगानें सामान्यरूप होतें ' असें तूं म्हटलें, तर येथें कोणाचें कोणाच्या योगानें सामान्यरूप झालें आहे ?

विद्यार्थी—' विषयीं ' ह्याच्या योगानें ' प्रामाणिकपणा ' ह्याचें सामान्यरूप झालें आहे.

परीक्षक—सामान्यरूप ह्म० काय ? व तें प्रामाणिकपणा ह्यांत कसें झालें आहे ?

विद्यार्थी—( न समजल्यामुळें स्तब्ध )

परीक्षक—बरें, क्रियापद ह्म० काय ?

विद्यार्थी—ज्या शब्देंकरून कोणत्याही क्रियेचा किंवा स्थितीचा बोध होतो, तो शब्द.

दादोबांनीं केलेली ही व्याख्या कितपत सयुक्तिक व समर्पक आहे, ही तर एक अलाहिदाच गोष्ट; परन्तु इतकें उघड दिसून येईल कीं, ही व्याख्या उलगडून सांगणें व ती 'होता' ह्या क्रियापदास लागू करून दाखविणें, हें तिसऱ्या इयत्तेच्या विद्यार्थ्यांस किती दुर्घट आहे, हें सांगणें नकोच. ह्याचप्रमाणें दादोबांच्या नाम, सर्वनाम, इ० प्रत्येक जातीच्या शब्दाच्या व्याख्येचा अर्थ मुलांस समजून, त्यानें प्रत्येक शब्दाची जात ओळखून सांगणें, हें फारच अवघड आहे, हें उघडच आहे.

( या घोटाळ्यावरून, नवीन शिक्षण-पद्धतीस अनुसरून लिहिलेल्या पुस्तकांची आवश्यकता व महत्त्व चांगल्या रीतीनें कळून-येईल. )

( २ ) "**मराठी भाषेचें छोटें व्याकरण**"—हें प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत ह्यांनीं लिहिलें-आहे. सन १८९६. पृष्ठें ९६. यांत अक्षरें, शब्द व वाक्यें हीं तीन मराठी भाषेचीं तत्त्वें सांगितलीं-आहेत. ( ! ) सर्वनामांस नामांचे आभास असें म्हटलें-आहे. कर्त्याच्या विद्वत्तेस साजेसें ह्यांत कांहींच नाहीं.

( ३ ) "**मराठी व्याकरणसार**"—ह्या नांवाचें एक ४२ पानांचें लहानसें पुस्तक रा० कान्हेरे यांनीं लिहिलें-आहे. तेंही वैशिष्ट्यरहित व त्रोटक

असेंच आहे. ह्यांत नुसते उद्देश्य व विधेय हे दोन शब्द घुसडून--दिले--आहेत; परंतु वाक्यपृथक्करणदृष्ट्या त्यासंबंधीं कर्त्यानें कांहीं विचार केलेला दिसत–नाहीं. हे नुसते शब्दच मराठी व्याकरणांत घालण्यांत त्याची काय कल्पना असावी, तें कळत-नाहीं. "बोलणारा स्वतः उद्देश्य असल्यास, त्यास प्रथम पुरुष; ज्याशीं बोलतो तो इसम उद्देश्य असल्यास, त्यास द्वितीय पुरुष; आणि बोलणारा ज्याच्या संबंधानें बोलतो, तो तृतीय पुरुष;" इ० प्रकारचीं विधानें यांत आहेत.

( ४ ) "**संगीत लघु व्याकरण-बोध**" हें पुस्तक शंकर महादेव आठवले यांनीं निर्णयसागर प्रेसमध्यें छापिलें–आहे. पृष्ठें २४. हें दादोबांच्या लघु व्याकरणाचें रूपान्तर आहे, असें 'कर्ता'च प्रस्तावनेंत म्हणतो; व तें खरें आहे. दादोबांच्याच नियमांचें कवितेंत रूपान्तर करण्यांत, कर्त्यानें बरेंच यश सम्पादिलें–आहे. यांतील मासला—

नामाची व्याख्या—" दृश्य तैसें अदृश्य सर्व कांहीं । वस्तु प्राण्याचें नांव नाम पाहीं ॥ जसें–पाणी, लेखणी, गाय, गांव, । राम, राधा, आनन्द, वायु, देव," ॥

सर्वनाम—" नाम नांवाचें पुनः पुनः नाम । दे न येऊं हा सर्वनाम धर्म ॥ जसें–मी, तूं, तो, असें, कोण, हा, जो, । पुत्र त्याचा तो मला भेटला जो" ॥

क्रियापद—" दावण्यासी अस्तित्व नाम याचें । सांगण्यासी वा, क्रिया स्थिती वाचे ॥ क्रियापद यांची योजना ति ( ! ) होई । जसें–आहे, हो, थांब, करीं जाई " ॥

विध्यर्थ—" धर्मार्थ शक्यार्थ व योग्यतार्थ । ऐसे क्रियेपासुनि येति अर्थ ॥ ' विध्यर्थ ' तेव्हां स्थलिं त्या म्हणावें । जैसें मुलांनीं मुलिंनीं करावें " ॥

यांतील शास्त्रीयता व काव्य यांबद्दल लिहिणें नकोच !

( ५ ) "**व्याकरणसम्बन्धी सोपे धडे**" भाग ३ रा–हें पुस्तक मुंबई-च्या ' ईगल ' प्रेसमध्यें सन १८७४ त ' धि ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन सोसायटी ' मार्फत छापलें–गेलें–आहे; पद्धतिरहित.

( ६ ) "**व्याकरण-मंजरी**" अथवा ग्रन्थावरून व्याकरण करण्याची पद्धति–हें पुस्तक विष्णु लक्ष्मण काळे, मिशन हायस्कूल–बेळगांव यांनीं सन १८९५ त छापिलें–आहे. ( कितीएक विद्वान् कळप, सभा, सैन्य, इ० शब्द समुदायवाचक नामें आणि तले, पाणी, सोनें, इ० शब्द पदार्थवाचक नामें; असे नामाचे आणखी निराळे भेद मानितात. परन्तु असे अनेक भेद करून, व्याकरण

करण्याचे पद्धतींत जास्त कठीणपणा आणण्याचें प्रयोजन दिसत नाहीं ) असें लेखकानें म्हटलें–आहे.

( ७ ) " **लघुत्तम मराठी विक्षिप्त व्याकरण** "—हें एक पुस्तक कृष्णाजी यज्ञेश्वर गोडबोले एक्झिबिशनर, राजाराम हायस्कूल–कोल्हापूर यांनीं शिळाप्रेसवर छापलें असून, तें अतिशय अशुद्ध आहे. यांत दादोबांच्याच पद्धतीचा स्वीकार केलेला–आहे; पण ' विक्षिप्त व्याकरण ' असें नांव देण्याचें कांहीं कारण कळत–नाहीं. " ह्या लहानशा पुस्तकानें गोंधळ होईल, त्याकडे सूज्ञांनीं लक्ष न द्यावें " असें कर्त्यानें प्रस्तावनेंत म्हटलें–आहे; पण कोणता गोंधळ होईल, याचा मागमूस कोठेंच नाहीं.

( ८ ) " **विद्यार्थ्यांचा व्याकरण–मित्र** "–हें अगदीं छोटेसें पुस्तक निर्णयसागर प्रेसमध्यें छापिलें असून, तें बहुधा विनायक कोंडदेव ओक ह्यांनीं लिहिलें–असावें. " आपल्या भाषेंतल्या शब्दांचे धर्म आणि त्यांचे परस्पर संबंध हीं समजून भाषणाच्या अर्थाचें ज्ञान चांगलें व्हावें, " हा व्याकरण शिकण्याचा मुख्य हेतु ह्यांत प्रतिपादिला–आहे.

" राज–मंदिर " ह्याचा अर्थ राजाचें मंदिर असा आहे; पण " संसार–समुद्र " ह्याचा अर्थ संसाराचा समुद्र असा नसून, संसाररूपी समुद्र असा आहे.

" त्याच्या दोन थोबाडींत मार " ह्यांत **दोन** ह्या शब्दाचा सम्बन्ध थोबाडींत ह्या शब्दाकडे नाहीं, तर **चापट्या** हा शब्द वाक्यांत अध्याहृत आहे, त्याकडे आहे.

" गडबडां धरणीवरि लोळते " ह्यांत **गडबडां** ह्या शब्दाचा सम्बन्ध **धरणी** ह्या शब्दाकडे नाहीं, **लोळते** ह्या शब्दाकडे आहे.

" कुत्रा कोल्हा धरितो " ह्यांत धरणें ही क्रिया करणारा **कुत्रा** आणि तो धरितो **कोल्ह्याला**; असा अर्थ आहे.

" कुत्रा भुंकते " हें बरोबर नाहीं; " भुंकतो " असें पाहिजे. कां ? इ० गोष्टी व्याकरणानें समजतात; त्याचीं कारणें सांगतां येतात; व भाषेचें रहस्य समजतें; अशी 'बालबोध' रचना या पुस्तकांत आहे.

( ९ ) वासुदेव लिंगोजी बिर्जे ह्यांनीं सन १८८६ त " **पद्यात्मक व्याकरणसार** " किंवा मराठी व्याकरण पाठ करण्याचें सुलभ साधन या नांवाचें पुस्तक बेळगांवास ' दीनबंधु ' प्रेसमध्यें छापिलें–आहे.

( १० ) मिरजच्या शाळेचे हेडमास्तर यांनींही मराठी चौथीकरितां एक लहानसें पुस्तक लिहिलेलें पाहण्यांत-आलें; त्यांत फक्त पहिला पाठ शिक्षण-पद्धतीस अनुसरून थोडा बरा आहे; बाकी पुढील सर्व लेखन मूळ पद्धति सुटल्यामुळें, निरुपयोगी झालें-आहे.

( ११ ) "**लेखन-शुद्धि**"-गुंजीकर यांनीं हें थोडक्यांत परन्तु सुन्दर पुस्तक लिहिलें-आहे. यावर अभिप्राय देतांना 'विस्तार'कर्त्यांनीं कांहीं आक्षेपांचं चांगलें निराकरण केलें-आहे उदा०—उच्चारतुल्य लेखन असावें, असें आग्रहानें कोणीं म्हटलें, तर त्यास त्यांनीं खालील उदाहरणें दिलीं-आहेतः—"हर्हर्महादेव, पुंडलीकवर्दा हारि विठ्ठल," असें लिहून चालेल काय? त्याचप्रमाणें देशस्थ-कोकणस्थ ह्यांचा अनुस्वारवाद. सरकारनें मोठा खटाटोप करून, अखेरीस यांतून अंग काढून घेतल्यानें, "आपण शुद्धलेखन-सुधारणेचे बाबतींत आहों तेथेंच आहों," असें विस्तारकर्त्यांनीं म्हटलें-आहे.

( १२ ) "**मराठी भाषेची लेखनपद्धति**"—डॉ० **विष्णु गोविंद चिपळोणकर** ह्यांनीं सन १९०४ मधील सरकारी शुद्धलेखन-परिषदेच्या विरुद्ध "सहविचारिणी सभा" बडोदें, हिच्या तर्फें प्रसिद्ध केलेलें पुस्तक. यांत २९ सप्टेंबर १९०४ रोजीं बडोद्यास सहविचारिणी सभेची बैठक भरून, तींत झालेला वादविवाद प्रसिद्ध केला आहे. या सभेस सरकारी पक्षाचे प्रमुख डॉ० भाण्डारकर ह्यांसही निमंत्रण केलें-होतें, पण ते हजर राहूं-शकले-नाहींत; असा उल्लेख आहे.

---

## २. व्याकरण-विषयाची आवश्यकता.

**"बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते। पिपासितैः काव्यरसो न पीयते॥**
**न विद्यया केनचिदुद्धृतं कुलम्। हिरण्यमेवार्जय निष्फला गुणाः॥"**

असा प्रश्न वारंवार उभा राहतो कीं, ह्या व्याकरण-विषयाची आवश्यकता तरी काय? ह्या क्लिष्ट विषयाचें विद्यार्थ्यांच्या डोक्यावर काय म्हणून ओझें लादावें? वैद्यकादि विषयांप्रमाणें व्याकरणाचा साक्षात् उपयोग काय आहे? त्याच्यावांचून व्यवहार कोठें अडून राहिला-आहे? शिवाय, गणितासारख्या

विषयांमध्यें जसे सिद्धांत वादीच्या गळ्यांत अडकावितां-येतात, त्याप्रमाणें ह्या व्याकरण-विषयांत दुसऱ्याला निरुत्तर करतां येईल असें काय आहे ? गायन-वादनासारखा हा मनोरंजक किंवा कर्मणुकीचा विषय तरी कोठें आहे ? अथवा एकाद्या कलेचा ज्याप्रमाणें उपजीवनार्थ पैसा मिळविण्यासाठीं उपयोग होतो, तसें तरी यांत कोठें आहे ?

ह्या सर्व गोष्टी थोड्या-फार अंशानें खऱ्या आहेत; तथापि, ह्यालाही उत्तरें नाहींत असें नाहीं; ही एक गोष्ट आणि दुसरें असें कीं, जीं उत्तरें आहेत, तींही कमी बलवत्तर आहेत, असें नाहीं; पण प्रतिपक्षानें तितका दूरवर विचार मात्र करावयास-पाहिजे. ह्यासंबंधानें मराठींत तिघांच गृहस्थांनीं लिहिलेलें आम्हांस आठवतें. " जी जांची जन्मभाषा त्यांस व्याकरणाचा काय उपयोग ? " ह्या नेहमींच्या आक्षेपास, दादोबांच्या पूर्वींचे व्याकरणकार **गंगाधरशास्त्री फडके** ह्यांनीं उत्तर दिलें-आहे. ते म्हणतात,-" मातबरांचा प्रापंचिक व्यवहार चालतो, तसाच दरिद्र्यांचाही भीक मागून दिवस लोटतोच; तसें व्याकरण जांस येतें त्यांचा व्यवहारांत आणि येत नाहीं, त्यांचा व्यवहारांत बराबरी नाहीं. हालीं जें महाराष्ट्र भाषेचें व्याकरण झालें आहे, येणेंकरून ह्या भाषेचा अनुगम आणि भाषेंतलि विषय समजण्यानें संस्कृतांत प्रवेश करावयाची जांची इच्छा असेल, त्यांस फार उपयोग पडेल. " ह्यांत व्याकरणाच्या जरूरीचीं फडके शास्त्रीबोवा दोनच कारणें देतात. एक मातबरांचा प्रापंचिक व्यवहार व गरीबांचा प्रापंचिक व्यवहार यांत अन्तर आहे; व दुसरें संस्कृत भाषा शिकण्यासाठीं व्याकरणाचा उपयोग आहे. हीं कारणें जरी खरीं आहेत, तरी तीं ठसवावीं तशीं जोरदार रीतीनें वरील भाषेंत ठसविलीं-नसल्यामुळें, व्याकरणाची जरूरी काय ? हा प्रश्न केव्हां केव्हां पुनः डोकें वर काढतोच; व खरीच जरूरी दिसून न आल्यामुळें आपल्या वाङ्मयाची व आपली कांहीं थोडी हानि झाली-आहे असें नाहीं; हें पुढील विवेचनावरून समजून-येईल.

ह्यासंबंधींच थोरले शास्त्रीबोवा ह्यांनीं आपल्या निबंधांत थोडा-फार ज्यास्त ऊहापोह केला-आहे. हें विवेचन मार्मिक आणि सर्वसंमत होणारें असेंच आहे. तथापि त्यांतही व्याकरणाची जरूरी व त्या ज्ञानाविरहित आपलें अतीव नुकसान कसें होऊन-राहिलें-आहे, याची जाणीव करून-दिलेली-नाहीं. असो. व्याकरणाच्या जरूरीसंबंधानें खालील गोष्टी सांगतां-येतील.

( १ ) नेहमीं आपल्याला असें आढळून-येतें कीं, ज्यांची संस्कृति श्रेष्ठ

असते, तेच जगावर आपली सत्ता गाजवितात; आणि ज्यांची संस्कृति कमी दर्जाची असते, ते जगांत शेंकडों वर्षें तसेच खिचपत पडून-राहतात. भिल्ल, गोंड, संताळ, कोळी, कातकरी, ह्या लोकांकडे आपण पाहिल्यास, ते हजार वर्षांपूर्वी जसे होते, त्याच स्थितींत आजही आपल्यास आढळून-येतील. धड अन्न नाहीं, धड वस्त्र नाहीं; घरें नाहींत, दारें नाहींत; ग्रंथ नाहींत, ज्ञान नाहीं, कला नाहीं, हुन्नर नाहीं; विद्या नाहीं; शेंकडों वर्षें ह्यांची स्थिति कुत्र्यां-मांजरां-प्रमाणें बहुवंशीं एकसारखी कां असावी ? याचें उत्तर उघड उघड असें आहे कीं, ह्यांची संस्कृति इतरांच्या मानानें अतिशय कमी आहे. वाक्यमीमांसेंत आगरकर प्रस्तावनेच्या आरंभींच लिहितात कीं, " कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतावस्थतेच्या अनेक कारणांपैकीं त्याचा ग्रंथसंग्रह हें एक महत्त्वाचें कारण आहे. ग्रंथ मनोरंजक व सुगम व्हावे, ह्यासाठीं त्या भाषेच्या उत्पत्तीविषयीं, रचनेविषयीं, व शब्द-कोशाविषयीं विचार होऊन, शुद्ध-भाषाविषयक ग्रंथ निपजूं लागतात. मोठ-मोठ्या कवींचा व शास्त्रीय ग्रंथ लिहिणारांचा व्यवसाय, अडाणी लोकांचा ज्या प्रकारच्या भाषेंत व्यवहार होत असतो, त्या प्रकारच्या भाषेनें नीट चालत नाहीं; त्यांची भाषा अगदीं दुर्बळ ठरते. भाषा अपुरी पडल्यामुळेंच प्रासादिक कवि आणि बुद्धिवान् व बहुश्रुत शास्त्रज्ञ हे नवीन शब्द पाडण्याच्या टांकसाळी सुरू करितात. हीं शब्द-नाणीं प्रचारांत आलीं म्हणजे ठिकठिकाणीं त्यांचे कसे अर्थ लावले आहेत यांचा तपास करून निश्चय ठरविणारे व्याकरणकार व कोश-कार पुढें सरसावतात. अशा रीतीनें गद्यरचना व पद्यरचना सुव्यवस्थित होऊन शब्दार्थांस स्थिरत्व येतें: आणि वाङ्मयांतील विस्खलीतपणा नाहींसा होऊन, देशोन्नतिकारक ग्रंथसंग्रह निर्माण होतो. असा ग्रंथसंग्रह अडाणी लोकांस पैदा करितां येत नाही, म्हणून त्यांच्यामध्यें ज्ञानवृद्धिहीं होत नाहीं; आणि अर्थात् ते लोक आहार-निद्रादि व्यवहार करीत असले, त्यांच्या लंगड्या-लुल्या भाषेनें त्यांचा तात्पुरता व्यवहार चालत असला, तरी तो ' पशुभिः समानाः ' पैकींच असल्यामुळें, ते मृततुल्यच लोक असतात; हें अधिक सांगण्याची जरूरी नाहीं. ह्याप्रमाणें भाषेस स्थिरता आणणें हें कार्य मुख्यतः व्याकरणानेंच होत असतें. "

( २ ) व्याकरण-ज्ञानाचे अभावीं काय अनर्थ होईल, हें एका सुभाषितांत खालीलप्रमाणें ग्रथित केलें-आहे:—

" यद्यपि बहु नाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम् ।
स्वजनः श्वजनो माऽभूत् सकलं शकलं सकृत् शकृत् " ॥

जरी ह्या व्याकरण-ज्ञानापासून कांहीं उपयोग नाहीं, असें वाटत असलें, व तूं अन्य कांहीं शिकत-नसलास, तरी व्याकरणाध्ययन कर; कारण स्वजन म्हणण्याचे ऐवजीं आपल्याकडून श्व-जन असें म्हटलें-जाऊं नये. स्वजन म्हणजे आपले भाऊबंद वगैरे लोक; ह्यांना श्व-जन म्हणजे कुत्र्याचे भाऊबंद म्हणणें किती मूर्खपणाचें होईल ? त्याचप्रमाणें सकल म्हणजे सर्व; अर्थात् त्याऐवजीं शकल म्हटल्यास, त्याचा अर्थ तुकडा असा होईल. तसेंच, सकृत म्हणजे एकदां असा अर्थ होण्याऐवजीं शकृत् म्हटल्यास, त्याचा भलताच अर्थ होईल; तात्पर्य, व्याकरण-ज्ञानाचे अभावीं मनुष्य वरच्यासारख्या हास्यास्पद चुका बोलतांना शेकडों वेळां करील; किंबहुना तशा चुका त्यानें बोलतांना केलेल्या न दिसल्या, तरी डोळस आणि आंधळा यांच्यामध्यें जो फरक आहे, तो व्याकरण-ज्ञान असणारांत व नसणारांत आहे, हें उघडच आहे. तात्पर्य, वाङ्मयाचा व्याकरण हा पाया आहे, आणि योग्य अर्थ-ज्ञान होण्यास, त्याची फार अवश्यकता आहे, हें उघड आहे.

( ३ ) कायदा व शास्त्रग्रंथ इत्यादिकांची भाषा अगदीं तंतोतंत बरोबर असावी लागते; आणि जर का त्यांत यत्किंचितही इकडचें तिकडे झालें, तर मोठाच घोटाळा होतो; व वकील आणि पंडित लोक अथवा शास्त्रज्ञ त्याची चिकित्सा करकरून, आपल्या पक्षकारांना अथवा पक्षाला कसा फायदा मिळवून-देतात, तें आपण वारंवार पाहतोंच. 'क्ष' ह्या खुनी आरोपीस " फाशीं द्यावा; " असा न्यायाधिशानें निकाल दिला; तेव्हां आरोपीच्या वकिलानें त्याच शब्दांचा फायदा घेऊन, फासांत मान अडकल्या गेलेल्या आरोपीला सोडविलें. कारण, निकालाचे शब्द फाशीं ( फासांत ) द्यावा असे होते. त्यासंबंधींच्या हल्लींच्या कायद्यांत " मरेपर्यंत फाशीं द्यावा " अशाप्रकारची सुधारणा करण्यांत आली-आहे, हें सर्वश्रुतच आहे.

जेव्हां नफा-नुकसानीचा मोठाच प्रश्न उपस्थित होतो, व्यक्तींचे अथवा राष्ट्रांचे करार-मदार ठरावयाचे अथवा पहावयाचे असतात, अशा वेळीं, योग्य लेखनाशिवाय गत्यन्तर नसतें. टिळकांचा खटला हायकोर्टांत चालला असतां, शब्दांचे व वाक्यांचे योग्य अर्थ ठरविण्यासाठीं कोश व व्याकरण ह्यांचें साह्य

घ्यावें लागलें; इतकेंच नव्हे, तर त्यावेळीं साक्षीदारांचे तपासणींत शब्दार्थाचा कीस काढीत असतां, त्यांस जें छेडण्यांत-आलें, त्यावरूनही साक्षात् नसलें, तरी अप्रत्यक्षपणें अर्थज्ञानाकरितां व्याकरणादिकांची किती जरूरी आहे, हें स्पष्ट समजून-येईल; कारण, निरनिराळ्या दृष्टींनीं शब्दार्थ किंवा वाक्यार्थ मानित्यास, एकाद्याचें कसें अतिशय नुकसान होतें, अगर एकाद्याचा कसा अतिशय फायदा होतो, त्याचीं उदाहरणेंच देत बसण्याचें कारण नाहीं.

विद्यार्थी अथवा इतर पुष्कळजण कवितांचे अर्थ करितांना शेकडों वेळा नकळत चुकत असतात;व आपण कांहीं खरोखर चुकतों,हें पुष्कळ वेळां त्यांच्या ध्यानींही येत-नाहीं. कवि म्हणतो एक, व यांचा अर्थ निराळाच.' एक नेहमींचेंच सामान्य उदाहरण पहा:—

**शकुनि म्हणे, " कुरुनाथा, हा सर्वांहीं मिळोनि मारावा ।**
**भ्याले यास भट जसे भीती गज-शिशु मृगोत्तमारावा " ॥**

यांत " शकुनि कुरुनाथाला म्हणाला " असें अर्थाचे वेळीं पुष्कळसे लोक सांगतांना आढळतील; पण कवि तसें म्हणत-नाहीं; तो कुरुनाथाला कर्म करीत नाहीं, संबोधितो आहे; शिवाय, शकुनीचें "कुरुनाथा,........मृगोत्तमारावा" एवढें सर्व म्हणणें अवतरणांत आहे, त्याची वावदूक अर्थकांस कांहींच किंमत वाटूं-नये काय ? कवीचें बोलणें किंवा त्याचें मूळचें लेखन फिरविण्याचा आपणांस काय अधिकार ? पण ह्यासारख्या साध्या गोष्टींतही आपण पुष्कळ वेळां चुकतों, हें अनेकांच्या ध्यानांतही येत--नाहीं. तात्पर्य योग्य, अर्थनासाठीं व्याकरणज्ञानाची किती आवश्यकता आहे, हें यावरून कळेल.

यावर कोणी असा श्लेष काढतील कीं, ' मोरोपंताची तुम्हीं वर आर्या दिली आहे; पण मोरोपंताच्या पोथ्यांत विरामचिन्हें व अवतरणें कोठें आहेत ? शब्द तरी सुटे कुठें आहेत ? मग अमुकच अर्थ कशावरून ? ' हें म्हणणें बरोबर आहे; परन्तु आमच्या वरील लिहिण्याचा आशय इतकाच कीं, जेथें विरामचिन्हें व अन्यप्रकारचे लेखन-संकेत दिलेले-असतात, त्या ठिकाणीं तरी त्या-लेखन-संकेतांस धुडकावून देऊन,मनःकल्पित वाक्यार्थ करण्यास कोणासही अधिकार नाहीं; पण तसा पुष्कळ वेळां आढळतो; एवढें मात्र खरें.

( ४ ) पांडवांना द्यूतांत जिंकिल्यानंतर द्रौपदीला बोलावण्यासाठीं दूत गेला; त्यावेळीं द्रौपदी म्हणते,--"अरे, **श्री** म्हण, न **स्त्री** म्हण:" धर्मानें द्यूतांत 'श्री'

हारविली असें म्हण; स्त्री हारविली असें म्हणूं-नको. (धर्मराजा स्त्री हारविण्याइतका वेडा आहे कीं काय? कदाचित् तो श्री म्हणजे संपत्ति घालवील! शिवाय स्त्री कोणी द्यूतांत पणाला लावतो की काय, संपत्ति पणाला लावतात. ) तो दूत अशिक्षित असल्यानें कदाचित् बोलण्यांत चुकत–असेल, ह्या समजुतीनें द्रौपदीनें त्याला प्रथम वरील प्रमाणें खडसलें.येथलें दूताचें उच्चारण जरी चुकीचें नसलें,तरी ह्याप्रमाणें उच्चारांत अगर लेखनांत जर प्रमाद होऊं लागले, तर नेहमींच्या व्यवहारांत सुद्धां कसे घोटाळे उडतील, याचा विचार केल्यास, पाठ केलेल्या व्याकरणज्ञानाची नव्हे,पण बोलण्याच्या पद्धतीची म्हणजेच साहजिक असणाऱ्या व्याकरणज्ञानाची जरूरी येथें स्पष्टपणें प्रत्ययास येते व कबूल करावी लागते.

( ५ ) संस्कृत, इंग्रजी, वगैरे भाषा शिकण्यासाठीं, स्व–भाषेच्या व्याकरणज्ञानाची अत्यन्त आवश्यकता आहे; त्याचप्रमाणें कोणालाही परकीय भाषा शिकण्यासाठीं व्याकरणज्ञानाची फार जरूरी आहे, हें मागें आलेच आहे; व याबद्दल कोणाचाच मतभेद नसल्यामुळें, हा मुद्दा अधिक विचारांत घेण्यासच नको.संस्कृत, इंग्रजी इ० आवश्यक भाषा आजकाल ( मातृभाषेशिवाय ) कोणत्याही साक्षर मनुष्याला येणें ज्ञानवर्धनाच्या व व्यवहाराच्या दृष्टीनें भाग झालेआहे; इतकेंच नव्हे, तर त्यावांचून पावलोपावलीं व्यवहारही अडूं–लागला–आहे, हें आपण पाहतोंच. नामदार गोखले, श्रीनिवास शास्त्री, यांसारखे आपले लोक राज्यकर्त्यांच्या इंग्रजी भाषेमध्यें प्राविण्य संपादितात, आणि कायदेकौन्सिलांतून किंवा अन्य प्रकारें देशाची मोठी कामगिरी बजावितात. त्याचप्रमाणें जर्मनीमधील लोक आपली संस्कृत भाषा शिकून अनेक प्रकारें शोध लावितात. ही परभाषा हस्तगत करण्यास, स्व–भाषेचें व्याकरण–ज्ञान हेंच त्यांस उपयोगी पडत–नाहीं काय? बहुतेक भाषांच्या घटनेचा प्रकार साधारणतः एकसारखाच असतो; व ज्याला एका प्रकाराची भाषा–घटना पुरी माहीत होते, त्याला अन्य प्रकार सहज साध्य होऊन, परकीय भाषाशिक्षण केव्हांही सुलभ होतें.

( ६ ) रामा आला, गंगू गेली, फूल फुलतें, अशीं वाक्यें मुलांच्या कानांवर नेहमीं आढळतात. ‘ रामा आली ’ असें त्यांच्या कानांवर पडत–नाहीं; याचा अर्थच हा कीं, भाषा–रचना म्हणजे व्याकरण–ज्ञान पारिभाषिक शब्दांनींच व्हावयास पाहिजे असें नाहीं; तें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें होतच–असतें; तें साक्षात् व्याकरणाचे धडे घोकवून या किंवा

नका-देऊं. हे ज्ञान जितकें ज्यास्त असतें, तितकें त्या मनुष्याची वक्ता, ग्रंथकार, इ० नात्यानें मोठी प्रतिष्ठा वाढविण्यासच तें कारणीभूत होतें. आपण, सामान्यतः जें बोलतों तेंसुद्धां बहुधा व्याकरणबद्धच असतें; परंतु तेव-ढ्यानें राष्ट्राचा व्यवहार भागत-नाहीं, राष्ट्राच्या व्यवहाराला ग्रंथांची, वक्त्यांची, पंडितांची, शास्त्रज्ञांची, जरूरी असते; व त्यांच्या भाषा-व्यवहाराकरितां, व्याकरण-शास्त्राची आवश्यकता प्राप्त होऊन राष्ट्राची उन्नति होते.

( ७ ) व्याकरण हें शब्दांच्या अर्थाच्या चिकित्सेसंबंधाचें शास्त्र आहे; ज्याची चिकित्सात्मक बुद्धि वाढते, त्याला हेंचसें काय, परंतु कोणताही विषय समज-ण्यास सुलभ जातें. विचारशक्ति व तर्कशक्ति ज्यांच्यामध्यें उत्पन्न झाली, त्यांचें बोलणें, लिहिणें प्रमाणशुद्ध असतें; तें लंगडें पडत-नाहीं; तें स्वतःवर न उल-टतां दुसऱ्यावर आपली छाप पाडितें; हाही कांहीं महत्त्वाचा लाभ म्हणतां-येत-नाहीं. **थोरल्या शास्त्रीबोवांनीं** सांगितलेला हा मुद्दाही विचारांत घेण्यासारखा आहे.

(८) **आगरकर** 'वाक्यमीमांसे'च्या प्रस्तावनेंत म्हणतात,-"शेंकडा नव्या-ण्णव लोकांस ज्याची पर्वा नाहीं किंवा गरज नाहीं, अशा व्याकरणासारख्या एकदे-शीय विषयांत लेखकांनीं आपली हिम्मत कां खर्चावी ? याचें उत्तर असें कीं, ज्याला आर्थिक लाभ राहो, परंतु देशाच्या वाङ्मयाचा खरोखर फायदा वाटत असेल, त्यानें ह्या मार्गांत पडावें; आणि ह्या मार्गांत पडल्याच्या प्रमादापासून कांहींच फायदा नाहीं, असें वाटत असेल, त्यांनीं त्या वाटेला जाऊं नये. असे लोक कोणत्याही देशी भाषेच्या घटनेच्या वगैरे संबंधानें काथ्याकूट करणाऱ्यांस वेडे-पीर समजतील; हें उघडच आहे; आम्हांपैकीं कित्येकांस असें वाटतें कीं, अठरा-पगड जातींप्रमाणें हिंदुस्थानांत अठरापगड भाषा असण्याची कांहीं जरूर नाहीं. त्यांऐवजीं इंग्रज लोकांसारख्या सुधारलेल्या लोकांना हिंदुस्थानांत सार्वभौम सत्ता प्राप्त झाली असल्यामुळें, येथल्या सतरा-पंधरा अर्धवट रानटी भाषा ( यांत मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली, इ० सर्व हिंदुस्थानांतील देशी भाषा येतात. ) नाहींशा होऊन, त्यांच्या जागीं विद्वान् ( ? ) इंग्रजी भाषा चालू होईल, तर फार बरें होईल. पण ह्या मतापेक्षां मराठी भाषेस उत्तरोत्तर उन्नतावस्था येत जाणार आहे, अशी खात्री झाल्यामुळें, मराठी वाक्यांची थोडी-बहुत मीमांसा करून, त्यांचें पृथक्करण करण्याच्या कामास आम्हीं हात घातला आहे."

तात्पर्य, ह्या सर्व विवेचनावरून व्याकरणज्ञानाची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष किती

जरूरी आहे, हें कळून-येईल; आणि ह्या प्रकरणाच्या आरंभींच म्हटल्याप्रमाणें "ज्यांना भूक लागली-आहे, त्यांची भूक व्याकरणानें शमणार-नाहीं; तसेंच, ज्यांना तहान लागली-आहे, त्यांची तृप्ति काव्यरस प्याल्यानें होणार-नाहीं; केवळ विद्येच्या योगानेंच कोणाचें कुल वर आलें-आहे, असें नाहीं; ह्यासाठीं पैसा मिळव; त्याशिवाय सर्व गुण व्यर्थ आहेत." हें जरी बाह्यतः व्यवहार-चतुर म्हणवून घेणाराच्या दृष्टीनें खरें असलें, तरी व्याकरण-ज्ञानाचें महत्त्व एवढ्यानें कांहीं कमी होत-नाहीं. इतकेंच नव्हे, तर देशांत भाषाविषयक शास्त्रांची जोपासना करणारे कांहीं विद्वान् लोक ग्रंथसमृद्धि करून, देशाची ज्ञान-संपत्ति वगैरे वाढवितात; म्हणूनच तर त्यांच्या मोठेपणावर देशांतल्या भाषेकडे दुर्लक्ष करणाऱ्या सामान्य लोकांना, संस्कृतिदृष्ट्या जिवन्त राहतां-येतें; नाहींतर त्यांची गणना भिल्ल, कोळी, वारली, कातकरी, नीग्रो, रेड-इंडियन, यांपेक्षां कोणत्या निराळ्या कोटींत करतां-येईल? असो. यासाठीं आपली संस्कृति कायम राहण्याकरितां, व्याकरणादिकांची अत्यन्त आवश्यकता आहे; हें पटल्या-वर तरी व्याकरणाध्ययनाकडे पुष्कळांचें असलेलें दुर्लक्ष्य कमी होईल; त्या विष-यास शाळांत, परीक्षांत व युनिव्हर्सिटींत महत्त्वाचें स्थान दिलें-जाईल, अशी आम्ही आशा बाळगितों.

( ९ ) महाराष्ट्रांतले साधु कोण? ज्ञानेश्वर, तुकाराम, इ०; महा-राष्ट्रांतले राजकारणी पुरुष कोण? नाना फडणीस, नाम० गोखले, टिळक, इ०; महाराष्ट्रांतले गणिती कोण? ना० परांजपे इ०; महाराष्ट्रांतले खरे समाजसुधारक कोण? आगरकर, करवे, इ०; महाराष्ट्राकरितां मरणारे कोण? खंडेराव चिट-णीस इ०; बाकीचे सामान्य लोक म्हणजे खरोखर राष्ट्र नव्हे. राष्ट्र म्हणवून घेण्याला त्या राष्ट्रांत जे तेजस्वी पुरुष असतात, तेच कारणीभूत होतात; व त्यांवरच-त्यांच्या जिवावरच-राष्ट्र म्हणजे आम्ही सामान्य जन जगतों. अर्थात् मोडक्या-तोडक्या भाषेंत आपला व्यवहार करणारे व आमचें व्याक-रणादि भाषाविषयक शास्त्रांवाचून कांहीं अडून-राहिलें-नाहीं, अशी घमेंड बाळग-णारे आम्ही, कांहीं खरोखर महाराष्ट्रीय नव्हेंत; देशांत ह्या शास्त्रांचें अध्ययन करून, व नाना प्रकारांनीं ग्रंथ-समृद्धि करून ज्ञान वाढविणारे विद्वान् आणि ग्रंथकार हेच खरोखर महाराष्ट्राची जगांत कांहीं किंमत उरविणारे आहेत; हें कोणासही नाकबूल करितां-येणार-नाहीं.

( १० ) कै० राजवाडे ह्यांच्या भाषेंत ह्या प्रकरणाचा शेवट करूं. ते आपल्या

सुबन्त-विचारांत म्हणतात-" व्याकरणशास्त्रावांचून सध्यां काय अडलें आहे, असा बालिश प्रश्न जे कोणी करितात, त्यांना उत्तर एवढेंच कीं, हरएक शास्त्रावांचून तर ह्या देशाचें सर्वत्र नडत आहे. जितकें रसायणशास्त्रावांचून नडत आहे, जितकें राज्यशास्त्रावांचून नडत आहे, जितकें युद्धशास्त्रावांचून नडत आहे, तितकेंच व्याकरणशास्त्रावांचूनही नडत आहे. येथें युद्धशास्त्राच्या जोडीला व्याकरणशास्त्राला नेऊन बसविलेलें पाहून, कित्येक सुज्ञांना अचंबा वाटेल. परंतु त्यांनीं अंमळ सबूरी करावी. त्यांच्याहून सहस्रपट मोठ्या अशा एका युद्धशास्त्रज्ञाच्या कृतीकडे सहृदय अंतःकरणानें पाहण्याची त्यांनीं कृपा करावी. ज्यूलियस कैझर हा योद्धा मोहिमेवर असतांनाही लॅटिन भाषेच्या व्युत्पत्तीवर व व्याकरणावर शास्त्रीय टिपणें मोठ्या काळजीनें लिहून ठेवी. हातांत तरवार ज्यानें खलखलवावी, त्यानें त्याच हातानें व त्याच वेळीं, व त्याच स्थळीं, लेखनीसारख्या तीक्ष्णतर आयुधाच्या साहाय्यानें व्याकरणाचा मान राखावा, हा काय चमत्कार आहे बरें ? ज्यांना सामान्य सुरीही कशी ती धरितां-येत-नाहीं, ज्यांनीं साऱ्या जन्मांत सुपाखेरीज इतर कोणतेंही रसायण पाहिलेलें नाहीं, त्यांना व्याकरणाच्या योग्यतेची पारख कशी होणार ? व्याकरणशास्त्र हें मानवी व्यवहाराला फार उपकारक आहे. तदभावीं केव्हां केव्हां तर मोठा अनर्थ गुदरतो व राजकीय उलाढाली करणाऱ्यांच्या प्राणावर येऊन बेततें. यास दृष्टान्त अनुभवावरून व इतिहासावरून शेंकडों देतां येतील. परंतु परप्रत्ययनेयबुद्धि जे आमच्या इकडील खर्डेघाशे, त्यांच्या समाधानार्थ त्यांना मान्य अशा एका आधुनिक इंग्लिश मुत्सद्याचें व्याकरण व वैयाकरण यांसंबंधाचें मत सांगतों. हाल्डेन नांवाच्या एका पुढारी इंग्लिश मुत्सद्यानें The dedicated life नांवाच्या एका निबंधांत, व्युत्पत्ति व व्याकरण ह्यांच्या अभ्यासांत गर्क झालेल्या परंतु चवढाळ अशा मूर्ख लोकांच्या अवहेलनास पात्र झालेल्या एका वैयाकरणाचा दाखला देऊन, आपल्या इंग्लिश श्रोतृवर्गाला असा उपदेश केला आहे कीं, 'बाबांनो, या वैयाकरणाप्रमाणें कशाचीही पर्वा न करितां, एकनिष्ठेनें हातीं घेतलेलें महत्कृत्य करीत रहा. ' सुज्ञांनीं या वर दिलेल्या गोष्टीचें नीट मनन करावें. इ० "

# ३. मराठींतील संयुक्त क्रियापदें.

या विषयासंबंधानें खालील गोष्टींचा विचार येथें करावयाचा आहे:— १. कांहीं संस्कृत कृदन्तें मराठींत क्रियापदें कशीं झालीं; २. कांहीं संस्कृत कृदन्त-शब्द आपल्या सहाय धातूंच्या जोडांसह सामासिक क्रियापदत्व किंवा संयुक्त-क्रियापदत्व कसे पावले; ३. त्यांस सामासिक किंवा संयुक्त मानिल्यानंतर त्यांचें लेखन कसें असावें; आणि ४. मुलांचें शिक्षणशास्त्र व अन्यशास्त्रें ह्यांचा नित्य विरोध-सम्बन्ध आहे काय? इ०. ह्यापैकीं एकेका गोष्टीचा विचार करूं.

[ १ ]

| | |
|---|---|
| रामा जातो | रामा जातो ( आहे ) |
| रामा गेला | रामा गेला ( आहे-नाहीं ) |
| रामा जाणार | रामा जाणार ( आहे-नाहीं-होता-असेल-नसावा) |
| मकर-कुंडलें श्रवणीं तळपत | मकर-कुंडलें श्रवणीं तळपत ( आहेत ) |
| कण्ठीं कौस्तुभ-मणी विराजत | कण्ठीं कौस्तुभ-मणी विराजत ( आहेत ) |

ह्या दोन्ही प्रकारच्या वाक्यांचें स्वरूप वस्तुतः एकच आहे. पहिल्या प्रकारच्या वाक्यांत ‘ आहे-नाहीं ’ इ० शब्द अध्याहृत आहेत; आणि दुसऱ्या ठिकाणीं ते स्पष्ट आहेत. हे मूळ असलेले शब्द पहिल्या वाक्यांतून गळले कसे, दोन्ही प्रकारच्या वाक्यांवरून दिसून येणारा अर्थ एकच आहे कीं नाहीं, दोन्ही ठिकाणीं वाक्यपूर्ति होत-आहे कीं नाहीं, होत असल्यास एकेरी शब्दानें होत-आहे कीं दुहेरी शब्दांनीं, दुहेरी शब्दांची आवश्यकताच आहे कीं काय, दोन शब्दांचें कार्य एकरूपतेनें करणारा एकटा शब्द, वाक्यपूर्ति करणाऱ्या शब्दाच्या म्हणजे क्रियापदाच्या, तोडीस जाऊन बसतो कीं नाहीं, किंवा तो तसा बसत असल्यासही द्विरूपतेनें संचारणाऱ्या शब्दांस एकस्वरूप मानितां-येत-नाहीं, अथवा एकरूप झालेल्या मूळच्या शब्द-द्वयास फोडून द्विरूपच केलें-पाहिजे, ह्या प्रश्नांसंबंधानें वैय्याकरणांचा बराच मत-भेद व मत-विरोध आहे. त्याची सयुक्तिकता व्यवहाराच्या दृष्टीनें जोखली-पाहिजे. केवळ शास्त्र म्हणून हवेंत उड्या मारण्यांतही अर्थ नाहीं, व केवळ रूढि म्हणून शास्त्राशीं बंडावा करण्यानेंही अनवस्था-प्रसंगच उद्भवेल. असो.

विचार केल्यास, वरील उदाहरणांवरून खालील गोष्टी निष्पन्न होतातः—

( १ ) दुसऱ्या वाक्यांच्या शेवटीं असलेले शब्द आरंभीं पहिल्या वाक्यांतही होते; ( २ ) ते आतां अध्याहृत आहेत; किंवा आतां ( ३ ) अंशतः किंवा अजीबात गळले-आहेत; ( ४ ) दोन्ही प्रकारच्या वाक्यांचें उद्दिष्ट कार्य एकच आहे; व ( ५ ) दोन्ही वाक्यांचा अभिप्रेत अर्थही एकच आहे. एवढ्या गोष्टीं-बद्दल वैयाकरणांत मत-भिन्नता दिसत-नाहीं. बाकीच्या गोष्टींमध्यें मत-भिन्नता आहे. त्यांपैकीं एकेकीचा विचार करूं.

दोन्ही ठिकाणीं वाक्यपूर्ति होते कीं नाहीं ? एक पक्ष म्हणतो, 'याति' ह्या क्रियापदापासूनच 'जातो' हा शब्द निघाला असल्यानें, तशा ठिकाणीं तेवढी वाक्यपूर्ति होते; पण 'गेला' व 'जाणार' हे शब्द मूळ कृदन्तांपासून आल्यानें, ते वाक्यपूर्ति करूं-शकत-नाहींत; ते मराठींतही नेहमीं कृदन्तेंच मानिले-पाहिजेत.

आतां आपण वरील वाक्यांतल्यासारख्या शब्दांचीं हींही रूपें बदलून त्यांना एकरूप करूं याः—

१. रामा जाताहे ( जात + आहे ) २. रामा गेलाहे ( गेला + आहे )
३. रामा जाणाराहे ( जाणार + आहे ).

ह्यांपैकीं शेवटचें वाक्य कोणास अपरिचित वाटत असल्यास, नेहमीं येणारे खालील शब्द पहाः—

१. गेलोंसें ( गेलों + असें ) चाल पथ पुढें पाहीं
२. सत्संगति करिताहे ( करीत आहे ) लीलालेशें करूनि जेंवि हित
३. माझा नव्हे ( न + आहे ) तुझाचि हा बाळ
४. नोहे ( न + आहे ) हा पवन जवन वारु भासतो
५. असें नव्हतें ( न + होतें ) ठाऊक मुळीं मातें
६. नाहीं ( न + आहे ).

ह्या शब्दांचीं पूर्वीं द्विशब्दात्मक रूपें होतीं, हें उघड आहे. आतां तीं एक-शब्दात्मक व एकरूपात्मक दिसत-आहेत, हेंही उघड आहे.

गेला-आहे, गेला-नाहीं; जाणार-आहे, जाणार-नाहीं; अशा ठिकाणीं शब्द एक असोत कीं दोन असोत, 'गेला' 'जाणार' ह्या शब्दांनीं वाक्यपूर्ति होते, असें मानण्यास एक पक्ष मुळींच तयार नाहीं. 'जाताहे,' 'गेलाहे,' 'जाणाराहे,' या किंवा 'गेलोंसे' 'नसतें' इ० शब्दांच्या एकरूपतेची ताडातोड करून, व

त्यांमधील दोन अवयव फोडून, प्रत्येक अवयवाचें निराळें स्वतंत्र व्याकरण त्या अवयवाला स्वतंत्र शब्द समजून हा पक्ष करूं इच्छितो व करावयाचा आग्रह धरितो.

' व्हर्नाक्युलर फायनल ' ह्या परीक्षेच्या मागील वर्षांच्या प्रश्नांत खालीलसारखे प्रश्न आढळतातः—

१. वर्तोळा, अनशूद्र, धुपेल, ओवळें, दिवाळी, शिलंगण, सुतार, हिंवाळा, पावसाळा, उन्हाळा, चांभार, गाभारा, घंगाळ, सोवळें व गुराख्या यांतील समास सविग्रह सांगा.

२. घड्याळ, पोहरा, अक्का, यांचे सविग्रह समास सांगा.

जसा परीक्षक तसें त्याचें उत्तर. या बाष्कळ समजुतीनें पुष्कळ वेळां उत्तरें दिलीं-जातात; व तींच त्या परीक्षक-पंडितांच्या पुस्तकांत असतात, म्हणून ते तीं मान्य करितात; इतर उत्तरें शून्य किंमतीचीं असा त्यांचा ग्रह असतो; असें आम्हीं कित्येकदां निरीक्षलें-आहे. उदाहरणार्थ, वरील प्रश्नांचेंच स्पष्टीकरण एका परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या पुस्तकांत दिलें-आहे, तें येथें मुद्दाम सादर करितों.

**अनशूद्र**—अन्नाची होते शुद्धि ज्यापासून [ पं० ब० स० ].
**धुपेल**—धुपाचें तेल [ ष० त० स० ].
**ओवळें**—नव्हे जें मंगल तें अमंगळ [ न० त० स० ].
**शिलंगण**—सीमेचें उल्लंघन. [ ष० त० स० ] इत्यादि.

३४५६

आतां वरील शब्दांचे समास विचारणें हें जितकें मूर्खपणाचें तितकींच त्यांचीं उत्तरेंहीं परीक्षार्थी व पोटार्थी विद्यार्थ्यांनीं नंदी-बैलाप्रमाणें परीक्षकांच्या पुस्तकरूपी तोंडाकडे पाहून दिलेलीं, मूर्खपणाचीं असतात; हें उघड आहे.

अन्नशुद्धि, धूप-तैल, अ-मंगल, हे शब्द सामासिक आहेत; ह्यांत दोन स्वतंत्र शब्द स्पष्टपणें आहेत; समास दोन स्वतंत्र शब्दांचा होतो; ते शब्द संधियोग्य असल्यास, फार तर [ अन्य+उक्ति=अन्योक्ति, सद्विद्या, तपोबल, यांप्रमाणें] नियमानें सामासिक शब्द बनतील; परंतु दोन स्वतंत्र शब्द असल्यावांचून समासच होणार-नाहीं. एकेरी किंवा एकरूप शब्दांचा समास होणें कधींच शक्य नाहीं; एवढा विचार न करितां, बेधडक वरील समासयुक्त नसलेल्या शब्दांचे ठोकून समास करून-टाकिले-आहेत. आंधळ्याच्या मागून आंधळे जाऊन, दोघेहीं खड्ड्यांत पडले-आहेत. थोडा तरी विचार करतो कोण ?

वस्तुतः अमंगल शब्दापासून ओवळें हा शब्द मराठींत आला; हें खरें आहे. त्याचप्रमाणें गंगा+आलय ह्या शब्दापासून घंगाळ हा शब्द मराठींत अनेक रूपांतरें होत होत साधला-आहे, हें खरें आहे. परंतु त्यांत आतां द्विशब्दत्व बिलकूल उरलें-नाहीं; ते एक शब्द आहेत.

गंगालय शब्दाचा वर दिलेला समास बरोबर आहे; त्याचप्रमाणें अमंगल शब्दाचाही समास होईल; एकादश हा शब्दही समास-योग्य आहे; परंतु घंगाळ, ओवळें, अक्का, या शब्दांत जर द्विशब्दत्व उरलेंच-नाहीं, तर त्यांचा समास होणार कसा? ह्याप्रमाणें परीक्षक व परीक्षार्थी ह्यांचा असा आंधळ्या कोशिंबिरीचा खेळ केव्हां केव्हां दिसून-येतो.

आतां प्रस्तुत मुद्याकडे वळूं. वरील उदाहरणें पाल्हाळानें नमूद करण्याचें कारण हें कीं, तीं परीक्षांतून आलेलीं-आहेत; व त्यांचीं उत्तरें परीक्षकांना वरच्याप्रमाणेंच त्यांच्या पुस्तकांत असतात म्हणून तीं तशींच हवीं असतात, हें वाचकांस कळावें; व त्यांचें वैय्यर्थ्य वाचकांच्या ध्यानांत आणून-यावें.

'विविध-ज्ञान-विस्तारा'च्या २५-३० वर्षांपूर्वींच्या अंकांमध्येंही परीक्षक व परीक्षार्थी ह्यांच्या वरच्यासारख्या सावळ्या गोंधळाचे कांहीं मासले माझ्या पाहण्यांत-आले-आहेत. असो.

दोन शब्द एकमेकांत मिळून, त्यांचें अपभ्रष्ट रूप बनत बनत एक-शब्दात्मक रसायण बनल्यानंतर व त्यांतील मूळ शब्दांची स्वतंत्रता नष्ट झाल्यानंतर तो एक शब्द दोन शब्दांचें कार्य करूं-शकतो कीं नाहीं, या प्रश्नाचा आतां विचार करूं; आणि एका शब्दानें जर दोन शब्दांचें पूर्ण कार्य आतां होऊं-लागलें-असेल, तर त्या एकाला दुसरा अध्याहृत शब्द-जो त्यानें पूर्वीं जवळ असलेला दहादां लोटिला-तो पुनः त्यास चिकटविण्याचें कारण काय? किंवा ते दोन शब्द स्व-खुशीनें कांहीं वाक्यांत एकशब्दात्मक अर्थ उत्पन्न करीत-असले, तर ते केवळ मूळचे भिन्न आहेत, म्हणून त्यांचें एकत्रित कार्य नष्ट झालें कीं काय? व त्यांस एक शब्द-एक जोडशब्द-म्हणण्यास कां प्रत्यवाय असावा?

| | | | |
|---|---|---|---|
| घंटा झाली | घंटलें; | उजेड झाला | उजाडलें; |
| उद्धार करितो | उद्धारतो; | उत्तर दिलें | उत्तरला; |
| संपादन करील | संपादील; | रत झाला | रतला; |
| नम्र होते | नमते; | इत्यादि. | |

ह्यांत पहिल्या दोन शब्दांचें कार्य दुसरा एकच शब्द करीत–आहे; आणि दोहोंचा अर्थही सारखाच आहे. त्याचप्रमाणें पहिले दोन शब्द त्या वाक्यांतच भिन्न असल्यानें, व त्या भिन्न शब्दांचें प्रयोजनही पृथक् निर्दिष्ट केल्यानें, त्या शब्दांचें स्वतंत्र व्याकरण करितात; व तें सर्वांस मान्यच आहे. तसेंच, दुसऱ्या शब्दांतही घंटणें, उजाडणें, उद्धारणें, उत्तरणें, नमणें, हेच धातु समजून, त्याप्रमाणें सर्व व्याकरण करितात. घंटलें, उजाडलें, उद्धारतो, यांस क्रियापदें समजण्यांत कोणाचाच मत–भेद नाहीं; व पहिल्या वाक्यांतून झाली, करितो, हीं क्रियापदें समजण्यासही कोणाचा प्रत्यवाय नाहीं. फक्त अडचण आहे ती एवढीच कीं, अर्थ कांहीं असो. स्पष्ट अशा एकशब्दात्मक वाक्यार्थपूर्ति करणाऱ्या क्रिया-शब्दास क्रियापद म्हणण्यास कोणताही पक्ष तयार आहे; पण जेथें दिसण्यांत दोन भिन्नशब्द तर दिसतात.परन्तु वाक्यार्थपूर्ति एका क्रियाशब्दानें न होतां, दोन क्रिया–शब्दांनीं मिळून होते,तेथें मात्र वैय्याकरण त्या दोघांस मिळून क्रियापद न मानतां, हमरी–तुमरीवर येऊं लागतात.

[ २ ]

यांतील निष्कर्ष काय काढावयाचा हें ठरविण्यापूर्वी, भाषेच्या स्वभावाकडे प्रथम लक्ष दिलें–पाहिजे; व ह्याच नवीन मुद्याकडे मला आतां वाचकांचें लक्ष वेधावयाचें–आहे.

भाषेचा स्वभाव असा आहे कीं,ती अर्थ–विशदीकरणासाठीं एका शब्दाला हवीं तेवढीं लटांबरें जोडून, अनेकशब्दात्मक होईल; म्हणजे वाक्य पाहिजे तेवढें विस्तारील; अथवा अर्थ–विशदीकरणासाठींच पण पाहिजे तेवढें संकुचित रूप धारण करूं–शकेल. खराप्रमाणें बऱ्याच अंशीं तिची अशी स्थिति आहे. हा तिचा स्वभाव लक्षांत घेतला, म्हणजे संयुक्त क्रियापदांसंबंधीं विचारान्दोलनांत बराचसा फरक पडल्यावांचून राहणार–नाहीं.

सामासिक शब्द हे पुष्कळ विशदीकरण थोडक्या शब्दांत निदान कमी शब्दांत करूं--शकतात, हें सर्वांस माहीतच आहे. हेंच कार्य संधि-युक्त किंवा जवळ जवळ आलेले विसंधियुक्त दोन तीन शब्द करितात. बोलणाराची जलदीनें उच्चार करण्याची प्रवृत्ति ही यास कारण आहे. मारीत+आहे=मारिताहे वगैरे याच प्रवृत्तीचीं उदाहरणें आहेत. आतां घण्टलें, उत्तरला, सम्पादील, या शब्दांना; जर मूळ दोन अर्थदर्शक शब्दांपासून तेवढाच अर्थ दर्शविणारे

हे 'एकेरी' शब्द झाले असल्यानें, क्रियापदें मानण्यास कोणाचीच अडचण नाहीं; तर मग गेलोंसें, करिताहे, नोहे, नव्हे, नसतें, यांचा जडलेला सांधा उखडून टाकून, ते संस्कृताप्रमाणें दोन शब्द असलेच-पाहिजेत; असा त्या रसायणावर आरोप लादून, त्यांचें भिन्न भिन्न व्याकरण कां करावें, हें कळत-नाहीं. याचें कारण एवढेंच दिसतें कीं, संस्कृतांत संयुक्त क्रियापदें नाहींत, अर्थात् मराठींतही तो प्रकार नसलाच-पाहिजे; हा आग्रह कोठून तरी तडीस न्यावयाचा. परंतु हें बरोबर दिसत-नाहीं. आजीबाईस आपल्या नातीनें अगदीं "आपल्यासारखी" असावें, असें प्रेमामुळें वाटणें साहजिक आहे; परंतु तसें ध्येय ठेविलें, तरी नातीच्या-मराठीच्या-उफाड्याच्या वाढत्या वयास अनुसरून, तिचा दुसऱ्या कोणाशीं कांहींच सम्बन्ध येऊं-शकणार-नाहीं, असें मराठीच्या आजीबाईस किंवा तिच्या पक्षकारांस वाटणें आजकाल फार भोळेपणाचें समजलें-जाईल.

तात्पर्य, घण्टलें, उद्गारला, ह्या शब्दांप्रमाणेंच करिताहे, गेलोंसें, नव्हे, ह्यांना स्वतन्त्र क्रियापदें म्हणावीं लागणार; त्यांत मूळचें संस्कृत कृदन्त किंवा न हें अव्यय आहेच; व तें फोडून निराळें काढून, व्याकरण करूं म्हटलें, तर तें आतां वरच्या दोन प्रकारच्या उदाहरणांवरून, एकास स्वतन्त्र क्रियापद मानावयाचें व दुसऱ्यास तेंच कारण असतां मानावयाचें-नाहीं; असें धरसोडीचें, विसंगत, युक्तीस व सोयीसही सोडून, होईल; हें स्पष्टच आहे.

आतां प्रश्न उरला 'करीत-आहे' 'गेला-नाहीं' यांच्या एकत्रितपणाबद्दलचा किंवा संयोगीकरणाबद्दलचा. हा प्रश्न बोलणाराच्या हेतूवरून उलगडला-पाहिजे: म्हणून त्याचा आतां विचार करूं.

[ ३ ]

संयुक्त क्रियापदें न मानणारांचें सर्वसामान्य धोरण खालीलप्रमाणें आहे:-

१. रामा काम करितो
२. रामानें काम केलें

या वाक्यांत रामा हा कर्ता, काम हें कर्म, व करितो, केलें, हीं क्रियापदें; त्यांपैकीं बरेचसे मान्य करितात; पण—

१. रामा काम करीत-आहे-नाहीं
२. रामानें काम केलें-होतें-नव्हतें
३. रामा काम करणार-असेल-नसेल

ह्या वाक्यांत त्यांचे मतें ' काम ' हाच कर्ता असून, 'आहे-नाहीं,' ' होतें-नव्हतें, ' असेल-नसेल, इ० हींच क्रियापदें आहेत. त्यांचें म्हणणें ( १ ) दोन शब्द पुढें आले रे आले,कीं व्याकरणानें त्या दोहोंची स्वतंत्र फोड केलीच-पाहिजे: ( २ ) त्यास संस्कृताचा आधार आहे; (३) त्यानें अन्य भाषांचें अनुकरण करूं-नये; ( ४ ) त्यानें बोलणाराच्या उद्दिष्टाकडेही बिलकुल लक्ष देण्याचें प्रयोजन नाहीं; कारण, ( ५ ) व्याकरणांत केवळ 'पदा'चाच-पदरूपाचाच-विचार करणें प्राप्त आहे; ( ६ ) अर्थाकडे लक्ष देणें त्याचें काम नाहीं.

आतां प्रश्न असा उपस्थित होतो कीं, बोलणाराच्या उद्दिष्टाकडे व्याकरणानें न पहावें, तर व्याकरणाचें खरोखर प्रयोजनच काय ? व्याकरण हें बोलणारानें ज्या त्या स्थलीं वसविलेल्या शब्दप्रणालिकेपासून त्याच्या बोलण्याचें उद्दिष्ट काय, अथवा तें लेखनांत असल्यास, त्यांतील उद्दिष्ट कसें ओळखावें, याचें मार्गदर्शक आहे; आणि म्हणूनच व्याकरणास वाक्यपृथक्करणाची किंवा वाक्य-मीमांसेची जोड देण्यांत-आली-आहे. किंबहुना ती जोड नसेल, तर व्याकरण-शास्त्र एका महत्त्वाच्या अंगानें अपुरें राहील, हें उघड आहे. आगरकरांनीं "वाक्य-मीमांसा" हें पुस्तक याचसाठीं लिहिलें-आहे. असें असतां बोललेल्या शब्दसमुदायापासून बोलणाराचा अभिप्रेत अर्थ, त्याचा विच्छेद न करितां, जसा असेल तसाच प्रकट होणें अगत्याचें आहे. ह्या दृष्टीनें पाहतां, वरील वाक्यांपासून खरोखर काय अर्थ निष्पन्न होतो, तें पाहूं.

' रामानें काम केलें ' ' रामा काम करितो ' ह्यांत क्रिया करणारा रामा आहे; आतां-' रामानें काम केलें-आहे ' ' रामानें काम केलें-नाहीं ' किंवा ' रामा काम करीत-आहे ' 'रामा काम करीत-नाहीं ' ह्या वाक्यांतून वरच्या-पेक्षां फक्त ' आहे-नाहीं ' एवढा शब्दबदल झाल्यानें, रामाचें काम करण्याचें कर्तृत्व कोठें गेलें ? पूर्वपक्ष म्हणतो,-" रामाचें काम करण्याबद्दलचें कर्तृत्व आम्हांस कबूल आहे; पण ' आहे ' व 'नाहीं' हीं जीं वरील वाक्यांत क्रियापदें आहेत, त्यांचें कर्तृत्व रामा ह्या शब्दाकडे नसून, काम ह्या शब्दाकडे आहे. "

हें म्हणणें बाह्यतः पाहतां बरोबर दिसतें: परंतु बोलणाराला फक्त एकादी गोष्ट ' आहे ' किंवा 'नाहीं' एवढेंच सांगावयाचें-आहे काय, हा मुख्य व मह-त्त्वाचा प्रश्न आहे; आणि कितीही पूर्वपक्षाच्या बाजूकडे झुकण्याचें धोरण ठेविलें, तरी असें स्पष्ट म्हणावें-लागतें कीं,वाक्य-मीमांसेच्या अथवा बोलणाराच्या उद्दि-

ष्टाच्या दृष्टीनें,बोलणारास नुसतें 'आहे' 'नाहीं' असें सांगावयाचें नसून,'केलें-आहे कीं केलें-नाहीं' 'करणार-आहे कीं करणार-नाहीं' 'करीत-आहे कीं करीत-नाहीं,' इ० सांगावयाचें-आहे; म्हणजे करणें, बोलणें, जाणें, देणें, येणें, इ० पूर्व-क्रियांबद्दल त्यास बोलावयाचें-आहे; व त्यांबद्दलच बोलणें हें त्याचें निखालस उद्दिष्ट आहे. मग असें असतां ' आहे ' ' नाहीं ' इ० एकेरी शब्दात्मकच उद्दिष्ट विधान आहे; असें आग्रहानेंच प्रतिपादन कां करावें ? ह्याऐवजीं मागें लिहिल्याप्रमाणें ' आहे' ' नाहीं ' हे जोड प्रत्यक्ष दिसत-असोत किंवा नसोत, त्या दुहेरी शब्दांचें अर्थदृष्टया स्वरूप एक-शब्दात्मकच आहे, असें म्हणण्यास काय हरकत आहे ? केवळ संस्कृतांत द्विशब्दात्मक क्रियापद-रूपें नाहींत, एवढयावरच बोलणाराच्या उद्दिष्टास फाटा देऊन, एक-शब्दात्मकच क्रियापदांचा आग्रह कां धरावा, ह्यास त्या आग्रहाशिवाय दुसरें सबळ कारण दिसत-नाहीं.

' आतां रोगी बरा झाला ' ' अलेक्झांड्रा ही एक राणी होती ' ' तिच्या अंगांत येत होतें ' इ० वाक्यांमध्यें ' बरें होणें ' ' राणी असणें ' ' अंगांत येत असणें ' इ० शब्दसमुच्चयांचा अर्थ ' करीत-आहे ' ' दिलें-नाहीं ' ह्यांप्रमाणेंच एकरूपतेनें सिद्ध होत-नाहीं काय ? मग, त्यांसही जोड-शब्दात्मक क्रियापदें कां मानूं-नयेत, हा एक प्रश्न उपस्थित होतो. थोरल्या शास्त्रीबोवांनीं व इतर पूर्वपक्षवाद्यांनीं तो उपस्थित केलेलाच-आहे; व अशा रीतीनें वाढविल्यास, सबंध वाक्यच्या वाक्यच अनेक जोड-शब्दांचें क्रियापद मानावें-लागेल, असें कुशाग्रबुद्धि शास्त्रीबोवांनीं त्याच वेळीं लिहून-ठेविलें-आहे. अर्थात् ह्या प्रश्नाचा निकाल करिते वेळीं निर्वाहपक्ष व अनिर्वाहपक्ष ह्यांचा विचार केला-पाहिजे. ' रोगी बरा झाला ' ह्या वाक्यांत ' बरें होणें ' हें विधान उद्दिष्ट आहे खरें; पण ' बरा ' ह्या शब्दाचें स्वतन्त्र व्याकरण केल्यानें भागतें. ' ती मुलगी द्वाड आहे ' यांतही नुसतें ' आहे-नाहीं ' हेंच विधान नाहीं खरें; पण येथेंही ' द्वाड ' ह्या शब्दाचें स्वतन्त्र व्याकरण सांगतां-येतें. ' गंगूच्या अंगांत आलें ' ह्या ठिकाणींही नुसतें ' आलें-गेलें ' हें विधान नाहीं; तरीपण ' अंगांत ' ह्या शब्दाचें स्वतन्त्र व्याकरण करणें सोयीचें पडतें. शिवाय ' बरें ' ' द्वाड ' ' अंगांत ' हे कांहीं क्रिया-शब्द नाहींत. 'पण रामा गेला-नाहीं' यांत 'गेला' ह्या शब्दाला वरच्याप्रमाणें स्वतन्त्र केल्यास, मुख्य विधान-क्रियाच मुळीं नष्ट होते. येथें बोलणारास 'जाण्या'बद्दलच विधान करावयाचें असल्यानें, तोच मुख्य क्रिया-शब्द आहे. त्याला गौण करणें अर्थदृष्टीनें व बोलणाराच्या हेतूच्या दृष्टीनें अयोग्य होईल.

अर्थात् अखेर असें ठरविणें प्राप्त होतें कीं, जेव्हां मुख्य कृदन्तसदृश क्रिया-शब्द व त्याचा जोड सहाय क्रियापदात्मक शब्द हे जवळ जवळ येतात, तेव्हांच त्या उभयतांच्या सान्निध्यास एकरूप समजून, त्या दोघां मिळून संयुक्त क्रियापद ( तें संयुक्त क्रियायुक्त एक पद ) मानावें; व जेव्हां कृदन्तास प्राधान्य नसेल, तें साक्षात् नामें, विशेषणें व अव्ययें ह्यांच्या वर दिलेल्या उदाहरणांप्रमाणें केवळ विधानपूरक म्हणूनच अवतरत असेल, किंवा वाक्यांत दिसून-येईल, तेव्हां त्यास जोड शब्द मानूं-नये; त्यांस संयुक्त क्रियापदही म्हणूं-नये; व त्यांचें व्याकरण स्वतन्त्र करावें; ही व्यवस्था उत्तम, सोयस्कर; व वाक्याची उद्दिष्टार्थ-हानि न करणारी आणि सर्वमान्य होणारी अशी आहे.

१. मी खेळणार-आहें येथें ' खेळणार-आहें ' एवढें संयुक्त क्रियापद.

२. मी येथें विहारी होय किंवा ह्याचेंच रूपान्तर मी येथें खेळणारा झालों ह्या ठिकाणीं ' खेळणारा ' हें कर्तृवाचक विधिविशेषण आहे.

दोन्ही ठिकाणीं अर्थ एक नाहीं, भिन्न आहे; म्हणून त्या शब्दांचें अर्थहानि-कर व्याकरण न करितां, अर्थास धरूनच वरच्याप्रमाणें व्याकरण करावें.

' रामानें मला पुस्तक दिलें ' ह्यांत ' दिलें ' हा वाक्य पूर्ण करणारा क्रिया-शब्द असतां, तो मूळ संस्कृत कृदन्तापासून जन्मलेला म्हणूनच केवळ त्यास आतां ' आहे-नाहीं ' असें त्याच्या पुढें क्रियापद अध्याहृत मानून, त्यालाही कृदन्तच ठरविणें खरोखर आग्रहाचें होईल ; व जेथें जेथें संस्कृत-कृदन्त-जन्य मराठींत क्रिया-शब्द आढळेल, तेथें तेथें वाक्यांत तो काय कार्य करितो, हें न पाहतां मराठींतही सर्व वेळीं त्यास कृदन्त मानावयास लावणें अन्धपणाचें होईल.

तात्पर्य; संस्कृत-कृदन्त-जन्य शब्द मराठींत पांच प्रकारचीं कार्यें करीत असलेले आढळून-येतात; एकच प्रकारचें नव्हे. म्हणून त्यांचें व्याकरण मराठींत एकच ठरूं-शकणार-नाहीं. त्यांच्या कार्याप्रमाणें भिन्न होऊं-शकेल.

( १ ) झाडाचें पान **'पिकलें'**(येथें 'पिकलें' हा शब्द क्रियापद आहे.)

( २ ) **पिकलें** पान गळून पडणारच ( येथें ' पिकलें ' हा शब्द पान ह्या शब्दाचें विशेषण. )

( ३ ) हें फळ **पिकलें-आहे** ( येथें ' पिकलें ' हा शब्द मुख्य क्रियादर्शक असून, संयुक्त क्रियापदान्तर्गत आहे; व 'पिकलें-आहे' एवढा जोड-शब्द संयुक्त-क्रियापद आहे. ते दोन शब्द नाहींत, त्या दोहों मिळून एकच शब्द आहे. )

( ४ ) मीं विश्वामित्र–ऋषि ध्यानस्थ **बसलेले** पाहिले ( यांत ‘ बसलेले ’ ह्या शब्द विधिविशेषण आहे. ) आणि—

( ५ ) देशाटन **केल्यानें** चातुर्य येतें ( येथें ‘ केल्यानें ’ हें केलें या भू० का० वा० धातुसाधित नामाचें, नपुं० लिंगीं, तृतीयेच्या ए० व० चें रूप आहे. )

ज्याप्रमाणें नाटकांत मूळचें रूप एकच असून, एकादा मनुष्य निरनिराळीं सोंगें घेतो, त्याप्रमाणें वाक्यांतील शब्दांचें आहे. नटानें ज्यावेळीं जी भूमिका घेतली–असेल, तें नांव त्यास मिळतें; त्यावेळीं त्याच्या मूळच्या ‘ दामूअण्णा ’ नांवाचा आग्रह चालत–नाहीं. त्याप्रमाणें संस्कृत–कृदन्त–जन्य शब्द मराठींत ज्या स्थानीं अधिष्ठित झाले–असतील, व जें कार्य करीत–असतील, तेंच नांव त्यांना प्राप्त होणें साहजिक आहे. तें वरील पांचांपैकीं कोणतेंही एक असूं–शकेल.

एवढें पटल्यावर आतां संयुक्त–क्रियापदांच्या मान्यतेस कांहीं अडचण उरूं–नये.

[ ४ ]

आतां, आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा विचार करूं. शिक्षणशास्त्रदृष्ट्या ह्या गोष्टींकडे पाहण्याचा कोणी फारसा विचारच करीत–नाहीं; परन्तु व्याकरण-ज्ञान म्हणजे सामान्य भाषाज्ञान जर प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसही आवश्यक आहे, तर त्यांच्या दृष्टीनें व त्यांना शिकविण्याच्या दृष्टीनेंही ह्या विषयाकडे पाहिलें–पाहिजे. दोन शास्त्रांच्या फारखतीनें किंवा त्यांच्या एकसुरी शिंगखुपसणीनें, त्यांपैकीं कोणा एका शास्त्राचा जय झाला, असें मानणें असमंजसपणाचें आहे. म्हणून मुलांना का होईना, कोणताही विषय शिकवितेवेळीं तो त्यांना समजावून शिकविला–पाहिजे; समजावण्याचे मार्ग कठीण असल्यास, ते सोपे केले–पाहिजेत; सांगण्याची भाषा अवघड असल्यास, सवघड वापरली–पाहिजे; ही आधुनिक शिक्षण–पद्धति आतां सर्वमान्य झालेली आहे.

ह्या दृष्टीनें आपण मुलांना एकाद्या वाक्यांतील शब्दांच्या कार्याविषयी समजूत देत–आहोंत, असें गृहीत धरूं. ‘ आतां रामानें काम केलें ’ ह्या ठिकाणीं वाक्यार्थाची पूर्ति ‘ केलें ’ ह्या क्रिया–शब्दानें होत–आहे, हें मुलांस कळतें; व केलें–दिलें–मारिलें इ० शब्द क्रियापदें आहेत, हें तो सहज तेवढ्या क्रियापूर्तीच्या जाणिवेनें सहज ओळखतो; पण जर त्यास ‘ केलें ’ ह्याच्यापुढें ‘ आहे–नाहीं ’ असे शब्द अध्याहृत आहेत; असें सांगून, ‘ केलें ह्यास विधिविशेषण म्हण ’ असें आपण त्याजवर लादूं–लागलों, तर तो बुचकळ्यांत पडेल; ‘ आहे–नाहीं ’ हें अध्याहृत उपटसुंभ शब्द कशासाठीं, ह्याची त्यास नीटशी जरूरी पटणार–नाहीं;

' प्रफुल्ल होऊनि सुपुष्प ठेलें ' यांतही ठेलें ह्यापुढें ( आहे ) हा शब्द अध्याहृत घालून, ठेलें ह्या क्रिया-शब्दाचें वाक्यपूर्तीचें काम हिरावून-घेऊन, मुलांस, त्यास कृदन्त-विशेषण म्हणावयास लावणें, त्यांस चमत्कारीक वाटेल; इतकेंच नव्हे, तर त्यायोगें त्यांची कांहीं समजूतही पटणार-नाहीं: आणि मुलांची जेथें समजूत पटत-नाहीं, तें शिक्षण काय कामाचें ?

व्याकरणासारखा विषय मुलांस समजावण्यास कठीण, त्या विषयांत मता-मतांचा गलबला, तेव्हां काय करावें, असा पुष्कळ लोक गवगवा किंवा कांगावा करितात; परंतु समजुतीच्या दृष्टीनें मुलांस शिकवावें कसें, ह्याचा विचार करण्याची त्यांस आवश्यकता वाटत-नाहीं; जणूं व्याकरणशास्त्र म्हणजे व्याकरण-शास्त्र. सर्व शास्त्रांचा एकमेकांशीं किंवा शिक्षणशास्त्राशीं कांहीं सम्बन्ध आहे, किंवा असावा, ह्याची त्यांस दादच नसते; ह्यास मुलें किंवा व्याकरणशास्त्र काय करणार ? असो.

( १ ) मी येणार-नाहीं, ( २ ) तूं मला सहा महिन्यापूर्वी शिव्या दिल्या-होत्यास, ( ३ ) त्याला जावयाचें-आहे, ( ४ ) मुलांनीं खोटें बोलूं-नये, ( ५ ) आतां हें काम केलें-पाहिजे. ( ६ ) ते उरलेले पोहे खाऊन-टाक इ० वाक्यांत शेवटच्या शब्दांविषयींच केवळ विधानें नसून, ' येणार-नाहीं, ' ' दिल्या-होत्यास ' इ० म्हटल्यानेंच मुख्य-क्रियापूर्ति होत-आहे; व त्यांतील पहिलेच मुख्य क्रिया-युक्त शब्द गाळल्यानें, मनास अर्थ ( किंवा बोलणाराचें उद्दिष्ट विधान ) नीट पटत-नाहीं, हें मुलांच्या ध्यानांत येतें. अर्थात् जें मुलांच्या ध्यानांत येत-नाहीं, व ध्यानांत आणूं गेल्यास पटूं-शकत-नाहीं, तें लादणें शिक्षण-शास्त्रदृष्ट्या अयोग्य व अशास्त्रीयच होय. म्हणून शास्त्राच्या नांवाखालीं विद्या-र्थ्यांस उगीच कोणीं बुजगावूं-नये. मोठे मोठे जाणते पण्डित देखील असें बुज-गावणें केव्हां केव्हां दाखवितात; पण ते शक्याशक्यतेचा व व्यवहार्य-अव्यवहार्य यांचा कांहींच विधि-निषेध बाळगीत-नाहींत. उदाहरणार्थ,—

( १ ) रामः रावणं प्रति घातयति=राम रावणातें घातितो
( २ ) रामः पुत्रिकां प्रतिमारयति=राम मुलगी **तेमारितो**
( १ ) रामः रावणं सम् घातयति=राम रावणास घातितो
( २ ) रामः पुत्रिकां संमारयति=राम मुलगी **समारितो**
( १ ) रामः रावणं परा घातयति=राम रावणाला घातितो
( २ ) रामः पुत्रिकां परामारयति=राम मुलगी **लामारितो** इ०

यांतील 'स–ला–तें'चा फरक मुलांस कसा कळणार? आणि राजवाड्यांनीं जरी **समारितो, लामारितो, तेमारितो,** अशी शास्त्रदृष्ट्या व व्युत्पत्तिदृष्ट्या क्रियापदें प्रतिपादिलीं–असलीं, तरी तीं प्रस्तुत मानणार कोण ? किंवा उद्यांपासून मुलांनीं भाषा बोलणेंच सोडून–यावें ? अथवा राजवाड्यांच्या शास्त्राप्रमाणें किंवा मताप्रमाणें विभक्तिप्रत्यय, सर्वनामें, क्रियापदें, इ० मुलांस व मोठ्यांसही कळणें अशक्य, म्हणून शाळांतून सामान्य व्याकरण–विषयही काढून–टाकावा ? अर्थात् हें शक्य नाहीं. तर तारतम्य भावानें, मुलांस व मोठ्यांसही समजेल, झेपेल व व्यवहारितां–येईल अशा रीतीनें, नीट योजनेनें, शिक्षणशास्त्रास धुडकावून न लावितां, पाऊल टाकणें बरें. मुलें झालीं, तरी त्यांच्या किंवा बहुजनसमाजाच्या डोक्यावर कांहीं तरी शास्त्राच्या नांवाखालीं थापावयाचें नाहीं; भाषा ही शास्त्राकरितां अडून बसणार नाहीं, तुम्हीच तिचा स्वभाव पाहून शास्त्र जरूर तर करा; फिरवा. अशा दृष्टीनें संयुक्त क्रियापदांबद्दल विचार केल्यास, तीं मानिल्यानें अर्थदृष्ट्या मुलांच्या समजुतीस पटेल, अशी योजना करितां–येते; चालू भाषा–व्यवहार ( मग तो परानुकरणानें असो कीं कसाही असो ) पवित्र व शास्त्रशुद्ध करून–घेतां–येतो; म्हणून एकादी गोष्ट लादण्यापेक्षां तिची इष्टता व सकारणता मुलांच्यासुद्धां मनावर बिंबविणें अगत्याचें आहे; आणि शिक्षणशास्त्रासही धुडकावून देण्यांत अहर्निश पुष्कळांकडून जें पाप घडत–असतें, तें घडूं–नये. हा ह्या लिहिण्याचा आशय आहे.

वरील सर्व विवेचनावरून संयुक्त-क्रियापदांचें मूळ स्वरूप खालीलप्रमाणें कळून–येईल:—

( १ ) कृदन्त व त्यापुढील क्रियापद हीं पूर्वी संस्कृत रचनेप्रमाणें भिन्न होतीं व त्यावेळीं त्यांचें व्याकरण भिन्न शब्द समजून करणेंच शास्त्रशुद्ध व योग्य होतें खरें; परंतु आतां दोहोंपैकीं पुढील क्रियापद–शब्द नष्ट होऊन, मागच्या कृदन्तजन्य उरलेल्या शब्दांसच क्रियापदत्व प्राप्त झालें–आहे, कारण, वाक्यपूर्तीचें काम तेच शब्द आज अक्षरशः आपल्या एकेरी रूपानेंच करीत–आहेत. 'रामानें काम केलें' यापुढें आतां ' आहे–नाहीं ' असे शब्द घालण्याची जरूरी नाहीं.

( २ ) हे शब्द पूर्वी होते, मग आतां कोठें गेले ? ह्याचें उत्तर मागें आलेंच–आहे कीं, अर्थ पूर्णपणें राखून, शब्द गाळून, वाक्य थोडक्या शब्दांत बहुर्थक

ठेवणें हा भाषेचा स्वभाव आहे; ह्यामुळें पुढील मूळ क्रियापदें गळून, कृदन्तात्मक शब्दासच क्रियापदत्व आलें. कदाचित् असेंही होण्याचा सम्भव आहे कीं, आज ज्यांना आम्ही संयुक्त–क्रियापदें म्हणतों, त्यांतील शेवटचे शब्द मागील कांहीं उदाहरणातल्याप्रमाणें कालान्तरानें गळूनही जातील. ह्या भाषेच्या स्वभावाप्रमाणें खरोखरच घडल्यास, संयुक्त–क्रियापदें न मानणारांच्या दृष्टीनें उत्तमच झालें; व आमचें व्याकरण आमच्या आजीच्या मार्गास अनुसरलें; म्हणजे हा वादच मिटला.

परन्तु संगति ही मोठी वाईट असते, तिचा कांहींना कांहीं परिणाम टिकून-राहतोच; व तो कालान्तरानेंही जाणें अशक्य असतें. त्याप्रमाणें आपल्या भाषेला अन्य भाषांच्या साहचर्यानें, संयुक्त क्रियायुक्त शब्द वाक्यार्थपूर्तीसाठीं वापरण्याचें जें वळण लागलें–आहे, तें जाईल, असें वाटत–नाहीं; निदान कांहीं 'शें' वर्षें तरी तें तसेंच राहणार; हें निश्चित आहे. मग त्यांच्या कार्याप्रमाणें व्याकरणांत त्यांस स्थान देण्यास नको काय ? *

## [ ५ ]

आतां, जर संयुक्त क्रियापदें मानावयाचीं, तर तीं संयुक्त लिहावयाचीं कां नाहींत, याचा विचार करून, हा लेख पुरा करूं.

संस्कृत शब्दांत विशेष्य–विशेषण हीं एकत्र जुळून लिहितात. म्हणजे त्यांचा सामासिक शब्द होतो; मराठींत तशी रूढि नाहीं, इतकेंच. उदा०—'ताम्र–वर्ण' हा शब्द संस्कृतांत एकत्रच लिहिला–पाहिजे; पण मराठींत 'तांबडा वर्ण' असे स्वतंत्र सुटे शब्द लिहिण्याची वहिवाट आहे. दुसरें उदा०—'महाराष्ट्र–राज्य–संस्थापक' संस्कृतांत हा एकच शब्द समजला–पाहिजे; व त्यांतील पदें जोडूनच लिहिलीं–पाहिजेत; पण मराठींत ह्याच अर्थाचे 'मराठी राज्याचे संस्थापक,' हे शब्द एकत्र लिहिण्याची चाल नाहीं. एवढें ध्यानांत आल्यावर

---

* ह्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत वाचीत–असतां, कै० रा० ब० काशीनाथ नारायण साने ह्यांनीं जेथें जेथें त्यांस संयुक्त क्रियापदें दिसलीं, तेथें तेथें 'एकेरी रूपानें काम भागतें, मग मुद्दाम दुहेरी रूपें कशाला ?' असें म्हणून तीं गाळण्याबद्दल व सर्वत्र एकेरी रूपें घालण्याबद्दल सूचना केली–होती; सूचना सुंदर होती, परन्तु लोक–व्यवहार तें ऐकणार आहे थोडाच ? यामुळें आम्हांसही तिचा स्वीकार करितां आला–नाहीं.

जे शब्द वस्तुतः एक–समासयुक्तच आहेत, ते भिन्न लिहिण्याच्या केवळ रूढी-मुळें, त्यांतलें समासार्थकत्व नाहींसें होऊं–शकत–नाहीं. म्हणून संयुक्त क्रियापदें मानावयाचीं ठरल्यावर त्यांचें संयुक्तत्व, एकशब्दत्व किंवा समासत्व दर्शविण्या साठीं, त्या दोन क्रिया–शब्दांमध्यें सामासिक शब्दांतल्याप्रमाणें एक समास-दर्शक रेघ ओढली म्हणजे झालें; व हाच उपक्रम ह्या पुस्तकांत बहुशः आमच्या स्वतन्त्र लेखनांत अवलंबिला–आहे. ते सामासिक शब्द आहेत; व त्यांचा कर्म-धारय समास होईल. ते सामासिक शब्द झाल्यावर व लेखनांत मध्यें रेघ देऊन तसें दर्शविल्यावर, 'संयुक्त–क्रियापदें' हा शब्द सार्थ, सयुक्तिक, सोयस्कर, भाषा-व्यवहारास धरून, इष्ट, व्यवस्था लावण्यास उत्तम, अशास्त्रीयता ज्यांत कांहीं उरली–नाहीं, व विसंगतिही कांहीं नाहीं, असा होईल; अर्थात् संयुक्त क्रियापदें मानून, ह्या शब्दाचा स्वीकार करण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

---

# ४. आपल्या भाषेचें पुढें काय होणार ?

## [ १ ]

या विषयासंबंधानें विविधज्ञानविस्तारांत खालील चिंतनीय लेख फार दिवसा-मागें आला आहे—

( १ ) " एका विद्वान् गृहस्थानें मुंबईतील एका प्रसिद्ध सभेमध्यें व्याख्यान दिलें होतें कीं, **देशी भाषांचा कांहीं उपयोग नाहीं, त्यांच्या जागीं इंग्रजी भाषाच चालू होईल तर बरें,** आतां ज्या लोकांना स्वतःचें घर–दार नाहीं तर नाहीं, पण स्वतःची भाषाही नाहीं. त्यांचें जिणें व्यर्थ होय ज्यांची देशभाषा गेली त्यांच्या हातून स्वदेशविषयक कांहीं मोठें कृत्य व्हावयाचें नाहीं. अलीकडे मुंबईतील कित्येक पारशी गृह-स्थांनीं गेल्या संपूर्ण १० शतकांमध्यें आपली म्हणून अंगिकारलेली जी गुजराथी भाषा ती सोडून देऊन, सर्वत्र–घरीं, दारीं,–इंग्रजी भाषाच चालू करावी असें ठरविल्याचें समजतें; परन्तु ही गोष्ट सर्वप्रकारें दुराग्रहसूचक होय. आम्ही तर असें समजतों कीं, ज्यांनीं देशाची भाषा सोडली, त्यांचा त्या देशाच्या संबं-धाचा सर्व अभिमान गेला; ते त्या देशाला परके झाले; त्यांच्या हातून त्या देशाच्या कल्याणाची कांहीं गोष्ट होणार नाहीं; त्यांची दृष्टि बहिरंग झाली;

बाहेरच्या देशांकडे लागली; ते ह्या देशांतून दूर जातील, तर वाईट नाहीं. आमच्या देशामध्यें जे ख्रिश्चन लोक आहेत, त्यांचीही भाषेच्या संबंधानें मोठी शोचनीय स्थिति झाली आहे. हिंदुस्थानांतील बहुतेक ख्रिश्चन लोकांना व त्यांतूनही विशेषेंकरून रोमन-कॅथोलिक मताच्या लोकांना देशी भाषांचें ज्ञान तांत्रिकच असल्यामुळें, त्यांनीं पोर्तुगीज किंवा इंग्रजी भाषा आपलीशी करण्याचा प्रयत्न चालविला आहे; परंतु त्यांचीही स्थिति हीच. त्यांना ह्या देशाचा किंवा लोकांचा जर कांहीं अभिमान असेल, तर तो ह्यामुळें दिवसेंदिवस पूर्ण नष्ट होत जाणार. त्यांच्याही हातून ह्या देशाच्या खऱ्या कल्याणाची गोष्ट कांहीं होणार नाहीं. ते आपण होऊन, आपणांला इतक्यांतच परके समजूं लागले आहेत. ज्यांच्या पूर्वीच्या ५० पिढ्यांमध्यें परकीय रक्ताचा खरोखर लवलेशही नसेल, त्यांना आपण येथले पूर्ण ‘ देशी लोक ’ असें समजतों. परन्तु आतां त्यांना ‘ देशी लोक ’ ह्या शब्दाची लाज वाटूं लागली आहे. ह्यावरून देशांतील सर्व लोक एका वळणांत राहण्याला भाषा हें एक साधन आहे, हें उघड आहे.

भाषा बदलल्यास, भाषा-भेदापासून मतभेद उत्पन्न होतो; मतभेदापासून द्वेषभाव उत्पन्न होण्याला साह्य होतें. म्हणून देशभाषेचा अभ्यास व तिची सुधारणा करण्यासाठीं आणि शुद्धि राखण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. परभाषांचा अभ्यास करणें जरूर आहे, हें खरें; पण त्यामुळें देशी भाषांच्या अभ्यासाचें व रक्षणाचें महत्त्व कमी होतें असें नाहीं. कोणताही विचार व सुधारणा हीं जर देशांतील स्त्री-पुरुषांस समजलीं पाहिजेत, तर त्या गोष्टीला देशभाषेसारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. परभाषांपासून कधीं इष्टप्राप्ति व्हावयाची नाहीं.

तात्पर्य, ज्यांची देशभाषा मेली, त्यांचे हातपाय मोडले; त्यांचीं तोंडें बंद झालीं; त्यांचे डोळे बहिर्मुख झाले; त्यांचे विचार परकीय संस्कृतीला भुलले; त्यांचीं भ्रान्त-इन्द्रियें परकीय आचारांना कवटाळूं लागलीं; फार काय, त्यांचें स्वत्व नुरलें; ते ह्या देशाचेच नव्हेत; त्यांचा धर्म परकीय बनला; ते त्यांच्या किंवा आमच्या हिंदुस्थानचें काय कल्याण करणार ? धड असे लोक ‘परकीय’ नव्हेत, कारण ते ह्या देशाचे खरोखर रहिवासी आहेत; त्यांचीं घरें-दारें, येथें आहेत; त्यांना परकी लोक खरोखर आपुलकीच्या नात्यानें वागवीत नाहींत; अलीकडे त्यांची विटंबना व मानखंडनाही होऊं लागली आहे. त्यांना ‘ देशी

लोक ' म्हणावें, तर भाषा, व्यवहार व धर्म इत्यादि गोष्टींनीं ते आम्हांपासून दूर सरकूं लागले; त्यांची-आमची ओळख सुटूं लागली; एवढी अनर्थ-परंपरा स्वभाषा त्यांस पारखी होऊं लागल्यामुळें ओढवली ! हा प्रकार बळावल्यास, आमच्या भाषेचें पुढें काय होणार ? ह्याचें उत्तर उघडच आहे आमची भाषा परकी किंवा परकीमय किंवा धेडगुजरी बनणार आणि आम्ही आत्मत्वाला व स्वतःच्या संस्कृतीला मुकणार ! म्हणजे आमची भाषा एकप्रकारें स्वत्वाच्या दृष्टीनें मरणोन्मुख झालेली ठार मरणार ! ! ह्यापेक्षां आणखी वाईट परिणाम तो कोणता ? तेव्हां देशभाषेच्या अभ्यासाचा व देशभाषा विशुद्ध स्थितींत रक्षण करण्याचा काय उपयोग ? हें पुनः पुनः विचार करून सांगण्याचें कारण राहत नाहीं. "

(२) कै० **विश्वनाथ काशीनाथ राजवाडे** ह्यांनीं देखील पुण्याच्या "शारदोपासक संमेलना" च्या प्रथम अधिवेशनाच्या वेळीं अध्यक्ष ह्या नात्यानें असेच उद्गार काढिले-होते.

" जिचा उत्कर्षापकर्ष आपण अजमावूं पाहणार, जिच्यांत ग्रंथसम्पत्ति ऊर्फ विचार-सम्पत्ति आपण निर्मिणार किंवा निर्मिण्याची दिशा दाखविणार, ती ही आपली मराठी भाषा आपले उदात्त हेतु सहन करण्याला व सफलतेस आणण्याला सध्यां लायक आहे कीं लायक नाहीं ? उदात्त हेतु जिच्या द्वारा तडीस न्यावयाचे ती ही आपली मराठी भाषा मरण्याच्या पंथास तर लागली नाहीं ? आणि मरण्याच्या पंथास जर लागली असेल, तर मढ्याला सजवीत बसण्यांत कोणता शहाणपणा आहे ? मेल्या मढ्याला गाडून टाकून ताबडतोब मोकळें होणें व नव्या देहाचा स्वीकार करून, संसाराला नव्या हुरूपानें लागणें जास्त फलप्रद नाहीं काय ?

... ...आपण कोट दोन कोट लोक साक्षात् मराठी भाषा बोलत आहोंत, तेव्हां ती अगदीं मरून जाऊन, तिचें अद्यापि मढें बनलें नाहीं हें उघड आहे. कांहीं थोडीं सबल दुर्बल वर्तमानपत्रें, लेचीं पेचीं गद्य-पद्य पुस्तकें, गृह्य व ग्राम्य व्यवहार, ह्यांच्यांत मराठी भाषेचा उपयोग अद्याप आपण करीत आहोंत. त्यावरून दिसतें कीं मराठी भाषा अद्याप मेली नसून, तिच्यांत कांहीं धुगधुगी उरली आहे. समाजाच्या व्यवहाराचे बाकीचे प्रांत, ह्यांत तिचीं झाडून सारीं अंगें थंडगार पडून गेलेलीं आहेत. राजकीय, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, दिवाणी, मुलकी, लष्करी, नाविक, तारायांत्रिक, प्रावासिक, स्थापत्यिक, वगैरे

जे जे अगणित व्यवहार सरकार करतें ते ते इंग्रजी भाषाद्वारा चालतात....शिकलेले म्हणून ज्यांना म्हणतात, ते प्रत्येक दहा शब्दांत पांच-चार इंग्रजी शब्द ढकलून देतात. खाजगी किंवा सरकारी शाळा, कॉलेजें, सभा, काँग्रेसादि संस्था, यांतून मराठी भाषा पार मरून गेलेली आहे. मराठीचे वाली जे ग्रंथकार गेल्या शंभर वर्षांत झाले, त्यांपैकीं वहुतेक सर्वांचा पत्रव्यवहार तर इंग्रजींतच चाले. ग्रंथरचना इंग्रजींत करण्यांतच भूषण मानणारे कांहीं झाले. प्रोफेसर, मास्तर, सरकारी व व्यापारी नोकरींतील बहुतेक सर्व कारकून, इंग्रजीचा बाहुल्यानें उपयोग करितांना आढळतात. इंग्रजी शिकलेल्या स्त्रियाहि इंग्रजी शिकलेल्या पुरुषांचें अनुकरण करितात. तात्पर्य, इंग्रजी शिकलेल्यांची सहज तोंडांतून निघणारी व हातानें कागदावर सहज उमटणारी भाषा सध्यां इंग्रजी झाली आहे, असें विधान केल्यास तें फारसें चुकलें आहे असें म्हणण्यास काणी धजावणार नाहीं. याप्रमाणें सरकार, खाजगी संस्था, व्यापारी व्यवहार व ग्रंथकार ह्यांनीं जर मराठीला सोडून दिलें आहे, व शिक्षितांच्या संसर्गानें अशिक्षितांत हि जर हाच प्रकार बळावत चालला आहे, तर तिची अशी तोंडदाबणी व अशाच प्रकारची डांबणूक आणीक कांहीं वर्षे होत गेल्यास, लौकरच सर्व महाराष्ट्र इंग्रजी भाषा शुद्ध किंवा अपभ्रष्ट अशी बोलूं लागेल, असा अंदाज दिसतो.

इंग्रजीला तर एकान्तिक काट देण्याची आपली ईर्ष्या नाहीं, इंग्रजींतून व्यवहार न करण्याची तुमची ताकद नाहीं, इंग्रजीपासून अलग राहण्याची तुमची सोय नाहीं, तेव्हां तुम्हांला एकच मार्ग शिल्लक राहतो. इंग्रजीच्या हल्ल्यानें मराठीचा जेवढा चुराडा होईल तेवढा निमूटपणें व सन्तभावानें होऊं द्यावयाचा. शेंकडा शंभर जरी इंग्रजी शब्द या चुराड्यांत तुमच्या भाषेंत यद्यपि शिरले, तथापि त्यांपैकीं बहुतेक शब्द अपभ्रष्ट होऊन गेल्याशिवाय तुम्ही त्यांच्यावर आपलेपणाचा शिक्का मारणार नाहीं, ही एक समाधानाची बाब तुमच्या बाजूची दिसते. तुमच्या भाषेचा जसा क्षय होणार, तसाच तुमच्यांतील शिष्ट जे ब्राह्मण त्यांचा क्षय होऊन, तुम्ही तुमच्या धन्याचे केवळ गुलाम किंवा सनदी मजूर होऊन जाल; व तुमचा शब्दकोश इतका रोडावून जाईल कीं तुमच्या धन्याच्या भाषेंतील लक्षावधि शब्दांतून पांच-पन्नास खाण्यापिण्याच्या व मजुरीच्या धंद्याच्या पलीकडे तुमचा शब्द-कोश फोफावणार नाहीं. तुम्ही काय व्हाल व तुमची भाषा कशी होईल हें पहावयाचें असल्यास, दूरच्या फिजींत किंवा केनियांत जा किंवा इतका लांबचा प्रवास तुम्हांला झेपत नसल्यास, जवळच्या

गोव्यांत शिरा आणि तेथील किरिस्तांव चेड्यांच्या मराठी भाषेची त्यांच्या पोर्तुगीज धन्याच्या भाषेखालीं कोण दुर्दशा उडून गेली आहे ती पहा. कदाचित् असेंहि होईल कीं, पृथ्वीवरील शास्त्रसंपन्न राष्ट्रांची लोकसंख्या तुमच्या लोक-संख्येहून अनेक पटींनीं वाढत आहे, ती आणीक वाढून तुम्हांला गुलाम किंवा सनदी मजूर म्हणून देखील तुमच्याच देशांत तुमचा धनी ठेवूं इच्छिणार नाहीं आणि तुम्ही पृथ्वीच्या पाठीवरून नष्ट होऊन जाल."

[ ३ ] एकंदर व्यवहारांत, लिखाणांत आणि भाषेत मुसलमानी अमदानींत जी भयंकर हानिकारक उलटापालट झाली, त्याचें वर्णन "महाराष्ट्रसारस्वतां"त **कै० विनायकराव भावे** यांनीं खालीलप्रमाणें केलें आहे:—

"राजसत्ता मुसुलमानी असल्यामुळें सरकारदरबारांत फारशी भाषा सुरू झालेली; व हळू हळू सरकारकामासंबंधें सर्व कागदपत्र फारशींत राहूं लागले 'अर्ज'दारांच्या 'फिर्यादी' 'काजी' पुढें जाऊन, त्यांचा 'फैसला' किंवा 'इनसाफ' होऊं लागला. अग्रवादी, पश्चिमवादी, व्यवहार वगैरे पूर्वापार आढळणाऱ्या संज्ञा नाहींशा झाल्या व त्यांच्या जागा मुसुलमानी शब्दांनीं घेतल्या. पत्रांबदली 'कागद' आले; व त्यांवर प्रमाणांकारितां 'गोही' होत असत, त्या 'साक्षी' झाल्या. 'अधिकाऱ्यां'चे 'मोकदम' झाले आणि त्यांना प्रतिवर्षीं मिळणाऱ्या वार्षिक वेत-नाचे ऐवजीं 'सालीना मुशाहिरा' मिळण्याचा 'सिलसिला' पडला. लोक स्वतः-च्याच बापाचें नांव पिते म्हणून न लिहितां 'बिन' योजून लिहूं लागले. राजे-लोकांच्या सभोंवतालच्या मंडळींत तर साफच बदल झाला. राजसभेंत 'बैसणा-ईत' होते तेथें 'दरबारी' आले. राजाबरोबर स्वारींत 'सवदळी' [ शिपाई ], 'दांडिवस' [ पालखीचे भोई ], 'हाडपी' [ विडेकरी ], बारी [ शागीर्द ], 'सागळिये' [ पाणिके ], 'चंवरधरू' [ चवऱ्या वारणारे ], 'भांडारीं', 'वेचकरू', 'देवहारू', [ पुजारी ], 'दिवटे', 'बडवे', वगैरे सेवक असत, ते आतां दिसे-नासे झाले; 'झुंजमल, अनुभीम, राईक, पाईक, मांडलिक, राऊत, रजपूत, वगैरे पदव्या आणि हुद्दे सैन्यांत ऐकूं न येतां', 'जमादार, हवालदार, शिलेदार, सर-दार', ह्या पदव्या नव्यानें ऐकूं येऊं लागल्या.

एकदां स्वातंत्र्य जाऊन परतंत्रता आली म्हणजे जिंकलेल्यांना आपलें सर्वच कांहीं कमी दर्जाचें वाटून, जे त्यांचें सर्व उच्च दर्जाचें व चांगलें वाटूं लागतें. मराठ्यांनीं गुजराथ जिंकल्याला पुष्कळ दिवस गेले, पण अजूनहि दक्षिणी पागोटें घालणारे गुजराथी पुष्कळ आढळतात, पण तिकडे गुजराथी पगडी कोणी दक्षिणी

घालीत नाहीं. हाच प्रकार सक्ती नसतांही इंग्रजी राज्यांत, राहणी, पेहराव, भाषा, इत्यादिकांसंबंधानें आपण नेहमीं पाहतों. लग्नादि कार्यांतच काय पण आपल्या देवतांच्या मिरवणुकींत किंवा धार्मिक प्रसंगीं देशी वाद्यांनीं मनाचें समाधान न होतां आपल्या आजच्या व पूर्वीच्याहि जेत्यांचीं वाद्यें एकप्रकारें जणु आपल्या पारतंत्र्याचा इतिहास मोठ्या हौशीनें वाजवीत सुटतात !...... मग जेथें परकीयांस बाटवून आपला धर्म,आपली भाषा व आपला रिवाज, यांचा प्रसार करण्याचा ज्यांनीं विडाच उचलला होता, त्यांच्या राज्यांत जित अशा मराठ्यांच्या एकंदर गोष्टींत व भाषेंत मनस्वी फरक पडावा हें साहजिकच आहे. ......त्या काळीं वाक्यांत फारशी शब्द इतके शिरले कीं, मराठी वाक्यांचीच रचना फारशीमय होऊं लागली. फारशी भाषेची छाप राज्यकर्त्यांमुळें इतकी दृढ पडली कीं, लोक ते शब्द हौसेनें, खुशीनें किंवा जबरीनें योजूं लागले. ......जे जे लोक एकदां बाटले ते ते तर साफ आमच्यांतून उठून गेल्यासारखेच झाले. त्यांना परकीय गोष्टींचा, अनुकरणाचा व फारशीमय भाषा बोलण्याचाच नसता अभिमान उत्पन्न झाला. ते उलट अनेक तऱ्हांनीं आपलीच हेटाळणी करूं लागले; व प्रत्यक्ष सूर्याच्या तापापेक्षां उसन्या उन्हानें तापलेल्या वाळूप्रमाणें मूळ अस्सल मुसुलमानांपेक्षांही यांना जोर विशेष चढला व हेंच अधिक तापप्रद व भयप्रद झालें. यांचा अम्मल महाराष्ट्रावर अधिक काल असता, तर पंजाबांत ज्याप्रमाणें हिंदु व मुसलमान यांच्या राहणींत फारसा फरक नाहीं, व बोलीसुद्धां सररहा 'उर्दू' झाली आहे, त्याप्रमाणें आपल्या मराठीची व आपली अवस्था झाली असती !''

(४) कै० **हरीभाऊ आपटे** ह्यांनीं व परवांच्या ''मराठी साहित्य संमेलना''चे अध्यक्ष **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर** यांनींही आपल्या भाषेच्या सद्यःस्थितीचें पर्यालोचन करून, तिची हळूहळू पण भरभराट होत-आहे,असें आपापल्या निबन्धांत व भाषणांत दर्शवून,आशेला थोडी जागा उत्पन्न केली-आहे;परन्तु वरतीं दिलेल्या उताऱ्यांतील भयें त्यामुळें कांहीं उपेक्षणीय ठरत-नाहींत. त्यांजकडे काणाडोळा करून भागत-नाहीं. आपल्या भाषेची हेळसांड करून चालणार-नाहीं. हेळसांड होत-नाहीं, असें कोणीं म्हटल्यास, त्यांत विचारदृष्ट्या कांहीं अर्थ नाहीं. कारण, आपणास आपल्या भाषेची प्रगति घडवून आणण्यास किती अडचणी आहेत पहा:—मुंबई युनिव्हर्सिटी ही अठरा-बाबूंची बनलेली-आहे; आणि तिच्या अभ्यासक्रमामध्यें खालपासून उच्च-परीक्षांपर्यंत देशी भाषांना योग्य

स्थान मिळणें अगत्याचें असतां, ही सार्धी गोष्टही रानड्यांच्या वेळेपासून आजपर्यंत होऊं-शकली-नाहीं. मुं० यु० त देशी भाषांच्या विरुद्ध युरोपियन, मुसलमान व नेटिव्ह ख्रिश्चन मेंबर्स असणार, हें साहजिकच आहे. त्यांत पुनः उर्दू, मराठी कीं गुजराथी हा वाद आहेच. इतकेंच नव्हे, तर ह्यापुढेंही हे वाद वळावत जाऊन, दूरदृष्टि राजवाड्यांनीं वरतीं म्हटल्याप्रमाणें, प्रमुख ब्राह्मणवर्ग मागे पडून, ब्राह्मणेतर वर्ग नोकऱ्या-चाकऱ्यांकरितां त्यांचें स्थान पटकावण्याची धडपड करीत-राहणार; अस्पृश्य वर्ग ह्याच कारणासाठीं पुढें येण्याच्या झटापटींत कित्येक दिवस गुंतून राहणार. ह्या एवढ्या बहुजन-समाजाला सध्यां भाषेच्या उत्कर्षापकर्षाकडे पाहण्याची फुरसत नाहीं; इच्छा नाहीं. इतकेंच नव्हे, तर ह्यांच्यांपैकीं बहुसंख्याक लोकांना अजून कित्येक वर्षें इंग्रजी भाषेचेंच स्तोम प्रिय वाटणार; भावी पिढीला भाषा शिक्षण देणारीं आजचीं ट्रेनिंग कॉलेजें-त्यांतील हल्लींचे विद्यार्थी-पहा, किंवा युनिव्हर्सिटींतील कोणतींही देशी भाषेंतील उत्तर-पत्रकें पहा, कोणास साध्या, शुद्ध मराठी भाषेची जरुरी देखील वाटत-नाहीं. तूर्त कोणाला स्वभाषेची पर्वाच नाहीं; आणि असा प्रकार आणखी कित्येक वर्षे ह्या झगड्यांत चालणार हें स्पष्टच आहे. तेव्हां वरच्या दोन लेखांतील भयें व्यर्थ तरी कशीं म्हणावीं ? गोव्याच्या किरिस्तांव मराठीला 'अभिजात मराठी' म्हणतां येईल काय ? "**ऱ्याकरनांत** शब्दांच्या आठ जाति असतात" असें किंवा अशा प्रकारच्या भाषेनें शिकविणाऱ्या एकाद्या अलीकडील ट्रेन्ड मास्तराच्या मराठीला "अभिजात मराठी" म्हणतां येईल काय ? तूर्तच्या घाईंत व खाईंत तुमच्या भाषेची प्रगति होण्याला वाव नाहीं; आणि 'भाषेचें कांहीं होवो' असें म्हणणारा व तिच्या लज्जा-रक्षणार्थ देखील धावून न येणारा असा बेफिकीर पेंढारवर्ग यांच्या तावडींत मात्र तुमची भाषा सांपडली-आहे खरी.

असें जर आहे, तर आमच्या मराठी भाषेचें पुढें काय होणार ? "ती मरणार" असें जरी याचें उत्तर येत-असलें, तरी त्या उत्तरांतच तिच्या उत्कर्षाचें बीज आहे. 'मरणार' त्याअर्थी 'मेली नाहीं' आणि 'मेली नाहीं' त्याअर्थी आमच्या भगीरथ प्रयत्नांनीं ती जगणें शक्य आहे. अर्थात् त्या मार्गाचेंच अवलंबन सुज्ञांनीं करणें अवश्य आहे. संकट लहान-सान नाहीं, एवढेंच दर्शविण्याचा येथें हेतु आहे.

# विभाग दुसरा.

# महानुभावीय व्याकरणकार.

ज्ञानेश्वराच्याही पूर्वी महानुभावीयांनीं आपल्या धार्मिक वाङ्मयाच्या अध्य-यनाकरितां तत्कालीन मराठीचीं व्याकरणें तयार केलीं, ही गोष्ट आतां पुराव्यानें सिद्ध होत-आहे. पंचवार्तिककार पंडित भीष्माचार्य ह्यांनीं आपल्या पूर्वीच्या महानुभावीय व्याकरणकारांचा आपल्या ग्रंथांत आदरानें उल्लेख केला-आहे; आणि महानुभावीय वाङ्मयांत ठिकठिकाणीं षड्व्याकरणकारांचे उल्लेख आहेत; परंतु त्यांपैकीं सध्यां चौघांचीच माहिती थोडी-फार उपलब्ध आहे.

ही माहिती **महन्त गोपीराज**, ऋद्धिपुर येथील मठाचे अधिपति, ह्यांनीं आम्हांस जागोजाग फिरून व स्वतः मिळवून दिली. इतकेंच नव्हे, तर ते केवळ ह्याच कामाकरितां पुण्यास आले-होते. इतिहास-संशोधक-मंडळांत त्यांनीं आपले निबंध महानुभावीय वाङ्मयासंबंधानें नवीन प्रकाश पाडणारे असे वाचले. आमच्याकरितां ते दहा-वीस ठिकाणीं पायीं हिंडले. बरोबर पोथ्यांचें ओझें त्यांस आमच्याकरितां दोन-तीनशें मैलांच्या प्रवासांत बाळगावें-लागलें. कष्टां-शिवाय त्यांनीं खर्च केला तो निराळाच. अशा प्रयत्नानें जमविलेली माहिती त्यांच्याच शब्दांनीं येथें देत-आहों. येथें त्यांचे पुनः एकदां आभार मानणें युक्त आहे. महानुभावीय व्याकरणकारांचा निराळा भाग करण्यासाठीं त्यांनीं सांगि-तलें, व पुस्तक छापण्याच्या ऐन वेळीं येथें येऊन त्यांनीं माहिती पुरविली, म्हणून हा स्वतंत्र भाग आम्हांस काढितां-आला.

ह्या माहितीपैकीं कांहीं भाग कै० **विनायकराव भावे** यांच्या "महाराष्ट्र सारस्वतां"तून व कांहीं भाग यवतमाळचे वकील **यशवंत खुशाल देशपांडे** एम्. ए. एल्. एल्. बी. यांच्या "महानुभावीय वाङ्मय" ह्या पुस्तकांतून घेतला-आहे; हेंही येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करितों.

महंत **गोपीराज** महानुभाव यांचें मूळ नांव **हरिराजबोवा** असें होतें. ह्यांनाच **महात्मा मुशाफिर** असेंही म्हणतात. महानुभावीयांत पट्टाधिष्ठित श्रीदेवदेवेश्वर संस्थानाचे महन्त श्री **दत्तराज माहुरकर** हेही महानुभावीय वाङ्मय प्रसिद्ध करण्यांत दुसरे प्रमुख गृहस्थ आहेत. ह्यांनीं लाहोर येथें "दत्तप्रकाश" छापखाना काढून कांहीं ग्रंथ प्रसिद्ध केले-आहेत. आम्हांकरितांही व्याकरणाच्या पोथ्यांच्या नकला त्यांनीं तयार केल्या; मूळ व्याकरणकार यांच्या हातच्या पोथ्यांच्या एकाद्या पानाचे फोटो देण्याचा विचार होता; परंतु त्या पोथ्या मठांतून आहेत, पण मिळूं शकल्या नाहींत; म्हणून नक्कल केलेल्या पोथ्या त्यांजकडून मुद्दाम आतांच मागविल्या नाहींत. . शिवाय महन्त **गोपीराज** हे स्वतः येथें दोन-तीन पोथ्या नक्कल केलेल्या घेऊन आले-होते. त्या पाहून, पुढील कांहीं विवेचन केलें-आहे. श्री दत्तराज ह्यांचेंही ह्याप्रकारें आम्हांस सक्रिय साह्य होतें; त्यांच्या ह्या कळकळीबद्दल व प्रेमाबद्दल त्यांचेही आम्ही अत्यन्त आभारी आहों. श्री दत्तराज व श्री गोपीराज ह्यांनीं पाठविलेल्या पं० भीष्माचार्य कृत 'पंचवार्तिका'च्या नकलांवरून, तें व्याकरणच आम्ही या भागाच्या शेवटीं छापवून सुज्ञांस सादर केलें आहे.

---

## १. श्री भास्कर कवीश्वर व्यास.

ह्या काळीं उपलब्ध नाहीं असा १ भाषाशास्त्रावर, व्याकरणावर निबंध पं० वर्य श्री कवीश्वर व्यासाचा होता, अशा प्रकारचे उल्लेख महानुभावीय वाङ्मयामध्यें अढळतात; आणि " पंचवार्तिक " कारानें (पं० भीष्माचार्यानें) आपल्यापूर्वी झालेल्या निबंधकारांचा उल्लेख याप्रमाणें केला आहे । " **तयापासून ज्ञान होआल्या आणीवासी** (आनेराज व्यास पारमांडल्य) **या ग्रंथकारानें लक्ष्मण. रत्नाकर प्रकरणीं सूत्र प्रकृती भेद निरूपीले असे** " तयाप्रमाणें कविश्वर व्यासाच्या भाषाशास्त्र—मराठी व्याकरण—या निबंधाचा उल्लेख आहे.

यावरून पंचवार्त्तिकापूर्वी महाराष्ट्र भाषावर इतर ग्रंथ व्याकर्ण निबंधकार महानुभावांत झाले होते, हें निर्विवाद आहे.

ग्रंथकार आणि आचार्यत्व या नात्यानें हे सर्वांत श्रेष्ठ असून, **श्री भास्कर कवीश्वराचार्यांचे** ग्रंथ अत्यूच्च आहेत; आणि महानुभावीय महाराष्ट्र वाङ्मयोत्पादक लेखक हे प्रथमचे आहेत.

यांचें प्रथमचें राहण्याचें व जन्माचें गांव **कासारबोरी** जिल्हा परभणी ( निजामचें राज्य ) हें आहे. यांच्या तीर्थरूपांचें नांव अनंताचार्य. अनंताचार्यांचें शिक्षण प्रतस्थान मुंगीपैठण येथें झालें. अनंताचार्यांनीं कासारबोरीस एक **वैयाकरणशाळा** घातली होती असा उल्लेख " कवीश्वराचार्य वंशपरंपरेंत " सांपडतो.

" चांगदे ॐ देशाउरी : ।। अध्यापकु झाला चालिसापुरी ।।
अनंतें घातली कासारबोरी ।। वैयाकरणशाळा " ।। ७ ।।

ह्या अनंताचार्यांस त्या वेळच्या यादव राजानें त्याची विद्वत्ता जाणून आपल्या पदरीं बाळगिलें त्यासंबंधीं उल्लेख असा—

**अनंत** यादवें अव्हानोनी ।। रहाविले तीर्था पैठणी ।।
अध्यापकु वृत्ति स्वीकरौनि ।। राय अन्नें वर्त्तती ।। ८ ।।
क्रमेंची अनंता पासौनि ।। उमांबे जठरीं पुत्र दोनी ।।
पुत्र लाभें दंपत्य मनीं ।। सुखावलें ।। ९ ।।
जेष्ठ नावें दिवाकरू ।। धारा भाणू कवीश्वरू ।।
अचाट प्रज्ञा साचोकारू ।। वाचास्पती ।। १० ।।

श्री भास्कर कवीश्वर व्यास हे नागदेवाचार्यांच्या ५०० शिष्यांपैकीं सर्वांत श्रेष्ठ होते. नागदेवाचार्यांच्या मागून हेच द्वितीय आचार्य पदारूढ झाले. कवीश्वर आम्नाय म्हणजे कवीश्वर कुळीचे हेच आद्य प्रवर्तक होत. ह्यांनाच त्यांच्या पांडित्यावरून "**भावाघोष**" व "**कवीश्वर**" असें म्हणत. लौकिकांत त्यांना पंडित **भानुभट बोरीकर** म्हणत असत.

ह्यांनीं शके ११९५ त " **शिशुपाल वध** " नांवाचा मराठी ओवीबद्ध काव्यग्रंथ लिहिला. तो नुकताच प्रसिद्ध झाला असून, एम्० ए० च्या परीक्षेस लाविलेला आहे. ह्या काव्यावरून भास्कर कवीश्वराची कविता किती उच्च दर्जाची होती, हें दिसून येईल. हा ग्रंथ ज्ञानेश्वर-पूर्वकालीन असून, त्यावेळीं मराठी काव्यरचना किती प्रगल्भ दशेस पोहोंचली होती, याची जाणिव होईल. ज्यास काव्य म्हणतां येईल असा मराठींतील पहिला काव्यग्रंथ "शिशुपाल वध" हाच आतांपर्यंतच्या शोधावरून दिसून येतो.

श्री कवीश्वराचार्यांच्या जीवनवृत्ताच्या पुष्टीकरणार्थ कांहीं ओव्या येथें देत आहों, त्यांवरून त्यांची योग्यता कळून येईल.

कवीश्वर नांमु : भट्टीं ठेवियेलें : परंपरा आले : आज वेन्ही ॥ १३९ ॥
भानुभट्टी टीका : वेदांची वर्त्तत : निबंधी पढत : महाराष्ट्र ॥ १४० ॥
जेआंचे ज्योतीश : काशी खंडा गेलें : तेणें मानवले : विप्रराजू ॥ १४१ ॥
साधनाचा लागीं : देवदेवेश्वरू : क्षेत्र हे पै थोरू : जिंकीयेलें ॥ १४२ ॥
गीतेंचिआं टीका : संस्कृत मराठी : ज्ञान कसवटी : भानुभट्टी : ॥ १४३ ॥
दशपरि येकु : श्लोकु वाखाणिला : तेणें तो तोखैला : द्विजराॐ : ॥१४४॥
गंगेचिआं तीरीं : पुराण सांगितां : नारी पनिवथा : पांतु ठेल्या ॥ १४७ ॥
वेधेंचि डोइए : घागरी वाऔनी : आलिआं थांऔनि : ऐकावआं ॥१४८॥
कोकिळांचेनि रवां : आणिएलें ऊणें : ऐसें खरें तेणें : वेधियेलें : ॥१४९॥
डोंइए वाऔनि : कळसु घागरीं : उभीआं सुंदरीं : वेधभ्रमें : ॥ १५० ॥
एका शिरिमारे : उभोंचि ठाक्ती : ऐसें नेणो किती : दोहीं भागीं ॥१५१॥
ऐसे ग्रामजनु : अघवें वेधिले : पहावेंआं आले : कवीराजा ॥ १५२ ॥
वाखाणितां गीता : भागवतु भलें : आचार्य तोखलें : आइकीतां ॥१५४॥

याप्रमाणें ठिकठिकाणीं कवीश्वराचार्यांच्या विद्वत्तेविषयीं, वक्तृत्वाविषयीं, व त्यांच्या मोहक वाणीविषयी उल्लेख आहेत. वरील भट्ट म्हणजे कवीश्वराचार्यांचे गुरु नागदेवभट्ट किंवा नागदेवाचार्य हे होत.

कवीश्वराचार्य हे शके ११९२।९३ च्या सुमारास काशीस गेले. तेथें काशीवासी पंडितवर्यासी त्यांची भयंकर द्वैतवादावर व ज्योतिषशास्त्रावर चर्चा झाली. "सर्व पंडितांस निरुत्तर केलें. जयतपत्रें घेतिन्हलीं आन मुरडले". तेथून परत येत असतां, यवन सरकारी अधिकाऱ्यांनीं यांस उज्जनी येथें कारागृहवासांत ठेविलें. पुढें हे यादवराजांचे हेर वगैरे नाहींत अशी खात्री होऊन त्यांस सोडलें. तेथेंच त्यांनीं सर्वसंगाचा त्याग करूण श्रीचक्रधर सर्वज्ञाचें चरणीं तनमन अर्पूण शिष्यत्व स्वीकारिलें. थोडे दीवस सनिध्यांत राहून महाराष्ट्र विदर्भदेशी श्रीनागदेवाचार्यांपाशीं आले. हे फार विद्वान, रूपवान् व शीघ्रकवी होते.

"शिशुपाल वध" यांनीं लिहिल्याचा वर उल्लेख केला आहे. तो ग्रंथ रचल्यावर कवीश्वराचार्यांनीं तो वयोवृद्ध, तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध त्रदंडियुत **श्रीभावेदेव व्यास** यांस वाचून दाखविला. तवं भावेदेव व्यासें भणतलें "भट्टो हा ग्रंथ नीका जाला असे : परि निवृत्तांजोगा नव्हेचि : हा शृंगारियां प्रवृत्तांजोगा जाला असे:" त्यावर मग भागवत ओवीबद्ध ग्रंथ १२ स्कंद लिहिले. आन भावेदेव व्यासापुढें भणतलें, "आता होए कवीश्वरो हा निवृत्तां योग्य जाला"

श्रीमद्भागवत टीकेपैकीं एकादश स्कंध हा भाग फार गोड उतरला आहे. या प्रकर्णास "**उद्धवगीता**" असें नांव आहे. ह्या ग्रंथानंतर यांनीं शृंगारपर ग्रंथ-रचना केली नाहीं. पूजावसर ओवीबद्ध, चौपद्या, ईशस्तुति, विरहाष्टक, श्रीआ-ष्टक, असे पद्यग्रंथ व चक्रपाणि चरित्र, श्रीदत्तात्रेयचरित्र, चालिसाख्यस्तोत्र, आणि गीताटीका व "**महाराष्ट्रभाषा**" हा व्याकरणविषयक ग्रंथ, हे गद्यग्रंथ भागवत ग्रंथापूर्वीच लिहिलेले आहेत.

"ईशस्तुति" श्लोकबद्ध आहे. हे निर्यमक श्लोक आहेत. महाराष्ट्रांतील अनेक वृत्तात्मक पद्य श्लोक रचनेचा आद्य मान यांचेकडे येतो. त्यांच्या निर्यमक कवि-तेचा मासला "महानुभावीय वाङ्मयकारांनीं" दिला आहे तो असाः—

तें कें देखोन डोळां परतर सुफळा सृष्टि हें जीवितेसी ।
वैश्या जंघा सुरेषा उपर घणतरीं जन्मभूमी अनंगा ॥
सेलामध्यें प्रदेशीं मिरवितु सजनीं भालगंटीं पवैशा ।
वेठींला योगिराजें करवितु सहजे पारणें लोचनांसी ॥

ह्या पुस्तकांतलि विषयास अनुसरून माहिती देणें योग्य असल्याने इतर गोष्टी व पाल्हाळिक उतारे देत नाहीं.

यांचा "श्रीकृष्णचरित्र"हा दुसरा एक गद्य ग्रंथही रसाळ असा उतरलेला आहे.

कवीश्वराचार्यांच्या व्याकरणविषयक निबंधाचें नांव "**सुभाष्य**" किंवा "**भाष्य**" असें होतें; असा गोपीराज महानुभाव यांनीं आपल्या पत्रांत उल्लेख केला आहे.

श्री नागदेवाचार्य यांच्या जीवनचरित्रांत श्री कवीश्वर व्यासांची संपूर्ण माहिती दिली आहे; ती गद्यांत आहे. पण विस्तारभयास्तव येथे देतां येत नाहीं.

महानुभावांच्या धर्मग्रंथांचा सुलतान तुघलखाच्या स्वारींत नाश झाला, असें "वृद्धान्वयांत" वर्णन आहे; आणि कवीश्वर वंशवर्णनांत—

**विशेषासहितः देह त्यजियेलेः हीरोनियां नेलेः पुस्तकांते १७४**

अशी ओवी आहे. यावेळीं आणि मलक काफूरच्या धाडीमध्यें जूनाट पुरातन पुस्तक पोथ्यांचा नाश झाला, असा महानुभावीय वाङ्मयामध्यें उल्लेख आहे. तर **भाषा-निबंध-व्याकरण** यामुळें कविश्वर व्यासाचा **अनुपलब्ध** आहे.

याप्रमाणें महन्त गोपीराज यांनीं अत्यन्त परिश्रमानें दिलेली माहिती येथें बहुतेक त्यांच्याच शब्दांत उद्धृत केली आहे. छापला गेला तरच तो ग्रंथ इतर

जुन्या विद्वानांच्या कृति कवडीमोल असें समजण्याचें निदान जुन्या वाङ्मया-संबंधानें तरी धाष्टर्य करितां–येणार–नाहीं; म्हणून जरी ह्यांचा ग्रंथ उपलब्ध नाहीं, तरी **कवीश्वराचार्य भाषाघोष महानुभाव भानुभट्ट बोरीकर हे मराठी भाषेचे आद्य व्याकरणकार** होऊन गेले, हें आतां मिळालेल्या माहितीवरून निश्चित होते.

"महाराष्ट्रसारस्वतां" त कवीश्वराचार्यांसंबंधीं आणखी उल्लेख खालील-प्रमाणें आहे:–कवीश्वराचार्य हे फार बुद्धिमान् व रूपवान् होते. यांच्याविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, "लिंबू वर उडवावें व तें खालीं येऊन झेलण्या-पूर्वींच यांनीं नवा श्लोक रचून द्यावा; अशी यांच्या बुद्धीची तीव्रता होती."

---

## २. आनेराज व्यास.

आनेराज व्यासांचे आजें अनंतभट्ट हे कन्हरदेवराय जाधव यांचे कोशा-धिकारी होते. कूचीं म्हणजे किल्ला त्याचे अधिष्ठाते म्हणून अनंतभट्टास अनंत-कूचीं असें म्हणत असत. हे मूळचे पैठणजवळील **वरखेड वाडे** या गांवचे राहणारे होते. यांचे पुत्र चक्रपाणि व ह्या चक्रपाणीचे दोघे पुत्र एक गोपाळ-पंडित व दुसरा केशवपंडित. **गोपाळ पंडित** ह्यालाच **अनंत पंडित** अथवा **आनेराज व्यास** असें म्हणत असत. हे दोघेही नागदेवाचार्यांचे शिष्य होते. व दोघांनींही ग्रंथरचना केली–आहे. गोपाळपंडितांनीं लीलाचारित्रांतून सूत्रें ग्रथित करून "सूत्रपाठ" तयार केला. "लक्षण रत्नाकर" संस्कृत व "सुभा-षितांत:क्षरी मराठी असे बरेच ग्रंथ यानें केले आहेत. हे गोपाळ पंडित पार-मांडल्य आम्नायाचे म्हणजे कुळीचे प्रवर्तक असून, त्यांचा "द्वात्रिंशल्लक्षण" म्हणून जो ग्रंथ आहे, त्यावर पंडित शारंगधर पुसदेकर यांची टीका आहे. ( महानुभावीय वाङ्मय यावरून ). यांचा जन्म शके ११९० व मृत्यु शके १२६२ त झाला, अशी माहिती मिळते.

हे गोपाळ पंडित अथवा आनेराज व्यास सात महिन्यांचे जन्मले होते. ते जन्मले तेव्हां त्यांचे डोळे उघडतना, म्हणून त्यांच्या आईनें त्यांस श्री-चक्रधराच्या स्वाधीन केलें. मग त्यांचे डोळे उघडून त्यांस नीट दिसूं लागलें. यावरून त्यांना पारमांडल्य असें नांव चक्रधरानें दिलें.गोपाळ पंडित हे मोठेपणीं

वरखेड सोडून, देवनगरीस जाऊन राहिले. तेथें असतांना हे रामदेवराव जाधवाची धाकटी राणी कामाइसा हिचे पुराणिक व खाजगी खजिनदार होते. "तिये सव्वाये लक्षाचा व्यापारू गोपाळ पंडित होता." कामाई देवीनें याचे मार्फत पुढें नागदेवाचार्यांचा मंत्रोपदेश घेतला. हे गोपाळ-पंडित नांवाजलेले विद्वान् असल्यानें, राणीनें साहजिकपणें त्यांना आश्रय देऊन पुराण सांगण्यास ठेविलें. यानें एकंदर सहा ग्रंथ मराठींत लिहिले आहेत. यांपैकीं चौपद्या व सुभाषितांतःक्षरी हे दोन पद्यात्मक असून, बाकी चार गद्य आहेत. सुभाषितांतःक्षरींची नियमक श्लोकबद्ध रचना आहे. शिवाय या श्लोकांतून थोडी चमत्कृतीही आहे. श्लोकाच्या एका चरणाचें जें अंत्य अक्षर तेंच त्याच्या पुढच्या चरणाचें आद्य अक्षर आहे व पहिल्या श्लोकाच्या चौथ्या चरणाचें जें अक्षर तेंच त्याच्या पुढील श्लोकाच्या प्रारंभींचें अक्षर आहे. याप्रमाणें प्रत्येक चरणाचे व श्लोकाचे दुव्वे एकमेकांत गुंफून ही साखळी बनविली आहे. यांचे सूत्रपाठ महानुभावीयांच्या नित्यपाठांतील झाले आहेत. ( महाराष्ट्र–सारस्वतावरून ).

यांचा व्याकरणासंबंधीं भाग पाहण्यास मिळाला नाहीं. शास्त्रविषयावर "लक्षण-रत्नाकर" या नांवाचा यांचा एक निबन्ध आहे, त्यांतच भाषा व व्याकरणसंबंधीं कांहीं भाग यांनीं लिहिला आहे. याविषयीं खालीलप्रमाणें उल्लेख आढळतो:—

माहिंभट्टी व्याकर्णावरी ॥ संस्कृत, भाषा मंजरी ॥  
रचितें जहालें केशव" सूरी[२] ॥ परमार्ग हेतु "  
मूळ व्याकरणाचेनि अधारें ॥ "सुभाषानिबंधु" बोलिला कविश्वरें ॥  
जो छपन्न भाषेसी होऊन उरें ॥ महाराष्ट्रीये ॥  
भाषा प्रबोध, भाषाप्रदीपिका ॥ गौड महाराष्ट्री पीठिका ॥  
अष्टौ व्याकरणाचा अवाका ॥ उमचविला "  
श्री भास्करें गोपाळा अज्ञापिलें ॥ ते **लक्षण रत्नाकर** बोलिलें ॥  
मग पंचवार्तिक निरोपितें जहालें " भीष्मभुनि ॥  
" लिंगत्रय विवंचना " ॥ दृष्टांतोपपत्ति न्याय प्रमाणा ॥  
उपपत्ति अनुपपत्ति शङ्कार्ण ॥ दामोदरु प्रणितु ॥  
ऐसे भाषा निबंध ॥ महात्म मार्गिंचें प्रसिद्ध ॥  
लिङ्गत्रय, पदार्थ भेद, ॥ कवीश्वर कृत ॥

———

१ 'भाषामंजरी' केशवराज सूरी कृत मराठी होती. २ पंडित.

## ३. पंडित भीष्माचार्य.

हे महानुभाव पंथांतील ज्यांचा ग्रंथ आज उपलब्ध आहे, असे एक व्याकरण-प्रबन्धकार आहेत. या नांवाचे त्या पंथांत एकंदर तीन किंवा चार ग्रंथकार होऊन-गेले; परंतु त्यांपैकीं हे पंडित भीष्माचार्य तेराव्या शतकांतील होत. त्यांचे विद्यागुरु प्रसिद्ध पंडित बोपदेव हे होते; व धर्मदीक्षा गुरु हेतुस्थळ कर्ते न्याय व्यास हे होते. त्यांचा भीष्माचार्यांनीं मंत्रोपदेश घेतला-होता. बोपदेव हे देवगिरीचे रामदेवराव यादव यांचे दरबारांतील प्रसिद्ध विद्वान् पंडित, कवि व ग्रंथकार होते. भीष्माचार्यांनीं " लक्षण रत्नाकर भाष्य " म्हणून एक मराठी ग्रंथ लिहिला-आहे. यांनीं पुष्कळच लहान-मोठे संस्कृत व मराठी ग्रंथ लिहिलेले महानुभाव वाङ्मयांत उपलब्ध आहेत. त्यांत "दिनकरप्रबंध" ( अध्याय २४, संस्कृत ); ब्रह्मोपनिषदावरील " धाराबिंब " संज्ञिक भाष्य; श्रीक्षेत्र ऋद्धपूर माहात्म्य, ( अध्याय १० ); लक्षण सारोद्धार; सिद्धान्तसार; वगैरे ग्रंथ प्रमुख आहेत. धाराबिंब यामध्यें महोपाध्यायाम्नाय दीक्षित विराटमुनि श्री बोपदेव महात्मे महदाचार्य शिष्य भीष्माचार्य मुनि असा त्यांनीं स्वतःचा उल्लेख केला-आहे. 'दिनकर प्रबंध' कवीश्वराम्नाय जयकृष्णसूरी यांचे वचनावरून त्यांनीं लिहिला-आहे.तसेंच 'दत्तात्रय प्रबंध'हा जंबूकोपाभिध कमळाकर विख्यात योगी यांचे वचनावरून लिहिला-आहे. त्यांच्या पंचकृष्ण प्रातःस्मरणांतील एक पद्याचा मासला:—

> प्रातः स्मरामि रमणी जन मोहनं तं ।
> नंदात्मजं मदन मोहनकं महांतं ॥
> ब्रह्मेंद्र रुद्रहरिवंदित पादपद्मम् ।
> नारायणं यदुपतिं पुरुपाद पद्मम् ॥

याचप्रमाणें त्यांचें मार्गमंजरी स्तोत्र मराठी श्लोकबद्ध आहे. तें महंत दत्तराज ह्यांनीं लाहोर येथें छापिलें-आहे. ह्या स्तोत्राच्या आरंभींचा नमुना यांचे पद्याची कल्पना यावी, म्हणून आणखी एक देतों.—

> जे जे उद्धरिले मुनी कळयुगीं ते वर्य विप्राजनीं ।
> ते ते ब्राह्मण जातिचे परपथी ज्ञातेजना सारथी ॥
> ते सर्वे मुनि मार्गमूळ नमिता जीवा घडे योग्यता ।
> तस्मात्ते प्रणमू सदाधिकरिलें चक्रेश्वरें निर्मिलें ॥

चक्रधरस्तोत्रांतील एक श्लोक--

तथा प्रतिष्ठानि पुरीं मृता हो ।
तीं जीववीली वनिता वरा हो ॥
जी माय तीं या हरिनायकाची ।
प्रासिद्धि तेणें सकळा प्रभूची ॥

यांनीं गीतगोविंदावरही ' महाराष्ट्र सुबोधिनी ' नांवाची टीका केली असून, व्याकरणशास्त्रावर **'नामविभक्ति'** व भाषा-शास्त्रावर **'पंचवार्तिक'** असे दोन ग्रंथ केले-आहेत. पंचवार्तिकांत ( १ ) सूत्रलक्षण, ( २ ) सूत्रप्रकृति, ( ३ ) सूत्रकारक, ( ४ ) सूत्राख्यान व ( ५ ) सूत्रस्वरूप, अशीं प्रकरणें आहेत. सूत्र म्हणजे ' अध्याहारें ' कां पूर्वपदानुवृत्ति समवेत अल्पाक्षरें असंदिग्ध पदें असेतिः तेंहीं पदीं करून जेणें प्रयोगें अर्थज्ञान सूत्रिजे म्हणजे मुद्रिजे, तथा प्रयोगातें सूत्र म्हणिजे. ' सूत्राचे, १ वचन, २ वाक्य, ३ प्रकरण व ४ महावाक्य असे चार भेद केले-आहेत. त्यांचा अर्थ "( १ ) वचना-पासोनि अर्थ निफन्नला तो वचनार्थ. ( २ ) वचनापासोनि वाक्य निफन्नलें. ( ३ ) वाक्यापासौनि प्रकरण निफन्नलें. ( ४ ) प्रकरणापासोनि महावाक्य निफन्नलें. " वगैरे. हीं दोन्हीं पुस्तकें मराठी व्याकरण व भाषाशास्त्र यांवर आहेत.

पं० भीष्माचार्यासंबंधीं वरील सर्व माहिती यवतमाळचे वकील यशवंत खुशाल देशपांडे एम्० ए० एल्० एल्० बी०; यांच्या " महानुभावीय मराठी वाङ्मय " या पुस्तकावरून त्यांच्या परवानगीनें घेतली-आहे; ज्ञानेश्वर पूर्वकालापासून महानुभावीयांचें मराठी वाङ्मय ओतप्रोत भरलेलें-आहे; आणि पं० भीष्माचार्य यांचे ' नामविभक्ति ' व ' पंचवार्तिक ' हे व्याकरणसंबंधीं ग्रंथ अर्थात् रामदेवरावाच्या वेळचे म्हणजे १३ व्या शतकांतील असल्यामुळें, फादर स्टीफन्स् याच्या सन १५४९ मधील मराठीच्या व्याकरणापेक्षां कितीतरी अगोदरचे आहेत, हें स्पष्टच आहे.

' महाराष्ट्र सारस्वतां'त पं० भीष्माचार्यासंबंधानें खालीलप्रमाणें माहिती आहे:—ह्यानें ३०।३२ ग्रंथ लिहिले आहेत. याची ग्रंथरचना विविध आहे. आपल्या मार्गांतील सूत्रें वगैरेंवर याचे ग्रंथ आहेत. ब्रह्मविद्या, मायावाद, यासंबंधानेंही यानें लिहिलें आहे. नाममाला, स्मरणमाला, प्रसादमाला, मूर्तिज्ञान, वगैरे भक्तिपर रचनाहि यानें केली आहे. ' सुभाषितें' ही रचिलीं आहेत. पण यांशिवाय यानें आपल्या पूर्वींच्या ग्रंथांवर टीकाहि लिहिल्या आहेत. याची

' धनंजय' कोशावर एक टीका आहे. ' अंताक्षरी' वर याची टीका आहे. जयदेव कविकृत ' गीतगोविंदा'वर " महाराष्ट्र सुबोधिनी " नांवाची गद्य टीका यानें लिहिली आहे. यांत अन्वय, पदें पाडून शब्दार्थ व एकंदर अर्थ सांगितला आहे. याखेरीज वर उल्लेखिल्याप्रमाणें विद्यार्थ्यांना व मराठी भाषेच्या भक्तांना उपयोगी पडेल, असेही ग्रंथ लिहिण्याची सुरुवात यानें केली आहे. वर उल्लेखिलेले दोन व्याकरण-ग्रंथच याची साक्ष देतात. असो. ' पंचवार्तिकां'तील थोडा थोडा अधला मधला भागही नमुन्यादाखल ' महाराष्ट्रसारस्वतकारांनीं' दिला आहे; ( पृ० २११ ). परन्तु तो ग्रन्थच या पुस्तकांत पुढें समाविष्ट केला असल्यानें, त्यांतील उतारे येथें देऊन आणखी जागा आडवीत नाहीं.

याप्रमाणें पं० भीष्माचार्य व त्यांच्या अगोदरचे उपलब्ध झालेले कांहीं व्याकरण-प्रबन्धकार यांविषयीं मिळाली ती माहिती सादर केली-आहे.

## ४. विश्वनाथ वर्धनस्थ बीडकर.

ह्यांचें सुमारें दोनशें पानांएवढें चरित्र महानुभवीयांनीं लिहिलेलें आहे; परंतु तें आम्हांस मिळूं शकलें-नाहीं; ह्यामुळें " महानुभवीय वाङ्मय " यांतील त्रोटक माहितीवरच निर्वाह करणें भाग पडत-आहे. **विश्वनाथ व्यास** बीडकर यांचे उपाध्याय आम्नायांतील दीक्षागुरु रेवेराज हे होते; व वाल्हन पंडित हे त्यांचे विद्यागुरु होते. विश्वनाथ व्यासानें ध्यानामृतस्तोत्र आचार, दृष्टांतस्थळ वगैरेवर महाभाष्य केलें असून, शिवाय हयग्रीव व्यासकृत गद्यराजस्तोत्र, दामोदर पंडितकृत साठी चौपद्या, इत्यादिकांवर टीका लिहिल्या आहेत. ध्यानामृतस्तोत्र हें शके १५६३ मध्यें हिरवळीये या नगरांत त्यांनीं पूर्ण केलें. हें स्तोत्र मराठी श्लोकबद्ध असून, त्यांत अनेक तऱ्हेचीं वृत्तें योजिलीं-आहेत. या स्तोत्रावरही पुढें अनेक टीका झाल्या-आहेत. या स्तोत्रांतील श्लोकांचा नमुना—

त्या श्रीपाद सरोजवेध बहळे त्रैलोक्य आनंदले ।
योगीभृंग आमोद चुंबित भले दास्यत्व झंकारिले ॥
त्यानें स्पर्शित वंदिता विबुधजे किर्ती स्तवे सदा मंगळे ॥८१॥
द्विपद तळतळा त्या नंद जिल्हाळ सांगा ।
परम सरळ कुंदा ब्रह्मरूपाचि पांगा ॥

गिरवत दसभागा कोवळीया सुरागा ।
विलसत सुकुमारा पूतळी मातिचांगा ।। ८३ ।।
गमत मज जनी त्या मूर्ति कैवल्य गंगा ।
जन आघवेचये नासा तीर्थ की सेचलिंगा ।।
नखचय मिसरूपें चंद्र की तेथ राहे ।
क्षणरहित असावे शुद्धती मागताहे ।। ८४ ।।

यांत गण, मात्रा, इ० कडे दुर्लक्ष दिसतें.

विश्वनाथ पंडित वर्धनस्थ यांनीं जो व्याकरणावर निबंध लिहिला–आहे, त्यांत ते म्हणतात—"जयास समासाचें, विभक्तीचें, कारकाचें ज्ञान नाहीं, तो स्वोक्तिचा म्हणावा. अर्थात् व्याकरणाचे नियम माहित नाहीं त्यानी शास्त्रांस वाखानु नये. म्हणून व्याकरणाचें ज्ञान व्हावें लागे."

"नामविभक्ति" या ग्रंथांत व्याकरणासंबंधीं विवेचन केलें आहे; आणि "पंचवार्तिक" या नांवाचा एक दूसरा निबंध आहे; त्याच्यांत व आपण पं० भीष्माचार्यकृत पाठविलेल्या पंचवार्तिकांत फेरफार आहे. परंतु ती पोथी जवळ हल्लीं येथें नसल्यानें त्याची पूर्ण ओळख करतां येत नाहीं; आणि काव्यकर्त्याच्या नांवाचा उल्लेख करतां येत नाहीं. तरीपण ह्या दोन्ही निबंधांचे कर्ते पं० विश्वनाथ बीडकर असावेत, अशी माहिती मिळते. असें म० गोपीराज यांनीं कळविलें आहे; यावरून 'नामविभक्ति' व 'पंचवार्तिक' या नांवाचे व्याकरण–ग्रंथ दोघां लेखकांचे पृथक् असावेत कीं काय, हें शोधकारांनीं शोधावें असें ते म्हणतात.

---

## श्री गोपीराज महानुभाव.

[हि मराठीचे व्याकरणकार नाहींत;परन्तु यांनीं महानुभावीय व्याकरणकारांची माहिती देण्यांत फार परिश्रमपूर्वक साहाय्य केल्यामुळें, त्यांजकडे मागविलेली व त्यांजकडून आलेली सर्व माहिती गौरवार्थ येथें देणें अवश्य वाटल्यावरून दिली आहे. हीच गोष्ट श्री दत्तराज महानुभाव यांजबद्दलही आहे. या उभयतांचे आम्ही फार फार ऋणी आहों, एवढें लिहिलें म्हणजे पुरे.]

पट्टाधिष्ठित परिव्राजकाचार्य महात्मा श्रीगोपीराज बाबा महानुभाव महंत यांचें प्रथम नांव श्रीहरिराजबुवा आहे. पुढें प्रवास प्रिय असल्यामुळें महात्मा मुशाफिर असें नांव पडलें; ( शके १८४८ इ० स० १९२६ ).

श्रीक्षेत्र रितपुर ऋद्धिपूर ( काशी ) श्रीगोपीराज मंदिर संस्थान गादीवर यांची स्थापना झाल्यामुळें आतां गोपीराज बाबा, या नांवानें सर्व लोक ओळखतात. यांचा जन्म जि० जेहेलम, पो० मुक्काम कर्सोल (पंजाब) येथें झाला. श्रीमान् पंडित ईशाधिष्ठित श्रीदिवाकर बाबा महानुभाव कर्सोलकर यांजला दत्तक



श्री गोपीराज महानुभाव.

देण्यांत आलें. इ० स० १८९२ वर्षी महानुभाव संप्रदायी दीक्षा देण्यांत आली. इ० स० १८९४ सालीं पट्टाधिष्ठ महदाचार्य श्रीविद्वांस, महानुभाव यांची स्वारी ( फेरी ) पंजाबांतून परत दक्षणेंस आली त्यांच्याबरोबर दक्षिण येथें आले. पट्टाधिष्ठित वैराग्यनिष्ठ श्रीभास्कर महानुभाव पुणेंकर यांच्या संनिध्यांत संप्रदाय परंपरेप्रमाणें अभ्यास शिक्षण झालें.ई०स० १९०१ते १९१० पंजाब,यु० पी० युनाइटेड प्रवांसिस, फ्रांटीयर पेशावर, बिलोचस्थान, बन्नु, डी० आई० खान, डी० जी० खान इत्यादि प्रदेशांत फिरतीवर होते तेव्हांपासून म्हणजे इ० स० १९०१ पासून महानुभाव संप्रदायीक पोथ्या व ग्रंथ संग्रह शोधण्याचें काम हातीं घेतलें. इ०स० १९२४ ठाणें येथें वाङ्मय शोधण्यास पोथ्या जमवून कै० भावे यांच्या येथें महाराष्ट्रभाषाकोविद श्रीकवीश्वराचार्य महंत दत्तराज माहुरकर ठाण्यास होते. तेव्हांपासून महानुभाविय वाङ्मयाचा प्रचार सुरू आहे ।

श्रीमान् यशवंत खुशाल देशपांडे एम. ए. वकील यांनीं आपल्या " महानुभावीय वाङ्मय " ग्रंथांत जागोजागीं यांचा आदरणीय उल्लेख केला आहे । आणि कै० विनायक लक्ष्मण भावे यांनींही यांच्याविषयीं महाराष्ट्र सारस्वतांत आदरणीय भाव दाखविला आहे ।

या महंतानें पेशावर, अमृतसर यु० पी०नेपाल, अंतरवेद, माळवा, खानदेश, वऱ्हाड, दक्षिण, पुणें, सातारा, वाई प्रांतांत भ्रमण करून महानुभावीय जुनाट पोथ्या व ग्रंथांचा मोठ्या कष्टानें व प्रयासानें अभ्यास व संग्रह केला आहे। सन ई० १९२७ मध्यें श्रीक्षेत्र ऋद्धिपूर (काशी) येथें आपल्या श्रीगोपीराज मंदिरांत— " श्रीगोपीराज महात्म ग्रंथसंग्रहालय आणि वाचनालय " अशी संस्था उघ-

डली आहे। त्यांत चारपांचशें जुने ग्रंथ व कागदपत्र व फारशी सनदांचाही संग्रह करण्यांत आला आहे। आपल्या मठांत अन्नसत्रही घातलें आहे. त्याचप्रमाणें यात्रेकरू मंडळींना सर्व प्रकारें आराम मिळावा अशी उत्तम सोय करण्यांत आली असून यात्रेकरू लोकांना औषधोपचार तात्पुरते करण्यांत येतात. मठांत उतरलेल्या यात्रीकांस तकलीफ व गैरसोय होऊं नये अशी काळजी घेऊन व्यवस्था ठेवतात.

हे महानुभाव समाजांतील ग्रहस्थी व संन्याशी पंजाबी व दक्षिणात्य मंडळींचे आदरास व प्रेमास पात्र झाले आहेत. पंजाब व महाराष्ट्रांतील थोर थोर लोकांशीं यांचा परिचय आहे. विदर्भ-साहित्य-संघ परिषद् ( यवतमाळ् अधिवेशन तिसरें, २४ जानेवारी ई०स०१९२४ ) येथें महानुभावीय वाङ्मय संस्कृतीवर मराठींत यांचें भाषण झालें त्यामुळें केसरी,--पुणें, प्रजापक्ष--अकोला, महाराष्ट्र--नागपूर, लोकमत--यवतमाळ, उदय--उमरावती, आदि पत्रांत यांविषयीं प्रशंसनीय आदरपूर्वक लेख आले होते पुणें येथें भा० इ० सं० मं०त ( शके १८४९ पंधरावें वार्षिक संमेलन ) ता० ३०।७।२७ रोजी महानुभावीय जुनाट वाङ्मय व महाराष्ट्र काव्यादि विषयावर महत्त्वाचें भाषण झाल्यामुळें, भा० इ० सं० मं० चे चिटणीस पोतदार आदिकरून मंडळींनीं सहानुभूति व आदर दाखविला. हे उद्योगी, धाडशी, साहसी व धैर्यवान् असून, समयानुकूल भाषण करणारे, शान्त व सात्त्विक वृत्तिधारी आहेत. हे क्षणभर रिकामे नसून सर्व काळ यांचें वाचन व संशोधन लेखन सुरू असतें. कितीक वेळीं महानुभाव मंडळींत प्रतिज्ञापर्यंत नौबत पोचली कीं, यांजला जो रिकामा दाखवील त्यासंगे शर्त बांधूं ! हिंदी भाषेचेही हे उत्तम व्याख्याते आहेत महानुभाव धर्मोन्नति परिषद्, अधिवेशन नव्वें पं० श्रीपाद राऊत अध्यक्ष व आणिक महंत मंडळींनें " महानुभावीय वाङ्मय संशोधक" अशी पदवी यांजला दिली. महानुभावीय वाङ्मयाचा प्रसार व महाराष्ट्रास याजपासून फायदा व्हावा अशी यांची रात्रंदिवस खटपट सुरू आहे. या उद्योगामुळें, " शिशुपाल वध " प्रस्तावनेंत, " महानुभावीय वाङ्मय ग्रंथांत, " "गोसावी संप्रदाय " ग्रंथांत, "ज्ञानकोशांत", "महाराष्ट्र सारस्वत", "गीताधर्म मंडळ रिपोर्ट" आदि ग्रंथांत, यांचा प्रशंसापूर्वक उल्लेख आला आहे. अस्पर्शोद्धाराकडे यांचें पूर्ण लक्ष आहे, हे श्रीगुरूचे व श्रीमद्भगवद्गीतेचे अनन्य भक्त आहेत.

मलाही यांनीं महानुभाव व्याकरणकार व व्याकरण निबंधकारांबद्दल विश्वसनीय प्रमाणयुक्त महानुभावीय " वृद्धाचारांतून " व " श्रीनागदेवाचार्य चरित्रांतून " माहिती गोळा करून माझ्या कार्यास सुरवात केली व भर घातली. पोथ्या दाखविण्याचे व समजावून सांगण्याचे कष्ट केले, त्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहें. महाराष्ट्र भाषेतलीं अवघड स्थळें आणि जुने शब्द ज्ञानेश्वरी पूर्वकालीन या पंजाब देशस्थ महंतानें आपल्या महाराष्ट्रीयांस समजावून सांगावे व शब्दांची विषद्-वृत्ति करून दाखवावी, हें खरोखर यांचें प्रशंसनीय कर्तव्य आहे.

---

## श्रीदत्तराज महानुभाव.

महंत श्रीदत्तराज यांनीं पंजाब प्रान्तान्तर्गत वटाला ( जि० गुरदासपूर ) येथें सारस्वत ब्राह्मणांच्या कुळांत ता० २६-८-१८६७ ई० रोजीं जन्म घेतलें. यांना वयाच्या पांचव्या वर्षी मातापित्यांकडून श्रीलक्षराज महानुभाव



यांस ईश्वरार्पण करण्यांत आलें. यांनीं आपलें धार्मिक अध्ययन प० म० श्री विद्वांस महानुभाव यांजजवळ संपवून, अलीकडे आपल्या पंथांत लुप्त असलेलें संस्कृतविद्याध्ययनाचें पुनरुज्जीवन करण्याच्या हेतूनें स्वतः पेशावर ( पंजाब ) येथें पं० श्रीकृष्णशास्त्रींपासून प्राचीन पद्धतिप्रमाणें संस्कृतचेंही शिक्षण मिळविलें यांच्या शिकवणीनेंच कित्येक महानुभाव व्यक्तींची संस्कृताध्ययनाकडे प्रवृत्ति झाली. आज यांच्याच मनोरथाचें फळ हल्लीं चालू असलेलें 'श्रीकृष्ण संस्कृतविद्यालय' हरिपूर-हजारा ( n. w p. ) हें होय; आणि आज बरीच

मंडळी या महानुभाव पंथांत पंजाब युनिव्हर्सिटीचे शास्त्री दिसून येतात. थोडक्याच वर्षांत यांची प्रवृत्ति ग्रन्थसमालोचनाच्या व्यवसायांत व्यग्र झाली व आजपर्यंत हे त्याच व्यवसायांत अगदीं तत्पर आहेत. आणि सतत३०वर्षां-पासून वेद, उपनिषदें, पुराण, इतिहास इत्यादिकांची छानबीन करित आहेत, हे आपल्या विद्वत्तेमुळें महानुभाव समाजाचे पुढारी गणले गेले आहेत. जेवढे म्हणून महानुभावीय वाङ्मय ग्रंथ छा०आपल्या दृष्टीस पडत आहेत,ते यांच्याच पूर्ण कृपेचें फळ होय.नाहीं तर सुमारें८००वर्षांपासून अज्ञात असलेल्या महानुभावीय वाङ्म-याचा आपणांस गन्धदेखिल नसता. पंजाबांतील काय पण महाराष्ट्रांतीलही थोर थोर व्यक्ति यांच्या विद्वत्तेच्या आणि प्रत्युत्पन्नमतिच्या परिचयापासून केव्हांही वञ्चित नाहींत. हे पंजाबदेशीय असूनहि महाराष्ट्र भाषेवर यांचा अत्यन्त हार्दिक प्रेम आहे. पेशावर येथें स्वस्थापित श्रीगोपाल मन्दिरांत, माहूर येथें महंत मजकुराचे संस्थान देवदेवेश्वर आश्रमांत आणि चांदूर येथें आपल्या श्री-दत्तमान्दिरांत, एक एक पुस्तकालय यांनीं स्थापित केलेलें आहे. सांप्रत यद्यपि हे दमाच्या आजारामुळें अस्वस्थ राहतात, तरी पण शक्य तेवढा लेखन व्यवसाय सुरु आहेच. किंबहुना, यांनीं महानुभावीय वाङ्मयाची सेवा उदार अंतः-करणानें अवंचकरूपानें बजावली, त्याचेंच फळ आहे कीं,महानुभावी ग्रन्थ उच्च-तम कोटींत गणले जाऊन मुंबई युनिव्हर्सिटीच्या B. A. M. A. च्या परीक्षांस ठेवले गेले आहेत.

# प्रास्ताविक दोन शब्द.

" न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते. "

ह्या भगवंतोक्तिवर विचार केला असतां निर्विवाद सिद्ध होतें कीं, ज्ञान हें मनुष्याचें परमध्येय आहे. तें (ज्ञान) शास्त्रद्वारा आणि शास्त्रावगम वाणीद्वारा होऊं शकतें; करितां वाणीसंस्कार होणें क्रमप्राप्त आहे असें ह्मणणें वावगें होणार नाहीं. ह्मणूनच शाकटायन, गार्ग्य, शाकल्य, पाणिनि, कात्यायन, पतञ्जलि, यास्क आदि महर्षींनीं आद्य संस्कृत भाषेचें व्याकरण निर्माण केलें होतें. त्यांचेंच अनुसरण करून महाराष्ट्रभाषाभिमानी श्रीभीष्माचार्य महानुभाव यांनीं आपल्या पवित्र महाराष्ट्र भाषेवर 'पंचवार्तिक' नांवाचा हा व्याकरणग्रंथ १३ व्या शतकांत लिहिला आहे प्रस्तुत ग्रंथाच्या प्रच्छन्न दशेंत आधुनिक बहुजनसमाजाची समजूत होती कीं, इंग्रजी शिकवणीनेंच मराठी भाषेचे व्याकरण संस्कार करण्यांत आले. परंतु शनैः शनैः ह्या समजुतीचा ऱ्हास होत चालला आहे.

पट्टा-पुरातत्त्व जिज्ञासु कै० वि० ल० भावे हे सदर ग्रंथाची प्राचीन हस्तलिखित प्रत पाहून आपल्या महाराष्ट्र-सारस्वताच्या तृतीयावृत्तीच्या २१० पृष्ठावर लिहितात कीं," हे ग्रन्थ पाहिले असतां इंग्रजी अंमलामुळें व अंमलानंतर मराठी भाषेला कोश-व्याकरणादि संस्कार घडले अशी समजूत साफ सोडून देणें भाग आहे. "

कै० भाव्यांच्या या लेखावरून स्पष्ट होत आहे कीं, डॉ० श्रीधर व्यंकटेश केतकर M. A. P. H. D. यांनीं जें आपल्या महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या १७ व्या भागाच्या २८१ पृष्ठावर फडके गंगाधर। शास्त्री यांना " आद्य मराठी व्याकरणकर्ते " असें लिहिलें तें अगदीं विचारणीय आहे. समालोचनात्मक दृष्टीनें पाहतां, श्रीभीष्माचार्यच आद्य मराठी व्याकरणकर्ते असें ह्मणणें अतिशयोक्ति कोटींत जाणार नाहीं.

कै० लो० टिळक यांनीं केसरीचे उपसंपादक दत्तोपंत लिमये यांस आद्य मराठी व्याकरण ह्मणून सदर ग्रन्थाची प्रत लिहावयास सांगितली होती, परंतु आमच्या प्राचीन रहस्यगोप्याभिमानी महंतांनीं ग्रंथान्तर्गत ब्रह्मविद्या–सूत्रांचीं उदाहरणें सांगण्याचें नाकारल्यामुळें केवळ निरुदाहरण प्रतच त्यांनीं केली. ही अपूर्ण ह्मणून लोकमान्यांनीं छापिली नाहीं. ही प्रत सद्यः भाव्यांच्या आश्रमांत विद्यमान आहे. अस्तु !

ग्रंथकर्त्यांचें जन्म (पं० भीष्माचार्यांचें) सारस्वत ब्राह्मण कुळांत असून काशी ही यांची जन्मभूमि होती. यांच्या पित्याचें नांव विश्वेश्वराचार्य होतें. यांच्या कुळपरंपरेंत विद्यादेवीची सेवा निरंतर होत असल्यामुळें तिच्या प्रसादानें आचार्य ही उपाधि कुलंगत होती. हे बाळक असतांच यांचे पिता योगक्षेम वृत्ति करितां देवगिरी येथें रामदेव राजाचे प्रधान हेमाद्रिपंत उर्फ हेमाडपंत यांच्याजवळ सहकुटुंब येऊन राहिले. हेमाद्रिपंत बहुश्रुत विद्वान् असल्यामुळें त्यांच्या संनिधिस अनेक पण्डित राहत असत, त्यांपैकीं पंडित बोपदेवाजवळ विश्वेश्वराचार्यांनीं आपल्या भीष्मास विद्याध्ययनासाठीं ठेविलें. 'पण्डिता'पासूनच भीष्म हे 'आचार्य' कोटींत गणले गेले. पण्डित बोपदेवानें श्री चक्रधर शिष्य विप्रनागदेवापासून परमेश्वर मंत्राची दीक्षा घेतली होती. पंडिताच्या उपदेशानें आचार्यानेंही परमेश्वर मंत्राची दीक्षा घेतली. पुढें कांहीं दिवसांनंतर यांनीं महात्मपंथाचें अनुसरण करून ज्ञानवृद्ध श्री न्याय व्यासापासून संन्यास आश्रम स्वीकार केलें. असा यांचा इतिवृत्त गुरुपरंपरेनें ऐकत आहों. स्वतः त्यांनींही स्वकृत 'मुक्तमाला' ग्रंथांत आपला थोडासा परिचय दिला आहे.

"विप्रनागनाथांः मुनिनागदेवेंः दृढाविले भावेंः ज्ञानरोपां ॥ २२१ ॥ विप्रे नागदेवेः मुनि बोपदेवांः हाच ज्ञान ठेवाः निरोपैला ॥ २२२ ॥ बोपदेवा मुखेंः मज पै श्रवणः जाले हे गहनः ज्ञान मायेंः ॥ २२३॥" कै० भाव्यांनी महाराष्ट्र सारस्वतांत चौदाव्या शताब्दींत आद्य भीष्माचार्यांचा उल्लेख केला आहे. परंतु तो असंगत आहे. कारण आचार्य रामदेवाचे समकालीन होत; आणि रामदेव राजा १३ व्या शतकांत विद्यमान होता. त्याचा राज्य गेल्याचा काळ एका महानुभावीय जुनी पोथीवर दिला आहे:—

" शाके सप्त शशि द्विभू परिमिते संवत्सरे मन्मथे ।
मासे फाल्गुनिके तिथौ प्रतिपदे शुक्रे च मन्दे दिने ॥
म्लेन्छे शास्त अलावदीन रिपुणा भद्रो गृहीतस्तथा ।
श्रीमन् देवगिरौ स्थितस्य नृपते रामस्य राज्यं गतम् ॥ "

यावरून १२ वी शताब्दींत आचार्यांचा विद्यमान काळ ठरतो. महात्मपंथांत आल्यावर आचार्यांची ग्रंथकर्तृत्वाकडे अतिशय प्रवृत्ति झाली. सांप्रत यांच्या ग्रंथकर्तृत्वाकडे संबंध ठेवणारे महाराज स्तोत्र (T), मार्ग प्रभाकर, निरुक्त, मुक्तमाला, अवतारमाला, नाममाला, सुभाषितांताक्षरी टीका, लक्षणरत्नाकर टीका, गीतगोविन्द टीका, संकेतभाष्य (Y). आदि मराठी ग्रंथ आणि सिद्धांतपताका, दिनकर-प्रबंध, पदार्थदीपिका आदि संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहेत. या ग्रंथांवरून यांची बहुश्रुतता, उत्साह प्रियता. आणि ग्रंथ कर्तृत्वशक्ति किती होती याची कल्पना पुरातत्त्वविज्ञानींच करावी. पुढेंही यांच्या गादी-प्रतिष्ठेवर प्रतिष्ठित पुरुषांचीही ग्रंथकर्तृत्वाकडे ओढ अधिकच राहिली. प्रस्तुत ग्रंथांवरून दिसून येतें कीं, आचार्यांची श्री चक्रधरो-पदिष्ट ब्रह्मविद्यातत्त्वामध्येंही विशेष निपुणता होती. यांनीं सूत्रांचें पर्यालोचन अतिसूक्ष्म दृष्टीनें केलें होतें महाराष्ट्र भाषेचें याथातथ्य कायम राहून महात्मजनांस ब्रह्मविद्यातत्त्वाचें यथार्थत: ज्ञान होत राहवें, आणि शिक्षण परिपाटी योग्य रीतीनें चालत राहवी, या उद्देशानेंच लेखकानें प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याचे श्रम घेतले असावेत म्हणूनच उदाहरणा करितां ब्रह्मविद्यांतर्गत सूत्रच यांनीं घेतले आहेत.

सदर ग्रंथांत सूत्रलक्षण, सूत्रप्रकृतिलक्षण, सूत्रकारक लक्षण, सूत्रव्याख्यान लक्षण, हे चार अंश आचार्यांच्या कल्पनेचे आहेत; आणि पंचम सूत्रस्वरूप लक्षणांतील ३२ लक्षणांची कल्पना पार-मांडल्याम्नाय संचालक गोपाळ पंडित उर्फ अनंत मुनि व्यास यांनीं केली होती; त्या बत्तीस लक्षणांवर आचार्यांनीं लक्षणरत्नाकर नांवाची

---

T. हा ग्रंथ वि० का० राजवाडे यांनीं कोल्हापूर येथें छापविला आहे.

Y. 'संकेत भाष्य' ही टीका भगवद्गीतेवर आहे. परंतु केवळ श्रीकृष्णोक्तिसच अवलंबून ही टीका लिहिली आहे.

विस्तृत टीका स्वतंत्र रूपानें लिहून त्यांचा सारगर्भितार्थ सूत्रस्वरूप लक्षणांत जोडला आहे. यांच्या सूत्र लक्षणांत आणि वैय्याकरणांच्या "अल्पाक्षरमसंदिग्धं सारवद्विश्वतो मुखम् । अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्र विदो विदुः" या सूत्र–लक्षणांत कांहींच भेद नाहीं. नामांत आणि क्रियेंत जें द्विवचन दिलें आहे तें संस्कृताचें अनुकरण मात्र आहे; परंतु चालू मराठी भाषेंत द्विवचनाचा उपयोग उघड रीतीनें कोठेंही आढळत नाहीं. कृदन्ती आणि तद्धिती प्रत्यय, समास आणि संधि यांचें स्वतंत्र प्रकरण रूपानें वर्णन न करून गौण रूपानें केलें आहे. कारकांचें वर्णन वैय्याकरणांस अनुसरून आहे. सूत्र प्रकृतिचे दहाहि प्रकार वैय्याकरणांचे घेतले खरे, परंतु त्यांचे बहुतेक लक्षण वैय्याकरणांहून भिन्न आहेत.याप्रमाणें यांनीं वैय्याकरणांस अनुसरूनहि कचित् स्वातंत्र्य दाखविलें आहे. वचन, वाक्य, प्रकरण, महावाक्य, पेंडी, यांची कल्पना केवळ स्वतन्त्र आहे. क्रियापदांचें वर्णन संक्षेप रूपानें केलें आहे. सूत्रव्याख्यान–लक्षण–पद्धति अपूर्व रीतिनें मराठींत उपयुक्त केली आहे. किंबहुना, आचार्यांनीं या व्याकरणद्वारें महाराष्ट्र भाषेस संस्कृताची जन्मात्मजा ठरवून दिली आहे. अहह! हे किती महाराष्ट्र भाषेचे पक्षाभिमानी होते, व ब्रह्मविद्या शास्त्रांत यांची केवढी साभिनिवेश दृष्टि होती, हें निरपेक्ष बुद्धीच्या वाचकांच्या लक्षांत येईलच. याचप्रमाणें यांचे कृतिजन्य ग्रंथ अगदीं पाहण्यासारखे आहेत.

सदर ग्रंथाच्या बऱ्याच जुन्या प्रत्यांवर अनेक ठिकाणीं निरनिराळे पाठभेद होते; त्या सर्वांची एकवाक्यता करून ही प्रत लिहिली आहे.

"आद्य मराठी व्याकरण" ह्मणून हा ग्रंथ महाराष्ट्रभाषारसिकांच्या सेवेंत भेट या नात्यानें सादर उपस्थित करित आहों. आशा आहे कीं, रसिक वाचक निरपेक्ष बुद्धिनें आचार्यांच्या विद्वत्तेची समालोचना करतील.

संस्थान श्री देवदेवेश्वर }
माहूर. श्रीदत्तराज महानुभाव.

# वाकम-दिगमाची गोष्ट.

एक गडी एका यजमानाजवळ चाकरीस राहिला। तो केवळ नांवाचा मात्र गडी होता। आपल्या धन्याच्या नांवाची देखील चौकशी करण्याची त्यास जरूरी वाटली नाहीं, इतका तो अडाणी होता। एके दिवशीं त्याच्या यजमानानें त्याला आपल्याबरोबर घेतलें व यजमान घोड्यावर बसून आणि तो गडी पायीं, अशा रीतीनें ते चालले। यजमानास जावयाचें तेथें गेल्यावर यजमानाने घोड्याचा लगाम त्या गड्याच्या हातीं देऊन, त्यास रस्त्यावर उभें राहण्यास सांगितलें, आणि आपण दुसरीकडे गेला। इतक्यांत समोरून एक उंट आला व त्यामुळें घोडें बुजालें आणि त्या गड्याच्या हातून निसटलें। लगाम मात्र त्याच्या हातीं राहिला। गड्याला यजमानाचें, उंटाचें, घोड्याचें आणि लगामाचेंही नांव माहीत नसल्यामुळें, त्यानें जवळ असलेल्या एका मनुष्याबरोबर यजमानास निरोप पाठविला कीं, "ऐला सांग, पैला वाकम आलें। दिगम गेलें। आणि ठीकटवळें हातीं राहिलें।"

ही वाकम-दिगमाची गोष्ट उदाहरणार्थ 'पञ्चवार्तिकां'त आलेली आहे. त्याचा आशय मनुष्यास योग्य भाषाज्ञान नसलें, म्हणजे त्याची अशी 'वाकम-दिगमाची परी' अवस्था होते, हें सांगण्याचा आहे.

ऐला=अलीकडचा ( गृहस्थ )। पैला=पलीकडचा ( यजमान )।
वाकम=वांकडा ( उंट )। दीगम=घोडा।
ठीक टवळें=लगाम।

याप्रमाणें वरील शब्दांचे अर्थ आहेत.

श्री चक्रधरः शरणम्

# पंचवार्तिक

प्रतिज्ञाः—सूत्रलक्षणमेवं च सूत्रप्रकृतिलक्षणम् ।
सूत्रकारकमेवं च सूत्रव्याख्यानलक्षणम् ॥ १ ॥
सूत्रस्वरूपमेवं च कथितं शास्त्रवेदिभिः ।
पञ्चवार्तिकमेतद्यः पठन् स पण्डितो भवेत् ॥२॥

## १. सूत्र लक्षण.

आतां प्रतिज्ञेसि अनुसरौनि प्रथम ' सूत्रलक्षण ' सांगिजताए:—

अल्पाक्षरें असंदिग्धें सारवंतें विश्वतोमुखें सार्थकें निर्दोषें जे हां प्रयोगें अर्थज्ञानु सूत्रिजे (मुद्रिजे) तेआ प्रयोगातें सूत्र ऐसें भणिजे.

तेआं सूत्रांचे च्याऱ्हीं भेद (१) वचन (२) वाक्य ( ३ ) प्रकरण (४) महावाक्य.

तीनि पदांचे सूत्र तें वचन बोलिजे. सा वचनांचे सूत्र तें वाक्य बोलिजे. बारा वाक्यांचे सूत्र तें प्रकरण बोलिजे. बारा प्रकरणांचे सूत्र तें महावाक्य बोलिजे.

तेचि केवी? ना—भाष्यकारें भणितलें:—"एकें दों शब्दें आचारा विचाराचा निर्वच कीजे तें वचन बोलिजे : दो चौ वचनांचा समुच्चयो तें वाक्य बोलिजे : सातां पांचां वाक्यांचा मेळावा तें प्रकरण बोलिजेः सातां पांचां प्रकरणांचा बांधा तें महावाक्य बोलिजेः शब्दें भणजे पदें.

आतां वचनांचे भेद सांगता असीजे. वचनांचे तीनि भेद. ( १ ) एका पदांचे वचन ( २ ) दोनि पदांचे वचन, ( ३ ) तीनि पदांचे वचन. " कृपाळु " " निरालंबी " एवमादिकें सूत्रें एकपदी वचनांचीं उदाहरणें जानिजेति. " आनंद तो " " ब्रह्म तो" "आत्म-

ज्ञानें मोक्ष " एवमादिकें सूत्रें द्विपदी वचनांचीं उदाहरणें जानिजेति. " जो जन्मक्षेपी " " आनंद शब्दें ईश्वरु बोलिजे " एवमादिकें सूत्रें त्रिपदी वचनांचीं उदाहरणें जानिजेति.

## ( १ ) वचनविचार—पदें व पदभेद.

वचन प्रत्यभिज्ञा पद अळखी वांचौनि न होएचि भणौनि आर्धीं पद अळखी होआवीचि लागे.

तियेचि पदें सलिंग, अलिंग, क्रिया, ऐसीं त्रिविधें असति.

जातिद्योतक होऔनि अत्याज्य ते लिंग तेनें युक्त ते सलिंग, लिंगाचिये तीनि भेद असति. ( १ ) पुल्लिंग, ( २ ) स्त्रीलिंग, ( ३ ) नपुंसकलिंग. यथाः—देव, देवी, दैव, एवमादि.

सलिंग पदांचिये तीनि वचनें असति (१) एकवचन, (२) द्विवचन, ( ३ ) बहुवचन. यथाः—' देव आला ' एथ एकत्व असे भणौनि एकवचन, ' देव आले ' एथ द्वित्व बहुत्व असे भणौनि द्विवचन बहुवचन, तेंचि द्वित्व बहुत्व प्रकरण वशें जानिजे; ' देवी आली ' एथ एकत्व असे भणौनि एकवचन, ' देविआ आलिआ ' एथ द्वित्व बहुत्व असे भणौनि द्विवचन बहुवचन, तेंचि द्वित्व बहुत्व प्रकरण वशें जानिजे; ' दैव उदेलें ' एथ एकत्व असे भणौनि एकवचन, ' दैवें उदेलीं ' एथ द्वित्व बहुत्व असे भणौनि द्विवचन बहुवचन, तेंचि द्वित्व बहुत्व प्रकरण वशें जानिजे.

तियेचि सलिंग पदें द्विविधें. ( १ ) नाम, ( २ ) सर्वनाम. तियेची यथासम्भव द्विविधें. ( १ ) केवळ, ( २ ) संयुक्त.

एकाचि पद तें ' केवळ ' पद. दो कां ती कां बहुतां पदांचा एकीं अर्थीं मेळावा तें ' संयुक्त ' पद. " परमेश्वरु एकु आति " इये सूत्रीं ' एकु ' हें सर्वनाम केवळ पद, आन ' परमेश्वरु ' हें संयुक्त (परम + ईश्वरु ) पद.

इये दोनि पदीं सातीही विभक्ति आ वर्तति असति. " एकां प्रेम मंचरैति " एथ ' एकां ' इये केवळ पदीं द्वितीया; आन " परमेश्वराते चिंतिता परमेश्वरा सारिखा होए " एथ ' परमेश्वराते ' इये संयुक्तपदीं द्वितीया.एवमादि साती विभक्तिआंचीं उदाहरणें जानिजेति.

[अ] केवल पदें कृदन्ती प्रत्यय करौनि कां तद्धिती प्रत्यय करौनी सिद्ध होताति. भणौनि प्रसंगवशें कृदंती प्रत्यय आन तद्धितीप्रत्यय निरौपजिताए.

## कृदन्ती प्रत्यये.

कृदन्ती प्रत्यये धातु पासौनि होताति.

अ. जीवु, हर, देव, जय, प्रवाह, त्यागु, विभागु, प्रसाद, भाव, संचय, रोग, प्रपंचु, मंत्र, इन्द्र, चन्द्र.

अक. कारक, बाधक, साधक, शोधकु, वेधकु, भजकु, जनक, रक्षक, पालक, स्थापक, बोधकु, हिंसकु, घातक, व्यापकु, ज्ञापकु, द्रावकु.

अन. स्थान, पचन, पाचन, दान, मान, पान, ज्ञान, ध्यान, पतन, करण, कारण, वचन.

अना. प्रार्थना, रचना, वेदना,

इन्. अनुयायी, शेषशायी, अर्थी, आकांक्षी.

उ. भिक्षु, जिज्ञासु.

तृ. दाता, ज्ञाता, भोक्ता, वक्ता, कर्ता, नियन्ता.

ति. भक्ति, मुक्ति, शक्ति, उक्ति, प्रीति, सृष्टि, गति, रति, मति, बुद्धि, विकृति, प्रकृति, प्राप्ति.

त्र. शास्त्र, पात्र, स्तोत्र.

त. आप्त, प्राप्त, कृत, पतित, रचित, व्याप्त.

य. कार्य, त्याज्य, भव्य, वंद्य, पूज्य, खाद्य, पेय, चोष्य, लेह्य, भोज्य.

मान. यजमान.

अनीय. करणीय.

तव्य. दातव्य, कर्तव्य.

वर. ईश्वरु.

एवमादिके सोदाहरण कृदन्ती प्रत्यये जानिजे.

## तद्धिती प्रत्यये.

तद्धिती प्रत्यये नामापासौनि होताति.

भावीं:
- ता. प्रसन्नता, देवता, एकता.
- त्व. देवत्व, तिर्यक्त्व, नित्यत्व, व्यापकत्व, मनुष्यत्व.
- य. धैर्य, पातिव्रत्य, ऐश्वर्य, सौंदर्य, औदार्य, लावण्य, सौभाग्य.

ता. जनता.

आलु. दयालु, श्रद्धालु, कृपालु.

मत्. भक्तिमान, बुद्धिमान, मतिमान, श्रद्धावान, ज्ञानवान्, विद्यावान्.

मात्र. पुरुषमात्र.

इन्. ज्ञानी, प्रमादी, अभिमानी.

धा. अष्टधा, द्विधा.

तर. शुभतर, साधुतर, शुक्लतर.

तम. शुभतम, साधुतम, शुक्लतम.

वत्. अमृतवत्.

क. आत्मक, भिक्षुक.

अ. वासुदेव, शांभव, पांडव, कौरव, राघव, गौरव, लाघव दैव.

य. दैत्य, आदित्य.

इक. कायिक, वाचिक, मानसिक.

एवमादिकें सोदाहरण तद्धिती प्रत्यय जानिजे.

[ आ ] संयुक्त पदें समासें करौनि कां संधिकरौनि सिद्ध होताति भणौनि समास आन संधि निरूपिजताए.

## समास.

समासाचिये च्यार्‍हीं भेद असाति. १ अव्ययीभाव, २ तत्पुरुष. ३ बहुव्रीहि, ४ द्वन्द्व.

१. जेथ पूर्वपदाचा अर्थ प्रधानु असे तें आतें 'अव्ययीभाव' भणिजे. 'यथोचित', 'यथाशक्ति', एवमादि शब्दीं अव्ययीभाव समास जानिजे.

२. जेथ उत्तरपदाचा अर्थ प्रधानु असे तें आतें 'तत्पुरुष' भणिजे. तोचि तत्पुरुष त्रिविध जानिजे. (१) विभक्ति तत्पुरुष, (२) कर्मधारय. (३) द्विगु.

(१) 'सर्वशक्तियुक्त', 'एतत्सहित', 'जीवप्रपंचव्यतिरिक्त', 'परमेश्वर-प्रवृत्ति', 'मायावेष', एवमादि प्रयोगीं विभक्ति तत्पुरुष जानिजे.

(२) 'परमेश्वरु', 'महावाक्य', 'महाराज', 'बद्धमुक्त', इये प्रयोगीं कर्मधारय समास जानिजे.

(३) 'त्रिभुवन' 'अष्टांग' एवमादि प्रयोगीं द्विगु समास जानिजे.

३. जेथ अन्यपदार्थ प्रधानु असे ते आते 'बहुव्रीहि' समास भणिजे. 'अनंत शक्ति परमेश्वर,' 'पीतांबर हरि' एवमादि प्रयोगीं बहुव्रीहि समास जानिजे.

४. जेथ उभय पदांचा अर्थ प्रधानु असे ते आते द्वन्द्व समास भणिजे. 'सच्चिदानंद', 'हरिहरब्रह्मा', 'जीवप्रपंच', एथ द्वन्द्व समास जानिजे.

इये द्वंद्व समासीं कवन पद पूर्व योजिजे आन कवन पद पश्चात् योजिंजे ययाचे ही नियम असति.

तियेची ऐसीः—(१) "पूज्यपद पूर्व योजिजे" (२) "इकारान्त आन उकारान्त शब्द पूर्व योजिजे." (३) आन अल्पस्वर शब्द पूर्व योजिजे.

'सच्चिदानंद' येथ 'सत्' पूज्य असे भणौनि ते आते पूर्व योजिले असे, 'हरिहरब्रह्मा' एथ हरि शब्द इकारान्त असे भणौनि ते आते पूर्व योजिलें असे. 'जीव-प्रपंच' एथ जीव-शब्द अल्पस्वर असे भणौनि ते आते पूर्व योजिलें असे.

एवं समास जानिजे.

## संधि.

इ-भिन्न स्वरवर्ण पुढें असतां मागील 'इ' 'य'त्वाते पावे.

यथाः—आदि+अन्ती=आद्यन्ती

उ-भिन्न स्वरवर्ण पुढें असतां मागील 'उ' 'व' त्वाते पावे.

यथाः—तालु+ओष्ठ=तालव्योष्ठ.

अ पुढें इ असतां दोनि मिळौनि 'ए'कार होएं.

यथाः—परम+ईश्वरु=परमेश्वरु.

अ पुढें उ असतां दोनि मिळौनि 'ओ'कार होए.

यथाः—फल+उपभोग=फलोपभोग.

अ पुढें ऋ असतां दोनि मिळौनि 'अर्' होए.

यथाः—राज+ऋषि=राजर्षि.

अ पुढें अ असतां दोनि मिळौनि दीर्घ 'आ' होए.

यथा:—विद्या+आनन्द=विद्यानन्द.

इ पुढें इ असतां दोनि मिळौनि दीर्घ 'ई' होए.

यथा:—कवि+ईश्वरु=कवीश्वरु.

उ पुढें उ असतां दोनि मिळौनि दीर्घ 'ऊ' होए.

यथा:—वस्तु+उपदेश=वस्तूपदेश.

पदान्तीचे आ 'त'कारासि 'द'कार होए. ह,य, व,र,ग,घ,ज,झ, ड, ढ, द, ध, ब,भ, आन स्वर पुढें असतां.

यथा:—चित्+आनन्द=चिदानन्द, चरेत्+भैक्ष्यम=चरेद्भैक्ष्यम्; यत्+दृश्यते=यद्दृश्यते.

इकारादि स्वरोत्तरील विसर्ग रेफाते पावे, स्वर आन ग, घ, ङ, ज, झ, ञ, ड, ढ, ण, द, ध, न, ब, भ, म, य, र, ल, व, ह, पुढें असतां.

यथा:—प्रकृति:+अहम्=प्रकृतिरहम्, जिज्ञासु:+उत्तम=जिज्ञासुरुत्तम:

अकारोत्तरवर्ति विसर्ग 'ओ'त्वाते पावे.अ स्वर आन ग, घ, ङ, ज, झ, ञ, ड, ढ, ण, द, ध, न, ब, भ, म, य, र, ल, व, ह, पुढें असतां.

यथा:—विराग:+वैराग्यम्=विरागोवैराग्यम्.तम:+निमग्न:=तमोनिमग्न: समर्थ:+धर्मम=समर्थोधर्मम्.

पुढें त थ असतां विसर्ग 'स'काराते पावे.

यथा:—रज:+तम= रजस्तम.

एवं संधि जानावी.

---

सिद्धनामें कांइ विशेषणें असति; आन कांइ विशेष्यें असति. आन सर्वनामें केवळ विशेषणाचि असति.

आतां अलिंगपदें सांगिजताए. लिंग रहितें तियें अलिंगें तियेंाचि अव्ययें. चि, की[1], कीं[2], गा, आन,जरि, तरि, परि, मग,के, कां, एवमादिके अव्ययें जानिजेति.

---

१.'की'निश्चयावाचक यथा:—"तुह्मां बोध आन बोधशक्ति ते एथौनिचि की गा!"

२. 'कीं'अथवा वाचक यथा:—"भक्तभेदें अनुभवी कीं अभेदें अनुभवी"

## क्रियापदें.

आतां क्रियापदें सांगता असीजे. क्रिया तिया द्विविधा. सलिंगा आन अलिंगा. गेला, गेली, गेलें, एवमादि क्रिया सलिंगा बोलिजेति. आति, नाहीं, होए, न होए, एवमादि क्रिया अलिंगा बोलिजेति.

सर्वाही क्रिया भूत, भविष्य, वर्तमान, इये काळीं वर्तति. या वेगळे प्रेरणा, आशंसा, प्रार्थना, आन आशीर्वाद अर्थीं ही प्रयोगे असाति. तिये भविष्यान्तर्गत जानिजेति.

क्रियेचिये तीनि वचनें असाति.आन तीनि पुरुषे असाति. एकवचन, द्विवचन, बहुवचन: प्रथम पुरुष, मध्यम पुरुष, उत्तम पुरुष. इये अनुक्रमें वचन पुरुप जानिजेति. ' तो जातो ' एथ प्रथम पुरुप जानिजे, ' तु जात आसि ' एथ मध्यम पुरुष, ' मी जातो ' एथ उत्तम पुरुष जानिजे.

एकी क्रिया सकर्मका आन एकी अकर्मका.

जिये क्रियेचा फळ आन व्यापार भिन्न भिन्न स्थळीं वर्तति असति तिये क्रियेते सकर्मक क्रिया भणिजे.

जिये क्रियेचा फळ आन व्यापार एकी स्थळींचि असति तिये क्रियेते अकर्मक क्रिया भणिजे.

क्रियापदांचे तीनि प्रयोगे असाति. क्वचित् कर्मणि, क्वचित् कर्तरि, आन क्वचित् भावे.

जेथ क्रिया कर्मानुसार असति तेथ ते आते कर्मणि प्रयोग भणिजे. यथा:—" पुरुपें धर्माधरु दीजे. "

जिये प्रयोगीं क्रिया कर्तानुसार असति ते आते कर्तरि प्रयोग भणिजे. यथा:—"सृष्टिमध्यें परमेश्वरु अवतरति" "परमेश्वरु जीवांते उद्धारिती. "

जिये प्रयोगीं क्रिया केवळ क्रिया द्योतनार्थ असति ते आते भावे प्रयोग भणिजे. यथा:—" जीतेनि मृताचा धर्मी वर्तावे. "

एवं वचन निर्वचन.

---

## (२) वाक्यविचार.

आतां वाक्याचे भेद सांगता असीजे.

वाक्याचे १५ भेद. (१)चौ पदांचे वाक्य (२)पांचा पदांचे वाक्य (३) सा पदांचे वाक्य (४) साता पदांचे वाक्य (५) आठा पदांचे वाक्य (६) नवा पदांचे वाक्य (७) दहा पदांचे वाक्य (८) अकरा पदांचे वाक्य (९)बारा पदांचे वाक्य (१०) तेरा पदांचे वाक्य (११) चौदा पदांचे वाक्य (१२) पंधरा पदांचे वाक्य (१३) सोळा पदांचे वाक्य (१४) सतरा पदांचे वाक्य (१५) अठरा पदांचे वाक्य.

इयेची उदाहरणें अनुक्रमें चि जानिजे.

(१) "कृतयुगीं आत्मोपास्ति हा धर्मु." 1

(२) "मग एकु अनुसरति एकु नानुसरति."

(३) "जड अजड चिज्जड एवं त्रिविध माया."

(४) "जीव-प्रपंच व्यतिरिक्त सच्चिदानंद-स्वरूप परमेश्वरु एकु आति तो सर्वशक्तियुक्त."

(५) "या परि योग्य होए ते आसि परमेश्वरु सामान्य ज्ञान-दान करीति."

(६) "नित्य केवळ अनाद्यविद्यायुक्त वस्तु एकु आति तें जीवशब्दें बोलिजे."

(७) "नित्यत्व व्यापकत्व सर्वात्मकत्व सर्वातीतत्व सर्वकर्तृत्व सर्व-साक्षित्व एवमादि अनंते धर्में बोलिजेति."

(८) "ऐसिया माया पुराते स्वीकरौनि कर्मभूमिस्थितां मनुष्यदेह-युक्तां जीवां ज्ञानपर्यंत आपुला संबंधु देति."

(९) "सकलां ही विद्येचें साधन एथ साध्य ब्रह्माण्डीं ब्रह्मविद्येचें साध्य साधन एथचि."

(१०) "हे हाट चौहाट बोलावे परि एथौनि दीहले आविनु कवना ही घेऊं थोको न ए."

---

1 जिये सूत्रीं क्रियापद नसे तेथ 'असे,' 'आति,' 'असति,' 'होए,' 'होताति,' या क्रियापदांचे अध्याहार जानिजे.

( ११ ) " राग, द्वेष, काम, क्रोध, मद, मच्छर, यांचा त्यागु याचि नांवें संन्यासु की बाई. "
( १२ ) "भोजे आ ! एथ अनुसरीजे ना तरि ऐसि आ अधो परिचे आं वृक्षां होइ जालु मग अनंत काळु दुःख भोगिताचि असजालु. "
( १३ ) "शक्तिशब्दें सकळां ही देवतां सकळ ही गुण सकळ ही धर्म, ज्ञान विज्ञान हें सर्व शक्तिशब्दें बोलिजेति. "
( १४ )"सच्छब्दें ब्रह्म बोलिजे. चिच्छब्दें माया बोलिजे. आनंदशब्दें ईश्वरु बोलिजे. ब्रह्म माया ईश्वरु ऐसा त्र्यंश परमेश्वरु एकु आति. "
( १५ ) " बाई ! श्री उद्धवदेव आज्ञा भंगु करौनि आले तरि कांई ते आं अविधि जाहला ? मा ईश्वराची आज्ञा ते ईश्वराचि ये कारणें भंगैली की. "

इये वाक्यें एके केवळें एके संयुक्तें.

जेथ एकाचि क्रियापद समग्रां पदांते व्यापी तें केवळ वाक्य. यथाः—"जीव-प्रपंच व्यतिरिक्त सच्चिदानंद स्वरूप परमेश्वरु एकु आति." एथ 'आति' हे एकाचि क्रियापद अवघे आं पदांते व्यापौनि वर्ते भणौनि याते केवळ वाक्य जानिजे.

जेथ बहुतिये क्रियापदें आपुलाले आं पदांते व्यापिती तें संयुक्त वाक्य. यथाः—"तुष्टला जन तरि विखो संपादैल, रुसला तरि प्राणां घतैल, भण औनि उभयतां जन-संबंधु त्याज्य. इये सूत्रीं, 'तुष्टला जन तरि विखो संपादैल' येथ 'संपादैल' हें कियापद, एनें आपुलालीं पदें व्यापिलीं; " रुसला तरि प्राणां घतैल " एथ 'घतैल' हें क्रियापद, एनें आपुलाली पदें व्यापिलीं; 'भणऔनि उभयतां जन-संबंधु त्याज्य' एथ 'त्याज्य' हें क्रियापद, एनें आपुलालीं पदें व्यापिलीं.

एके संयुक्त वाक्यें दोनि प्रयोगां मिळौनि असाति कां तीनि प्रयोगां मिळौनि असाति एवं उत्तरोत्तरीं वृद्धिक्रमु जानिजे.

तियेचि वाक्यें वचनवत्प्रयोगां कां वाक्यवत्प्रयोगां कां वचन-वाक्यवत् प्रयोगां मिळौनि असाति.

वचनवत् दो प्रयोगां मिळौनि एक वाक्य यथाः—" चैतन्य देवता होए परि परमेश्वरु नव्हे. " एथ 'चैतन्य देवता होए' हा

एक प्रयोग आन ' परि परमेश्वरु नव्हे ' हा दुसरा प्रयोग. इये दोनि प्रयोगे त्रिपदी असति भणौनि वचनवत् प्रयोगाचें उदाहरण जानिजे.

वाक्यवत् दोनि प्रयोगां मिळौनि एक वाक्य यथा:—"हा गा देव कांई अनेक असति देव तो एकाचि की ". एथ ' हा गा देव कांई अनेक असति ' हा एक प्रयोग आन " देव तो एकाचि की " हा दुसरा प्रयोग. इये दोनि प्रयोगे अनुक्रमें षट्पदी पंचपदी असति, भणौनि वाक्यवत् प्रयोगाचें उदाहरण जानिजे.

वचन वाक्यवत् दोनि प्रयोगां मिळौनि एक वाक्य. यथा:— " एथ श्रीकृष्णीं त्रिविधजन श्री प्रभुचा ठाईं द्विविध जन " इये सूत्रीं ' एथ श्रीकृष्णीं त्रिविधजन ' हा एक प्रयोग; आन ' श्री प्रभुच्या ठाईं द्विविध जन ' हा दुसरा प्रयोग. इये दोनि प्रयोगे अनुक्रमें चतुष्पदी त्रिपदी असति. भणौनि वचन वाक्यवत् प्रयोगाचें उदाहरण जानिजे. एवं त्रिप्रयोगीं चतुष्प्रयोगी पंचप्रयोगी आदि वाक्यांचे उदाहरणें जानिजेति.

जिये सूत्रीं पदाची न्यूनता भासे तेथ भीतरीचि आ भीतरी पूर्व पदानुवृत्ति कीजे, आन अध्याहारु कीजे. यथा:—" तुष्टला जन तरि विखो संपादैल,रुसला तरी प्राणां घेतैल, भणऔनि उभयतां जन-संबंधु त्याज्य. " इये सूत्रीं ' रुसला तरि प्राणां घेतैल ' एथ 'जन' पदाची न्यूनता भासे भणौनि पूर्व प्रयोगीं बोलिला जो ' जन ' पद ते आची अनुवृत्ति कीजे. आन ' तुष्टला जन तरि विखो संपादैल ' तरि कवनांसि संपादैल ? ना–' अनुसरले या पुरुषासि '; तरि एथ 'अनुसरले आ पुरुषासि ' याचा अध्याहारु कीजे. ऐसिया परि चतुर्विध सूत्रीं पूर्वपदानुवृत्ति आन अध्याहारु कीजे.

एवं वाक्य निर्वचन.

---

## ( ३ ) प्रकरण–विचार.

आतां प्रकरणाचे भेद सांगता असीजे.

प्रकरणाचे दहा भेद असति. ( १ ) तीनि वाक्यांचे प्रकरण, ( २ ) चौ वाक्यांचे प्रकरण, ( ३ ) पांचा वाक्यांचे प्रकरण, ( ४ ) सा वाक्यांचे प्रकरण, ( ५ ) साता वाक्यांचे प्रकरण, ( ६ ) आठा वाक्यांचे प्रकरण, ( ७ ) नवा वाक्यांचे प्रकरण, ( ८ ) दहा वाक्यांचे प्रकरण, ( ९ ) अकरा वाक्यांचे प्रकरण, ( १० ) बारा वाक्यांचे प्रकरण.

चौ पदां पासौनि जंव अठरा पदें तंव वाक्यांचे पंधरा भेद होताति. एका पदाचे वचन वर्जोनि मग वचनाचे दोनि भेद ते ही प्रकरण सूत्रीं वाक्यवत् जानावी. ऐसे सतरा भेद असति. या सतरा भेदामध्यें भलतिये एके बारा वाक्यें ते आंचा मेळावा तें प्रकरण सूत्र. परि अष्टादश पदपर्यंत जिये सूत्रें असति तेथ ते न लभे.

तीनि वाक्यांचे प्रकरण सूत्र यथाः—" पोरे आ एका कारणें सातां पांचांचा सासुरवासु पाहिजे, मा विश्वाचा पति परमेश्वरु तेनेंसि धरणें मांडिले असे, तरी जगाचा सासुरवासु पाहिजे की. "

चौ वाक्यांचे प्रकरण सूत्र यथाः—" मग जीव नाहीं तेंचि एक गंधर्व नगराकार अनेकधा विकृति रची, ते आ माजी रीगे, तादात्मक होए, ' विकृतिरहं ' ऐसे बूझे. "

पांचा वाक्यांचे प्रकरण सूत्र. यथाः—" साकरी, शांभवी, शुद्धा, वेधवती,–ब्रह्मा, विष्णु, महादेव, शेषशायी, या चौघांचिया च्यान्हीं विद्या, साकरी ब्रह्मे आची, शांभवी महादेवाची, शुद्धा विष्णुची, वेधवती शेषयायीची ".

सा वाक्यांचे प्रकरण सूत्र. यथाः—" वसिष्ठ आनवी चिये प्रथम करणीची रिगवणी जाने ते आस्तव देह द्वन्द्वे निवर्तौलि, परि मनोद्वन्द्वे न निवर्ततीचि, पुत्र वियोगे आडी दरडी वरोनि घाली, परि अभिमानिनी देवता वरचे आवरी, धरी, मरौ नेदी. "

साता वाक्यांचे प्रकरण सूत्र. यथाः—" लौकिक तें लौकिकीं वर्ते, भौतिक तें अष्ट भैरवांचा ठाईं वर्ते, उपसंहाराख्य तें विश्वचैतन्याचा

ठाईं वर्ते, लाभाख्य तें ईश्वरीं वर्ते, लाभाख्य तें द्विध, भक्ताचा ठाईं वर्ते, ज्ञानियाचा ठाईं वर्ते. "

आठा वाक्यांचे प्रकरण सूत्र. यथा:—" हा गा ! जन्माचिया कांईं अनुपत्ति आ पडलिआ असति, ऐसी अनंतें जन्में वायां गेलीं, एके महीळिये जन्मु दीन्हले, मोळिये दीन्हले, शिवनेआ दीन्हले, रुभनेआ दीन्हले, मा हे एक जन्मु एथ दीजो कां मा कांईं होईल तें पाहिजो. " एवमादिके द्वादशां भेदीं प्रकरण सूत्रें जानावी.

## एवं प्रकरण निर्वचन.

---

## (४) महावाक्य.

आतां महावाक्याचे भेद सांगता असीजे.

महावाक्याचे दहा भेद असति. ( १ ) तीनि प्रकरणांचे महावाक्य, ( २ ) चौ प्रकरणांचे महावाक्य, ( ३ ) पांचा प्रकरणांचे महावाक्य, ( ४ ) सा प्रकरणांचे महावाक्य, ( ५ ) साता प्रकरणांचे महावाक्य, ( ६ ) आठा प्रकरणांचे महावाक्य, ( ७ ) नवा प्रकरणांचे महावाक्य, ( ८ ) दहा प्रकरणांचे महावाक्य, ( ९ ) अकरा प्रकरणांचे महावाक्य, ( १० ) बारा प्रकरणांचे महावाक्य. या वरौते सूत्र नव्हे ते निरोपणाची मोकळीक जानिजे. सकळ महावाक्य सूत्रांचा संग्रहो बाहुल्यें अन्वयसूत्र पाठीं असे.

साता पांचा प्रकरणांचा बांधा तें महावाक्य. याचा दुसरा अर्थ:-

सात पांच नामग्रहणें जिये वाक्यीं असति तें महावाक्य बोलिजे. यथा:—" जीव प्रपंचव्यतिरिक्त. " एवमादि पाठ-अर्थ सूत्रांची एकवाक्यता असे. तेथ बारा वस्तूंचा नामग्रहण असे, तियेचि ऐसें:— ( १ ) जीव, ( २ ) प्रपंच, ( ३ ) सत्, ( ४ ) चित्, ( ५ ) आनंद, ( ६ ) परमेश्वर, ( ७ ) शक्ति, ( ८ ) देवता, ( ९ ) गुण, ( १० ) धर्म, ( ११ ) ज्ञान, ( १२ ) विज्ञान.

या महावाक्याचे दहा भेद. तेंचि तीनि नामापासौनि बारा नामापर्यंत जानिजे. यथा:—"आनव, शाक्तेय, शांभव." हे तीनि नामांचे

उदाहरण जानिजे. एवं "ज्ञान, ध्यान, मंत्र, स्थावर," " वेध, विद्या, ज्ञान, साधन, धर्म " इयें अनुक्रमें चौ नामांचे तथा पांचा नामांचीं उदाहरणें जानिजेति.

प्रसंगवशें पेंडी लक्षण सांगता असीजे.

" अवघे आ शास्त्राचा अवाका याते पेंडी बोलिजे."

नित्यानित्यवस्तु विवेके करौनि अमुके मोचके आन अमुके अमोचके ऐसे जेनें कथिजे तें शास्त्र बोलिजे; अमुके मोचके अमुके अमोचके ऐसा शास्त्र निर्धारित दोथोवे आचा समुच्चयो जेनें यथार्थ उमटे तो अवाका बोलिजे. " सृष्टिमध्यें कवनें करणें मुंचिजेना एवमादि पूर्वांचिये उपदेशें अवघे आ शास्त्राचा अवाका उमटे भणौनि पूर्वीत पेंडी भणिजे.

" अवघे आ निरूपणाचा अवाका याते ही पेंडी बोलिजे. "

" अवघे आ प्रकरणाचा अवाका याते ही पेंडी बोलिजे."

एवं सूत्र–लक्षण समाप्त.

ग्रं. क्र. 3845

## २. सूत्रप्रकृति लक्षण.

आतां सूत्र प्रकृति सांगता असीजे.

तरि सूत्र प्रकृति भणजे कांई ? ना—सूत्र रूपत्वें रचना साम्य असतां ही सूत्रांसि परस्परें जी विलक्षणता ती सूत्रांची प्रकृति जानिजे. यथाः—" परा पश्यन्ती मध्यमा वैखरी " आन " चहुयुगीं परमेश्वरु जीवांते उद्धरिती " या दोनी सूत्रांची रचना साम्य असतां ही एक वाचा नाम भेदाचे ज्ञापक आन एक परमेश्वर व्यापाराचे ज्ञापक असे. ऐसी विलक्षणता आति भणौनि सूत्र प्रकृतिचे ज्ञान होआवेचि लागे.

सूत्र प्रकृति दशधाः—संज्ञा, परिभाषा, विधि, नियम, अतिदेश, अपवाद, विभाषा, निपात, प्रतिषेध, अधिकार, ऐसे सूत्रांचे दहा प्रकार असति. तियेंचि वैय्याकरणीं भणितलेंः—

" संज्ञा च परिभाषा च विधिर्नियम एव च
अतिदेशोऽपवादश्च विभाषा च निपातनम्
प्रतिषेधोऽधिकारश्च सूत्रं तद्दशधा विदुः "

संज्ञा सूत्राचे लक्षण:—साजात्यां वैजात्यां कां मिश्रां अनेकां वस्तूंची नामें एकत्र जेथ आळविजेति तें संज्ञासूत्र आन तेंचि उद्देश सूत्र जानिजे.

" परा पश्यन्ती मध्यमा वैखरी " एथ साजात्यां अनेकां वस्तूंची नामें असति.

" लौकिक भौतिक उपसंहाराख्य लाभाख्य" एथ वैजात्यां अनेकां वस्तूंची नामें असति.

" ज्ञान ध्यान मंत्र स्थावर " एथ साजात्यां वैजात्यां अनेकां वस्तूंची नामें असति. भणौनि इये संज्ञा सूत्रें जानिजेति.

परिभाषा सूत्राचें लक्षण:—शब्दाचे आ अर्थाचे ज्ञापकसूत्र तें परिभाषा सूत्र बोलिजे. ' भणिजे, ' ' बोलिजे, ' ' भणजे, " भणिजेति, ' ' बोलिजेति, ' ए ही क्रियापदें परिभाषा जानिजे. यथा:— " सच्छब्दें ब्रह्म बोलिजे. " " चिच्छब्दें माया बोलिजे, " "आनंद शब्दें ईश्वरु बोलिजे, " " व्यतिरिक्त भणजे वेगळा. "

लक्षण सूत्रें ही शब्दार्थाचे ज्ञापक होतातिं, भणौनि तियेही परिभाषा शब्दें आळविजेति. यथा:—" नित्य बद्धा देवता, " "बद्धमुक्त जीव, " " नित्यमुक्त परमेश्वरु, " " प्रपंच अनित्य. "

संख्याज्ञापक सूत्रें ही शब्दार्थाचे ज्ञापक होताति भणौनि तिये ही परिभाषाशब्दें आळविजेति. यथा:—"बत्तीस लक्ष कृतयुग," "कृतयुगीं लक्षभर आयुष्य, " ऐसी त्रिविधें परिभाषा सूत्रें जानिजेति.

विधि सूत्राचें लक्षण:—विधिरूपें कां निषधरूपें जियें आचारसूत्रें तियें विधिसूत्रें भणिजेति. ' कीजे, ' ' करावा, ' ' करावी, ' ' करावें, ' ' होआवा–वी–वें, ' ' त्याज्य, ' ' वंद्य, ' ' भज्य, ' ' पूज्य, ' ' सेव्य, ' एवमादि कर्तव्याची ज्ञापके क्रियापदें जेथ असति तियें विधिरूपें सूत्रें जानिजेति. यथा:–"नाम स्मरण कीजे," " प्राप्तार्थाचा त्यागु करावा " " एथींची सेवा ते भूताविरोधें

करावी की गा, " "कौपीनु धारण करावे" तुह्मां शयनासनीं भोजनीं परमेश्वरु होआवा की गा " एवमादि.

'न कीजे,' 'न करावा,' 'न होआवा,' 'न होआवी' 'त्यजावा,' 'सांडावा,' 'वर्जावे' एवमादि निषेधार्थाची ज्ञापके क्रियापदें जेथ असति तियें निषेधरूपें सूत्रें जानिजेति. यथा:—"पचन पाचन न कीजे," "विषयाचा संग न करावा," "आग्रहो परिग्रहो न होआवा" एवमादि.

नियम सूत्राचें लक्षण:—जिये विचार सूत्रीं 'करी,' 'करवी,' 'करिति,' 'बोले,' 'देति,' 'घे,' 'ने, 'आनी,' 'असे,' 'मैळे,' 'उजळे,' 'अवतरे' एवमादि क्रियापदें करौनि वस्तुनियम, वस्तुस्वरूपानियम, वस्तुकारणानियम, वस्तुकार्यनियम, कीजे तियें नियम सूत्रें भणिजेति.

वस्तुनियम यथा:—" अपमृत्यु एकु आति. "

वस्तुस्वरूप नियम यथा:—" स्त्रियाचा स्वरूपीं आग्रहो एकु आति. "

वस्तुकारण नियम यथा:—" अनंतशक्ति परमेश्वर सकळांसि ही विषयव्यवस्था करीति ".

वस्तुकार्यनियम यथा:—" अयोग्यासि योग्य करीति योग्यासि परमेश्वर ज्ञानु देति. "

अतिदेश सूत्राचें लक्षण. जेथ दृष्टान्त प्रधानु असे तें अतिदेश सूत्र भणिजे. यथा:—" त्यागु जैसा खेइ गोइचा," "वैराग्य जैसा भर्तृहरीचा," "जैसा तुह्मां श्वानसूकराचा विखो तैसा इंद्रादिकां तुमचा," "उद्धरण तें मनुष्यावतारींचि आति परि तेथिचा विशेष परद्दश्यत्वीं प्राप्त करणें आति जैसा आंतुलाचा." एवमादि जेतुले ही चाकारान्त दृष्टांत सूत्रें तियें सर्व ही अतिदेश सूत्रें जानावी.

अपवाद सूत्राचें लक्षण. एकाची निंदा आन एकाची प्रशंसा जिये सूत्रीं असे तें अपवाद सूत्र बोलिजे. यथा:—" ॐ लेआ पासि कोरज चांगु," "देवासि पाढिअे तेआ पासि देव पाढिअे ते नीके" "ज्ञाना पासि प्रेम उत्तम" "राजसा पासि तामसु ॐ खटा" एवमादि पंचमी विभक्तिचेनि योगें अपवादसूत्रें जानिजेति.

विभाषा सूत्राचें लक्षणः—" जेथ अंती संबोधन, द्वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, कां अव्यये असति, तिये विभाषा सूत्रें जानिजेति.

अनुक्रमेचि उदाहरणें:—

" अग्निचेनि संबंधें वातश्लेष्मा न बधिति की गा मंडळी का ! "

" एके रोमेचा ठाई सहस्र विंचवाची वेदना ते दुःख देहांती जीवांसी "

" एथीचें तें सकळ ही एथचि आचि प्रवृत्ति "

" त्र्यंश हे निरोपावे आ दोषें भणिजतु असीजे ते सकळाचे ज्ञान हो आवे आं. "

" ईश्वरापासौनि विद्या होए कां विद्यावंतापासौनि. "

" जीवेश्वरां स्वामिभृत्य संबंधु हा अनादिचा "

" जेंचि मान ब्रह्मांडीं तेंचि पिण्डीं "

" हा गा हें तुह्मां विषयत्व लागौनि ठाकले मा "

निपात सूत्राचें लक्षणः—

जे आ वांचौनि जें अनुपपन्न आति ते आची अनुपपत्ति वारावेआ जेथ पदाचा कां वाक्याचा निपतन होत असे ते आते निपात सूत्र बोलिजे. तेंचि निपात कर्तृपद असौनि क्रियापदाचा अभावीं कां दृष्टान्त असौनि दार्ष्टान्तिकाचा अभावीं जानिजे. " कृतयुगीं आत्मोपास्ति हा धर्म. " एथ ' धर्म ' हे कर्तृपद असे, परि 'असे' या क्रियापदाचा अभाव जानिजे.

" ताळिचील हानितले आ वरचील पडे उतरुंडी गडवडी " एथ दृष्टान्त असे परि दार्ष्टांतिक नसे.

प्रतिषेध सूत्राचें लक्षणः—आचारसूत्र व्यातिरिक्त 'नाहीं,' 'नव्हे,' ' नेविजे, ' ' न पविजे, ' 'न मिळे,' ' न होति. ' एवमादि निषेधज्ञापक क्रियापदें जेथ असति तियें प्रतिषेध सूत्रें बोलिजेति. " कलियुगीं विद्यावन्तु नाहीं" "शेषशायी देवता होए परि परमेश्वरु नव्हे" " ने निजे श्री प्रभुची लीळा " चहुयुगीचा धर्मीं प्ररमेश्वरु नेनिजे न पविजे " एवमादि प्रतिषेध सूत्रांचीं उदाहरणें जानिजेति.

अधिकार सूत्राचें लक्षण:—जिये प्रथम सूत्रींचे आधिकृत पद द्वितीय सूत्राचे आं अर्थालागी संबंधिजे ते अधिकारसूत्र बोलिजे. यथा:—" नित्य व्यापक परमेश्वरु " हें प्रथम सूत्र, आन 'अप्रमेयु' हें द्वितीय सूत्र, प्रथम सूत्रीं असलेले आ ' परमेश्वर ' या अधिकृत पदाचा संबंध द्वितीय सूत्रासि असे, भणौनि " नित्य व्यापक परमेश्वरु " हें अधिकार सूत्र जानिजे.

परमेश्वरें श्री चक्रधरें द्वादश प्रकरण सूत्रें तथा इतरें ही प्रकरण वशें वेगळाली निरोपिली असति. ते आ माजी एकाचे आ अंतीं क्रियापदें असति, कवनांचे आ अंती सप्त विभक्त्यंत पदें असति, कवनांचे आ अंतीं अव्यये असति ऐसि त्रिविध सूत्र प्रकृति असे. इये त्रिविधा सूत्र प्रकृति, माजी दशविध सूत्र प्रकृति भेदें सकळें ही सिद्धांत सूत्रें जानावी. मग ते आ माजी विधिसूत्रें प्रतिषेध सूत्रें नियम सूत्रें सर्वत्र क्रियापदें करौनि युक्त असति.

परिभाषा सूत्रां चिआ तथा निपात सूत्रांचिआ अंतीं तथा अधिकार सूत्रांचिआ अंतीं काचित् क्रियापद असे आन काचित् प्रथमा असे.

संज्ञा सूत्रांचिआ तथा अपवाद सूत्रांचिआ अंतीं सर्वत्र प्रथमा असे.

अतिदेश सूत्रांचिआ अंतीं सर्वत्र षष्ठी असे.

विभाषा सूत्रांचिआ अंतीं काचित् अव्यये आन काचित् संबोधनीं एकवचन; आन प्रथमा वर्जौनि सकळा विभक्तिआ असति. जेथ संबोधनीं वहुवचन दिसत असे ते गौरवा वाचक जानिजे.

एवं सूत्रप्रकृति लक्षण.

# ३. सूत्रकारक लक्षण.

आतां सूत्रकारक निरोपिजताए.

सूत्रांचे आ अर्थाचा निर्णयोऽ कारका वाचौनि न होवेचि भणौनि सूत्रकारकाचे ज्ञान हो आवेचि लागे। केवी जे श्री नागदेवाचार्यें भणितलें " अगा केशवद्या ! हे शास्त्र वचनरूप परमेश्वरु ते वचन जै अन्यथा वाखानिजे तरी तेआ वचनरूपा परमेश्वराचा वाखानिता पातित होए: तेनें पुरुषें तो परमेश्वरु दुःखविला गा: या तंव व्याकरण ज्ञाने करौनि सूत्रकाराचा निर्धारु यथा तथ्य जानिजे: तै वचनाचा यथार्थ अर्थ उमटे: हे जै नसे: तै नुमटेचीः हे जे आ नसे ते आ ' वाकमदीघमा 'ची परि होए "$

विभक्तिया सात असाति. ( १ ) प्रथमा, ( २ ) द्वितीया, ( ३ ) तृतीया, ( ४ ) चतुर्थी, ( ५ ) पंचमी, ( ६ ) षष्ठी, ( ७ ) सप्तमी.

प्रथमाः— उक्त * कर्त्रीं प्रथमा विभक्ति वर्ते. यथाः—

" माया जीवांते विकरे—"

उक्त कर्मीं प्रथमा विभक्ति वर्ते यथाः—" परमेश्वरें परमेश्वर पाविजे. "

संबोधनीं प्रथमा विभक्ति वर्ते. यथाः—" देमाति ! परमेश्वर कृपाळु असे परि जीवें कृपेसि पात्र हो आवे की "

द्वितीयाः—अनुक्त कर्मीं द्वितीया विभक्ति वर्ते. यथाः— " मग जीव प्रपंचाते रचीति "

अत्यंत संयोगी द्वितीया वर्ते. यथाः—" कृतयुगीं लक्षभर आयष्य. "

---

ऽ निर्णयो त्रिविध (१) शब्दाख्य, (२) संप्रदायाख्य, (३) रहस्याख्य. शब्दाख्य निर्णयो व्याकरणें, अभिधानें आन अलंकार शास्त्रें जानिजे. संप्रदायाख्य निर्णयो अधिकरण मुखें, श्रवण मनन, विजाध्यासनें करौनि जानिजे. रहस्याख्य निर्णयो सद्गुरुमुखें परासिद्धान्त सूत्रें जानिजे.

$ ही वाकम—दिगमाची गोष्ट ग्रंथाच्या शेवटीं दिली आहे.

* 'कर्तरि' प्रयोगीं कर्ता उक्त आन कर्म अनुक्त जानिजे; 'कर्मणि' प्रयोगीं कर्म उक्त आन कर्ता अनुक्त जानिजे; भावे प्रयोगीं कर्ता अनुक्त आन कर्माचा अभाव जानिजे.

प्रतिशब्द योगीं द्वितीया वर्ते. यथाः—" हें शास्त्र दृष्टां प्रति कारणु होए कां अदृष्टां प्राति कारणु होए. "

तृतीयाः—अनुक्त कर्त्रीं आन साधनीं तृतीया विभक्ति वर्ते.
यथाः—" तेनें लाविले " एथ कर्त्रीं तृतीया; आन " आत्मज्ञानें मोक्ष " एथ साधनीं तृतीया.
सहार्थक शब्दयोगीं तृतीया विभक्ति वर्ते. यथाः— " मा विश्वाचा पाति तेनेंसि धरणें मांडिले असे "
विनु अर्थक शब्दयोगीं तृतीया विभक्ति वर्तेः—" ज्ञानें विनु वैराग्य कांई करावे बापे आ ! "

चतुर्थीः—संप्रदानीं चतुर्थी विभक्ति वर्ते. यथाः—" ज्ञानियासि मोक्ष देती. "
प्रयोजनीं चतुर्थी विभक्ति वर्ते. यथाः—" परमेश्वरालागी रंका होआवे "

पंचमीः–अपादानीं पंचमी विभक्ति वर्ते.
यथाः—" ईश्वरापासौनि विद्या होए कां विद्यावंता पासौनि. "

षष्ठीः—संबंधीं षष्ठी वर्ते. यथाः—"कवाडांचा देऊळीं न बैसावे" " आप्ताचे वाक्य लागे "
माजी आन मध्यें शब्दयोगीं 'षष्ठी' विभक्ति वर्ते. यथाः– " ते आ माजी रीगे " " बहुता मध्ये जे आची विशेष प्रतीति. "

सप्तमीः—अधिकरणीं सप्तमी वर्ते. यथाः—" ईश्वरीं संपूर्ण शक्ति जीवीं अंशतः शक्ति. "

आतां विभक्तियांचे प्रत्यय सांगता असीजे.

प्रथमा विभक्तिचे कवनी प्रत्यय नसौनि केवळ तत्तच्छब्द मात्राचे आ प्रयोगीं ' प्रथमा असे' ऐसे जानिजे. यथाः—' जीव, ' 'देवता,' ' प्रपंच, ' ' परमेश्वरु, ' एवमादि.

ते, सि, आं, इये प्रत्यये जे आ शब्दाचे आ अंती असाति ते आ शब्दाची द्वितीया विभक्ति जानावी. यथाः—" मग जीव प्रपंचाते रचीति, " " अयोग्यासी योग्य करिती, " " तुम्हां शयनासनीं

भोजनीं परमेश्वर हो आवा की गा'' कचित् प्रत्यय लोपी * ही द्वितीया जानावी. यथाः—" परमेश्वर प्रवृत्ति माया सृष्टि संहारु करी. "

एं, करौनि, नि, इये प्रत्यये जे आ शब्दाचे आ अंती असाति त आ शब्दाची तृतीया विभक्ति जानावी.

यथाः—" देवें करावें तें केलें पुरुषें करावें तें ठेलें, " अज्ञान छेदे करौनि अन्यथा ज्ञानु त्रुटि होए " "जीतेनि मृताचा धर्मी वर्तावे".

कचित् प्रत्ययलोपींहि तृतीया जानावी यथाः—" परमेश्वर प्रवृत्ति माया सृष्टि संहार करी " " कर्मवशें जीव सकल हि पावे एक वांचौनि".

सि, कारणें, लागी, आं, इये प्रत्यये जे आ शब्दाचे आ अंतीं असाति ते आ शब्दाची चतुर्थी विभक्ति जानावी. यथाः—"योग्यासि परमेश्वरु, ज्ञानु देती " " ईश्वराची आज्ञा ते ईश्वराचि कारणें भंगैली की" " परमेश्वरालागी काळ, कुळ, लोकु इये तीनि आंगवावी" " ऐसिया मायापुराते स्वीकरौनि कर्मभूमिस्थितां मनुष्यदेहयुक्तां जीवां ज्ञान पर्यन्त आपुला संबंधु देति. "

कचित् प्रत्ययलोपींही चतुर्थी जानावी. यथाः—" महीळिये जन्मु दीहले "—

पासौनि, पासाव, स्तव, तव, पसि, कडौनि, हौनि, एवमादि प्रत्यये जे आ शब्दाचे आ अंती असाति ते आ शब्दाची पंचमी विभक्ति जानावी. यथाः—" चंद्रसूर्या पासौनि आनव " " सुरा पासाव मानवे चांगु बहुते " " धर्मास्तव चैतन्य प्राप्तिफळ " " प्रसाद सेवेतव पुरुप धर्मी दक्षी होए " " ३० ले आ पासि कोरडा चांगु " " तुमचे आ कडौनि तुम्हां कांई न हो आवे " एवमादि उदाहरणें जानिजेति.

चा, ची, चें, सि इये प्रत्यये जे आ शब्दाचे आ अंतीं असाति ते आ शब्दाची षष्ठी विभक्ति जानावी. यथाः—" परमेश्वराचा सकळही व्यापार तो शक्तिद्वारेंचि, " " माया परमेश्वराची प्रवृत्ति

---

*परमेश्वर शास्त्रीं अनेकीं स्थळीं लुप्तप्रत्ययात्मक शब्दांचिअे प्रयोगें असाति.

३० ळगे, " " ईश्वरीचें तें सकळही नित्य, " " अनंतशाक्ति परमेश्वर सकळासि विषय व्यवस्था करीति."

क्वचित् प्रत्ययलोपींही षष्ठी विभक्ति जानिजे. यथा:—" प्रारब्धां भोगें क्षयो."

ई हा प्रत्यय जे आ शब्दाचे आ अंतीं असति ते आ शब्दाची सप्तमी विभक्ति जानावी. यथा:—" दयामाया कृपा करुणा हे ईश्वरींचि आति."

क्वचित् प्रत्यय लोपीं ही सप्तमी विभक्ति जानावी. यथा:— " हाळि आं पाळि आं असावें."

सातां असतां इये शब्दे जेथ असति तेथ ' सति सप्तमी ' जानिजे. यथा:—"ऐसा विखो बापुडा जो सेवित सातां आपुलिया मोहरा न करी."

एवं सूत्रकारक.

---

# ४. सूत्रव्याख्यान लक्षण.

आतां सूत्र व्याख्यान लक्षण सांगता असीजे.

जेथ पदच्छेद, पदार्थोक्ति, विग्रहो, वाक्ययोजना, आक्षेप कां समाधान इये सा प्रकारें सूत्राचा अर्थ प्रकाशित होत असे, ते आते सूत्र व्याख्यान भणिजे. तियोचे सा प्रकारे एकीं श्लोकीं गोविलीं असति.

" पदच्छेदः पदार्थोक्तिर्विग्रहो वाक्ययोजना ।
आक्षेपश्च समाधानं व्याख्यानं षड्विधं मतम् ॥ "

जेथ केवळ, संयुक्त, अव्यय, क्रिया, या चौपदाचा विभागु कीजे आन विभक्तिचाहि निर्देश कीजे, ते आते पदच्छेद बोलिजे. यथा:— " मग जीव प्रपंचाते रचीति " एथ ' मग ' हें अव्ययपद, 'जीव' हें प्रथमान्त केवलपद, ' प्रपंचाते ' हें द्वितीयान्त संयुक्तपद, 'रचीति' हें क्रियापद जानिजे.

जेथ प्रत्येक पदाचे आ अर्थाची उक्ति असे, ते आते पदार्थोक्ति

बोलिजे. यथा:—" माया कार्य जीवु जीवकार्य प्रपंचु " एथ मायेचे कार्य सकळजीव आन जीवांचे कार्य त्रिगुणात्मक पंचभौतिक प्रपंच हे पदार्थोक्ति जानिजे.

कार्य, वासुदेव, जीवप्रपंचु, जिज्ञासा, एवमादि शब्दांचे आ 'करनेआसि योग्य ते कार्य,' 'वसुदेवाचा पुत्र तो वासुदेव,' 'जीव आन प्रपंचु ते जीवप्रपंचु,' 'जानावे आचि इच्छा ती जिज्ञासा,' एवमादि अर्थाचिये अवबोधके जिये वाक्यें ते आंते विग्रह भणिजे.

वाक्य योजनेचे दोनि प्रकार असाति. (१) खंडान्वयो, (२) दंडान्वयो. 'सूत्र संबंध काळीं आदौ कर्ता, मग कर्म, मग क्रिया, मग तेआची विशेषणें, आन करणादि उपपदें आन यथोचित स्थानीं अव्यये मेळविजे याते खंडान्वयो भणिजे. यथा:—" ऐसिया मायापुराते स्वीकरौनि कर्मभूमिस्थितां मनुष्यदेहयुक्तां जीवां ज्ञान पर्यंत आपुला संबंधु देति ". एथ कर्ता 'परमेश्वरु' अनुवर्तिजे, एवं 'परमेश्वरु संबंध देति' तरि कवनाचा संबंध देति? ना 'आपुला,' कवनांसि? ना 'जीवां, कैसिआ परिचे आ जीवां? ना 'मनुष्यदेहयुक्तां,' कव पर्यन्त? ना 'ज्ञानपर्यन्त', कांई करौनि? ना 'ऐसिया माया पुराते स्वीकरौनि'.

सूत्र संबंधकाळीं आदौ विशेपणयुक्त कर्ता, मग विशेषणयुक्त करणादि उपपदें, मग विशेषण युक्तचि कर्म, मग विशेषणयुक्ताचि क्रिया,आन यथोचित स्थानीं अव्यये मेळविज; याते दंडान्वयो भणिजे. यथा:—" एथिचे आसि प्राणापदींची पीडा नाहीं " एथ 'प्राणापदींची पीडा एथिचे आसि नाहीं' ऐसा अन्वयो लाविजे.

सूत्रीं तत्तत्पदाचें प्रयोजन पूसिजे याते आक्षेप भणिजे. यथा:— "यापरि परमेश्वरु श्रीचक्रधर सकळ जीवांते उद्धारिती" इये सूत्रीं 'परमेश्वरु' हे पद असतां पुन: 'श्रीचक्रधर' या पदाचे प्रयोजन कांई? हा आक्षेप असे.

सूत्रीं तत्पदाचें प्रयोजन दाखविजे, याते समाधान बोलिजे. यथा:— "यापरि परमेश्वरु श्रीचक्रधर सकळ जीवांते उद्धारिती" इये सूत्रीं 'श्रीचक्रधर' एनें पदें व्यक्तिमंत सुचविला असे. हे पद जरि नसे,

तरि केवळ ‘ एरमेश्वरु ’ एनें पदें अव्यक्ताचि लाभता आन अव्यक्तीं तरि उद्धरण नाहीं. मग ‘ यापरि श्रीचक्रधर सकळ जीवांते उद्धरिती’ ऐसेचि कां नसावे पा ? ना–जो श्रीचक्रधर जीवांते उद्धरी तो कवन पदार्थ ? ना–परमेश्वरु या लागी. ‘ परमेश्वरु ’ या पदाचे प्रयोजन असे, भणौनि दोनी पदें एथ सार्थकेचि जानावी.

सूत्र व्याख्यान काळीं आदौ पदच्छेद, मग विग्रहो, मग वाक्य-योजना, मग पदार्थोक्ति, मग आक्षेप, मग समाधान कीजे.

आतां एकींचि सूत्रीं सा प्रकार दाखविजताए:—“ परमेश्वर प्रवृत्ति माया व्यापारवशें अविद्यात्मक जीव ‘ चैतन्यमहं ’ ऐसे घेऔनि उठीति ” इये सूत्रीं आदौ पदच्छेद कीजताए तेचि ऐसे:— ‘ परमेश्वर प्रवृत्ति ’ हें लुप्त तृतीयान्त संयुक्तपद, ‘ माया व्यापार वशें हे तृतीयान्त संयुक्तपद, ‘ अविद्यात्मक ’ हे विशेषणात्मक संयुक्तपद, ‘ जीव ’ हे प्रथमान्त केवळपद, ‘ चैतन्यमहं ’ ही द्विपदी संस्कृत असे, इये दोनि पदें प्रथमान्त केवळ पदें असति. ऐसे हें अव्यय पद असे, ‘ घेऔनि ’ हें अव्ययपद, ‘ उठीति ’ हें क्रियापद असे.

आतां विग्रहो कीजताए:—“ परमेश्वराची प्रवृत्ति परमेश्वर-प्रवृत्ति, ” ‘ मायेचे आ व्यापाराचे आवशें मायाव्यापारवशें, ’ ‘ अविद्या असे आत्मा जेआंचा ते अविद्यात्मक. ’

आतां खंडान्वयें वाक्य योजना कीजताए:—

‘ जीव उठीति ’ कांई करौनि ? ना—‘ चैतन्यमहं ’, ऐसे घेऔनि कैसे आ परिचे जीव ? ना–‘ अविद्यात्मक, ’ कवनाचे आ वशें ? ना—‘ मा व्यापार वशें, ’ तरि माया व्यापारासि कां प्रवर्तैली ? ना—‘परमेश्वर प्रवृत्ति.’

आतां दण्डान्वयें वाक्य योजना कीजताए:—

अविद्यात्मक जीव परमेश्वर प्रवृत्ति माया व्यापारवशें ‘ चैतन्यमहं ’ ऐसे घेऔनि उठीति.

आतां पदार्थोक्ति सांगिजताए:—

अविद्या असे आत्मा जेआंचा ऐसे जे जीव ते परमेश्वराचे आ प्रवृत्तीसि अधीन होऔनि व्यापारासि प्रवर्तैलि जी माया तियेचे आ

व्यापारासि वश होऔनि 'चैतन्य ते मी' ऐसे आ अहंभावेसि सावधा होति.

आतां आक्षेप आन समाधान कीजताए:—

सूत्रीं 'अविद्यात्मक' या पदाचे प्रयोजन तें कांई ? ना अविद्यात्मक एनें पदें मुक्तिचे जीव निराकारिले असति, का जे ? मुक्तिचे आ जीवांचा ठाई अविद्या नसे, भणौनि 'अविद्यात्मक' हें पद सार्थक जानिजे.

एवं सूत्र व्याख्यान लक्षण.

---

## ५. सूत्रस्वरूप लक्षण.

आतां सूत्रस्वरूप लक्षण सांगिजताए:—

जेथ वत्तीस लक्षणें करौनि सूत्रांचे भाव प्रकाशित होत असे, वे आते 'सूत्रस्वरूप' ऐसे भणिजे.

तिये बत्तीस लक्षणें उद्देशमात्रें ऐसे जानिजे:—(१) प्रतिज्ञा, (२) प्रमाण, (३) दृष्टान्त, (४) उपपात्ति, (५) व्याप्ति, (६) विषयप्रदान, (७) विशेषप्रबोधक, (८) उत्सर्ग, (९) अपवाद, (१०) निषेध, (११) न्याय, (१२) विरोध-परिहार, (१३) काकु, (१४) कक्षा, (१५) भावार्थ, (१६) प्रकरण, (१७) अस्तित्व, (१८) निर्देश, (१९) निर्णयो, (२०) पक्ष, (२१) प्रभेद, (२२) आशंका, (२३) आक्षेप, (२४) कार्य, (२५) लक्षण, (२६) स्वरूप, (२७) कारण, (२८) हेतु, (२९) संबंध, (३०) प्रतीति, (३१) विशेषण, (३२) प्रतिष्ठा.

आतां अनुक्रमेंचि तेआंची लक्षणें आन उदाहरणें सांगता असीजे.

प्रतिज्ञाः—फलश्रुति ज्ञापक वाक्याते प्रतिज्ञा सूत्र बोलिजे. यथाः— "विकार विकल्प शून्य.....जो जन्म क्षेपी ते आसि परमेश्वर पुनरपि आपुला संबंध देती" एथ 'अनुसरले आ आचारवंतासि जन्म

क्षपले आ नंतरे परमेश्वर पुनरपि आपुला संबंध देति ' ही फलश्रुति असे भणौनि याते प्रतिज्ञासूत्र जानिजे.

प्रमाणः—जेनें दृष्टादृष्ट अर्थाचे अनुभव ज्ञान होए ते आते प्रमाण सूत्र भणिजे. तेचि प्रमाण आप्त वाक्य जानिजे. आप्त वाक्य ते श्रुति. यथाः—" विकार हा इंद्रियधर्म विकल्प हा मनोधर्म, " "श्रीकृष्णीं अष्टविध ब्रह्मचर्य " इये सूत्रद्वयीं दृष्टा तथा अदृष्टा अर्थाचा अनुभव ज्ञात होत असे भणौनि याते प्रमाणसूत्रें जानावी.

दृष्टान्तः—जेथ दृष्टे करौनि अदृष्टार्थ बुझाविजे ते आते दृष्टान्त सूत्र बोलिजे. यथाः—" गांवां एकां हस्ती आलाः ते आते जात्यंधे पाहो आलेः एकें पाओ देखिलाः एकें सोंड देखिलीः एकें कानु देखिलाः एकें पाठ देखिलीः एकें पोटु देखिलेंः एकें पूस देखिलीः मग ते एकमेकां संवादितिः अरे तुआं हस्ती देखिलाः जेनें पाओ देखिला तो भणे हस्ती खांबा सारिखाः जेनें सोंड देखिली तो भणे हस्ती मुसळासारिखाः जेनें कानु देखिला तो भणे हस्ती सूपा सारिखा; जेनें पाट देखिली तो भणे हस्ती भीति सारिखाः जेनें पोटु देखिला तो भणे हस्ती कोथळेया सारिखाः जेनें पूस देखिली तो भणे हस्ती खराटेआ सारिखाः ऐसे एकमेकांते उरोधितिः तेआ मध्यें एकु डोळसु असे तो भणे हस्तीचा हा एकु एकु अवयवु होएः परि हस्ती नोहेः ऐसा सर्वावयवी युक्त तो हस्तीः तैसे जे आसि जी शक्ति प्रकाशिळी असे, तो तिये शक्तिते परमेश्वरु भणेः ज्ञानिया असे तो भणे ही ईश्वराची एक एक शक्ति होएः परि परमेश्वरु नोहेः ऐसा सर्वशक्तियुक्त तो परमेश्वरुः " एथ हस्तीचेनि अर्थें परमेश्वरार्थ प्रकाशिला असे भणौनि याते दृष्टान्त सूत्र जानिजे.

उपपत्तिः—संतासंत क्रियेचें फलवाक्य ते उपपत्ति सूत्र भणिजे. यथाः—" पापाय फल दुःख पुण्याय फल सुख " एथ संतासंत क्रियेचें फल बोलिलें असे भणौनि याते उपपत्ति सूत्र जानिजे.

व्यावृत्तिः—यथार्थ ज्ञानें करौनि सामान्य पदार्थीं विशेष बुद्धिचा तिरस्कारु असे जिये सूत्रीं तआते व्यावृत्ति सूत्र भणिजे. यथाः—" चैतन्य देवता होए परि परमेश्वरु नोहे " इये सूत्रीं चैतन्यरूप

सामान्य पदार्थी परमेश्वररूप विशेष बुद्धिचा तिरस्कारु असे भणौनि याते व्यावृत्ति सूत्र भणिजे.

विषयप्रदान:—पदार्थ निर्वचनीं परमेश्वर शास्त्रे करौनि जेथ सार निवडीजे ते आते विषयप्रदान सूत्र भणिजे. यथा:—"एकाते प्रपंच परिणामु बोलिजे, एकाते विवर्तु बोलिजे, एथ तैसे नोहे: प्रपंच भणजे स्वतंत्र पदार्थु एकु आति–" इये सूत्रीं 'प्रपंचु स्वतन्त्र पदार्थु असे.' ऐसे सार निवडिलें, भणौनि याते विषय प्रदान सूत्र बोलिजे.

विशेष प्रबोधक:—आचारीं अनेक विधि ❀ प्राप्त जाहलेया कवन कीजे आन कवन न कीजे या विभागाचा जेथ विशेषत्वें ज्ञान होए तेआते विशेष प्रबोधक सूत्र भणिजे. यथा:—"अल्पें अनिष्टें बहुतें अनिष्टें परिहरिजेति तरि परिहरिजे." या सूत्राते विशेष प्रबोधक ऐसे जानिजे —कां पा ? ना–" परमेश्वरभक्तिपरायणासि अशक्त दशा प्राप्त जाहलेया तेआचिये शुश्रूषे लागी अनुसरला पुरुष प्रवर्तैला. मग तेआचिए औषधि लागी एके वनस्पतिची पानें तोडावी लागैली तरि ऐसिआ काळीं " हिंसा न करावी " आन " आपुलेआ पडले-आची शुश्रूषा कीजे " इये दोनि विधि प्राप्त जाहलेआ तरि पुरुषें कांई करावें पा ? ना–" अल्पें अनिष्टें बहुतें अनिष्टें परिहरिजेति तरि परिहरिजे " इये सूत्रे करौनि " आपुलेआ पडलेआची शुश्रूषा कीजे" या सूत्राचा विशेषत्व जाणौनि अल्पमात्र हिंसेसि टेकावे.

उत्सर्ग:—जेआ सूत्रांतरे करौनि अर्थमात्राचे उच्छेदन कीजे तेआते उत्सर्गसूत्र बोलिजे. "धर्म नष्टु आति परि विषय नष्टु नाति" याते उत्सर्गसूत्र जानिजे का पा ? ना–" एथ अनुसरे तेतुका वांचे " या सूत्राचे आ अर्थाचे उच्छेदन " धर्म नष्टु आति परि विषय नष्टु नाति " या सूत्रें करौनि होत असे.

अपवाद:—उत्सर्गाचा निन्दे करौनि निषेध कीजे तो अपवाद, अपवादें व्याप्त तें अपवाद सूत्र. " अनंतें उद्धरिलें " याते अपवाद सूत्र जानिजे. कां पा ? ना–" धर्मनष्टु आति परि विषय नष्टु नाति " हे उत्सर्ग सूत्र बाहुल्याभिप्रायें. कां पा ? हें जरि नव्हे तरि 'अनंते

❀ विधि द्विधा=(१) ( विधिरूप विधि ), २ (निषेधरूप विधि.)

उद्धरिलें ' हें कैसे ? एवं विषय नष्ट बाहुल्ये नाहींति तोकडे असति, केवी जे " विरळा नांदे " ऐसे सर्वज्ञें भणितलें.

निषेधः—कवने काळीं जो अर्थ सेव्य नव्हे तेआचा जेथ तिरस्कारु तेआते निषेधसूत्र भाणिजे. यथाः—"विकारविखो न सेवावा " विकारविखो कवनीं ही काळीं सेव्य नव्हे. तेआचा एथ तिरस्कारु असे, भणौनि याते निषेधसूत्र जानिजे.

न्यायः—जियें सूत्रें करौनि अनुक्तार्थाची सिद्धि होए तेआते न्याय सूत्र भणिजे. यथाः—'एथिचे आसि प्राणापदीची पीडा नाहीं' एथ ' अंतीचे दुःख सकळ फळीं आति ' या अनुक्तार्थाची सिद्धि होत असे, भणौनि याते न्यायसूत्र जानिजे.

विरोधपरिहारः—कवनी एकी काळीं करणीय तें अकरणीय होए आन अकरणीय तें करणीय होए एनें परिहारें व्याप्त तें विरोधपरिहार सूत्र बोलिजे. यथाः—" सेवकासि अविधि नाहीं " एथ सेवेचेनि योगें श्रीमूर्तिसि हात पाओ लागे, नखें फेडितां क्षौरु करितां खेदु होए तेने अवज्ञा घडे, ते अकरणीय, परि सेवेचेनि अंगीकारें तें करणीय ऐसे जानावे. कां पा ? ना–" सेवकासि अविधि नाहीं " ऐसें सर्वज्ञें भणितलें.

काकुः—शब्दाचेनि उत्कर्षे मुख्यार्थाते त्यजौनि अन्यथा करना लागी जे उक्ति उच्चारिजे तेआते काकुसूत्र बोलिजे. यथाः—" ऐसा विखो बापुडा जो सेवित सातां आपुलिआ मोहरा न करी " एथ मोहरा न करी ? ना–'मोहरा करी' अन्यथा करण असे भणौनि याते काकुसूत्र जानिजे.

कक्षाः—जेथ आना पदार्थासि आने शब्दें गूढ हेतु आळविजे तेआते कक्षासूत्र भणिजे. यथाः—सामान्य स्त्रियांते पाहौनि भणिजे 'मानसें आली' एथ 'इया अतिनीच बाईया' ऐसे गूढ हेतु करौनि सामान्य स्त्रियांसि मानसें भणितली.

भावार्थः—जियें सूत्रीं जो जैसा शब्द असे तेआचा तैसाचि अर्थ जानिजे तेआते भावार्थ सूत्र भणिजे. यथाः—"चातुर्वर्ण्यें चरेद्भैक्ष्यम्" एथ शब्दानुसारी अर्थ जानिजे.

प्रकरण:—जिये सूत्रीं प्रसंगवशें अनेकार्थक शब्दाचा एकार्थ होत असे तेआते प्रकरण सूत्र भणिजे. यथा:—अस्तिपर प्रकरणीं "देवता स्मरणें" ऐसें भणितलें. इये सूत्रीं प्रकरणवशें देवता शब्दें परमेश्वरु जानिजे.

अस्तित्व:—जिये सूत्रीं 'आति' एवमादिके क्रियापदे करौनि वस्तु निर्धारिजे तेआते अस्तित्व सूत्र भणिजे. यथा:—"सच्चिदानंद स्वरूप परमेश्वरु एकु आति" एथ परमेश्वराचे अस्तित्व निर्धारिले असे भणौनि याते अस्तित्व सूत्र जानिजे.

निर्देश:—जिये पदार्थी जो जैसा भेद असे तो तैसाचि जेथ निर्वर्चीजे तेआते निर्देशसूत्र भणिजे. यथा:–"देवता एकी ऊचा एकी नीचा पैल आठ ऐल तीनि समानचि" एथ देवतांचे यथार्थ भेद सांगितले असति भणौनि याते निर्देश सूत्र जानिजे.

निर्णयो:—जिये सूत्रीं हीनाचेआ व्यावृत्ति ऊचाचा निर्धारु असे तेआते निर्णय सूत्र भणिजे. यथा:–"चैतन्या पर परमेश्वरु" एथ हीनाचे आ व्यावृत्ति ऊचाचा निर्धारु केला असे भणौनि याते निर्णय-सूत्र जानिजे.

पक्ष:—जिये सूत्रीं एका शब्दाचे अनेकार्थ होताति तेआते पक्ष-सूत्र भणिजे. यथा:–"आत्मज्ञानें मोक्ष" एथ आत्म शब्दाचे आन मोक्ष शब्दाचे अनेकार्थ असति भणौनि याते पक्ष सूत्र जानिजे.

प्रभेद:—जिये सूत्रीं परस्पर वैजात्य वस्तूंचा निर्वच कीजे तेआते प्रभेद सूत्र भणिजे. यथा:—"जीवजीवां साजात्य हे सकळां वैजात्य" एथ परस्पर वैजात्य वस्तूंचा निर्वच असे भणौनि याते प्रभेद सूत्र जानिजे.

आशंका:—जिये सूत्रीं विरोध कल्पना उदैजे तेआते आशंका सूत्र भणिजे. यथा:—"दर्शनीं अदर्शन" एथ विरोधकल्पना होत असे भणौनि याते आशंका सूत्र जानिजे.

आक्षेप:—जिये सूत्रीं आक्षेप केला असे ते आते आक्षेप सूत्र भणिजे. यथा:–"अन्यत्र कीजे ते वाराणसी फेडिजे.वाराणसी कीजे ते के फेडावे नायका ?" एथ आक्षेप केला असे भणौनि याते आक्षेप सूत्र जानिजे.

कार्य:—जेथ कार्याचें निरोपण असे तेआतें कार्यसूत्र भणिजे. यथा:—"जीव अर्जक देवता फलदाती चैतन्य व्यापारतें परमेश्वरु उद्धरिता" एथ कार्याचें निरोपण असे भणौनि यातें कार्यसूत्र जानिजे.

लक्षण:—नित्यानित्य पदार्थांचें असाधारणत्व जियें सूत्रीं वर्णिलें असे तेआतें लक्षणसूत्र भणिजे. यथा:—"नित्यबद्धा देवता", "बद्धमुक्त जीव," नित्यमुक्त परमेश्वरु," "प्रपंच अनित्य," इयें सूत्रीं नित्यानित्य पदार्थांचें असाधारणत्व वर्णिलें असे, भणौनि यांतें लक्षण सूत्रें जानिजेति.

स्वरूप:—ज्ञान विज्ञानवंत स्वरूप जेथ वर्णिलें असे तेआतें स्वरूप सूत्र भणिजे. यथा:—"देवता स्वरूपें ज्ञातें आनंदरूपें" "आनंदें दुमदुमित असे" "ब्रह्म तें निःशब्द" इयें सूत्रीं ज्ञान विज्ञानवंत स्वरूप वर्णिलें असे. भणौनि त्यांतें स्वरूप सूत्रें जानिजेति.

कारण:—जेथ कारणाचें निरोपण असे तेआतें कारणसूत्र भणिजे. यथा:—"परमेश्वरापासौनि अनंतावतार" एथ कारणाचें निरोपण असे भणौनि यातें कारण सूत्र जानिजे.

हेतु:—जियें फलवाक्यीं फलाचेनि आवश्यकत्वें विधि कल्पिजे तेआतें हेतु सूत्र भणिजे. विधिकल्पना यथा:—" तळमळीत जन्मातें धाडी ते आसि परमेश्वरु आपुलें प्रेमु देति" एथ 'परमेश्वराचियें तळमळें जन्मातें धाडावें, ऐसा विधि कल्पिजे; निषेध कल्पना यथा:—"विखो अनंता तापां आश्रयो नरकासि हेतु' एथ विखो न सेवावा ऐसा निषेध कल्पिजे, भणौनि यांतें हेतुसूत्रें बोलिजेति.

संबंध:—मागिला सूत्राचा संबंध जेणें उपसंहार वाक्यें उद्धारिजे तेआतें संबंधसूत्र भणिजे. यथा:—"या परि मनुष्य पर्यन्त मेळे, " "ऐसा परमेश्वरु एकु आति" इयें सूत्रीं मागिला सूत्रांचा संबंध उद्धारिला असे भणौनि यांतें संबंध सूत्रें बोलिजेति.

प्रतीति:—' होए तें होए आन नव्हे तें नव्हे ' ऐसा जेणें यथार्थ निश्चयो होए तेआतें प्रतीति सूत्र भणिजे. यथा:—" कर्मभूमिचिआ देवता होति परि परमेश्वर न होति " एथ यथार्थ निश्चयो होत असे भणौनि यातें प्रतीति सूत्र जानिजे.

विशेषण:—जिये सूत्रीं विशेषणें करौनि अन्यसूत्रस्थित विशेष्य व्यापिजे तेआते विशेषणसूत्र भणिजे. यथा:—" आनंद तो " एवमादि विशेषण सूत्रें करौनि " ऐसा परमेश्वर एकु आति " इये सूत्रीं स्थित ' परमेश्वरु ' हें विशेष्यपद व्यापिलें असे भणौनि याते विशेषणसूत्र जानिजे.

प्रतिष्ठा:—जेनें आपुलेआ शास्त्राचा उत्कर्ष प्रतिष्ठिजे, ते आते प्रतिष्ठा सूत्र बोलिजे. यथा:—" हें अधृत शास्त्र कीं गा ". एथ शास्त्राचा उत्कर्ष प्रतिष्ठिला असे भणौनि याते प्रतिष्ठा सूत्र जानिजे.

एवं बत्तीस लक्षणांची संकलित उदाहरणें जानावी. याचि परि सकळ शास्त्रीं पंचवार्तिकें अनुवर्तवावी. तैचि ब्रह्मविद्येचि व्युत्पत्ति होए. एन्हवीं सूत्ररूप परमेश्वरु दुःखविने घडे. भणौनि पंचवार्तिकें गुरुमुखें अभ्यासावींचि लागे. तै संपूर्णत्व होए.

इति श्री परधर्म महामोक्षिकसाधने श्रीनागार्जुनोपदेशे उपाध्यायान्माय दीक्षित श्रीभीष्माचार्यविरचित पंचवार्तिक समाप्त.

# विभाग तिसरा.

## [ अ ] महाराष्ट्रीय प्रमुख व्याकरणकार व व्याकरणचर्चिक.

### ५. पंडित वैजनाथ नागपूरकर.

डॉ० केरी ह्यांनीं पंडित वैद्यनाथ किंवा वैजनाथ ह्यांच्या साह्यानें इ० स० १८०५ मध्यें मराठीचें व्याकरण लिहिलें, व त्यांच्याच साह्यानें मराठी भाषेचीं देवनागरी अक्षरें तयार करून तें व्याकरण छापण्यांत–आलें. अर्थात् डॉ० केरी ह्यांच्या व्याकरणाचे साहाय्यक म्हणून मराठीच्या व्याकरणाचे इतिहासांत यांच्याही चरित्राचा समावेश करणें ओघानेंच प्राप्त होतें. साताराचे कै० रावबहादुर **दत्तात्रय बळवंत पारसनीस** ह्यांनीं पुष्कळ परिश्रम करून ह्यांचें चरित्र संशोधिलें व नवयुगांत प्रसिद्ध केलें; त्यावरून तें येथें देण्यांत–येत–आहे.




पंडित **वैद्यनाथ** हे एक महाराष्ट्रीय गृहस्थ असून, नागपूरकर भोसल्यांच्या आश्रित जनांपैकीं पं० **वेणीरामपंत** ह्यांजकडे होते. हे मोठे संस्कृतज्ञ असून, हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल मार्किस ऑफ वेल्सली ह्यांनीं फोर्ट विल्यम कॉलेजमध्यें इ० स० १८०४ च्या सुमारास, त्यांस मराठी अध्यापकाची जागा दिली–होती. नागपूरकर भोंसले ह्यांचा संबंध बंगाल, बहार व ओरिसा प्रांतांशीं कशा प्रकारचा होता, हें इतिहासज्ञांस माहीतच आहे. याच नागपूरच्या मराठ्यांनीं कांहीं दिवस बंगाल्यांत फार मोठा दरारा उत्पन्न केला—

होता. ह्या नागपूरकरांचे शिवभट साठे नांवाचे एक सुभेदार बंगाल्यांत होते. मुर्शिदाबादच्या नबाबांस त्यांचा फार वचक होता. वेणीरामपंत, विश्वंभरपंत, राजारामपंत, वगैरे कित्येक वकीलही नागपूरकरांच्या राजकारणाच्या निमित्तानें बंगाल्यांत घुसले होते;व त्यांपैकीं कांहीं तर तेथें स्थायिकही राहिले.हे सर्व तिकडे '**पंडित**' ह्या नांवानें संबोधिले जातात. दक्षिणी महाराष्ट्रीय पंडितांमध्यें इंग्रजांचे कांहीं गुण आहेत; त्यांपैकीं परकीयांमध्यें घुसून, त्यांची भाषा वगैरे पैदा करून त्यांत प्रावीण्य संपादून,तेथील लोकांवर आपली छाप बसविणें हा एक होय. गुदस्तां वंगभाषेंतील सुप्रसिद्ध लेखक व ग्रंथकार म्हणून नांवाजलेले "हितवादी" पत्राचे संपादक पं० **देउसकर** कैलासवासी झाले; यांच्या उदाहरणावरूनही वरील विधानाची सत्यता पटेल असो. नागपूरकरांकडून बंगाल्यांत घुसलेल्या व तेथें राहिलेल्यांपैकीं पं० **वैद्यनाथ** होत, हें येथें सांगावयाचें आहे. ह्या महाराष्ट्र पंडिताच्या हाताखालीं पुष्कळ सुप्रसिद्ध युरोपियन गृहस्थ महाराष्ट्र भाषेंत पारंगत होऊन, प्रसिद्धीस आले.

पंडित **वैद्यनाथ** हे डॉ० **केरी** ह्यांचे सहाध्यापक असून, त्यांनीं मराठी भाषेचीं देवनागरी अक्षरें तयार करण्याच्या कामीं डॉ० केरी ह्यांस मदत केली. अर्थात् पं० वैद्यनाथ हे मराठी मुद्रणकलेच्या संशोधकांपैकीं एक होत. डॉ० केरी यांचें मराठी भाषेवर प्रेम जडून त्यांनीं १८०५ मध्यें मराठी भाषेचें व्याकरण व कोश हीं पंडित वैद्यनाथ ह्यांच्या मदतीनें तयार करविलीं; व बॅप्टिस्ट मिशन प्रेसमध्यें श्रीरामपूर येथें हे दोन्ही ग्रंथ छापून प्रसिद्ध केले. १८१४ मध्यें स्वतः पंडित वैद्यनाथ यांनीं " सिंहासन–बत्तिशी " हा मराठी ग्रंथ छापून प्रसिद्ध केला. तसेंच १८१६ मध्यें " राजा प्रतापादित्य ह्यांचें चरित्र " आणि नागपूरचे " रघूजी भोंसले ह्यांची वंशावळ " हे दोन ग्रंथही त्यांनींच प्रसिद्ध केले. ह्याच वर्षी " मराठी भाषेंतील अस्सल पत्रसंग्रह " म्हणून एक ग्रंथ पं० वैद्यनाथांच्याच मदतीनें **डॉ० केरी** ह्यांनीं प्रसिद्ध केला. १८०३ मध्यें " न्यू टेस्टॅमेंट " या ग्रंथाचें मराठी भाषांतर डॉ० केरी ह्यांनीं वैद्यनाथांच्याच मदतीनें केल्याचा उल्लेख आढळतो.

मराठींतील पहिला ग्रंथ कोणता व मराठी मुद्रणकलेचा जनक कोण हे प्रश्न अद्यापि वादग्रस्त आहेत; पण त्यांशीं प्रस्तुत कांहीं कर्तव्य नाहीं. युरोपांत १६७८ मध्यें लॅटिन भाषेंतील " मलबारांतील वनस्पति व फळें यांचें वर्णन " ह्या नांवाच्या पुस्तकांत मराठी भाषेंतील छापिलेला लेख सांपडतो. हिंदुस्थानांत

# मराठी भाषेंतील पहिला लेख.



मात्र युरोपियन मिशनरी लोकांनीं प्रथम मुद्रण–यंत्रें आणिली व ग्रंथ छापण्यास सुरुवात केली, ह्यांत शंका नाहीं; तथापि मराठी भाषेंतील छापण्याचे टाईप तयार करण्याची मूळ कल्पना काढण्याचें व ती अंमलांत आणण्याचें श्रेय एकट्या डॉ० केरीस व मराठीचें व्याकरण लिहिण्याचें श्रेय ह्या पंडित वैद्यनाथ यांसच डॉ०केरी यांजबरोबर देतां–येईल. मराठी मुद्रणाचा जन्म १८०५ मध्यें झाला; व वंगदेशांत श्रीरामपूर येथें प्रथमतः मराठी व्याकरण डॉ० केरी यांनीं छापिलें, हें खरें; तथापि याच सालचा परंतु याच्याही पूर्वीचा मराठी मुद्रणाचा प्रयत्न खुद्द महाराष्ट्रांत चालू होता, हें येथें ओघानें सांगावयास पाहिजे. पुण्यास **नाना फडनवीस** हे राजकारणकुशल होते, त्याचप्रमाणें ते विद्या,कलाकौशल्य, कृषि इत्यादिकांकडेही लक्ष घालीत; त्यांनीं पुण्याचे रेसिडेंट सर चार्लस मॅलेट यांच्या मदतीनें चित्रशाळा व शिल्पशाळा काढिली होती.ह्या शाळेंतून तयार झालेल्या एका तांबट विद्यार्थ्याकडून त्यांनीं मराठी अक्षरांचे खिळे तयार करवून, एक गीता–ग्रंथ छापण्याची कल्पना प्रथम मनांत आणिली त्यावेळीं हा ग्रंथ सुंदर अक्षरांनीं लिहून ब्राह्मणांस वाटण्याचा परिपाठ होता. परंतु १७९६ त **दुसरे बाजीराव** हे पेशवे झाल्यावर अस्वस्थता उत्पन्न झाली व ती योजना

तशीच राहिली. कारागीर दुसरीकडे गेले. गीतामुद्रा तयार करणारा कारागीर मात्र सुदैवानें मिरज येथें गेला; व **श्रीमंत गंगाधरराव गोविंद पटवर्धन** यांनीं त्यास आश्रय देऊन, महाराष्ट्रांतच पहिला छापील गीताग्रंथ १८०५ मध्यें निर्माण झाला; ह्या ग्रंथाची छापील पोथी व अस्सल ठसे अद्यापि श्रीमंतांच्या संग्रहीं आहेत; व कांहीं भा०इ०सं० मंडळाजवळ आहेत ते इ०स० १८०४मधील आहेत. (न.यु.)

तात्पर्य, मराठी मुद्रणकलेच्या बाबतींत बंगाल्यांत श्रीरामपूर येथें डॉ० **केरी** व पं० **वैद्यनाथ** आणि महाराष्ट्रांत मिरज येथें **श्री० गंगाधरराव पटवर्धन** यांचीं नांवें चिरस्मरणीय आहेत; आणि पं० वैद्यनाथांची माहिती देत असतां हीं इतर नांवें गाळणेंही अपरिहार्य आहे.

पंडित वैद्यनाथांसंबंधीं अधिक माहिती मिळत नाहीं, त्यास उपाय नाहीं. परंतु एवढें खरें कीं, जरी युरोपियनांनीं ह्या देशांत पंडितांस हाताशीं धरून, ग्रंथप्रकाशनाचा सपाटा सुरू केला, तरी पंडितांशिवाय त्यांचे ग्रंथ जितके सरस झाले, तितके सरस निघणें अशक्य होतें. तथापि अशा बहुवंशीं पंडित-साह्यानें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांवर नांव मात्र युरोपियनांचें आढळतें. अर्थात् ज्याच्या त्याच्या श्रमाचा वाटा त्याला रास्त रीतीनें मिळण्यासाठीं **पं० वैद्यनाथांस** आम्हीं स्वतंत्र स्थान येथें मुद्दाम दिलें आहे. यांच्या व्याकरणाच्या मुखपृष्ठांचे फोटो डॉ. केरींच्या चरित्रांत दिले आहेत.

---

## ६. दादोबा पांडुरंग तर्खडकर.



मराठीचे आद्य व्याकरणकार दादोबा पांडुरंग तर्खडकर यांचा जन्म मुंबईस सन १८१४ त ( वैशाख शु० ४ रोजीं ) झाला. यांच्या आईचें नांव यशोदा. जात वैश्य. मूळ गांव वसईजवळ तर्खड. आजे यशवंतशेट रोजगारानिमित्त मुंबईस आले. हीं एकंदर भावंडें १५. पैकीं दादोबाच ज्येष्ठ. लहानपणचें शिक्षण कांहीं वडिलांजवळ व कांहीं खासगी गांवठी शाळांत झालें. आत ‘ आकू ’ हिनें त्यांना श्लोक शिकविले व आईनें कहाण्यांची गोडी लाविली. या गांवठी शाळेंत असतां कोणा पाद्र्यांनीं त्यांस ‘ मात्थी उक्त ’ नांवाचें छापील पुस्तक बक्षिस दिलें. १८२३ च्या सुमारास त्यांस वॉटकिन् नांवाच्या म्हाताऱ्या इंग्रजी

कावाडी मास्तराच्या शाळेंत घातलें. पुढें १८२५ त ते बाँबे नेटिव्ह एज्युकेशन् सोसायटीच्या शाळेंत जाऊं लागले. वाडिलांच्या भजनी दिनचर्येमुळें व प्राकृत पोथ्या लिहवून त्यांचा संग्रह केल्यामुळें, त्यांस मराठी भाषेची गोडी उत्पन्न झाली-होती.सोसायटीच्या शाळेंत **बापूशास्त्री शुक्ल** हे त्यांचे मुख्य गुरु होते. १८२८ त म्हणजे १४ वर्षांचे असतांच त्यांचें लग्न उरकण्यांत आलें-होतें.

यांनीं विशीच्या आंतच म्हणजे सन १८३४ च्या सुमारास व्याकरण रचण्याचा हेतु धरिला-होता. " त्यावेळीं मराठी ग्रंथांचा फारसा प्रसार नव्हता. दर्पण ( इं०-म० ) व प्रभाकर ( मराठी ) हीं वर्तमानपत्रें मुंबईस भाऊ महाजन यांच्या साह्यानें निघाल्यापासून मराठींत लिहिण्याचा प्रघात वृद्धिंगत होऊं लागला व यामुळें व्याकरण-नियमांची आवश्यकता त्याच मानानें अधिकाधिक वाढूं लागली. " तेव्हां दादोबांनीं १८३६ त आपला व्याकरण—ग्रंथ शेवटास नेऊन गणपत कृष्णाजीच्या शिळा-प्रेसवर प्रथम मुंबईंत छापविला. त्याच्या सर्व प्रति सरकारनें घेतल्या. त्याच सुमारास सरकारनें त्यांना माळव्यांत जावऱ्याचे अल्पवयी नबाव यांस इंग्रजी शिकविण्याचें कामावर नेमिलें. ते नाशिक, मालेगांव, धुळें, यांवरून इंदुरास पोंचले. तेथें त्यांस व्याकरणाची छापील प्रत प्रथम मिळाली. वाटेंत सिंधव्याच्या घाटांत त्यांस एक ब्राह्मण दरोडेखोर भेटला, त्याचे हातून ते सुटले. पुढें शादी झाल्यावर नबाव इंग्रजी शिकण्याचा कंटाळा करूं लागले; तेव्हां दादोबा मुंबईस परत आले व एल्फिस्टन् इन्स्टिटयूटमध्यें त्यांस शिक्षक नेमिलें. मग त्यांस सुरतच्या इंग्रजी शाळेचे मुख्य नेमिलें. त्यानंतर १८४५ मध्यें नामांकित विद्वान् बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर हे मृत्यु पावल्यावर त्यांच्या, शाळा सुपरिंटेंडेंटच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली. त्यावेळीं त्यांनीं शिक्षकांचे पगार वाढविले; शाळांच्या कामाची शिस्त ठरविली; व अध्यापनाचें धोरण लावून दिलें; वगैरे कामें केलीं.

त्यांचे हातीं बारा विद्यार्थ्यांचा एक स्वतंत्र वर्ग चालविण्याकरितां सरकारनें दिला होता, तो त्यांनीं चांगला तयार केला; असें म्हणतात. पुढें त्यांस अहंमदनगर येथें डेप्युटी कलेक्टरचे हुद्यावर नेमण्यांत आलें. त्यापूर्वीं एतद्देशीयांस ह्या जागा मिळत नव्हत्या. त्या कामावर असतां, पठाजी नाईक नांवाच्या भिल्लाचें बंड उद्भवलें. तो मोठा विलक्षण मनुष्य होता. त्यानें पोलिस सुपरिंटेंडेंट कप्तान् हेन्री यास ठार मारिलें.तेव्हां त्या जिल्ह्याचे मुख्य कलेक्टर टायटलर साहेब यांनीं त्यांस भिल्लांचीं हत्यारें काढून घेण्याचे कामावर नेमिलें. त्यावेळीं दादोबांस

कोणतें संकट ओढवेल कोण जाणे, अशी भीति येऊन पडली होती; परंतु त्यांनीं तें काम मोठ्या कुशलतेनें पार पाडिलें. शहरांतून सरकारी खजिना काढून किल्ल्यांत नेऊन ठेवावा, अशी सूचना कलेक्टर यांनीं केली होती; पण ती मोडून काढून, दादोबांनीं खजिन्याचें रक्षण केलें. हें बंड मोडल्यामुळें त्यांची सरकारांत फार वाहवा झाली. अखेर १८६२ त त्यांनीं पेन्शन् घेतलें.

त्यांचे मित्र नानाभाई हरिदास यांनीं त्यांस एकदां घरबसल्या कापसाचे व्यापारांत १० हजार रुपये मिळवून दिले होते. पेन्शननंतर व्यापारांत त्यांचा फार पैसा बुडाला. तेव्हां बडोद्याचे खंडेराव महाराज ह्यांजकडे त्यांनीं नोकरीची खटपट केली; तेव्हां महाराजांनीं त्यांना द० म० ५० रु० ची वंशपरंपरेची कांहीं नेमणूक ( बा० वो० ) करून दिली; परंतु तेथल्या दरबारी मंडळींनीं तेथें त्यांचें बूड फार दिवस टिकूं दिलें नाहीं. मग पुनः सरकारांत वशिला लावून श्रीकृष्णशास्त्री तळेकरांच्या मागें त्यांस एज्युकेशनल ट्रॅन्स-लेटर नेमण्यांत आलें. तें काम त्यांनीं शेवटपर्यंत केलें. एकदां पेन्शन घेतल्या-नंतर पुनः सरकारी नोकरींत घेतल्याचें हें एक उदाहरण दिसतें. याप्रमाणें दादोबांनीं सरकारसेवा आमरण उत्तम बजाविली.त्यांना सरकारकडून **रावबहादुर** ही पदवी मिळाली होती.

त्यांची मुख्य वाङ्मयसेवा त्यांचें ' **महाराष्ट्र भाषेचें मोठें व्याकरण** ' ही होय. या व्याकरणावरून दादोबांचें नांव महाराष्ट्रांत चिरायु झालें आहे. काशीच्या एका पंडितांनीं त्यांस " महाराष्ट्र भाषेचे पाणिनि " ही उपमा दिली आहे, * ती परमार्थतः नव्हे, तरी सामान्यतः लोक ग्राह्य मानितील, असें वाटतें. त्यांच्या व्याकरणाच्या जन्मापासून मराठी भाषेला एक नवीन स्थैर्य येऊं लागलें; व ' दादोक्त ' चा ( व्याकरणाचा ) मराठीवर सुमारें ३०–४० वर्षे अंमल चालला; असें परिणामी आणि उपयुक्त कार्य त्यांच्या ग्रंथानें झालें, ह्यांत शंका नाहीं ( म० ग० इं० अ० )

मराठी भाषेच्या तत्कालीन स्थितीबद्दल दादोबांनीं आपल्या मोठ्या व्याकरणाच्या प्रस्तावनेच्या शेवटीं जे जिव्हाळ्याचे उद्गार काढले–आहेत, ते मननीय

---

* **कै० साने** यांच्या सांगण्यावरून नागपूर येथील रसकल्लोळ, भामाविलास, इ० काव्यांचे कर्ते, आणि कुवलयानंद या ग्रंथाचे मराठींत गद्यपद्यात्मक भाषान्तरकार **गंगाधरशास्त्री मंगरूळकर** हे दादोबांस " मराठी भाषेचे पाणिनि " म्हणत; असें कळतें.

आहेत; ते म्हणतात—" अलिकडेस मागल्या पंचवीस वर्षांपासून सर्व लोकांचा भर इंग्लिश भाषा शिकण्यांत फार वाढत चालल्यामुळें, स्वभाषेविषयीं त्याच मानानें मोठी अनास्था वाढत चालली आहे; ही उघड अत्यन्त शोचनीय गोष्ट माझ्या दृष्टीपुढें असतां, हा असा स्वभाषा सुधारण्याविषयीं व्यर्थ परिश्रम करणें हा माझा शुद्ध वेडेपणा आहे, असें जरी मला हस्तामलकासारखें ढळढळीत दिसत आहे, तरी जीस मी जननीप्रमाणें मानितों, त्या आपल्या स्वभाषेची शेवटपर्यंत सेवा केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. "

त्यांच्या ह्या व्याकरण-पुस्तकासंबंधीं त्यावेळीं कांहीं आक्षेप नव्हते, असें नाहीं. त्याविषयीं दादोबा स्वतः रंजीस पावून म्हणतात:—" अलीकडे परोत्कर्षासहिष्णु स्वभावाच्या कांहीं मंडळींनीं आमच्या विषयीं अशी कंडाळी उठविल्याचें आम्हीं ऐकतों कीं, मयत बाळशास्त्री ( जांभेकर ) यांचेच कागदपत्र आमच्या हातीं लागल्यावर त्यांवरून आम्हीं हें व्याकरण रचिलें; आणि आपल्या नांवानें प्रसिद्ध केलें. वस्तुतः ह्या विषयावर लिहिलेला त्या गृहस्थाच्या किंवा कोणाच्याही हातचा एक कागदाचा चिठोडाही आम्हीं पाहिला नाहीं. त्यांत आमच्या लोकांचे कान तर अशी एकादी परनिंदापर गप्प ऐकण्यास आ करूनच असतात. त्यांत हें विरजण पडतांच तिचे हे गटागट घोट घेऊन मनांत जिरवूं लागले आहेत. तेव्हां अशा लोकांच्या शिकारींत सांपडलों असतां, जर आम्हीं आत्मसंरक्षण न केलें, तर हा आमचा दुर्लक्षतेचा दोष पुढें आम्हांसच उलटा मोठा बाधक होईल. " दादोबांचें हें म्हणणें त्यांच्या कृतीवरून अगदीं प्रांजलपणाचें दिसतें. कारण व्याकरण-ग्रंथ दुसऱ्याचे चिटोरे जमवून कितपत सुसंगत ग्रथितां-येईल ही एक गोष्ट; दुसरें, त्यांच्या व्याकरणांत व पूरणिकांत किती तरी विचार व रचना एथून तेथपर्यंत त्यांचीं स्वतःची व स्वतंत्र अशी निःसंशय रीतीनें केलेली-दिसून-येते. त्याचप्रमाणें मराठी भाषेच्या रूपांविषयीं त्यांचें स्वतंत्र वाचन, स्वतंत्र शोधन त्यांच्या ग्रंथांत व पूरणिकेंत जागोजाग आढळून-येतें, ही तिसरी गोष्ट; आणि ज्याला एवढें सगळें स्वतंत्रपणें करतां येतें, तो आपल्या लाभासाठीं दुसऱ्यांचीं चिटोरीं जमवून, त्यांचा नामनिर्देशही न करितां, बेधडक शिष्ट असंमत मार्गास प्रवृत्त होईल, हें विश्वसनीय वाटत नाहीं, ही चौथी गोष्ट; ह्या सर्वांवरून वरील कंडाळ्यांत कांहीं अर्थ नाहीं, असेंच त्रयस्थ वृत्तीनें उघड दिसतें. असो.

दादोबांनीं " **यशोदा-पांडुरंगी** " म्हणून मोरोपंताच्या केकावलीवर एक विस्तृत टीका लिहून, आपलें मातृ-पितृ-ऋण फेडिलें आहे. आईचें नांव यशोदा व वडिलांचें पांडुरंग, हींच नांवें त्यांनीं आपल्या ह्या ग्रंथास जोडिलीं-आहेत. त्यांच्या ह्या ग्रंथावरूनही त्यांचें मराठी भाषेवरील प्रभुत्व स्पष्ट कळून-येतें. ह्यांशिवाय शिशुबोध, माबाईच्या ओंव्या, धर्मविवेचन, इ० लहान पुस्तकें हीं त्यांनीं लिहिलीं-आहेत.

दादोबांना विश्वविद्यालयाच्या परीक्षांत बी० ए० चे ( मराठीचे ) परीक्षक नेमीत-असत. त्यांच्या अध्ययनासंबंधीं व योग्यतेसंबंधीं एक दोन गोष्टी त्यांनींच लिहून-ठेविलेल्या-आहेत. ( १ ) दादोबा हे हिंदु धर्माभिमानी होते, तरी पण त्यांचा कल सुधारकी वृत्तीकडे अधिक होता, असें दिसतें. कारण, ह्या सुधारणांकरितां त्यांनीं " परमहंस सभा " नांवाची एक संस्था स्थापन केली-होती; हल्लींचा प्रार्थना-समाज स्थापन होण्यासही यांचेच श्रम कारणीभूत झाले-होते, असें म्हणतात. सुधारकी वृत्तीचा त्यांचा लौकिक त्यावेळीं बराच पसरला-होता. अशा स्थितींत दादोबांचे नागांवकर गुरुजी **बापूशास्त्री शुक्ल** यांची सुरतेस एकदां त्यांच्याशीं भेट झाली. त्यावेळीं ते म्हणाले,-"दाद्या, तुझें केलेलें व्याकरण पाहून मला संतोष झाला; तसेंच तुझे दुसरे गुण विद्वत्तेचा स्तव ऐकून, मला फार आनंद होतो; पण गड्या, तूं नास्तिक झालास रे !-तुझी धर्मावर निष्ठा नाही, हें ऐकून मी दिलगीर आहें. " हा गुरु-शिष्यांचा संवाद किती प्रेमळ आहे, हें सांगणें नकोच. हें भाग्य थोड्यांच्याच नशिबीं असेल. असो. ( २ ) दुसरी गोष्ट त्यांच्या अगदीं लहानपणची आहे. ते नऊ वर्षांचे असतां, त्यांजविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, ताजुद्दीन नांवाच्या आपल्या एका शाळेंतील सोबत्यास दरमहा १ रु० देण्याचा ' आडवा ' खर्च बाप खुशींत असतां त्याजकडून कबूल करवून, ते फारसी शिकले. तसेंच ते गुजराथीहि शिकले-होते; व सुरतेस नर्मदाराम शास्त्र्यांशीं ते संस्कृत शिकले.

दादोबांनीं स्वतःच आपलें ठोकळ असें चरित्र लिहून-ठेविलें-होतें. तें अत्यन्त प्रेमळ, रसाळ व बारीक-सारीक अशा खासगी गोष्टींनींही भरलेलें असून, ह० भ० प० लक्ष्मण रामचंद्र पांगारकर ह्यांनीं त्यांतील कांहीं भाग आठव्या साहित्य-संमेलनाचे वेळीं प्रसिद्ध केला होता; व आणखी कांहीं महत्त्वाचा भाग " मराठी गद्याचा इंग्रजी अवतार " यांत प्रो० दत्तोपंत पोतदार यांनीं दिला-

आहे; ह्या दोहोंवरून व शिवाय ' बालबोधा ' वरून हा चरित्रभाग संगृहीत करण्यांत आला-आहे.*

दादोबा आपल्या अडुसष्ठाव्या वर्षी ता० १७ ऑक्टोबर १८८२ रोजीं मुंबईस मृत्यु पावले. त्यांच्या व्याकरणाच्या जन्मापासून मराठी भाषेला स्थैर्य येऊं-लागले. त्यांच्या कृतीचा अंमल ३०-४० वर्षे चालला; असा परिणामी ग्रंथ त्यांनीं लिहिला. थोडें कां होईना, पण सरस, प्रौढ, उपयुक्त, स्वतंत्र, असें ह्यांनीं लिहिलें, म्हणून त्यांची योग्यता विशेष आहे; असें प्रो० पोतदार यांनीं म्हटलें आहे, तें योग्यच आहे.

ह्यांच्या व्याकरणानंतर हें शास्त्र बरेंच पुढें गेलें-आहे; तेव्हांपासून आतांपर्यंत जवळ जवळ ९० वर्षांत चर्चाही पुष्कळ झाली-आहे; तरी दादोबांच्या व्याकरणविषयक कामगिरीचें महत्त्व अद्यापिही लवमात्र देखील कमी झालेलें-नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्यांच्या मोठ्या व्याकरणाच्या तर सर्व ७।८ आवृत्ति सरकारनेंच घेतल्या; आणि लघु-व्याकरणाच्याही प्रति लाखांवर खपून, हल्लीं त्याची २८ वी आवृत्ति निघालेली आहे. ह्यांस मराठीचा 'आद्य व्याकरणकार' म्हणतात; पण तें तत्त्वतः खरें नसून, मराठीचे यापूर्वीचे युरोपियन व्याकरणकार व त्याही पूर्वीचे मानभावांचे व्याकरणकार ह्यांची माहिती आम्हीं इतरत्र दिलीच आहे. मात्र मराठीं व्याकरणसंबंधीं बरेंच मोठें व मूर्त कार्य प्रथमतः यांनींच केलें, हें अक्षरशः खरें आहे; व म्हणून " महाराष्ट्र भाषेचे पाणिनि " हा त्यांचा मान कोणास हिरावून घेतां-येणार-नाहीं.

---

## ७. कृष्णशास्त्री गोडबोले.

ह्यांचा जन्म १ सप्टेंबर १८३१ रोजीं वाई येथें झाला. त्यांच्या वडिलांचें नांव पांडुरंगपंत. हे पुणें येथें सदर-अमीन कोर्टांत शिरस्तेदार होते; ह्यामुळें ह्यांचें शिक्षण पुण्यासच झालें. प्रथम ते पांडोबा तात्या दिवेकर ह्यांच्या शाळेंत जाऊं-लागले. पांडोबा तात्या उत्तम गणिती होते. त्यांचीच छटा पुढें शास्त्रीबोवांत उमटली. नंतर ते विश्रामबागच्या वाड्यांतील पाठशाळेंत जाऊं-लागले. तेथें

* नुकतेंच " विविधज्ञानविस्तारांत " **भास्करराव सदानंदजी लखंड** यांनीं हें आत्मचरित्र समग्र छापण्यास सुरुवात केली आहे. ( जुलै १९२७ ).

ज्योतिष, व्याकरण, अलंकार, ह्या शास्त्रांचें अध्ययन चाले. पण पुढें मेजर कँडीसाहेब यांनीं या पाठशाळेस एक इंग्रजी शिक्षणाचा वर्ग जोडिला;(१८५१). त्यावेळीं कँडीसाहेब ह्यांनीं पाठशाळेंतील विद्यार्थ्यांस विचारिलें कीं, "तुम्हांस जर इंग्रजी शिकवून आम्हीं तयार केलें,व पुढील मार्ग क्रमण्यास मोठमोठ्या पगाराच्या जागा दिल्या, तर तुम्ही पत्कराल काय ? " कृष्णशास्त्र्यांनीं त्या कालाकडे लक्ष पुरवून इंग्रजी शिकण्यास आरंभ केला. त्यांची हुशारी पाहून कँडीसाहेब फार खूष झाले; व पुढें त्यांच्या ग्रंथरचनेस कँडीसाहेबच अंशतः कारणीभूत झाले, असें त्यांच्या खासगी पत्रव्यवहारावरून वाटते. पाठशाळेंत त्यांस तीन रुपयांपासून दहा रुपयांपर्यंत स्कॉलर्शिप् मिळत–असे. पाठशाळेंतील शिक्षणानंतर त्यास पूना कॉलेजचे मराठीचे शिक्षक नेमिलें.तेथें ते गुरु–शिष्य ह्या दोन्ही अवस्थेंत होते. म्हणजे त्यांस शिकावेंही लागे व शिकवावेंहि लागे. नऊ वर्षांनंतर त्यांस कुलाबा ऑब्झर्व्हेटरीमध्यें नेमिलें. नंतर १८६५ त केरोपंतांच्या जागेवर ट्रेनिंग् कॉलेजचे सुपरिंटेंडेंट नेमण्यांत आलें. पुढें सिंध–हैद्राबाद व कराची येथें हायस्कूलमध्यें ते सेकंड् असिस्टंट होतें. तेथें त्यांनीं सिंधी भाषेचा उत्कृष्ट अभ्यास केला; व त्यांस मुंबई युनिव्हर्सिटींतून त्या भाषेचे परीक्षकही नेमीत. पुढें पुणें–हायस्कूल व मुंबईस एल्फिस्टन् हायस्कूल आणि फणसवाडी अँग्लो–व्हर्नाक्युलर स्कूल येथें त्यांनीं काम केलें; आणि अखेरीस शेवटच्या जागींच सन १८८२ त पेन्शन् घेतलें. त्यांनीं आपली बढती व्हावी, म्हणून कांहीं खटपट केलेली दिसत नाहीं–ह्यामुळें; आणि मोठे विद्वान् असा जरी त्यांचा लौकिक होता, तरी ते कोणाचीं आर्जवें करीत नसल्यामुळें; मागें पडले असावे. ते गणित व ज्योतिष ह्या विषयांत चांगलेच पारंगत होते.

ह्यांचे प्रमुख ग्रंथ म्हणजे ग्रहलाघव, ज्योतिःशास्त्र, सिंधी भाषेंतील अंकगणित, सिंधी भाषेचें निरूपण, इ० होत. त्याचप्रमाणें भगवद्गीतेंत " मासानां मार्गशीर्षोऽहं ऋतूनां कुसुमाकरः " हें वाक्य आहे. त्याचे आधारावर गीता सांगण्याचे वेळीं वसंतऋतु मार्गशीर्षांत होता; आज चैत्रांत आहे. तेव्हां हा बदल होण्याचा काल ज्योतिषाच्या व गणिताच्या आधारें शास्त्रीबुवांनीं इ० सनापूर्वी ३० हजार वर्षांवर ढकलला. ह्यावर ( वेदांचें पुराणत्व ) नांवाचा इंग्रजींत त्यांनीं ग्रंथ लिहिला; तो त्यांच्या बुद्धिमत्तेची चांगली साक्ष देतो. " पंचांगसाधनसार " हें एक पुस्तक त्यांनींच लिहिलें

" **मराठी भाषेचें नवीन व्याकरण** " हाही त्यांचा अप्रतिम ग्रंथ आहे; त्यांस संस्कृत, मराठी, इंग्रजी, फारसी, अरबी व सिंधी, ह्या भाषा चांगल्या अवगत होत्या; म्हणून त्यांस अनेकभाषाकोविद असें म्हणत. ह्यामुळें ह्यांच्या हातून मराठी व्याकरणाचा ग्रंथ, त्यापूर्वीच्या सर्व व्याकरण-ग्रंथांपेक्षां अधिक सरस, आटोपसर, व्युत्पत्ति, वाक्यपृथक्करण, छंदःशास्त्र, आणि संस्कृत-प्राकृत-मराठी यांचा संबंध-दर्शक प्रकरणें जोडल्यामुळें, अधिक व्यापक असा झाला-आहे; हें तज्ज्ञ कबूल करितात; तथापि हा ग्रंथ मोठा असल्यानें केवळ प्रौढांच्याच उपयोगी आहे, म्हणून त्याचा प्रसार मात्र शालोपयोगी पुस्तकांप्रमाणें झाला-नाहीं. असो. ह्या महत्त्वाच्या व्याकरणग्रंथामुळें ह्या पुस्तकांत ह्यांस स्थान देण्यांत आलें-आहे; आणि त्यांचें चरित्र त्यांच्या ग्रंथाच्या तृतीयावृत्तीमध्यें त्यांचेच चिरंजीव अनंत कृष्ण गोडबोले ह्यांनीं-दिलें आहे, त्याचा सारांश ह्या ठिकाणीं उद्धृत केला-आहे.

शास्त्रीबोवा नित्यनियमाप्रमाणें सकाळीं रपेट करण्याकरितां चतुःशृंगीच्या पायथ्यापर्यंत गेले; व सायंकाळीं एकाएकीं त्यांच्या मृत्यूची वार्ता इष्ट-मित्रांस कळली ! प्रथम ती त्यांस गप्पच वाटली, पण शोधाकरितां मंडळी आली, तों ती खरीच ठरली ! २२ नवंबर १८८६ रोजीं शास्त्रीबोवा पुण्यास एकाएकीं निवर्तले ! ह्यांचा **फोटो** उपलब्ध **नाहीं**.

---

## ८. कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर.

यांचा जन्म १८२४ त झाला. त्यांच्या वडिलांचें नांव **हरिपंत** असें होतें. त्यांची घरची गरीबीच असे. प्रथम त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें कृष्णशास्त्री यांस वेदाभ्यास करावयास लाविलें-होतें; परंतु ते चौदा वर्षांचे झाल्यावर त्यांस 'लिहिणें-वाचणें म्ह० कारकुनीची विद्या' ( बालबोधकर्ते ) शिकण्यास विश्रामबागेंतल्या मराठी शाळेंत घातलें. तेथें पाठशाळाहि होती तींत अनेक शास्त्रें पढवीत असत. त्या वेळीं त्या पाठशाळेचे मुख्य अधिकारी नामांकित **मोरशास्त्री साठे** हे होते.* त्या पाठशाळेंत कृष्णशास्त्र्यांचा प्रवेश झाल्यावर, त्यांना

---

*" विविधज्ञानविस्तारा "च्या १० व्या पुस्तकाच्या ८ व्या अंकांत **कृष्णशास्त्री चिपळूणकरांचें** चरित्र आलें आहे. त्यांत शास्त्रीबोवांचे गुरुजी

त्यांच्या हुशारीबद्दल तीन रुपये दरमहा देण्याची तजवीज मोरशास्त्री यांनीं केली. पुढें त्यांस दरमहा सहा रुपये मिळूं-लागले. तेथें त्यांनीं अगदीं अल्प काळामध्यें ( कोणी म्हणतात एक वर्षामध्यें ) अलंकारशास्त्र, न्यायशास्त्र व धर्मशास्त्र, ह्यांचा फार उत्तम रीतीनें अभ्यास केला. ते उपजतच मोठे बुद्धिवान् होते. ह्यामुळें त्यांच्या हुशारीबद्दल सगळ्या पाठशाळेंत त्यांची मोठी ख्याति झाली. ती इतकी कीं, केवळ विनोदार्थ एकदां दहा मंडळांत मोरशास्त्री साठे आणि कृष्णशास्त्री चिपळूणकर ह्यांचा पूर्वपक्ष-उत्तरपक्ष होऊन, त्यांत मोरशास्त्री हरले. तेव्हां मोरशास्त्र्यांस एवढा संतोष झाला म्हणून म्हणतात कीं, तेथल्या तेथें त्यांनीं, आपल्या अंगावरची शालजोडी काढून कृष्णशास्त्र्यांच्या अंगावर घातली; आणि " शिष्यात् इच्छेत् पराजयम् " या सुखाचा अनुभव घेतला. तेव्हांपासून मोरशास्त्री त्यांस ' **बृहस्पति** ' म्हणूं-लागले. मोरशास्त्री यांनीं 'प्रसंगवोळखी' धरून त्यांस इंग्रजी शिकण्याचा उपदेश केला.

पुढें विश्रामबाग वाड्यांत सरकार इंग्रजी शिकवूं लागलें, तेव्हां त्यांनीं इंग्रजी भाषेचा अभ्यास केला. त्यांतहि त्यांची विलक्षण गति पाहून, त्यांचे इंग्रजीचे गुरु ग्रांन साहेब ह्यांस फार आश्चर्य वाटलें. सुमारें पांच वर्षे इंग्रजीचा अभ्यास केल्यावर त्यांस ४० रु० दरमहाची भाषान्तरकाराची जागा प्रथमतः मिळाली; (१८५२). पुढें ते पुणें-पाठशाळेंत मराठीचे असि० प्रोफेसर झाले. १८५९त त्यांची बदली दक्षिणा प्राइझ कमिटीच्या सेक्रेटरीचे जागीं झाली. हें काम करीत

---

**मोरशास्त्री साठे** यांजबद्दलचीही माहिती ओघानेंच दिली-आहे. प्रस्तुत माहिती मागाहून मिळणें कठीण पडतें; म्हणून तिचा सारांश येथें थोडक्यांत देतों. मोरशास्त्री हे मूळचे कोंकणांतले राहणारे. ते पुण्यांतील प्रख्यात **नीळकंठशास्त्री थत्ते** ह्यांजकडे शिकण्यास राहिले. त्यांनीं त्या मुलाची परीक्षा पाहिली. त्यास एका ठेंगण्या शिंक्याचें खालीं जेवावयास बसविलें. उठतांना नीट ध्यानांत ठेवून हा मुलगा उठला व शास्त्रीबोवांच्या परीक्षेंत उतरला; इ० आख्यायिका आहे. पुढें हे प्रख्यात नैयायिक झाले; पण वैयाकरण त्यांस आपल्या विषयांत हात घालूं न देतां, त्यांची मानखंडना करीत. हें शल्य सहन न होऊन, त्यांनीं तीन महिन्यांत व्याकरणशास्त्राचें अध्ययन केलें. त्यांची धारणाशक्ति व बुद्धि विलक्षण होती, असें म्हणतात

कै० थोरले शास्त्रीबोवा.



असतांच त्यांनीं संस्कृत नाटकांचीं भाषान्तरें तपासून शुद्ध केलीं. तेव्हांपासून वाढत वाढत ते पुण्याच्या ट्रेनिंग् कॉलेजचे प्रिन्सिपल झाले: ( १८६५ ). त्यावेळीं त्यांस दरमहा २०० रु० पगार मिळू-लागला. नंतर त्यांस एतद्देशीय वर्तमानपत्रांवर व पुस्तकांवर ' रिपोर्टर 'चे कामावर नेमिलें: ( १८६८ ). " हें काम साहेब लोकांस देखील त्यांच्या इतकें चांगलें करितां-आलें-नाहीं, असें सरकारनें म्हटलें " (बा० बो०). मात्र जागेवर असतां निबंधमालेवर ' एलिफंस ' ऊर्फ ' हत्ती ' बोवांनीं हल्ला चढविला: आणि रिपोर्टर झोंपा घेतात काय, का सगळेच ब्राह्मण कटांत शिरले-आहेत, असा बेहोष सवाल केला ' त्यावेळीं हेच थोरले शास्त्रीबोवा रिपोर्टर होते.

ट्रेनिंग् कॉलेजांत असतां, त्यांना मराठी व्याकरणावर साहजिकच विचार करावा-लागला. त्याचें फळ म्हणजे त्यावेळचे ' शालापत्रकां 'तील त्यांचे निबंध होत. **शालापत्रक** हें मासिक १८६१ त निघालें व १८७० पावेतों चाललें. (चित्रशाळेनें चालविलेलें त्याचेंच रूपान्तर हल्लींचें 'मराठी शालापत्रक' हें होय.) यांत पिता-पुत्र चिपळूणकर म्हणजे **कृष्णशास्त्री** व **विष्णुशास्त्री** अथवा थोरले शास्त्रीबोवा आणि धाकटे शास्त्रीबोवा यांचे फार चांगले लेख व ग्रंथ-परीक्षणें आलीं. धाकट्या शास्त्रीबोवांनीं आपल्या लेखणीला धार लावून ती तयार केली, ती याच शालापत्रकांत. संस्कृत-कविपंचकावर त्यांचा उत्कृष्ट निबंध यांतच आला व मराठी कवींविषयीं लिहिण्यास त्यांनीं प्रारंभ केला होता, तोंच वरतीं लिहिल्याप्रमाणें यांच्यावर सरकारांतून गिल्ला झाला. शालापत्रक मासिकानें वाङ्मयाची सेवा या काळांत केली, ती प्रतिष्ठित व खबरदारीनें केली, यांत शंका नाहीं

१८५२ च्या सुमारास मिशनरी मंडळींचा जोर वाढलासें पाहून, कृष्णशास्त्री यांनीं ' विचारलहरी ' नांवाचें पत्र सुरू केलें-होतें; त्यामुळेंही सरकारची कृष्ण-शास्त्र्यांवर खप्पा मर्जी झाली होती. तेव्हांच त्यांनीं स्वतंत्र शाळा काढण्याचा बेत केला-होता; पण तितक्या थरावर त्यावेळीं प्रकरण गेलें नाहीं तथापि धाकट्या शास्त्रीबुवांनीं मात्र ह्या कामीं वडिलांवर ताण करून, " न्यू इंग्लिश स्कूल " ही नमुनेदार शाळा उभारिली; आणि अखेर त्यामुळें पूना हाय-स्कूलची जरूर देखील नष्ट करून-टाकिली; हें दृश्य सध्यां आपल्या डोळ्यांपुढें आहेच कृष्णशास्त्री यांनीं १८६१ त ' अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह ' नांवाचा एक

विविधशास्त्रविषयक सुंदर ग्रंथ लिहिला. ' पद्यमंजरी ' हा काव्यग्रंथ व ' सॉक्रेटिसाचें चरित्र ' हीं दोन पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. तीं दोन्ही सरस आहेत. सरकारी क्रमिक पुस्तकांतून त्यांच्या कविता व शास्त्रीय लेख बरेच घेतलेले आढळतात. मराठी भाषा जणुं त्यांजपुढें हात जोडून उभी होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. " आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी " यांनीं लोकांस किती चटक लाविली, हें सर्व जाणतातच. एकंदरींत पाहतां त्यांनीं मराठीची उत्तम प्रकारें सेवा केली आहे, यांत सन्देह नाहीं. त्यांचे ग्रंथ बहुतेक भाषान्तरितच आहेत; मूळ असा एकही ग्रंथ नाहीं. तथापि त्यांची भाषा शुद्ध, सोपी, खुबीदार व गोड अशी आहे: ती इतकी की, ते ग्रंथ भाषान्तरें आहेत, असें भासत मुद्धां नाहीं. ' रासेलस ' ह्या त्यांच्या पुस्तकावरून शास्त्रीबोवांच्या ह्या विलक्षण करामतीचा अनुभव येईल. पुष्कळ भाषान्तरें होतील, पण कृष्णशास्त्र्यांच्या रासेलसासारखें भाषान्तर आढळणें मुष्कील ! मूळांतला अभिप्राय मनांत उतरवून, मग तो पुनः स्वतःचे डोक्यांतून मराठींत आपलासाच दिसेलसा उतरून, त्याचा जुना वास बिलकूल घालवून, वाचकांस सादर करण्याची त्यांची हातोटी अप्रतिम होती. त्यावेळीं शास्त्रीबोवांनीं आपल्या बुद्धिमत्तेमुळें व विद्वत्तेमुळें जुन्या-नव्या, देशी व इंग्रजी सर्व मंडळींवर विलक्षण छाप पाडिली होती. आपल्या अलौकिक व मनोरम ग्रंथरचनेनें त्यांनीं मराठी भाषेस बरेंच चांगलें रूप आणून, ती विष्णुशास्त्री वगैरे पुढील विद्वानांचे उपयोगाकरितां उत्तम तऱ्हेनें कमावून, तयार करून दिली; असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. तथापि अशा जाड्या पंडिताच्या हातून झालीं त्यापेक्षांही भरींव पुस्तकें व्हावयास पाहिजे होतीं, असें ' पुणें-वर्णनां'त रा० गायकवाड म्हणतात, तेंही थोड्याफार अंशानें खरेंच आहे. हे ता० २० मे १८७८ रोजीं वयाच्या ५४ व्या वर्षी कितीएक वर्षांपासून जडलेल्या काळजाच्या विकारानें वारले. मोठा कर्ता पुरुष गेला म्हणून सर्व महाराष्ट्र हळहळलें ! ( म० ग० इं० अ० ).

शास्त्रीबोवा आमच्यांतील डॉ० जॉन्सन् होते, असें म्हटलें तरी चालेल. वादविवादांत ते कोणताही पक्ष घेऊन बसले, तरी त्यांच्यापुढें कोणाची मात्रा चालत नसे. सभा झाली आणि तेथें शास्त्रीबोवा असले, म्हणजे तेच अध्यक्ष असावयाचे. शास्त्रीबोवांस गणित आवडत नसे, असें म्हणतात: तरी एके प्रसंगीं, त्यांचे मित्र व त्यांच्यासारखेच जाडे विद्वान् गणितशास्त्रपारंगत **केरोपंत नाना छत्रे** म्हणाले कीं, " गणितांत देखील कृष्णशास्त्र्यांच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास

मला फार अडचण पडते. ते मोठे मातृभक्त होते. त्यांना आई म्हणजे देव वाटत असे व तिच्या आज्ञेत ते आपली सुधारकी वृत्ति बाजूस ठेवून सर्व तऱ्हेनें वागत असत. जॉन्सनप्रमाणें त्यांचें चरित्र लिहिणारा बॉस्वेल आमच्यांत निर्माण झाला नाहीं, म्हणून सर्व विचारी लोक हळहळतात; ( बा० बो० ).

खुद्द कृष्णशास्त्र्यांसंबंधानें 'विस्तारां'तील त्यांच्या चरित्रांत खालील आणखी दोन–चार गोष्टी आढळल्या:—

( १ ) शास्त्रीबोवा प्रख्यात वक्ते खरे; पण त्यांच्या आवाजाबद्दल त्यांच्याच एका आदरशील शिष्यानें "काकवत् कर्करायते" असे उद्गार एकदां विनोदानें काढिले–होते.

( २ ) शास्त्रीबोवांच्या वक्तृत्वाचा फायदा त्यावेळीं मिशनऱ्यांकडून फार मुलें बाटविलीं–जात, त्यांना परावृत्त करण्यांत झाला; त्याचप्रमाणें त्यांच्या प्रमाणशुद्ध लेखनानें, त्यांनीं काढिलेल्या "विचारलहरी" मासिकांत जे लेख येत, त्यांचाही फायदा याच कामांत झाला

( ३ ) उदाहरणार्थ, काशीचे एक पंडित **नीलकंठशास्त्री गोरे** हे बाटून पुण्यास ख्रिस्ती धर्मप्रसारासाठीं संचारार्थ एकदां आले–होते. त्यांचा व थोरले शास्त्रीबोवा यांचा प्रमाणबद्ध वादविवाद होऊन, अखेर नीलकण्ठशास्त्री हरले; व त्यांस हात हालवीत पुण्यांतून माघारें जावें–लागलें. नीलकंठशास्त्री गोरे ह्यांनीं पुष्कळदां पाद्र्यांस वादविवादांत हारविलें होतें; पण ख्रिस्त्यांचें धर्मपुस्तक वाचल्यावांचून पाद्र्यांस पुरें पराजित करितां येणार नाहीं, असें वाटून, त्यांनीं बायबल वाचण्यास सुरुवात केली; पण अखेर ते स्वतःच ' संगतीं संगदोषेण ' ह्या न्यायानें 'बायबलां'च्या पेचांत सांपडले; व अखेर ख्रिस्ती झाले ! तत्कालीन वातावरणाचा केवढा प्रभाव हा ! हे गोरेशास्त्री पुनः एकदां पुण्यास आले होते, पण त्यांनीं पुनः वादविवाद केला–नाहीं.

( ४ ) एकदां "ज्ञानप्रकाश" हें वर्तमानपत्र सुरू करण्याचा दिवस येऊन ठेपला; परंतु उ–ऊ, ऋ–ऌ, ए–ऐ, इ० अक्षरांचे टाईप नव्हते; तेव्हां शास्त्रीबोवांनीं तीं अक्षरें गाळून, मजकूर तयार करून दिला एक तासांत त्यांनी १०० पद्यें तयार करून दिलीं; परंतु "ह्या गोष्टीचा उल्लेखही ज्ञानप्रकाशकारांनीं केव्हां, कोठेंच केला–नाहीं, हें आश्चर्य कीं अरसिकता? ह्याबद्दल अधिक लिहिणें म्हणजे आपलेंच मौर्ख्य आपण प्रकट करणें आहे;" असें 'विस्तार'कर्त्यांनीं या चरित्राच्या शेवटीं लिहिलें–आहे.

## ९. रामचंद्र भिकाजी जोशी.



हे गृहस्थ रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्यांतील मुरुड गांवचे राहणारे. ह्यांच्या गांवानें अनेक मोठ्या माणसांस जन्म दिलेला-आहे. त्यांचीं नांवें येथें देणें अप्रासंगिक होणार-नाहीं. ( १ ) या सर्वांत पहिले स्थान युनिव्हर्सिटी स्थापन होण्यापूर्वी प्रसिद्धीला आलेले रावसाहेब **विश्वनाथ नारायण मंडलिक** यांना दिलें-पाहिजे. नियमितपणाबद्दल जॉर्ज वॉशिंग्टनप्रमाणें त्यांची सर्वत्र ख्याति होती. त्यांची तेजस्विता अवर्णनीय होती, व तिजमुळें युरोपियन लोकांत त्यांचें मोठें वजन होतें. हे नामांकित हायकोर्ट वकील असून, व्हाइसरिगल कौन्सिलांत या प्रांतांतून त्यांचीच प्रथम नेमणूक झालेली-होती. यांनीं हिंदी समाजाची एकंदरींत कीर्ति उज्ज्वल केली. ( २ ) दुसरे गृहस्थ **वामन आबाजी मोडक.** हे एल्फिन्स्टन् हायस्कूलचे पहिले हिंदी प्रिन्सिपल होते. ( ३ ) ज्योतिःशास्त्रविशारद **शंकर बाळकृष्ण दीक्षित**, हे महा बुद्धिवान् होते. ट्रेनिंग् कॉलेजांत हे शिक्षक असतां, सकाळीं बाबा गोखल्यांच्या शाळेंत जाऊन ते मॅट्रिक झाले. ( ४ ) ज्ञानप्रकाश व आर्यभूषण ह्यांचे आपल्या कर्तबगारीनें मालक बनलेले **हरि नारायण गोखले** हे या गांवचे चौथे गृहस्थ होत. दैनिक ज्ञानप्रकाश काढण्याचें धाडस यांनींच प्रथम केलें.(५) महिलाविद्यालय, अनाथबालिकाश्रम, भारतवर्षीय-महिलाविद्यापीठ, स्थापन करणारे प्रो० **धोंडो केशव कर्वे** हे पांचवे गृहस्थ सर्वप्रसिद्धच आहेत; आणि ( ६ ) **रामचंद्र भिकाजी जोशी** हे सहावे गृहथ असून (७) **मुरुडकरबुवा** म्हणून प्रसिद्धीस आलेलें कीर्तनकार-बंधुद्वयही याच गांवचें आहे.

**रामभाऊ जोशी** ह्यांचा जन्म १८५६ त झाला. प्राथमिक शिक्षण मुरुड येथेंच झालें. नंतर रत्नागिरीच्या हायस्कूलचे हेडमास्तर वामन आबाजी मोडक

हे त्यांचे मावसे असल्यामुळें त्यांजकडे हायस्कूलमधील शिक्षण झालें. पुढे ते मॅट्रिक पास झाल्यावर डेक्कन् कॉलेजांत गेले; परंतु प्रीव्हिअसमध्येंच नापास झाल्यामुळें, त्यांचें पुढील शिक्षण झालें–नाहीं. न्यू इंग्लिश स्कूलमधील टिळक–आगरकर ह्या पिढीच्या मागून लगेच पांच–चार वर्षांत जी नवीन विचाराची मंडळी त्या संस्थेंत शिरली, त्यांपैकींच हे जुन्यांतले जुने होते न्यू इं० स्कूल-मध्यें ते कायमचे शिक्षक अखेरीस फार तर ४० च्या सुमारें पगारावर होते, व त्या संस्थेचे ते हल्लीं पेन्शनर आहेत.

हे जुन्या पिढींतले सुधारक म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहेत. यांचीं जीं मतें आहेत, त्यांप्रमाणें वागण्यांत ते कधीं माघार घेत–नाहींत. सामान्यपणें असें म्हणतां–येईल कीं, **प्रि० आगरकर**, **प्रि० भाटे**, **प्रो० कर्वे**, वगैरेसारख्यांचीं जीं सामाजिक सुधारणेबद्दलचीं मतें आहेत, तींच ह्यांचीं आहेत स्त्रीशिक्षण, प्रौढ-विवाह, पुनर्विवाह, ह्यासंबंधीं ह्यांचीं मतें उदारवादित्वाचीं आहेत. पुष्कळ दिवस हे विधवाविवाहोत्तेजक–मंडळीचे सेक्रेटरी होते; आणि अनेक सामाजिक सुधा-रणांत त्यांनीं प्रमुखत्वानें भाग घेतलेला–आहे. किंबहुना असेंही म्हणतां–येईल कीं, ते देशाविषयीं कळकळीचे असे समाजसुधारक आहेत. राजकीय आखा-ड्यांत उतरेल तोच देशाचा हितचिंतक, ही समजूत सर्वस्वी खरी मानतां–येणार–नाहीं. ज्यांना समाजसुधारणेशिवाय खरें राष्ट्रैक्य होणें नाहीं, व खरें स्वातंत्र्य लाभावयाचें व टिकावयाचें–नाहीं, असें मनापासून वाटत–असेल, तेही देशाचे खरोखर उद्धारकच आहेत: ह्यांत शंका नाहीं.

**रामभाऊ जोशी**, हे आरंभीं न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक होते; व शेवट-पर्यंत त्यांनीं त्या शाळेंतच काम केलें. त्या अवधींत त्यांनीं "**शिशुव्याकरण**" नांवाचें पुस्तक पहिल्यानें लिहिलें; आणि पुढें "**बालबोध व्याकरणा**"चीं दोन पुस्तकें व "**प्रौढबोध व्याकरण**" हीं लिहिलीं. ह्या पुस्तकांतील नवीन पद्धति मान्य होऊन सरकारनें हीं पुस्तकें शाळांत चालविण्यासाठीं मंजूर केलीं. पूर्वीच्या सर्व व्याकरणविषयक पुस्तकांतून केवळ रूळ किंवा नियम पाठ करण्यासाठीं दिलेले–असत. ती पद्धति शिक्षणशास्त्रदृष्ट्या सदोष आहे. असो. ह्या व्याकरण–पुस्त-कांतील सर्वच प्रमेयें सर्वांसच मान्य होतील असें नाहीं; आणि नमुन्याकरितां त्यासंबंधीं राजवाडे इत्यादिकांचें म्हणणें जरी येथें दिलें–आहे.तरी **रामभाऊंचा मराठीच्या** अभ्यासाचा दीर्घ व्यासंग, त्यांचें मराठी वाङ्मयांत नांव राखण्यास भर-पूर पुरेसा आहे. त्यांनीं व्याकरणांशिवाय आणखी पुष्कळ पुस्तकें लिहिलीं

आहेत. 'सुलभ केकावली,'' मराठी शब्दसिद्धि,'' अलंकारदर्पण,'' पद्यसमुच्चय, इ०. तसेंच " निबंधचंद्रिका " हें मासिकही त्यांनीं ३।४ वर्षे चालविलें होतें. ह्याशिवाय " मराठी भाषेची घटना " इ० त्यांची पुस्तकें प्रसिद्ध आहेत. शेवटचें पुस्तक युनिव्हर्सिटींतील उच्च शिक्षणक्रमांतही लाविलेलें असून, त्यावरून ह्यांची चौकस-बुद्धि चांगली व्यक्त होते. ह्या पुस्तकाची एक आवृत्ति संपून दुसरी निघाली-आहे, ह्यावरून त्या पुस्तकांतील गुणाधिक्य प्रत्ययास येईल. ह्या पुस्तकांतील **कै० टिळकांच्या** गीतारहस्यावरील अभिप्राय खालीलप्रमाणें आहे:—

" ... हा ग्रंथ रचण्यांत टिळक ह्यांनी फार श्रम घेऊन आपलें बुद्धिसामर्थ्य आणि थोर विद्वत्ता प्रदर्शित केली आहे. तथापि त्यांच्या वावदूक स्वभावामुळें ठिकाठिकाणीं त्यांनीं आपल्या विरुद्ध असलेल्या मतांचें खंडन करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळें ग्रंथांत चर्वीतचर्वण, पाल्हाळ, अनपेक्षीत प्रतिपादन वगैरे फार झालें आहे.........भाषेच्या आणि रचनेच्या दृष्टीनें हा ग्रंथ विषयाच्या आणि त्याच्या विद्वान् कर्त्याच्या योग्यतेस साजेसा झाला नाहीं..... या ग्रंथाच्या प्रचंडपणामुळें आणि मागें जे दोष सांगितले, त्यांमुळें तो लौकरच मागें पडण्याचा संभव आहे; इ०. "

**मोरो केशव दामले** यांच्या " शास्त्रीय मराठी व्याकरणा "वर टीका करितांना यांनीं ' घटनें 'त पुढील मत प्रदर्शित केलें-आहे—" या पुस्तकांत शास्त्रीय या नांवाखालीं पुष्कळ अशास्त्रीय गोष्टी दडपून दिल्या आहेत, व आत्मतेमुळें ग्रंथकारानें पूर्वीच्या व्याकरणकारांनीं व्याकरणाच्या शास्त्रीयतेसाठीं जे जे प्रयत्न केले, त्यांचें नीटपणे अवलोकन देखील केलें नाहीं. या पुस्तकांतील कित्येक प्रकरणें वाचून, ग्रंथकारांना व्याकरणशास्त्र म्हणजे काय हें सुद्धां नीट कळत नव्हतें, असें मोठ्या खेदानें म्हणणें भाग पडत आहे. या एवढ्या मोठ्या पुस्तकांत दुसऱ्याचें खंडण आणि उपहास करण्याचा प्रयत्न यांपलीकडे दुसरें कांहीं नाहीं. आपल्याखेरीज दुसऱ्या कोणास स्वतंत्र मत देण्याचा अधिकारच नाहीं, अशी दामल्यांची समजूत होती. या पुस्तकानें मराठी व्याकरणासंबंधीं गोष्टींचा निकाल तर लागला नाहीच, पण उलट बऱ्याच नवीन भानगडी मात्र उत्पन्न झाल्या आहेत. "

यांचीं एकंदरींत मतें ध्यानांत येण्यासाठीं व तीं अभ्यासून अजमावून पाहण्यासाठीं येथें दिलीं-आहेत. यांच्या व्याकरण-पुस्तकांबद्दल राजवाडे काय म्हणतात, तेंही खालीं नमूद केलें-आहे. अर्थात् ह्या भिन्न मतांबद्दल सर्व लेखकां-

विषयीं आदरबुद्धि बाळगूनच आपलें मत कोणींही बनवावें, एवढाच हेतु आहे. कारण, भिन्न मतें झालीं, तरी त्यांच्या प्रतिपादकांचा अभ्यास, उद्योग व कामगिरी ह्यांमुळें शास्त्रांत कांहीं ना कांहीं भर पडतेच; अतएव, भिन्न मतांमुळेंच केवळ कोणी आपले ग्रह बनविणार-नाहीं, हें उघड आहे. असो

**विश्वनाथ काशीनाथ राजवाडे**, यांनी दामले ह्यांच्या शास्त्रीय मराठी व्याकरणावर टीका करितांना मागील बहुतेक व्याकरणकारांचा थोडा-फार परामर्ष घेतला-आहे. त्यांत आपल्या "तिङ्त-विचारा"त पृष्ठ २ वर ते लिहितात—( दादोबा, कृष्णशास्त्री, चिपळूणकर व कृष्णशास्त्री गोडबोले " ह्या तीन वैय्याकरणांच्या नंतर **रामचंद्र भिकाजी जोशी**, आले. संस्कृत, प्राकृत, किंवा फारसी, अरबी, इंग्रजी, बंगाली किंवा हिंदी, ह्या भाषांपैकीं कोणत्याही एका किंवा अनेक भाषांचें ज्ञान नसतां, जितकें चांगलें व्याकरण एकादा शाळामास्तर करूं शकेल तितकें यांनीं केलें आहे. स्वभाषेचा अभिमान यांचे ठायीं बाळपणापासून असल्याकारणानें व टापटिपीनें नित्याचा लहान-सहान व्यवहार करण्याचा स्वभाव पडल्यामुळें, मराठी भाषेची यथाशक्ति सेवा करण्याचें कृत्य ह्यांनीं आरंभिलें व तें मराठी भाषेच्या व्याकरणाची बालबोध मांडणी करण्याच्या रूपानें फलद्रूप केलें ... .. इ०." राजवाडे यांचें सर्व मत जिज्ञासूंनीं मूळांतच पहावें व तुलावें

हे 'स्कूल लीव्हिंग् सर्टिफिकेट्' परीक्षेचें कांहीं वर्षें परीक्षक होते. यांनीं आपल्या बहिणीचा पुनर्विवाह केला; व तेव्हांपासून समाजसुधारकांत ते पुढें आले. ह्यांचे वडील व मातुःश्री हीं ह्या पुनर्विवाहाला पूर्वीं अतिशय विरुद्ध होतीं; पण पुढें तीं दोन्हीं पूर्ण अनुकूल झालीं; असें प्रो० **अण्णा कर्वे** ह्यांनीं सांगितलें, तें येथें मुद्दाम नमूद करण्यासारखें वाटल्यावरून तसें केलें-आहे. हे हल्लीं पुण्यांत "भाण्डारकर रिसर्च इन्स्टिट्यूट कॉलनी"मध्यें स्वतःच्या बंगल्यांत राहतात.

वरील माहिती **प्रो० धों० के० कर्वे** यांनीं सांगितल्याप्रमाणे लिहिली-आहे. खुद्द रामभाऊंनीं दिलेली नाहीं. यांतील उत्तरभाग मात्र त्या त्या पुस्तकांतून उद्धृत केलेला आहे. फोटो रामभाऊंची पुतणी सखूबाई ( **सौ० इंदिराबाई मायदेव** ) बी. एम्. सी. यांनीं दिला-आहे.

## १०. आप्पाजी काशिनाथ खेर.



हे पुण्याच्या भावे स्कूलमध्यें शिक्षक होते. शिक्षण बी० ए० पर्यंत झालें-होतें; व त्या संस्थेचे लाइफ-मेंबर होते. सन १९०३ च्या आक्टोबरमध्यें ते मृत्यु पावले. भावे स्कूलमधील जुने गृहस्थ दामूअण्णा नगरकर ( कसबा पेठ ) यांजकडून खेरांसंबंधीं एवढीच माहिती मिळाली. खेर हे कुलाबा जिल्ह्यांत कर्जतजवळ राहणारे असून, त्यांना गाण्याची फार आवड व तबला, सतार, हीं वाजविण्याचा बराच नाद होता. मूळचे गरीब. शिक्षण मधुकरी वृत्तीनें झालें; व नोकरी करून त्यांनीं कॉलेजचें शिक्षण संपादलें. कर्जतास यांनीं भावेस्कूलची एक शाखाही काढली होती; ती १९११ त बंद पडली. हे चांगले शिक्षक होते; व 'केसरी' वगैरे वर्तमानपत्रांतून रामभाऊ जोशी यांशीं त्यांचा व्याकरण-संबंधीं वाद चाले, असें म्हणतात. खेरांनीं मराठीचें इंग्रजींत व्याकरण लिहिलें-असून, इंग्रजी शिकणाऱ्या मॅट्रिकपर्यंतच्या विद्यार्थ्यांस त्याचा चांगला उपयोग झाला-आहे, यांत शंका नाहीं.

वर दिलेला यांचा फोटो ऐन वेळीं खेरांचे बंधु नेमाड प्रांतांत डे० ए० इन्स्पेक्टर आहेत, त्यांजकडून आला; पण अन्य माहिती वेळेवर हातीं आली-नाहीं; म्हणून देतां-आली-नाहीं. तसेंच, यांचे चिरंजीव गंधर्व नाटक मंडळींत होते, असें कळलें; पण पत्रें पाठवून तिकडूनही कांहीं मिळूं-शकलें-नाहीं.

---

## ११. रामचंद्र भिकाजी गुंजीकर.

सिंहासनबत्तिशी, वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, इत्यादि कथाग्रंथ सिद्ध होण्याचा वेळ संपल्यावर, बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर, सदाशिव काशीनाथ छत्रे, इत्यादिकांचें भाषांतरित ग्रंथ लिहिण्याचें युग लागलें. त्या युगांतल्या बऱ्याच पुढच्या-पण विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या थोड्या आधींच्या-वेळांत, जे चांगले मराठी ग्रंथकार झाले, त्यांपैकींच रामभाऊ गुंजीकर हे एक होत.

ह्यांचा जन्म १८ एप्रील १८४३ रोजीं बेळगांवापासून १६ मैलांवर 'जांबोटी' या गांवीं झाला. त्यांचें मराठी शिक्षण तेथेंच झालें. नंतर ते इंग्रजी शिकण्याकरितां १८५८ मध्यें बेळगांवास गेले. १८६० मध्यें त्यांची पब्लिक सर्व्हिसची परीक्षा उतरली. पुढें १८६३ पर्यंत ते मुंबईस एल्फिन्स्टन् हायस्कूलमध्यें अभ्यास करूं लागले. त्याच्या पुढच्याच वर्षीं त्यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा



पास झाली. नंतर ते एल्फिन्स्टन् कॉलेजांत गेले. परंतु तो विद्याभ्यासाचा क्रम त्यांस लौकरच मोडावा लागला. १८६६ त ते एल्फिन्स्टन् हायस्कुलांत असिस्टंट मास्तर झाले. तेथें त्यांनीं २२ वर्षं नोकरी केली. त्या मुदतींत त्यांचें काम वरिष्ठांस पसंत पडून, त्यांची बढती होत होत १८९० मध्यें त्यांस हुबळी येथील ॲंग्लो-व्हर्नाक्युलर स्कूलवर हेडमास्तर नेमिलें; आणि मग १८९५ त ते बेळगांव जिल्ह्याचे असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर झाले; व १८९८ मध्यें पेन्शन् घेतल्यापासून ते मुंबईस येऊन राहिले.

ह्यांची मुख्य कामगिरी म्हणजे "**विविधज्ञानविस्तार**" या नामांकित मासिकाला जन्म देणें ही होय, हे उत्तम मराठी ग्रंथकार होते; त्याचप्रमाणें चांगले मार्मिक संस्कृतज्ञही होते. त्यांचा 'कौमुदीमहोत्साह' हा ग्रंथ याची साक्ष देण्यास पुरे आहे. मोचनगड, सौभाग्यरत्नमाला, मराठी भाषेची लेखनशुद्धि, **सुबोधव्याकरण**, लाघवी लिपी, कन्नडपरिज्ञान, इ० त्यांनीं पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत भगवद्गीतेचें उत्तम भाषान्तर त्यांनीं केलें-आहे. ह्या ग्रंथाविषयीं ते आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हणतात-" थोर भाग्य पृथ्वीचें, म्हणून श्रीमद्भगवद्गीतेसारखा अद्वितीय पुण्यग्रंथ उपलब्ध झाला. त्याच्या योग्यतेचें वर्णन करण्याचें सामर्थ्य वाणीला नाहीं. केवळ अर्जुनाला बोध करण्याकरितां नव्हे, तर सर्व सृष्टीच्या उद्धारास्तव परमात्म्यानें ही अमूल्य देणगी देऊन-ठेविली-

आहे. तेव्हां अशा अमृतोपम ग्रंथाच्या पठनानें वाणी परिपूत करावी; जी कांहीं ग्रंथलेखनाची अल्पस्वल्प शक्ति त्याच्या प्रसादानें प्राप्त झाली-आहे, ती त्याच्याच सेवेमध्यें योजून तिचें सार्थक्य करावें: आणि त्या ग्रंथांतील अद्भुत अर्थाच्या चिंतनानें आत्म्याचा उद्धार करावा, या हेतूनें हें यथामति भाषांतर केलें-आहे." त्यांजकडे काव्यसंग्रहाचें संपादकत्वही कांहीं दिवस होतें. "संस्कृत भाषेचें व्याकरण" मराठींत लिहिण्यास त्यांनीं आरंभ केला-होता, परंतु त्यांच्या हातून तें पूर्ण झालें-नाहीं.

कै० जावजी दादाजी शेट-निर्णयसागर छापखान्याचे मालक-हे त्यांचे चांगले मित्र होते. त्यांनीं एक लहानसें मराठी मासिक पुस्तक काढावयाचें ठरविल्यावर, त्या मासिकास नांव काय द्यावें, ह्याचा विचार चालू असतां, "**बालबोध**" हें अगदीं यथार्थ नांव गुंजीकरांनीं सुचविलें. राष्ट्रहिताविषयीं त्यांचे विचार वरच्या दर्जाचे असत. १८७५ त त्यांनीं ज्ञानप्रसारक सभेमध्यें एक निबंध वाचिला. त्यांत त्यांनीं लोकांतल्या अज्ञानाचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें-आहे:—
"एक म्हणतो, शनिवारच्या दिवशीं चणे खाल्ल्यानें दरिद्र येतें; पण शुक्रवारच्या दिवशीं खाल्ल्यानें संपदा येते. एक म्हणतो, एकमुखी रुद्राक्ष जवळ असल्यानें संपत्ति येते. एक म्हणतो, शालग्राम पूजेला शंखोदक नसेल, तर कृष्ण परमात्म्याची प्राप्ति कधींहीं होणार नाहीं. एक म्हणतो, सोमवारीं श्मश्रु करविल्यानें पुत्ररत्न दृष्टीस पडतें. एक म्हणतो, काळें पागोटें बांधिल्यानें शनीची पीडा होत नाहीं. अशा हजारों वेडगळ क्षुद्र गोष्टींनीं आमच्या लोकांचीं मनें व्यापून टाकिलीं. मोठमोठीं कृत्यें आम्ही मुळींच विसरलों. सूर्य-चंद्राच्या ग्रहणांचा प्रकार नीट पाहण्याकरितां म्हणजे वेध घेण्याकरितां आधींपासून तयार राहणें व ईश्वराच्या अगाध शक्तीची स्तुति करणें ह्यांत जो काळ घालवावयाचा, त्याचा भलताच अर्थ होऊन, राहू-केतु हे सूर्य-चंद्रास भक्षितात; त्यांस त्या दैत्यांच्या मुखांतून सोडविण्याकरितां अनुष्ठानें करावीं; अशी समजूत झाली. ह्याप्रमाणें शास्त्रीय शोधांच्या अभावीं वेडगळ समजुती उराशीं बाळगून स्वस्थ राहणें हें आमच्या नाशास कारण झालें."

ह्यांस मराठी, इंग्रजी, कानडी व संस्कृत ह्या भाषा चांगल्या अवगत असून, शिवाय बंगाली, गुजराथी व उर्दू ह्याही भाषा येत-होत्या. त्यांचा व्यासंग मोठा असे ते स्वभावानें साधे, मनमिळाऊ, शांत व उद्योगी होते. शेवटीं ते बेळ-

गांवास असतां, त्यांचा बी० ए० पर्यंत पोंचलेला वडील मुलगा एकाएकीं मृत्यु पावला; त्यामुळें त्यांस मोठा धक्का बसून, त्यांची प्रकृति ढासळत-चालली. आणखी एक-दोन असेच दुःखाचे प्रसंग त्यांजवर आले. पुढें १९०१ च्या जून-च्या १६ व्या तारखेस नेहमीप्रमाणें ते बरे होते; आणि त्या दिवशीं सायंकाळीं ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक उत्सवाचें अध्यक्षस्थानचें काम पार पाडून रात्रीं ते घरीं आले, व दुसऱ्या दिवशीं अकस्मात् त्यांस पक्षघात झाला. पुष्कळ उपाय झाले, पण रोगाचें पाऊल क्षणोक्षणीं पुढेंच पडून १८ तारखेस ते मृत्यु पावले. ( बा० बो० ).

मराठीचें '**सुबोध व्याकरण**' व '**लेखनशुद्धि**' ह्या पुस्तकांशिवाय त्यांनीं विविधज्ञानविस्तारांत रामचंद्र भिकाजी जोशी यांच्या व्याकरणावर जे निबंध लिहिले, ते थोरल्या शास्त्रीबोवांच्या निबंधांच्या तोलाचे आहेत. व्याकरणासारख्या रूक्ष विषयावर, कादंबऱ्यांसारखे करमणुकीचे विषय सोडून देऊन, मासिकांतून लिहिण्याचें व चर्चा करण्याचें कोणीच मासिककार पत्करणार नाहीं; परंतु विविधज्ञानविस्तारांत यांनीं अशा प्रकारचे व इतर वाङ्मयविषयक पण भारदस्त आणि विद्वत्ताप्रचुर लेख लिहिण्याचें वळण घालून-दिलें; तें अजून चालू असून, वाङ्मयवृद्धीस अत्यन्त उपकारक आहे; हें सांगणें-नकोच.

यांच्या "**सुबोध व्याकरणा**" संबंधीं पुस्तक प्रत्यक्ष पाहून जें काय वाटले, तें दुसरीकडे दिलेंच-आहे.

---

## १२. प्रि० गोपाळ गणेश आगरकर.

ह्या थोर पुरुषाचा जन्म सातारा जिल्ह्यांतील 'टेंभू' या गांवीं सन १८५६ मध्यें झाला. गोपाळरावांचे आजे बच्चाजीपंत हे चांगले श्रीमंत होते; पण वडील गणेशपंत ह्यांचे वेळीं ह्या कुटुंबास अत्यन्त गरिबीची स्थिति आली. आईचें नांव सरस्वतीबाई. प्राथमिक शिक्षण **टेंभू** येथेंच झालें. मग ते कऱ्हाडास आपल्या मामांकडे इंग्रजी शिकण्यासाठीं गेले तेथें इंग्रजी तीन इयत्ता झाल्यावर गरीबी-मुळें ते तेथील कोर्टांत उमेदवार झाले; पण शिकण्याची तीव्र इच्छा म्हणून रत्नागिरीस गेले. तेथें वार लावून, प्रसंगीं शागिर्दी करून, व हाल-अपेष्टा सोसून, त्यांनीं तेथलें शिक्षण संपादिलें; पण अखेर त्यांस पुनः कऱ्हाडास परत

यावें—लागले. मग त्यांनी तेथें कंपौंडरची नौकरी धरिली. पुढें त्यांचे थोरले मामा ह्यांनी त्यांस वऱ्हाडांत अकोलें येथें आपल्या भावाबरोबरच इंग्रजी शिक्षणासाठीं नेलें. तेथें हेडमास्तर **विष्णु मोरेश्वर महाजनि** हे, त्यांना शाळेस यावयास एकदां उशीर झाला म्हणून म्हणाले कीं, " तुमच्या हातून काय होणार—आहे ? तुम्ही असेंच रखडत पडणार. " यावर त्यांनीं तावडतोब उत्तर केलें,—



" आपल्यासारखा एम्० ए० होईन तरच नांवाचा आगरकर." हे उद्गार त्यांनीं पुढें खरे करुन दाखविले. अकोल्यास मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यानंतर पुढें ते पुण्यास डेक्कन् कॉलेजांत आले. तेथें येण्याकरितां इकडून—तिकडून त्यांनीं ५० रु० जमाविले—होते, ते केव्हांच उडाले. मग त्यांनीं पुण्याच्या वक्तृत्वोत्तेजक सभेंतलें बक्षिस ५० रु० मिळविले; तसेंच, कॉलेजांतील एका निबंधाचेंही ५० रु० बाक्षस मिळविलें; पण एवढ्यानें निभाव कसा लागणार ? तात्पर्य, कॉलेजांत असतां फी देण्याचीही त्यांना अडचण पडे; पण **केरूनाना छत्रे** हे विद्यार्थ्यांचे मोठे साह्यकर्ते असल्यामुळें त्यांनीं त्यांस वेळोवेळीं मदत करावी. रात्रीं सदरा धुवून, दुपारीं तो अंगांत घालावा; असल्या हाल–अपेष्टेंत आपलें अध्ययन यांनीं संपविलें. कॉलेजांत असतांच, **टिळकांचा** व त्यांचा स्नेह जमला; आणि वाटल्या धुण्याचा व खर्डेघाशीचा अनुभव त्यांस पूर्वीच आल्यामुळें, त्यांनीं आपला आयुष्यक्रम निश्चित करुन, लोकशिक्षणाचे कार्यार्थ देह झिजविण्याचा संकल्प केला. घरच्या गरीबीची परवा न करितां, "**न्यू इंग्लिश स्कूल**" काढण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला.

देशोन्नतीच्या कामीं प्रयत्न करणाऱ्या न्यू इंग्लिश स्कूलच्या ह्या पहिल्या संस्थापकांत कै० **धाकटे शास्त्रीबोवा, आगरकर** व **टिळक** ह्या त्रिमूर्तीचीं नांवें विसरलीं जाणें शक्य नाहीं. ह्या त्रिमूर्तीच्या व आणखी कांहीं येऊन मिळालेल्या माणसांच्या धडाडीमुळें, न्यू इं० स्कूल पहिल्या प्रतीचे बनलें; त्याची विलक्षण भरभराट झाली व मुख्य संस्थापक विष्णुशास्त्री चिपळूणकर निवर्तल्यावर पुढें ह्या मंडळींनीं **डेक्कन एज्युकेशन सोसायटी** स्थापन करून, **फर्ग्युसन कॉलेज** काढिलें. वामन शिवराम आपटे ह्यांच्या मागून **आगरकर** ह्यांस त्या **कॉलेजचे** प्रिन्सिपल नेमण्यांत–आलें. ह्या अध्यापनाच्या कामाबरोबरच त्यांनीं लोकजागृतीचें कार्यही आमरण चालविलें. " **केसरी** " पत्राचे ते संपादक होते, त्यावेळीं कोल्हापूर संस्थानच्या परिस्थितीसंबंधीं कांहीं लेख लिहिण्यांत–आले; त्या बाबतींत त्यांजवर खटला होऊन, त्यांस व टिळक यांस डोंगरी येथें १०१ दिवस तुरुंगवास भोगावा–लागला. तुरुंगांत असतांच आगरकरांनीं ' विकारविलसित ' ऊर्फ ' **हॅम्लेट** ' हें नाटक लिहिलें; तें किती उत्कृष्ट उतरलें आहे, हें निराळें लिहिण्यास–नकोच. तसेंच त्यांनी " **तुरुंगांतील आमचे १०१ दिवस**" हें पुस्तकही प्रसिद्ध केलें–आहे.

" **केसरी**" पत्रांत संपादक या नात्यानें टिळकांचाही संबंध होता; त्यावेळीं पुढें पुढें ह्या दोघां वीरांचा अनेक गोष्टींत मतभेद होऊं लागला. म्हणून आगरकरांनीं केसरीशीं आपला संबंध तोडून टाकून " **सुधारक** " नांवाचें वर्तमानपत्र काढिलें; ( १८८८ ). त्यांतील भाषा व लेख सामाजिक आचार–विचारांत अत्यन्त परिणामकारक व क्रांतिकारक झाले–आहेत, हें स्पष्ट दिसतच–आहे. ह्यांचा शेवट दम्याच्या वडिलार्जित विकारानें व शेवटीं उदर होऊन, १७ जून १८९५ रोजीं झाला. त्यांचें "**वाक्यमीमांसा** " हें पुस्तक व्याकरणविषयाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे; आणि त्यांनींच वाक्यांतील शब्दांचा परस्परसंबंध याविषयीं इंग्रजी धर्तीवर मराठींत हें पुस्तक लिहून, आतांपर्यंत मराठी व्याकरणास न मिळालेली वाक्यपृथक्करणाची जोड करून–दिली–आहे. तें १८८८ त छापिलें.

त्यांच्या एकंदर सामाजिक कर्तृत्वाविषयीं खालील उद्गार काढितात—"सुधारक व आगरकर हीं नांवें आतां सर्वांस परिचित आहेत. सॉक्रेटीस, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, ह्या पूर्वीच्या सुधारकांचा जसा छळ झाला, त्याचप्रमाणें आगरकरांचाही झाला. त्यांना ठार मारण्याची सुद्धां धमकी देण्यांत–आली–होती. शिमग्यांत जिवंतपणीं त्यांची प्रेतयात्रा काढली–गेली; कां तर सामाजिक

विवेकदृष्टि जागृत करण्याचा व विकारवशतेचा महाराष्ट्रांतून कडेलोट करण्याचा त्यांनीं आपल्या लेखांच्या द्वारें खटाटोप केला म्हणून ! कांहीं असलें, तरी पूर्वकालीन ब्राह्मणांप्रमाणें खरी वैराग्यवृत्ति स्वीकारून; धन, मान, सुख, वैभव, लोकभीति यांस दूर सारून; सदाचरणाचें कडकडीत व्रत आचरून; हा महाभाग पुरुष अकालीं निजधामास गेला; ही त्यांची कीर्ति मात्र आज राहिली आहे. ''

## १३. कै० मोरो केशव दामले.



प्रसिद्ध ''**शास्त्रीयमराठी व्याकरण**''या ग्रंथाचे हे कर्ते आहेत. यांचा जन्म शके १७९० म्ह० सन १८६८ कार्तिक वद्य ७ या दिवशीं रत्नागिरी जिल्ह्यांत 'मालगुंड' या गांवीं झाला. त्यावेळीं त्यांचे वडिल **केसो विठ्ठल दामले,** हे तेथील सरकारी मराठी शाळेवर हेडमास्तर होते. **मोरोपंत** हे त्यांचे सहावे चिरंजीव. लहानपणीं तेराव्या–चवदाव्या वर्षापर्यंत त्यांचें मराठी शिक्षण दाभोळ येथील शाळेंत झालें. दाभोळचे **पेठे** यांजकडे त्यांची एक आत्या दिलेली होती, तिला मूल–बाळ कांहीं नसल्यामुळें, तिनेंच लहानपणीं मोरोपंत यांचें संगोपन केलें. पुढें ते चौदा वर्षांचे झाले, त्या सुमारास त्यांचे एक वडील बंधु **श्रीधर केशव दामले,**हे मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजांतून बी०ए०पास झाले होते.रत्ना–

गिरी हायस्कूलमधून ते मॅट्रिकच्या परीक्षेंत पास झाले, तेव्हां श्रीधरपंतांना जगन्नाथ शंकरशेट यांची पहिल्या नंबरची संस्कृत स्कॉलरशिप् मिळाली होती. याप्रमाणें ते संस्कृत व गणित या विषयांत आरंभापासून तरबेज असत; ह्यामुळें १८८१ त बी० ए० झाल्यावर लगेच त्यांना (श्रीधरपंतांना) १८८२ च्या सुमारास बडोदें येथें नुकत्याच स्थापन झालेल्या "बडोदा कॉलेज"मध्यें संस्कृत भाषेचे प्रोफेसर म्हणून नेमण्यांत आलें होतें. ह्या वडील बंधूंची नेमणूक बडोद्यास झाल्यामुळें, मोरोपंत हे त्याच वर्षी त्यांचे दुसरे एक बंधु **कृष्णाजी केशव दामले**, किंवा प्रख्यात कवि **'केशव-सुत'** ह्यांच्याबरोबर इंग्रजी शिक्षणासाठीं बडोद्यास गेले. बडोद्यास जाण्यापूर्वीच त्यांचा विवाह त्यांच्या चौदाव्या वर्षीच कोंकणांत उरकून घेण्यांत आला होता. बडोदें येथील शिक्षणाचा लाभ मोरोपंत यांना फार दिवस लाभला नाहीं. कारण त्यांचे प्रोफेसर असलेले वडील बंधु हे एका वर्षाच्या आंतच विषम-ज्वराला बळी पडले; परंतु त्यांनीं आठ-दहा महिन्यांच्या अवधींतच आपल्या दोघांही धाकट्या भावांना इंग्रजी ३ तीन इयत्तांपर्यंतचें शिक्षण घरच्या घरींच देऊन ठेविलें होतें. श्रीधरपंत हे आपल्या धाकट्या भावांना इंग्रजी शिकवीत, तेव्हां त्यांच्याच घरीं, श्री० **सयाजीराव महाराज गायकवाड** यांचे धाकटे बंधु श्री० **संपतराव** हे इंग्रजी शिकण्यास येत असत. तेव्हांपासून मोरोपंतांची श्री० **संपतराव** यांच्यांशीं ओळख व मैत्री झाली होती; तिचा त्यांना पुढें फार उपयोग झाला.

वडील बंधु एकाएकीं वारल्यामुळें, **मोरोपंत** व **केशवसुत** हे दोघेही कोंकणांत परत आले. त्यांच्या शिक्षणाची पुढें व्यवस्था कशी करावी, याची त्यांचे वडिलांना मोठी काळजी व चिंता पडली. त्यावेळीं मोरोपंत यांचे एक सख्खे मामा **रामचंद्र गणेश करंदीकर**, हे मध्यप्रांतामध्यें वर्धा येथें वकील होते, ते चांगल्या भरभराटीच्या स्थितींत असल्यामुळें, त्यांजकडे **केशवसुत** व **मोरोपंत** ह्यांची रवानगी करण्यांत आली. तरी खुद्द वर्धा येथें त्या काळीं इंग्रजी शिक्षणाची विशेष चांगली सोय नव्हती, म्हणून त्यांना नागपूर येथें पाठविण्यांत आलें. नागपूर येथें **मोरोपंत** हे फारच थोडे दिवस राहिले, कारण, नागपूर येथील कडक उन्हाळा त्या दोघां बंधूंना फारसा मानवेना. तेव्हां **केशवसुत** हे शिक्षणासाठीं पुण्यास गेले; व **मोरोपंत** हे उमरावतीच्या हायस्कुलांत इंग्रजी चवथ्या इयत्तेंत दाखल झाले. उमरावतीस लौकरच त्यांना दरमहा पांच रुपयांची एक स्कॉलरशिप् मिळाली. उमरावती हायस्कूलमधून ते सन १८८७ च्या

अखेर मॅट्रिकची परीक्षा पास झाले व १८८८ सालीं डेक्कन् कॉलेज-मध्यें प्रविष्ट झाले. त्यावेळीं डॉ० भाण्डारकर, प्रि० सेल्वी वगैरे मंडळी त्या कॉलेजांत अध्यापक होती. पहिल्या वर्षी ते प्रीव्हिअस्मध्यें नापास झाल्यामुळें एक वर्षपर्यंत डेक्कन् कॉलेजांत होते व १८८९ सालीं पी० ई० परीक्षा सेकंड् क्लास-मध्यें पास होऊन, १८९२–९३ सालीं, त्याच कॉलेजांत ते दक्षिणा फेलो होते. त्यांच्याबरोबर प्रो० बी० के० ठाकोर, प्रो० शिवरामपंत परांजपे, ही मंडळी-देखील त्यावेळच्या फेलोंमध्यें होती. १८९३ अखेर ते एम्० ए० ची परीक्षा पास झाले. एम्० ए० च्या परीक्षेस बसण्यापूर्वींच म्हणजे १८९३ च्या सप्टेंबर–ऑक्टो-बरच्या सुमारास त्यांना उज्जन येथील "माधव कॉलेजांत" लॉजिक् व फिलॉ-सफी या विषयांच्या प्रोफेसरीची जागा मिळाली. सन १८९४ पासून १९०७ अखेरपर्यंत म्हणजे चौदा वर्षें ते या जागेवर होते. १२५पासून २०० रु० पर्यंत या अवधींत त्यांचा पगार वाढला होता; परंतु उज्जन हें गांव **विक्रमादित्याच्या** वेळीं विद्या, कला, इत्यादिकांनीं भरभराटलेलें असलें, तरी आजच्या मानानें फारच मागासलेलें असल्यामुळें व तेथील कॉलेजचे वर्ग–म्हणजे इंटरमिजिएट् व बी० ए० चे वर्ग–बंद होऊन, माधव कॉलेज् हें फक्त हायस्कूलच्याच स्वरूपाचें उरल्यामुळें, ते ती नोकरी सोडून दुसरीकडे जाण्याचा प्रयत्न करीत असत. १९०८च्या सुरुवातीस नागपूर येथील सिटी स्कूलवर सुपरिंटेंडेंट् किंवा हेड्मास्तर म्हणून त्यांस नेमण्यांत–आलें. याच जागेवर ते अखेरपर्यंत होते. तेथें त्यांस दरमहा ३०० रुपये पगार मिळत असे.

यांचा अंत १९१३ सालीं रेल्वेच्या अपघातांत अगदीं आकस्मिक रीतीनें झाला. त्या सालच्या मे महिन्याच्या सुटींत ते उन्हाळ्याकरितां आपलें कुटुंब व सर्वांत धाकटी ५–६ वर्षांची मुलगी रत्नप्रभा यांना घेऊन, आपले धाकटे बंधु **सीताराम केशव दामले** यांच्याकडे महिना–दीड महिना राहण्यासाठी नागपूर येथून ता० २९ एप्रील रोजीं रात्रीं ९ वाजण्याच्या पॅसेंजरनें निघाले. ही गाडी ता० ३० च्या सकाळीं पांच वाजण्याच्या सुमारास अकोल्याच्या जवळील 'बोरगांव' नांवाच्या लहान स्टेशनापर्यंत येऊन पोंचली होती; परंतु त्या स्टेशनच्या जवळच सिग्नलरच्या चुकीमुळें ती गाडी भर वेगामध्यें असतां-नाच, त्या स्टेशनांत उभ्या असलेल्या एका मालगाडीवर येऊन आदळली. पॅसें-जर गाडीचे बरेच डबे चक्काचूर होऊन मोडले व उलथून पडले. अपघाताच्या वेळीं **मोरोपंत** व त्यांचें कुटुंब हीं दोघेंही गाढ निद्रेंत असल्यामुळें, अपघात

होत आहे याची त्यांना जाणीव नसतांनाच, एका उलथलेल्या डब्यांत मृत्यु-मुखीं पडलों. आगगाडींतील इतरही कित्येक उतारू मृत्युमुखीं पडले; व जखमी झाले. **मोरोपंत** यांची धाकटी मुलगी केवळ ५–६ वर्षांची असूनही, परमेश्वर-कृपेनें आगगाडीच्या डब्यांतून बाहेर फेकली जाऊन, रेल्वे-लाइनीच्या बाजूला कांहींएक दुखापत न होतां, सुरक्षितपणें येऊन पडली. अशा अत्यंत चमत्कारिक व हृदय-भेदक रीतीनें **मोरोपंत** यांजवर आकस्मिकपणें मृत्यूचा घाला पडला. मृत्युसमयीं त्यांचें वय जवळ जवळ ४५ वर्षांचें होतें. त्यांच्या मागें त्यांच्या तीन मुली व एक मुलगा अशीं अपत्यें पोरकीं होऊन राहिलीं. त्यांचे एक जांवई दामोदर व्यंकटेश घारपुरे हे हल्लीं वर्धा येथें नामांकित वकील आहेत. **मोरोपंतांचा** मुलगा '**दत्तात्रेय**' हा त्यावेळीं फक्त दहा वर्षांचा होता व बाकीच्या दोन मुली आठ व सहा वर्षांच्या होत्या.

**मोरोपंत** हे लहानपणापासून हुशार विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध असत. कॉलेजांत त्यांच्यावर डॉ० **भाण्डारकर** व प्रि० **सेल्बी** यांची विशेष मेहेरबानी असे; व माधव कॉलेजांतील जागा त्यांना ह्या दोन गुरुवर्यांच्या शिफारशीमुळेंच मिळाली होती. कॉलेजांत असतांना त्यांना नेहमींच स्कॉलरशिप् मिळत नसे; तेव्हां कॉलेजचा खर्च चालविण्याची मोठी पंचाईतच पडे. एका वर्षी त्यांना उमरावतीचे प्रसिद्ध वकील **सर मोरोपंत जोशी** यांनीं दरमहा दहा रुपयांप्रमाणें मदत केली होती. सर मोरोपंत हे श्रीधर केशव दामले यांचे सहाध्यायी होते; आपल्या मित्राचे धाकटे भाऊ म्हणून त्यांनीं हें द्रव्यसाह्य केलें. ही सवाशें रुपयांची रक्कम पुढें डेक्कन् कॉलेजांत फेलोशिप् मिळाल्यावर मोरोपंत यांनीं परत केली.

मोरोपंत यांना तर्कशास्त्र किंवा न्याय व व्याकरण या विषयांची प्रथमपासूनच फार आवड असे. त्यांनीं Deductiv व Inductive अशा लॉजिकच्या दोन्ही प्रकारांवर दोन ग्रंथ मराठीमध्यें लिहिले आहेत व ते बडोदें येथें प्रसिद्ध झाले होते. Logic या शब्दाला ते न्यायशास्त्र हा संस्कृत शब्द योजीत-असत. Deductive logic किंवा Deduction याला त्यांनीं निगमन व Induction याला विगमन असा पर्यायशब्द लाविला होता. **प्रो० गज्जर** यांनीं सयाजी ज्ञानमंजूषा नांवाची जी ग्रंथमाला गायकवाड सरकार यांच्या आश्रयाखालीं प्रसिद्ध केली, त्या मालेमध्यें सन १८९५ च्या सुमारास त्यांचा निगमन या न्यायशास्त्राच्या पद्धतीवरील ग्रंथ प्रसिद्ध झाला होता; व त्या ग्रंथाबद्दल

त्यांना गायकवाड सरकाराकडून १५० रुपयांचें पारितोषिक मिळालेंहोतें. Inductive Logic वरील त्यांचा ग्रंथ बडोद्याचे व सध्यां मुंबईचे प्रकाशक **दामोदर सावळाराम यंदे** यांच्या मार्फत प्रसिद्ध झाला असावा; किंवा बडोद्याच्या सहविचारिणी सभेच्या ग्रंथमालेंतून प्रसिद्ध झाला असावा. या ग्रंथांशिवाय बर्कच्या Present Discontents आधुनिक असंतोष या पुस्तकाचें त्यांनीं मराठी भाषान्तर प्रो० विजापूरकर यांच्या "ग्रंथमाला" मासिकांतून प्रसिद्ध केलें होतें. शिवाय याच मासिकामध्यें ते कधीं कधीं 'विचार-भ्रमण' या मथळ्याखालीं निबंध लिहीत असत. **शुद्धलेखन सुधारणा** अथवा सरकारी वेडावा यासंबंधींचे त्यांचे परिणामकारक लेखहि या मासिकांतच प्रसिद्ध झाले होते.

त्यांचा सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे "**शास्त्रीय मराठी व्याकरण**" हा होय. हा जवळ जवळ एक हजार पृष्ठांचा विस्तृत ग्रंथ आहे. मराठी व्याकरणावर एवढा विस्तृत व सांगोपांग असा ग्रंथ आजपर्यंत दुसऱ्या कोणींही रचिलेला नाहीं. म्हणूनच मराठी भाषेच्या व्याकरणांमध्यें या ग्रंथाला उच्च स्थान प्राप्त झालेलें-आहे. या ग्रंथाविषयीं स्तुतिपर व प्रशंसापर उद्गार वऱ्हाडांतील शाळाखात्याचे एक वरिष्ठ अधिकारी कै० रा० ब० **विष्णु मोरेश्वर महाजनि** यांनीं एका शिफारसपत्रांत काढिले आहेत; परंतु एवढा व्याकरण-ग्रंथ छापण्याला त्यांना कोणी छापखानेवाला किंवा प्रकाशकच मिळणें दुरापास्त झालें होतें. अखेर मुंबईच्या '**इंदुप्रकाश**' छापखान्याचे मॅनेजर शेट **दामोदर सावळाराम यंदे** यांनीं तो ग्रंथ सन १९०८ मध्यें छापून प्रसिद्ध केला. हा ग्रंथ मुंबईस छापून-निघत होता, तेव्हां मोरोपंत हे स्वतः मुंबईस प्रुफें तपासण्यासाठीं एक-दोन महिने मुंबईस येऊन राहिले होते. या ग्रंथाप्रीत्यर्थ त्यांना स्वतःला एक पैचा देखील मोबदला मिळाला नाहीं. त्यांनीं केवळ ग्रंथ तयार झालेला होता व इतकी मेहनत कित्येक वर्षें तो ग्रंथ तयार करण्यासाठीं त्यांनीं केली होती, म्हणून तो कसाबसा छापून तरी प्रसिद्ध होऊन विद्वानांपुढें यावा, म्हणून त्याची प्रथमावृत्ति काढण्याची परवानगी प्रकाशकांस मोफत दिली होती. आतां सोळा वर्षांनंतर त्या पुस्तकाची प्रथमावृत्ति संपून गेल्यामुळे, दुसरी आवृत्ति पुनः प्रकाशकांकडून प्रसिद्ध होत आहे. ग्रंथ फारच मोठा व विस्तृत असल्यामुळें, तो शाळांतून किंवा कॉलेजांतून अभ्यासक्रमासाठीं लावितां येत नाहीं. हा ग्रंथ व्याकरणशास्त्राचे जे तज्ज्ञ व प्रोफेसर किंवा शिक्षक आहेत, त्यांना एक प्रमाणभूत ग्रंथ

( Book of reference ) म्हणून उपयोगी पडण्यासारखा आहे. त्याची इतकी मोठी योग्यता असल्यामुळेंच राजाश्रयाशिवाय किंवा एकाद्या धनाढ्याच्या मदतीशिवाय असा ग्रंथ छापून निघणें देखील कठीणच असतें. अशा ग्रंथांना पुस्तकांच्या भर बाजारांत फारसें गिऱ्हाईक नसतें.त्यांचा उपयोग शाळा, कॉलेजें, विद्यापीठें यांच्या ग्रंथसंग्रहालयांतच विशेष होण्यासारखा असतो.

**कै० मोरो केशव दामले** हे प्रथम कॉलेजच्या पी० ई० परीक्षेंत नापास झाले, तेव्हां पुढें शिक्षणक्रम चालविण्याचा खर्च कसा चालवावा, याविषयीं मोठी अडचण वाटल्यामुळें, ते श्री० **संपतराव गायकवाड** यांना भेटले. मोरोपंतांचे वडील बंधूंकडे श्री० **संपतराव** हे मागें इंग्रजी शिकण्यास येत असल्यामुळें, त्यांची व मोरोपंतांची चांगली ओळख झाली होती; हें मागें आलेंच आहे. ती पूर्वीची ओळख ध्यानांत घेऊन, श्री० **संपतराव** यांनीं दरमहा पंधरा रुपयांप्रमाणें आपल्या बालपणच्या सहाध्यायी मित्रास दोन वर्षेपर्यंत दिले. श्री० **संपतराव** हे राजघराण्यांतील असून, त्यांनीं लहानपणची ओळख जाणली व आपल्या गरीब बालमित्राला अडचणीच्या प्रसंगीं विद्यार्जनाच्या कामीं मदत केली या औदार्याबद्दल मोरोपंत हे नेहमीं त्यांना धन्यवाद देत असत.


ग्रॅज्युएट् झाल्यानंतर ऐन तारुण्याच्या उमेदीमध्यें इतर इंग्रजी विद्याविभूषितांप्रमाणेंच मोरोपंत साधारणतः धर्माच्या बाबतींत कोणताही कर्मठपणा आचरीत नसत; परंतु सन १९०१-२ सालांमध्यें त्यांना एका साधूच्या सहवासानें स्नान, संध्या, पूजा, नैवेद्य, वैश्वदेव, सोवळें, ओंवळें, वगैरे सर्व जुन्या धार्मिक श्रद्धेचे प्रकार करण्याची हौस उत्पन्न झाली; व पुढें त्यांनीं नेहेमीं अगदीं कर्मठपणानें वागण्याचा परिपाठ ठेविला होता. **दत्तात्रेय** या दैवताची ते विशेष भक्तिभावानें आराधना करीत असत व गुरुचरित्र या भक्तिपर ग्रंथाचे सप्ताह त्यांचे नेहमीं चालू असत. त्यांच्या कित्येक स्नेह्यांना व नातलगांना ह्याबद्दल आश्चर्य वाटे; परंतु धार्मिक बाबतींत वयपरत्वें मनुष्याच्या आचार-विचारांत पुष्कळ वेळां विलक्षण फेरबदल झालेले पाहण्यांत येतात; अत्यंत नास्तिक आणि धर्माची व जुन्या कर्मठपणाची टवाळी करण्यांत भूषण मानणारे कित्येक सुधारक तारुण्याचा अविचारीपणा संपल्यानंतर सर्व जुना आचार पाळतांना केव्हां केव्हां आढळून येतात; कित्येक खऱ्या किंवा खोट्या साधूंच्या नादीं लागून त्यांचा गुरुमंत्र घेतात; त्याप्रमाणेंच मध्यम वयांत मोरोपंतांच्या आचार-विचारांत हा

जो थोडा बदल झाला, त्याबद्दल कांहीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. ते जुन्या आचार-विचारांचे कट्टे भक्त झाले होते; त्याचप्रमाणें ते अत्यन्त निस्सीम असे मातृभक्त होते. ते आपल्या मातुःश्रींची सेवा-चाकरी स्वतः करीत व तिच्या वृद्धापकाळीं त्यांनीं तिला काशी, प्रयाग, गया, मातृगया वगैरे तीर्थयात्रांकरितां स्वतः नेऊन आणिलें-होतें. मोरोपंत यांना पान, तंबाखू, विडी, सुपारी किंवा चहा, यांपैकीं कोणतेंही व्यसन नव्हतें; आणि त्यांचें आचरण सर्वस्वीं निष्पाप, निष्कलंक व पवित्र असे. इतकें सदाचरण फारच थोड्यांत आढळून येतें.

मोरोपंतांसंबंधीं ही माहिती त्यांचे बंधु प्रसिद्ध माजी " राष्ट्रमत " कर्ते **सीताराम केशव दामले** यांनीं लिहून दिलेली आहे; ती तशीच येथें उतरली आहे.

यांचा शास्त्रीय व्याकरणाचा ग्रंथ मुंबईस इंदुप्रकाशांत छापत असतां, प्रस्तुत लेखकाशीं त्यांच्या पुस्तकाचीं प्रुफें तपासण्याचे बाबतींत त्यांचा परिचय जडला-होता. त्या अवधींत " विद्यार्थ्यांसाठीं आपण व्याकरण-पुस्तकें कां तयार करीत-नाहीं ? " असें मीं त्यांस विचारिलें-होतें. त्यावेळीं " हें शास्त्रीय मराठी व्याकरणाचें काम मी करून ठेवितों; तुम्ही यावरून पाहिजे तर विद्यार्थ्यांकरितां पुस्तकें लिहा " असें त्यांनीं मला सांगितलें-होतें. त्याचप्रमाणें प्रस्तुत लेखकाचें ठाणें जिल्ह्यांतील पनवेल जवळचें गांव ' बेलापूर ' येथें घर व जमीन विकत घेऊन, तेथें स्थायिक राहण्याचा त्यांचा विचार होता; हेंही मला माहीत आहे. कारण, मोरोपंतांचे मृत्यूपूर्वीं ४।५ वर्षे व नंतर निदान २।३ वर्षे त्यांचे कोंकणांतील सर्वांत वडील बंधु आमच्या गांवीं भातखंडे यांचे घरीं येऊन-राहिले-होते; आणि **रा॰ केशवराव पाटणकर** यांची जमीन विकत घेण्याचें ठरलें-होतें. दोन हजार रुपये बयाणाही दिला-गेला-होता; परंतु दुर्दैवानें मागील चरित्रांत आल्याप्रमाणें ते इकडे जमीन-खरेदीसाठीं आणखी दहा-पांच हजार रुपये बरोबर घेऊन येत असतां, त्यांचा रेल्वेच्या अपघातांत अंत झाला, आणि ते आमचे ग्रामस्थ होण्याचें भाग्य आम्हांस लाभलें-नाहीं !

# १४. कै० विश्वनाथ काशीनाथ राजवाडे.



ह्या गृहस्थांचें खरोखर संपूर्ण चरित्र लिहावयाचें म्हणजे तो एक टिळक-चरित्रासारखा मोठाच ग्रंथ होईल. कारण, ह्यांची प्रत्येक हालचालच मुळीं विचार करणाऱ्या माणसाला खळबळवून सोडणारी आहे. तशीच ती आदर्शवत् व परिस्थितीची यथार्थ जाणीव करून देणारी आहे. या ठिकाणीं त्यांचें विस्तृत चरित्र देण्यास जागा नाहीं. शिवाय, आपलें चरित्र लिहिलें-जावें, अशी त्यांची स्वतःचीच इच्छा नव्हती; आणि त्यांच्या इतर महत्त्वाच्या प्रचंड कार्यसागरा पुढें त्यांना ह्या चरित्राकडे पाहण्याचीही फुरसत सांपडणें शक्य नव्हतें. ह्या सर्व कारणांमुळें ह्या मोठ्या व महाराष्ट्रास ललामभूत अशा गृहस्थांचें चरित्र अहिताग्नि **शंकरराव रजावाडे** ह्यांजकडून मिळवून, त्यांस दाखवून, व कांहीं कांहीं मतांसंबंधाचा भाग खुद्द चरित्रविषय राजवाडे ह्यांच्या ग्रंथांतून उतरून घेऊन, येथें दाखल केला-आहे.

**विश्वनाथ काशीनाथ राजवाडे** यांचा जन्म शके १७८६ आषाढ शु० १८ सन १८६४ मध्ये झाला. राजवाड्यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांत देवरुख तालुक्यांत 'निवें' म्हणून आहे; पण ह्या राजवाड्यांचें घराणें देशावर येऊन पुष्कळ दिवस झाले-होते. पुण्याजवळचें वडगांव येथें ह्यांचे चुलते व वडील राहत-असत. दोघेही मुखत्यार-वकिलीचें काम करीत. त्यांची मातुःश्री व वडील ह्या उभयतांनाही फिट्स् येत-असत. ह्यामुळें **विश्वनाथपंतांचाही** स्वभाव त्यांच्याप्रमाणेंच थोडासा तऱ्हेवाईक बनला-असावा. वडील पुण्यांतील ओंकारे-

श्वराचे गच्चीवरून पडून बेशुद्ध होऊन मृत्यु पावले. त्यांचें लग्न बुकसेलर **दादा गोडबोले** यांच्यांपैकीं गोडबोले घराण्यांतील मुलीशीं झालें-होतें. ती बाळंतपणांत लौकरच वारली. विश्वनाथपंत हे बी० ए० झाल्यावर न्यू० इं० स्कूलमध्यें सुमारें १२ वर्षे शिक्षक म्हणून होते. त्यावेळीं " तुमच्या वर्गाचें शिक्षण बरोबर नाहीं, " असें कोणीं वरिष्ठांनीं म्हटलें. यांनीं " **शिक्षण म्हणजे कांहीं पोकळ्याची भाजी** नव्हे, " असें ताडकन् उत्तर दिलें व ती नोकरी सोडिली. पुढें ते अखेरपर्यंत अविवाहित होते; आणि त्यांचें अहर्निश संशोधन-कार्य व लेखन-कार्य चालू-होतें.

शिक्षणासंबंधीं लिहितांना ग्रंथमालेंत त्यांनीं स्वतःसंबंधानें जें लिहिलें-आहे, त्यांतील मुद्याचा भाग त्यांच्याच शब्दांत पण संक्षेपानें खालीलप्रमाणें आहेः—

" इ० स० १८८२ सालीं मुंबईतील विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेंत मी पसार झालों. त्यावेळीं माझें वय १८ होतें. ह्या अठरांपैकीं माझीं सात वर्षे इंग्रजी व तीन वर्षे मराठी शिकण्यांत गेलीं. आठव्या वर्षीं मीं धुळाक्षर शिकण्यास आरंभ केला; व दोन-तीन वर्षे अळं टळं करीत कधीं शाळेंत व कधीं घरीं मिळून सामान्य मराठी वाटेल तें वाचणें व केरोपंतांच्या अंकगणितांतील वाटेल तो प्रश्न चुकत-माकत सोडविणें मला येऊं लागलें. भूगोल, इतिहास, व्याकरण, व्युत्पत्ति, काव्य, वगैरे विषयांची मला वस्तुतः बिलकुल माहिती नव्हती. ह्या तीन वर्षांतील फक्त दीड वर्षच काय तो मी शाळेंत गेलों. बाकीचीं वर्षे माझीं घरीं धांगडधिंग्यांत, विटी-दांडूंत, पोहण्यांत, उड्या मारण्यांत व मारामाऱ्या करण्यांत गेलीं. दीड वर्ष मी दोन-चार खेडेगांवांतील व शहरांतील शाळांत होतों. तेवढ्या अवधींत मला एकही पंतोजी शास्त्रीयरीत्या शिक्षण देणारा भेटला नाहीं. येथून तेथून सर्व पंतोजी आडमुठे, पोटभरू, इकडची पाटी तिकडे उचलून टाकणाऱ्यांपैकीं होते. ह्या दीड वर्षाच्या अवधींत आठवड्यांतून दोन-तीन दिवस घटका-अर्धी घटका मी अभ्यास करीत असे व तेवढ्या अभ्यासावर वर्गांत माझा नंबर पंतोजीची अवकृपा व देहदंड न संपादण्याइतका वर राहत असे. ह्या अवधींत अत्यंत उच्च प्रतीचें शिक्षण मिळालेला व द्रव्यावर दृष्टि न ठेवितां केवळ स्वदेशांतील मुलें उदात्त विचारांचीं, उदात्त कृति करणारीं व स्वदेशावर प्रेम करणारीं निपजावीं, एवढ्याच हेतूनें अध्यापकाचा धंदा आयुष्यभर नम्रपणें करणारा असा एकादा गुरु जर मला मिळाला असता, तर ह्या तीन वर्षांच्या अभ्यासांत माझी प्रगति मुंबईतील विश्वविद्यालयाच्या बी० ए०च्या इतकी झाली

असती, असें मला आतां वाटतें.......!एकंदरींत ह्या तीन वर्षांत जें कांहीं मी नवीन शिकलों, तें मी चांगल्या गुरूच्या देखरेखीखालीं सहा महिन्यांत शिकलों असतों. ह्यामुळें हीं तीन वर्षें अगदीं फुकट गेलीं व नैतिक व धार्मिकदृष्ट्या माझा किती तोटा झाला, तो तर सांगवतच नाहीं. त्यांत खैर एवढीच झाली कीं, मराठी चौथी झाल्यावर सहावीपर्यंत अभ्यास करण्यांत आणखी काळ न दवडतां मला इंग्रजी शाळेंत घातलें. इंग्रजी शिकण्यांत नोकरी मिळण्याचा जास्त संभव आहे, असें पाहून त्यांनीं ही व्यवस्था केली असावी; असा माझा तर्क आहे.

१८७६ सालीं पहिल्यांदां मी पुण्यांतील बाबा गोखले यांच्या शाळेंत गेलों. बाबांचें लक्ष वकिलीकडे लागलें होतें, व मास्तरांना दुपारीं इतर धंदे करतां यावेत म्हणून शाळा सकाळीं ६ ते १० पर्यंत भरत असे. सरकारी हायस्कूल व मिशन्स्कूलशिवाय तिसरी इंग्रजी शाळा हीच असल्यामुळें, हींत ४०० मुलें असत. त्या सर्वांची व्यवस्था बाबांच्या शुक्रवारांतील घरांत केलेली असे. ह्या घराच्या लगतच्या व पाठीमागील वर्गांच्या खोल्या ओलसर, दमट, अंधुक, पडक्या, गटार, पायखाने वगैरेंच्या घाणीनें भरलेल्या असत. माझा पहिला वर्ग अशाच एका खोलींत होता. वर्गांत ५०।६० मुलें होतीं. हा वर्ग मिश्र असे. म्हणजे कांहीं मुलें इंग्रजी मातृका शिकणारीं, कांहीं हॉवर्डच्या पहिल्या पुस्तकाचा प्रथमार्ध, कांहीं द्वितीयार्ध, व कांहीं हॉवर्डचें दुसरें पुस्तक शिकणारीं, असा होता. हा वर्ग एकच व शिक्षकही एकच. त्यामुळें तासांतील पांच–चार मिनिटें माझ्या तुकडीच्या वांट्यास व अर्धे मिनिट माझ्या वांट्यास येई. चार तासांतील पांच विषय मिळून मास्तराच्या वाणीचा साक्षात् स्पर्श माझ्या वांट्यास दोन–अडीच मिनिटें येई. इतक्यांत बाबांच्या शाळेंत एक क्रांति झाली. पुण्यांतील प्रसिद्ध वकील, वक्ते व विनोदी गृहस्थ जे **काशीनाथपंत नातू** ते ह्या शाळेंत पातीनें मास्तरकीचा धंदा करीत. त्यांच्या डोक्यांत स्वतःच एक नवीन शाळा काढावी, अशी शक्कल आली. त्यांनीं फितविलेल्या मुलांबरोबर मी त्या शाळेंत गेलों. त्या शाळेंत मला हॉवर्डच्या दुसरें पुस्तक शिकण्याच्या वर्गांत घातलें. येथें दोन–तीन महिने काढतों, तों प्रसिद्ध देशभक्त पण बंडखोर **वासुदेव बळवंत फडके, वामनराव भावे,** व **लक्ष्मणराव इंदापूरकर,** ह्यांनीं एक नवीन शाळा काढिली; व आमच्या शाळेंतील कांहीं मुलें फितविलीं; त्यांबरोबर भाव्यांच्या शाळेंत दाखल होऊन, त्याप्रीत्यर्थ मला

हॉवर्डचें तिसरें पुस्तक शिकण्याच्या वर्गांत घातलें. लगेच एक-दोन महिन्यांत परीक्षा झाल्यामुळें, माझा इंग्रजी चवथ्या इयत्तेचा वर्ग झाला. ह्या अवधीत हजार-दीडहजार इंग्रजी शब्द, व कांहीं घरसोडीचें इंग्रजी व्याकरण, यापलीकडे मीं कांहीं इंग्रजी ज्ञान संपादिलें नाहीं. १८८० त मी सातव्या इयत्तेंत गेलों, तों भाव्यांच्या स्कुलांतील दोन शिक्षक ती शाळा सोडून मिशनस्कुलांत गेले. सबब शिकविणारा कोणी नसल्यामुळें मी मिशनस्कुलांत गेलों. तीही शाळा दोन-तीन महिन्यांनीं सोडून स्वस्थ घरीं बसलों व वर्षभरानें **विष्णुशास्त्री चिपळोणकरांच्या** शाळेंत दहा-पंधरा दिवस जाऊन, नंतर प्रवेश-परीक्षेचा घरींच महिना-दोन महिने अभ्यास करून, सन १८८२ त खासगी रीतीनें ती परीक्षा पास झालों.

ह्याप्रमाणें सहा वर्षांत पांच खासगी शाळा झाल्या. त्यावेळीं ह्या माहितीपासून काय तात्पर्य काढावयाचें, हें मला कळत नव्हतें; तरी आज २०।२२ वर्षांनीं विचार करितां, ह्या शाळा-चालकांविषयीं फारसा पूज्यभाव वाटत नाहीं. शाळा काढण्यांत क्षुद्र मत्सर, उदरपूर्तीचा तात्पुरता उपाय ( धंदा ), ह्याच गोष्टी विशेषेंकरून आढळतात. कांहींत नीतिमत्तेचा पूर्ण अभाव, कांहीं सुरादेवीचे कट्टे उपासक, **वासुदेव बळवंत फडक्या**सारखे कांहीं नीतिमत्तेनें बरे, पण मुलें देशभक्त निपजावींत हा त्यांचा उदात्त विचार अंमलांत आणण्याची पद्धति टिकूं शकली नाहीं. एक फक्त भावे ह्यांस मास्तरकीचा धंदा व शाळा ह्यांच्यांशीं एकनिष्ठेनें वागण्याचा धडा पुण्यांत घालण्याचा पहिला मान देणें जरूर आहे. शाळेला फंड जमविण्याकरितां व कायमची इमारत मिळविण्याकरितां यांनीं केलेली पायपीट व मेहनत खरोखर इंग्रजी स्पेलें व शब्द शिकविण्याच्या गिरण्यांहून श्रेष्ठतर अशा एकाद्या राष्ट्रहितसाधक संस्थेलाही भूषण झाली असती. अशा वेळीं विद्वत्तेनें व मनोरचनेनें राष्ट्रहित साधण्यास बराच लायक असा एक गृहस्थ सरकारी नोकरीला लाथ मारून पुण्यास आला. हा गृहस्थ म्हणजे विष्णुशास्त्री चिपळोणकर हा होय. यांच्या पूर्वीं ज्यांनीं खासगी शाळा काढल्या, ते सर्व पदवीहीन होते; व पुण्यांतल्या हायस्कुलांतील पांच-चार पदवीधरांशीं तुलना करितां यांचें पारडें लोकदृष्टीनें बरेंच हलकें पडे. ह्यांत सगळेच अविद्वान् होते व हायस्कुलांतील सगळेच विद्वान् होते, असें नव्हे; **बाबा गोखले** एके काळीं पूना कॉलेजांत फेलो होते व **कृष्णशास्त्री चिपळोणकर, केरोपंत छत्रे** इत्यादिकांत त्यांची गणना होत असे. **सीतारामपंत**

**चिपळोणकरां**सारखा फर्डा इंग्रजी लिहिणारा हायस्कुलांतील **कुंटे, गाडगिळां**-खेरीज कोणी नव्हता. शिक्षण दोघांतही कांहीं निराळें नव्हतें. इंग्रजी शब्द व स्पेलें पांच-सात वर्षे शिकवून प्रवेश-परीक्षेला मुलें तयार करण्याचें दोन्ही शाळांत काम चाले. दोहोंत अपेयपान, अभक्ष्यभक्षण, चावटपणा, बाहेरख्याली-पणा, इ० असणारे गुरुजी सांपडत.

आतां **विष्णुशास्त्री चिपळोणकर** यांनीं देशभक्त, विद्वान, कार्यकर्ते, विचारवंत, आचारवंत, धर्मशील, उद्योगी, साहसी, असे लोक निर्माण करण्याच्या उदात्त हेतूनें आपली शाळा आपल्या बाण्याला साजेल अशी पांच-चार पदवीधर व पदवीहीन मंडळी जमवून सुरू केली. सरकारी इन्स्पेक्टर, डिरेक्टर, परीक्षक, वगैरे कोणाचाही स्पर्श शाळेला होऊं द्यावयाचा नाहीं, असा त्यांचा बाणा होता. प्रारंभीं सरकारी पद्धतीहून किंचित् निराळी, व मग वर्तमानपत्रें, व्याख्यानें, ग्रंथ, निबंध ह्यांच्या साह्यानें लोकमत बनवून उत्तरोत्तर तीपासून पूर्ण भिन्न अशी शिक्षणपद्धति सुरू करावयाची; तसेंच प्रथम मॅट्रिककरितां इंग्रजींतून व नंतर मराठींतून इतर व्यवसायांना उपयोगी पडेल, असें शिक्षण प्रचलित करण्याचा त्यांचा मानस होता; परंतु सवादोन वर्षे लोटतात, तोंच शास्त्रीबोवांला मृत्यूनें अकस्मात् गांठल्यानें हा हेतु जागच्या जागींच जिरला. आपल्या शाळेंतून प्रवेशपरीक्षेंत बरींच मुलें पास झालेलीं व दरवर्षी एकानें तरी **जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप्** पटकाविलेली दाखवून, आपल्याविषयीं अनुकूल मत, सादर व बहुमान मिळविण्यांतच हा काळ गेला.

शास्त्रीबोवांचे पहिले साह्यकारी **टिळक, आगरकर, आपटे** व **नामजोशी** हे होते. ते वारल्यावर मागाहून गोळे, केळकर, गोखले, पाटणकर, धारप, भानु व त्यानंतर कर्वे, लेले, लिमये वगैरेंचा संस्थेंत प्रवेश झाला. शास्त्रीबोवांची शाळा प्रथम अँग्लो-इंडियन कामगारांमध्यें साशंक विचार व दरारा उद्भूत करण्यास कारणीभूत झाली. याचीं कारणें अशी कीं, ( १ ) दोनदोनशें, चारचारशें, किंबहुना हजार हजार रुपये दरमहा मिळविण्याची ज्याची लायकी दहा-पांच वर्षांत व्हावयाची, अशी पदवीधर विद्वान् मंडळी ह्या संस्थेंत तीस-पस्तीस रुपड्यांवर संतुष्ट राहून काम करण्यास सिद्ध झाली, त्याअर्थी संस्थेचा कांहीं तरी गूढ हेतु असावा; ( २ ) कित्येकांना हे लोक जेसुइटांप्रमाणें क्रांतिकर वाटूं लागले, व वर्डस्वर्थनें शाळेच्या बक्षिस-समारंभाचे वेळीं त्यांच्याशी ह्यांची तुलनाही केली; ( ३ ) मंडळींतील दोन इसमांनीं कोल्हापूरच्या दुर्दैवी शिवाजीची कड

घेऊन तलवार गाजविली होती; यामुळें लोकमत त्यांचे बाजूस फार झालें; व ह्या शाळेंतील लोकांचा १-१॥ वर्षांत जर एवढा पराक्रम, तर पुढें ही मंडळी काय करील कोण जाणे, असें वाटूं लागलें होतें; (४) शिवाय मंडळीच्या हातीं दोन स्वतंत्र विचारांचीं पत्रेंही होतीं. ह्या शाळेचा आरंभ तर ह्या प्रकारचा झाला; परंतु शास्त्रीबोवांच्या मागून त्यांचा बाणा, त्यांच्या प्रतिज्ञा, सर्व लयास गेल्या व या संस्थेस आपल्या आहारीं कोणत्या रीतीनें आणावें, ह्याचा विचार सरकार करीत असतांच, **रोगी वैद्याच्या घरीं आयताच चालून गेला**; आणि पंधरा महिन्यांच्या खटपटीनें डेक्कन् एज्युकेशन् सोसायटीची स्थापना होऊन, तींत अगदीं सरकारी शाळांबरहुकूम वरिष्ठ-कनिष्ठ नोकर तयार करण्याचें काम होऊं लागलें व तें आजतागायत चालू आहे. त्यांनीं राजमान्यता मिळविली, पांच पन्नास-हजार रुपये सरकारांतून दरवर्षीं पदरांत पाडिले, सरकारप्रमाणेंच राजरोस भारी फी उकळण्याची सुरुवात केली, सरकारी लोकांची पायपिटी आपल्या शाळेंत सुरु करविली, आणि स्वतंत्र उद्योगाकडे जी प्रवृत्ति व्हावयाची, तिच्या ऐवजीं सरकारला नोकर पुरविण्यासच उलट मदत केली.

इंग्रज सरकारनें शाळाखातें सुरु केलें, त्याचा मतलब उच्च, मध्यम व कनिष्ठ दर्जाचे नोकर तयार करण्याचा होता व आहे. साहित्य, वैद्यक, कायदा, व स्थापत्य ह्यांच्या पाठशालांतून कामापुरते तरबेज लोक करून, त्यांस सरकारनें मुनसफ, मामलतदार, डेप्युटी कलेक्टर, हेडमास्तर, असिस्टंट सर्जन, असि॰ एंजिनिअर, हायकोर्ट वकील, वगैरे सिव्हिल सर्व्हंटांच्या खालच्या जागा दिल्या, जे लोक ह्यांतून परीक्षा पास न होतां मध्येंच गळाटले, व जे हायस्कुलांतील मॅट्रिक्, पब्लिक् सर्व्हिस्, वगैरे परीक्षा पसार झाले, त्यांना इंग्रजी कारकून, सब्-ओव्हरसिअर, असिस्टंट मास्तर, हॉस्पिटल् असिस्टंट, डिस्ट्रिक्ट वकील वगैरेंच्या नोकऱ्या मिळाल्या; आणि जे इसम ट्रेनिंगच्या परीक्षा, मराठी सहावी इयत्ता, वगैरे कनिष्ठ दर्जाच्या परीक्षा पास व नापास झाले, त्यांना मराठी शाळांवर मास्तर, देवी डॉक्टर, मराठी कारकून, मोकदम व बगले वकील, सरकारनें नेमिलें. युरोपांतील विश्वविद्यालयें असलें केवळ नोकरच तयार करण्याचें काम बिलकुल करीत नाहींत. सरकारी नोकऱ्या मिळविणाऱ्यांची परीक्षा घेण्याचें काम तिकडे युनिव्हर्सिट्यांकडे प्रायः कोठेंही सोंपविलेलें नाहीं. म्हणून त्या विश्वविद्यालयांप्रमाणें कामगिरी-आमच्या इकडील नोकर चाकर निपजविणाऱ्या यंत्रांच्या द्वारा प्रतिष्ठित, शीलवंत व देशभक्त लोक तयार करण्याची-कदापिही होणें नाहीं. ह्या

हिडिस स्वरूपाच्या शिक्षणपद्धतीचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न विष्णुशास्त्र्यानें केला, पण दुर्दैवानें तो विफल झाला; हें वर सांगितलेंच आहे.

आतां हे लोक पोटाला चिमटा घेऊन स्वार्थत्याग केला म्हणतात; तेव्हां सरकारी पगारापेक्षां हे लोक कमी पैशांत काम करितात; हा स्वार्थत्याग तर खराच,पण तो सत्कारणीं कीं असत्कारणीं यावरूनच त्याचें महत्त्व किंवा लघुत्व ठरणार आहे. अर्थात् सरकार उदार शिक्षणाच्या भपकेदार नांवाखालीं जो नोकरवर्ग तयार करितें, तेंच काम करण्यांत सरकारला मदत करणाऱ्यांचा स्वार्थत्याग स्वदेशास निरुपयोगी व कवडीमोलाचा ठरला जाईल. यांनीं आपली स्वतंत्रता गमावली, व मागाहूनच्या यांच्या टिवल्याबावल्या केवळ अज्ञानदर्शक व उपहास्य होत. ह्यांच्या प्रयत्नानें देशांत नोकऱ्या मागणारे सवंगसुकाळ ग्रॅज्युएट, अंडरग्रॅज्युएट झाले. यांना स्वतंत्र धंद्यानें पोट भरणें माहीत नसल्यामुळें, काळ वाईट आला म्हणून बोंबलावें लागत आहे. हें काम यांनीं बहादुरीनें केलें आहे; आणि खरोखर हें देशावर राष्ट्रीय संकटच ओढवलेलें आहे; व त्याच्या मुळाशीं डे० ए० सोसायटी आहे.

१८८२ त मॅट्रिक झाल्यावर मीं पहिली टर्म महालक्ष्मीवरील एल्फिन्स्टन् कॉलेजांत भरली. पी० ई०च्या वर्गाला ऑलिव्हर नांवाचा शिक्षक इंग्रजी शिकवी; 'नॉट' हा नकारार्थी शब्द आहे, वगैरे अपूर्व माहिती मधून मधून हे लाजाळू व वर मान न करणारे विद्वान् देत असत; पिटर्सन् विक्रमोर्वशी कीं कोणतेंसें नाटक ख्रीच्या प्रमाणें अत्यन्त कोमल व गोंडस स्वरानें इंग्रजी भाषान्तर करून सांगत किंवा एकाद्या वांकड्या तिकड्या संस्कृत वाक्याचा किंवा शब्दाचा अर्थ मांगण्यास विचकत. एका-दोघांखेरीज कोणी मन लावून शिकवितोसें दिसलें नाहीं. पैशाच्या व दुसऱ्या कांहीं कारणामुळें दुसऱ्या 'टर्मांत' मी कॉलेजांत गेलों नाहीं, पुढें पुण्यांत येऊन, दीड-दोन वर्षे दुसरा कोणताच धंदा करण्याची माझी ऐपत नसल्यामुळें, मीं पब्लिक सर्व्हिस, वगैरे परीक्षेकरितां उमेदवार तयार करण्याचा एक धंदा काढिला. ३०-३५ रुपये मिळत. वडील बंधूंना (**वैजनाथ काशीनाथ राजवाडे**) डेक्कन् कॉलेजांत फेलोशिप् मिळाल्यावर त्या कॉलेजांत दुसरी टर्म भरूं लागलों. फक्त १०-५ व्याख्यानांला हजर असें. प्रिलिमिनरींतून कसाबसा निघून, नंतर पुस्तकें घेऊन, महिन्याभरच्या अभ्यासानें सेकंड् क्लासांत परीक्षा पास झालों. १८८५ त पुण्यांतून कॉलेजांत गेलों तर जाई. दोन्ही टर्मा भरून परीक्षेस बसलों नाहीं. १८८६ व ८७ ह्रीं दोन सालें कॉलेजांत होतों.

बी० ए० च्या दोन्ही परीक्षा एकदम द्याव्या असें मनांत आलें; पण दोन्ही सालीं प्रिलिमिनरींतच मला आडकाठी झाली. परीक्षेच्या अगोदर एकादा महिना अभ्यास करावयाचा, व्यर्थ बारा महिने तीं क्षुल्लक पुस्तकें कुटीत बसावयाचें नाहीं, ह्या मतामुळें मी सहामाही, प्रिलिमिनरी वगैरे परीक्षांस बसत नसें. अखेर १८८८ त बाहेरचा विद्यार्थी म्हणून मी परीक्षेस बसलों व फर्स्ट बी०ए० पास झालों. १८९० मध्यें डे०कॉ०त रहावयास गेलों. दुसऱ्या बी०ए० करितां इतिहास हा ऐच्छिक विषय घेतला. शिक्षक कोणी नसल्यामुळें वर्गांत जाण्याची मला जरूर पडली नाहीं. व कडक शिस्तीचे प्रिन्सिपॉल **सेल्बी** ह्यांनींही इतर विषयांना हजर राहण्याची सक्ति माझ्यावर विलकुल केली नाहीं. ह्यामुळें निव्वळ कॉलेजांतलि खोलीचा, हवेचा व जवळील नदीचा यथेच्छ उपयोग करून घेण्याकरितां मीं ८० रु० फी भरली. परीक्षेच्या आधीं एक महिना अभ्यास करण्याकरितां पुण्यापासून बारा कोसांवर वडगांव येथें गेलों; व परीक्षेंत पास झालों. युनिव्हर्सिटीच्या कोणत्याही परीक्षेंत मी नापास झालों नाहीं. दर दोन महिन्यांनीं जर एक एक परीक्षा घेतली असती, तर ह्या तिन्ही परीक्षा मी पाहिल्या सहामाहींतच पास झालों असतों. परंतु सहा टर्मा, सहामाह्या, उपान्त्य परीक्षा व मुंबईच्या फेऱ्या, अशा नाना खुळांत सांपडल्यामुळें, सहा वर्षें मला रखडावें लागलें.

कॉलेजांत मी पहाटेस नियमानें पांच वाजतां उठून दोन तास तालमींत मेहनत करीत असें. बैठका, जोर, जोडी, मलखांब व कुस्ती, अशी सुमार दीड-दोन हजार मेहनत रोजची होई; तों सात वाजत. नंतर शेर-दीड शेर दूध पिऊन, आठपर्यंत कॉलेजच्या आसपासच्या झाडांखालीं सहल व विश्रांति घेई. ८ ते ९ वर्तमानपत्रांचें वाचन. पुढें १ तास नदीवर पोहणें. भोजन आटोपेतों नेमके साडेअकरा वाजत. नंतर समानशीलांबरोबर अर्धा तास धूम्रपान. पुढें वाचनालयांतील आणलेल्या एकाद्या पुस्तकाचें मननपूर्वक वाचन. वर्गांत प्रायः जात नसें. तो वेळ स्वतंत्र वाचनांत घालवीं. ४-४॥ ला शादिलबोवाजवळील होडीखान्यांत एकांड्या होड्यांत सात वाजेतों ५-७ मैलांचें वल्हवणें. तेथून भोजन आटपेपर्यंत ८॥ वाजत. नंतर १०-१०॥ पर्यंत ५-५० विड्या खलास होईपर्यंत नानाप्रकारच्या गप्पा. नंतर दोन टेवलांवर घोंगडी टाकून ताठ उताणें निजलें कीं मला झोंप येई. मऊ बिछान्यावर झोंपच येत नसे. १८९० पर्यंत मी कधीं आजारी पडलों नाहीं. कॉलेजांत शिक्षकवर्गाशीं माझी ओळख झाली नाहीं व दृढ मैत्रीही कोणाशीं

जडली नाहीं. **चॅन्सेलरादिकांचा पदवीदान-समारंभाचे वेळीं उपदेश मात्र स्वतंत्र धंदा व सरस्वतीच्या एकान्त उपासनेचा; पण शिक्षण मात्र बारान् बारा चोवीस वर्षें नोकरीचें.** ह्या मानभावीपणामुळें मला त्या कॉलेजचा व शिक्षकांचाही मोठासा आदर वाटत नसे. शिवाय, डेक्कन् कॉलेजची इमारतही १८१७ त खडकीची म्हणून जी लढाई झाली, त्याच जागीं आहे; ह्यामुळें ह्या जागेवर येतांच कोणत्याही मराठ्याला औदासीन्य यावें; तसें मला होई. अशा त्या अपशकुनी जागेवर कोणाचें मन रमेल ?

बाराव्या वर्षापासून सत्त्विसाव्या वर्षापर्यंत मला एक दुष्ट खोड लागली. ह्या १५ वर्षांत वाचणें, लिहिणें, विचार करणें, सर्व मी इंग्रजींत करूं लागलों. स्वभाषेंत कांहीं प्रासादिक व नामांकित ग्रंथच नाहींत, असें इतरांप्रमाणें माझें हि मत झालें असतें. कुंटे, रानडे वगैरेंचीं व्याख्यानें, आपापसांतील बोलणें, मित्रादिकांना पत्रें, आचारी, गडी यांच्यांशीं बोलणें, डिबेटिंग्मधील अद्वातद्वा व्याख्यानें, देशी कपडे वापरणाऱ्या मंडळींचें सर्व काम, व्यायामाचे सर्व प्रकार, इंग्रजींत; मी मराठी बहुतेक विसरूनच जावयाचा, पण तिघां गृहस्थांनीं मला ह्या विपत्तीपासून वांचविलें. **चिपळोणकरांच्या निबंधांनीं** मला मराठी भाषेविषयीं आस्था उत्पन्न झाली; **काव्येतिहाससंग्रहकारांच्या** पत्रांनीं मला स्वदेश म्हणून कांहीं आहे हें कळलें;आणि **परशुरामपंत त्यात्या गोडबोले** ह्यांनीं छापिलेल्या काव्यांनीं महाराष्ट्र सारस्वताचा मला अभिमान वाटूं लागला. हे तीन ग्रंथ माझ्या दृष्टीस न पडते, तर मी कुंट्यांच्यासारखीं इंग्रजींत व्याख्यानें देण्यास, सुरेंद्रनाथांप्रमाणें बूट, पाटलोण घालून देशाभिमानाचीं पत्रें काढण्यास किंवा सुधारकांप्रमाणें बायकांना झगे नेसविण्याच्या इर्षेस खचित लागलों असतों. दारू पिणारे, मांस खाणारे, स्वदेशाला, स्वभाषेला व स्वधर्माला तुच्छ मानणारे गांवठी साहेब, कांहीं कॉलेजांतील विद्यार्थ्यांत नव्हते असें नाहीं. तात्पर्य, ह्या शाळांनीं व कॉलेजांनीं देश, धर्म, रिवाज, भाषा, नीति, शील यांकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं; महाराष्ट्राचा इतिहास आम्हांपासून ज्यांनीं शिकावयाचा, तेच आम्हांला विलायतेंतून येऊन तो शिकवितात ! महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याला हे लोक अगदीं नालायक आहेत.ग्रँट डफच्या मराठी बखरींतील शेंकडों-नाहीं हजारों-चुका मीं " मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनां"तील प्रस्तावनांत यथास्थित दाखविलेल्या आहेत. मिशनऱ्यांच्या शाळा, बिझांटबाईसारख्या रोज नवा धर्म स्वीकारणाऱ्यांच्या शाळा, त्या सरकारची नोकरवर्ग तयार कर-

ण्याचीच शिक्षणपद्धति अंमलांत आणणारे कारखाने होत. यांपासून कांहीं देशकार्य होईल, असें समजणाऱ्या वर्तमानपत्रकारांच्या शहाणपणासारखें आचरट खूळही हिंदुस्थानाशिवाय दुसऱ्या कोठें पहावयास मिळणार नाहीं. इ०..."

राजवाडे ह्यांची पत्नी निवर्तल्यावर व त्यांनीं न्यू इं० स्कूलमधील नोकरी सोडल्यावर ते प्रथम मेणवली येथें गेले. १ वर्ष तेथें त्यांनीं **नाना फडणविसाचें** दफ्तर शोधिलें. ऐ० लेखसंग्रहाचा पहिला खंड पानिपतच्या इतिहासासंबंधीं पत्रांनीं भरलेला प्रसिद्ध केला. पानिपत प्रकरणांतील दक्षिण-हिंदुस्थानांतील व उत्तर-हिंदुस्थानांतील सर्व जागा त्यांनीं त्या त्या ठिकाणीं प्रत्यक्ष जाऊन पाहिल्या. ह्या पुस्तकामुळें ते प्रथम प्रसिद्धीस आले. ह्यापूर्वी "भाषांतर" नावांचें मासिक त्यांनीं काढिलें-होतें, तें सुमारें एका वर्षांतच बंद पडलें. त्यांनीं बहुशः पायानेंच सर्व हिंदुस्थानचा प्रवास केला. बगदाद, बसरा, व अफगाणिस्तान येथेंही ते जाऊन आले. " मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें " ह्या नांवाचे त्यांचे सुमारें २५।३० ग्रंथ आहेत; त्यांपैकीं ७।८स त्यांनीं ज्या प्रस्तावना लिहिल्या-आहेत, त्या अपूर्व व अत्यन्त मौल्यवान् अशा आहेत. त्यांचें खरें कार्य व संशोधनकौशल्य ह्या प्रस्तावनांतूनच दिसून-येतें. प्रो० **विजापूरकर** यांच्या "**ग्रंथमाला**" ह्या मासिकांत त्यांनीं पुष्कळसे शिलालेख, ताम्रपट, विरामचिन्हें, लेखनशुद्धि, व्युत्पत्ति, इत्यादिकांवर वाचनीय असे लेख लिहिले आहेत. विश्ववृत्त, सरस्वतीमंदिर, राष्ट्रोदय, यांतही त्यांचे लेख आलेले-आहेत.

त्यांना नगरापासून सुमारें ८० मैलांवर मोंगलाईंत असलेल्या **बीड-पाटांगण** या गांवीं ज्ञानेश्वरीची एक अति जुनी प्रत सांपडली. तिचा त्यांनीं अभ्यास केला; आणि तो करीत असतां वैदिक भाषा, पाणिनी, प्राकृतभाषा, यांचाही विचार केला. संस्कृतापासून मराठी कशी सिद्ध झाली, याच्या त्यांनीं पायऱ्या शोधून काढिल्या; व **ज्ञानेश्वरी मराठीचें व्याकरण** लिहिलें. मरण्यापूर्वी सर्व-मराठी धातु मूळ संस्कृत धातूंवरून कसे बनले, त्यासंबंधीं त्यांनीं लाविलेला छडा कोशरूपानें लिहिण्याचें काम चालू होतें; व ज्ञानकोशमंडळामार्फत १५ हजार रु० भांडवल उभारून हा कोश छापण्यासंबंधीं योजना प्रसिद्ध झाली-होती. कै० **प्रो० दामले** ह्यांच्या शास्त्रीय मराठी व्याकरणावर मुद्देसूद टीका ह्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणीं केलेली ऐकिवांत नाहीं. गोवें प्रांतांत फोंडें येथें निघणाऱ्या "प्राचीप्रभा" नांवाच्या महाराष्ट्रापासून दूरच्या मासिकांत त्यांनीं "तिङंत

विचार'' प्रसिद्ध केला; व ''मुवंत-विचार'' स्वतंत्रपणें प्रसिद्ध केला-आहे. मराठीचे दामल्यांसहित सर्व पूर्व-व्याकरणकार शतशः चुकले आहेत; असें यांचें म्हणणें असून, ते मराठीचें नवीन व्याकरण लिहिणार होते, असें म्हणतात. त्याचप्रमाणें महाराष्ट्राचाही इतिहास लिहिण्याचें त्यांच्या मनांत होतें.

''भारत-इतिहास-संशोधक-मंडळ'' व '' आरोग्यमंडळ '' ह्या दोन संस्था त्यांनीं काढिल्यापैकीं टिकून-राहिलेल्या-आहेत. सरदार **मेहेंदळे** ह्यांना सेक्रेटरी नेमून भा० इ० सं० मं० ह्या संस्थेस त्यांनीं आरंभ केला; पण पुढें **प्रो० दत्तो वामन पोतदार** ह्यांनीं जास्त लक्ष घालून व हिशेब वगैरे नीट ठेवून, ही संस्था आपल्या देखरेखीखालीं घेतली; आणि राजवाडे ह्या संस्थेपासून दूर झाले. मंडळांत त्यांचीं सुमारें शें-पन्नास दप्तरें आहेत, असें म्हणतात.

ते गांवोगांव संशोधनार्थ हिंडत; पण त्यांनीं बहुशः पैसे देऊन लेख, पोथ्या वगैरे विकत घेतलीं-नाहींत; कारण, तसें केल्यानें लोकांस पैसे उपटण्याची चटक लागेल म्हणून. धुळ्यास त्यांचा सुमारें वीस एक हजार ग्रंथसंग्रह आहे व त्यांपैकीं अवघा दोन हजार ग्रंथसंग्रह ३० हजार रुपयांस **श्री० पंतप्रतिनिधि** यांनीं विकत घेतला-आहे; आणि दरमहा १०० रु० ह्याप्रमाणें त्यांस ३० वर्षें हे पैसे द्यावयाचे-होते. के० राजवाडे ह्यांनीं आरंभीं केवळ पांच-चार रुपयांतही आपला खर्च भागवून, संशोधनकार्य केलें; वरील प्राप्तीशिवाय त्यांचे इष्ट-मित्र त्यांस थोडी-फार मदत करीत-असत. **'राधामाधवविलासचंपू'** व **'सार्धांची बखर'** हीं दोन उत्कृष्ट पुस्तकें त्यांनीं चित्रशाळेला कांहीं न घेतां दिलीं-आहेत; व पुस्तकांवरही '' कांहीं हक्क राखून ठेविले नाहींत '' असें ते लिहीत.

सन १९२५ च्या मे महिन्यांत पुण्यांतील शारदोपासक-मंडळानें त्यांस अध्यक्ष नेमून त्यांचा बहुमान केला. बांधा उंच, काटकुळा पण कणखर; साधा पोषाख, साधी वागणूक, ढोंगी शिष्टाचार वर्ज्य; दुसरीकडे पाहणें नाहीं; कठोर वाणी, पण तडफडणारें, तळमळणारें, देशाविषयीं निःसीम प्रेमाचें अंतःकरण; अशी त्यांची '' निःस्पृहस्य तृणं जगत् '' ह्या बाण्याची मूर्ति पुष्कळांनीं पाहिली-असेल. स्वभाव मात्र तऱ्हेवाईक, कोणाशीं पटावयाचेंच नाहीं, असा; पण कर्तृत्वामुळें व उत्तम शीलाच्या आचरणामुळें त्यांस सर्व विचित्र वर्तनांचे प्रकार माफ होते; आणि लोकांत त्यांविषयीं खराखरा आदरच होता.

नुकतेच हे ता० ३१ डिसेंबर १९२६ रोजीं, धुळें येथें एकाएकीं हृदयाची क्रिया बंद पडून मृत्यु पावले. महाराष्ट्राचें किंबहुना हिंदुस्थानांतील एक माणिक हरपलें! या १९२ वर्षांत रा० ब० **पारसनीस**, रा० ब० **बाबासाहेब साने**, **खरेशास्त्री**, इ० इतिहाससंशोधक मंडळी दिवंगत झाली.

---

## १५. वेदमूर्ति पांडुरंग जनार्दन भट्टजी पाध्ये.



ठाणें जिल्ह्यांत वसई तालुक्यांतील आगाशी येथील हे राहणारे. यांच्या सत्तराव्या वर्षाचे सुमारास "**स्वरव्यंजनव्यवस्था**" हा त्यांचा अपूर्व ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यांच्या ग्रंथाच्या अपूर्वतेप्रमाणेंच त्यांचें अल्पचरित्रही अपूर्वच आहे; तथापि त्यांत अनुभव, शास्त्रीयता, मोठमोठ्या पदवीधरांनाही लाजविणाऱ्या चिकित्सेचा प्रभाव, ह्या गोष्टी उत्कटत्वानें दिसून येतात. ह्या ग्रंथांतल्याप्रमाणें मनोरंजकता व अनेक व्यावहारिक उदाहरणें देऊन विषय बिंबविण्याची हातोटी हीं दुसरीकडे क्वचितच सांपडतील. स्वरव्यंजनव्यवस्था हा व्याकरणाचाच एक भाग असल्यामुळें, ह्या विषयावरील या विद्वान् लेखकांच्या चरित्राचा येथें परामर्ष घेणें योग्यच आहे. शिवाय जुना सामान्य वैदिक एवढ्यानेंच, किंवा नव्या पदवीधर पंडितांच्या मानानें क्षुद्र ह्या केवळ भावनेनेंच, त्यांच्या योग्यतेकडे दुर्लक्ष करणें वाजवी होणार-नाहीं; त्यांचा वरील ग्रंथ जो लक्षपूर्वक पाहील, त्यास हें कबूल करावेंच-लागेल किंबहुना चिकित्सकांनीं हा त्यांचा ग्रंथ एकवार अवश्य पहावा, अशी आम्ही शिफारस करितों. ह्यांचें चरित्र त्यांनीं स्वतःच

आपल्या पुस्तकात पुस्तक-प्रकाशनाचे वेळीं दिलें आहे,तेंच येथें सादर करितों; व तेवढेंही त्यांची योग्यता दर्शविण्यास पुरेसें आहे.

हा ग्रंथ स्वरव्यंजन नांवाचा लिहिला, त्यासंबंधीं थोडी हकीकत. आमचें शिक्षण लेखन शाळेंत मुळींच झालेलें नाहीं. "घरचे घरीं श्री ग पासून अ आ अि अी व क ख ग पासून ळ पर्यंत एवढेंच कायतें शिकलों" याच्यापुढें बाराखड्या अथवा फाडे किंवा सवायकी दीडकी वगैरे शपथ व्हाण्याला आजमित्तीपर्यंत एक अक्षराचें अध्ययन शिक्षण कांहीं नाहीं. तर मग केलें काय? वेदारंभ पुस्तक पुढें ठेवून शिक्षा ज्योतिष छंद निघंट एथपर्यंत बऱ्याच अक्षरांची ओळख पटत चालली ।। पुढें अष्टाध्यायी चालू केली. त्यांत जोडाक्षरांची माहिती बरीच झाली. पानावर अंक असतात त्यामुळें ४ अध्यायांचीं पानें पन्नास होतीं म्हणून पन्नासांपर्यंत आंकडे समजले. पुढें ४ अध्याय झाले तेव्हां १०० पर्यंत आंकडे पाठ झाले.पण सदोतीस अडतीस एकोणतीस असें तोंडांत येई तेव्हां सोवती रागें भरत. सत्तेचाळीस अठ्ठेचाळीस एकोणचाळीस असेंच तोंडांत येई. असें रोज चुके. पुढें सत्यान्शीं अठ्यान्शीं नव्यान्शीं हें मला पसंत पडलें.पुढें सत्त्याणवद अठ्याणवद नव्याणवद हें माझ्या पसंतीस आलें. तेव्हां ती मागली चुकी सांपडली. तेव्हांपासून सर्व अंक तपासले. सर्व चुका सापडल्या।।हेंच शिक्षण शाळेंत झालें असतें, तर चुकी लागली नसती व समजलीही नसती ।। असो ।। असें अध्ययन ओटीवर बसून २४ वर्षें केलें. पुढें २४ वर्षें विद्यार्थ्यांस शिकविलें. घनापर्यंत दशग्रंथ, जेवण्यापुर्ती व निजण्यापुर्ती सुटी, गांवांत काय होत असे तेंही माहिती नाहीं ।। घरांत बायका पुरुष बोलतात ती भाषा ।। जें अहोरात्रींत दृष्टीस पडेल तें शिक्षण ।। एकेका अक्षराला बाराखडी असते हें कित्येक वर्षें माहीत नव्हतें. ते प्रकार पोथींतून निवडून काढिले तेव्हां क मध्यें कृ कॄ काढले. पुढें बाराखड्या पाहिल्या त्यांत नाहीं तेव्हां ही चूक समजली. असें झालें. आमचें शिक्षण लिहिणें वाचणें वगैरे शाळेंत कांहींएक झालेलें नाहीं आणि ग्रंथ लिहिण्याचा तर प्रसंग आला. तेव्हां कसें तरी करून लिहून काढला. हा कोणातरी चांगल्या शिकलेल्या मनुष्याच्या हातीं यावा व मग छापून काढावा अशा विचारांत पंचवीस-तीस वर्षें निघून गेलीं. कोणी पन्नास रुपये घेऊं कोणी पंचवीस घेऊं असें म्हणत व कोणी तर हा ग्रंथ अक्षरशः खोटा आहे म्हणून आम्ही लिहूं इच्छित नाहीं असेंही म्हणाले. इतक्या काळांत केवळ धर्मार्थ दुरुस्त करून देण्यास कोणीही भेटलें नाहीं. पुढें एक वेळ **टिळक महाराजांस** भेटलों.त्यांनीं आठच दिवसांत वाचून पाहून "हा ग्रंथ अक्षरशः बरो-

चर आहे" असें म्हटलें; आणि "हा लोकांत प्रसिद्ध झालाच पाहिजे, पण एवढा काळ कां गेला ?" असेंही म्हटलें. तेव्हां मीं त्याचें कारण वर लिहिल्याप्रमाणें सांगितलें. तेव्हां ते म्हणाले, " दुरुस्ती करण्याचें कांहीं कारण नाहीं; जसें असेल तसें छापून काढा." तेव्हां तो उपदेश घेतला. पुढें पैशाची अडचण सांगितली. त्यावर ते म्हणाले. "खर्च मी करितों. दोन महिन्यांनंतर सर्व प्रति घेऊन जा." आमच्या दुर्दैवामुळें यांतील कांहींएक घडलें नाहीं. असो. आमची लिपी विलक्षण आहे, ती लिहिण्याजोगे टाईप कोठें मिळणार नाहींत. परोपकारकर्ते म्हणतात, तुमच्या लिपीप्रमाणें मी नवे टाईप करून छापून देईन ! त्यांच्या उपदेशावरून दुरुस्त न करितां आज हा ग्रंथ शिलाप्रेसवर छापावा लागला. ७।८ महिने पुण्यास रहावें लागलें. **कोंडोपंत नाना छत्रे** यांनींही उत्तेजन दिलें. ते म्हणाले, "हा ग्रंथ प्रसिद्ध झालाच पाहिजे. पाहिजे तो दृष्टान्त द्या, पाहिजे तें उदाहरण द्या, विस्तार होईल तरी होऊं द्या; परंतु उद्योग सोडूं नका, लिहून काढा." छापण्यापर्यंत मजल आली. याचा जगांत जर कोणाला उपयोग झाला, तर त्याचें श्रेय त्याच्याचकडे जाणार; आम्ही केवळ लेखक आहों. इ०.

पदवीहीन मनुष्याचा ग्रंथ चांगला असला, तरी त्यास छापण्याचे कामीं कशी अडचण पडते, हें यांच्या वरील चरित्रावरून दिसून-येईल; शाळेंत साक्षरता संपादन केली-नसतां, हा विलक्षण चिकित्सात्मक ग्रंथ यांनीं लिहिला म्हणून, त्यांच्याच शब्दांत त्यांचें थोडें विस्तृत चरित्र येथें दिलें-आहे.

यांच्या लिपीचा नमुना–अ, आ, अि, अी, अु, अू, अृ, अॢ, अे, अै, ओ, औ, अं, अः; ॅच, ॅछ, ॅज, ॅझ, ॅञ, (तालव्य): ंच, ंछ, ंज, ंझ, ंञ, (दन्ततालव्य);ज्ञ=ज्ञ; समजावें, अुदाहरण; इ० उच्चार व आकार किंवा लेखन यांत मेळ पाहिजे; आपल्या देवनागरी लिपींत तें पुष्कळच साधलें-आहे; परंतु कांहीं ठिकाणीं उच्चार व लेखन यांत भेद आहे, तें अशास्त्रीय असल्यामुळें ह्यांनीं स्वर-व्यंजन-व्यवस्थेंत दुरुस्त करण्याचा बुद्धिकौशल्यपूर्वक प्रयत्न केला-आहे. यांच्या ह्या ग्रंथावर पुष्कळ विद्वान् लोकांचे अनुकूल अभिप्राय आहेत.

हे वृद्ध व अंध गृहस्थ सुमारें १५ वर्षांपूर्वीं ७१ वर्षांचे होऊन वारले. (ता० २२ सप्टेंबर १९१२; भाद्रपद शुद्ध ११ शके १८३४ ). ही तिथी आगाशीचे **तात्यासाहेब गद्रे** यांनीं कृपा करून आम्हांस कळविली.

---

# १६. परशुराम हरि थत्ते.



यांचा चिपळूण जिल्हा रत्नागिरी येथें वैशाख शु॥ ३ शके १८८० रोजीं जन्म झाला. ह्या दिवशीं अक्षय्य तृतीया असल्यामुळें यांचें नांव 'परशुराम' असें ठेवण्यांत आलें. हें घराणें मूळचें चिपळूण-पासून जवळच असलेल्या केतकी-बिवली या गांवचें. ब्रह्मेंद्रस्वामींच्या बखरींत या गांवाचा उल्लेख आलेला आहे. पेशवाई-च्या अखेरीस हें घराणें लक्ष्मी व सरस्वती यांनीं परिपूर्ण होतें. शेवटच्या बाजिरावा-च्या बरोबर यांतील कांहीं पुरुष ब्रह्मा-वर्तास गेले; त्यांपैकीं परत इकडे कोणी आलें नाहीं. याच घराण्यांतील नील-कंठशास्त्री थत्ते हे पुण्याच्या संस्कृत भाषेच्या मूळपीठाचे संस्थापकांपैकीं एक होते.

परशुरामपंतांचे वडील हरीपंत हे केतकी-बिवली येथील वतन संपादण्यास राहिलेल्या पुरुषांपैकीं होत. हे केतकी-बिवलीहून चिपळूण बंदरांत व्यापारा-करितां येऊन राहिले. तेथें त्यांचें एक स्वतंत्र दुकान व फड होता. परशुराम-पंतांचें मराठी सहा इयत्तांपर्यंतचें शिक्षण चिपळूण येथें, नंतर इंग्रजी मॅट्रिकपर्यं-तचें शिक्षण धुळें व नाशिक येथें झालें. धुळें येथें सन १८७२ त 'पांझरा' नदीस मोठा पूर आला होता, व त्यामुळें पुष्कळ खेडीं वाहून गेलीं. परशुरामपंत हे स्वतः घरांत रात्रीं पाणी शिरलें असतां, आपल्या बंधूंसह जीव वांचविण्यासाठीं पळून गेले होते. ह्या आकस्मिक गोष्टींचा त्यांच्या मनावर फार परिणाम होऊन त्यांनीं ह्या जलप्रलयाच्या वार्षिक विपत्तींची आगाऊ सूचना गांवोगांव मिळण्यास कांहीं सिग्नल्सच्या योजना सचित्र काढून ठेविल्या आहेत; त्या नागपूरचे 'उद्यम' कर्ते रा० महादेवराव पाध्ये यांजकडे प्रसिद्धीकरितां पडलेल्या आहेत. परशुरामपंतांस विशेषेंकरून भौतिकशास्त्रें व प्राचीन संस्कृत-ग्रंथशोधन यांची विशेष आवड होती. यांचे बंधु व वडील वारल्यामुळें यांचा पुढील शिक्षणक्रम आटोपला. त्यांचा हेतु मेडिकल कॉलेजांत जाण्याचा

होता; तो त्यांनीं वैद्यकी व खासगी रीतीनें मेडिकल शिक्षण संपादून आणि त्यासंबंधीं ग्रंथ लिहून पुरा केला.

हे प्रथम भुसावळ येथील खासगी इंग्रजी शाळेंत १८८० ते १८९१ पर्यंत शिक्षक होते. नंतर ते तेथेंच जी० आय० पी० रेल्वे व म्युनिसिपालिटी यांतून पैशाची मदत मिळवून स्वतंत्र अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूलचे हेडमास्तर झाले. पुढें लोकलबोर्डच्या कायद्याअन्वयें ही शाळा भुसावळ म्युनिसिपालिटीचे ताब्यांत देण्यांत आली. या शाळेंत असतां, यांनीं तेथील मराठी शिक्षक गोविंद गोपाळ नगरकर इ० च्या मदतीनें, विद्यार्थ्यांना भाषान्तर करण्याच्या कामीं मदत व्हावी म्हणून, मराठी भाषेवरील "**वाक्यपृथक्करण**" नांवाचें सुमारें १५० पृष्ठांचें पुस्तक लिहिलें. त्यावर **न्या० महादेव गोविंद रानडे** यांचा चांगला अभिप्राय घेऊन, **प्रि० वामन शिवराम आपटे** ( न्यू इंग्लिश स्कूल ) यांजकडे अभिप्रायाकरितां व गाईड टु संस्कृत कॉंपोझिशन लिहितांना त्यांस मदत व्हावी म्हणून १॥ वर्ष ठेविलें होतें. त्यानंतर **गोपाळ गणेश आगरकर** यांचें " **वाक्यमीमांसा** " हें पुस्तक छापलें गेलें. पुढें थत्ते यांचें " वाक्यपृथक्करण " याचा कांहीं भाग **कै० विष्णु मोरेश्वर महाजनि** यांच्यामार्फत " वऱ्हाड शालापत्रकां "त प्रसिद्ध झाला. याप्रमाणें आगरकरांच्या पूर्वीं लिहिल्या गेलेल्या ह्या ग्रंथाची हाकिकत आहे; व हें पुस्तक यांचें चरित्र येथें देण्यास कारणीभूत झालेलें आहे.

भुसावळ येथें रा० थत्ते यांच्या हातून झालेली एक विशेष गोष्ट म्हणजे तेथील शाळेंतील मुलें रेल्वेलाइनवरील रूळांवर गिट्टी ( खडी ) ठेवून ती कशी फुटते याची मजा पाहत राहत; अनेकवार मुलांना पोलीसमार्फतसुद्धां ताकीद देऊनही या खोड्यांचा बंदोबस्त होईना. तेव्हां यांनीं तेथील असि० कलेक्टर डॉ० जे० पोलन यांच्या डोक्यांत तेथें एक लोखंडी पूल घालण्याची कल्पना भरवून, रल्वे अधिकाऱ्यांकडून शेंकडों रु० खर्च करवून, ती सातारें व भुसावळ यांचे दरम्यान मूर्तस्वरूपांत आणविली. भुसावळच्या नागरिकांनीं त्यांस दिलेल्या मानपत्रांत याचा उल्लेख केला आहे.

यानंतर ते सोलापूर येथें डे० ए० इ० चे इंग्लिश क्लार्क होते: व पुढें अहमदाबादेस ए० इ०च्या शिरस्तेदारीच्या हुद्यावर होते. त्यास ठाणें व मुंबई भागांतही साहेबांबरोबर फिरावें लागे. त्या अवधींत यांनीं ' अरुणोदयां 'त

( १ ) आर्यललितविस्तार, ( २ ) स्वयत्नाचिंतामणि, व ( ३ ) हिंदुस्थानांतील प्राचीन सुधारणा–वैदिककाल, हीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं.

पुढें मुंबईस एलिफन्स्टन मिडल स्कूलमध्यें व नंतर नाशिक हायस्कूलमध्यें यांनीं शिक्षकाचें काम केलें. डॉक्टर० का०ना० गोखले यांच्या सूतिकाशास्त्र, गृहपरिचर्या व आरोग्यशास्त्र आणि ‘ फर्स्टएड ’ या पुस्तकांचीं त्यांनीं भाषान्तरें केलीं. नाशकास हे “ लँग्वेज इन्स्ट्रक्टर ( पंडित ) ऑफ पोलीस ” या जागेवर असतां त्यांनीं १९२७ त पेन्शन घेतलें. हल्लीं हे नाशिकचे राहिवासी आहेत.

यांनीं करमणुकींत शास्त्रीय लेख, उपनिषत्परमामृतम्, गीतेवर मोहविध्वंसिनी टीका, हिंदी चित्र-प्रबोध, इ० पुस्तकें लिहिलीं. यांशिवाय यांचीं निरनिराळया विषयांवरील पुष्कळ अप्रसिद्ध पुस्तकें आहेत; व हे एक जुने जाडे व कल्पक लेखक आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांचा पोलीसकॉलेजांतील युरोपियन व इतर शिष्यवर्ग बराच मोठा आहे.

(१) वेदकाळाचा इतिहास २ भाग, ( २ ) बौद्धकाळाचा इतिहास, ( ३ ) हिंदुकाळाचा इतिहास, ( ४ ) जंगलांची जोपासना, ( ५ )अद्भुत वृक्षोत्पादन, ( ६ ) भूगर्भदर्पण, ( ७ ) वाफेचीं यंत्रें, ( ८ ) तैलयंत्रें, ( ९ ) गलवतें, ( १० ) तेज, ( ११ ) विद्युद्विज्ञान, ( १२ ) आकाशयानें, ( १३ ) भारतीय विमानें, ( १४ ) अंगुलिमुद्रण, ( १५ ) मनुष्यशरीर, ( १६ ) बालामृत, अवलामृत, पुरुषामृत, इ. ग्रंथही यांनीं तयार केलें असून, त्यांपैकीं कांहीं अप्रसिद्ध आहेत; व कांहीं निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध होत आहेत. ( १७ ) कृष्णकारस्थान, ( १८ ) कृष्णाच्या अकलेली कमाल, इ. नाटकेंही यांनीं लिहिलीं आहेत.

---

# [ आ ] शालोपयोगी व्याकरणकार.

## १७. गंगाधरशास्त्री फडके.

हे अष्टागर प्रांतांतील **नागांव** येथील राहणारे. हल्लीं तेथें ह्यांचे वंशज बापूसाहेब फडके हे आहेत; परंतु त्यांजकडे चौकशी करितां, शास्त्रीबोवांचा फोटो किंवा माहिती कांहीं मिळाली नाहीं.

ह्यांचें " **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण** " ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांत पाहण्यास मिळालें. तें शिळाप्रेसवर छापिलें असून, एज्युकेशन सोसायटीकरितां केलें; व १८३८ त त्याची दुसरी आवृत्ति आर० प्रेस? यांचे छापखान्यांत मुंबईस छापिली* ह्या पुस्तकाचे प्रस्तावनेंत पुढील मजकूर आहे:—

( १ ) मुंबई शिक्षा-मंडळाचे सक्रतारी मेहर्बान कपतान पोपसाहेब ( ! ) यांस या ग्रंथाचे गुण-दोष आणि श्रम यांचे परीक्षक असें जाणून परमादरानें नजर केला.

( २ ) ग्रंथावर दोष देणें आणि मोठी इमारत फोडणें ह्या दोन गोष्टींस विशेष श्रम नाहींत.

( ३ ) ह्या (मराठी) भाषेच्या व्याकरणाच्या आश्रयानें महाराष्ट्र भाषा समकक्ष जी गुजराथी व हिंदुस्थानी भाषा यांचीं व्याकरणें सहज तयार होतील.

पुस्तकाचें वैशिष्टय—

( १ ) आरंभ संधि-प्रकरणानें केला-आहे.

( २ ) ह्यांत चतुर्थीचीं साठीं, करितां, स्तव, हीं विभक्त्यर्थक शब्दयोगी अव्ययेंही प्रत्ययांतच दिलीं-आहेत.

( ३ ) अमक्यावरून किंवा अमुक कार्य असतां, षष्ठी, सप्तमी, इ० विभक्ति होते; अशा प्रकारची भाषा आहे.

( ४ ) संवादरूप आहे.

---

* ह्यांस न विचारतां सरकारनें छापिलेली हीच आवृत्ति असावी काय ?

गंगाधरशास्त्र्यांच्या व्याकरणासंबंधाची व तत्कालीन माहिती या पुस्तकांत अन्यत्र थोडी थोडी विखुरलेली आहे, त्यांची चरित्रात्मक माहिती अधिक उपलब्ध होत-नाहीं. यांच्या व इतर अनेक तत्कालीन शास्त्र्यांच्या उदाहरणांवरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, हे शास्त्री कितीही विद्वान् असले, तरी त्यांस साहेबाच्या छायेची अपेक्षा असेच. पेशव्यांच्या सरकारास विद्यावृद्धीस उत्तेजन देण्यास फावलेंच नाहीं; व ( व्याकरण-कोश ) हीं कामें तर राजाश्रयावांचून तडीस जाणें कठीण; म्हणून साहजिकच हा प्रकार घडला.

---

## १८. जगन्नाथशास्त्री क्रमवंत.

यांचे नातू जगन्नाथ रावजी टुल्लु ( लालसाहेबांचे पालक ) हे देरा, जि० सुल्तानपुर, प्रांत अयोध्या, येथें असतात; तेथून जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांची माहिती त्यांनीं पत्रद्वारें खालीलप्रमाणें कळविली आहे. " **वनाचें उपवन** " नांवाच्या त्यांच्या पुस्तकांत, पृष्ठ २२ ते २६ वर ही माहिती असून, तिचा गोषवारा त्यांनीं दिला आहे.

" वे० शा० सं० जगन्नाथशास्त्री क्रमवंत ( टुल्लु ) हे १८२९ ते १८३७ पर्यंत चालू असलेल्या महाराष्ट्र भाषेच्या कोशाच्या विद्वान् संपादकांत अग्रगण्य होते. दक्षिणी भाषेतील पुस्तक-प्रकाशक-मंडळींत त्यांचें मोठें वजन होतें. शाळाखात्यांत 'मुख्तसर' म्ह० इन्स्पेक्टर व कर्नल जर्व्हिस यांचे साहायक होते. तसेंच ठाण्याच्या जिल्हाजजचे हिंदुधर्मशास्त्रविषयक सहायक होते. मुंबईच्या प्रसिद्ध भुलेश्वर देवालयाचे हे पुराणिक असून, **नागांव**, जि० कुलाबा येथील मुखवस्तु रहिवासी होते. मृत्यु सन १८२९."

गंगाधरशास्त्री फडके, जगन्नाथशास्त्री क्रमवंत व बाळशास्त्री घगवे, या तीन शास्त्र्यांकडून अज्जम कर्नल जर्व्हिससाहेब यांनीं मराठीचें व्याकरण तयार करविल्याचा उल्लेख वारंवार आढळतो; परंतु त्यांपैकीं जगन्नाथशास्त्र्यांचीच वरीलप्रमाणें अगदीं त्रुटित माहिती मिळाली आहे. यांचा **फोटो** उपलब्ध नाहीं.

---

# १९. कै० बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर.

रत्नागिरी जिल्ह्यांत राजापुराजवळ **पोंभुर्ले** नांवाचें गांव आहे, तेथें यांचा जन्म सन१८१० मध्यें झाला. यांचे वडील चांगले व्युत्पन्न भिक्षुक होते. त्यांनीं आपल्या मुलास चांगली काव्य–व्युत्पत्ति करून दिली होती. सन १८१८ त पेशवाई बुडाली व नंतर इंग्रजांचा अंमल बसून स्थिरस्थावर झाल्यानंतर १८२२ च्या ऑगस्टच्या २१ व्या तारखेस मुंबईस एज्युकेशन सोसायटीची शाळा स्थापन झाली व सरकारनें इतर गांवोगांवीं देशभाषेंतील शिक्षणाच्या शाळा सुरू केल्या. त्या शाळांवर देखरेख करण्याच्या कामावर सदाशिव काशीनाथ ऊर्फ बापू छत्रे नांवाचे त्यावेळचे नामांकित ग्रंथकार होते,त्यांस सरकारनें मुक्तसर (तपासनीस)नेमिलें होतें.ह्यांचा आणि जांभेकर घराण्याचा फार दिवसांचा निकट संबंध होता; म्हणून **बापू छत्रे** यांचे सांगण्यावरून गंगाधरशास्त्री यांनीं आपला मुलगा बापूंकडे इंग्रजी शिकण्यासाठीं ठेविला. त्या मुलाची अल्पवयांत थोर बुद्धि पाहून त्यास सोसायटीच्या शाळेंत घातलें. "दिवसास शाळेंत इंग्रजी शिकावें व संध्याकाळीं आमचे गुरु बापूशास्त्री शुक्ल यांच्या विन्हाडीं कौमुदीची पोथी घेऊन तेथें पढावयास जावें. त्यावेळच्या सर्व विद्यार्थीमंडळींत हे अग्रगण्य होते. ते मला संध्याकाळीं आपल्या घरीं बोलावून स्पेक्टेटर व रँवलर यांचे अर्थ सांगत, त्यावेळीं पहिल्या वर्गांत हरिश्चंद्र हरिशंकर, बाळ गंगाधरशास्त्री, मोरोबा कान्होबा, जनार्दन आप्पाजी गाडगीळ वगैरे मंडळी असत;" असें दादोबा आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात.

ह्यांच्या इंग्लिश शिक्षणाची जी सोय झाली, तीविषयीं एक चमत्कारिक आख्यायिका सांगतात. एकदां सन १८२४ त हा मुलगा सुमारें चौदा वर्षांचा असतां, दोघां सोजिरांची मोठी मारामारी झाली. त्यांनीं साक्षीदार म्हणून या मुलास कोर्टापुढें नेलें. तेव्हां त्यास इंग्रजांचा गंधही नसतां, हा त्याला कोणते शब्द बोलला व तो ह्याला परत कोणते बोलला, हें अगदीं बरोबर उच्चार करून, कांहींएक अर्थ न जाणतां, यथाक्रम हातवारे करून त्यानें बिनचूक म्हणून दाखविलें. तें इतकें हुबेहूब वठविलें कीं, तेवढयावरून न्यायाधिशास कलागतीचें स्वरूप कळून आलें; व तो ह्या बाळच्या बुद्धिप्रभावामुळें थक्क झाला आणि त्यानें ह्या मुलाची विद्याखात्याकडे शिफारिष केली. बालबोध-

कार म्हणतात कीं, 'त्या न्यायाधीशानें त्यांच्या इंग्लिश अभ्यासाची सोय आपल्या स्वतःच्या खर्चानें करून दिली.' त्यावेळची परिस्थिति अशी होती कीं, सन १८१३ त ईस्ट इंडिया कंपनीला पार्लमेंटनें जी सनद दिली होती, तींत हिंदी लोकांच्या शिक्षणाकरितां दरसाल निदान एक लाख तरी रुपये खर्च करण्यांत यावे, असें एक कलम होतें; परंतु त्याप्रमाणें वरेच दिवस कोणीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. शिवाय, इंग्रजी भाषा शिकण्यास लोक तयार नव्हते. "न वदेत् यावनीं भाषां प्राणैःकंठगतैरपि" हें सर्वसामान्य मत त्यावेळीं प्रचलित होतें. ह्यामुळें इंग्रजी शिकण्यास बक्षिसांची व पगाराची लालूच दाखवावी लागत असे. अशा खटपटीनें जे विद्यार्थी मुंबईस प्रथम तयार झाले, त्यांपैकीं **बाळशास्त्री जांभेकर** हे एक होते. ते १८२४ त मुंबईतल्या एल्फिन्स्टन् इन्स्टिटयूटमध्यें जाऊं लागले. ते स्वतः मोठे बुद्धिमान् किंबहुना एकपाठी, विलक्षण मेहनती, आणि स्वभावानेंही गरीब असल्याच्या योगानें, त्या विद्यालयांतले त्यांचे गुरु मि० **मर्फ** व त्यांचे मागून त्यांच्या जागेवर येणारे मि० **मेनवेरिंग** साहेब यांची त्यांच्यावर फार मर्जी वसली. शास्त्रीवावांचे सहाध्यायी **दादोबा पांडुरंग, नौरोजी फर्दूनजी, भाऊ महाजन, जनार्दन वासुदेवजी**, असे कित्येक गृहस्थ होते; परंतु **बाळशास्त्र्यांची** बरोबरी त्यांपैकीं कोणाच्यानेंही करवली नाहीं. अवघ्या चार वर्षांत त्यांचा ह्या विद्यालयांतील शिक्षणक्रम संपला. त्यावेळीं इयत्ता नसल्यामुळें त्यांचें अध्ययन तेथें किती झालें, हें मापानें जरी सांगतां येणार नाहीं, तरी फळावरून त्याचा अजमास करितां येण्यासारखा आहे. ते **प्रो० आर्लिवार** ह्यांजपाशीं गणित-शास्त्र शिकले. नंतर १८३४ त सरकारनें त्यांस एल्फिन्स्टन् विद्यालयांत गणित-शास्त्राचे आर्लिवार यांचे अ० प्रोफेसर व इंग्लिश, वाङ्मय व इतिहास या विषयांचे प्रोफेसर नेमिलें. तेव्हां पहिले एतद्देशीय प्रोफेसर म्हणून त्यांचा गौरव व लौकिक सर्वत्र फार झाला. आर्षांच जुन्या व्याकरण–न्यायादि शास्त्रांत त्यांची गति अकुंठित होती; व नवीन विद्येंतही ते अष्टपैलू होते. इतिहास व भाषा ह्यांत त्यांचा हातखंडा असून, रसायनादि शास्त्रांची त्यांस मनस्वी आवड असे. गणितांत तर त्यांची गति अत्युत्कृष्टच होती. **बापू छत्रे** यांच्या मागून त्यांच्या जागेवर सक्तार ( सेक्रेटरी ) म्हणून त्यांस नेमिलें होतें; (पगार दरमहा ५० रु०).

एल्फिन्स्टन् कॉलेज १८३४ त त्या साहेबांच्या नांवानें ३ लाख रुपये जमवून उभारण्यांत आलें होतें; तेथें प्रोफेसर होण्यापूर्वीं, यांनीं १८२९ ते १८३४

पर्यंत दुसऱ्या जागांवर काम केलें. **बापू छत्रे** यांच्या जागीं सक्तार म्हणून असतां, जर्व्हिस साहेबांनीं १८३० त लॉर्ड ब्रौह्यामच्या त्यावेळीं विलायतेंत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका ग्रंथाचें भाषांतर **बाळशास्त्री जांभेकर, बाळशास्त्री घगवे,** व **जगन्नाथशास्त्री क्रमवंत** ह्यांजकडून मराठींत व गुजराथींत करविलें. त्याचें नांव " विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष " हें होतें. हा ग्रंथ साताऱ्चे **श्रीमंत प्रतापसिंह राजे छत्रपति** ह्यांस नजर केला होता. हा ग्रंथ मराठींत फारच प्रौढ व सुरस झाला होता, पण त्याची द्वितीयावृत्ति निघूं शकली नाहीं. १८३२ च्या सुमारास सातारकर **प्रतापसिंह महाराज छत्रपति** यांच्या इच्छेवरून अक्कलकोटच्या दोघां राजपुत्रांस २०० रुपयांवर इंग्रजी शिकविण्याचें काम यांनीं सुमारें १-१॥ वर्ष केलें. नंतर एल्फिन्स्टन् कॉलेजांत मागें सांगितल्याप्रमाणें १८४२ पर्यंत प्रोफेसर म्हणून काम केल्यावर १८४४ पर्यंत त्यांस एज्युकेशनल् इन्स्पेक्टर नेमण्यांत आलें होतें. यानंतर त्यांस सरकारनें नॉर्मल स्कूलवर नेमिलें.

त्या सुमारास शिक्षणप्रसार करण्याचा सरकारचा प्रयत्न चालू होता, परंतु देशस्थिति व भाषा यांचें ज्ञान त्या इंग्रज अधिकाऱ्यांस बेताचें असल्यामुळें व कोणी वजनदार एतद्देशीय गृहस्थ अजून मिळाला नसल्यामुळें, शिक्षण काय द्यावें, शिक्षक कोणत्या प्रकारचे असावे व ते कसे तयार करावे, इ० प्रश्न जरा बिकटच होते; परंतु शास्त्रीबोवांनीं त्यांचा उलगडा तेव्हांच केला व तें सर्वच काम शास्त्रीबोवांच्या गळ्यांत पडलें. ह्या कामगिरीचे बाबतींत बालबोधकार अर्काटच्या हल्ल्याची व त्रिचनापल्लीच्या वेढ्याची उपमा देतात. वेढा उठविण्याची युक्ति क्लाइव्हला सुचल्याबरोबर ती अमलांत आणण्याचें काम त्याच्याच गळ्यांत पडलें; त्याचप्रमाणें शिक्षक तयार करण्याचें हें नॉर्मलस्कूल मुंबईस काळबादेवी रोडवर स्थापण्याचें ठरल्याबरोबर, त्यांत शिकवून शिक्षक तयार करण्यास, स्वतः देशांत फिरून, गुजराथी, दक्षिणी व कानडी होतकरू लोक शास्त्रीबोवांनीं निवडून आणिले. त्यांच्या जेवणाखाण्याची आणि अभ्यासाची सगळी व्यवस्था आपण स्वतः मोठ्या मेहनतीनें पाहून, त्यांस उत्तम शिक्षक बनविलें; आणि गरज लागत गेली, तशी त्यांची योजना जागोजाग केली. ह्या कामीं शास्त्रीबोवांस पांच वर्षें अहोरात्र खपावें लागलें.

सरकारनें दिलेलीं हीं कामें करीत असतांच, शास्त्रीबोवा यांचे एक सहाध्यायी **भाऊ महाजन** ( यांनीं १८४० त "**प्रभाकर**" नांवाचें एक प्रति

रविवारीं निघणारें ८ पृष्ठांचें, वार्षिक १२ रु० किंमतीचें, एक वर्तमान कालिकें होत ), यांच्या साह्यानें "दर्पण" नांवाचें एक इंग्रजी व मराठी वर्तमानपत्र शास्त्रीबोवांनीं कांहीं दरमहा न घेतां चालविलें होतें. त्या वेळेपूर्वी मराठी व इंग्रजी मापेंत देशी लोकांनीं चालविलेलें मुंबईंत एकही वर्तमानपत्र नव्हतें. ह्या पत्रानें त्यांची कीर्ति फार वाढविली व त्यावेळचे गव्हर्नर सर जेम्स कॅर्नाक हेही त्यांच्या लिहिण्यावर खूष होऊन, त्यांनीं बाळशास्त्री यांस "जस्टिस् ऑफ् धि पीस" ही बहुमानाची पदवी दिली. ही पदवी पैसेवाल्या थोडयाच लोकांशिवाय त्यावेळीं दुसऱ्या कोणास मिळत नसे. त्यावेळीं फक्त पांचच कायते जे.०पी० मुंबईस होते. ह्याप्रमाणेंच शास्त्रीबोवांनीं "**दिग्दर्शन**" नांवाचें एक मासिकही स्वतंत्रपणें कित्येक वर्षे चालविलें होतें. त्यांत शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व त्याचे अभावीं ग्रहणें वगैरे संबंधानें लोकांच्या ज्या भ्रामक समजुती असत, त्यांसंबंधीं निःस्पृहतेनें लिहिलेलें असे. ह्या मासिकास लोकाश्रय फारसा नव्हता; व शास्त्रीबोवांस पुष्कळ नुकसान सोसावें लागलें.

१८४६ त शास्त्रीबोवा नॉर्मल स्कूलमधील विद्यार्थ्यांस घेऊन नेहमींप्रमाणें प्राचीन लेखांचा शोध लावण्याकरितां—किंवा कोणी म्हणतात त्याप्रमाणें श्रमपरिहारार्थ—कनकेश्वर ता० अलिवाग जिल्हा कुलाबा येथें गेले होते. त्यांनीं कान्हेरी वगैरे ठिकाणचीं लेणीं विद्यार्थ्यांस दाखवावीं, तेथील लेख वाचावयास शिकवावें, रात्रीं Prismatic Compass घेऊन तारे व त्यांचीं अंतरें विद्यार्थ्यांस मोजून दाखवावीं, असा त्यांचा मे महिन्याच्या सुटींतील कार्यक्रम असे. कनकेश्वरास याप्रमाणें ते गेले असतां, **त्यांस उष्णता लागून** ताप आला व तशाच आजारी स्थितींत ते परत मुंबईस आले. अखेर १७ मे १८४६ त कोळभाट वाडींतील आपल्या राहत्या घरांत ते निवर्तले. मरणसमयीं त्यांचें वय अवघें ३५ वर्षांचें होतें. त्यांच्या पश्चात् त्यांची गृहस्थिति फार कठीण झाली. अखेर खटपटीनें सरकारांतून यांचे कुटुंबास व मुलास दरमहा ५० रु० मिळूं लागले. परंतु तीं दोघेंही सुमारें १२ वर्षांचे आंत मृत्यु पावलीं. त्यांचें दुसरें कुटुंब पराडकरांच्या म्हणजे मोरोपंत कवींच्या घराण्यांतील होतें.

शास्त्रीबोवांस मराठी, संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच, लॅटिन, ग्रीक, बंगाली, गुजराथी, हिंदुस्थानी, कानडी, तेलगू व फारशी इतक्या भाषा अवगत होत्या. ते खरोखर एकपाठी होते; त्यांस कोशाचें कारण कधींच पडत नसे, असा त्यांच्या परिचित मंडळींत त्यांसंबंधीं ग्रह होता. अध्ययन व अध्यापन यांशिवाय

त्यांच्या मनास दुसरा काहीं व्यवसायच कधीं शिवला नाहीं. गुण्यांत पंचवीस आंकडे व गुणकांत पंचवीस आंकडे एवढाल्या मोठ्या ज्योतिषसंबंधीं गुणाकारांत देखील त्यांच्या हातून चुकी झाली नाहीं.

बाळशास्त्री आपल्यांत फार थोर पुरुष झाले, यांत शंका नाहीं. "बाळशास्त्री हे काळे, ठेंगण्या बांध्याचे पुरुष होते;त्यांचे नेत्र विशाल व चंचल होते; ते गंभीरपणानें नेहमीं खालीं पहात असत; ते अल्पवयी होते,तरी त्यांची वागणूक पोक्तपणाची होती" असें **दादोबा** लिहितात. त्यांची चेहरेपट्टी भव्य,प्रसन्न, हसतमुख व इभ्रतदार होती, असें **राजारामशास्त्री भागवत** वर्णितात.त्यांचा पोषाख म्हणजे नागपुरी रेशमी धोतरें, पांढरा अंगरखा व तांबडें लहान पुणेंशाही पागोटें, एक जोडा व साधें उपवस्त्र असा असे. त्यांचें वक्तृत्व साधें पण परिणामी असे.त्यांची शोधबुद्धि विलक्षण.**खळोबा कामत** नांवाचा एक कारागीर आगगाडी काढतों म्हणाला, यांनीं त्यास २०० रु० मदत दिली. त्यांची बुद्धिमत्तेमुळें सर्वांवर छापही चांगली होती. कँडी साहेबांचे कोशांत "काळ आला होता, पण वेळ आली नव्हती" याबद्दल इंग्रजींत Death unexpected असें लिहिलें होतें, तेथें Narrow escape from death अशी सुधारणा बाळशास्त्री यांनीं सुचविली; असें त्या कोशाच्या प्रस्तावनेंत नमूद आहे. या चुकीखेरीज एकही चूक त्या ग्रंथांत आढळणार नाहीं, असा कँडी साहेबांनीं बाणा प्रगट केला आहे.अशा ह्या शोधक गुरूच्या शिष्यवर्गांत रक्तपित्तावर औषध शोधून काढणारे विद्वान् डॉ० **भाऊ दाजी,** त्यांचे बंधु वनस्पतिशोधक **डॉ० नारायण दाजी**, ज्योतिषी व गणिती **केरूनाना छत्रे**, राजकीय पुढारी **दादाभाई नौरोजी**, असे प्रसिद्ध पुरुष होते.

## बाळशास्त्री यांचे ग्रंथ व लेख.

( १ ) बालव्याकरण ( व्याख्या फार व्यापक असून संक्षिप्त आहेत. )

( २ ) भूगोलविद्या

( ३ ) नीतिकथा

( ४ ) हिंदुस्थानचा इतिहास यांत " ह्या नव्या लोकांच्या ( इंग्रजांच्या ) चातुर्यापुढें आणि कौशल्यापुढें **अकबर** आणि **औरंगजेब** जरी पुनः जिवंत होते, तरी त्यांचें काहीं न चालतें" असें लिहिलें आहे].

( ५ ) मराठी भाषेच्या व्याकरणावर निबंध ( अप्रसिद्ध व अनुपलब्ध )

( ६ ) शब्दसिद्धिनिबंध ( बाळशास्त्री व भाऊ महाजन मिळून )

( ७ ) रॉयल एशियाटिक सोसायटी व जिऑग्रॉफिकल सोसायटीपुढें वाचलेले शिलालेख आणि ताम्रपत्रें यांवरील निबंध.

( ८ ) उपचंद्रिका मासिकांतील लेख.

( ९ ) संध्येचें भाषांतर ( प्रारंभ ).

( १० ) ॲबरक्रांबीकृत मानसशास्त्राचें भाषांतर ( अप्रसिद्ध व अनुपलब्ध ).

( ११ ) दिग्दर्शन व दर्पण यांतील लेख.

( १२ ) इंग्लंडचा इतिहास. (गोल्ड स्मिथच्या पुस्तकाचें रॉबर्ट मनी यांच्या सांगण्यावरून लिहून शिळाप्रेसवर छापलेलें भाषांतर ).

( १३ ) हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा इतिहास.

( १४ ) शून्यलब्धि गणितग्रंथ ( हा त्यांचा शेवटचा ग्रंथ असें दादोबा म्हणतात ).

( १५ ) सारसंग्रह ( दुसऱ्याचे नांवावर आहे, सबब याबद्दल प्रो० **पोतदार** यांस संशय आहे ).

प्रो० **पोतदार** यांजजवळ भूगोलशास्त्र ( गणितभाग ) नांवाचें १८३६ तलें पुस्तक आहे. भूगोलविद्या नाहीं. या भूगोलशास्त्रास जोडून भास्कराचार्यांच्या मताचा विचार म्हणून निबंध जोडिला आहे. एकदां व्याख्यानांत चंद्रग्रहणा–विषयीं शास्त्रीबोवांनीं शास्त्रीय मत प्रतिपादन केलें.त्यामुळें ग्रामण्यापर्यंत मजल जाऊन, त्यांची लोकप्रियता जुन्या मंडळींत कमी झाली असें म्हणतात; ह्याचें प्रत्यन्तर ह्या पुस्तकांतील माहितीवरून दिसून येतें.

एकंदरींत बाळशास्त्री जाडे विद्वान् होते, तरी त्यांच्याकडून मराठी वाङ्मयाची कांहीं अलौकिक सेवा झाली, असें वाटत नाहीं यांचे ग्रंथ बहुतेक शालोपयोगी व प्रौढ असले, तरी चटकदार किंवा रमणीय नाहींत; त्यांचा शास्त्रीय शोधांवर व ज्ञानावर भर फार; ह्यामुळें त्यांचें लिहिणें गंभीर परंतु जड लागतें. त्यांचे सहाध्यायी दादोबा किंवा समकालीन हरी केशवजी किंवा गुरु बापू छत्रे यांच्याप्रमाणें त्यांची लेखणी रसाळ नाहीं. शास्त्रीय वाङ्मयांत मात्र यांची कामगिरी चांगली झाली. विद्वत्तेंत व बुद्धिमत्तेंत बाळशास्त्री वरच्या सर्वांहून निःसंशय वरचढ होते त्यांची दांडगी पाठशक्ति, स्मरणशक्ति व शोधबुद्धि यांयोगें त्यांची छाप त्या वेळीं जबरदस्त बसली होती. ते विद्यार्थ्यांस अनेक प्रकारें मदत करीत व सार्वजनिक कार्यांतही मन घालीत. सामाजिक सुधारणेचे बाबतींतही रे० नारायण शेषाद्रि यांचे बंधु श्रीपाद शेषाद्रि यांस परत हिंदुधर्मांत घेण्याविषयीं त्यांचा पाठिंबा होता. पूर्वांग-प्रायश्चित्तही झालें; परंतु उत्तरांग होण्यापूर्वी

**बाळशास्त्री** यांजवर ग्रामण्य झालें. हें प्रकरण पांच वर्षें चाललें होतें, असें म्हणतात. विधवाविवाहाविषयींही एक ग्रंथ यांच्या प्रोत्साहनानेंच **गंगाधरशास्त्री फडके** यांनीं प्रसिद्ध केला.

वरील सर्व माहिती 'बालबोध' व 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' या पुस्तकांतून जुळवून घेतली आहे.

---

## २०. कै० गंगाधर रामचंद्र टिळक.



यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांतील दापोली तालुक्यामधील **चिखलगांव** हें होय. हे त्या गांवचे खोत होते; परंतु त्या खोतीचें उत्पन्न मात्र जवळ जवळ कांहीं नव्हतेंच म्हटलें तरी चालेल. गंगाधरपंतांचे आजे केशवराव हे उद्योगी व कष्टाळू असून, त्यांनीं पेशवाईच्या अखेरीस अंजनवेलची मामलत मिळविली होती. ते घोड्यावर बसण्यांत वस्ताद, निशाण मारण्यांत पटाईत, पोहण्यांत सराईत आणि स्वयंपाकांत तरबेज होते; असें त्यांचें वर्णन आढळतें. पेशवाईनंतर मामलत सोडून हे घरीं स्वस्थ बसले. ह्यामुळें पूर्वीची स्थिति जाऊन त्यांस गरिबीचे दिवस आले. गंगाधरपंताचा जन्म १८२० त झाला. गंगाधरपंतांचे वडील रामचंद्रपंत ह्यांचा विद्याभ्यास फारसा न झाल्यामुळें, त्यांनीं (इंग्रजी) मोजणीखात्यांत नोकरी धरिली. त्यामुळें ते बहुतेक प्रवासांतच असत. तेव्हां घरींच आजोबांनीं त्यांना थोडेंसें शिकविलें; व याच सुमारास दाभोळास मराठी शाळा सुरू झाली होती, तींत शिकण्यासाठीं ठेविलें. ह्या शाळेंतील विद्यार्थ्यांत वयानें किंचित् मोठे या नात्यानें त्यांना पूर्वीच्या 'मालचाट्या'चें म्हणजे हल्लींच्या शब्दांत सांगावयाचें तर 'मॉनिटर'चें किंवा 'सेक्रेटरी'चें काम करावें लागे.

दाभोळचें शिक्षण आटोपल्यावर गंगाधरपंत हे स्वतःच्याच हिंमतीवर पुण्यास येऊन मवाळकरांच्या शाळेंत इंग्रजी शिकूं लागले. परंतु १८३७ त

त्यांची मातुःश्री वारली व त्यांचे वडील वैतागून संन्यास घेण्यासाठीं काशीस निघून गेल्यामुळें, चार-पांच माणसांचा कुटुंबभार गंगाधरपंतांवरच पडला; म्हणून ते कोंकणांत गेले व नाइलाजानें त्यांना प्राथमिक शाळेतील शिक्षकाची नोकरी पत्करावी लागली यानंतर त्यांचें लग्न झालें; व त्यांस लागोपाठ तीन मुली होऊन,१८५६ त **बळवंतरावजी टिळक** ह्यांचा जन्म झाला.प्रथमतः ५ रुपयांवर, नंतर मालवणास बदलून गेल्यावर १० रुपयांवर, पुढें चिपळूणास १५ रुपयांवर व अखेरीस रत्नागिरीस २५ रुपयांवर त्यांची नेमणूक झाली. त्यावेळच्या स्वस्ताईमुळें व ह्यांच्या टापटिपीच्या राहणीमुळें, जरी ह्यांच्या भोंवतीं आश्रित विद्यार्थ्यांचा परिवार वाढत गेला, तरी तें सर्व संभाळून, व आपल्या धार्मिक वडिलांच्या सांगण्याप्रमाणें वागून, त्यांनीं आश्रितांचा परामर्ष व त्यांस भोजन-दक्षिणा देण्याचा उपक्रम चालू ठेविला होता; त्यामुळें १॥ वर्षांत त्यांचे घरीं बाहेरचे व दक्षिणा देण्यासारखे १००० ब्राह्मण जेवले; अनायासें सहस्र-भोजन घडलें ! असा हिशेब उपलब्ध आहे.

त्यांचे वेळीं ट्रेनिंग कॉलेजें नव्हतीं. तरी विद्या मात्र आतांच्यापेक्षां सरस असे, असें म्हणतात गंगाधरपंत हे जात्याच बुद्धिवान् होते, ह्यामुळें ते स्वतःच्याच प्रयत्नानें संस्कृत व गणित ह्या विषयांत बरेच प्रवीण झाले होते. त्यांचें गणिताचें अध्ययन शून्यलब्धीपर्यंत झालें होतें, व संस्कृत विषयाच्या अध्ययनावरून तर त्यांस गंगाधरपंतांपेक्षां गंगाधरशास्त्री ह्या नांवानेंच लोक अधिक ओळखीत. डॉ० **रामकृष्णपंत भाण्डारकर** व **गंगाधरशास्त्री** ह्यांचा स्नेह,उभयतांची संस्कृताविषयीं आवड असल्यामुळेंच अधिक झाला. ज्यांना पदवीधर होतां न आल्यामुळें ऐहिकदृष्ट्या फार नुकसान झालें, अशांपैकींच गंगाधरशास्त्री हे एक होत. बुद्धि तरतरीत असून इंग्रजीचा अभ्यास झाला नाहीं; काम सामान्य दर्जाचें म्हणजे प्रथम मराठी शालाशिक्षक व नंतर असिस्टंट डे० ए० इन्स्पेक्टरचें; ह्यामुळें ग्रंथकर्तृत्वही सामान्य प्रतीचेंच झालें. इंग्लंडचा इतिहास, अंकगणित व **लघुव्याकरण** वगैरे शालोपयोगी पुस्तकें त्यांनीं लिहिलीं.

हे अत्यन्त हिशेबी, करारी, निश्चयी, स्वच्छ मनाचे, उद्योगी व कर्तबगार गृहस्थ होते. त्यांना शालोपयोगी ( म्हणजे पुष्कळ विक्री होऊन द्रव्यलाभ करून देणारीं ) पुस्तकें लिहून आपली महत्त्वाकांक्षा भागवून घ्यावी लागली. तरी त्यांनीं टापटिपीनें वागून ८२९७ रु० शेवटीं शिल्लक ठेविले; व त्यांपैकीं सुमारें ५ हजारांत आपल्या मुलाचा विद्याभ्यास वगैरे होण्याची तरतूद मृत्यु-

पत्रानें करून ठेविली. विद्वत्तेच्या मानानें ते खरोखर प्रोफेसर होण्याच्या लायकीचे होते. क्राफर्ड साहेबांनीं उपस्थित केलेल्या समायिक भांडवलाच्या एका धंद्यांत त्यांस चांगली ठोकर बसली होती. हे पहिल्यापासूनच पुण्यास असते, तर कदाचित् **कृष्णशास्त्री** व **विष्णुशास्त्री** या पिता-पुत्रांच्या जोडीप्रमाणें **गंगाधरशास्त्री** व **बाळशास्त्री टिळक** ही पिता-पुत्रांची जोडी लोकोत्तर झाली असती. यांच्या लघुव्याकरणासंबंधानें मागें लिहिलेंच आहे. हे सन १८७२ त वारले. ( केळकरकृत टि० च० वरून ).

## २१. कै० रेव्हरेंड् गणपतराव नवलकर.



रा० **गणपतराव रघुनाथराव नवलकर** ह्यांचा जन्म मुंबईस फणसवाडींत १८३७ मध्यें ४ सप्टेंबर रोजीं झाला. यांच्यांविषयीं त्यांचा एक वयोवृद्ध ब्राह्मण विद्यार्थी म्हणतो,–" गणपतराव नवलकर हे त्यांच्या सहा बहीण-भावंडांपैकीं पांचवे होते. ह्यांचे वडील आपल्या धर्माबद्दल फार अभिमान बाळगीत, व त्यांनीं आपलें बरेंच आयुष्य हिंदु धार्मिक मराठी पुस्तकें वाचण्यांत व पूजा-अर्चा करण्यांत घालविलें होतें त्यांच्या ह्या धार्मिक वृत्तीचा, त्यांच्या सर्व मुलांवर चांगला परिणाम झाला. त्यावेळच्या प्रचलित हिंदुधर्माच्या चालीरीतींचें बाळकडू त्यांस मिळालें होतें; व हल्लींप्रमाणेंच मूर्तिपूजा व इतर हिंदूंचे धार्मिक विधि नीट रीतीनें पाळणें हेंच धर्माचें मोठें ध्येय त्यावेळीं समजलें जात असे. ह्यासंबंधीं सर्व माहिती गणपतरावांना त्यांच्या वडिलांनीं चांगली करून दिली होती; व गणपतरावांनींहि त्याचा पूर्ण फायदा करून घेतला."

चौदाव्या वर्षी गणपतराव **फ्री चर्च** मिशनमध्यें शिरले; व लगेच एका वर्षांत ते कॉलेजमध्यें दाखल झाले. नंतर १८५६ मध्यें ते ख्रिश्चन झाले. १८५९ त डॉ० विल्सन् त्या कॉलेजचे मुख्य प्रिन्सिपल होते. त्यांनीं त्यांच्याविषयीं पुढील उद्गार काढिले आहेत:—" आमच्या मिशनरी संस्थेमध्यें जे उत्कृष्ट विद्यार्थी आज अभ्यास करीत आहेत, त्यांपैकींच एक गणपतराव रघुनाथराव हे आहेत."

२१ वर्षांचे झाल्यावर ते निजामचे राज्यांतील 'जालना' येथें गेले व तेथें त्यांनीं आपलें मिशनचें काम सुरू केलें. १८६१ त त्यांनीं 'स्कॉटिश' ऑर्फनेजमध्यें शिकविण्याचें काम पत्करिलें. त्यानंतर मुंबईच्या 'रॉबर्ट मनि' स्कूलमध्यें ते शिक्षक होते. १८७० मध्यें त्यांना एफ् ०सी० इन्स्टिट्यूशन मधील शाळेवरील सुपरिंटेंडेंट् नेमण्यांत आलें. १८७२ मध्यें त्यांचें एका ब्राह्मण ख्रिश्चन बाईबरोबर लग्न झालें व त्यांना १८७३ मध्यें उपदेशकाचें ( Preacher ) काम करण्याची परवानगी मिळाली. १८८० त अलिबाग येथें त्यांना उपदेशक नेमिलें. ह्या ठिकाणीं त्यांनीं एक स्वतंत्र इंग्रजी शाळा काढिली. तींत उत्तरोत्तर विद्यार्थी वाढत जाऊन तिचें हायस्कूल बनलें. या शाळेला उपयोगी पडणारें एक वसतिगृह, एक वाचनालय व हस्तव्यवसाय शिकविण्याची एक शाळा, हीं त्यांनीं जोडली. त्यांनीं रेवदंडा येथेंही एक अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूल काढिलें व अलिबाग येथें आणि आसपासच्याही बऱ्याच भागांत शाळा काढिल्या.

मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांनीं त्यांना डेप्युटी कलेक्टर व मॅजिस्ट्रेटची जागा देऊं केली होती; व त्याचप्रमाणें स्कॉटलंडला जाण्याची सुसंधि त्यांस दिली होती; परंतु त्याचा फायदा घेणें त्यांस पसंत पडलें नाहीं.

१८९३ मध्यें हे अलिबाग सोडून नाशकास आपल्या कुटुंबासह स्वतःच्या घरीं राहूं लागले. एक वर्षानंतर आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीं ते मुंबईस आले. १९०७ मध्यें मिसेस् नवलकर ह्या मुंबईस वारल्या. १९०९ मध्यें गणपतराव हे आपल्या मुलांसह पुण्यास येऊन राहूं लागले; व पुण्यांतील आपल्या घरामध्यें १९१२ त मृत्यु पावले.

ह्यांची वाङ्मयविषयक कामगिरी खालीलप्रमाणें आहे—हे सुमारें १४ वर्षांचे असतां, त्यांनीं एक " हिंदु हार्बिंजर " आणि दुसरें " वर्तमान " या नांवाचीं पत्रें सुरू करून, " गार्डियन् " नांवाच्या वृत्तपत्रांत ते लेख लिहूं लागले. १८५९सालीं त्यांनीं आपले लेख 'बाँबे कार्टर्ली रिव्ह्यू'मध्यें व 'ओरिएंट्ल् ख्रिश्चन् स्पेक्टेटर'मध्यें प्रसिद्ध केले. ह्यांचें पहिलें व्याख्यान 'युनायटेड् स्टूडंट्स् असोसिएशन्'पुढें झालें; व तें डॉक्टर जॉर्ज बर्डवुड ह्यांना फार आवडलें. तें पुढें बाँबे क्वार्टर्ली रिव्ह्यूमध्यें प्रसिद्ध झालें. १८६१ सालीं त्यांनीं "अँग्लो-मराठी मॅगेझीन" नांवाचें मासिक काढिलें. त्या मासिकाचे पुष्कळ सुशिक्षित हिंदु लोक वर्गणीदार होते. ह्याच सुमारास त्यांनीं 'हिंदु मिशन्' या संस्थांची हकीकत एका पत्रांत प्रसिद्ध केली; आणि इंग्रजी वाङ्मयावर व मराठी व्याकरणावर त्यांनीं

एक व्याख्यान दिलें; व तें लेखरूपानें प्रसिद्ध केलें. ह्या पुस्तकाची द्वितीयावृत्ति त्यांच्या पत्नीनें लिहून काढिली होती; व १८८० मध्यें ती प्रसिद्ध झाली. तिच्या संबंधानें त्यावेळचे मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हॉइस चान्सेलर यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत—

"आजकाल शिक्षण–विषयावर जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत ह्या पुस्तकाचा बराच वर नंबर लागेल. ह्या पुस्तकामध्यें **मि० नवलकर** यांची उत्तम बुद्धिमत्ता व शोधकपणा दिसून येतो. हें पुस्तक युरोपियन व हिंदु विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त होईल, अशी आमची शिफारस आहे."

**प्रो० मॅक्समुलर** ह्यांनीं आपला फोटो व आपलें हस्ताक्षर ह्यांजकडे पाठविलें; आणि त्यांनीं पुस्तकाबद्दल आपला असा अभिप्राय प्रकट केला:– " मीं आपल्या **स्टूडंट्स् मराठी ग्रॅमर** ह्या पुस्तकाचें परीक्षण केलें; बोलण्याच्या भाषेला उत्कृष्ट तऱ्हेनें उपयोगी पडेल, असें आपण हें पुस्तक लिहिलें आहे, व त्याबद्दल मी आपलें अभिनंदन करितों. आपल्या लिहिण्याच्या चटकदार शैलीमुळें मराठी व्याकरण–विषयाचा अभ्यास खरोखरच मनोरंजक व उत्साहजनक होईल." एनूसायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या ११ व्या आवृत्तीमध्यें हेंच पुस्तक सर्वोत्कृष्ट आहे, असा अभिप्राय आला आहे; इं० सिव्हिल सर्व्हिस् परिक्षेकरितां मराठी व्याकरणावरील सर्व जुन्या पुस्तकांना ह्यानें मागें टाकिलें आहे; व ह्याच व्याकरणाच्या धर्तीवर मराठींत व इंग्रजींत अशाच तऱ्हेचीं पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत· त्यापैकीं कांहीं अमेरिकन् लोकांचींही आहेत.

१८८० सालीं **गणपतराव** ह्यांनीं " मनाचे व्यापाराचीं तत्त्वें " यावर एक व्याख्यान दिलें. त्या व्याख्यानाबद्दल युरोपियन् 'मॉरल्स'चे इतिहासकार मि० लेकी ह्यांनीं खालीलप्रमाणें उद्गार काढिले आहेत:—"माझीं नीतिशास्त्रासंबंधीं जीं तत्त्वें आहेत, त्यांपेक्षांही अधिक उदात्त विचाराचीं तुमचीं असून, तीं सुशिक्षित लोकांना अधिक पटण्यासारखीं आहेत; व त्या तत्त्वांचा ऊहापोह तुम्हीं सांगोपांग रीतीनें या व्याख्यानांत केला आहे; तुम्ही या विषयावर केव्हांतरी अधिक लिहून प्रसिद्ध कराल, असा मला भरंवसा आहे."

**गणपतराव** ह्यांनीं पुष्कळसे निबंध व पुस्तकें लिहिलीं; परंतु ज्या धंद्यांत ते पडले होते, त्यांशिवाय इतर विषयांसंबंधीं एकही ओळ त्यांनीं प्रसिद्ध केली नाहीं. आपल्या आत्मचरित्रांत आपलें व्याकरणसुद्धां त्यांनीं बायबलच्या प्रसारार्थच लिहिलें, असें म्हटलें आहे. त्यांचे इतर निबंध खालीलप्रमाणें होत:—

( १ ) धि एलेमेंटरी ट्रुथ्स् ऑफ रिलिजन्, ( २ ) थॉट्स् ऑन् आयडॉ-लेट्री, ( ३ ) पँप्लेट ऑन् धि पारशी रिलिजन्, ( ४ ) ट्रॅक्ट्स् ऑन् ब्राह्मी-झम्, ( ५ ) मिल्टन्च्या पॅरडाइज् रिगेंडचें परीक्षण, ( ६ ) ख्रिस्तचरित्र, (७) रत्नागिरी व तेथील लोक. यांशिवाय इंग्रजींत व मराठींत आणखी लिहिलेलीं पुस्तकें–( १ ) हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास, ( ३ ) सहाव्या इयत्तेकरितां नेम-लेला टीपांसहितचा ज्ञानेश्वरीचा भाग, ( २ ) बाबा पदमजींच्या आत्मचरित्राचें भाषान्तर, ( ४ ) एफिशिअन्स यांस पत्र, ( ५ ) जॉन् गिल्पिन्सारख्या कांहीं पोवाड्यांचीं भाषान्तरें.

१८८० त त्यानीं आपल्या व्याकरणाची दुसरी आवृत्ति काढिली व सुधारून वाढविलेली तिसरी आवृत्ति १८९४ त प्रसिद्ध केली; नंतर ते रिटायर्ड झाले. त्यानंतर त्यांनीं नाशकास राहून एक वर्षपर्यंत आपल्या व्याकरणांत सुधारणा करून, त्यांत ५० पृष्ठें जास्त समाविष्ट केलीं. मुंबई ए० सो० च्या छापखान्यांत ती आवृत्ति काळजीपूर्वक छापवून घेऊन, त्या पुस्तकाची किं० पूर्वी ५ रु० होती, ती ८ रु० केली.

त्यांचीं आणखी कांहीं पुस्तकें—( १ ) नवीन गीतसंग्रह, ( २ ) ख्रिस्त-विजय, ( ३ ) बाल मराठी व्याकरण, (४) नवीन मराठी व्याकरण, ( ५ ) बालोद्यान–गीतें, ( ६ ) मराठीचें वाक्यपृथक्करण ( इंग्रजींत ), ( ७ ) जुनी जुनी वार्ता, ( ८ ) शमसोनमल्ल नाटक, ( ९ ) सदू कोळी, ( १० ) कोमस नाटक व परीक्षण, ( ११ ) तुकाराम, (१२) पाखंडवाद्याची सुलभ समजूत,इं०.

ते आपले बरेच लेख " धि ख्रिश्चन् पेट्रियट् " यामध्यें देत असत; तें पत्र मद्रासमधील हिंदी खिस्त्यांकरितां काढिलेलें होतें. " ख्रिश्चन् सिटिझन् " नांवाचें जें मासिक पुण्यांत निघत असे, त्याची इंग्रजीची बाजू हे संभाळीत असत.

ह्यांची मुलगी मिस् **आर० नवलकर** बी०ए० ह्या हल्लीं पुण्याच्या फीमेल ट्रेनिंग् कॉलेजच्या सुपरिंटेंडेंट् असून, त्यांनीं कृपा करून आपल्या वडिलांचें इंग्रजींत दिलेलें हें चरित्र भाषान्तर करून येथें उतरिलें आहे.

---

# २२. प्रो० राजाराम रामकृष्ण भागवत.



ह्यांचें चरित्र विविध–ज्ञानविस्ताराच्या ४० व्या पुस्तकापासूनच्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. त्यांतील भाग सारांशरूपानें येथें घेतला आहे. ह्यांचे बन्धु नासिकच्या हायस्कूलमध्यें आहेत, त्यांनीं चार ओळी दिल्या असत्या, तर त्या अधिक योग्य शब्दांनीं त्यांना देतां आल्या असत्या; परन्तु त्यांनीं शास्त्रीबोवांचें चरित्र पुण्यांतील निळ्या–काळ्या शाईचे प्रसिद्ध कारखानदार घोरपडे ह्यांनीं छापल्याचा हवाला दिला. असो.

**राजारामशास्त्री** हे नेमस्त किंवा उदारमतवादी असें म्हणवून घेणाऱ्या पक्षाचे होते; एवढें प्रथम लिहिलें, म्हणजे त्यांविषयीं वाचकांस यथार्थ कल्पना करितां येईल. शास्त्रीबोवांनीं आपल्या स्वतःच्या लेखांविषयीं असेंच स्पष्ट म्हटलें आहे कीं, "आपण हंगामी लेख लिहिले. त्रिकालाबाधित सत्य त्यांत सांपडेल, अशी कोणीं अपेक्षा करूं नये." अर्थात् हे लेख त्यावेळीं चर्चेला व एकंदरींत ऐतिहासिक, भाषाविषयक, वगैरे प्रगतीला फार कारणीभूत झाले; हें ध्यानांत ठेवावयास पाहिजे.

राजापूर तालुक्यांत सन १८५१ मध्यें ह्यांचा '**कशेळी**' येथें जन्म झाला. त्या गांवीं ह्या घराण्याचें नांव "राऊत" असें चालतें. त्या कुळांतील एक पुरुष पूर्वीं पेशव्यांकडे बारगीर असून, चाबूकस्वार व अश्वविद्यानिपुण होता, म्हणून त्या घराण्यास तें नांव पडलें असावें. शास्त्रीबोवांचे वडील मुंबईस आल्यावर त्यांनीं हें नांव बदललें. मुंबईच्या म्युनिसिपालिटींत ते नोकर होते. तेही चांगले लेखक होते. राजारामपंत ह्यांना लहानपणींच मातृवियोग झाला. एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें त्यांचें इंग्रजी शिक्षण झालें. १८६७ त ते प्रवेश–परीक्षा पास झाले. त्यापूर्वींच १ वर्ष त्यांचा विवाह झाला होता. नंतर ते शिक्षणाकरितां मेडिकल कॉलेजांत गेले. तीन वर्षें शिक्षण झाल्यावर १८७० त त्यांनीं तो कोर्स सोडला; व संस्कृताचा चांगला अभ्यास केला. डॉ० **अण्णा मोरेश्वर कुंटे**, डॉ० **रणछोडदास कीर्तिकर** हे त्यांचे मेडिकल कॉलेजांतलि सहाध्यायी होते. राजारामपंतांचे

वडील १८७७ त वारले. त्यानंतर त्यांनीं मनिस्कूलमध्यें संस्कृत शिक्षकाची नोकरी धरिली. पुढें त्यांच्या कामाची अल्पावधींतच प्रशंसा होऊन, त्यांस प्रथम संस्कृत शास्त्री म्हणून व पुढें प्रोफेसरचें काम "सेंट झेवियर कॉलेज"मध्यें मिळालें. ते शेवटपर्यंत सुमारें ३१ वर्षें त्या जागेवर होते. पदवीधर नसून, त्यांस ही जागा मिळाली होती.

सन १८८४ त "बॉंबे हायस्कूल" नांवाची एक संस्था मुंबईस निघाली, तिच्या संस्थापकांमध्यें हे होते. पण त्यांचें खरें कर्तृत्व १८८६ त त्यांनीं काढिलेल्या "**मराठा हायस्कूल**"च्या भरभराटीवरून दिसून आलें. ही शाळा त्यांनीं २२ वर्षेंपर्यंत मुकाट्यानें पण भरभराटीच्या स्थितींत चालविली. १८९६ त ह्या शाळेला पी० ई० चा वर्ग जोडण्याचीही परवानगी मिळाली होती. ह्या शाळेकरितां बाहेर मदत मागण्याचीही जरूरी पडली नाहीं, इतकें स्वावलंबन **राजारामशास्त्री** ह्यांनीं तिला अंतःसुधारणांनीं आणून दिलें होतें. शास्त्रीबोवांना ह्या शाळेचें पूर्ण कॉलेज करण्याची इच्छा होती, पण प्लेगमुळें कांहीं जमलें नाहीं. आपले साधु व कवि ह्यांच्याबद्दल पुण्यतिथि; सुट्या आणि त्या दिवशीं त्यांच्या चरित्रापासून घेण्याचा बोधपर उपदेश; शाळेच्या बौद्धिक कार्यक्रमास सुरवात होण्यापूर्वीचें ईशस्तवन; इत्यादि नवीन तऱ्हा शास्त्रीबोवांनीं ह्या शाळेंत नवीनच सुरू केल्या व अलीकडे पुण्या-मुंबईच्या शाळांनीं त्या उचलल्या. त्याचप्रमाणें अस्पृश्यांसही शाळेंत बोलावून, त्यांस उपदेश करण्याचा नवीन उपक्रम सुरू केला. स्वधर्म सोडून बाटण्याचा धूमधडाका त्यावेळीं सुरू असतां, अशा लोकांच्या परावर्तनाकरितां, त्यांनीं "वार्ताहर" नांवाच्या त्यांनींच काढिलेल्या मासिकामध्यें हिंदुधर्म-विवेचनपर लेख लिहिले. तें मासिक शास्त्रीबोवांनीं दोन वर्षें चालविलें.

( १ ) शास्त्रीबोवांनीं १८८४ त "**जशास तसें**" हा आपला पहिला ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांत **रा० भि० गुंजीकर** यांनीं "**सरस्वती-मंडल**" नामक पुस्तकांत महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या सहा प्रमुख जातींबद्दल जीं विधानें केलीं होतीं, त्यांचें खण्डन होतें. त्या लेखांवरून शास्त्रीबोवांच्या अंगचा विकारप्रभाव व वादप्रवणता ह्या गोष्टी दिसून आल्या. ( २ ) पुरातन-वस्तु-शास्त्र-शोध ह्या विषयावर जांभेकर, तळेकर, भाऊ दाजी, भाण्डारकर, तेलंग, भगवानलाल, इ० चे लेख "**इंडियन अँटिक्वेरी**" नामक मासिकांत येत असत. त्यांतच ह्या विषयावर शास्त्रीबोवांनीं "**विचार माधुकरी**" ह्या नांवाचा लेख लिहिला.

( ३ ) भाषातुलना-शास्त्राकरितां त्यांनीं फारसी, आरबी, फ्रेंच, हिंदी व गुजराथी ह्या भाषांचा अभ्यास केला; आणि त्या विषयावर त्यांनीं "रॉयल एशियाटिक सोसायटी" पुढें इंग्रजींत निबन्ध वाचले व ते पुढें प्रसिद्ध केले. १ महाभारताची विचिकित्सा, २ भगवद्‌गीतेंतील बुडया, ३ एकपाद कली, ४. वेदार्थयत्नाची गुरुकिल्ली, इ० त्यांचे प्रमुख लेख आहेत. ( ४ ) १९०२ मध्यें ते वुइल्सन फायलॉलाजिकल लेक्चरर होते; ते त्यांचे निबन्ध प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणें ( ५ ) "पारशी धर्म" ह्या विषयावरही त्यांनीं महत्त्वाचे व शोधप्रचुर लेख लिहिले.

( ६ ) शास्त्रीबोवांचे "विविधज्ञानविस्तारांत" बरेच लेख आले आहेत: त्यांपैकीं, "मराठशाही" संबंधीं लेख केव्हांही वाचनीयच ठरतील. त्या लेखांत त्यांनीं देशी व इंग्रजी सामग्री कामीं लाविली आहे. त्यापूर्वी फक्त इंग्रजी सामग्रीवरच लेखकांचा भर असे. ( ७ ) विस्तारांतील " मराठ्यांविषयीं चार उद्गार " हे त्यांचे दुसरे विस्तृत लेख असून, त्यांत शाहू व पेशवे ह्यांविरुद्ध आणि कोल्हापूरकरांस अनुकूल अशाप्रकारची टीका आहे. ( ८ ) शास्त्रीबोवांचे सामाजिक व धर्मपर लेखही बरेच आहेत. ( ९ ) "केसरकडून सुल्तानकडे" हें त्यांचें पुस्तक गायकवाडी पुस्तक-मालेमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

सामान्यतः शास्त्रीबोवांच्या लेखांत न्यायनैष्ठुर्य, ब्राह्मणांविषयीं अनुदारता व त्याचमानानें ब्राह्मणेतरांविषयीं फाजील उदारता, जातिभेदाविषयीं उभा दावा, इ० विशेष गोष्टी आढळून येतात. (वि० वि०).

**विष्णुशास्त्री** चिपळूणकर आणि **राजारामशास्त्री** भागवत यांच्यामध्यें कांहीं समान प्रकारचीं साधर्म्यें व वैधर्म्यें आढळून येतात. ( १) दोघेही समकालीन. (२) १।२ वर्षांच्या अंतरानें प्रवेश--परीक्षा पास. ( ३ ) अभ्यासवृत्ति उभयतांची सारखी. एकानें ( डेक्कनमध्यें गोलांटया खात ) पदवी मिळविली इतकेंच. दुसऱ्यानें अर्धवटच आपला परीक्षाक्रम सोडून--दिला. ( ४ ) दोघांनीं स्वतंत्र हायस्कुलें अनुक्रमें पुण्यास व मुंबईस काढिलीं आणि तीं ( ५ ) कर्तबगारीनें चालविलीं. ( ६ ) दोघांनीं आमरण शिक्षकाचा धंदा केला. ( ७ ) सरकारी नोकरीची दोघांसही सारखीच चीड असे. ( ८ ) दोघेही संस्कृत व इंग्रजी यांत निष्णात. ( ९ ) दोघे खंदे लेखक. ( १० ) पोटार्थी किंवा भाडोत्री काम कोणींच केलें नाहीं. ( ११ ) दोघांत वक्तृत्वशक्ति कमी, पण मतांत मात्र विरोध फार होता. ( १२ ) दोघेहि पाश्चात्य सुधारणेचे द्वेष्टे; पण एकाचें हत्यार

सत्तावन्त प्रतिपक्षावर, तर दुसऱ्याचें हत्यार अंतर्मुखदृष्टीनें पाहून, समाजांतील आपल्याच लोकांच्या दुष्प्रवृत्तींवर. एवंच, दोघेही विकारवश, पण वरील कारणामुळें **विष्णुशास्त्री** लोकांत अधिक प्रिय व **राजारामशास्त्री** कांहीं अंशीं अप्रियच म्हटलें तरी चालेल,

ता० ४ जानेवारी १९०८ रोजीं हे मृत्यु पावले. ह्यांच्या वर लिहिलेल्या फायलालॉजिकल लेक्चर्साशिवाय, ' विस्तारांतील ' " महाराष्ट्र–देश, महाराष्ट्रीय लोक व मराठी भाषा " यांसंबंधींच्या लेखांमधील त्यांचे व्युत्पत्तिविषयक शोध चिन्तनीय आहेत; त्याचप्रमाणें शास्त्रीबोवांनीं एक मराठी " छोटें व्याकरण " लिहिलें असून, ( मुं० म० ग्रं० सं० त आहे ) लेखनशुद्धीसंबंधींही एक लहानसें पुस्तक लिहिलेलें आहे.

---

## २३. कै० रावजी शास्त्री गोडबोले.

मूळ राहण्याचें ठिकाण–**वाई**, जि० सातारा. पिढीजाद धंदा–भिक्षुकी. स्थिति गरीबीची. वाईस चरितार्थ चालेना म्हणून पुण्यास आले. तेथें जुन्या विश्रामबागेंतील पाठशाळेंत यांनीं संस्कृत व इंग्रजी ह्यांचें अध्ययन केलें. त्यावेळीं सरकारांतून गरीब होतकरू हुशार विद्यार्थ्यांस अल्पशिष्यवृत्ति, वाड्यांत राहण्यास जागा, ग्रंथ वगैरे मोफत मिळत; म्हणून विद्यार्जन करतां आलें. पाठशाळा सोडल्यानंतर कांहीं थोडीं वर्षे साहेबलोकांची **पंडितागिरी** करून उदरनिर्वाह करीत. पुढें शाळाखात्यांत नोकरी केली. प्रथमतः कांहीं वर्षे पुण्याच्या ट्रेनिंग कालेजांत संस्कृत व मराठी ह्या विषयांचे अध्यापक होते. त्यावेळेस यांचे–ग्रंथांचें मार्मिक परिशीलन व तीव्र बुद्धिमत्व–हे गुण अधिकाऱ्यांच्या नजरेस आले; यामुळें त्यांना सरकारनें दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी नेमिलें. त्याकाळीं मराठी भाषेंत योग्य ग्रंथकारांस उपयुक्त ग्रंथ करण्यास पारितोषिकें देऊन उत्तेजन देणें, हें ह्या कमिटीचें काम असे. हें काम सुमारें २५ वर्षे केल्यानंतर ते शाळाखात्यांत मराठी ट्रान्सलेटर झाले. शाळाखात्यांत चालू असलेल्या सरकारी पुस्तकांच्या नवीन संशोधित

आवृत्ति छापून काढणें, शालोपयोगी नवीन पुस्तकें मराठींत लिहिणें, अगर विद्वान् ग्रंथकारांकडून लिहावेिणें, व तीं तपासून छापाविणें. तसेंच एकाद्या ग्रंथकारानें लिहिलेलें पुस्तक शाळाखात्यांत चालू करण्यास योग्य असल्यास तें खात्याकडून मंजूर करून घेणें, इत्यादि कामें मराठी ट्रान्सलेटरचीं असत. हें नांव देण्याचें कारण असें कीं, स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्ति त्याकाळीं नसल्यामुळें बरेचसे ग्रंथ परभाषेंतून रूपांतरवजा करावे लागत. त्यांनीं सन १८८८ त पेन्शन घेतलें.

प्रकृतीच्या कायमच्या दीर्घकालीन रुग्णावस्थेमुळें यांना वाङ्मयात्मक विशेष कामगिरी करतां आली नाहीं. ह्यांनीं सरकारी हुकुमानें केलेले ग्रंथ-मराठी ४ थ्या इयत्तेकरितां [१] " महाराष्ट्राचा संक्षिप्त इतिहास " [२] " हंटरचा हिंदुस्थानचा इतिहास, " व [३] " राबिन्सन् क्रूसोचें भाषांतर, " व संशोधिलेला ग्रंथ- [४] " **नवनीत**. " सांप्रत सुधारलेल्या नवनीताचें श्रेय पुष्कळसें ह्यांचे वाट्यास येण्यासारखें आहे.

रावजीशास्त्री गोडबोले यांस सरकारनें (चाटफिल्ड डायरेक्टर यांनीं) एक मराठी शाळांतून चालविण्यास योग्य असें व्याकरण रचण्यास सांगितलें. मूळच्या अशक्त प्रकृतीमुळें त्यांच्या एकट्याच्यानें हें पुस्तक पूर्ण झालें नाहीं. तेव्हां पुण्याच्या मेल ट्रेनिंग कॉलेजांतील त्यावेळचे अध्यापक कै० **नारायणशास्त्री साठे** व कै० **नारायण धोंडदेव जोशी** यांच्या मदतीनें रावजीशास्त्री यांनीं "**मराठी भाषेचें मध्यम व्याकरण**" हें पुस्तक तयार केलें. हा ग्रंथ सन १८८७त पुरा झाला; तरी १८९१ मध्यें **रावजीशास्त्री** हे कै० होईपर्यंत तो प्रसिद्ध होऊं शकला नाहीं. पुढें यांच्या मृत्यूनंतर सन १८९७ त रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर **हरि गणेश गोडबोले** यांनीं तो प्रसिद्ध केला. तिघां पंडितांच्या हातून हा ग्रंथ सिद्ध झाला असतांही तो सरकारी शाळांतून चालूं शकला नाहीं; या व अशा प्रकारच्या अनेक उदाहरणांवरून एवढी गोष्ट ढळढळीतपणें दिसून येते कीं, ग्रंथकारांची विद्वत्ता किंवा ग्रंथाची योग्यता ह्यांची किंमत ग्रंथकाराच्या मृत्यूनंतर क्वचित् शून्यही होते. नाहींतर सरकारनें आपल्याजवळील लायकांत लायक अशा गृहस्थांवर एकादें काम सोंपवूनही, तें कैक वर्षें पडीत कां रहावें, व त्याची वास्तपूस्तही कां होऊं नये, याची कांहीं उपपत्तिच लागत नाहीं ! यांचा **फोटो** उपलब्ध नाहीं, त्यांच्या चिरंजीवांनीं दिलेली ही माहिती येथें घेतली आहे.

# २४. कै० नारायणशास्त्री साठे.



**नारायण पांडुरंग शास्त्री साठे** यांचा जन्म श्री क्षेत्र **नाशीक** येथें सन १८३७ सालचे सुमारास झाला. त्यांचे वडील बंधु पांडुरंग शास्त्री आणि आजे नारायण शास्त्री साठे हे नाशीक येथील नामांकित शास्त्री असून पांडुरंग शास्त्री हे धर्मशास्त्रांत फार निष्णात होते. कै० **नारायण शास्त्री** हे बहुतेक शास्त्रांत चांगले विद्वान् असून व्याकरण-शास्त्रांत त्यांची विशेष गति होती. लहानपणीं त्यांना तालीम, पोहणें, वगैरे शारीरिक व्यायामाचा फार नाद असे; व शेवटपर्यंत त्यांची शरीरप्रकृति उत्तम होती.

त्यांचें मराठी भाषेवर उत्तम प्रभुत्व होतें. संस्कृत व मराठी भाषांच्या व्याकरणांचा त्यांनीं तुलनात्मक दृष्टीनें उत्तम अभ्यास केला होता.

त्यांना प्रथम इंग्रजी मुळींच येत नसे; तथापि संस्कृत व मराठी भाषांचें ज्ञान उत्तम असल्यामुळें त्यांनीं विद्याखात्यांतील कांहीं अधिकाऱ्यांस संस्कृत व मराठी शिकवून, त्यांचेपासून आपण नोकरींत असतांना त्यांनीं इंग्रजीचें चांगलें ज्ञान संपादिलें होतें.

त्यांचा स्वभाव निर्भीड व निश्चयी परंतु प्रेमळ; आचरण शुद्ध, कित्ता घेण्यासारखें होतें. ते जुन्या घराण्यांतील असून शास्त्री असतांही विवेकसंपन्न असल्यामुळें केवळ जुन्या रूढींस व आचारांस चिकटून न राहतां स्वतंत्रपणें विचार करणारे असत.

त्यांचीं चार लग्नें झालीं होतीं व त्यांस मुलगे व मुली बऱ्याच झाल्या, तरी त्यांचे मागें हल्लीं त्यांचें एकही अपत्य हयात नाहीं. ते १८९७ सालीं पावसाळ्यांत

प्लेगास बळी पडले ! [ ही माहिती व फोटो पुण्याच्या मेल ट्रेनिंग् कॉलेजचे **प्रिन्सिपल पुंडलीक** यांनीं शास्त्रीबोवांचे भाचे व सांगली संस्थानचे दिवाण **रामचंद्र सदाशिव आठवले** यांजकडून आम्हांस ऐन वेळीं मिळवून दिली, याबद्दल आम्ही ह्या उभयतांचे फार आभारी आहों. ]

कै० वा० **नारायणशास्त्री साठे** यांचा अत्यल्प असा जीवनवृत्तांत मराठी शाळापत्रक पुस्तक ९ अंक १ यांत पृष्ठ २५ वर प्रसिद्ध झालेला आहे. त्यांतील कांहीं भाग खालीलप्रमाणें:—

कै० शास्त्रीबावा यांचा दररोजचा पाठ अत्यंत मनोरम व उपयुक्त होत असे. शास्त्रीबावा आपल्या पाठाची पूर्वतयारी करून नित्य टिपणेंही काढीत; व जरूर ती माहिती विद्यार्थ्यांस देत.पाठ नेमिल्या वेळीं सुरू होऊन अगदीं नेमिल्या वेळांतच पुरा होईल अशी दक्षता घेत. यावरून आधुनिक शिक्षण–शास्त्राचीं सर्व तत्त्वें स्वभावतःच त्यांचे अंगीं बाणलीं होतीं, असें प्रायः निदर्शनास येई.

मराठी, संस्कृत हे विषय त्यांचे आवडते होते, तरी गणितादि शास्त्रांतही त्यांची पारंगतता चांगल्या प्रकारची होती. कै० **रावजी शास्त्री देवकुळे** गणिताचे मुख्य अध्यापक, हे आपल्या विषयांत महत्त्वाच्या बाबतींत शास्त्री-बावांचा विचार घेत असत; व ट्रेनिंग कॉलेजांत ही जोडी त्यावेळीं नामांकित शिक्षक म्हणून प्रसिद्ध होती.

मराठी व संस्कृत ह्या विषयांत जे विद्यार्थी अधिक सामर्थ्यवान् आहेत असें शास्त्रीबावांच्या निदर्शनास येई.त्यांस ते त्यांचें तत्संबंधीं ज्ञान परिपूर्ण होण्याच्या दृष्टीनें अत्यंत कळकळीनें मार्गदर्शक सूचना देत; सक्रीय साहानुभूतिपूर्वक मदत करीत; व खाजगी वेळांत घरीं येण्यास सांगून त्यांस नियमितपणें मराठी व संस्कृत ग्रंथांचें शिक्षण देत. शिक्षणाविषयक कळकळ जितकी शास्त्रीबावांमध्यें दिसून येत असे, तितकीच आपल्या विद्यार्थ्यांविषयीं इतर बाबतींतही असावी असें त्यांस वाटत असल्यानें त्यासंबंधींही मार्गदर्शक सूचना ते वेळोवेळीं करीत. इंग्रजी शिक्ष-णाचें महत्त्व त्यांना पूर्णपणें पटलें असल्यानें कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं इंग्रजी शिक्षणही घ्यावें असें त्यांस वाटत असे; म्हणून ते होतकरू विद्यार्थ्यांस शिक्षक झाल्यावर मोठ्या शहरीं काम करण्यास संधि मिळेल अशी मुद्दाम योजना करीत असत. यावरून त्यांचें विद्यार्थ्यांवर अकृत्रिम प्रेम कसें होतें, हें दिसून येणार

आहे. मराठीचें मार्मिक ज्ञान होऊन त्या भाषेंत मार्मिकपणें लिहिणारे व बोलणारे आपले विद्यार्थी असावे, अशी त्यांस महत्त्वाकांक्षा होती.

त्यांस डे० इन्स्पेक्टरच्या जागेचा मान देण्याचा सरकारचा पुष्कळ वेळां कल दिसून आला होता; पण त्यांना त्या अधिकाराच्या जागेपेक्षां गुरुत्वाचा मान अधिक असें वाटत असल्यानें तो योग त्यांनीं पुष्कळ वेळां नाकारल्याचेंही ऐकिवांत आहे. यावरून शिक्षकाच्या कामाचें महत्त्व किती आहे, हें त्यांनीं आपल्या आचरणानेंच सिद्ध करून दाखविलें; असें म्हणण्यास हरकत नाहीं.

व्याकरणावरील सर्व ग्रंथांचें परिशीलन त्यांनीं उत्तम रीतीनें करून त्यांतील दोष कोणते आहेत, हें आपल्या विद्यार्थ्यांस समजून दिल्यानें त्यांच्या विद्यार्थ्यांकडून जसें व्याकरण पायाशुद्ध शिकविलें जातें, तसें अलीकडील शिक्षकांकडून शिकविलें जात नाहीं. शास्त्रीबावांचें व्याकरणविषयक विचार ग्रंथरूपानें प्रसिद्ध होण्याचा सुयोग त्यांच्या अकालीं मृत्यूमुळें आला नाहीं. व्याकरणाची लेखी प्रत तयार झाली होती; पण मराठी भाषेच्या दुर्दैवामुळें तो व्याकरण-ग्रंथ मराठी वाङ्मयांत ललामभूत होण्याची संधि कालानें दिली नाहीं.

ग्रंथकार व कवि यांचें हृद्गत पूर्णपणें जाणण्याची शास्त्रीबावांची शक्ति फार मोठी असल्यानें गद्यपद्यसंबंधीं अगदीं यथार्थ ज्ञान विद्यार्थ्यांना मिळे. विद्यार्थ्यांना शास्त्रीबावांच्या पाठाची शक्य ती तयारी करून गेल्याखेरीज वर्गांत जाणें भीतीचें वाटे व पवित्र भाषण, आचरण, यांकडे ते डोळ्यांत तेल घालून पाहात असल्यामुळें विद्यार्थ्यांच्या शीलावर अत्यंत इष्ट असा परिणाम होत असे. जुन्या प्राचीन आचार्यांची कडक विद्वत्ता; गुरु **सांदीपनी**सारखी विद्यार्थ्यांच्या कल्याणाविषयीं कळकळ; पेष्टालाझी, फ्रोबेल, मांटेसोरी, इत्यादि पाश्चात्य शिक्षकांसारखी शिक्षणपद्धति; यांचें योग्य संमिश्रण शास्त्रीबावांमध्यें दिसून येत असल्यानें त्यांचें अनुपम चारित्र्य शिक्षकांना निरंतर आदर्शभूत असेंच होतें. " **मराठी भाषेचें मध्यम व्याकरण** " करण्यांत हे एक प्रमुख पंडित होते, हें वर आलेंच आहे.

———

## २५. कै० नारायण धोंडदेव जोशी.



हे पुणें मेल ट्रेनिंग् कॉलेजांतील व धुळें ट्रेनिंग् स्कूलमधील शिक्षक, मार्मिक भाषाभिज्ञ, मराठी भाषेचे व्यासंगी, मराठी व्याकरणकार, चांगले शिक्षक आणि आमरण विद्याव्यासंगी असे गृहस्थ होऊन गेले त्यांविषयीं १९०५ च्या शालापत्रकांत आलेली माहिती त्यांचे चिरंजिवांनीं दिली, ती खालीलप्रमाणें आहेः—

ह्यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांत **वरवडें.** त्यांच्या कुळांत कानदेव नांवाचा एक बुद्धिमान् व शूर पुरुष होऊन गेला. त्यानें मुसलमानांं अमलांत मोठी बहादुरी केल्यावरून त्यास बाराशें रुपये उत्पन्नाचा ( वर्षासनाचा ) पोमेंडी हा गांव इनाम मिळाला. हा गांव त्यांच्या कुळाकडे अद्यापि इनाम चालत आहे. पुढें ह्या घराण्यांतील एक गृहस्थ **गोविंदपंत,** हे स्वतःच्या कर्तबगारीवर ग्वाल्हेर-दरबारचे फडनवीस झाले. अद्यापि 'फडनिसांचा गोट' म्हणून ग्वाल्हेरीस यांच्या नांवाचें ठिकाण प्रसिद्ध आहे. पुढें त्यांनीं आपल्या पुतण्यास ग्वाल्हेरीस फडनवीस केलें, व आपण पुण्याचे दरबारांत प्रविष्ट होण्यासाठीं दक्षिणेंत आले. त्यावेळीं **सवाईमाधवराव** पेशवे होते. गोविंदपंतांनीं आपल्याबरोबर ग्वाल्हेरीहून येतांना कित्येक उंटें द्रव्यानें लादून आणिलीं होतीं. पुण्यास आल्यावर शुक्रवारांत त्यांनीं एक वाडा बांधिला. शेवटच्या रावबाजींच्या कारकीर्दीतील होळकरी दंग्यांत जीं कित्येक कुटुंबें धुळीस मिळालीं, त्यांत ह्यांचें द्रव्य तर लुटलें गेलेंच, पण वाडाही जळाला.

हें पूर्ववैभव नष्ट झाल्यानंतरच्या कालांत सन १८४१ मध्यें **नारायणरावांचा** जन्म झाला. फडके ह्यांच्या वाड्यांत जें मिशनस्कूल होतें, त्यांत ह्यांचें संस्कृत, मराठी, व इंग्रजी शिक्षण झालें. तेथें तीनपासून अठरा रुपयांपर्यंत त्यांना स्कॉलर्शिप् मिळत होती ; व बुद्धिमान् असल्यामुळें त्यांनीं चांगलें नांव विद्यार्थी-वर्गांत मिळविलें होतें. त्यांनीं गोल्ड्स्मिथच्या एका संपूर्ण काव्याचें संस्कृतांत एक कविताबद्ध भाषान्तर केलें होतें, तें त्या मिशन्-स्कूलमधील मुख्याध्या-

पकास फार आवडून, त्यानें **जोशीबोवांस** एक इनाम दिलें; व त्यांस पुण्या-च्या हायस्कुलांत जागा देण्याबद्दल शाळाखात्यांतील मुख्याधिकाऱ्यांकडे त्यांची शिफारस केली. त्याप्रमाणें १८६२ त त्यांस पुण्याच्या हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून नेमण्यांत आलें. पुढें वसईच्या अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूलचे त्यांस हेड-मास्तर नेमण्यांत आलें. पुढें बार्शी व जुन्नर येथें त्यांची बढती होत गेली. नंतर बारामतीस त्यांचे वडील फडणिशीच्या जागेवर होते, ते वारले; म्हणून घरची व्यवस्था पाहण्यासाठीं त्यांनीं मुद्दामच कमी पगारावर पुण्याच्या मेल ट्रेनिंग् कॉलेजांत आपली बदली करून घेतली. येथें ते २१ वर्षें काम करीत होते; व येथेंच ह्यांस उत्तरोत्तर बढती होत गेली. पुढें धुळ्याच्या ट्रेनिंग् स्कूलमध्यें त्यांची नेमणूक होऊन तेथेंच १९०१ मध्यें त्यांनीं पेन्शन घेतलें. १९०३ सालीं **वड-गांवच्या** रानांत त्यांस अर्धांगवायूचा झटका बसला. पुढें थोडथोडी प्रकृति खालावत जाऊन १९०५ मध्यें ते मृत्यु पावले. त्यांची मूळची शरीरप्रकृति निकोप होती. ते धार्मिक व कर्मठ वृत्तीचे असून, राहणी साधी व जुन्या चालीची होती. स्वभाव चौकस, हट्टी व म्हणूनच सत्यप्रिय होता. स्पष्टवक्ते-पणा हा गुण त्यांच्यांत विशेष होता. स्मरणशक्ति दांडगी. सुपारीच्या खांडा-चेंही व्यसन नव्हतें. विद्यार्थ्यांना मदत करण्याकडे त्यांचा विशेष ओढा असे. ते हजरजबाबी असत, असें म्हणतात.

मराठी भाषेच्या व्याकरणावर त्यांनीं फार परिश्रम केले. मराठी भाषेची उत्कृष्ट चिकित्सा होऊन, तिचें उत्तम व्याकरण व कोश प्रसिद्ध व्हावीं, अशी त्यांची उत्कट इच्छा होती. शेवटपर्यंत त्याबद्दल त्यांचे प्रयत्न सुरू होते. त्या-साठीं त्यांनीं मराठींत ज्या इतर भाषांचे शब्द आले आहेत,त्या आरबी, फारसी, वगैरे सात भाषांचा अभ्यास केला होता, आणि त्यांपैकीं बहुतेक भाषांतील व्याकरणें, कोश, वगैरेनीं आपला ग्रंथसंग्रह खच्चून भरून ठेविला होता. मरा-ठीचा कोश करण्यासाठीं २० वर्षें त्यांची खटपट सुरू होती. तो कोश अपू-र्णच राहिला; शाळांतील विद्यार्थ्यांसाठीं त्यांनीं एक व्याकरणाचें पुस्तक लिहिलें होतें, तेंही तसेंच राहिलें. ह्यांशिवाय त्यांनीं मराठी व्याकरणावर विस्तृत निबंध, स्फुट प्रकरणें व टिप्पणें लिहिलीं तींही अप्रकाशितच राहिलीं. ते चांगले सरस व मार्मिक कवि असून, केवळ शालीनतेमुळें व प्रसिद्ध न झाल्यामुळें, त्यांच्या परि-चितांसही त्याविषयीं फारशी माहिती नाहीं. "वर्णमाला रामायण" इत्यादि, त्यांची कविता आहे. संस्कृत व्याकरणसार हा त्यांचा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. वैद्यक, ज्योतिष यांतही त्यांनीं प्रवीणता संपादिली होती.

" मराठी भाषेचें मध्यम व्याकरण " **रावजी सदाशिव शास्त्री गोडबोले, नारायण शास्त्री साठे,** व **नारायण धोंडदेव जोशी,** ह्या त्रिवर्गांनीं सरकारचे आज्ञेवरून लिहिलें; पण रावजीशास्त्र्यांच्या पश्चात्, सन १८९७ मध्यें तें प्रसिद्ध झालें. त्यांतील सर्व प्रकारचे दोषांची जबाबदारी वरील ग्रंथकर्त्यांकडे नसून, केवळ प्रकाशकांकडे आहे, असें ह्या व्याकरणाच्या प्रस्तावनेच्या शेवटीं म्हटलें आहे. ग्रंथकर्त्याच्या मागें ह्या ग्रंथाचा प्रसार व्हावा तसा झाला नाहीं. या ग्रंथाशिवाय वरील तिघांनीं आपापले स्वतंत्र व्याकरण-ग्रंथ लिहिले होते, असें त्रुटित उल्लेखांवरून दिसतें.

**कै० नारायण धोंडदेव जोशी,** यांच्या मागें त्यांचे दोघे चिरंजीव पुण्यांत आहेत; पैकीं **लक्ष्मण नारायण जोशी,** ह्यांनीं आपल्या वडिलांचें चरित्र व फोटोही आम्हांस प्रेमानें दिला; याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोंत.

---

## २६. विनायक कोंडदेव ओक.



टापटिपीच्या सुबोध भाषेमुळें ज्यांनीं बालबोध नांवाचें सुप्रसिद्ध मासिक अखंड चौतीस वर्षे चालविलें, त्यांच्या इतर कामगिरीबरोबर, त्यांनीं व्याकरण-विषयक कांहीं त्रोटक निबंध व **'अगदीं सोपें व्याकरण'** ह्या नांवाचें एक लहानसें व्याकरणाचें पुस्तक विद्यार्थ्यांकरितां लिहिलें आहे; म्हणून त्यांचें चरित्र येथें थोडक्यांत त्यांच्याच बालबोधांतील आत्मचरित्रावरून सादर करितों.

हे चित्पावन कोंकणस्थ ब्राह्मण असून, ह्यांचें मूळ गांव रत्नागिरी जिल्ह्यांत चिपळूण तालुक्यांत **'हेद्वी'** नांवाचें आहे. त्यांचा जन्म सन १८४० त गुहागर

येथें त्यांच्या आजोळीं झाला. ४।५ वर्षांचे झाले असतील–नसतील तोंच त्यांचीं आई–बापें निवर्तलीं. त्यांचे चुलत–चुलते **दाजी काशिनाथ ओक** ह्यांनीं त्यांचा लहानपणीं प्रतिपाल केला. त्यावेळीं खेड्यांतून सरकारी शाळा नसल्यामुळें, दाजीबांनीं आपल्या मुलांस शिकविण्याकरितां एक पंतोजी घरीं ठेविलेला असे, त्यांच्या मुलांबरोबरच यांचें प्राथमिक शिक्षण म्हणजे सर्व उजळणी, मोडी–बालबोध वाचन, सरळ–व्याजापर्यंत अंकगणित व तोंडचे हिशेब इतकें झालें. ह्या पंतोजीची तोंडचे हिशेब शिकविण्याची एक जुनी वही असे, तिला 'मेस्तक' म्हणत. तिच्यावरून कच्च्यांच्या पद्धतीनें त्यावेळीं तो तोंडचे हिशेब शिकवीत असे. त्यांचे वेळीं शिक्षणांत भूगोल–इतिहासाचें नांवही नव्हतें. शिवाय, त्या वेळचे असे घरीं ठेविलेले पंतोजी बहुधा हरकाम्ये असत. त्यांस जमा–खर्च लिहिणें, धान्यांचीं मापें घेणें आणि कधीं कधीं घरांतील पाणी–उदक पाहणें, हीं कामेंही करावीं लागत.

अशा प्रकारच्या प्राथमिक शिक्षणानंतर दहा–बारा वर्षांच्या वयाचे असतांच, ते चिपळूण येथील सरकारी मराठी शाळेंत जाऊं लागले. त्या शाळेचे हेडमास्तर **पुरुषोत्तमपंत काणे** म्हणून चांगले विद्वान् गृहस्थ होते. त्यांजपासून त्यांस मराठीचे पुढें उपयोगी पडेल असें चांगल्या प्रकारचें शिक्षण मिळालें, असें ते म्हणत. यानंतर इंग्रजी शिकण्यासाठीं ते साताऱ्यास गेले; व इंग्रजी तीन पुस्तकांइतकें त्यांचें अध्ययन तेथील शाळेंत झालें. त्यांचें लग्न बरेंच लहानपणीं झाल्यामुळें, एवढें शिक्षण झाल्यावर त्यांच्या गळ्यांत प्रपंच पडला. तेव्हां त्यांस नोकरी धरणें भाग पडलें. त्यांचे साताऱ्चे हेडमास्तर पांढरकामे हे त्यावेळीं अहमदनगर जिल्ह्याचे डे० ए० इ० झाले होते; त्यांनीं त्यांस अहमदनगराजवळ भिंगार नांवाच्या गांवीं दरमहा ८ रु० पगाराची मास्तरची जागा दिली. "त्या वेळीं वस्तुपाठादिकांचें बंड नव्हतें" असें ते आपल्या आत्मकथनांत म्हणतात.

यानंतर त्या कालमानाप्रमाणें अनेक ठिकाणीं बदल्या होऊन, वाढत वाढत ते नाशिकास १०० रुपयांवर अ० डे० ए० इ० झाले; व सुमारें २९ वर्षें शिक्षक, व ५।६ वर्षें परीक्षक, या नात्यानें सरकारचें दीर्घकालपर्यंत म्हणजे सुमारें ३४–३५ वर्षें इमानें–इतबारें व 'वरिष्ठाचें बरें म्हणवून घेऊन' त्यांनीं काम केलें; आणि १८९५ सालीं ते पेन्शन घेऊन मुंबईस येऊन राहिले. त्यांचीं शिक्षणविषयक कांहीं मतें आज विचित्र वाटतील; पण त्यांनींच तीं नमूद केलीं असल्यामुळें मासल्याकरितां एक–दोन देतों.

( १ ) " शिक्षणांत ईर्षेपेक्षां शिक्षाच फार उपयोगी पडते. "

( २ ) " पुढें पुढें पुष्कळ शिकत जाणें ह्यापेक्षां संथा आणि गुंडिकाच फार उपयोगी पडतात. "

यावर भाष्य करण्याचें कारण नाहीं. शिक्षा केव्हां केव्हां जरी आवश्यक असली, तरी ती गौणच होय; तसेंच मुद्याच्या गोष्टी ध्यानांत राहण्याकरितां, त्या पाठ करणें जरी आवश्यक असलें, तरी 'संथा' व ' गुंडिका ' ह्यांचें माहात्म्य आतां कोणी फारसें मानणार नाहीं.

वरील हकीकत कै० ओकांनीं कांहीं कारणपरत्वें लिहून ठेविली होती, त्यांतील आहे. यापुढची हकीकत त्यांनीं स्वतः लिहिलेली नसून, बालबोधांतील त्यांच्या मृत्युलेखामधील निवडून घेतली आहे; व कांहीं त्यांचे चिरंजीव **गोपीनाथपंत** यांजकडून मिळाली आहे.

कै० ओकांचा आवडता व्यवसाय म्हटला म्हणजे ग्रंथ-लेखनाचा होता. त्यांनीं एकंदर ५०-५५ वर्षें बालबोधांत व इतर पुस्तकरूपानें सारखें लिहिलें. एवढ्या मुदतींत त्यांच्या हातून लहान-मोठीं पुष्कळच पुस्तकें मराठींत लिहिलीं गेलीं आहेत. ते वारंवार म्हणत असत कीं, " मला लिहावयाला मेजर टी० कँडीसाहेब यांनीं शिकविलें. " हें खरें आहे कीं, त्यावेळीं मेजर कँडी हे विद्येचे मोठे भोक्ते होऊन गेले; व मराठी ग्रंथकारांस त्यांजकडून पुष्कळच उत्तेजन मिळालें. त्याप्रमाणें हे कँडीसाहेब दक्षिणा प्राईज कमिटीचे अध्यक्ष असतां, कै० ओकांच्या ' लघुनिबंधमाला ' ह्या पहिल्या पुस्तकास बक्षिस मिळालें. त्यानंतर त्यांनीं ' मधुमक्षिका ' हें पुस्तक दक्षिणा प्राईज कमिटीकडे पाठविलें, तें त्या साहेबांस आवडलें. तेव्हां कँडीसाहेबांचें चिरंजीव यांनीं मुद्दाम नेवासें येथें जाऊन, ओकांस त्याप्रमाणें कँडीसाहेबांचें मत कळविलें. याप्रमाणें दक्षिणा प्राईज कमिटी, ख्रिश्चन् व्हर्नाक्युलर एज्युकेशन् सोसायटी व निर्णयसागर छापखान्याचे मालक ह्यांनीं त्यांस उदार आश्रय दिल्याबद्दल ते त्यांचे नेहेमीं धन्यवाद गात असत. ह्यांपैकीं साहेबांबद्दल मात्र ज्यास्त कौतुक त्यावेळीं पुष्कळांस वाटत असे; तसें यांस वाटत होतें.

कै० ओक साताऱ्यास इंग्रजी शिकण्यासाठीं गेले असतां त्यांस शिकवण्या करून पोटापुरतें मिळवावें लागत असे. तसेंच त्यावेळीं ते ' शुभसूचक ' नांवाच्या वर्तमानपत्रांत लेख लिहीत असत. तेथें त्यांस एकदां उदराचा विकार जडला होता व ते अगदीं अंथरुणासही खिळले होते. ते एका खाणावळींतल्या

खोलींत राहत असत. पण त्या खाणावळीच्या मालकिणीनें त्यांची मनापासून शुश्रूषा केली; व पोटच्या मुलाप्रमाणें औषधोपचार चालू ठेविले. इतर लोकांनीं त्यांस डोलींत घालून घरीं पोंचवून टाकण्याबद्दल सल्ला दिला होता. अखेर सातारच्या राजवैद्यांच्या घरीं ते मुलास शिकविण्यास जात असत. त्यांनीं शिक्षक बरेच दिवस कां आले नाहींत म्हणून चौकशी केली; तेव्हां त्यांची प्राणांतिक अवस्था त्यांस दिसून आली. अगदीं शेवटचा उपाय म्हणून त्यांनीं विड्यांतून दोन गोळ्या त्यांस खावयास दिल्या. त्या दैवगतीनें लागू होऊन, दोन तासांत घागरभर पाणी निचरून जाऊन, ओक ८।१० दिवसांत खडखडीत बरे झाले. त्या राजवैद्यांनीं मराठी भाषेवरच हे न कळत उपकार केले; असें बालबोधकारांनीं म्हटलें आहे.

मराठीची लेखन–शुद्धि कायम राखण्याकरितां त्यांनीं नेटाचे प्रयत्न केले, असें म्हणतात. त्यांनीं नेटानें प्रयत्न केला नसता, व कै० **विष्णु कृष्ण भाटवडेकर**, कै० **मोरो केशव दामले**, सर **भालचंद्र कृष्ण भाटवडेकर**, डॉ० **मॅकिकन्, रावसाहेब पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी** ह्यांनीं त्यांस मनोभावें साह्य केलें नसतें, तर आज निदान सरकारी क्रमिक पुस्तकांच्या लेखन–पद्धतींत मोठी क्रांति होऊन, फार मोठा घोटाळा झाला असता. तो टाळण्याचें बहुतेक श्रेय कै० ओकांस दिलें पाहिजे; असें बालबोधांतील त्यांच्या चरित्र–लेखकाचें म्हणणें आहे.

मागें ओकांचीं शिक्षा, संथा व गुंडिका यांबद्दलचीं मतें दिलीं आहेत; तशींच आणखीही कांहीं आहेत. “ उत्तम योद्धे जसे स्वयंभू असतात, शिकवून तयार करितां येत नाहींत; तसे उत्तम शिक्षक स्वयंभू असतात, ते शिकवून तयार करितां येत नाहींत; ” असें त्यांचें मत होतें. त्यास्तव ट्रेनिंग कॉलेजांची पद्धत त्यांस पसंत नसे. “ मी स्वतः १८६३ च्या जुलैपासून डिसेंबरपर्यंत सहा महिने पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजांत, सरकारनें पाठविल्यावरून गेलों होतों. तेव्हांचे आमचे सगळे शिक्षक चांगले होते. स्मिथ साहेब इंग्रजी शिकवीत, केरोपंतनाना गणित शिकवीत, रावजीशास्त्री गोडबोले मराठी शिकवीत, काकाचार्य संस्कृत शिकवीत, आणि कृष्णशास्त्री गोडबोले इतिहास–भूगोल शिकवीत. त्यांच्या सहवासांत आमचा बराच चांगला अभ्यास झाला; परंतु तेथें आम्हांस शिकविण्याची कला प्राप्त झाली, आम्ही पहिल्यापेक्षां अधिक चांगले शिकविणारे झालों, आम्हांला शिकविण्याची युक्ति कांहीं अधिक कळली, असें मात्र म्हणतां

येत नाहीं. आमचें ज्ञान वाढलें, त्याबरोबरच सगळींच लहान-मोठीं कामें करण्याची आमची शक्ति वाढली असली पाहिजे; त्यांतच शिकविण्याच्या शक्तीचीही वाढ झाली असली पाहिजे; तींत कांहीं विशेष भर पडली असें नाहीं;" असें त्यांचें म्हणणें असे.

त्याचप्रमाणें किंडरगार्डन् वस्तुपाठ, इत्यादिकांवर त्यांचा विश्वास नव्हता. "शाळाखात्यांतल्या मोठ्या अधिकाऱ्यांनीं शिक्षकांस सांगत सुटावें कीं, शिकणें हें मुलांस नेहमीं गारुड्याचा खेळ पाहण्यासारखें मजेचें वाटलें पाहिजे; आणि त्याचा नमुना म्हणून ते एकादा विषय घटका-अर्धी घटका शिकवून दाखवीत, तेव्हां मुलें तटस्थ ऐकत बसत हें खरें; पण तीं विषयानें मन वेधल्यामुळें नव्हे; तर ते मोठे अधिकारी लहानशा शिक्षकाचें काम करितात, हें कौतुक पाहण्याकरितां व धाकानें तशीं बसत असत; आणि हें त्या अधिकाऱ्यांच्या लक्षांत येत नसे." अशा प्रकारचें वस्तुपाठादिकांबद्दल त्यांचें मत असे.

त्यांचे वेळीं सरकारच्या इयत्तांतले अभ्यास व खेड्यांतल्या लोकांची विद्येविषयीं कल्पना यांत फार अंतर होतें. "भूगोल, इतिहास, व्याकरण, इत्यादि विषय खेड्यांतल्या लोकांस दृष्टीस नको असत; ते शाळांच्या परीक्षांस तर आवश्यक असत; म्हणून त्या आईबापांची मर्जी संपादून, त्यांस आवश्यक वाटणारे लेखन, वाचन, तोंडचे हिशेब, इ० विषय आधीं शिकवून, मग आपला खासगत वेळ महिनोंगणती खर्चून, मीं ते भूगोलादि विषय त्यांस शिकविले. त्यांत सरकारी काम रोज अमुक तास करावयाचें, हा कांहीं निर्बंध नव्हता. जागे झाल्यावर झोंप लागेपर्यंत शिकवावयाचें हें वेळापत्रक होतें."

कै० ओक जरी जन्मभर शिक्षक होते, तरी अध्यापन हा त्यांचा मुख्य व्यवसाय नसून, लेखन हाच त्यांचा मुख्य व्यवसाय होता. त्यांची लिहिण्याची पद्धति अगदीं सुबोध असे. उगाच जाडे शब्द घालून ते वाक्यें मनस्वी लांब करीत नसत. एकाबद्दल अर्थ सुबोध होण्यासाठीं चार वाक्यें घालावीं लागलीं, तरी ते पर्वा करीत नसत. लिहिण्यासंबंधाचा त्यांचा एक विशेष हा होता कीं, ते लेखांत कधींही खोडाखोड करीत नसत. ओळी मुक्तामाळेप्रमाणें असत. त्यांचे हस्तलेख दासबोधांतील 'लेखननिरूपण' यांतील पुढील ओळींची आठवण करून देतात-"पहिलें अक्षर जें काढिलें। ग्रंथ संपेतों पाहात गेलें। एक टांकेचि लिहिलें। असें वाटे ॥"

ते नामांकित असे आधुनिक कवि नव्हते, तरी त्यांच्या कविता सुबोध व प्रेमळ असत. 'पुष्पवाटिका' नांवाचें त्यांच्या कवितांचें एक पुस्तक प्रसिद्ध

झालें आहे. बालबोधांतही बहुतेक त्यांच्याच कविता येत. गद्याप्रमाणें पद्यांतही सुबोधतेवर त्यांचा कटाक्ष असे.

त्यांच्या ग्रंथाची समग्र यादी दिल्यास ते ५।५० तरी सहज भरतील. आम्ही त्यांचें चरित्रच लिहीत आहों, त्या अर्थी एका ठिकाणींच त्यांची कामागिरी पहावयास सांपडावी, म्हणून ती यादी येथें देतों.

१ लघुनिबंधमाला.
२ मधुमाक्षिका.
३ हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास.
४ हिंदुस्थानकथारस.
५ पीटर धि ग्रेट याचें चरित्र.
६ शिकंदर बादशहाचें चरित्र.
७ गद्यरत्नावली.
८ महन्मणिमाला.
९ इतिहासतरंगिणी.
१० फ्रान्सांतील राज्यक्रांतीचा इतिहास.
११ पुष्पवाटिका.
१२ आल्फ्रेड धि ग्रेट यांचें चरित्र.
१३ सर टॉमस् मन्रो यांचें चरित्र.
१४ शिपायांच्या बंडाचा इतिहास.
१५ मुलांचें कल्याण.
१६ मुलांस थोडासा बोध.
१७ मुलांस उत्तम बक्षिस.
१८ आनंदराव.
१९ शिरस्तेदार.
२० विद्यार्थ्यांचा व्याकरण-मित्र.
२१ ड्यूक ऑफ वेलिंग्टनचें चरित्र.
२२ वॅारन् हेस्टिंग्सची गोष्ट.
२३ मनुष्याचें कर्तव्यकर्म
२४ आब्राहाम लिंकनचें चरित्र.
२५ अनुकरण.
२६ शिक्षकांस थोडासा बोध.
२७ फुलांची परडी.
२८ स्वदेशाभिमान.
२९ बालबोध पहिलें पुस्तक.
३० ,, दुसरें ,,
३१ ,, तिसरें ,,
३२ ,, चौथें ,,
३३ ,, पांचवें ,,
३४ सोपें व्याकरण.
३५ ग्लॅडस्टनचें चरित्र.
३६ रावराजे दिनकरराव राजवाडे यांचें चरित्र.
३७ अमीर अबदुल रहिमान चरित्र.
३८ शहाणपणाचा ओनामा.
३९ प्रपंचरहस्य.
४० जावजी दादाजींचें चरित्र.
४१ महाराष्ट्र वाङ्मय.
४२ सांप्रतच्या लेखकांचें कर्तव्य.
४३ साम्युएल जॉन्सनचें चरित्र.
४४ इसापनीति.
४५ कठीण शास्त्रांतल्या सोप्या गोष्टी.
४६ शिमग्याविषयीं थोडा विचार.
४७ स्त्रियांची परवशता.
४८ रोमचा इतिहास. इ०

ही यादी **बालबोधा**शिवाय अगदीं अपुरी होईल. अत्यन्त नियमितपणानें त्यांनीं ३४ वर्षें एकहाती " बालबोध " मासिक चालविलें. तें त्यांचें बहुतेक अखंड स्मारकच आहे, म्हटलें तरी चालेल. त्यांनीं बालबोधांत एकंदर ४०२ चरित्रें, ४०२ कविता, ४०२ निबंध, ३७१ शास्त्रीय विषयांवरील निबंध, आणि इतर विषय ८५०, एवढें लिहिलें आहे.

गणेश जनार्दन आगाशे ह्यांच्या भाषेनें खालीलप्रमाणें हें चरित्र संपवितों—

विनायका, जोंवरि भूमिपृष्ठीं । नांदेल बोली वहिली मराठी ।
घरोघरीं तेंवि जनास हाटीं । रुचेल सोपी तव लेख-धाटी ॥
शिलादिकें निर्मित जें लयाला । जाई; तुला स्मारक तें कशाला !
ग्रंथावली जे हरितें तमाला । ते त्वत्कृती काय न दीपमाला ! ॥

सप्टेंबर १९१४ त यांचा मुंबईस मृत्यु झाला. त्यांचे चिरंजीव गोपीनाथपंत यांनीं आम्हांस आपल्या वडिलांच्या संबंधाचें टांचण मेहेरबानीनें पहावयास दिलें; हें येथें नमूद करण्यास आनंद वाटतो.

---

## २७. कै० बाळकृष्ण विष्णु भिडे.



" मराठी भाषेचें व्याकरण" ह्या नांवाचें एक पुस्तक चांगल्या विवेचकतेनें ह्यांनीं लिहिलें असून, त्यांच्या पश्चात् तें प्रसिद्ध झालें आहे. त्या पुस्तकांत ह्यांची दिलेली माहिती येथें त्रोटक रीतीनें दिली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्यांत इळें-दाभोळें नांवाचें गांव आहे, तें यांच्या पूर्वजांचें मूळ ठिकाण पुढें यांचे आजे यांनीं सांगली व कोल्हापूर येथील दरबारांत बरींच महत्वाचीं कामें केलीं. ह्यांच्या वडिलांनीं व चुलत्यांनींही भुदरगड व रांगणा येथील पुंडाई मोडण्यांत चांगलें शौर्य दाखविलें होतें; परंतु तो काळ गेला; आणि

त्यांच्या वडिलांना उतरतें मान येऊन, १८५० त **बाळकृष्णपंतांचा** जन्म झाला. त्यांना चुलता-चुलतीचा फार लळा असल्यामुळें, त्यांचें प्राथमिक शिक्षण तासगांव, नरसोबावाडी, येथें झालें. पुढें ते वडिलांकडे कोल्हापुरास गेल्यावर त्यांचें तेथील हायस्कुलांत शिक्षण झालें. तेथें **महादेव मोरेश्वर कुंटे** हे हेडमास्तर होते. १८६९ त मॅट्रिक् झाल्यावर कॉलेजांत जाण्याची त्यांची फार इच्छा होती, परंतु खर्चाची अडचण पडली. तेव्हां **कुंटे** यांनीं **बाळकृष्णपंतास** आपल्या हाताखालीं ३० रुपयांची असिस्टंटची जागा दिली. एक वर्षभर तेथें काम केल्यावर व खर्चाची थोडीशी अडचण दूर झाल्यावर ते डेक्कन कॉलेजांत गेले. १८७२ त ते एफ्. ए. झाले. **बळवंत नारायण जोशी** ( बी. ए. एल्. एल्. बी. ) ह्यांनीं कॉलेजांत असतां, उदारपणानें आपल्यास मिळालेली स्कॉलर्शिप् **बाळकृष्णपंतांस** दिली, म्हणून कॉलेजांतील त्यांचें शिक्षण झालें; पण ते प्रथम बी० ए० नापास झाले. म्हणून त्यांनीं सातारा हायस्कुलांत नोकरी धरिली. त्यांची शिकविण्याची शैली व हुषारी साताऱ्च्या हायस्कूलचे हेड्मास्तर रावबहादुर **विठ्ठल नारायण पाठक** ह्यांनीं पाहून, धुळ्यास नवीनच स्थापन झालेल्या ट्रेनिंग् स्कूलमध्यें शिफारस करून त्यांची नेमणूक करविली. मध्यंतरीं ते बी० ए० ही झाले.

धुळ्यास ट्रेनिंग स्कूलमधील शिक्षणक्रम उत्तम चालावा व तेथील शिक्षक उत्तम निपजावेत, म्हणून पुण्याच्या ट्रेनिंग् कॉलेजांत प्रसिद्धीस आलेले, विद्याव्यासंगी, मर्मज्ञ, विद्यार्थ्यांविषयीं कळकळ बाळगणारे, गणितशास्त्राचे अध्यापक **रावजी मोरेश्वर देवकुळे** ह्यांची नेमणूक सरकारनें ह्या ट्रेनिंग् स्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं केली, परंतु लौकरच ते निवर्तले; तेव्हां त्यांच्या जागीं **भिडे** यांची नेमणूक करण्यांत आली. **देवकुळे** हे खरोखरच विख्यात शिक्षक होऊन गेल्यामुळें, त्या ट्रेनिंग् स्कूलमधील विद्यार्थ्यांवर नवीन हेडमास्तरची छाप बसणें कठीण होतें; परंतु **भिडे** यांस त्यांच्या विद्वत्तेमुळें व सौजन्यामुळें कांहींच अडचण पडली नाहीं. संस्कृताचा पाठ शिकविण्याची त्यांची शैली उत्कृष्ट परिणामकारक होती; आणि गणित व पदार्थविज्ञान हे विषय तर ते फारच मनोरंजकतेनें व सोप्या भाषेनें शिकवीत; ह्यामुळें इतर सद्गृहस्थही ते प्रयोग पाहण्यास मुद्दाम येत असत, असें म्हणतात. ते मुलांच्या नीतिशिक्षणाविषयीं व त्यांच्या खानपानासंबंधीं व आरोग्याबद्दल फार काळजी बाळगीत असत. पुढें त्यांना बढती मिळून खानदेश जिल्ह्याचे डे० ए० इन्स्पेक्टरच्या जागीं त्यांची नेमणूक झाली.

हें काम करीत असतां, व शाळा तपासण्याच्या निमित्तानें त्यांना मराठीमधील अनेक संशयास्पद स्थळ आढळून आलीं; म्हणून त्यांनीं जुने ग्रंथ व व्याकरणें खूप वाचिलीं व त्यांवर टिपणें लिहून ठेविलीं. रात्रीच्या रात्री त्यांनीं ह्या नादांत घालविल्या. सरकारी काम संपल्यानंतर रात्रीं अकराच्या पुढेंही त्यांचा उद्योग चाले. शास्त्रीय ज्ञान संपादण्याचा तर त्यांचा हव्यास इतका जबरदस्त झाला कीं, १८९९ च्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस जी ताऱ्यांची वृष्टि होणार होती, ती पाहण्याकरितां त्यांनीं ३।४ रात्री नगांवच्या बारींत व पांझरा नदीच्या वाळवंटावर आलोचन जागरणांत घालविल्या. रात्रीं नऊ वाजतां खाकेंत एक सत्रंजी मारुन व डोकीला रुमाल बांधून बाहेर पडावयाचें आणि झाडझूड, इमारत, कांहीं नसेल अशा जागीं ती अंथरुन, रुमाल उशाला घेऊन, आकाशाकडे दृष्टि लावून, उताणें पडावयाचें; असा त्यांनीं तडाखा आरंभिला होता. त्यावेळीं त्यांच्या डाव्या फुफ्फुसाला विकृति झाली. प्रथम उसण भरली असें वाटलें; पण पुढें तो दुर्धर रोग होऊन १ जानेवारी १९०० रोजीं ते मृत्यु पावले. त्यांच्या स्नेह्यांनीं पुढील व्यवस्था लाविली. डेक्कन कॉलेजांत एकदां सर्व विद्यार्थ्यांच्या छातीचा घेर मोजला असतां यांचाच सर्वांत जास्त भरला. सिंगल् बार व इतर तालीम ह्यांत ते प्रवीण असत. ह्यांचे वडील तर घागर घागर उसाचा रस पीत; व एक सबंध फणस एकाच वेळीं खात असत; असें म्हणतात.

ह्यांनीं हितोपदेशांतील मित्रलाभ व त्यापुढील ३।४ भागांचें भाषांतर केलें आहे. तें गद्य-पद्यात्मक असून, चांगलें खुबीदार वठलें आहे; परंतु प्रसिद्ध झालें नाहीं. त्यांचें "मराठी भाषेचें व्याकरण" खानदेशांतील शिक्षकांच्या कृतज्ञतेनें व त्यांनीं त्या पुस्तकाच्या प्रति घेऊन मदत केल्यामुळें, त्यांचे मित्र **जनार्दन बाळकृष्ण उपासनी** ह्यांनीं त्यांच्या पश्चात् प्रसिद्ध केलें आहे. **गणेश जनार्दन आगाशे** ह्यांनीं त्यास प्रस्तावना लिहिली आहे, तींत ते म्हणतात— ( हे व्याकरणकार ) "सातारा हायस्कुलांतील शिक्षक असतांना, एका वर्गास मराठी शिकविण्याचा प्रसंग त्यांस आला. त्यावेळीं व्याकरण करितांना प्रथमेचा अर्थ कर्म, असें एका मुलानें उत्तर दिलें. बाकीच्या बहुतेकांनींही तेंच उत्तर दिलें. पण एका मुलानें मात्र त्या शब्दाची द्वितीया विभक्ति सांगून, तिचा अर्थ कर्म, असें सांगितलें; व यांनीं तें पसंत केलें. मुलांनीं पुस्तकाचे आधार दाखविले. तेव्हां इंग्रजींत कर्मवाचक शब्दाची द्वितीया असते, व संस्कृतांतही तोच प्रकार आहे, असें असतां, मराठींतच कर्मवाचक शब्दाची प्रथमा कशी होईल ? असा विचार

तेव्हांपासून त्यांच्या मनांत घोळूं लागला; व पुढें त्यांनीं त्या विषयावरील वाचन केलें; त्याचें हें पुस्तक फल होय. ”

क्रियापदविचार व सामान्यरूप ह्या दोन प्रकरणांत ह्या ग्रंथांत विशेष आहे. हा विशेष ग्राह्यच होईल असें नाहीं, परंतु व्याकरणविषयाची ज्यांना अभिरुचि आहे, त्यांना ह्या विचारांचा पुष्कळ उपयोग होईल; अशी आशा प्रस्तावनाकार **आगाशे** ह्यांनीं प्रगट केली आहे. हें पुस्तक १९०३ मध्यें गोंधळेकर ह्यांच्या जगद्धितेच्छु प्रेसमध्यें छापलें आहे.

---

## २८. गोपाळ व्यंकटेश पाणंदीकर.

यांनीं स्वतःच कृपा करून दिलेलें अल्प आत्मचरित्र येथें सादर करितों.



“ माझें जन्म मार्च १८५१ मध्यें गोमांतक प्रांतीं झालें. १८५६ च्या सुमारास कांहीं आप्तांच्या साह्यानें आम्ही सर्व मुंबईस आलों. अल्पसें प्राथमिक शिक्षण घेऊन, १८६१ मध्यें इंग्रजी शिक्षणास प्रारंभ केला. १८६७ मध्यें मॅट्रिकची परीक्षा होऊन, बी० ए० पर्यंत पुढें अभ्यास केला. इत्युत्तर मनी स्कूलमध्यें उपशिक्षकाची जागा पत्करिली. एथून सावंतवाडी इंग्लिश स्कूलवर गेलों. तेथें हायस्कूलची स्थापना मींच केली. तेथील काम पाहून मे० **चॅटफिल्ड** साहेबांनीं कुलाबा येथें १८९० सालीं डे० ए० इन्स्पेक्टरच्या जागीं नेमिलें. नंतर इतर जिल्ह्यांत हेंच काम करून, १९२२ मध्यें मुंबईच्या जागेवरून पेन्शन् घेतलें. त्यानंतर खासगी शाळांतून अध्यापकाचें काम करीत आहें.

मिळालेल्या शिक्षणावरून, प्राप्त झालेल्या अनुभवानें दृढ झालेलीं मतें संकलित झाल्याशिवाय चरित्र अपुरें राहील; म्हणून माझीं मतें खालीं नमूद करितों.

( १ ) हिंदुस्थानांतील अनेक तीव्र भेद लक्षांत घेतां प्रचलित राज्यपद्धतीच ठीक दिसते. निजमध्यें वेळोवेळ फेरफार करवून घेऊन तीच सुखकर करून घेणें प्राप्त आहे.

( २ ) एका देशाचें दुसऱ्या देशाशीं सहकारित्व असल्याशिवाय गत्यंतरच नाहीं: हा अर्थशास्त्राचा सिद्धांत लक्षांत ठेवून, परदेशी मालाच्या बहिष्काराचा अतिरेक न करितां, देशामध्यें उद्योग-वृद्धि करण्याबद्दल अश्रांत श्रम करणें, हेंच आमचें कर्तव्य होय.

( ३ ) सामाजिक सुधारणा करितांना जुनें तितकें त्याज्य व नवें तितकें ग्राह्य, हें धोरण ठेवणें चुकीचें होय; म्हणून पोषाख, खाणें-पिणें, इत्यादिकांत फेरफार करणें आवश्यक दिसत नाहीं. जातिभेद नाहींसा होणें शक्य नाहीं, परंतु जातिमत्सर समूळ नष्ट करितां येईल; हें मी स्वानुभवावरून सांगूं शकतो. स्त्रियांस उच्च शिक्षण दिलें म्हणजे बालविवाहाची चाल बंद होऊन, प्रौढविवाह रूढ होत जातील; मात्र स्त्रियांनीं साधेपणा सोडतां कामा नये. नाहींपेक्षां लोक-मत खचित विरुद्ध होईल. आमची एक मुलगी यंदां ( १९२५ ) बी. ए. होऊन एम्. ए. चा अभ्यास करीत आहे. परंतु त्या नव्या चालीच्या आहेत,असा त्यांजवर बिलकुल आक्षेप घेण्यांत येत नाहीं. (१) केव्हांही झालें तरी उक्तींत व कृतींत मेळ ठेवण्यास नेहमीं जपलें पाहिजे; व म्हणूनच मीं स्वतः पुनर्विवाह करून वरील तत्त्वाचें महत्त्व लोकांच्या नजरेस आणून दिलें.

( ४ ) परमेश्वरावर भरंवसा ठेवून त्याचेंच मनन-भजन करीत असणें हाच मनुष्यमात्राचा खरा धर्म होय. याशिवाय धर्माची म्हणून जीं कृत्यें करण्यांत येतात, त्यांची गणना करमणुकीच्या सदरांत करतां येईल.

वरीलप्रमाणें ह्यांनीं दिलेलें चरित्र जसेंच्या तसें दिलें आहे. यांत त्यांच्या व्याकरणसंबंधीं कामगिरीचा वगैरे उल्लेख हवा होता; ‘ प्रचलित राज्यपद्धतीच ठीक दिसते ’ वगैरे यांचीं मतें, तशींच सामाजिक मतें, यांबद्दल आम्हांस येथें विचार करण्याचें कारणच नाहीं. यांनीं **१ सुलभ मराठी व्याकरण, २ चिमु-कलें व्याकरण** व **मराठी वाक्य-रचना**, अशीं व्याकरणसंबंधीं तीन पुस्तकें लिहिलेलीं आम्हांस माहीत आहेत. व्याकरणांत शुद्धलेखनसंबंधीं विचार अन्य कोणीं यांचेपूर्वी फारसा केलेला नाहीं, तो थोडा-फार यांच्या पुस्तकांत आढळतो. कांहीं नवीन कल्पना यांच्या पुस्तकांत आहेत, पण त्या भीतभीतच मांडलेल्या असल्यामुळें, त्यांचा प्रसार झाला नाहीं. वाक्यरचनेच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात, “ या प्रकारच्या नवीन कल्पनांच्या प्रयत्नास आरंभ व्हावा म्हणून हा पाहिला प्रयत्न पुढें मांडला आहे; त्याची उपयुक्तता लोकांना व सरकारला दिसून आली, म्हणजे असे प्रयत्न आपोआप अस्तित्वांत येतील.” इ०.

---

## २९. नारायण विठ्ठल आपटे.



हे पनवेल तालुक्यांतील शिरढोण गांवचे राहणारे. यांचे वडील **विठ्ठलपंत** प्रथम मुन्सफ कोर्टांत कारकून होते. हे अतिशय सात्त्विक वृत्तीचे, मानी, कोमल, तेजस्वी व करारी वृत्तीचे होते, परंतु भोळे असल्यामुळें ह्यांची वडिलार्जित इस्टेट गेली. २५ वर्षें खडतर अवस्थेंत काढल्यावर ह्यांचे गुरु **रावजीबोवा पाठक** वाईकर ह्यांचा त्यांजवर अनुग्रह होऊन, अखेरचीं बारा वर्षें ह्यांचीं सुस्थितींत गेलीं. यांनीं आपला मृत्युदिन प्रकृति उत्तम असतांही १० दिवस अगोदर आपल्या स्नेह्यांस सांगून ठेविला होता, असें म्हणतात. ह्यांस तीन पुत्र. पैकीं वडील **नारायणराव.** ह्यांचा विद्याभ्यास पूर्वी गरीबी व शिरढोण गांवीं शिक्षणाची सोय नसल्यामुळें व्हावा तसा झाला नाहीं. सन १८६९ त ह्यांचा जन्म झाला. घरीं मराठी शिक्षण झाल्यावर फक्त पांच महिने कल्याणच्या शाळेंत जाऊन, त्यांची मराठी सहावीची परीक्षा पास झाली. या परीक्षेंत सर्व ठाणें जिल्ह्यांत ह्यांचा पहिला नंबर आला होता. लगेच त्यांनीं शाळा-खात्यांत नोकरी धरिली व पुढील वर्षी ट्रेनिंग कॉलेजांत त्यांचा प्रवेश झाला. ह्या कॉलेजांतील परीक्षांतही त्यांचा तिन्ही वर्षे सारखा पहिला नंबर होता. पुढें ठाणें जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं शिक्षकाचें काम करून लौकिक संपादिल्यामुळें, १९०४ त पुण्याच्या प्रॅक्टिसिंग् स्कूलचे त्यांस हेडमास्तर नेमिलें. तेथें सात वर्षें काम केल्यावर १९११ त त्यांस ट्रेनिंग् कॉलेजांत मराठीचे अध्यापक नेमिलें. नुकतेंच १९२२ त त्यांनीं पेन्शन् घेतलें.

ह्यांनीं इंग्रजीचा अभ्यास कोणाच्याही साह्यावांचून स्वतांच केला: उत्तम शिक्षक व शालोपयोगी उत्तम ग्रंथकार म्हणून ह्यांचा लौकिक आहे. ह्यांनीं पुष्कळशा सरकारी पुस्तकांचीं भाषान्तरें केलीं आहेत. त्यांचीं स्वतःचीं पुस्तकें पुढीलप्रमाणें आहेतः—( १ ) बालशिक्षण भाग १ व २, ( २ ) शाळेंतील गाणीं, ( ३ ) कवाइतींच्या हुकुमांचे शब्द, ( ४ ) शालोपयोगी कवाईत, ( ५ ) श्री सखाराम बोवांचें चरित्र, ( ६ ) पदार्थपाठमाला गुच्छ १।२।३, ( ७ ) बालोद्यान शिक्षणसार, ( ८ ) ठाणें जिल्ह्याचें वर्णन, ( ९ ) शुद्धलेखन-दीपिका, ( १० ) चिमुकल्या प्राण्यांच्या गोष्टी, ( ११ ) भूमितीच्या प्रश्नांचें पृथःक्करण, ( १२ ) **व्याकरण, पु० १।२,** व ( १३ ) **व्याकरणप्रबोध**, इ०.

बारा तेरा वर्षांपूर्वी ह्यांनीं व्याकरणाचीं शाळांतील वर्गास चालविण्यायोग्य अशीं दोन पुस्तकें लिहून, प्रसिद्ध केलीं आहेत. ह्या पुस्तकांतील पाठपद्धति एकंदरींत पुष्कळच चांगल्या प्रकारची आहे. **राजवाडे** यांच्याप्रमाणेंच ' संयुक्त-क्रियापदें ' ह्या बाबींचें मराठींतून उच्चाटन व्हावें, असें ह्यांच्या पुस्तकांवरून ह्यांचें मत दिसतें. कळमळतें, सांजावलें,ह्यांना हे अकर्मक कर्तरिप्रयोग म्हणतात. ' रामानें काम केलें ' यांत रामानें हा कर्ता, काम हें कर्म, केलें कियापद; व ' रामानें काम केलें आहे ' यांत रामानें हा केलें ह्या विधीविशेषणांतील करणें या क्रियेचा कर्ता; परंतु ह्या वाक्यांत काम हा कर्ता व आहे क्रियापद, हा अकर्म-कर्तरि प्रयोग; अशी यांची विचारसरणी आहे. द्वितीयालोपास हे अनुकूल आहेत. ह्यांचीं हीं पुस्तकें एकंदरींत जरी प्रचलित व्याकरण-पुस्तकांत गुणाधिक्यानें सरस आहेत, तरी तीं सरकारकडून फक्त लायब्ऱ्यांकरितां मंजूर करण्यांत आलेलीं आहेत; पण सररहा सरकारी शाळांतून चालविण्यास अद्यापि मंजुरी मिळाली नाहीं. यांनीं "मराठी शिक्षकां"तही ह्यासंबंधानें पुष्कळ लिहिलें आहे; " भूगोल-विद्येचे प्राथमिक पाठ " ह्यांसारखीं इंग्रजीवरून भाषान्तरित पुस्तकेंही ह्यांनीं लिहिलेलीं आहेत. वऱ्हाड शाळाखात्यांत ह्यांचीं व्याकरण-पुस्तकें मान्य झालेलीं-आहेत.

## ३०. विनायक गोपाळ भावे.



जन्म कोकणांत आडीव मुक्कामी रत्नागिरी जिल्ह्यांत झाला. लहानपणीं मराठी सहावे इयत्तेपर्यंत सर्व शिक्षण वडील बंधु रा० धुंडिराज गोपाळ भावे यांचे हाताखालीं झालें. इंग्रजीचा आरंभ रा० सीताराम वामन देशमुख इंजिनियर हल्लीं मुक्काम अकोला यांचे हातून झाला.

इ० स० १९११ साली अकोला हायस्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा पहिल्या क्लासमध्यें झाली. नंतर नागपूर येथें हिस्लॉप कॉलेजमधून बी० ए० ची परीक्षा १९१५ सालीं झाली. तेव्हांपासून हिस्लॉप कॉलेजिएट हायस्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत आहेत. १९१८ सालीं जबलपूर ट्रेनिंग् कॉलेज-

## ३१. सदाशिव नारायण कुळकर्णी.



जन्म:तारीख ४-१-१८९२ मु० खोलापूर जिल्हा उमरावती येथें(आजोळीं) झाला. वयाच्या नवव्या वर्षीच वडील वारले. यापुढें संगोपन व शिक्षण चुलते रा० रामराव हणमंत कुळकर्णी व चुलत बंधु रा० व्यंकटेश रामचंद्र कुळकर्णी यांचेकडून झालें. मिडलस्कूलपर्यंतचें शिक्षण वऱ्हाडांत दर्यापूर, दहिहांडा ( कुळकर्णीपणाचें गांव ), तेल्हारा व इलिचपूर ह्या ठिकाणीं व हायस्कूलचें व कॉलेजचें शिक्षण नागपूर येथें नील सिटी हायस्कूलमध्यें व हिस्लॉप कॉलेजमध्यें झालें. प्रसिद्ध व्याकरणकार **मो० के० दामले** हे त्यावेळीं नील सिटी हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट असल्यामुळें त्यांच्या शिक्षणाचा

मधून एल्० टी० ची परीक्षा झाली. यांचे आवडते विषय गणित, तर्कशास्त्र, व व्याकरण हे होत.

---

लाभ मिळाला. मॅट्रिकची परीक्षा १९११ मध्यें, बी० ए० ची परीक्षा १९१६ मध्यें व एल्० टी० ची परीक्षा १९१८ मध्यें झाली. १९१६ पासून पटवर्धन हायस्कूलमध्यें नागपूर येथें शिक्षकाचें काम करीत आहेत.

---

या उभयतांनीं मिळून एक व्याकरण–पुस्तक लिहिलें असून, त्यांत मोरो केशव दामले यांच्या व्याकरणांतील मतांचाच सर्वस्वीं अनुवाद केला आहे. मांडणी व्यवस्थित असून, वऱ्हाड शाळाखात्यानें हें पुस्तक मान्य केलें आहे.

---

## ३२. घनश्याम बाळकृष्ण चिपळूणकर.



हे आमचे ट्रेनिंग् कॉलेजांतील परम स्नेही. सावंतवाडी संस्थानांत राहणारे. त्या संस्थानांतील भालावली नांवाच्या गांवीं १८८३ सालीं हे जन्मले. मूळचे अत्यन्त गरीब. १९०५ मध्यें ते पुण्यास "नवीन मराठी शाळेंत" प्रथम ७ रुपयांवर मास्तर म्हणून लागले. पुढें त्या शाळेनें त्यांस स्कॉलर्शिप देऊन, मराठी ट्रेनिंग् कॉलेजांत शिकण्यास पाठविलें. तीन वर्षें झाल्यावर त्यांस माधवराव साने यांच्यानंतर "नवीन मराठी शाळेचे" हेडमास्तर नेमण्यांत आलें. तें काम व नंतर रमणबागेंतील शाळेच्या देखरेखीचें काम, आणि अखेरीस न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकविण्याचें काम यांनीं उत्कृष्टपणानें व तडफदारपणानें केलें. नुकतेच गेल्या वर्षीं (१९२६) त्यांनीं न्यू० इं० स्कूलमधून पेन्शन घेतलें; व हल्लीं ते पुण्याच्या सेवासदनांत काम करीत आहेत.

यांनीं "**सुबोध व्याकरण**" म्हणून मराठी चौथ्या इयत्तेकरितां एक व्याकरण–पुस्तक लिहिलें असून, तें नुकतेंच प्रायमरी स्कूलसकरितां सरकारनें मंजूर केलें आहे.

# ३३. प्रोफेसर लक्ष्मण गणेशशास्त्री लेले.



सुप्रसिद्ध कवि व ग्रंथकार **कै० गणेशशास्त्री लेले** यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव. यांचा जन्म श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथें इ० स० १८७२ सालीं झाला. शिक्षण नासिक हायस्कूल व फर्ग्युसन कॉलेजमध्यें. संस्कृत व्युत्पत्ति, अलंकारशास्त्र व वैद्यक यांचें गुरुमुखानें अध्ययन. वैद्यकींतल्या पारंगतपणाबद्दल शारदापीठाकडून यांस वैद्यपंचानन अशी पदवी मिळाली. अलंकारशास्त्र या नांवाचा यांचा अलंकारांवर मोठा ग्रंथ आहे. तो विद्वन्मान्य असून त्यास दक्षिणाप्राइज कमिटीनें बक्षिस दिलें आहे आणि मद्रास व नागपूर येथील यूनिव्हर्सिट्यांनीं तो उच्च शिक्षणक्रमांत नेमिला आहे शाकुंतलाचें गद्यपद्यात्मक भाषांतर ‘ मराठी शाकुंतल ’ या नांवानें यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. शिवपार्वतीविवाहावर ‘विश्वमंगल’ हें नाटक यांनीं रचिलें आहे. यांचें मेघदूताचें समवृत्त भाषांतर प्रसिद्ध आहे. भामिनीविलासाचें यांचें पद्यात्मक भाषांतर पंचवीस वर्षांमागें प्रसिद्ध झालें. त्याला मार्मिक अलंकार टिप्पणी जोडली आहे. ‘पद्यमंजरी’ नांवाचा यांचा स्वकृत काव्यकलाप त्याच वेळेला लोकांपुढें आला. या सर्व पुस्तकांना डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रा० सोसायटीनें पारितोषिकें दिलीं आहेत. ‘**तिलकांजलि**’ ‘**महाराष्ट्रवंदन**’ व ‘**अबलाविजय**’ हीं यांचीं स्वतंत्र काव्यें आहेत. ‘**सन्मार्गप्रदीप**’ हें मुलांकरितां लघुनिबंधात्मक पुस्तक आहे. भारत, रामायण व गीता, तसेंच इतर उपयुक्त विषय यांवरील यांचीं व्याख्यानें प्रसिद्ध आहेत. नासिकचे ‘**गंगाधर नरसिंह केतकर**, यांचें चरित्र’ यांनीं लिहिलें आहे. शारदाप्रसादन

मंडळांचे हे चिटणवीस असून यांनीं त्या मंडळाच्या अभिनवकाव्यमालेचे पहिला व चवथा असे दोन भाग संपादिले आहेत. **टिळक, मोगरे, पांगारकर, आगाशे, तांबे**, इत्यादि आधुनिक कवींच्या काव्यांवर यांचे टीकालेख प्रसिद्ध आहेत. **'काव्यसौंदर्य'**, **'गद्यरत्नसमुच्चय'**, **'पद्यरत्नसमुच्चय'**, **'मराठी गद्यमाला'**, **'मराठी पद्यमाला'** व **'संस्कृत वाचनपाठमाला'** इत्यादि शालोपयोगी पुस्तकें यांनीं तयार केलेलीं आहेत. **'आपलें बोलणें'** या नांवाची स्वयं-शोधन-पद्धतीनें लिहिलेली व्याकरणपुस्तकमाला यांनीं व रा० रा० **मोरेश्वर सखाराम मोने**, अध्यापक,-अध्यापिकाशाला, हिंगणें-पुणें. यांनीं मिळून तयार केली आहे.

शास्त्रीबोवा पुण्याच्या शिक्षणप्रसारक मंडळीचे तहाहयात सभासद असून त्याच मंडळीच्या न्यू पूना कॉलेजमध्यें मराठी विषयाचे प्रोफेसर आहेत. नगर, अमदाबाद, मुंबई, व पुणें येथील मोठाल्या शाळांतून त्यांनीं संस्कृत व मराठी भाषांच्या अध्यापकाचें काम कित्येक वर्षें केलें आहे. ठाणें येथील मराठी ग्रंथ-संग्रहालयाच्या एका वार्षिक समारंभाला हे अध्यक्ष होते. मुंबई युनिव्हर्सिटीच्या बी०ए० च्या मराठी विषयाचे हे परीक्षक असतात. पुण्याच्या म्युनिसिपालिटींत हे स्कूलबोर्डाचे चेअरमन् होते व हल्लीं स्कूलकमिटीचे अध्यक्ष आहेत.

---

## ३४. मोरेश्वर सखाराम मोने.



यांचा जन्म **पनवेळ** जि० कुलाबा येथें २४ डिसेंबर १८८५ रोजीं झाला. मूळ राहण्याचें गांव ठाणें जिल्ह्यांत **बेलापूर**. लहानपणींच वडील निवर्तले. तेव्हां यांचे मातुल पनवेलचे बापूसाहेब थोरात यांच्या आश्रयानें आरंभींचें शिक्षण होऊन पुण्याच्या ट्रेनिंग् कॉलेजांत यांचा प्रवेश झाला; तेथील शिक्षण आटोपल्यावर इंदोर स्टेटमध्यें १॥ वर्षें यांनीं आपल्या चुलत बंधूंच्या हाताखालीं कॉंट्रॅक्टचें काम केलें; पण त्या धंद्यांतील साकसुरत लबाडीचे प्रकार न मानवून, ते परत गांवीं आले. फारच थोडे दिवस ठाण्याच्या रेजिस्ट्रेशन ऑफिसमध्यें कारकुनीचें काम केलें; पण केवळ

न मागतांही तुमच्या साक्षीबद्दल निरक्षर बांधवांकडून सहज १॥-२ रु०

चा खुर्दा रोजीं टेबलावर पडूं लागला; पण गरीब निरक्षर लोकांकडून नुसत्या सहीकरितां असे पैसे उपटणें हेंही सुशिक्षितांस लांछनास्पद आहे असें वाटून, ती नोकरी सोडली. (या खात्यांत न मागतां एवढा पैसा मिळतो, मग उखळ पांढरें करून घेणाराबद्दल लिहावयासच नको !) पुढें " इंदुप्रकाश " प्रेसमध्यें **शास्त्री व लेखक** ह्या नात्यानें जवळ जवळ एक तप काम केलें. त्या कामांत एक डोळा गेल्यामुळें, हिंगणें येथील **अध्यापिका-शाळेंत** यांनीं शिक्षकाचें काम पत्करिलें. तेथें हे कायम शिक्षक असून, सुमारें बारा वर्षें काम करीत आहेत. येथें आल्यावरही टिळकांचें " **हिंदी गीतारहस्य** " यांनीं तपासलें.

ट्रेनिंग् कॉलेजांत असतांनाच यांस **विष्णु वासुदेव नाटेकर** यांच्या व्याकरण-विषयक सुन्दर व्याख्यानांमुळें प्रथम त्या विषयाची आवड उत्पन्न झाली. यांनीं **इंदुप्रकाशमध्यें दामले** यांचें " **शास्त्रीय मराठी व्याकरण** " छापत असतां त्याचीं प्रुफें तपासलीं, यामुळें ह्यांची व्याकरण-विषयाची गोडी अधिक वृद्धिंगत झाली; " **शास्त्री** " कामामुळें या विषयाकडे व लेखनशुद्धीकडे यांचें अधिक लक्ष वेधलें; व अखेरीस हिंगण्याच्या ट्रेनिंग् कॉलेजांत आवडतें शिक्षण-अध्यापनाचें काम बारा वर्षें मिळाल्यामुळें, जवळजवळ **दोन तपें** ह्यांनीं व्याकरणविषयक पुस्तकसंग्रह, चरित्रें, फोटो, इ० जमविण्यांत व तत्संबंधीं अध्ययनांत वेळ घालविला; त्याचें मूर्त स्वरूप " **मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरणप्रबन्धकार** " हें पुस्तक होय. ' **विहारी** ' पत्रामध्यें यांचे कांहीं लेख व कविता पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या आहेत.

हे व प्रो० **लक्ष्मण गणेशशास्त्री लेले** यांनीं मिळून, नवीन **स्वयंशोधन-पद्धतीनें**, ( Method of Investigation ) प्रत्येक इयत्तेस स्वतंत्र अशीं "**आपले बोल गें**" या नांवाचीं व्याकरणाचीं पुस्तकें लिहिलीं असून, त्यांत,शास्त्रीयता, दीर्घकालीन अनुभव, मुलांच्या ग्रहणशक्तीच्या दृष्टीनें सुबोध मांडणी, कांहीं फोटो व आकृति इत्यादिकांनीं समजूत व मनोरंजकता, इ० गोष्टी साधल्या असून, सरकारनें थोड्या दिवसांपूर्वी नेमलेल्या व्याकरण-कमिटीच्या धोरणास अनुसरून त्यांतील विवेचन आहे.

# विभाग चौथा.

## [ क ] व्याकरण-प्रबन्धकार.

### ३५. बापूशास्त्री शुक्ल.



महाराष्ट्र भाषेचे पाणिनि " **दादोबा** " यांचे हे गुरुजी होत. दादोबांच्या चरित्रांत ह्या उभय गुरु-शिष्यांच्या सुरत येथील प्रेमळ भेटीचा वृन्तान्त आलाच आहे. " हीं भुस्कट व्याकरणें हवींत कशाला ? मी तुला तोंडींच व्याकरण शिकवितों " असें त्यांचें म्हणणें असल्याचा उल्लेख दादोबा आपल्या आत्मवृत्तांत करितात. यांचा फोटो " कोंकण एज्युकेशन सोसायटींतील लाइफ मेंबर,-**बापूशास्त्री शुक्ल** यांचे वंशज-**शिवराम अनंत शुक्ल** एम्. ए. यांचेजवळ मला मिळाला. शिवरामपंतांनीं बापूशास्त्र्यांबद्दल बरीच चौकशी केली, परंतु जास्त माहिती त्यांस उपलब्ध झाली नाहीं. फोटो मात्र बऱ्याच परिश्रमानें त्यांस उपलब्ध झाला; व तो त्यांनीं कृपाकरून मला दिल्यानें, आपणांस " दादोबां "च्या गुरुजींचें वरील छायाचित्र पाहण्यास मिळत आहे. यांजकडून जरी फार माहिती मिळाली नाहीं, तरी **नागांव** ( ता० अलिबाग, जि० कुलाबा, प्रांत अष्टागर ) येथें **धोंडोपंत शुक्ल** नांवाचे एक वृद्ध पेन्शनर गृहस्थ आपल्या घरीं लंगोटी लावून, बाजेच्या, झोपाळ्यावर दमखोकल्यानें बेजार होऊन, जर्जर स्थितींत पडले होते, त्यांनीं तोंडीं सांगितलेली त्रोटक माहिती खालीलप्रमाणें:--

**बापूशास्त्री** यांचें सर्व नांव **बापूजी गणेश मायदेव**. त्यांचें मूळ ठिकाण **नागांव**, प्रांत अष्टागर. त्यावेळीं शास्त्री-पंडितांचें अष्टागरप्रांत हें नारळी-पोफळी-प्रमाणें आगरच होतें; असें म्हणण्यास हरकत नाहीं. 'शुक्र' हें या घराण्याचें वृत्ती-वरून नांव पडलें आहे. पांच घरें भिक्षा मागून निर्वाह करावयाचा, शूद्रप्रतिग्रह कधींच स्वीकारावयाचा नाहीं, असा या घराण्यांत नेम होता. आंग्र्यांकडूनही या घराण्यानें प्रतिग्रह घेतला नाहीं. **बापूशास्त्री** यांचें शिक्षण वाई येथें गोपी-नाथशास्त्री आगाशे यांजकडे झालें. हे हवेली तालुक्याचे मामलेदार होते; त्यावेळीं तेल, तूप, ह्यांवर जकात बसविण्याचा कलेक्टरकडून हुकूम आला; तेव्हां "हिंदुधर्मशास्त्राधारें ह्या वस्तूंवर कर बसवितां येत नाहीं," असा बापू-शास्त्र्यांनीं रिपोर्ट केला; तेव्हां ते पंडित आहेत असा लौकिक होऊन, त्यांची बदली मामलेदारीच्या ऐवजीं अहमदाबादेस न्यायनिवाडा करण्याचे पंचांचे जागीं झाली. हिंदुधर्मशास्त्राधारें यांनीं दिलेला निर्णय त्यावेळचे कोर्टाकडून प्रमाणभूत मानला जात असे, असें म्हणतात. "हिंदु लॉ" चें पुस्तक तयार झाल्यावर ह्या पंचमंडळींस पेन्शनें देण्यांत आलीं. याप्रमाणें तें खातें कमी झाल्यावर **बापूशास्त्री** नागांवास येऊन घरीं स्वस्थ राहिले. तरीही धर्मशास्त्राचे बाबतींत जरूर पडल्यास **बापूशास्त्र्यां**चा सल्ला घ्यावा, असा अलिबाग कोर्टास हुकूम होता. त्यांस शेवटचा पगार १०० रुपये होता; अर्थात् पेन्शन् ५० रुपये मिळालें. **बापूशास्त्री** हे सुमारें ८४।८५ वर्षांचे होऊन मृत्यु पावले. ( ही सर्व हकीकत वर उल्लेखिलेले रिटायर्ड सॅनिटरी इन्स्पेक्टर धोंडोपंत शुक्र यांजकडून तोंडीं जशी मिळाली तशी दिली आहे ).

**गंगाधरशास्त्री फडके, जगन्नाथशास्त्री क्रमवंत**, ही मंडळीही खुद्द नागांवचीच आहेत; ह्या उभयतांचेही नागांवास वंशज आहेत, परंतु वरील व्यक्तींची माहिती अगर त्यांचे फोटो वगैरे हल्लीं कांहीं उपलब्ध होत नाहींत. गिरगांव बॅकरोड-मुंबई येथें फडके यांचें गणपतीचें एक सुंदर मंदिर आहे; परंतु तेथेंही गंगाधरशास्त्र्यांचा फोटो किंवा अन्य माहिती मिळत नाहीं.

विविधज्ञानविस्तार पु० ४६ अंक ७ यांत दादोबांचें आत्म-चरित्र ह० भ० प० **पांगारकरां**नीं संपादिलें-आहे, त्यांतील बापूशास्त्र्यांसंबंधाची माहिती खुद्द **दादोबां**च्या अनुभवाची असल्यामुळें, तिचाही येथें समावेश करितों.

"सन १८२७ त मी [ दादोबा ] वरच्या वर्गांत गेलों, तेव्हां वरच्या दोन-तीन वर्गांस वाचन, लेखन आणि व्याकरण शिकविण्याकरितां **बापूशास्त्री**

**मायदेव शुक्ल** ह्यांची नेमणूक झाली. हे शास्त्री संस्कृत व्याकरणांत मोठे प्रवीण होते. त्यांस मांसाहारी जातीच्या मुलांस व्याकरण शिकविणें फार हलकें काम वाटे. हे नवीनच अध्यापन करून, व पुण्यांतील आणि इतरत्र शास्त्र्यांच्या सभा वगैरे पाहून आलेले होते. जर पेशवाई असती, तर ते असें काम करण्यास, १०० रुपये दरमहा घेऊनही टिकतेना; मग ४० रुपयांवर कोठून ? परंतु आपल्या विद्वत्तेचे भोक्ते कोणी राहिले नाहींत, म्हणोन उदरनिर्वाहाकरितां त्यांस असा रोजगार पाहणे जरूर पडलें. **बापूशास्त्री शुक्ल** व जर्व्हिस साहेबाचे मुख्य पंडित **जगन्नाथशास्त्री क्रमवंत** हे एक-ग्रामस्थ. ते पंचोपाख्यान, विदूरनीति, बाळमित्र, इ० ग्रन्थ आमच्याकडून वाचून घेऊन, आमच्या वर्णोच्चाराकडे लक्ष देत असत. त्यांची व्याकरण शिकविण्याची पद्धति इतकी उत्तम असे कीं, ते जें सांगत, तें माझ्या मनांत तेव्हांच भरे. त्यांनीं एक-दोन वाक्यें चालवून, त्यांचें शब्दशः व्याकरण आमच्याकडून करवावें; विभक्तींचे अर्थ सांगावे; कर्ता, कर्म, क्रियापद, हें विचारावें; केव्हां लहर आली, तर आर्या, श्लोक, ह्यांचे अर्थ सांगावे; व शुद्ध लिहवून घेऊन तपासावे. यांत माझा नंबर बहुधा पहिला पडत असे. त्यावरून **शास्त्रीबोवांची** मजवर बरीच मर्जी बसत गेली. त्यांनीं नेहमीं मला ‘ **दादा** ’ म्हणून हाक मारावी. त्यांच्या जवळ पानसुपारीची चंची असे. ती उघडून, रोज सुपारी खात खात, मोठ्या प्रेमानें, त्यांनीं आम्हांस लाडकेपणानें शिकविलें. त्यांची प्रकृति थोडी विनोदी असे; म्हणून आम्हांतून कोणीं अशुद्ध शब्द म्हटला, अथवा सिंहासन-बत्तिशींत जागोजाग लिहिलेल्या संस्कृत श्लोकांपैकीं, कोणीं अशुद्ध श्लोक म्हटला, म्हणजे ते म्हणत- ‘ तुम्हांला संस्कृत शब्दांचा उच्चार बरोबर येणार नाहीं. तुम्ही मा ( मां ) स-मासे खाणारे लोक, ’ असें मोठमोठ्यानें हांसून म्हणावें; परन्तु त्यांच्या बोलण्याचा कधीं कोणास राग आला नाहीं. उलटीं आम्ही मुलें त्यांजकडून अशीच बोलणीं ऐकून घ्यावयास, खूश असों. कारण, ते पुरुष फार मोकळे मनाचे होते. मला मराठी भाषेची इतकी गोडी लागण्यास कारण, आमचे तीर्थरूपांची दिनचर्या व दुसरे हे **बापूशास्त्री**. म्हणून ह्या **शास्त्रीबोवांचें** स्मरण मी मोठ्या कृतज्ञतेनें करितों. हे **बापूशास्त्री शुक्ल** पुण्यांत पुढें हवेलीचे मामलेदार झाले; आणि पुष्कळ वर्षें अहमदाबादच्या अदालतीचे शास्त्री होते. हे मला १८६८ च्या सुमारास मुंबईस भेटले होते. तथापि त्यांची स्मरणशक्ति अशी विलक्षण पाहिली कीं, ज्या ज्या गोष्टी त्यांचे कारकिर्दींत घडल्या, त्यांचें त्यांस सन, तारीख, वार, सुद्धां स्मरण होतें. हें पाहून मी फार विस्मित झालों !” इ०.

# ३६. हंसदास–रघुनाथ भास्कर गोडबोले.



" हंस–गुरु–पद्धति " नांवाच्या हस्तलिखित पोथींत **श्रीहंसस्वामींच्या** शिष्यांचीं चरित्रें आलीं असून, त्यांतच **रघुनाथ भास्कर गोडबोले**–प्रसिद्ध " **हंसकोश** "कार–यांचें त्रोटक पूर्वचरित्र आलेलें आहे. परंडा, पोस्ट शेपला, जिल्हा सोलापूर, येथील हंस–स्वामींच्या " हंस गुंफा–स्थान ' ह्या मठाचे सध्यांचे कारभारी हंससेवक **शंकर सदाशिव भालवणकर** यांनीं सदरहू मूळ पोथींतील हंस–उपासक नांवाचा दहावा भाग आमचेकडे पाठविला, ह्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यन्त आभारी आहों. मठांतील रोजच्या पूजास्थानीं ठेवण्याच्या मूळ पोथींतील एवढाच स्वतंत्र भाग तींतून वेगळा पाठविणें हें व्यवहारदृष्ट्या त्यांच्या धाडसाचें तर खरेंच, पण त्याहीपेक्षां गुरुविषयींच्या त्यांच्या अत्यादर-बुद्धीचें निदर्शक होय; एवढें येथें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

या पोथींतील नवमाष्टकांत ' **बाळकराम** ' नांवाच्या एका हंस–भक्ताचे चरित्र आलेलें आहे; व त्यानंतर दहाव्या अष्टकांत **रघुनाथ भास्कर गोडबोले** ह्यांजसंबंधीं वृत्तान्त आहे. "आतां **रघुनाथपंत** प्रतिनिधि यांचें आख्यान ऐका " असें **रघुनाथपंतांस** संबोधून त्यांचें ओवीबद्ध चरित्र दाखल केलें आहे. **रघुनाथपंतांचे** वडील हे रत्नागिरीकडील राहणारे होते; व ते आंग्र्यांच्या पदरीं दिवाण होते. समुद्राजवळ कुलाबा नांवाचा किल्ला असून, इतरांचा तेथील आंग्र्यांपुढें पाड नव्हता; असें आंग्र्यांसंबंधीं ह्या पोथींत वर्णन आहे. रघुनाथपंतांचें घराणें मूळचें फार श्रीमंत होतें. " परि तो विश्वनाथ पेशवा । येणें गर्दी करून पळविला । **भास्करपंताच्या** यजमानाचा तेव्हां । वियोग जाहला " असें असंबद्ध वर्णन ह्या पोथींत आहे; त्यांतील कर्ता–कर्म यांचा नीट कांहींच बोध होत नाहीं. (**बाजीराव–बाळाजी**–हीं नांवें खोडून, **विश्वनाथ** हें नांव पोथींत दुरुस्तीचें म्हणून मागाहून घातलेलें आहे. ) **रघुनाथपंतांचे** वडील **भास्करपंत** हे यजमानाच्या वियोगानंतर पुढें कांहीं काळ फिरत राहिले नंतर पुण्यास आले. पुढें **बाळकृष्ण** नांवाच्या वडील मुलासह वाईस गेले, तेथें

**हंस-स्वामींच्या** प्रसादानें **भास्करपंतांची** पत्नी अन्नपूर्णाबाई हिच्या पोटीं गर्भ राहून **भास्करपंतांचा** वाईसच जन्म झाला. त्यावेळीं पुढें काय होईल याचा विचार न करितां, **भास्करपंतांनीं** खूप दान-धर्म केला. " ह्या कोकणस्थांमध्यें साधु एकही झाला नाहीं, पण हा मुलगा म्हणजे **रघुनाथ** हा साधुवृत्तीचा होईल " असे **हंसराज** स्वामींनीं म्हटलें होतें; त्याप्रमाणें पुढें घडून आलें. यानंतर **भास्करपंत** हे पुण्यास आले व तेथें आल्यानंतर त्यांची संपत्ति गेली.

**भास्करपंतांनीं** वडील मुलगा **बाळकृष्ण** यास इंग्रजी शाळेंत घातलें होतें; व तो नोकरी धरून मार्गाला लागला. **रघुनाथाचें** अध्ययन बीजगणित-बालव्याकर्ण-इंग्रजी-व्युत्पत्ति-इतकें झालें. हे मोठे बुद्धिमान् होते. ह्यांची परीक्षा होऊन, ह्यांना "काजप्राप्तीचें" ( सरकारी पब्लिक सर्व्हिसचें ) पत्र मिळालें. परंतु मूळपासूनच **रघुनाथपंत** परमार्थवृत्तीचे होते: आणि त्यांना कथा-कीर्तनें व संतचरित्रें यांची आवड फार होती. भूतदया जबर; कुबुद्धीचा लवलेश नाहीं; शांति, क्षमा व श्रद्धा हींही बलवत्तर; बोलणें थोडकेंसेंच, पण सर्वांना हे मित्र वाटावे. पुढें यांना प्रथम सेनेंत रोजगार लागला. कामगिरीनिमित्त त्यांना खानदेशांत जावें लागलें. नंतर एका साहेबानें त्यांना मोठी नोकरी देऊं केली; म्हणून त्यांनीं पूर्वकामाचा राजीनामा दिला. परंतु ती नोकरी मिळाली नाहीं व पहिलीही गेली. मग त्या साहेबानें एक चिठी देऊन पुण्यास पाठविलें; तेव्हां मोठी नोकरी न मिळतां शाळेंत मास्तरकीची नोकरी मिळाली. पुढें त्यांची नाशकास योजना झाली. तेथल्या पाद्र्यांच्या मताप्रमाणें शाळेंत काम करावें लागे. त्या शाळेंतील हेडमास्तर युरोपियन होता; व **रघुनाथपंतांवर** परीक्षकांचीही खूप मर्जी असे. पुढें सोलापूर जिल्ह्यांत **करमाळें** येथें **रघुनाथपंतांची** बदली झाली; व तेथेंच त्यांस " **हंसराज** " स्वामींचा अनुग्रह झाला. ह्या प्रकरणाचे शेवटीं ' बहिरंभट ' ह्यानें समारोप केला आहे, ह्यावरून ही पोथी बहिरंभट नांवाच्या कोणी गृहस्थानें लिहिली असावी कीं काय, असें वाटतें.

पुढें **रघुनाथपंतांना** दान-धर्मामुळें खूप कर्ज झालें. कोणत्याही ब्राह्मणाला ह्यांनीं कधीं विमुख पाठविलें नाहीं. निदानपक्षीं एक रुपया तरी द्यावा. मग कर्जाच्या निवारणासाठीं ह्यांनीं पुण्यांतील आपल्या भावाकडे मागणी केली; पण त्यांनीं उलट सांगितलें कीं, " मींच पुण्यांतला वाडा गहाण टाकून वडिलार्जित कर्ज फेडलें; मजजवळ निराळें द्रव्य कोठलें असणार ? या वडिलार्जित

कर्जाचाच अर्धा भाग तूं दे " ह्याप्रमाणें सर्व गाति खुंटली. मग " नाशिकाचा वाडा तूं घेऊन अर्धे कर्ज संभाळ " असें वडील भावानें सांगितल्यावर ह्यांनीं तीन हजारांस नाशिकचा वाडा विकला. वडिलार्जित कर्ज देऊन त्यांतील थोडेंच पैसे उरले. त्यानें भरती होईना, म्हणून पुण्यांतून आणखी कर्ज काढून करमाळें येथील देण्याची निरवानिरव करावी लागली.

**रघुनाथपंतांनीं** आपल्या पत्नीस दासबोध वगैरे वाचावयास शिकविलें. प्रथम त्यांना एक हिंदुस्थानी भाट जातीचा ढोंगी गोसावी गुरु मिळाला होता. त्यानंतर हे जास्त एकान्तप्रिय झाले, व अखेर अन्नपाण्यावांचून त्यांनी ७ दिवस तपश्चर्या आरंभिली. शेवटच्यां दिवशीं रात्रीं त्यांस स्वप्नांत शिव–पार्वती ह्यांनीं दर्शन दिलें; व पिवळें वस्त्र परिधान करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें शेवटपर्यंत त्यांचा तोच पोशाख होता. अखेर हंस–स्वामींनीं रघुनाथपंतांची परीक्षा पाहिली; ' सर्व पगार गुरूस अर्पण करीन ' असें कबूल करून घेतलें; व त्यानंतर हंसस्वामींच्या प्रमुख शिष्यांत त्यांची गणना झाली.


येथपर्यंतची माहिती वर निर्दिष्ट केलेल्या पोथीमधून निवडून घेतली आहे. ह्या मजकुरांतील असंबद्धता नष्ट करून, योग्य तेवढीच माहिती देण्यास हवी; परंतु त्यास उपाय नाहीं. शिवाय, **रघुनाथ भास्कर गोडबोले** यांच्या चरित्राचा येथपर्यंत फक्त पूर्वभागच आला आहे. त्यांची खरी कामगिरी पुढील वयांतीलच आहे; व त्यायोगानेंच ते जास्त प्रसिद्ध आहेत.

**रघुनाथपंतांचे** आप्त **नागोपंत भिडे** यांनीं कृपा करून त्यांचा फोटो दिला, तो वर छापविलाच आहे. यांनीं (१) **भारतवर्षीय प्राचीन ऐ०कोश**, ( २ ) **भारतवर्षीय अर्वाचीन कोश**, व (३) **हंसकोश**, हे तीन ग्रंथ त्या वेळच्या मानानें अभूत–पूर्व असे छापविले आहेत; व त्यामुळें त्यांची योग्यता जास्त दिसून येते. त्याचप्रमाणें त्यांनीं (४) **मराठी भाषेचा नवीन कोश**ही सन १८७० त त्यावेळच्या डायरेक्टर साहेबांच्या हुकुमानें छापिला आहे. त्यांनीं आपलें आत्मचरित्र लिहून ठेविलेलें पाहिलें होतें, असें **नागोपंत भिडे** म्हणतात; परंतु तें आतां सांपडत नाहीं. नागोपंतांकडे यांनीं लिहिलेली एक वेदान्तपर ओवीबद्ध पोथी ( ग्रंथ ) आम्हांस पहावयास मिळाली; वेदान्ताविषयीं आवड असणाऱ्यांनीं जरूर तर ती संपादन करावी. हस्तामलक, अध्यात्मरामायण, वाक्यवृत्ति, गर्भगीतेचे अभंग, हीं छोटीं अभंगात्मक पुस्तकेंही त्यांनीं लिहिलीं असून, तीं बेळगांवच्या रामतत्त्वप्रकाश छापखान्यानें प्रसिद्ध केलीं आहेत.

रघुनाथपंतांच्या व्याकरण-विषयक कामगिरीचें व अवलोकनाचें "**हंस-कोश**" हें फळ आहे; हा ग्रंथ सन १८६३ त **नारो आप्पाजी गोडबोले** यांनीं शिळा-प्रेसवर छापिला. त्याच्या प्रस्तावनेंत रघुनाथपंत म्हणतात- " मी मराठी कवींचे शब्द निवडीत असतां, त्यांत मला कांहीं ठराविक अशा गोष्टी आढळून आल्या; मग त्यांचे नियम बांधून, मी ह्या कोशांत जोडण्याकरितां टिप्पण तयार केलें; व उदाहरणासाठीं मराठी कवींच्या सारसार अशा निवडक प्रकारांचा ह्या ग्रंथांत समावेश केला आहे, म्हणून त्यास **हंस-कोश** असें नांव ठेविलें."

मोल्स्वर्थचा कोश प्रचंड म्हणून त्यांतील व्यवहारांत न येणारे संस्कृत, आरबी, फारशी इ० शब्द गाळून, आणि व्यवहारांत असलेल्या यवनी शब्दांचा व हंस-कोशांतील शब्दांचा समावेश करून, ह्यांनीं हातांत वावरायाजोगा "मराठी भाषेचा नवीन कोश" तयार केला. १८७६ च्या पूर्वी " भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश" व "भारतवर्षीय अर्वाचिन कोश" ह्यांनीं निर्णयसागर प्रेसमध्यें छापविले, "भरतवर्षांतील पूर्वीचे प्रख्यात पुरुष, स्त्रिया, त्यांचे धर्म, राजधान्या, नद्या, इ० पुराणेतिहास-ग्रंथांत वारंवार येतात; त्यांविषयीं आजकाल विद्या पुष्कळ वाढली असूनही, कदाचित् धर्मविषयक अश्रद्धाही वाढल्यामुळें, कोणीं प्रयत्न केला नाहीं," याचा मनास खेद वाटून, त्यांनीं ह्या कोशांचें काम केलें आहे. पाल्हाळ कमी करून, ह्या कोशांत रघुनाथपंतांनीं स्थल-कालासंबंधीं व्यवस्थित व मिळाली तेवढी निश्चित माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. त्या कालच्या मानानें यांचे हे उद्योग प्रचंड होत; यांत शंका नाहीं.

# ३७. डॉ० रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर.



यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यांत मालवण येथें ७ जुलै १८३७ रोजीं झाला. यांचे वडील **गोपाळराव** हे मालवण येथील मामलेदार कचेरींत कारकून होते. येथेंच त्यांचें वडिलार्जित घर व जमीन होती. **रामकृष्ण**पंतांचा मराठी अभ्यास मालवण येथेंच झाला. १८४७मध्यें त्यांच्या वडिलांची बदली रत्नागिरीस झाली. तेथें **गोपाळरावांनीं** त्यांस हिंम्या करून इंग्रजी शाळेंत घातलें; कारण, हें शिक्षण देणें धर्मबाह्य आहे, अशी त्यावेळीं पुष्कळ समजूत होती. त्यावेळीं आतांच्यासारख्या इयत्तांच्या परीक्षा नव्हत्या. पांच वर्षेपर्यंत रत्नागिरी येथें शिक्षण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठीं मुंबईस जाण्याची **रामकृष्ण**पंतांनीं इच्छा दर्शविली. त्यावेळीं अन्यत्र युनिव्हर्सिटी व कॉलेजे नव्हतीं. फक्त मुंबईस " एल्फिन्स्टन् इन्स्टिटयूट " नांवाची संस्था असून, तिचे शाळा व कॉलेज असे दोन भाग होते. प्र० **दादाभाई नौरोजी** हे त्यावेळीं इल्फिन्स्टन् कॉलेजांत शिक्षक होते. मुंबईस येण्याकरितां त्यावेळीं बोटींचाही मार्ग सुलभ नव्हता; म्हणून खुष्कीनें खूप दिवस लागत. इतक्या लांब पाठविण्याला **गोपाळराव** तयार नव्हते, परंतु मुलाच्या आग्रहामुळें अखेरीस त्यांनीं **रामकृष्णपंतांस** मुंबईस पाठविलें. प्रथम त्यांस हायस्कूलच्या वर्गांत राहून, त्या वर्गाची परीक्षा द्यावी लागली; नंतर पांच वर्षे त्यांनीं कॉलेजचा अभ्यास केला कॉलेजमध्यें त्यावेळीं संस्कृताचा अभ्यास चालू नव्हता. त्यांचा त्या वेळचा आवडता विषय 'गणित' हा होता. कॉलेजचा अभ्यास-क्रम पुरा झाल्यावर, त्यांस एल्फिन्स्टन्

इन्स्टिट्यूटमध्येंच शिक्षकाची जागा मिळाली. पुढें १८६० त पुण्यास " डेक्कन कॉलेज स्थापन झालें, त्यांत त्यांस ' **फेलो** ' म्हणून नेमण्यांत आलें.

१८५७ मध्यें मुंबई युनिव्हर्सिटीची स्थापना झाली. तेव्हां सर्व '**फेलों**'ना युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस बसलें पाहिजे, नाहींतर त्यांस कमी केलें जाईल, असा सरकारनें नियम केला. त्यामुळें **रामकृष्णपंतांस** युनिव्हर्सिटीच्या परीक्षांस बसावें लागलें; व ते १८६२ सालीं बी० ए० व १८६५ सालीं एम्० ए० झाले. १८६० पासून त्यांना संस्कृत भाषेची गोडी उत्पन्न होऊं लागली; व पांच-सहा वर्षांत त्यांनीं त्या भाषेंत प्रवीणता संपादन करून, न्याय, व्याकरण, इ० शास्त्रांचाही अभ्यास केला. प्रो० **हॉग** नांवाच्या पाश्चात्य पंडितानें प्रसिद्ध केलेल्या " ऐतरेय ब्राह्मण " ह्या पुस्तकावर मुंबई येथे त्यावेळीं चालू असलेल्या ' नेटिव्ह ओपिनियन ' ह्या इंग्रजी-मराठी वर्तमानपत्रांत कांहीं लेख येत. ते लेख वाचून पाश्चात्य विद्वानांस फार आश्चर्य वाटल; व 'हा तरुण लेखक लौकरच कीर्तिपदाला जाईल, ' असें त्यावेळचे प्रसिद्ध जर्मन संस्कृतज्ञ प्रोफेसर ' वेबर ' यांनी भविष्य केलें. हे लेख **रामकृष्णपंत भाण्डारकरांचे** होते. याच वर्षी **भाण्डारकरांनीं** आपलें संस्कृत प्रथम पुस्तक प्रसिद्ध केलें व लगेच पुढील वर्षी दुसरें पुस्तकही प्रसिद्ध केलें. आज सुमारें ६० वर्षें ह्या पुस्तकांच्या साह्यानें हजारो विद्यार्थ्यांनीं संस्कृताचा अभ्यास केला आहे.

१८६५ मध्यें **रामकृष्णपंतांची** सिंधमध्यें हैदराबाद येथील हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागीं नेमणूक झाली. नंतर त्याच वर्षी रत्नागिरीचे हेडमास्तरचे जागीं बदली झाली. तेथील आपल्या चार वर्षांच्या अमदानींत उत्तम शिक्षण व शिस्त ह्यांच्या योगानें **रामकृष्णपंतांनीं** तें हायस्कूल भरभराटीस आणिलें; व त्यांतील विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परीक्षेंत वरवर येऊन, त्यांस स्कॉलर्शिपाही मिळूं लागल्या.

१८६८ त **रामकृष्णपंतांना** एल्फिन्स्टन कॉलेजांत संस्कृताचे असिस्टंट प्रोफेसर म्हणून नेमिलें. तें काम त्यांनीं १४ वर्षें केलें. त्यांस ह्या ठिकाणीं असतांच इतिहास-संशोधनाकडे ओढा लागण्यास एक आकस्मिक कारण झालें. १८७० त 'मोदी' नांवाच्या पारशी गृहस्थाला कांहीं जुनीं नाणीं सांपडलीं, त्यानें तीं **रामकृष्णपंतां**कडे आणून दिलीं. त्यामुळे जुन्या लिपींचा अभ्यास करण्यास **रामकृष्णपंतांनीं** सुरुवात केली जुन्या प्राकृत भाषांचाही त्यांस अभ्यास करावा लागला पुढें त्यांनीं ताम्रपट, शिलालेख, नाणीं, यांसंबंधानें संशोधनात्मक

लेख लिहिण्यास सुरवात केली. त्यांचे हे बहुतेक लेख इंग्रजींतच असत; ह्यामुळें हिंदुस्थानांत व युरोपियन राष्ट्रांतही त्यांची कीर्ति झाली; व १८७४ मध्यें लंडन येथें जी सर्व देशांतील संस्कृत पंडितांची सभा भरली होती, तिला येण्याबद्दल **रामकृष्णपंतांस** निमंत्रण आलें. परंतु कौटुंबिक अडचणीमुळें त्यांस जातां आलें नाहीं; तरी नाशिक येथील लेण्यासंबंधीं संशोधनात्मक लेख त्यांनीं त्या परिषदेंत वाचण्यासाठीं पाठविला; तो विद्वमान्य होऊन, तेव्हांपासून ह्यांची कीर्ति चोहींकडे जास्तच पसरली; व १८७९ सालीं सरकारनें त्यांना प्राचीन इतिहास-संशोधक नेमिलें. १८८२ मध्यें त्यांना पुण्याच्या डेक्कन कॉलेजांत कायमची प्रोफेसरची जागा मिळाली. त्या जागेवर ते २१ वर्षें होते; नंतर त्यांनीं पेन्शन् घेतलें. १८८६ मध्यें सार्वदेशीय संस्कृत पंडितांची दुसरी सभा विलायतेंत झाली; त्या सभेकरितां हिंदुस्थानातर्फे **रामकृष्णपंतांची** निवड झाली; आणि युरोपांतील विद्वानांनीं व जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका, इ० देशांतील युनिव्हर्सिट्यांनीं त्यांच्यावर पदव्यांचा वर्षाव केला.

शिलालेख, ताम्रपट, जुनीं नाणीं, जुने संस्कृत ग्रंथ, यांच्या आधारें, कित्येक वर्षें खपून, त्यांनीं "दक्षिण हिंदुस्थानचा इतिहास" व "दक्षिण हिंदुस्थानचीं राजघराणीं" हीं पुस्तकें इंग्रजींत लिहून प्रसिद्ध केलीं. त्यायोगानें शालिवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, पल्लव, इ० प्राचीन राजघराण्यांविषयीं व त्यावेळचें कलाकौशल्य, व्यापार, धर्म व समाजसुधारणा यांविषयींची बरीच माहिती **उजेडांत** आली. सरकारमार्फत प्रसिद्ध होणाऱ्या "बॉंबे गॅझेटियर" मध्येंही त्यांनीं इतिहास-संशोधनात्मक अशी पुष्कळ माहिती पुरविली. १८६४ पासून सुमारें ५० वर्षें इतक्या दीर्घकालपर्यंत रामकृष्णपंतांनीं हा संशोधनात्मक व्यवसाय चालविला होता. वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांनीं "शैव व वैष्णव" हा प्रसिद्ध पण शेवटचा ग्रंथ इंग्रजींमध्यें प्रसिद्ध केला. अखेर दृष्टि कमी झाल्यानें, त्यांना पराधीनता प्राप्त झाली. संस्कृत भाषा ज्या देशाचें माहेरघर तिची ह्या देशांत हेळसांड; व युरोपमधील जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, इ० पंडितांनीं तिचें अध्ययन करून, व तुलनात्मक भाषाशास्त्र निर्माण करून, प्राचीन इतिहास उजेडांत आणावा; ही किती सखेदाश्चर्याची व लाजिरवाणी गोष्ट; परंतु डॉ० **भाण्डारकरांनीं** आपल्या संशोधनकार्यानें हिंदुस्थानाची अब्रू राखिली; व हिंदुस्थानांतही चिकित्सक, संशोधक बुद्धीचे व दीर्घ व्यासंगी लोक आहेत; हें निदर्शनास आणून दिलें.

अनेकविध संस्थांशीं त्यांचा संबंध होता. ( १ ) मुंबई युनिव्हर्सिटीचे परीक्षक, सिंडिकेट व चान्सेलर ते होते; ( २ ) १८८५ सालीं त्यांनीं शंकर पांडुरंगजी ह्यांच्या साह्यानें पुण्यास " महाराष्ट्र फीमेल एज्युकेशन सोसायटी " स्थापन करून, हुजुरपागेंतील मुलींचें हायस्कूल सुरू केलें. १८९२ मध्यें फीमेल ट्रेनिंग कॉलेज व त्याचेंच प्रॅक्टिसिंग् स्कूल सरकारनें त्या सोसायटीच्या स्वाधीन केलें होतें. ह्या सोसायटीचे डॉ० **भाण्डारकर** हे मरेतोंपर्यंत अध्यक्ष होते. (३) प्रो० **कर्वे** यांच्या " श्री० नाथीबाई दामोदर ठाकरसी भारतवर्षीय महिला-विद्यापीठा"चेही ते आरंभीं चॅन्सेलर होते. ( ४ ) हे प्रार्थनासमाजाचे पुरस्कर्ते होते. त्यांचीं त्या समाजांतील व्याख्यानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं आहेत. ( ५ ) डेक्कन् एज्युकेशन् सोसायटीचेही ते कित्येक वर्षे **अध्यक्ष** होते. त्याचप्रमाणें ( ६ ) न्यू पूना कॉलेज व नूतन मराठी विद्यालय चालविणाऱ्या शिक्षणप्रसारक मंडळाचेही ते प्रथमपासून मृत्यूपर्यंत अध्यक्ष होते. ( ७ ) नेटिव्ह जनरल लायब्ररी, ( ८ ) डेक्कन् व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन् सोसायटी, इ० ज्ञानप्रसारक संस्थांचेही ते अध्यक्ष होते.

१८९३ मध्यें **रामकृष्णपंतांनीं** पेन्शन् घेतलें; व मुळा-मुठा नद्यांचे संगमाजवळ त्यांनीं " संगमाश्रम " नांवाचा बंगला बांधिला; व स्वस्थ न बसतां, पुढील आयुष्य अनेकविध कार्यांत घालविलें. त्यांची राहणी अत्यन्त साधी, डोक्यावरील पांढरें स्वच्छ पागोटें व अंगावर साधें पांढरें उपरणें हीं त्यांनीं कधीं सोडलीं नाहींत. त्यांच्या विद्वत्तेला सदाचार, विनय, दीर्घोद्योग, निर्व्यसनीपणा व परमेश्वरनिष्ठा यांची जोड होती; अत्यन्त नियमित वागणुकीमुळें ते इतके दिवस जगले. त्यांच्या ८० व्या वर्षीं म्हणजे १९१७ सालीं, त्यांच्या शिष्यांनीं व चाहत्यांनीं, त्यांच्या स्मरणार्थ " **भाण्डारकर रिसर्च इन्स्टिट्यूट** " नांवाची संस्था स्थापन केली. तिला डॉक्टर साहेबांनीं आपला ४० हजार रुप यांचा अमूल्य ग्रंथसंग्रह दिला आहे. हे ऋषितुल्य गृहस्थ ता० २४ ऑगस्ट १९२५ रोजीं मृत्यु पावले. यांचीं युनिव्हर्सिटींतील " वुइल्सन फायलॉलॉजिकल लेक्चर्स " प्रसिद्धच आहेत; शिवाय व्युत्पत्तिविषयक लेख आणि " मराठी शुद्ध-लेखन-कॉन्फरन्स "चे अध्यक्ष या नात्यानें त्यांची कामगिरी, त्यांचें या पुस्तकांत चरित्र समाविष्ट करण्यास भरपूर पुरेशी आहे. ( क० शि० वरून ).

---

# ३८. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर.



प्रसिद्ध **थोरल्या शास्त्रीबोवांचे** हे चिरंजीव. यांचें चरित्र सर्वांस महशूरच आहे; परंतु विषय-पूर्तीसाठीं येथें थोडक्यांत देणें प्राप्त आहे. यांचा जन्म १८५० मध्यें पुणें येथें झाला. प्रथम यांचें शिक्षण आजोबांच्या मताप्रमाणें जुन्या पद्धतीप्रमाणें चालू होतें; परंतु **थोरल्या शास्त्रीबोवांनीं** त्यांस पुणें-हायस्कूलमध्यें घातलें. १८६५ मध्यें त्यांची मॅट्रिकची परीक्षा उतरली. पुढील शिक्षणासाठीं ते डेक्कन् कॉलेजांत गेले; पण गणित व इतर परीक्षेचे ठराव, विषय यांच्या चक्रांत गुरफटल्यामुळें, हुशार असूनही त्यांना परीक्षांतून पहिल्या अटक्यासच यश येऊं शकत नव्हतें; तरी अशा रीतीनें १८७१ च्या सुमारास ते बी० ए० झाले. वडिलांचें सरकारांत वजन असल्यानें, कांहीं वशिले न लावतांही **विष्णुशास्त्र्यांस** पुणें-हायस्कूलमध्यें शिक्षकाची नोकरी मिळाली. **विष्णुशास्त्री** बी० ए० होण्याच्या पूर्वीपासूनच "शालापत्रकां"त लिहूं लागले होते. "**संस्कृत कविपंचक**" हे त्यांचे विद्वत्ताप्रचुर लेख शालापत्रकांतच प्रसिद्ध झाले होते.

विष्णुशास्त्र्यांची "**निबन्धमाला**" १८७४ त सुरू झाली. त्या मासिकांत त्यांनीं, पाश्चात्य युरोपियन ग्रंथकारांचीं "पौर्वात्य राष्ट्रें नीतीनें हलक्या दर्जाचीं" वगैरे विधानें खोडून काढिलीं. इंग्रज ग्रंथकारांविरुद्ध लिहिणें म्हणजे पापच, अशी त्यावेळीं परिस्थिति होती. निबंधमालेंतील या लेखांवरूनच "**एलिफँस**" प्रकरण उद्भवलें; आणि विष्णुशास्त्र्यांची बदली दूर रत्नागिरीस करण्यांत आली. १८७७ त विष्णुशास्त्री रत्नागिरी हायस्कूलमध्यें दाखल झाले; परंतु पुढें त्यांनीं मे महिन्याच्या सुटीस जोडून सहा महिन्यांची रजा घेतली; व त्या अवधींत "चित्रशाळा" व "नवीन किताबखाना" या स्वतंत्र संस्था निर्माण केल्या; आणि "न्यू इंग्लिश स्कूल" स्थापण्याची जय्यत तयारी करून, सरकारी नोकरीचा राजीनामा दिला.

ता० १ जानेवारी १८८० रोजीं **मोरोबादादांच्या** वाड्यांत न्यू इंग्लिश स्कूल स्थापन झालें. पहिल्याच दिवशीं त्यांत १५० मुलांनीं नांवें नोंदविलीं. विष्णुशास्त्री, टिळक व नामजोशी या तिघांनीं धडाडीनें शाळेस आरंभ केला; पुढें आगरकर, आपटे, इ० मंडळी त्यांस येऊन मिळाली. प्रथम कांहीं वर्षे न्यू इं० स्कूलनें नाना शंकर शेटची संस्कृत स्कॉलरशिप् दुसरीकडे जाऊंच दिली नाहीं; यामुळें व चालकांच्या अष्टपैलूपणामुळें तें पुढें फारच भरभराटीस आलें.

लोकजागृति करण्यासाठीं स्वतंत्र वर्तमान-पत्र काढण्याचा या मंडळींनीं संकल्प केला; व '**केसरी**' हें मराठी वर्तमानपत्र व '**मराठा**' हें इंग्रजी वर्तमानपत्र यांनीं सुरू केलें. ह्या वर्तमानपत्राकरितां "आर्यभूषण" छापखानाही ह्या मंडळींनीं उभारला. ह्याप्रमाणें विष्णुशास्त्र्यांनीं मोठ्या धडाडीनें वर उल्लेखिलेल्या एकंदर सहा संस्था स्थापन केल्या; त्या सर्व आज भरभराटींत आहेत.

विष्णुशास्त्र्यांनीं काय कार्य केलें, हें सांगत बसण्याचें हें स्थल नाहीं: त्यांच्याविषयीं लिहीत बसण्यापेक्षां त्यांच्या निबन्धमालेंतील लेख व देशपरिस्थिति ह्यांचें ज्यानें त्यानें आपापल्या मनाशींच अवलोकन करावें. एवढें खरें कीं, इंग्रजी शिक्षणामुळें वड्या नोकऱ्या व अधिकार आरंभीं आपल्या लोकांस मिळूं लागल्यानें, मद्यप्राशनापासूनचें झाडून सर्व परकीय आचार-विचार-व्यवहार स्वाभिमानशून्यतेनें त्या पिढींतल्या बहुतेक लोकांत बऱ्याच अंशीं उत्पन्न झाले होते. दिव्याच्या काजळीप्रमाणें हीं स्वजनांची स्वाभिमानशून्यता झाडून टाकण्याचें कार्य निबन्धमालेच्या द्वारें शास्त्रीबोवांनीं केलें. त्यांची वाङ्मयसेवा अपूर्व आहे. डॉ० जॉन्सन, मोरोपंतांची कविता, आपल्या देशाची सांप्रतची स्थिति, मराठी भाषेची स्थिति, इ० त्यांचे लेख स्वतंत्र पुस्तकेंच होतील, अशा प्रकारचे व अभ्यासार्ह आहेत.

ह्या धाकट्या शास्त्रीबोवांविषयीं कांहींही मतभेद असोत, त्यांबद्दल व त्यांच्या वाङ्मयसेवेबद्दल मतभेद असणाऱ्यांचाही आदर-भाव आहे. शास्त्रीबोवांची लेखणी तिखट होती, हें खरें; परंतु त्याबद्दल कांहीं विचार न करितां, "घुबडानें, सूर्य आपल्या द्वेषामुळेंच अधिक प्रखर तापतो" असें म्हणावें, त्याप्रमाणें कांहीं वावदूकांची वडबड व्यर्थ ठरेल.

शास्त्रीबोवांनीं **भाषादूषण, लेखन-शुद्धि** व **भाषापद्धति** हे जे निबन्ध लिहिले आहेत, ते आमच्या पुस्तकाच्या कार्यक्षेत्रांत येतात. शास्त्रीबोवांविषयींचे खालील उद्गार आबाल-वृद्धांस परिचितच आहेत; तथापि ते सामान्यतः यथार्थ असल्यानें येथें उद्धृत करितों.

" ज्यांच्या गुणीं मुदित पंडित सर्व झाले ।
गर्वोद्धतांसहि जिहीं मदहीन केलें ॥
सर्वत्र ज्यांस जयपत्र मिळेच जाण ।
आतां असे लिहिल निःस्पृह लेख कोण ? ॥ "

थोडक्यांत १८७२ ते १८८० पर्यंतच्या आठ वर्षांत धाकट्या शास्त्रीबोवांनीं जें केलें, तें दुसऱ्या कोणाच्या हातून ८० वर्षांतही झालें नसतें; असें एकानें म्हटलें आहे. ता० १७ मार्च १८८२ रोजीं, हे पुण्यास अवघ्या ३२ वर्षांचे असतां फोटो काढण्याचे वेळीं उन्हाच्या तिरीपेनें घेरी आल्याचें निमित्त होऊन, ज्वरानें कालवश झाले. पुण्याच्या 'रे मार्केट' मध्यें त्यांचा अर्ध पुतळा स्थापन करण्यांत आलेला आहे; व या कामीं **चित्रशाळेचे** मालक **वासुदेवराव जोशी** हेच विशेष पुढाकारी होते; हेंही सर्वांस महशूरच आहे.

---

## ३९. गोविंद शंकरशास्त्री बापट.



हे रत्नागिरी जिल्ह्यांतील "पुळ्याच्या गणपती "चे राहणारे. यांचें पिढीजाद वैदिक-घराणें होतें. ८ फेब्रुवारी १८४४ त ह्याच गांवीं त्यांचा जन्म झाला; व तेथेंच त्यांचें मराठी शिक्षण, वेदाभ्यास तीर्थरूपांजवळ झाला. पुढील शिक्षणासाठीं ते पुण्यास आले. तेथें केशवशास्त्री नेने ह्या विद्वान् गृहस्थापाशीं त्यांचें व्याकरण, व न्याय या शास्त्रांचें अध्ययन झालें. पुढें ते ट्रेनिंग् कॉलेजांत गेले तेथें त्यांस स्कॉलर्शिप् मिळूं लागली. तेथलि अभ्यासक्रम संपल्यावर ठाण्याच्या इंग्रजी शाळेंत त्यांस सन १८६८ त संस्कृत-शिक्षकाची जागा मिळाली. पुढें लगेच नगरच्या हायस्कुलांत त्यांची बढतीवर नेमणूक होऊन, तेरा वर्षें

तेथेंच त्यांनीं काम केलें. नंतर १८८१ त मुंबईच्या एल्फिन्स्टन् हायस्कुलांत त्यांची बदली होऊन, १९०१ मध्यें त्यांनीं तेथेंच पेन्शन् घेतलें. ता० ६ मार्च १९०४ रोजीं हे मृत्यु पावले.

शास्त्रीबोवा नगरास आल्यावर अगदीं प्रौढपणीं इंग्रजी शिकूं लागले. नौकरी संभाळून व प्रपंच चालवून, त्यांनीं अभ्यास केला. यांचें चरित्र लिहितांना यांच्या उदाहरणावरून बालबोधकार **वि० कों० ओक** म्हणतात कीं, "हिंदुस्थानांतल्या लोकांस देशी भाषा चांगल्या शिकविल्या असतां, इंग्रजी भाषा शिकण्यास अतिशय सोपें पडेल, हें मत अत्यन्त ग्राह्य आहे; ह्याचा विचार सरकारनें करावा." सरकारला ह्या विचाराशीं काय कर्तव्य आहे, हें बिचाऱ्या भोळ्या **ओकांच्या** स्वप्नींही नसेल. असो. यांनीं (१) नौकानयनाचा इतिहास, (२) इलिझाबेथ, (३) पाल आणि व्हर्जीनिया, (४) डिनार्बस्, (५) सद्वर्तन, (६) हरि आणि त्रिंबक, (७) गद्यरत्नमाला, (८) नीतिमंदिर, (९) नेपोलियन बोनापार्टचें चरित्र, (१०) दाशरथी राम चरित्र, व (११) व्युत्पत्ति-प्रदीप, इत्यादि उत्कृष्ट पुस्तकें लिहिलीं आहेत. (१२) संस्कृत ग्रंथार्थसंग्रह या सदराखालींही लहान लहान पंचवीस-तीस-पुस्तकें ह्यांनीं कथा-पुराणादिकांच्या आधारें लिहिलीं असून, तीं निर्णयसागरनें छापिलीं आहेत; पण त्यांवर शास्त्री-बोवांचें नांव नाहीं. ह्यांची मराठी भाषा शुद्ध, सरस, गोड, अशी असे. ह्यांच्या पुस्तकांच्या उत्कृष्टतेमुळें, त्या पुस्तकांस सरकारचाही आश्रय होता. ह्या ग्रंथां-शिवाय त्यांनीं संस्कृत क्रियापदादि प्रकरणांवर कांहीं पुस्तकेंही विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां लिहिलीं आहेत.

शास्त्रीबोवा हे पिढीजाद वैदिक व हाडाचे पक्के जुने स्नान-संध्याशील कर्मठ ब्राह्मण होते; व मनुस्मृत्यादिक धर्मग्रंथ त्यांना चांगले अवगत होते; तरी ते जुनेंच धरून बसणारे हटवादी नव्हते. ते जुने व नवे यांतील दुवा होते म्हटलें तरी चालेल; कारण, विधवाविवाह, परदेशगमन, स्त्रीशिक्षण, इ० त्यांस नेमस्त प्रमाणांत मान्य होतें. ह्यामुळे जुन्या व नव्या दोन्ही मंडळींत त्यांस मान असे. त्यांनीं एकदां मुंबईच्या 'हिंदु युनिअन क्लब'मध्यें हिंदुस्थान देशाची अवनति ह्या विषयावर एक व्याख्यान दिलें होतें; त्यांत ते म्हणतात,—" जर कीर्ति पाहिजे असेल, तर खरें ऐक्य करून विचारानें वागा म्हणजे रीतिभाति सुधारतील; रीति सुधारल्या म्हणजे विद्या वाढेल: विद्या वाढली म्हणजे दारिद्र्य नाहींसें होईल; दारिद्र्य नाहींसें झालें, म्हणजे सामर्थ्य येईल; सामर्थ्य आलें, म्हणजे राज्य—

कल्यांशीं प्रेम वाढेल; प्रेम वाढलें म्हणजे ते आपणांस स्वातंत्र्य देतील; अशी अवनति कमी होऊन, उन्नति वाढत जाईल." या विचारसरणीवर टीका करणें नकोच.

यांची शरीरप्रकृति सुदृढ होती, पण १९०५ च्या मार्चमध्यें ( तारीख ६ ) दोन-तीन दिवस ताप येऊन ते एकाएकीं निवर्तले. यांसंबंधानें यापेक्षां अधिक माहिती मिळाली नाहीं.

"**व्युत्पत्तिप्रदीप**" हा यांचा ग्रंथ ह्या विषयासंबंधानें सर्वमान्य झालेला आहे, व त्याची योग्यता अद्यापिही पूर्ववत् कायमच आहे. ह्या ग्रंथांत त्यांस व्युत्पत्तीबरोबरच अर्थात् व्याकरण-नियमांचाही विचार करावा लागला आहे; आणि ह्या ग्रंथांतील त्यांची कर्तबगारीही ठळकपणें दिसून येणारी आहे. ह्या ग्रंथाच्या वीस-वीस हजारांच्या नऊ आवृत्ति संपून, नुकतीच त्यांचे पुतणे **कृष्ण बळवंत बापट**, यांनीं १६००० ची दहावी आवृत्ति काढिली आहे; ती निर्णयसागर छापखान्याकडून प्रकाशित झाली असून, मालकी प्रकाशकांची आहे! "पैशाकडे पैसा जातो," ही म्हण अशा पुस्तकांवरून सार्थ ठरते. ही दहावी आवृत्ति कांहीं सरकारनें सुचविलेले व कांहीं स्वतःचे महत्त्वाचे फरक करून, **गोविंद कृष्ण मोडक**--न्यू इंग्लिश स्कूलमधील संस्कृताध्यापक-यांनीं तपासली आहे. ह्या विद्वान् गृहस्थांविषयीं स्वतंत्र माहिती पुढें देण्यांत आली आहे.

---

## ४०. चिन्तामण विनायक वैद्य.

यांचा जन्म कल्याण येथें शके १७८३ आश्विन शुद्ध १५ स झाला; ( सन १८६१). प्राथमिक शिक्षण कल्याण येथें व दुय्यम व कॉलेजमधील शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन् हायस्कूल व एल्फिन्स्टन् कॉलेजमध्यें झालें. १८८४ त **चिन्तामणराव** एल्० एल्० बी० झाल्यावर प्रथम कांहीं दिवस कोल्हापूर संस्थानांत सबजजच्या कामावर होते. नंतर त्यांनीं ठाण्यास कांहीं दिवस स्वतंत्र वकिली केली १८८७ पासून १९०५ पर्यंत त्यांनीं **ग्वाल्हेर** संस्थानांत जजचें काम केलें. त्यानंतर कांहीं दिवस ते कल्याणास होते; व पुण्यास "टिळक विद्यापीठा"चे ते **कुलगुरु** म्हणून काम करीत आहेत. ह्या सर्व अवधींत व आतांपर्यंत त्यांचा लेखन-

व्यवसाय असा कधींच सुटला नाहीं. संस्कृत, प्राकृत, मराठी, हिंदी, ऊर्दु ह्या भाषांचा त्यांचा चांगला व्यासंग आहे.

अगदीं आरंभीं यांनीं ( १ ) " माझा प्रवास " या नांवानें १८५७ सालच्या बंडाच्या धामधुमींत सांपडलेल्या वर्सई ( ता० पेण, जि० कुलाबा ) येथील एका भटजीचा वृत्तान्त दिलेलें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. ( २ ) " दुर्दैवी रंगू " या नांवाची पानिपत-प्रकरणावर एक कादंबरी लिहिली आहे. ( ३ ) "श्रीरामचरित्र" (४) "श्रीकृष्णचरित्र" हीं त्यांचीं पुस्तकें सर्वांस परिचितच आहेत; (५) महाभारतावरील व्यासंगाइतका दांडगा व्यासंग महाराष्ट्रांत यांच्या इतका दुसऱ्या क्वचितच कोणाचा असेल. (६) " महाभारताचा उपसंहार " हें त्यांचें पुस्तक अत्यन्त संशोधनात्मक व विचारपरिपूर्ण असें झालें आहे. (७) " मध्ययुगीन भारताचीं " तीन पुस्तकें ह्यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत, तींही ह्यांच्या संशोधन-कृतींचीं उत्कृष्ट निदर्शक आहेत. शिलालेख, ताम्रपट, दानपत्रें, इ० च्या साह्यानें व पेशावरपर्यंत प्रत्यक्ष प्रवास करून यांनीं हिं० च्या जुन्या इतिहासांत अपूर्व भर घातली आहे. ( ८ ) महाभारतांतील ज्योतिषविषयक व अन्य प्रकारच्या उल्लेखांवरून काल-निर्णय करण्यासंबंधींचे यांचे लेख मननीय आहेत; व महाभारतीय युद्ध इ० स० पूर्वी ३१०० वर्षे अगोदर झालें, असें यांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. ( ९ ) इंग्रजीमध्यें " रजपुतांचा इतिहास " हें पुस्तक त्यांनीं लिहिलें आहे. ( १० ) रामायणाच्या परीक्षणात्मकही यांचा एक निबंध इं० त व मराठींत आहे. ( ११ ) " संस्कृत वाङ्मयाचा त्रोटक इतिहास " या नांवाचेंही त्यांनीं एक पुस्तक लिहिलें आहे. ( १२ ) त्यांनीं कालीदास इसवी सन पू० १ ल्या शतकांत झाला, असें ठरविलें आहे. यांनीं पुष्कळच लिहिलें आहे; व जें लिहिलें आहे, तें मार्मिक, विद्वत्ताप्रचुर व सुन्दर भाषेंत

कुलगुरु चिन्तामणराव वैद्य.



ग्रथिलें आहे. ( १३ ) " विविधज्ञानविस्तारा "मध्यें तर ह्यांचे लेख एकसारखे येत असतात.

यांनीं रा० रा० **वि० का० राजवाडे** ह्यांच्या ( १४ ) ज्ञानेश्वरीच्या मराठी व्याकरणावर टीकात्मक म्हणून पांच लेख केसरींत लिहिले होते, ते; आणि ह्यांशिवाय त्यांच्या ( १५ ) " निबंध आणि भाषणें " ह्या पुस्तकांत प्रसिद्ध झालेले लेखः--

( १ ) "मराठी भाषा व तिच्यावर इतर भाषांचा परिणाम " ( १९०६; ठाणें ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक समारंभाच्या वेळीं अध्यक्ष म्हणून केलेलें भाषण)

( २ ) "महाराष्ट्र-देश, महाराष्ट्र-भाषा व महाराष्ट्र-वाङ्मय " ( १९०८; पुणें, साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष म्हणून केलेलें भाषण ).

( ३ ) "मराठी भाषेचा इतिहास " ( वडोदें, साहित्य-संमेलनाकरितां लिहिलेला निबंध; १९०९ ) इ०. हे सर्व लेख; **चिंतामणरावांच्या** भाषाविषयक, व्याकरणविषयक, व्युत्पत्तिविषयक कामगिरीचे निदर्शकच आहेत; ह्या लेखांमुळेंच महाराष्ट्रीय व्याकरण-प्रबन्धकारांत त्यांचा साहजिकच प्रामुख्यानें समावेश होतो.

जुने विद्वान; मार्मिक संशोधक; निरलस, अखंड साहित्यसेवक; भीष्माचार्य या नात्यानें आज महाराष्ट्रांत यांची योग्यता मोठी आहे. "विविधज्ञानविस्तारांत" 'मराठी भाषेच्या उत्पत्ती'संबंधानें यांचा व डॉक्टर **गुणे** यांचा चाललेला वादविवाद महशूरच आहे. वेळोवेळीं संशोधनकार्यासाठीं हे लांबवर प्रवास करीत असतात; ते नुकतेच बराच कालपर्यंत प्रवासांत होते. त्यांच्या पत्रांतील त्रोटक टिपणांच्या व आम्हांस असलेल्या माहितीच्या आधारें हें चरित्र लिहिलें आहे.

## ४१. बळवंतरावजी टिळक.

त्यांचें चरित्र येथें विशेषत्वानें देण्याची जरूर नाहीं. हे **गंगाधरशास्त्री टिळकांचे** चिरंजीव; रत्नागिरी जिल्ह्यामधील दापोली तालुक्यांतील चिखलगांवचे राहणारे; परंतु तेथील खोतकीचा अगर उत्पन्नाचा त्यांचा फारसा

संबंध राहिला नव्हता. त्यांनीं आपलें तें सर्व उत्पन्न तेथील देवास देऊन टाकिलें. ह्यांचा जन्म ता० २३ जुलई १८५६ त रत्नागिरी येथें झाला. मुलगा होण्यासाठीं ह्यांच्या मातु:श्रींनीं अनेक वर्षें कडक सूर्योपासना केली. त्यांस

लो० टिळक.



सूर्याप्रमाणेंच तेजस्वी पुत्ररत्न लाभलें. त्यांचें मूळचें नांव 'केशव' असें होतें, पण **'बाळ'** असें लहानपणीं जें नांव पडलें, तेंच पुढें टिकलें. बुद्धिमत्ता व हटवादीपणा हे त्यांच्या लहानपणींही आढळून येत. त्यांस लहानपणीं संस्कृत श्लोक म्हणण्यास शिकवीत; एक श्लोक पाठ करण्याला १ पै, ह्याप्रमाणें त्यांची स्वकष्टार्जित कांहीं अत्यल्प रक्कम जमली होती. १८६६ त वडील डे० ए० इ० होऊन पुण्यास आले. बहुतेक सर्व अंकगणित, समीकरणापर्यंत बीजगणित, युक्लीडचीं दोन पुस्तकें इतकी तयारी वडिलांनींच करून दिली होती. दहाव्या वर्षींच सामान्य संस्कृत श्लोक ते आपल्या आपण लावीत. ह्यांचें इंग्रजी शिक्षण पुण्यांतील **'सिटी स्कूल'** मध्यें झालें. हटवादीपणामुळें शिक्षकांचें व ह्यांचें वनत नसे. हे उदाहरणें तोंडानेंच करीत. "सन्त, संत, सनृत," असे लेखनांत बुद्धिमत्तेचे नाना प्रकार करीत. ह्याबद्दलही त्यांची हेडमास्तरपर्यंत तक्रार गेली. ह्यांचें नांव हुशार पण तंटेखोर, या सदरांत एव्हांपासूनच पडलें. १८६९ त ते पुणें हायस्कूलमध्यें गेले. १८७२ त मॅट्रिकमध्यें गणित विषयांत कठीण तेवढींच उदाहरणें सोडवून, बाकी टाकून देऊन, उठून गेले; व पास झाले. लगेच त्यांनीं डेक्कन कॉलेजांत प्रवेश केला. पहिल्या वर्षीं आपली शरीरप्रकृति सुधारण्यासाठीं त्यांनीं मनस्वी तालीम केली. ह्यांतील त्यांचे प्रमुख सवंगडी **दाजी आबाजी खरे** हे होते. प्रो० **जिनसीवाल्यांनीं 'मातृविलाप'** या विषयावर संस्कृत कविता करावयास सांगितल्या असतां, ~~महादेव~~ वामन **शिवराम आपटे**

ह्यांसारखे प्रतिस्पर्धी असतां, ह्यांच्याच कविता त्यांस पसंत वाटल्या. प्रसिद्ध गणित व ज्योतिषशास्त्रपारंगत **केरुनाना छत्रे** हे यांचे वेळीं नामांकित व लोकप्रिय गुरु कॉलेजांत होते. १८७६ त गणिताचा स्वतःच अभ्यास करून ते बी० ए० पहिल्या वर्गांत पास झाले. त्यासालचे गणिताचे युरोपियन प्रोफेसर केवळ तांत्रिक विद्या देणारे होते, तें टिळकांस पसंत पडलें नाहीं. १८७७ त ते गणित विषयांत एम्० ए०च्या परीक्षेस बसले, पण नापास झाले. मग १८७९ त ते एल्० एल्० बी० झाले. पुढें ५।६ वर्षांनीं पुनः एम्० ए० च्या परीक्षेस बसले, पण तेव्हांही नापास झाले. डेक्कन कॉलेजांतील **गोपाळ गणेश आगरकर** हे त्यांचे परम स्नेही होते.

टिळक हे धाकट्या शास्त्रीबोवांच्या न्यू० इं० स्कूलला १८७९ च्या सुमारास येऊन मिळाले; व तेव्हांपासून त्यांच्या धडाडीच्या चारित्र्याला सुरुवात झाली. ह्यांची शाळा भरभराटली; त्या शाळेंत चांगल्याच सुविद्य व स्वार्थत्यागी शिक्षकांचा भरणा झाला; त्या शाळेनें युनिव्हर्सिटींतील संस्कृत स्कॉलर्शिपा हटकून मिळविल्या; त्या शाळेंतील **टिळक-आगरकरां**सारख्यांनीं '**केसरी**'सारखीं जोमदार वर्तमानपत्रें काढून, लोकशिक्षणाचें कार्य मोठ्या धडाडीनें फैलावलें; ह्यामुळें सर्वत्र ह्या मंडळींचा बोलबाला व उत्कर्ष होऊं लागला.

धार्मिक, सामाजिक, पण विशेषतः राजकीय आखाड्यांत, उतरून टिळकांनीं कोणत्या गोष्टी केल्या, हें येथें तपशीलवार देण्याचें कारण नाहीं. मात्र त्यांनीं जें पाऊल एकदां पुढें टाकलें, तें कधीं मागें घेतलें नाहीं. त्यामुळें राष्ट्रांत जोम उत्पन्न झाला; टिळक होते, तोंपर्यंत महाराष्ट्र नुसता खळबळलेला किंवा जिवंत होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या अष्टपैलू व धूर्त धोरणामुळें त्यांनीं आपल्यापुढें कोणाची मात्रा चालूं दिली नाहीं. त्यांच्यावर तीन वेळां खटले झाले, व त्या बाबतींत त्यांस दीर्घकाल आपत्ति, द्रव्यनाश व तुरुंगवासही पत्करावा लागला; पण त्यांचें धैर्य ढळलें नाहीं. लोकांनीं त्यांच्या ६० व्या वाढदिवशीं त्यांस १ लक्षांचा आहेर केला. शिवजयंत्युत्सव व नवीन तऱ्हेचे गणपत्युत्सव हीं त्यांनीं सुरू केलीं. "**गीतारहस्य**" हा उत्कृष्ट ग्रंथ तुरुंगांतच लिहिला. '**आर्यांचें उत्तरध्रुवाकडील वसतिस्थान**" हा त्यांचा इंग्रजी ग्रंथ विद्वन्मान्य झाला. त्यांचें "**केसरी**"चें कार्य जगापुढें आहेच. हा बुद्धिमान् पण शत्रूंनाही हळहळविणारा वीर पुरुष १ ऑगस्ट १९२० रोजीं मुंबईस निजधामास गेला !

डेक्कन कॉलेजांत असतां त्यांनीं **मराठी व्याकरणाचीं** कांहीं महत्त्वाचीं टांचणें केलीं होतीं; व शिवाजी उत्सवांतील यांचें व्याख्यान व केसरींतील लेखांबद्दलच्या दुसऱ्या खटल्याचे वेळीं त्यांनीं कांहीं शब्दांची **व्याकरणदृष्ट्या** केलेली चिकित्सा मननीय आहे. ( केळकरकृत टि० च०वरून ).

---

## ४२. प्रो० शिवराम महादेव परांजपे.

यांचें मूळ गांव कुलाबा जिल्ह्यांतील प्रमुख तालुक्याचें ठिकाण **महाड** हें असून, येथेंच यांचा जन्म शके १७८६ म्हणजे सन १८६४ मध्यें झाला. प्राथमिक सहा इयत्तांपर्यंतचें शिक्षण महाडासच झालें; व इंग्रजी पांच इयत्तां-पर्यंतचें शिक्षण रत्नागिरी येथें झालें. १८८० मध्यें ते पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिकण्यासाठीं आले; व १८८४ मध्यें त्या शाळेंतूनच ते मॅट्रिक पास झाले. त्यावेळीं त्यांना जगन्नाथ शंकरशेटची पहिल्या नंबरची संस्कृ-तची स्कॉलर्शिप मिळाली होती. लगेच १८८५ मध्यें ते फर्ग्यूसन कॉलेजांत शिकण्यासाठीं गेले. त्या कॉलेजास त्यावेळीं पुढील वर्ग जोडण्याची परवानगी मिळालेली नव्हती; म्हणून त्यांचें कॉलेजांतील पहिलें वर्ष झाल्यावर ते इंटर व बी० ए० साठीं डेक्कन कॉलेजांत गेले. १८९० मध्यें ते बी० ए० झाले ; व त्यांना डेक्कन कॉलेजांत फेलो म्हणून नेमण्यांत आलें. लगेच २ वर्षांनीं म्हणजे १८९२ त ते एम्०ए० झाले. त्यावेळींही त्यांस संस्कृतचें '**भगवानदास प्राईज**' व '**झाला वेदान्तप्राईज**' अशीं दोन बक्षिसें मिळालीं.

यानंतर " **भावे स्कूल**" च्या मंडळींनीं काढलेल्या "**महाराष्ट्र कॉलेजां**"त ते सुमारें २ वर्षे संस्कृतचे प्रोफेसर होते. तें कॉलेज बंद पडल्यावर १८९८ मध्यें त्यांनीं प्रसिद्ध " **काळ**" पत्र सुरू केलें. तें वर्तमानपत्र १९०८ पर्यंत चाललें होतें. त्या वेळीं यांच्यावर आक्षेपार्ह लेखांबद्दल खटला होऊन, त्यांस शिक्षा झाली होती. १९१० मध्यें त्यांची सुटका झाली; व त्यानंतर त्यांनीं "**कांहीं शब्दांची व्युत्पत्ति**" या मथळ्यानें इतिहास-संशोधक-मंडळाच्या मासिकामध्यें सुमारें १० लेख प्राकृताशीं तुलनात्मक असे लिहिले. मराठी लेखनशुद्धीसंबंधीं **साने-प्रभृतीं**ची जी शुद्धलेखन-कमिटी सरकारनें नेमिली

होती, त्यावेळींही "**काळांत**" यांचे कांहीं लेख त्या विषयावर आले होते; "साहित्यसंग्रह" भा० २ यांत "शब्दांच्या वाढीचा इतिहास" हा एक उत्कृष्ट लेख आलेला आहे. हे सर्व लेख मननीय असे आहेत.

यानंतर यांनीं " स्वराज्य " नांवाचें वर्तमानपत्र काढून, तें सुमारें ५



प्रो० शिवरामपंत परांजपे.

वर्षें चालविलें; व आतां तें त्यांनीं दुसऱ्याकडे दिलें. यांचीं प्रमुख पुस्तकें खालीलप्रमाणें:—

( १ ) काळांतील निवडक निबंध.
( २ ) स्वराज्यांतील निवडक निबंध.
( ३ ) साहित्यसंग्रह भा० १
( ४ ) साहित्यसंग्रह भा० २
( ५ ) कादंबरी (संगीत नाटक.)
( ६ ) मॅक्बेथ नाटक.
( ७ ) रासदेवराव नाटक
( ८ ) भीमराव
( ९ ) मालविकाग्निमित्र.
( १० ) भामिनीविलास
( ११ ) नागानंद
( १२ ) भासाचें पंचरात्र
( १३ ) ,, मध्यमव्यायोग
( १४ ) सूर्याच्या गैरसोयी
( १५ ) कालीदासानें न लिहिलेलें नाटक.
( १६ ) तर्कसंग्रह.
( १७ ) तर्कभाषा. इ०

हे चांगले कविही आहेत; पण यांच्या कविता फारशा प्रसिद्ध नाहींत. यांचें मराठी भाषेवरील प्रभुत्व, वक्तृत्व, उपरोधिक भाषा-शैली, या बाबतींत ह्यांचा हात धरणारा सध्यां महाराष्ट्रांत कोणी नाहींच, असें म्हटल्यास, तें अयोग्य होईलसें वाटत नाहीं. "**काळांतील निवडक निबंध**" विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेप्रमाणें कांहीं निबंध गाळून व जरूर तर सरकारची परवानगी घेऊनही, कोणी वाङ्मयभक्त छापून प्रसिद्ध करील, तर महाराष्ट्र-भाषेचा उत्कृष्ट नमुना न गमावल्याचें श्रेय त्यास मिळेल; पण ते आतां पाहण्यास मिळणेंहि दुर्मिळ, कोणी साहित्यभक्तांनीं ते आम्हांकडे पाठविल्यास महदुपकार होतील.

---

## ४३. विद्याधर वामन भिडे.

यांनीं कृपाकरून आपल्या संबंधाचें टिपण खालीलप्रमाणें दिलें आहे—

जन्म १८६१त बेळगांव येथें झाला. वडील ग्रांटमेडिकल कॉलेजचे जी० जी० एम्० सी० असून सरकारी नोकरींत होते. वडिलांबरोबर कोल्हापूर, शिकारपूर व सोलापूर येथें लहानपणचें वास्तव्य झालें. हुबळी येथें कानडी पांच इयत्ता व

इंग्रजी तीन इयत्तांपर्यंतचें शिक्षण झालें. १८७३ त ह्यांचे वडील वारल्यावर इंग्रजी चार आणि पांच इयत्तांपर्यंतचें शिक्षण धारवाड हायस्कूलमध्यें झालें. त्यावेळीं रा० ब० **विठ्ठलराव पाठक** हे तेथें हेड्मास्तर होते. नंतर ते पुणें हायस्कूलमध्यें शिकूं लागले. इंग्रजी ६।७ ह्या इयत्ता तेथें झाल्या. ते इंग्रजी सहाव्या इयत्तेंत वर्षभर विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे वर्गांत होते. कुंटे हे हेडमास्तर होते. पुढें ते १८७८ ते १८८३ पर्यंत डेक्कन कॉलेजमध्यें राहून बी० ए० झाले. त्यावेळीं केरूनाना छत्रे व डॉ० भाण्डारकर हे तेथें प्रोफेसर होते.



ह्यांनीं १८८४ ते १९१२ पर्यंत सरकारी शाळाखात्यांत मुंबई, नगर, रत्नागिरी, कल्याण, सोलापूर व ठाणें इतक्या ठिकाणीं शिक्षकाचें काम करून पेन्शन घेतलें. नंतर पुण्यांतील कांहीं खासगी शाळांत सुमारें दहा वर्षें त्यांनीं काम केलें. हल्लीं ते पुण्याचे रहिवासी आहेत.

ह्यांच्या ग्रंथांचे रचनाकाळ खालीलप्रमाणें—

१८८७–" म्हणींविषयीं चार शब्द."

१९००–" मराठी शब्दांचें उद्घाटन."

१९०६–८–काव्यें व गोष्टी.

१९०९–१०–" वाक्प्रचार व म्हणी" "निबंधलेखन व अनुवाद" आणि एक इंग्रजी० मराठी कोश.

१९११–जीवजागृति काव्य.

१९२३ ते २७–"कोर्लईचा किल्लेदार", " मुरारि" " केंजळगडाचा कवजा", " पण तिसरा कोण?" "गणवंत गडाचा गडकरी" "प्रांपतामहाच्या पदावर", इ० कादंबऱ्या व "अर्थालंकारांचें निरूपण;" आणि संस्कृत–इंग्लिश डिक्शनरी.

१९१२ ते १९२२-ह्यांनीं फ्रेंच, पार्ला व पर्शियन् ह्यांचेही अध्ययन आणि अध्यापन केलें असून, "मराठी शब्दांचें उद्‌घाटन" हें त्यांचें पुस्तक ह्या पुस्तकांत ह्यांचें चरित्र समाविष्ट करण्यास कारणभूत झालेलें आहे.

---

# ४४ रावबहादुर काशीनाथ नारायण साने.

यांचें चरित्र जुलै १९१३ च्या "चित्रमयजगत्"च्या अंकावरून जसेंच्या तसें उद्धृत केलें आहे. शेवटला भाग त्यांनीं स्वतः कृपा करून सांगितला आहे.

काशिनाथपंतांच्या घराण्याचें राहण्याचें ठिकाण **पापडी**, ता० वसई, जिल्हा ठाणें हें होय. त्यांचे वडील व ज्येष्ठ बंधु सरकारी नोकर असल्यामुळें व पुढें तेही स्वतः सरकारी नोकरींतच शिरल्यामुळे त्यांचें घरीं राहणें असें थोडेंच झालें. डहाणू येथें त्यांचे वडील नारो भिकाजी साने हे मामलतदार असतां, ता० २५ सप्टेंबर १८५१ मध्यें वंदप ता० कर्जत येथें त्यांचा जन्म झाला. सुमारें दहाव्या वर्षापर्यंत वडिलांचे हाताखालीं घरींच त्यांचें शिक्षण जुन्या चालीचें गृहस्थी बाण्याचें बरेंच झालें. १८६१ते१८६४ पर्यंत वसई, कल्याण, तळें-घोसाळें, येथील सरकारी मराठी



शाळांत त्यांचें शिक्षण होऊन, १८६५ मध्यें उरण येथें त्यांचें वडील बंधु महालकरी होते, त्यांच्या कचेरींत ते उमेदवारी करूं लागले. परंतु त्यांच्या बंधूनीं त्यांस उमेदवारी सोडून इंग्रजी शिकण्यास सांगितलें. १८६५ ते १८६९ पर्यंत उरण, कल्याण व पुणें येथलि बाबा गोखल्यांच्या शाळेंत, त्यांचें इंग्रजी शिक्षण झालें. मॅट्रिकची परीक्षा उतरल्यावर १८७० त ते डेक्कन कॉलेजांत शिकूं लागले. १८७२ मध्यें ते बी० ए० उत्तीर्ण झाले व पुढें पुण्यांतच ५।७ महिने घरीं स्वस्थ राहून,

त्यांच्या घराण्याचें ध्येय जें रेव्हिन्यू खातें त्यांत शिरण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. तो सिद्धीस न गेल्यामुळें १८७३ मध्यें त्यांनीं शाळाखात्यांत नोकरी धरिली. तींत ते डे० ए० इन्स्पेक्टर व पुण्याच्या मेल ट्रेनिंग् कॉलेजचे व्हाइस प्रिन्सिपॉल व प्रिन्सिपॉल या हुद्यांपर्यंत; तसेंच बेळगांव व पुणें येथील हायस्कूलचे हेडमास्तर, येथपर्यंत चढले.

महाराष्ट्र–भाषाशास्त्राशीं व महाराष्ट्र–वाङ्मयाशीं असलेल्या त्यांच्या परिचयावर नजर देऊन, देशभाषांत क्रमिक पुस्तकें नवीन तयार करण्यासाठीं नेमलेल्या कमिटींत, मराठी पुस्तकें तयार करण्याचें काम सरकारनें त्यांचेकडे दिलें. ह्या निरनिराळ्या हुद्द्यांवर कामें करीत असतां, सरकारलाहि त्यांचें काम पसंत पडत गेलें, असें दिसतें. तथापि सरकारी नोकरी झाली तरी त्यांनीं ती कधींही मिळमिळीतपणें न करितां, सर्वत्र तेजसपणानेंच केली, ही गोष्ट यांच्यासंबंधानें विशेष आहे. अशाप्रकारें सुमारें ३३।३४ वर्षें मोठ्या नेकीनें काम केलें असतां, तेजस्विता हाच एकप्रकारें दुर्गुण समजला जाणाऱ्या सरकारकडून, योग्य अधिक बढती मिळण्याची संधि आली असून, ती आपणांस मिळत नाहीं, असें समजतांच, त्यांनीं स्वसंतोषानें १९०७ मध्यें आपल्या कामाचा राजीनामा देऊन पेन्शन घेतलें.

बी० ए० झालों म्हणजे कृतकृत्यता प्राप्त झाली; आणि त्यांतही साधारण बरीशी सरकारी नोकरी मिळाली, कीं गंगेंत घोडे न्हाले; असें आपल्याकडील पुष्कळ ग्रॅज्युएटांमध्यें आढळून येतें. पुष्कळ बी० ए०, एम्० ए०, पदवीवाले; व कॉलेजांतील प्रोफेसर्स् खूप पगार व मोठ्या सुध्या खाऊन, देशाची किंवा वाङ्मयाची काय सेवा करितात, तें सांगावयासच नको ! **विश्वनाथ काशिनाथ राजवाडे** ह्यांनीं आपल्या डेक्कन् कॉलेजांतील शिक्षणासंबंधानें लिहितांना प्रो० **करकरे** ह्यांचा अनुभव दिला आहे. हे बडे देशी गृहस्थ पहिल्यानेंच विलायतेंतील गणिताची पदवी घेऊन आले; तेव्हां त्यांचा एवढा बडेजाव करण्यांत आला कीं पुसूं नये ! पण अखेर त्यांनीं आपल्या पुढील आयुष्यांत कोणतें एकादें आपल्या विषयासंबंधीं प्रमेय शोधून काढिलें, किंवा एकादा मोठा शोध लाविला, असें घडलें नाहीं ! हीच गोष्ट बहुतेकांची. पण सरकारी नोकरींत असतांही **काशिनाथपंत** हे त्यास अपवाद होते. त्याचें दृश्य फल "**काव्येतिहाससंग्रह**" हें मासिक पुस्तक होय. कै० जनार्दन बाळाजी मोडक व विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या साह्यानें त्यांनीं तें मासिक पुस्तक चालविण्याचें

मोठ्या जोखमाचें काम अंगावर घेऊन, तें आलेल्या अनेक अडचणीस न जुमानतां, अव्याहत सुमारें बारा वर्षे केलें. सरकारी नोकर असतां, अशाप्रकारें सरस्वतीची सेवा करणारे, **बाळशास्त्री जांभेकर, दादोबा, वि० कों० ओक** वगैरे मागील पिढींतील लोक सोडून दिल्यास, अलीकडे वाङ्मयसेवा म्हणजे सरकार–द्रोह; कांहीं लिहावयास गेल्यास नसतेंच लचांड अंगाला चिकटावयाचें; अशा कल्पना रूढ झालेल्या होत्या. ह्या परिस्थितींत काशीनाथपंतांनीं जें काम केलें, तें त्यांस खात्रीनें भूषणावह आहे. " मराठी इतिहासाच्या व मराठी काव्यांच्या कामीं परिश्रम करणारे " अशी नोंद ब्रिटिश म्यूझियमचे कॅटलॉगांत यांच्या नांवासमोर केलेली आहे, ती यथार्थच आहे; असें कोणीही म्हणेल.

काव्येतिहास–संग्रहांतील **बाबासाहेबांचें** काम आजकालच्या इतिहाससंशोधकांस आदर्शवत् झालें आहे, असें यांजविषयीं **वि० का० राजवाडे**प्रभृति मंडळी मोठ्या आदरानें लिहितात. अखेरपर्यंत मराठी भाषा व मराठी इतिहास यांवरील त्यांचा व्यासंग सुरू होता. थोड्या उशीरानें का होईना, **पंचम जॉर्ज** बादशहांचे वाढदिवसाचे निमित्तानें त्यांस १९१२ मध्यें सरकारकडूनही "**राव–बहादूर**" हा किताब मिळून त्यांचा गौरव करण्यांत आला.

ह्यांनीं पुढील महत्त्वाचे ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशित केले आहेत:– ( १ ) सभासदकृत श्रीशिवछत्रपति यांचें चरित्र, ( २ ) संभाजी व राजाराम यांचीं चरित्रें, ( ३ ) थोरले शाहूमहाराज यांचें चरित्र आणि धाकटे राजाराम व शाहूमहाराज यांचीं चरित्रें, ( ४ ) पेशव्यांची बखर, ( ५ ) भाऊसाहेबांची बखर, ( ६ ) पानिपतची बखर व इतर लहान मोठ्या बखरी ( ७ ) शिवाय शिवछत्रपति निर्मित " राज्यव्यवहार कोश "ही टीपा देऊन प्रकाशित केला. नुकतेंच गेल्या वर्षी ( ८ ) चिटणीस विरचित श्रीशिवछत्रपति यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र संशोधन करून पुनः प्रसिद्ध केलें. या सर्वांवरील विपुल टीपा व शुद्धता ह्यांवरून **बाबासाहेबांची** शोधक व विवेचक बुद्धि आणि निरलसता हीं प्रतीत होतात.

**शुद्धलेखन–कामिटींत** ह्यांनीं मोठ्या आस्थेवाईकपणानें व परिश्रमपूर्वक काम केलें आहे. त्यानिमित्तानें यांनीं व्याकरण, व्युत्पत्ति, भाषा–व्यवहार व मराठी भाषेचा स्वभाव, ह्यासंबंधीं जें संशोधन केलें, तें चिन्तनीय आहे; जरी त्यांच्या सूचनांचा प्रसार झाला नाहीं, तरी त्यांच्या संशोधनाचें महत्त्व कमी नाहीं.

त्यांच्या ह्या विशेष कामगिरीमुळेंच त्यांस व्याकरण-प्रबंधकार या नात्यानें ह्या पुस्तकांत आम्हीं स्थान दिलें आहे.

"विविध-ज्ञान-विस्तारां"तील 'एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे,' हे लेख यांचेच असून,ते किती शोधपूर्वक व मार्मिकपणें लिहिले आहेत, तें प्रत्यक्ष वाचणारासच समजेल. हे **भारत-इतिहास-संशोधक मंडळ** व **"डे० व्ह० ट्रा० सोसायटी"** यांचे मृत्यूपर्यंत अध्यक्ष होते. यांचें निधन ता० १७ मार्च १९२७ रोजीं झालें. एक करारी, शिस्तीचा भोक्ता, इतिहास-भक्त, मागील पिढींतील कर्ता पुरुष, गेल्यानें महाराष्ट्र फार हळहळलें !

---

## ४५. शंकर रामचंद्र हातवळणे.

"विविधज्ञानविस्तारा"च्या ३६ व्या पुस्तकांतील तिसऱ्या अंकामध्यें यांज-संबंधीं खालीलप्रमाणें माहिती आहे:—



हे सन १९०५ मध्यें सातारा जिल्ह्यांत 'शिरोळें' येथें एकाएकीं निवर्तले. मरणसमयीं हे सातारा जिल्ह्याचे डे० ए० इन्स्पेक्टर होते. त्यांना बरेच दिवस मधुमेहाचा विकार होता. पुतण्याच्या मृत्यूचा धक्का बसून, त्यांतच त्यांचा अन्त झाला. ते पदवीधर नव्हते, ह्यामुळे त्यांच्या बढतीचा मार्ग अधिक खुला झाला नाहीं. हे अतिशय मेहनती, कर्तव्यदक्ष व थोर मनाचे होते. मुलांमधील टापटीप, शिस्त व सभ्यपणा ह्यांकडे ते जास्त लक्ष देत. त्यांस ह्याबद्दल कडकपणा करावा लागे; तरी

त्यांची विषयविवेचन-पद्धति सुबोध व मनोरंजक असे. सुधारककारांनीं त्यांच्या-विषयीं म्हटलें आहे कीं,-"सार्वजनिक कामांत झटून पडण्याची त्यांची प्रवृत्ति वाखाणण्यासारखी होती. १८९६ पासून पुण्यांत एक ऑर्फनेज चालविण्यांत ह्या अल्पप्राप्तीच्या मनुष्याची कर्तव्यतत्परता फारच दिसून आली."

ह्यांनीं मराठी लेखन-शुद्धीसंबंधानें एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध केलें-आहे. शिवाय, शुद्धलेखन कॉन्फरन्समध्यें **का० ना० साने** ह्यांचेबरोबर हातवळणे हेही होते. ह्यांचे चिरंजीव **रामचंद्र शंकर हातवळणे** हे सातारा येथें डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ लँड रेकार्ड्स ह्या हुद्यावर आहेत. यांचेकडून ज्यास्त माहिती मिळण्याची अपेक्षा होती; पण फोटो मात्र आला, माहिती वेळेवर येऊं शकली नाहीं, त्यास इलाज नाहीं.

---

## ४६. कै० रामचंद्र परशुराम गोडबोले.

प्रसिद्ध "नवनीत"कार **परशुरामपंत तात्या गोडबोले** यांचे हे चिरंजीव. परशुरामपंतांचें चरित्र पुढें आलेंच आहे. **रामचंद्रपंत**, ह्यांचा जन्म मावळांत 'वेल्होळी' नांवाच्या गांवीं त्यांच्या आजोळीं एप्रील १८५८ मध्यें झाला. ह्यांचें शिक्षण पुण्याच्या प्रॅक्टिसिंग् स्कूलमध्यें व नंतर हायस्कुलांत झालें. १८७५ त त्यांची मॅट्रिकची परीक्षा झाली; व १८८० त ते बी० ए० झाले.



"ज्ञानप्रकाशां"तील यांच्या मृत्युलेखांत खालील-प्रमाणें माहिती आलेली आहेः-"आपल्या वयाच्या बाविसावे वर्षी बी० ए० ची परीक्षा पास झाल्या-नंतर पुढें सुमारें ३५ वर्षे **रामचंद्रपंतां**नीं शिक्षण-खात्यांत अनेक जबाबदारीच्या व हुद्याच्या जागीं काम केलें. प्रथम एल्फिन्स्टन हायस्कूलमध्यें असिस्टंट मास्तर म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यानंतर सोलापूर, धुळें व पुणें या ठिकाणीं हेड्-मास्तरच्या जागेचें काम त्यांनीं केलें. नोकरीच्या शेवटचीं दोन वर्षे त्यांची उत्तरभागच्या एज्यु-

केशनल् इन्स्पेक्टरच्या जागीं नेमणूक झाली होती. या सर्व ठिकाणीं त्यांनीं आपल्या अंगच्या सौजन्यानें व हुषारीनें लोकप्रियता संपादन केली होती. सुमारें बारा वर्षांपूर्वी ते इंग्लंडला गेले होते, त्यावेळीं त्यांनीं युरोपमधील निरनिराळ्या ठिकाणच्या शिक्षण-पद्धतींची माहिती मिळविली होती. शिक्षण-खात्यांतील लोकांना त्यांच्या ज्ञानाचा व माहितीचा फायदा वेळोवेळीं मिळत असे. येथील अनेक शिक्षणविषयक संस्थांशीं त्यांचा निकट संबंध असे. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षणप्रसारक मंडळी, पुणें-सेवासदन, वगैरे संस्थांच्या कौन्सिल्चे ते सभासद होते; त्याचप्रमाणें प्रो० **कर्वे** यांच्या **महिला विद्या-पीठा**चेही ते सभासद होते. महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन् सोसायटीचे सेक्रेटरी व डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन् सोसायटीचे सेक्रेटरी व ट्रेझरर हींही कामें त्यांचेकडे होतीं. पब्लिक सर्व्हिस कमिशनपुढें ज्या कित्येक अनुभविक गृहस्थां-च्या चांगल्या साक्षी झाल्या, त्यांतच भाऊसाहेबांच्या साक्षीची गणना होत होती."

**कै० रामचंद्रपंतांनीं, रा० गुरुजी** व **रा० राजवाडे** ह्या आपल्या दोघां मित्रांस देशांत नवीन कारखाने काढण्याच्या दृष्टीनें मदत केली होती. पहिले गृहस्थ पुणें—"सार्वजनिक सभे"च्या मदतीनें रंगांची माहिती मिळविण्या-करितां, व दुसरे गृहस्थ कांचेचा धंदा शिकण्याकरितां विलायतेस गेले होते. ते परत आल्यावर त्यांनीं आपापले धंदे येथें सुरू करण्याची बरीच खटपट केली; पण पुढें त्याचें काय झालें तें कळलें नाहीं. **रामचंद्रपंत** २० डिसेंबर १९२१ रोजीं मृत्यु पावले.


"**मराठी भाषेची लेखनपद्धति**" हें पुस्तक छापण्यांत **कै० साने** व **हातवळणे** यांच्याबरोबर **रामचंद्रपंतही** होते; व त्यावेळीं मराठी भाषेच्या शुद्धलेखनसुधारणेसंबंधीं यांनाही बराच प्रामुख्यानें विचार करावा लागला.

---

## ४७. प्रो० नारायण दासो बनहट्टी.

यांचा जन्म सन १८६२ त झाला. मराठी शिक्षण मिरजेस झालें. त्यावेळीं अक्षर, गणित, व्याकरण, व्युत्पत्ति, यांकडे विशेष लक्ष दिलें जात असे; यामुळें

यांचें मोडी–बाळबोध अक्षर उत्तम होतें. तसेंच, त्रैराशिकपर्यंत अंकगणित, समी-



**प्रो० नारायण दासो बनहट्टी.**

करणापर्यंत बीजगणित, दादोबांचें मोठें व्याकरण, व व्युत्पत्ति, यांचें यावेळींच त्यांस बरेंच ज्ञान झालें होतें; व तें त्यांस हायस्कूलमध्यें फार उपयोगी पडलें. त्यांना लहानपणीं चित्रें काढण्याचा, कारंजें करण्याचा व पालखीपुढें पदें वगैरे म्हणण्याचा नाद असे. गंजिफा, बुद्धिबळें, व खो-खो, आट्यापाट्या, लगोऱ्या, इ० देशी खेळ खेळण्याचाही त्यांस नाद होता. त्यांचे वेळीं क्रिकेट, टेनिस, वगैरे परकी खेळांचें प्राबल्य नव्हतें. शाळेंत यांचा बहुशः नेहमीं पहिला नंबर असे. इंग्रजी तिसऱ्या इयत्तेच्या स्कॉलरशिपच्या परीक्षेंतही त्यांचा पहिला नंबर येऊन, त्यांस दरमहा ५ रुपयांची मिरज एग्झिबिशन ४ वर्षेंपर्यंत मिळाली होती. अगोदरच मराठी शाळेंत बरेच विषय तयार असल्यामुळें, त्यांस बराच वेळ सांपडे; तो त्यांनीं कानडी, ऊर्दू व फारसी भाषा शिकण्यांत घालविला. पुढें ते कोल्हापूर हायस्कूलमध्यें शिकण्यासाठीं गेले.

१८७६–७७ मध्यें महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला होता. तो प्रसंग यांस वारंवार आठवत असे. मोरींतील शितें, आमसोलें, घामुकें, कोया, बुरकुंडें, निवडुंगांचीं बोंडें, खाऊन कित्येकांनीं पोटें भरलीं; कित्येकांनीं आपलीं मुलें विकलीं किंवा रस्त्यांत सोडून दिलीं; दुभत्या गाई चार–दोन आण्यांस विकल्या; इ० गोष्टी यांस डोळ्यांसमोर पहावयास सांपडल्या.

कोल्हापुरास दरवर्षीं पौष वद्य ३० रोजीं **प्रयाग-तीर्थावर विशाळीची** यात्रा भरत असते. त्या दिवशीं सर्व शाळांस सुटी असून, शिक्षक व विद्यार्थी मिळून, वनभोजन, खेळणें, पोहणें, भाषणें, कविता, व्याख्यानें कसरत, इ० कार्यक्रम होत असे. त्यावेळीं एकाद्या विषयावर कविता करण्याबद्दल बक्षिस लागत असे. १८७६ त **गोविंद बल्लाळ देवल** यांना "विधवा–दुःख–वर्णन–" पर कवितेबद्दल बक्षिस मिळालें होतें. १८७७ त " दुष्काळ " या विषयावरील कवितांचें बक्षिस **बनहट्टी** यांना मिळालें. पुढल्या वर्षी "हिंवाळा" या विषया-वर व "हिमागमवर्णनम् " या काव्याबद्दल त्यांना बक्षिसें मिळालीं. याच

वर्षी " फर्स्ट ग्रेड पब्लिक सर्व्हिस"ची मुलकी परीक्षा पास होऊन, तींत यांचा पहिला नंबर आला होता. "अभिज्ञातप्रीतिकम्" नांवाचें मालिनी वृत्तांत एक काव्य 'व्हिकार ऑफ वेक्फील्ड' मधील 'दि हरमिट्' या गीतावरून यांनीं केलें आहे. तसेंच, ' करवीरपुरवर्णनम् ', 'श्रीवेंकटेश द्वादशस्तोत्रम् ' इ० व कांहीं स्फुट काव्येंही यांनीं याच वेळीं लिहिलीं आहेत.

प्रवेशपरीक्षेपर्यंत यांचें संस्कृत वाचन पुष्कळच झालें होतें; त्यामुळें त्यांना त्या परीक्षेंतही एकादी स्कॉलरशिप् मिळेल, असा भरंवसा वाटत होता. १८७९ त ते प्रवेशपरीक्षा पासही झाले; व त्यांच्या अटकळीप्रमाणेंच संस्कृतचे प्रश्न चांगले सोडविल्यामुळें त्यांना कोल्हापूरची २५ रु० दरमहाची संस्कृतची **आल्फ्रेड् स्कॉलरशिप्** मिळाली; व ही बातमी त्यांस एल्फिन्स्टन् कॉलेजांत दाखल होण्यास ते मुंबईस गेले असतां आदल्या दिवशींच समजली; त्यामुळें यांचा कॉलेज-कोर्स चांगल्या तऱ्हेनें निभावून गेला. मुंबईस त्यांनीं समुद्र कसा असतो, हें प्रथमच पाहिलें. पुढें बी० ए० च्या परीक्षेस इतिहास, अर्थशास्त्र, न्यायशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, यांपैकीं काय घ्यावें, हें ठरविण्यांत; व वरील विषयांपैकीं सर्वच आवडीचे म्हणून त्यांचीं कांहीं कांहीं व्याख्यानें ऐकण्यांतच कांहीं दिवस गेले. त्यावेळीं हल्लींच्याप्रमाणें सटीक छापील पुस्तकें मिळत नसत. यांनीं अखेर संस्कृत भाषा हा विषय घेऊन व पुस्तकें स्वतः अभ्यासासाठीं लिहून काढून, ते डॉ० भांडारकरांच्या प्रवचनांसाठीं एल्फिन्स्टनमधून **डेक्कन् कॉलेजांत** गेले; आणि १८८४ त बी० ए० झाले.

प्रथम यांस मुंबईस खडकावरील 'इस्लायट' स्कूलमध्यें थोडे दिवस ४५ रुपयांवर नोकरी पत्करावी लागली; पण थोड्याच दिवसांनीं प्रि० वर्ड्स्वर्थ यांच्या शिफारशीनें अहमदाबादेस "**गुजरात कॉलेजांत**" १०० रुपयांवर सीनिअर फेलोची जागा यांस मिळाली. १८८८ त फेलोशिपची मुदत संपल्यामुळें, पुढें एल्फिन्स्टन् कॉलेजांतील त्यावेळीं रिकामी असलेली " सुपरिंटेंडेंट् व लायब्ररियन्"ची जागा यांना मिळाली पुढें १८९५ त पुण्यास डेक्कन् कॉलेजमध्यें यांची बदली झाली गुजराथेंत असतांना एम्० ए० च्या परीक्षेची व मुंबईस असतांना एल्०एल्० बी० ची परीक्षा देण्याची यांनीं तयारी केली होती; पण त्यांस इतर अडचणींमुळें तो नाद सोडून द्यावा लागला. यांस वरील जागेवर असतां, " असिस्टंट टु धि प्रोफेसर ऑफ संस्कृत " या नात्यानें हस्तालिखित ग्रंथसंग्र-

ह्यांची जोपासना, देखरेख, नवीन ग्रंथ-संपादन व संशोधन, ग्रंथांचें वर्गीकरण व वर्णनात्मक विस्तृत सूचि तयार करणें, इ० कामें करावीं लागत; आणि बी०ए०, एम्०ए० चे वर्गही घ्यावे लागत. ग्रंथसंग्रह वारंवार चाळावा लागत असल्यामुळें, अनेक अपरिचित ग्रंथ वाचनांत येत. बिकानेर, अलवार, काश्मीर, वगैरे प्रांतांत प्रवास करून डॉ० बूलर यांनीं संपादिलेला ग्रंथसंग्रह, विश्रामबाग ग्रंथसंग्रह व जैन ग्रंथसंग्रह, हे फार मोलाचे आहेत; असें त्यांस आढळून आलें. काश्मीर संग्रह " शारदा लिपी "त असल्यामुळें त्या लिपीचाही त्यांस अभ्यास करावा लागला. **उद्भटाचा** " काव्यालंकारसारसंग्रह, " **मम्मटाचा** " शब्दव्यापारविचार " व **मुकुलाचा** " अभिधावृत्ति मातृका " या ग्रंथांचें त्यांनीं संस्करण करून, पहिला ग्रंथ " बॉंबे संस्कृत सिरीज " मध्यें छापविण्याची परवानगीही त्यांनीं **प्रो० काथवटे** यांच्या शिफारशीनें डायरेक्टरकडून १९०० त मिळविली; पण त्या धामधुमीच्या काळांत, तो छापला जाऊं शकला नाहीं.

पुढें १९०४ मध्यें "**मराठी भाषेची लेखनशुद्धि**" यावर महाराष्ट्रांत कडाक्याचा वाद माजून राहिला होता. **साने, गोडबोले,** व **हातवळणे,** ह्यांनीं फार कळकळीनें या बाबतींत परिश्रम केले. या चर्चेच्या शेवटीं ( १ ) अन्त्य, व ( २ ) उपान्त्य ऱ्हस्व इ-कार व उ-कार, ( ३ ) शब्दाच्या अन्तीं व इतरत्र असलेले अनुस्वार, व ( ४ ) व्यंजनान्त शब्द कसे लिहावे, या सूत्र-चतुष्टयींत पर्यवसान झालें. **केसरी**कारांनींही त्यावेळीं ह्या चर्चेत भाग घेतला होता; पण चौथ्या लेखाच्या शेवटीं हा विषय कांहीं मित्रांच्या खातर त्यांनीं विकल्पावर आणून ठेविला होता. अशा गोष्टींत विकल्प अगर अनिश्चितपणा ह्या दोन्ही गोष्टी अनिष्ट आहेत असें वाटून, **प्रो० बनहट्टी** यांनीं मतमतान्तरांचें मंथन करून, शास्त्रीय दृष्टीनें व व्यापक दृष्टीनें विचार करून, **केसरी** व दैनिक **ज्ञानप्रकाश** यांत मार्मिक लेख लिहिले. यांच्या व आणखी कांहीं मंडळींच्या जोराच्या प्रयत्नानें मराठी क्रमिक पुस्तकांत शुद्धलेखनसंबंधीं जे अनिष्ट परिणाम व्हावयाचे, ते टळले; असें म्हणण्यास हरकत नाहीं. **प्रो० बनहट्टी** यांनीं संस्कृत, प्राकृत, महाराष्ट्री, अपभ्रंश, व मराठी या भाषांचा अन्योन्य संबंध, त्यांचें साधर्म्य व वैधर्म्य, त्या त्या भाषेंतील शब्दसिद्धि, व्युत्पत्ति, व प्रकृति-प्रत्ययादि प्रक्रिया, उच्चाराचें नियामकत्व, व लिपीला त्यांचें गोचरत्व किंवा अगोचरत्व इ० गोष्टींचा सूक्ष्म, व्यापक व मर्मग्राही विचार करून, हे सुन्दर व

परिणामकारक लेख लिहिले होते. व्याकरण-प्रबन्धकारांत यांचें चरित्र येण्यास मुख्यतः हेच लेख कारण झाले आहेत.

सन १८७५ त पुण्यास **वेदशास्त्रोत्तेजक सभा** स्थापन झाली. तिचे **बनहट्टी** हे रा० सा० बळवंतराव सहस्रबुद्धे यांच्यानंतर कार्यमंत्री होते; व बहुतेक विषयांतील परीक्षकही ते होते. त्याचप्रमाणें वरील सहस्रबुद्धे हे गायनसमाजाचेही सेक्रेटरी होते; त्यांच्यांशीं **बनहट्टी** यांचा स्नेह झाल्यानें, त्यांनीं संगीत-शास्त्राचेंही ज्ञान संपादिलें व " प्रौढ संगीत बोध " " बाल संगीत बोध " इ० गायनविषयक पुस्तकें लिहिलीं. तीं सरकारी मेल व फीमेल ट्रेनिंग् कॉलेजांत गायनाचे शिक्षक नेमून चालू करण्यांत आलीं.

१९०७ नंतर धुळें, नासिक, इ० हायस्कुलांत त्यांची बदली झाली. पुढें १९१० त मुंबईस एल्फिन्स्टन् हायस्कूलमध्यें फर्स्ट असि० व १९१२ त मिडल-स्कूलचे ते हेडमास्तर झाले. यांना बागेचा बराच नाद असल्यामुळें, एल्फि-न्स्टन् हायस्कूलमध्यें सुप० असतांना त्यांनीं तेथील वसतिगृहास टुमदार बागेनें फार शोभा आणिली होती. पुढें **जळगांव**चे हेडमास्तर झाल्यावर तेथेंही यांनीं हातांत खुरपें घेऊन, बाग उठविली होती. मुलांच्या शारीरिक व्यायामाकडेही ते फार लक्ष पुरवीत. यांनीं सन १९१७ त ४०० रु० पगार असतां पेन्शन् घेतलें; व ते घरीं मिरजेस येऊन राहिले. यांचे ज्येष्ठ चिरंजीव **श्रीनिवासराव** हेही वडिलांप्रमाणेंच स्कॉलर असून, एम्० ए० व एल्० एल्० बी० ही झालेले आहेत; आणि हल्लीं एल्फिन्स्टन् कॉलेजमध्यें मराठी भाषेचे लेक्चरर आहेत.

---

## ४८. वासुदेव गोविंद आपटे.

हे रत्नागिरी जिल्ह्यांतील देवाचे गोठणें येथील राहणारे. जन्म इ० स० १८७१ त खानदेशांत धरणगांव येथें झाला. यांचा अभ्यास धुळें हायस्कूल, इंदूर मदरसा, इंदूर मिशन् कॉलेज, व नागपूर ' हिस्लॉप ' कॉलेज, ह्या ठिकाणीं झाला. हे पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असि० सुपरिंटेन्डेन्ट् होते. यांनीं " आनंद " ह्या नांवाचें मुलांकरितां एक उत्कृष्ट मासिक आज वीस वर्षं चाल-

विलें आहे. हे कलकत्ता युनिव्हर्सिटीचे बी० ए० असून, ह्यांस बंगाली भाषा चांगली अवगत आहे. ह्यांनीं आपल्या मुलाचें नांवहीं " आनंद " असेंच ठेविलें होतें. त्याच्या मृत्यूनें ह्यांजवर दुःखाचा डोंगर कोसळला ! कांहीं दिवस इंदूर-दरबारनें ह्यांची नेमणूक मुद्दाम बोलावून प्रथम शिक्षक म्हणून ' चंद्रावती महिला-विद्यालयां'-त व नंतर " मल्हारी मार्तंड विजय " हे होळकर-स्टेटमधील वर्तमानपत्र चालविण्यासाठीं केली होती. त्यांनीं हें जिकीरीचें व जोखमाचें काम सुमारें ५ वर्षें उत्कृष्ट तऱ्हेनें केलें. पुढें ते पुण्यास आले; व तेथेंच स्वतंत्र छापखाना, व आनंद मासिक चालवून निरनिराळीं पुस्तकें हे प्रकाशित करीत असतात. आनंदाच्या लोकप्रियतेवरून, हें मासिक चालविण्याची त्यांची हातोटी, तसेंच मुलांना योग्य अशी विविध विषयांची माहिती देण्याची त्यांची कुशलता, ह्या गोष्टी दिसून येतात.



वासुदेवराव आपटे.

ह्यांनीं " मराठी शब्दरत्नाकर " व " शब्दार्थचंद्रिका " ह्या नांवाचे एक मोठा व दुसरा लहान असे निव्वळ मराठी कोश तयार केले आहेत. बंगाली-मराठी शिक्षक, विविध ज्ञानसंग्रह, रामायण, महाभारत यांतील गोष्टींची मुलांयोग्य लहान लहान पुस्तकें, मुलांस करण्यायोग्य नाट्य-रामायण, नाट्य-भारत इ० पुस्तकें, मर्नी आणि मोत्या, " विलक्षण भोळेपणा " ( भोळा बाळू ), वगैरे कितीतरी सुबोध व मनोरंजक वाङ्मय निर्माण केलें आहे. यांनीं सर्व पक्षांच्या मतांच्या समालोचनपर " विचार-साधन " ह्या नांवाचें एक स्वतंत्र वर्तमान-पत्रही १९२० मध्यें कांहीं दिवस चालविलें होतें. " लेखनकला " नांवाचेंही एक पुस्तक यांनीं नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे.

ह्यांनीं शब्दव्युत्पत्तीसंबंधानेंही कांहीं प्रयत्न केलेला आहे; व त्यामुळें ह्या पुस्तकांत त्यांचा समावेश करणें अगत्याचें आहे.

ह्यांनीं स्वतः दिलेली आणखी माहिती खालीलप्रमाणें:—हे दैनिक 'ज्ञानप्रकाश' पत्राचे पहिले मुख्य संपादक होते. वर दिलेल्या पुस्तकांशिवाय १ माणिक बाग, २ दुःखाअंतीं सुख, ३ नवयुग, ४ मूर्तिमंत देशाभिमान, ५ त्रिवेणी, इ० कादंबऱ्या लिहिल्या असून, यांनीं " संपूर्ण बंकिमचंद्र " या नावानें बंगालींतील प्रसिद्ध कादंबरीकार बंकिमचंद्र यांच्या कादंबऱ्यांचीं भाषान्तरें प्रसिद्ध केलीं आहेत. यां-

शिवाय 'वाल्मीकीचा जय' वगैरे एकंदर ह्यांचीं ६०।७० पुस्तकें होतील. '**मॉडर्न रिव्ह्यू**' मध्यें गेलीं दहा वर्षे मराठी पुस्तकांवर अभिप्राय लिहिण्याचें काम ह्यांजकडे आहे. मराठी साहित्य-संमेलनाचेही हे गेलीं १० वर्षे सेक्रेटरी होते.

---

## ४९. नारायण भवानराव पावगी.



जन्म १८५४ मध्यें झाला. ह्यांचे वडील, आजे, हीं सर्व खानदानी घराण्यांतील होतीं; आणि वडील फर्स्टक्लास मामलतदार असून, आज्या-पणज्यांनीं अशाच प्रकारच्या हुद्यांचीं कामें केलेलीं होतीं. यांचे पणजे पद्माकरपंत हे वाईच्या रास्त्यांचे कारभारी होते; त्यांच्यांविषयीं एक आख्यायिका सांगतात कीं, एकदां ह्यांचे यजमान **रास्ते** हे वऱ्याच निवडक मंडळींसह वाईस कृष्णानदीवर स्नानास गेले असतां, पदरच्या मंडळींच्या प्रामाणिकपणाची परीक्षा पहावी, म्हणून नदीच्या पात्रांत सर्वजण शिरण्यापूर्वी म्हणाले कीं,-" मीं दिलेल्या तनख्याखेरीज ज्या कोणीं माझ्या संस्थानांतील एका कपर्दिकेचा देखील अपहार केला नसेल, त्यानें माझ्याबरोबर कृष्णेंत शिरावें." हें ऐकल्यावर फक्त पद्माकरपंतच कायते त्यांच्याबरोबर प्रवाहांत शिरले व बाकींच्या मंडळींची पाण्यांत शिरण्याची छाती झाली नाहीं. ही आख्यायिका देण्याचें कारण असें कीं, **नानासाहेब** स्वतः व त्यांचें घराणेंही पूर्वीपासूनच अत्यंत प्रामाणिक व सच्छील वृत्तीचें होतें; आणि नानासाहेबांच्यामध्येंही ह्या गुणांचा विकास त्यांच्या वाडवडिलांपासूनच बीजवृत्तीनें झाला; हें पुढें दिसून येणार आहे

असो. नानासाहेबांच्या मातुःश्री त्यांच्या १० व्या वर्षीच निवर्तल्या. पुढें त्यांच्या वडिलांनीं पुनः लग्न केलें नाहीं. ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत ज्या ज्या ठिकाणीं ह्यांचे वडील मामलतीवर जात, त्या त्या ठिकाणीं ह्यांचें मराठी व इंग्रजी चौथ्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण झालें. पुढें घरचा विश्वासु ब्राह्मण देऊन, त्यांनीं, हे व ह्यांचे धाकटे बंधु रावजी भवानराव पावगी ह्यांस मुंबईस बिऱ्हाड करून दिलें. दोघेही एकाच वर्षीं १८७२ चे सुमारास मॅट्रिक झाले. पैकीं रावजी ज्यास्त हुशार असून, त्यांस बी० ए० च्या परीक्षेंत पहिला आल्यामुळें **भाऊ दाजींचें** संस्कृतचें बक्षिस मिळालें होतें. उभयतांचें पुढील शिक्षण एल्फिन्स्टन् कॉलेज् त्यावेळीं भायखळ्यावर होतें,त्यांत झालें. **नाना पावगी** हे मात्र बी० ए० च्या परीक्षेंत नापास झाले. नंतर त्यांनीं मुन्सफीचा अभ्यास सुरू केला, पण तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटच्या परीक्षेस बसून ते पास झाले. लगेच त्यांस अव्वल-कारकुनीची जागा मिळाली, व तेव्हांपासून ते रेव्हिन्यू खात्यांत वाढत वाढत महालकरी व फर्स्टक्लास मामलेदार या हुद्यांपर्यंत चढले.

सरकारी नोकरी इमानें-इतबारें करून साधेल तेवढें लोकहित साधावयाचें, ह्याविषयीं **नाना पावगीं**ची ठाणें जिल्ह्यांतील लोकांत फार प्रसिद्धि प्रस्तुत लेख-कानें ऐकिली आहे. त्याचप्रमाणें त्यांचें काम सरकारांतही प्रिय व इभ्रतीचें असेंच मानलें जात असे; ह्यांत शंका नाहीं. याला पुरावा म्हणजे नाना पाव-गींचे वडील 'कुलाबा जिल्ह्यांत' पेणेस मामलेदार असतांना, त्याच तालुक्यां-तील नागोठणें पेट्याची महालकऱ्याची जागा सरकारनें उभयतां पिता-पुत्रांच्या प्रामाणिकपणाची खात्री पटल्यामुळें, इतरांचे आक्षेप बाजूस सारून, यांसच दिली. त्याचप्रमाणें माहीम व वाडें या ठाणें जिल्ह्यांतील जवळ जव-ळच्या तालुक्यांतही सरकारनें या पिता-पुत्रांस खुशाल मामलतदार नेमिलें. इतकेंच नव्हे, तर मुंबईजवळचें प्रसिद्ध भाण्डखोरीचें ठिकाण **वान्द्रें** येथें त्यांस फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटचे कामावर नेमिलें. ह्या ठिकाणीं कामाची नेहमींच गर्दी असते. उभय पक्षकार मुंबईचे बॅरिस्टर, डि० वकील, हायकोर्ट वकील, ॲटर्नीज, सॉलिसिटर्स हजर राखून लढणारे, ह्यामुळें काम फार तुंबलेलें; आणि तें चालू तारखेवर आणण्यासाठीं मदतनीस मॅजिस्ट्रेट नेमण्याचेंही घाटत होतें; अशा स्थितींत अत्यंत शिस्तीनें, व्यवस्थितपणानें व निरलसतेनें वागून, यांनीं नित्य, नैमित्तिक, आकस्मिक, प्रासंगिक, नियतकालिक व जुने तुंबलेले खटले,

मागील प्रकरणें व कागदपत्र पाहून, तडफेनें निकालांत काढिले; आणि काम चालू तारखेवर आणून ठेविलें. इतकेंच नव्हे, तर परस्पर लोकांनींच यांचें काम पसंत असल्याबद्दल व यांना पेन्शन् न देतां उलट बढती करण्याबद्दल मागणें केलें होतें.

एकीकडे असा प्रकार होता, तरी दुसरीकडे यांनीं वेळांत वेळ काढून वाङ्मय-सेवा आरंभिली. "भारतवर्षाचा जो इतिहास गोरकायांनीं लिहिला आहे, तो फारच थोडे विरळ अपवाद खेरिज करून, केवळ विपरीतबुद्धीनें रचलेला व खोडसाळ आहे;" ह्या गोष्टी **कीर्तने, राजवाडे**, इत्यादिकांनीं आतां सप्रमाण सिद्ध केल्याच आहेत. ह्याचप्रकारें त्यांच्या पुस्तकांतील सत्यापलाप काढून टाकावा व खरा इतिहास आमूलाग्र लिहावा असा सद्‍हेतु मनांत धरून, ह्यांनीं "**भारतीय साम्राज्य**" नांवाचीं एकंदर २२ पुस्तकें लिहिण्याचा संकल्प केला. त्यांपैकीं आज ११ पुस्तकें व एक त्यांचें '**आत्मवृत्त**' हीं प्रसिद्ध झालेलीं आहेत; आणि बाकीचीं कांहीं लिहून तयार असून, अप्रकाशित आहेत. ह्या पुस्तकांत (१) आर्यदेश, (२) आर्यलोक व त्यांचें बुद्धिवैभव, (३) आर्येतिहास व भूगोल, (४) आर्यशास्त्र व कला, (५) आर्यशासनपद्धति व शासनसंस्था, (६) आर्यांचे गुण, नीति, शौर्य, इ० (७) भरतखंडांतील मुख्य धर्म, (८) भरतखंडांतील जातिवैचित्र्य, (९) भरतखंडांतील भाषा, (१०) संस्कृत भाषेचा इतिहास, (११) प्राकृत व मराठी भाषेचा इतिहास, (१२ व १३) भरतखंडांतील संस्कृत व प्राकृत कविरत्नें, (१४ ते २२) यांत महाराष्ट्रांतील कविरत्नें, भरतखंडांतील स्त्रीरत्नें, भरतखंडावर विदेशीयांच्या स्वाऱ्या, हिंदुपदपादशाही, भरतखंडांतील इस्लाम प्रभुत्व, महाराष्ट्रदिग्विजय, भरतखंडांतील आंग्ल राजसत्ता, भरतखंडांतील जमिनीचे सत्ताप्रकार व सिंहावलोकन, भारतीय नाट्यशास्त्र व नाट्यकला (प्रकाशीत), असले प्रचंड विषय ह्यांनीं गोंविले आहेत. शिवाय, हें एवढें प्रचंड काम त्यांनीं केवळ निःस्वार्थ देशसेवा, खरी कळकळ व तळमळ यांनीं प्रेरित होऊन आणि योग्य तें लिहिण्यांत सरकारच्या रोषाचीही परवा न करितां केलें आहे; हें कोणीही कबूल करील. स्वतंत्र देशांत तर यांस 'बिनबोभाट काम करणारें झांकलें माणिक' असेंच गणलें गेलें असतें. वरीलपैकीं ९।१०।११ हे यांचे भाषाशास्त्रीय लेख आहेत.

यांची सरकार-सेवा सरकार-मान्य होती,हें वर आलेंच आहे; पण ह्यांची वरील वाङ्मय–सेवा, देशसेवा व गौरकार्यांचे सत्यापलाप सप्रमाण त्यांच्या पदरांत बांधण्याचें कार्य, हें मात्र अखेर सरकारी अधिकाऱ्यांस मान्य व सहन झालें नाहीं, असें परिणामावरून म्हणावें लागतें. कारण, न्यायानें डेप्युटी कलेक्टरची रिकामी झालेली जागा मिळण्याचा यांचा हक्क असतां ती यांस मिळूं शकली नाहीं; इतकेंच नव्हे, तर कमिशनर लॅरेन्स सारख्यांचें त्यांच्यांविषयीं अनुकूल मत असतांही, त्यांना "भारतीय साम्राज्यांत" खराखुरा इतिहास नमूद केल्याबद्दल, व तें लिहिणें माफी मागून परत घेण्यास तयार नसल्याबद्दल, शेवटच्या २५० रु० पगाराच्या निम्मे पेन्शन् मिळण्याऐवजीं, अवघें पंचमांश म्हणजे ५० रु० पेन्शन् सरकारनें दिलें' अशाप्रकारें ह्यांचं ओजस्वी चारित्र्य आहे.

भूस्तरशास्त्राचे वेदर्षिजनक, आर्यांची जन्मभूमि व उत्तरध्रुवाकडील त्यांच्या वसाहती आणि वेदकालीन व वेदोत्तरकालीन भारतवर्षांतील स्वराज्य. हे तीन ग्रंथ ह्यांनीं इंग्रजींत लिहिले आहेत. मतभेद असले, तरी यांचे हे ग्रंथ चिंतनीय आहेत, असे टिळकांसारख्या विद्वानांचे अभिप्राय आहेत. यांनीं "मराठी भाषेचा इतिहास" हें पुस्तक लिहिलें असून, विशेषतः विदेशी शब्द न वापरतां सरकारी कामकाजांतही संस्कृताधारें देशीच नवीन बनवून वापरण्याकडे यांचा मोठाच कटाक्ष असे; असें ठाणें जिल्ह्यांतील ह्यांच्या हाताखालचे लोक सांगतात, भाषेच्या इतिहासाचा विचार करितांना व्याकरण व शब्द–व्युत्पत्ति यांचाही विचार येतोच; म्हणून या चरित्राचा त्या पुस्तकांत अशा दृष्टीनें प्रबंधक ह्या नात्यानें संग्रह केला आहे.

---

## ५०. कै० हरि नारायण आपटे.

---

**हरिभाऊंचा** जन्म वऱ्हाडांत त्यांच्या आजोळीं ता० ८ मार्च १८६४ रोजीं झाला. त्यांचें पाळण्यांतील नांव '**बाळकृष्ण**' असें होतें; परंतु पुढें त्यांस '**हरी**' असें म्हणूं लागले; त्याच नांवानें ते सर्वांस परिचित आहेत; हे ४ वर्षांचे असतांच त्यांची मातुःश्री निवर्तली, व वडिलांनीं दुसरें लग्न केलें. '**हरी**'स लहान-

पणीं त्यांचें प्रसिद्ध चुलते **महादेव चिमणाजी आपटे** वकील, यांचा व त्यांचे पत्नीचा म्हणजे चुलतीचा फार लळा होता; ह्यामुळें **हरिभाऊं**स मातृ-पितृ-वियोग झाल्यानंतरही, त्यांचा सर्व सांभाळ ह्या उभयतांनीं पुत्रवत् वत्सलतेनें केला. **महादेव चिमणाजी आपटे** वकील, ह्यांचे नांव महाराष्ट्रांत "आनंदाश्रमा"मुळें पूर्ण परिचित आहेच. **महादेव चिमणाजी आपटे** हे मुंबईस वकीली करीत, ह्यामुळें आरंभींचें '**हरी**'चें राहणें व शिक्षण मुंबईसच झालें. **हरीभाऊ** १४ वर्षांचे असतां पुण्यास आले, व हायस्कुलांत इंग्रजी चौथ्या इयत्तेमध्यें शिकूं लागले. त्यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे १८८० मध्यें पुण्यास **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांचें 'न्यू-इंग्लिश स्कूल" स्थापन झालें; व तें स्थापन होण्याचें



कळण्यापूर्वीच चार-चार महिने अगोदर सरकारी शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांपैकींच **हरीभाऊ** हे त्या शाळेचे आरंभींचे विद्यार्थी होते. त्यावेळीं **रावसाहेब रानडे** व **विष्णुशास्त्री चिपळूणकर** ह्यांनीं आपापल्यापरी, आपल्या तेजस्वी व ओजस्वी लेखणीनें समाजांत चैतन्य उत्पन्न केलें होतें. **हरीभाऊं**मध्यें लहानपणापासूनच लेखन-प्रवृत्ति, कवित्वशक्ति, रसिकता, हे गुण दिसून येऊं लागले होते. न्यू० इं० स्कूलमध्येंही त्यांच्या हुशारीनें, मित्रमंडळींत छाप व शिक्षक-मंडळींत प्रेम उत्पन्न झालें होतें. एकदां तर असें सांगतात "**करमणूककार**" **हरीभाऊ** कीं,-'मार्मियन' शिकवीत असतां, **हरीभाऊं**नीं एका कवितेचा अर्थ सुचविला, तो **प्रो० वासुदेवराव केळकर**, ह्या गुणग्राही पंडितांनीं ग्राह्य मानला; इतकी **हरीभाऊं**च्या अंगीं मार्मिकता होती. मात्र शाळेंतील पुस्तकें व **हरीभाऊं**ची वाचन-पुस्तकें ह्यांचें गणगोत्र कधींच पटत नसे, ह्यामुळें **हरीभाऊ** परीक्षेंत पास असे एकदांच म्हणजे १८८३ त मॅट्रिक झाले, तोच पहिला व शेवटचा प्रसंग होता.

प्रवेशपरीक्षेनंतर **हरीभाऊ** डेक्कन् कॉलेजमध्यें गेले. तेथेंही संस्कृत, काव्य, नाटकें, यांतील हरीभाऊंनीं सुचविलेल्या अर्थान्तराची मार्मिकता वारंवार प्रत्ययास येत असे. डॉ० भाण्डारकर हे शाकुंतल शिकवीत असतां, ५ व्या अंकांतील एका श्लोकाचा अर्थ हरीभाऊंनीं वेगळा सुचविला, तो प्रथम त्यांना पसंत पडला नाहीं; परंतु दुसऱ्या दिवशीं वर्गांत आल्याबरोबर त्यांनीं तो अर्थ बरो-

वर असल्याचें सांगितलें; इ० माहिती रा० **बापूराव आंबेकर** ह्यांनीं लिहिलेल्या हरीभाऊंच्या चरित्रांत दिलेली आहे. हरीभाऊ इतके मार्मिक होते, तरी ४ वर्षें एका पी० ई० च्या वर्गांत रखडले ! पहिल्या वर्षीं नापास झाले, म्हणून नुकत्याच निघालेल्या फर्ग्यूसन कॉलेजमध्यें ते गेले; तेथेंही त्या वर्षीं नापास झाले, म्हणून पुनः डेक्कन् कॉलेजांत गेले; पुनः तिसऱ्या वर्षीं फर्ग्यूसनमध्यें आले. त्यांनीं आपल्याबद्दल वारंवार असे उद्गार काढावे कीं,–"हें गणितच अगणित अडचणी परीक्षेच्या बाबतींत उत्पन्न करितें." असो. यानंतर त्यांनीं परीक्षेचा नाद सोडला. हरीभाऊंना, संस्कृत, इंग्लिश, जर्मन, फ्रेंच, गुजराथी व बंगाली इतक्या भाषा चांगल्या अवगत होत्या. त्यांच्या "मराठी"-च्या कर्तृत्वाबद्दल तर लिहावयासच नको.

**हरीभाऊंनीं** प्रथम १८९० मध्यें "**करमणूक**" नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू केलें. त्यांतील कादंबऱ्या, गोष्टी, चुटके, यांनीं महाराष्ट्रीय आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना अगदीं चटका लावून सोडला. ह्यांच्या "करमणुकी"नेंच सामान्य जनांत वाचनाभिरुचि उत्पन्न केली; व जें काम हजारों शिक्षकांकडून व्हावयाचें नाहीं, तें हरीभाऊंनीं "करमणुकी"च्या द्वारें मोठ्या प्रेमळपणानें केलें; आणि तेंही भारदस्त असें वाङ्मय निर्माण करूनच केलें; ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**हरीभाऊ** हे विशेषतः उत्कृष्ट कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या त्या कादंबऱ्यांतील भाषा–प्रभुत्वानें त्यांना पदवी नसतांही साहजिक मोठा अधिकार प्राप्त झाला. मुंबई युनिव्हर्सिटीनें त्यांना सतत १० वर्षें बी० ए० च्या मराठीचे परीक्षक नेमिलें होतें. त्यांनीं निरनिराळ्या प्रकारें पुष्कळच वाङ्मयसेवा केलेली आहे. त्यांपैकीं कांहींचा उल्लेख खालीलप्रमाणें:—

ऐतिहासिक कादंबऱ्या—( १ ) उषःकाल, ( २ ) गड आला पण सिंह गेला, ( ३ ) रूपनगरची राजकन्या, ( ४ ) चंद्रगुप्त, ( ५ ) वज्राघात, ( ६ ) सूर्योदय, ( ७ ) केवळ स्वराज्यासाठीं, ( ८ ) सूर्यग्रहण, ( ९ ) मध्यान्ह, इ०.

सामाजिक कादंबऱ्या—( १ ) आजकालच्या गोष्टी, ( २ ) पण लक्षांत कोण घेतो ! ( ३ ) मी, ( ४ ) यशवंतराव खरे, ( ५ ) गणपतराव, ( ६ ) भयंकर दिव्य, ( ७ ) जग हें असें आहे, ( ८ ) मायेचा बाजार, इ०.

नाटकें— ( १ ) संगीत संत सखूबाई, ( २ ) संगीत पिंगला, ( ३ ) भास कवीच्या नाटककथा ( रूपान्तरित ).

आणखी पुष्कळ कादंबऱ्या, गोष्टी व अन्य प्रकारचे लेख, यांचे विपुल आहेत: ते सर्व येथें देतां येणें अशक्य आहे.

**हरीभाऊंचे** चुलते **महादेव चिमणाजी आपटे** ह्यांनीं जुन्या संस्कृत विद्येच्या उत्तेजनार्थ व ग्रंथप्रकाशनार्थ पुण्यास "**आनंदाश्रम**" ही संस्था स्थापन केली. चुलत्यांच्या पश्चात् तिचें चालकत्व हरीभाऊंच्याकडे आलें. त्याचप्रमाणें पुण्यास "**नूतन मराठी विद्यालय**" ही संस्था कै० **विष्णुशास्त्री चिपळूणकर** ह्यांच्या स्मरणार्थ प्रथम निघाली. आज वाढत वाढत तिला "**न्यू पूना कॉलेज्**" स्थापण्यापर्यंतचें स्वरूप प्राप्त झालें. हरीभाऊंनीं आरंभापासूनच ह्या संस्थेच्या कामांत मनापासून हरएक प्रकारें साह्य केलें. ३०।३५ वर्षे त्यांचा ह्या संस्थेशीं संबंध होता, व कांहीं न घेतां, त्यांनी नूतन म० वि० च्या हायस्कूलमध्यें आठवड्यांतून कांहीं तास शिकविण्याचें काम केलें आहे.

**हरीभाऊ** हे सुमारें २० वर्षेपर्यंत पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे सभासद होते, व शेवटीं तीन वर्षें तर अध्यक्ष होते. त्यांना हृदयाचा विकार जडून ३ मार्च १९१९ रोजीं हरीभाऊंनीं "**आनंदाश्रमां**"त आपला देह ठेविला. त्यांचें "**विदग्ध वाङ्मय**" हें पुस्तक अत्यन्त मननीय आहे. शिवाय त्यांचीं "वुइल्सन् फायलॉलाजिकल् लेक्चर्स्" हींही प्रसिद्ध झालेलीं असून, त्यामुळेंच आमच्या प्रबन्धकारांत यांचा समावेश आम्हीं केला आहे.

---

## ५१. कै० शिवराम एकनाथ भारदे.

ह्यांचें त्रोटक चरित्र त्यांचे मित्र नगरचे **त्रिंबक गंगाधर धनेश्वर** वकील ह्यांनीं महाराष्ट्रसाहित्यपत्रिकेच्या ८ व्या वर्षाच्या पहिल्याच अंकांत ( मार्च १९२० ) प्रसिद्ध केलें आहे; त्यांच्या प्रेमळ परवानगीनें त्यांतील सारांश याखालीं दिला आहे.

**शिवरामबुवा भारदे** ह्यांचा जन्म ( इ० स० १८६२ त ) नगर जिल्ह्यांत 'शेवगांव' येथें झाला. हें तालुक्याचें ठिकाण असून, पैठणापासून सहा कोसांवर

आहे. ह्यांचे वडिलांना चौघे बंधु होते. त्यांत **रंगनाथबुवा** हे सुप्रसिद्ध कीर्तनकार होऊन गेले. ह्यांचा कीर्तनाचा सर्व संच घरचाच असे. मुंबईस रामवाडीच्या राममंदिरांत त्यांचीं कीर्तनें होत. ह्यामुळें शहराशीं संबंध जडल्याकारणानें ह्या कथेकरी-मंडळाच्या घराण्यांतील नवीन पिढीस इंग्रजी शिक्षणाचा लाभ झाला. **शिवरामपंतां**चा इंग्रजी अभ्यास नगर, सोलापूर व एलिफन्स्टन् हायस्कूल यांत झाला. शेवटच्या हायस्कूलमधून परीक्षेस बसून ते मॅट्रिक पास झाले;व पुढील शिक्षण एलिफन्स्टन् कॉलेजांत झालें; परंतु गणित-विषयांत फर्स्ट बी० ए० च्या परीक्षेंत दोन-तीन वर्षे लागोपाठ नापास झाल्यामुळें, त्यांस अभ्यासक्रम सोडावा लागला.

खासगी शाळा स्थापन, करून अल्प वेतनावर संतुष्ट राहून, विद्यादानाचें पवित्र कार्य करण्याचा धडा गिरविण्याकडे १८८० सालानंतर तरुण सुशिक्षितांची प्रवृत्ति दिसून यावयास लागली. तीस अनुसरून **शिवरामबुवा** व त्यांचे परम स्नेही अकोळनेरचे जहागीरदार **गणपतराव दाभोळकर** यांनीं नगरास एक ' नेटिव्ह् इन्स्टिटयूशन् " नांवाची इंग्रजी शाळा काढिली. ती त्यांनीं दोन-तीन वर्षे चांगली चालविली; पण पुढें नगर येथील सरकारी हायस्कूल सरकारनें तेथील एज्युकेशन् सोसायटीच्या ताब्यांत दिल्यामुळें, कांहीं मित्रांच्या आग्रहावरून **भारदे-दाभोळकर** ही जोडी आपली शाळा बंद करून, सोसायटीच्या शाळेंत शिक्षक बनली.

शिक्षकाचें काम करीत असतांना ' इंडिया ' पत्राचें ' मुत्सद्दी ' या नांवानें रूपान्तर करून, मराठींत एक साप्ताहिक पत्र **हरि कृष्ण परांजपे**, **दाभोळकर व भारदे** हे काढूं लागले. स्वतःचा छापखाना नसल्यामुळें ह्यांत खर्चाची बाजू यांचे अंगावर आली. तथापि खचून न जातां, पुढें ' सुदर्शन' या नांवाचें साप्ताहिक ह्यांनीं सुरू केलें. १८९७ सालच्या वावटळींत नगर हायस्कूलचे हेडमास्तर **रा० मोडक** यांचें शिवाजी उत्सवाचे वेळीं झालेलें व्याख्यान ह्या पत्रांत प्रसिद्ध झालें. तें सरकारास आक्षेपार्ह वाटल्यावरून भारद्यांचा शाळेशीं संबंध सुटला. या अज्ञातवासाचा उपयोग **शिवरामबुवांनीं** फार उत्तम रीतीनें केला. ते आपल्या शेवगांवीं गेले. तेथें त्यांचा वाडा फार भव्य व मोठा आहे; त्यांत एका खोलींत बऱ्याच पोथ्या व दप्तरें पडलीं होतीं, तीं चाळून पाहण्याचें काम त्यांनीं ह्या अवधींत केलें. ह्या दप्तरांत त्यांना **ज्ञानेश्वरी**ची एक सुवाच्य हस्तलिखित प्रत सांपडली. लेखकानें तिजवर लेखनकाल नमूद केला आहे; म्हणून त्यांनीं आणखी प्रति जमविल्या; त्यांत ह्यांची प्रत सर्वांत जुनी असें आढ-

रून आलें. बुवांच्या छापील प्रतीशीं ती ताडून पाहात असतां, यांनीं फार मार्मिकपणानें व शोधकबुद्धीनें ज्ञानेश्वरीचा अभ्यास केला. ह्यासंबंधीं त्यांनीं **सुधारकां**त बारा लेख प्रसिद्ध केले. '**भारद्वाजां**'च्या ह्या लेखांनीं सांप्रदायिक लोकांमध्यें मोठी खळबळ उडून गेली.

बुवांचा सिद्धान्त " ज्ञानेश्वरीचा कर्ता आळंदीचा **ज्ञानदेव** नव्हे, तर आपेगांवचा ज्ञानदेव " हा आहे. यांनीं ज्ञानेश्वरींतील शब्दांचे अर्थ व्युत्पत्तीसह नीट उमगावे म्हणून कोंकणी, मल्याळी व कानडी भाषांचे कोश संग्रहीं ठेवून, बऱ्याच शब्दांचा सोपपत्तिक अर्थ लाविला होता. विविधज्ञानविस्तारांत " ज्ञानेश्वरींतील कांहीं शब्दांचे अर्थ " हा उत्कृष्ट व मोलवान् निबन्ध त्यांनीं लिहिला होता. त्यांनीं नवीन संशोधित आवृत्ति प्रसिद्ध करण्याच्या इच्छेनें ज्ञानेश्वरीचे पहिले नऊ अध्याय लिहून काढिले होते. पुढल्या अध्यायांचें काम मात्र त्यांच्या मृत्यूनें राहून गेलें. ' ज्ञानेश्वरी कोश ' त्यांनीं लिहिला असून, त्याच्या रचनेसंबंधीं माहिती इंदूरच्या साहित्यसंमेलनांत त्यांनीं पुढें मांडिली होती. महाराष्ट्रांतील धर्मपंथांचा अभ्यास त्यांनीं केला होता. ज्ञानेश्वरकालीन समाजस्थितीवर पुण्याच्या प्रार्थनासमाजांत त्यांनीं एक व्याख्यान दिलें. **डॉ० भांडारकरां**सारख्यासही तें पसंत पडून ' संतचरित्र-कथनावर दरवर्षीच एक व्याख्यान देण्याचें त्यांस वर्षासनच मिळालें. १९२० च्या आरंभीं बुवा मृत्यु पावले. मानभावपंथ, मुकुंदराज, शिवादिनकेसरी, इ० वरील त्यांचे मननीय लेख त्यांच्या मृत्यूनें अप्रसिद्ध राहिले !

---

## ५२. डॉ० पांडुरंग दामोदर गुणे.

---

यांचा जन्म अहंमदनगर जिल्ह्यांत राहुरी येथें ता० २ एप्रील १८८२ रोजीं झाला. ते आपल्या वडिलांचे चौथे चिरंजीव होते. शिक्षण अहंमदनगर येथेंच झालें. विद्यार्थी-दशेंत असतांच संस्कृताकडे यांचा फार ओढा होता. अहंमदनगर येथील एज्युकेशन् सोसायटीच्या हायस्कूलमधून मॅट्रिकच्या परीक्षेस बसून, त्यांनीं जगन्नाथ शंकरशेटची दुसरी स्कॉलरशिप मिळविली. पुढील एम्० ए० पर्यंतचें शिक्षण मुंबईस बुइल्सन् कॉलेजमध्यें झालें. त्या अवधींत त्यांस वेळोवेळीं



विद्यार्थीप्रिय डॉ० पांडुरंग दामोदर गुणे.

संस्कृतच्या स्कॉलर्शिपा व बक्षिसें मिळत गेलीं. एम्० ए० झाल्यावर ते फर्ग्यूसन कॉलेजमध्यें प्रोफेसर झाले; व १९१० च्या सुमारास पुढील शिक्षणासाठीं ते जर्मनीस गेले. त्यांना हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ति मिळाली. संस्कृत व तुलनात्मक भाषाशास्त्र यांचा त्यांनीं 'लिपझिक्' येथें तीन वर्षें अभ्यास केला. नंतर पी० एच्० डी० ही पदवी घेऊन, ते १९१४ च्या आरंभीं फर्ग्यूसन कॉलेजमध्यें कामावर हजर झाले. " जर्मनींतील शिक्षण, " " आमचा युरोपचा प्रवास, " हीं दोन पुस्तकें त्यांच्या जर्मनींतील अवलोकनाचीं फळें होत. १९१८–१९ च्या सुमारास त्यांच्या क्षयरोगानें उचल खाल्ली. अशा स्थितींत प्रकृति अशक्त असूनही, ओरिएंटल् कॉन्फरन्स भरविणें, भाण्डारकर रिसर्च इन्स्टिट्यूटमध्यें उत्साहपूर्वक काम करणें, आणि विद्यार्थ्यांच्या निरनिराळ्या संस्थांमध्यें पुढाकार घेऊन त्यांना मदत करणें, ह्या गोष्टी त्यांच्या अव्याहत चालू होत्या. त्यांनीं मुंबई युनिव्हर्सिटींत जीं फायलालॉजिकल् लेक्चर्स दिलीं, तीं त्यांनीं पुढें आपल्या "तुलनात्मक भाषाशास्त्र" पुस्तकांत इंग्रजींत प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांचीं कॉलेजमधील काव्य, वेद, व तर्कावरील व्याख्यानें चिकित्सक पद्धतीचीं व मनोरंजक असत. कलकत्ता युनिव्हर्सिटीसाठीं प्राकृत भाषेचे उतारे निवडून,ते प्रसिद्ध करण्यासाठीं, त्यांनीं त्या युनिव्हर्सिटीकडे सोंपविले आहेत. तसेंच प्राकृत अपभ्रंशासंबंधींही त्यांनीं कांहीं लेख लिहिले आहेत.

ही माहिती **डॉ० गुणे** यांचे चिरपरिचित व ऋणानुबंधी " भारतवर्षीय महिलविद्यापीठांतील " प्रोफेसर व सुप्रसिद्ध कवि **वासुदेव गोविंद मायदेव** एम्० ए०. यांनीं दिली आहे.

" विविधज्ञानविस्तार " मासिकांत मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयीं मरणापूर्वी यांचे कांहीं लेख प्रसिद्ध झाले होते. त्या विषयावरील भीष्माचार्य **चिंतामण विनायक वैद्य** यांचें व आधुनिक धनुर्धर अर्जुन **डॉ० गुणे** यांचें वाग्युद्ध अजून विद्वानांच्या स्मरणांतून गेलें नसेल. पुण्याच्या हवेनें बरें वाटेना, म्हणून सांगलीस " वुइलिंग्डन् " कॉलेजमध्यें त्यांची नेमणूक झाली. तेथें त्यांना बराच आराम पडल्यासारखा वाटला; परंतु अखेर नोव्हेंबर ता० २५ सन १९२२ रोजीं त्यांचा अन्त झाला. " हे अत्यन्त निगर्वी, विनोदी, प्रेमळ व सहनशील गृहस्थ होते; त्यांचें आडनांव अन्वर्थक होतें. **डॉ० भाण्डारकर** म्हणजे ज्ञानाचें भाण्डार; **लोकमान्य टिळक** म्हणजे महाराष्ट्राचे तिलक; **गा० ब० शंकर**

**पांडुरंग पंडित** म्हणजे खरोखरच पण्डित; आणि **प्रो० कर्वे** म्हणजे खरोखरच 'करवे,' '**बोले**' नव्हत;–त्याचप्रमाणें **डॉ० गुणे** हे खरोखरच विद्वान, व **गुणवान्** होते." असें **रा० प्रियोळकर** यांनीं डॉक्टरसाहेबांच्या विस्तारांतील निधन-लेखांत लिहिलें आहे.

---

## ५३. विठ्ठल रामजी शिंदे.



अकरा–बाराव्या शतकांत बादामी ते सौंदत्ती-पर्यंतच्या प्रदेशांत एक राजघराणें होतें. त्याच्या मांडलिकत्वाखालीं "सिंद" नांवाचें घराणें पूर्वी होतें; व त्यांना त्या राजघराण्याकडून विजापूर जिल्ह्यांत 'मुरापुर' येथें जहागीरही मिळाली होती. पटवर्धनांच्या कर्नाटकावर स्वाऱ्या झाल्या, त्या वेळच्या लढायांत ह्या घराण्यांतील कर्ते पुरुष मारले गेले; व एक पोरका मुलगा मात्र उरला होता. पुढें जमखिंडी येथें त्या पोरक्या मुलास म्हणजे **विठ्ठलराव शिंदे** यांच्या आज्यास, त्या वेळच्या कानडी लिंगायत देसायांनीं आपल्या जवळ बाळगिलें. त्याचें नांव बसाप्पा (बळवंत) असें होतें. त्याचे पुत्र **रामजी** व त्यांचे पुत्र **विठ्ठलराव शिंदे**. शिंदे हें नांव 'सिंद' ह्या शब्दा-पासूनच आलें असावें; असें त्यांचें म्हणणें आहे.

विठ्ठलरावांचे वडील जुन्या चालींचे, भजनी संप्रदायाचे होते; जमखिंडीस त्यांना 'मराठ्यास कधींहि न मिळालेलें' संस्थानच्या स्टोअरचें काम मिळालें होतें. त्यांच्या विश्वासुपणाबद्दल खात्री होती, म्हणून तीन वेळां राजीनामा दिला होता, तरी संस्थानाधिपतींनीं त्यांना पुनः त्याच कामावर बोलाविलें. शेवटच्या वेळीं मात्र ते घरीं बसल्यावर, व साधु-संतांचा परामर्श घेण्याची त्यांची पहिल्यापासून प्रवृत्ति असल्यामुळें, पुढें पुढें त्यांस द्रव्याच्या टंचाईंत दिवस काढावे लागले.

प्रथम खाऊन-पिऊन सुखी अशा स्थितींत **विठ्ठलरावांचा** जन्म जमखिंडी येथें २३ एप्रील १८७३ रोजीं झाला. पहिलीं ६ वर्षें याप्रमाणें गेलीं. नंतर

कालचक्राचा फेरा आल्यानें, पुढील आयुष्य हालांत कंठण्याचा धडा त्यांस एव्हांपासूनच मिळूं लागला. **विठ्ठलरावांचें** प्राथमिक शिक्षण व हायस्कूलमधील शिक्षण जमखिंडीसच झालें. प्राथमिक शिक्षण चालू असतांच, त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें **रामजीबावांनीं** आपल्या घरांत सहा महिन्यांची सून आणली ! १८९१ मध्यें **विठ्ठलरावांची** मॅट्रिकची परीक्षा पास झाली. मॅट्रिक झाल्यावर **विठ्ठलरावांस** 'परशुरामभाऊहायस्कूलमध्यें' शिक्षकाची नोकरी मिळाली. येथें त्यांचें शिक्षण संपावयाचें, परंतु त्यांच्या यजमानांच्या मनांत **विठ्ठलरावांनीं** मुंबईस व्हेटरीनरी कॉलेजांत जाऊन, आपल्या संस्थानांत जनावरांच्या डॉक्टराचें काम करावें असें होतें; त्यामुळें त्या शिक्षणासाठीं जमखिंडीकरांनीं **विठ्ठलरावांस** स्कॉलर्शिप् देऊं केली; परंतु **विठ्ठलरावांनीं** स्कॉलर्शिपच द्यावयाची तर ती पुण्यांत आर्ट्स् कॉलेजचा अभ्यास करण्यासाठीं आपल्यास मिळावी, अशी मागणी केली; पण हें पोर आपला अनादर करीत आहे, अशा समजुतीनें संस्थानाधिपतींनीं **विठ्ठलरावांस** नोकरीवरून दूर केलें; व त्या रागांत त्यांच्या वडिलांसही कामावरून काढिलें. पुढें **विठ्ठलराव** हे पुण्यास आले; व शिकवण्या करून, डेक्कन् मराठा असोसिएशनची लहानशी मिळालेली स्कॉलर्शिप स्वीकारून व प्रसंगी भिक्षाही मागून त्यांनीं इंटरमीजिएटची परीक्षा दिली. '**मराठा**' म्हणवून घेऊन लोकांच्या घरीं मदत मागण्याचें भिकारडें काम केल्याबद्दल त्यांना केव्हां केव्हां चांगली संभावनाही करून घ्यावी लागली !

पुढील शिक्षणाचा भार मात्र **श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड** यांनीं आपल्या शिरावर घेतला. नंतर १८९८ त ते बी० ए० झाले. कॉलेजांत असतांनाच ते पुण्याच्या प्रार्थनासमाजांत जाऊं लागले, व एव्हांपासून धर्मसंबंधीं विचारांची त्यांच्या मनांत खळबळ उडूं लागली. पुढें एक वर्ष ते मुंबईस एल्० एल्० बी० चा अभ्यास करीत होते; पण मुंबईंतील प्रार्थनासमाजांतील व्याख्यानांनीं समाजविषयक व धर्मविषयक कामगिरी करण्याच्या मार्गांतच आपण पडावें, असें त्यांच्या मनानें घेतलें व समाजाच्या शिफारशीनें त्यांस "युनिटेरियन् असोसिएशन"ची स्कॉलर्शिप् मिळून, **विठ्ठलराव** यांनीं धर्म व समाज ह्यांच्या तुलनात्मक अभ्यासासाठीं विलायतेस जाण्याचें ठरविलें व सन १९०१ मध्यें त्यांनीं दोन वर्षांपुरती आपल्या मातृभूमीची रजा घेतली.

ऑक्स्फर्ड् येथील मँचेस्टर कॉलेजचा शिक्षणक्रम पुरा झाल्यावर, परत येण्याच्या सुमारास, ॲमस्टर्डाम येथें एक मोठी धर्मपरिषद् भरली होती; तींत

हिंदुस्थानाच्या वतीनें प्रार्थनासमाजाकडून **विठ्ठलरावांची** नेमणूक झाली होती. विलायतमधील परिस्थिति पाहून व तेथील अनुभव सांठवून, **विठ्ठलराव** १९०३ मध्यें परत स्वदेशीं आले.

**विठ्ठलराव शिंदे** यांची " डिप्रेस्ड क्लासेस् मिशन"ची कामागिरी अपूर्व आहे. न्यायमूर्ति सर **नारायणराव चंदावरकर** यांच्या हस्तें, शेट **दामोदरदास गोवर्धनदास** यांनीं आरंभीं दिलेल्या १००० रुपयांवर **विठ्ठलरावांनीं** परेळ येथें प्रथम डि० क्ला० मिशनतर्फे एक शाळा सुरू केली. आज सर्व हिंदुस्थानभर या मिशनच्या किती तरी शाखा पसरलेल्या आहेत. ह्या सर्व शाखांत पुण्याच्या शाखेची भरभराट ज्यास्त दिसून येते. या संस्थेंत विशेषतः औद्योगिक शिक्षणाकडे ज्यास्त भर दिला जातो; आणि पुण्यांतील कोणत्याही उत्तम चाललेल्या शिक्षण–संस्थेंत ज्या सोयी व कार्यांच्या शाखा असतात, त्या सर्व याही संस्थेंत पहावयास सांपडतील. याप्रमाणें पुण्यांतील डि० क्ला० मि०ची शाखा नांवारूपांस आणण्याचें सर्व श्रेय **विठ्ठलरावांसच** दिलें पाहिजे. ही संस्था त्या जातींतील मंडळींच्या स्वाधीन करून १९२३ पासून **विठ्ठलराव** हे इतर वाङ्मयात्मक वगैरे कामांत लक्ष घालूं लागले आहेत; तरी मूळ संस्थेकडे त्यांचें पूर्ण लक्ष आहेच. डि० क्ला० मि०ची पुण्यांतील स्थावर मिळकत तीन लक्षांपर्यंत आहे.

ऑक्सफर्ड् युनिव्हर्सिटीमध्यें, धर्माचा तुलनात्मक इतिहास व हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास हे विषय त्यांनीं घेतले होते, व त्यांस हे विषयच अत्यन्त प्रिय आहेत. यांच्या अनुषंगानें त्यांना मराठी, कानडी, संस्कृत, पाली, इत्यादि निरनिराळ्या भाषांचाहि अभ्यास करावा लागला; आणि विविधज्ञानविस्तारांत व केसरींत, (१) 'कोंकणी व मराठी' यांसंबंधानें व व्युत्पत्तिविषयक यांचे पुष्कळ लेख आलेले आहेत; (२) त्याचप्रमाणें **रामभाऊ जोशी** यांच्या 'मराठी भाषेची घटना' या पुस्तकांत "मराठी व कानडी यांचा परस्पर–संबंध" हा विचारपरिप्लुत लेख यांचाच आहे (३) ज्ञानकोशामध्यें 'अस्पृश्यता–निवारणा'-संबंधींची माहिती यांनींच लिहिली आहे. (४) राजवाड्यांच्या 'राधामाधवविलासचंपू'वर टीकात्मक असे यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. यांचीं (५) प्रार्थनासमाजांतील धर्मपर व नीतिपर व्याख्यानेंहीं पूर्वीच प्रसिद्ध झालेली आहेत. वर उल्लेखिलेले पहिल्या दोन अंकांमधील लेख आणि यांशिवाय " महाराष्ट्र विद्यापीठ व कर्नाटक " ह्यावरचे **विठ्ठलरायांचे** लेख व्याकरण–व्युत्पत्ति–

प्रबन्धांमध्यें निखालसतेनें येण्यासारखे आहेत; ह्यामुळें आम्हीं त्यांचें चरित्र येथें मुद्दाम त्यांस विचारून ग्रथित केलें आहे.

चरित्रान्तर्गत म्हणून ह्यांजसंबंधींच्या आणखीही कांहीं ठळक गोष्टी येथें थोडक्यांत नमूद करितोंः—

( १ ) पुण्यास १९१७ मध्यें शनिवारवाड्यापुढें एक मोठी सभा झाली; व तिचे **विठ्ठलराव** हे अध्यक्ष होते. त्यावेळीं त्यांनीं " मराठा राष्ट्रीय संघ " ही संस्था स्थापन केली; व तिचे नियम ठरविले. " मराठ्यांचे हितसंबंध वेगळे न मानितां, सर्व जातींच्या सहकारित्वानें, धार्मिक, सामाजिक, व राजकीय कामें करावीं " असें तिचें ध्येय आहे. जातिद्वेषमूलक ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वाद त्यांस मान्य नाहीं, असें त्यांनीं सांगितलें; तें आम्ही येथें मुद्दाम नमूद करीत आहों.

(२) हल्लींच्या बहुतेक शिक्षण-संस्था म्हणजे **पुस्तक-पंडित** तयार करण्याचे जणु कांहीं **कारखानेच** होत; ह्यामुळें हें शिक्षण संपादिलेले ब्राह्मणेतरही 'किंकर्तव्यमूढ' होऊन भिकार नोकरीच्याच मागें लागतात; हा अनुभव आहे; म्हणून डि० क्ला० मिशनचें असले **पंडित** तयार करणें ध्येय नाहीं.

( ३ ) " राधा-माधव-विलास-चंपू " वरील त्यांच्या टीकेंत खालील प्रमुख मुद्दे आहेतः—१. हें शहाजीच्या चरित्रात्मक काव्य असल्यानें, त्या विषयास सोडून, प्राचीन मराठ्यांच्या व इतर जातींच्या उत्पत्तीसंबंधानें लिहिणें अप्रस्तुत आहे. २. मराठे हे नागवंशी, कुणबी; क्षत्रिय नव्हेत; हें राजवाड्यांचें म्हणणें चुकीचें आहे. ३. महाराष्ट्राची उत्पत्ति सांगतांना "वऱ्हाड=वरचें महाराष्ट्र, कऱ्हाड=खालचें महाराष्ट्र झालें," ही शक्कल कांहीं जमते; परंतु "मऱ्हाड=मधलें महाराष्ट्र" हें तर्कट कोठलें ? त्याला कांहीं आधार नाहीं. ४. बुद्ध, जैन, लिंगायत, संन्यासी, ह्यांबद्दलचे राजवाड्यांचे उद्गार अप्रासंगिक व अयोग्य आहेत; इ०.

( ४ ) " तुलनात्मक भाषांचा इतिहास " या विषयावर आतांपर्यंत **डॉ० भांडारकरांसारखे** आपल्या इकडील पंडित व जर्मनीमधील किंवा अन्य यूरोपीय पंडित जें लिहितात, तें त्यांचें लिहिणें त्या विषयास धरून नाहीं; शिवाय, ह्यांपैकीं कोणतेही पंडित त्या विषयावर अधिकारानें लिहिण्यास असमर्थ आहेत; कारण, दोन भाषांची तुलना करावयाची म्हणजे त्या निदान दोन तरी स्वतंत्र भाषा पाहिजेत. आर्यन् व द्राविड, आर्यन् व मोगल, किंवा द्राविड व मोगल, अशा भाषांविषयीं कांहीं लिहिलें, तर ती दोन स्वतंत्र भाषांची तुलना होईल; पण ह्या बहुतेक पंडितांच्या सगळ्या लेखनांचा भर आर्य व त्यांच्याच

उपभाषा ह्यांचा तुलनात्मक विचार करण्याकडे असतो. अर्थात् कोणत्याही दोन स्वतंत्र भाषा त्यांस अवगत नसल्यानें, खऱ्या खऱ्या तुलनात्मक भाषाशास्त्राच्या इतिहासाचा अभ्यास होण्याची कोठेंच अद्यापि व्यवस्था झालेली नाहीं. अशा-प्रकारचा हा मुद्दा आपण नवीनच पुढें आणीत आहों; असें त्यांचें म्हणणें आहे.

( ५ ) मराठी ही संस्कृतापासून प्राकृताचे द्वारा उद्भवली, या सार्वत्रिक विधानावर त्यांचें असें म्हणणें आहे कीं, " मराठीवर पुष्कळच परिणाम कानडी भाषेचा झालेला आहे; इतकेंच नव्हे, तर बंगालीचाही उगम द्राविड भाषां-पासूनच झाला आहे. " प्राकृत भाषांमध्येंही किती द्राविडपणा आहे, ह्याविषयीं त्यांचें संशोधन चालू आहे. ज्यांची व्युत्पत्ति सांपडत नाहीं, त्या चालू भाषें-तील शब्दांना हल्लीं मूळचे ' देशी ' शब्द असें म्हणण्याची रीत पडली आहे. परंतु खरोखर तसें नसून, **मूळ द्राविड भाषा**; पण संस्कृतच्या पगड्यामुळें त्या दडपून जाऊन, व त्यांना संस्कृती थाटाचें वळण लागून, त्या निराळ्या पेहे-रावांत दिसूं लागल्यामुळें, त्यांना 'संस्कृतोत्पन्न' असें म्हणतात; पण तें चुकीचें आहे. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील अँग्लो-इंडियन, युरेजिअन, किरिस्तांव, इ० हे एकाच धर्माचे, एकाच पेहेरावाचे व एकाच आचार-विचारांचे असले, तरी ते कांहीं इंग्रज नव्हेत; त्याप्रमाणें संस्कृतचा पगडा बसला म्हणून हल्लींच्या देशी भाषा ह्या कांहीं 'संस्कृतोत्पन्न' नव्हेत.

( ६ ) सध्यां निरनिराळ्या प्रांतांतून स्वतंत्र युनिव्हर्सिट्या स्थापिल्या जाण्याचा संभव आहे. त्या बाबतींत म्हैसूर युनिव्हर्सिटी, बडोदा युनिव्हर्सिटी, इत्यादींशीं **विठ्ठलरावां**चा पत्रव्यवहार चालू आहे. **महाराष्ट्र युनिव्हर्सिटी**ही केव्हांतरी निघणारच; तेव्हां ह्या युनिव्हर्सिट्यांनीं तरी फक्त आर्य व त्यांच्याच उपभाषा यांच्या अध्ययनापुरता मार्ग मोकळा न ठेवितां, आर्य व आर्येतर भाषा यांच्या अध्ययनाचा मार्ग खुला करावा; म्हणजेच खरोखर तुलनात्मक भाषाशास्त्राचा विचार होऊं शकेल. एऱ्हवीं द्राविड-भाषांच्या अध्ययनावांचून मराठीविषयीं लढ-विलेली व्युत्पत्ति एकांगी व पंगु असणार.

( ७ ) मराठींत संयुक्त क्रियापदें कानडींतूनच आलीं आहेत, असेंही त्यांचें एक म्हणणें आहे.

याप्रमाणें यांजविषयीं व यांच्या मतांविषयीं मिळालेली माहिती सादर करीत आहों.

# ५४. रावसाहेब डॉ० विठ्ठल पांडुरंग चव्हाण.



यांचा जन्म पंजाब फ्रान्टिअरवर सुमारें ६० वर्षांपूर्वी झाला. त्यांचे वडील मिलिटरी असिस्टंट् सर्जन असल्यामुळें रावसाहेबांचें बालपण त्या बाजूसच गेलें. पुढें कोंकणांत आल्यावर मराठीचा अभ्यासक्रम पुरा होऊन इंग्रजीची सुरुवात होते न होते, एवढ्यांत त्यांचे पेन्शनर वडील इहलोक सोडून गेले.

फ्रान्टिअरवर त्यांचे वडील नोकरीवर असतांना तेथल्या अडदांड पठाणांपासून त्यांस कुटुंबाचें संरक्षण करण्यासाठीं किती त्रास सोसावा लागत असे, याची कल्पना हल्लींच्या काळांत येणें शक्य नाहीं रावसाहेबांच्या मातु:श्रीवर एकदां तर मोठाच भयंकर प्रसंग आला होता. शिकारीचा व्यासंग असल्यामुळें त्यावेळीं त्यांनीं दोघां पठाणांचा खरपूस समाचार घेऊन आपल्या जीवाचें संरक्षण केलें. अशा भयंकर स्थितींतून निभावून सुरक्षितपणानें सर्व मंडळी कोंकणांत आली म्हणूनच कीं काय, रावसाहेबांच्या वडिलांना विशेष रीतीनें ईश्वर-सेवा करण्याची जरूरी वाटून, त्यांनीं ती सेवा दानधर्मरूपानें केली. सन १८७६–७७ सालीं महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला होता, त्यावेळीं आठ-नऊ महिनेपर्यंत हजार–बाराशें दुष्काळपीडित लोकांना जेवावयास घालून त्यांचे प्राण वांचविले. शिवाय, त्यांनीं बऱ्याच ठिकाणीं धर्मशाळा बांधिल्या व अस्पर्श्य लोकांसाठीं एक शाळागृह दिलें.

वडिलांच्या ह्या पुण्याईनें म्हणा अगर ईश्वरी संकेतानें म्हणा, वडील आटोपल्यानंतर श्रीयुत **गोपाळराव पाणंदीकर** पेन्शनर डेप्युटी एज्युकेशनल् इन्स्पेक्टर यांनीं त्यांना आश्रय दिला. श्री० पाणंदीकर हे त्यावेळीं सावंतवाडी

हायस्कूलचे हेड्मास्तर होते; आणि त्यांनींही जात-गोत ह्यांकडे लक्ष न देतां मोठ्या उदार अंतःकरणानें रावसाहेब यांस आपल्या घरीं ठेवून घेऊन मॅट्रिक-पर्यंतचा अभ्यास पुरा करवून घेतला. ह्या अवधींतला त्यांचा शिक्षणाचा काळ फार महत्त्वाचा झाला; व त्याचाच परिणाम रावसाहेबांच्या पुढील विद्याव्यासंगावर झाला. इंग्रजी भाषेसंबंधानें रावसाहेबांचा जो कांहीं थोडाबहुत लौकिक आहे, त्याचें सर्व श्रेय श्री० पाणंदीकर यांनाच दिलें पाहिजे. कोणत्याही प्रश्नाचा मार्मिक रीतीनें निरीक्षण करण्याचा गुण व त्याचा सर्व बाजूंनीं अभ्यास करण्याची त्यांची हातोटी, हातांत घेतलेल्या विषयावर अव्याहत श्रम करण्याची संवय, वगैरे विद्याव्यासंगास पोषक अशा गुणांचा मूळ पाया श्री० पाणंदीकर यांनींच घालून दिला.

मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यानंतर मेडिकल कॉलेजचा कोर्स यशस्वी रीतीनें पुरा झाल्यावर मुंबई येथें खाजगी दवाखाना काढून, त्यांनीं शवत्त्यनुसार लोक-सेवेला वाहून घेतलें आहे. पहिल्या प्लेगच्या वेळीं त्यांनीं दोन-तीन प्लेग-हॉस्पिटल्स् सतत दोन वर्षें कांहींएक न घेतां स्वतांचें नुकसान करून घेऊन चालविलीं होतीं. प्लेगचें उग्र स्वरूप थंड झाल्यावर वर्तमानपत्रांतून लेख वगैरे लिहिण्याला सुरुवात झाली. 'अँथ्रोपॉलॉजिकल सोसायटी'शीं रावसाहेबांचा निकट संबंध आज पंचवीस वर्षांचा आहे. त्या सोसायटीचे ते ३।४ वर्षें व्हाइस प्रेसि-डेन्टही होते. हल्लीं सात-आठ वर्षें कोंकणी भाषा व तत्संबंधीं पोटविषय यांवर त्यांचा दांडगा व्यासंग सुरू आहे.या विषयांवर त्यांनीं बरींच व्याख्यानें दिलीं आहेत. मुंबईंतील सर्व इंग्लिश दैनिकांनीं व इतर कांहीं वर्तमानपत्रांनीं त्यांच्या कोंकणी भाषेच्या पुस्तकावर बरेच प्रशंसापर उद्गार काढले आहेत. आणि त्या पुस्तकाचें मल्याळम् भाषेंत भाषांतर झालें असून कानडींतही होण्याचा संभव आहे. सासून मेकयानिक्स इन्स्टिटयूटचे त्यावेळचे प्रेसिडेन्ट **मि० गायडर** सी० आय० ई० यांनीं सदर इन्स्टिटयूटचे मार्फत रावसाहेब **डॉक्टर चव्हाण** यांस एक गोल्ड् मेडल् दिलें आहे. ह्या गोल्ड मेडलवर "For Literary activities" असे शब्द लिहून सदर इन्स्टिटयूटनें रावसाहेबांचा मोठा गौरव केला आहे. "कोंकणी भाषेंतील म्हणी" हें त्यांचें दुसरें एक पुस्तक सध्यां छापत आहे. वयाकडे पाहतां त्यांचा दीर्घोद्योग व सतत परिश्रम करण्याची हातोटी हीं केवळ अवर्णनीय आहेत.

---

## ५५. वामन रघुनाथ वर्दे वालावलीकार.


यांचा जन्म २३ जून १८७७ रोजीं गोमांतकांत 'डिचोली' या गांवीं झाला. यांचें प्राथमिक शिक्षण कोंकणी व पोर्तुगेज भाषेंत झालें. पुढे इंग्रजी मॅट्रिकची परीक्षा पास होऊन, मराठी व गुजराथींही ते शिकले. त्याचप्रमाणें संस्कृत व लॅटिन् ह्या भाषांचाही त्यांनीं अभ्यास केला. त्यांनीं कोंकणी भाषेंत (१) गोंयकाराचो मुंबैकार, (२) मोगाचें लग्न, व (३) शेक्सपियराच्या खेळांची माळ, इ० ग्रंथ लिहिले आहेत. त्याचप्रमाणें त्याच भाषेंत स्वयंसेवक (फोंडें), 'हिंदु' (मडगांव), व महाराष्ट्र–सारस्वत (मुंबई), यांत यांचे खालीलप्रमाणें लेख प्रसिद्ध झालेले आहेतः—(१) वासशणैली पोपाय, (२) म्हजी बा खैं गेली ? (३) गोंयची अवै–भास, (४) गोंयची बुद्धी, इ०. इंडियन अँटिक्वेरी, नवयुग, व विविधज्ञानविस्तार यांपैकीं पहिल्यांत त्यांचे इंग्रजी लेख व बाकीच्या दोहोंत त्यांचे मराठी लेख प्रसिद्ध झाले आहेत. 'विस्तारां'त त्यांचे कोंकणी–मराठी भाषेबद्दल लेख " **शणै गोंयबाब** " ह्या टोपण नांवानें प्रसिद्ध झाले आहेत. यांच्या पत्रांतील भाषेवरून ते अत्यन्त नम्र व आपलें चरित्र आणि फोटो प्रसिद्ध करण्यास नाखूष दिसतात. मोठ्या मिनतवारीनें त्यांनीं दिलेल्या टिपणाचा उपयोग करून वरील मजकूर लिहिला–आहे.

---

## ५६. पांडुरंग वामन काणे.

यांचा जन्म क्षेत्र परशुराम येथें ७ मे १८८० रोजीं त्यांच्या आजोळीं झाला. वडील दापोली येथें वकील होते. तेथेंच **पांडुरंगपंतांचे** मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण झालें. सन १८९७ त ते मॅट्रिक पास झाले. पुढें मुंबईस वुइल्सन् कॉलेजांत त्यांचें उच्च शिक्षण होऊन, ते १९०१ मध्यें बी० ए० व १९०३ मध्यें एम्० ए० झाले. प्रीव्हिअसपासून बी० ए० पर्यंतच्या युनिव्हर्सिटींतील सर्व संस्कृतच्या स्कॉलर्शिपा यांनीं मिळविल्या होत्या. बी० ए० झाल्यावर ते दोन वर्षे विल्सन् कॉलेजांतच फेलो होते. एम्० ए० मध्यें त्यांना " झाला वेदान्त प्राईज " मिळालें.

यांचे त्यावेळीं प्रतिस्पर्धी कै० प्रो० वाटे एम्० ए० हे होते. त्यांस संस्कृतांत पहिले आल्याबद्दल " भगवानदास स्कॉलर्शिप् " मिळाली; व संस्कृतांत निबंध लिहून, वेदान्तांत पहिलें आल्याबद्दल **काणे** यांना वरील प्राईज मिळालें होतें.



पांडुरंग वामन काणे.

पुढें १९०५ मध्यें ' भारत—रामायण—कालीन समाजस्थिति' हा निबन्ध यांनीं इंग्रजींत लिहिला; त्याबद्दल त्यांस व्ही० एन्० मंडलीक प्राईज व १९०६ मध्यें 'अलंकारशास्त्राचा इतिहास' हा निबन्ध लिहिल्याबद्दल त्यांस व्ही० एन्० मंडलीक गोल्ड मेडल मिळालें. १९१३ मध्यें यांनीं भाषाशास्त्रावर "वुइल्सन फायलालॉजिकल लेक्चर्स " दिलीं. नंतर १९१५।१६ सालीं (Sprinjir) स्प्रिंजर रिसर्च स्कॉलर होते. त्यावेळीं त्यांनीं " महाराष्ट्र व कोंकण " यांच्या प्राचीन भूगोलासंबंधीं संशोधन केलें. याप्रमाणें यांचा मुंबई युनिव्हर्सिटींतील यशस्वी शैक्षणिक कार्यक्रम झाला.

हल्लीं १५ वर्षे ते मुंबई युनिव्हर्सिटींत ' Faculty of Arts ' चे सभासद आहेत; व तितकींच वर्षे संस्कृत बोर्डाचेही सभासद आहेत. तसेंच हल्लीं ते मराठी बोर्डाचेही चेअरमन् असून, सुमारें ७ वर्षे लोकांकडून निवडून आलेले ' फेलो ' आहेत याशिवाय युनिव्हर्सिटीच्या पोस्टग्रॅज्युएटच्या बोर्डाचेही हे सभासद आहेत.

हे १९०४ मध्यें प्रथम रत्नागिरीच्या हायस्कुलांत शिक्षक म्हणून राहिले. नंतर १९०७ मध्यें मुंबईस एल्फिन्स्टन् हायस्कूलमध्ये आले. १९०९ मध्यें कांहीं दिवस एल्फिन्स्टन् कॉलेजांत प्रोफेसर होते. नंतर १९१३ मध्यें शाळाखात्यांतील सरकारी नोकरीचा त्यांनीं राजिनामा दिला. १९०८ मध्येंच ते एल्० एल्० बी० पास झाले होते; व १९१२ मध्यें ' Hindu and Mahamedan law ' हा विषय घेऊन त्यांनीं युनिव्हर्सिटींतील कायद्यांची अत्युच्च परीक्षा L. L. M. ही दिलीच होती; ह्यामुळें सरकारी नोकरी सुटल्यानंतर त्यांनीं एकदम वकिली सुरू केली. त्यांनीं १९१३ पासून सुमारें ८ वर्षे लॉ क्लास काढून तो चालविला; व मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजात सुमारे सहा वर्षे प्रोफेसरचें काम केलें.

१९१० पासून हे मुंबई युनिव्हर्सिटी, अलाहाबाद युनिव्हर्सिटी, बनारसची हिंदु युनिव्हर्सिटी व उस्मानिया युनिव्हर्सिटी, यांत संस्कृतचे परीक्षक आहेत. यांचे "इंडियन् अँटिक्वेरी, भाण्डारकर रिसर्च इन्स्टिटयूट व बॉबे एशियाटिक सोसायटी, यांच्या मासिकांतून व विविधज्ञानविस्तारांतून बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत; त्यांची ग्रंथरचनाही पुष्कळच आहे; ती खालीलप्रमाणें:—

( १ ) साहित्यदर्पण, ( २ ) संस्कृतचा इतिहास, ( ३ ) बाणकृत कादम्बरी, ( ४ ) हर्षचरित, ( ५ ) उत्तररामचरित, ( ६ ) सांख्यप्रणीत धर्मशास्त्र, ( ७ ) व्यवहारमयूख, ( ८ ) पूर्वमीमांसेचा अल्प परिचय, ( ९ ) हिंदु कायद्या-संबंधीं वैदिक उतारे, ( १० ) महाराष्ट्राचा प्राचीन भूगोल. इ०. ह्यांशिवाय " धर्मशास्त्राचा इतिहास " ह्या नांवाचा एक प्रचंड ग्रंथ ते लिहीत आहेत.

यांची सार्वजनिक कामगिरीही बरीच आहे. मुंबईच्या ब्राह्मणांच्या शंकर-वाडीस ८० हजार रुपये उभे करून जागा मिळवून देण्याच्या कामीं ह्यांनीं अति-शय खटपट केली आहे. त्याचप्रमाणें **कै० डॉ० वेलणकर** ह्यांचे बरोबर काम करून ब्राह्मणांसाठीं माटुंगा येथें तीन चाळी उभारण्यांतही यांनीं बराच भाग घेतला आहे. मुंबईच्या 'रॉयल एशियाटिक सोसायटी'चे हे तहाहयात सभासद, फेलो व व्यवस्थापक-मंडळांतील एक आहेत. त्याचप्रमाणें मुंबईच्या " मराठी ग्रंथसंग्रहालया "च्या व्यवस्थापक-मंडळांतही ते आहेत.

यांनीं कृपा करून दिलेली माहिती वर घेतली आहे.

---

## ५७. गोविंद कृष्ण मोडक.

यांनीं व्याकरण-विषयावर अधिकारयुक्त पुष्कळच लेख लिहिले आहेत. हे पुणें येथें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें संस्कृताचे प्रधानाध्यापक आहेत. यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यांत नागोठण्याजवळ भोर संस्थानांत **पाली** येथें सन १८७९मध्यें झाला. मराठी शिक्षण येथेंच झालें. नंतर इंग्रजी शाळेंतील अभ्यास नाशकास झाला. पुढें मॅट्रिकच्या परीक्षेंत यांस पहिली संस्कृत स्कॉलरशिप् मिळाली होती; परंतु येथ-पासून त्यांचे अभ्यासक्रमास, प्रकृतीचे अस्वास्थ्यामुळें, उतरती कळा लागली.

अशाच स्थितींत त्यांनीं प्रीव्हियस् व इंटरमीजिअट् या दोन परीक्षा दिल्या; व त्यांत ते सेकंड् क्लासमध्यें पास झाले. त्याचप्रमाणे युरोपियन लोकांस शिकविण्याकरितां काढलेली **पंडित-परीक्षा**ही हे पास झाले आहेत. नंतर ह्यांनीं प्रथम नूतन मराठी विद्यालयांत व पुढे आजतागायत न्यू इंग्लिश स्कूलमध्यें संस्कृत शिक्षकाचें काम केलें आहे यांच्या अध्यापनांतील विशेष म्हणजे यांची विषयाचे मूळाशीं जाण्याची प्रवृत्ति. अलीकडे व्याकरण-विषयाचे बाबतींत तत्त्वान्वेषी प्रवृत्तीचें बीज अध्यापनांत जरी व्हावें तसें होत नसले, तरी तें इतरत्र निदर्शनास आल्यावांचून राहात नाहीं. व्याकरण-विषयांतील शंका शाळेंतील इंग्रजी, मराठी व संस्कृत या भाषांचे शिक्षक ह्यांनाच विचारून समाधान करून घेतात. अर्थात् व्याकरण-विषयच असा आहे कीं, तो एका भाषेसंबंधीं चांगला साध्य असला म्हणजे वाटेल त्या भाषेच्या स्पष्टीकरणास लावितां येतो. या व्याकरण-विषयाची आवड यांस मराठी शाळेपासूनच आहे.



याचप्रमाणें अर्थापनांतही ह्यांची बरीच गति आहे. पुणे येथील मयूर-मंडळाचे चर्चेत रा० रा० **शिवराम महादेव परांजपे**, रा० रा० **जनार्दन सखाराम करंदीकर**, यांचे बरोबर हेही प्रमुखत्वानें भाग घेतात. व्युत्पत्तिशास्त्रांत ह्यांचा व्यासंग विशेषच आढळून येतो. यासंबंधीं त्यांचे लेख विविधज्ञानविस्तार वगैरे मासिकांत वेळोवेळीं प्रसिद्ध झाले आहेत. व्याकरण-विषयावरील यांचे लेख ज्ञानप्रकाशांतही बरेच वेळां आलेले आहेत. गेल्या मे महिन्यांत (१९२५) पुणें येथें भरलेल्या

**गोविंद कृष्ण मोडक.**

शारदोपासकसंमेलनांत ‘ **द्वितीयालोप** ’ ह्या नांवाचा व्याकरण-विषयक एक उत्कृष्ट निबंध त्यांनीं वाचिला होता. ‘ **मोरोपंती शुद्धलेखन**’ हा नुकताच (आक्टोबर १९२५ च्या) विविधज्ञानविस्तारांत आलेला त्यांचा लेख विद्वत्ताप्रचुर आहे. संस्कृत भाषेचा व व्याकरणाचा यांचा परिचय सूक्ष्म असल्यानें, मराठी व्याकरणावरील ह्यांचे निबंध अधिकारयुक्त असेच आहेत.

एकादा विषय हातीं घेतला म्हणजे त्याला सर्वस्त्रीं वाहून घेणें, हा ह्यांचे स्वभावांतील विशेष होय. ह्यामुळें घेतलेला विषय उत्तम प्रकारें यांना आत्मसात् करितां येतो. घशाच्या कांहीं विकारामुळें यांस फार बोलवत नाहीं व

स्वभावतः हे एकान्तिक असल्यानें, विशेष परिचिताशिवाय इतरांस यांची योग्यता दिसून येत नाहीं: आणि म्हणून ह्यांच्या विद्वत्तेचें जसें चीज व्हावें तसें विद्वन्मंडळांतही झालेलें दिसत नाहीं; पण अंगीकृत कार्याची अत्यन्त उपासना, हा गुण यांचेपासून कोणींही घेण्यासारखा आहे.

**गोविन्द शंकरशास्त्री बापट** यांचें व्युत्पत्तिप्रदीप यांनीं संशोधिलें आहे, व त्याची नुकतीच नवीन आवृत्ति निघाली आहे; हा उल्लेख बापटशास्त्रीबोवांच्या चरित्रांत यांच्याविषयीं आलाच आहे. त्यांनीं त्या पुस्तकांत खालील विशिष्ट संशोधन केलेलें आढळून येतें:—

( १ ) प्रभव व तद्भव शब्दांची विशिष्ट क्रमानें रचना, ( २ ) ताद्धितसिद्धीचें स्वतंत्र प्रकरण, ( ३ ) यवनी शब्दांची व कानडी शब्दांची सार्थ यादी, ( ४ ) कांहीं शब्दांची नवीन शोधांनीं ग्राह्य ठरलेली व्युत्पत्ति, हे व ह्यांशिवाय आणखी बऱ्याच गोष्टी.

---

## ५८. प्रा० कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी.

गुदस्तां प्रसिद्ध झालेल्या " भाषाशास्त्र व मराठी भाषा " ह्या पुस्तकाचे हे कर्ते आहेत. यांनीं स्वतःच लिहून दिलेलें यांचें चरित्र खालीलप्रमाणें आहे:—

ह्यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत इस्लामपूर येथें जानेवारी १८९३ मध्यें झाला. तेथें त्यांचें मराठी शिक्षण पुरें झाल्यानंतर इंग्रजी शिकण्याचा कांहीं योग त्यांना दिसेना. घरची गरीबी असल्यामुळें, स्वतांच्या आपल्या जबाबदारीवर त्यांना इंग्रजी शिक्षणास हात घालतां येईना. ह्याच वेळेस त्यांच्या मातुःश्री निवर्तल्या. ह्यामुळें त्यांना त्यांचे मातुल रा० **रामराव निगडीकर** ह्यांचा आश्रय करावा लागला त्यांनीं त्यांच्या तीन इयत्ता घरींच करून, त्यांस एकदमच चौथ्या इयत्तेंत घातलें. पुढें ते मॅट्रिक्युलेशन् पास झाल्यावर पुढचें शिक्षण कसें मिळणार ही अडचण आपोआपच दूर झाली. ह्या परीक्षेंत त्यांचा सातवा नंबर येऊन, मुंबई विश्वविद्यालयांतील जेकब शिष्यवृत्ति आणि राजाराम हायस्कूल व कॉलेज-मधील दोन शिष्यवृत्त्या मिळून त्यांना दरमहा एकंदर ४५ रु० मिळूं लागले.

पुढें फर्ग्यूसन् कॉलेजमध्यें येऊन, त्यावेळीं नुकतेच जर्मनीहून आलेले **डॉ० गुणे** ह्यांचा फायदा घेण्यासाठीं त्यांच्या देखरेखीखालीं बी० ए० संस्कृत ऑनर्सचा यांनीं अभ्यास केला. ह्याच वेळीं त्यांना व्याकरण व भाषाशास्त्र ह्या विषयांची गोडी लागली. **डॉ० गुणे** ह्यांची ह्या विषयासंबंधीं शिकवण चांगली असल्यामुळें त्या अभ्यासांत त्यांची जास्त प्रगति होऊं लागली.

पुढें व्यवसायानिमित्त त्यांना पुणें शहर सोडून धुळें येथें जावें लागलें, तेथें कांहीं लेखाच्या निमित्तानें संशोधनाचार्य **राजवाडे** ह्यांच्याशीं रा० **कुळकर्णी** ह्यांचा संबंध आला. रा० **राजवाडे** ह्यांनीं त्यांच्याकडून पाणिनीच्या अष्टाध्यायींतील व पतंजलीच्या महाभाष्यांतील कांहीं भाग, काव्यप्रकाश व युरोपियन् पंडितांचीं भाषाशास्त्रावरील पुस्तकें वाचून घेतलीं. अशा रीतीनें **राजवाडे** ह्यांनीं त्यांना भाषाशास्त्राची योग्यदीक्षा दिली. पुढें कांहीं दिवसांनीं **राजवाडे** व **कुळकर्णी** ह्यांनीं मराठींतील साधारणपणें दोन



**प्रो० कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी.**

हजार शब्दांची भाषाशास्त्रीय व्युत्पत्ति कायम केली; व एका पुस्तकाचा खर्डा (ह० ले०) तयार केला; तो अद्यापि साधनाभावी अप्रकाशित स्थितींत आहे.

मध्येंच **रा० कुळकर्णी** ह्यांची अमदाबाद येथील गुजराथ कॉलेजमध्यें संस्कृत अध्यापक म्हणून नेमणूक झाली. गुजराथमध्यें असतांना ह्यांनीं गुजराथी, पाली, प्राकृत, विशेषतः अर्धमागधी, ह्या भाषांचा अभ्यास केला. हे कॉलेजमध्यें मुलांना संस्कृत व अर्धमागधी शिकवीत असत. तेथें असतांना मराठी काव्य व व्युत्पत्तीसंबंधीं यांनीं बरेच लेख लिहिले. महाराष्ट्र–साहित्य–परिषदेच्या बडोद्याच्या संमेलनप्रसंगीं त्यांनीं "मराठींतील स्वरप्रक्रिया" हा शास्त्रीय निबंध वाचला. निबंधांतील शास्त्रीय विचारसरणीची संमेलनाच्या चालकांनीं बरीच वाखाणणी केली. ह्याशिवाय मराठींतील 'कार' प्रत्यय, मराठीं-

तील द्विवचन, मराठी लिपीची व्युत्पत्ति, **नामदेव** एक कीं दोन, वगैरे ह्यांचे निबंध प्रसिद्ध झाले आहेत.

ह्यांचें मुख्य पुस्तक म्हणजे " **भाषाशास्त्र व मराठी भाषा** " हें होय. ह्यामध्यें पौर्वात्य व पाश्चिमात्य अशा दोन्ही देशांतील भाषाशास्त्रीय प्रयत्नांची छाननी करून त्यांचें आपल्या इकडील प्रयत्नांशीं साम्य दाखविलें आहे. भाषाशास्त्रीय उपपत्ति प्रथम देऊन, त्या उपपत्तीचे नियम मराठी भाषेला लाविले आहेत. जातां जातां आजपर्यंत झालेल्या संशोधनाच्या आधारावर त्यांनीं मराठी भाषेचा उत्पत्तिकाल ठरविला आहे. शेवटच्या प्रकरणांत मराठी व्याकरणांतील ल-कार, लिङ्गप्रक्रिया, विभक्ति-सामान्यरूप, वगैरे प्रकारांची तपासणी करून, पाली, प्राकृत, विशेषतः अपभ्रंश भाषेच्या सहाय्यानें मधलि दुवे दाखवून संस्कृत भाषेशीं मूळ साधलें आहे. मराठीच्या संस्करण व शुद्धलेखनाविषयींच्या अशास्त्रीय भ्रामक समजुती ह्या विवेचनानें चांगल्या नाहींशा होतील, असें त्यांचें म्हणणें आहे. हें पुस्तक मुंबई विश्वविद्यालयानें बी० ए०च्या अभ्यासक्रमांत निविष्ट केलें आहे; व बऱ्याच विद्वान् गृहस्थांनीं प्रशंसापर उद्गार काढिले आहेत.

ह्यांचे भाषाशास्त्रीय प्रयत्न अद्यापि पुढें चालूच आहेत. " भारतीय जुनें शिक्षणशास्त्र, पद्धति व संस्था " हेंही एक पुस्तक इंग्रजीमध्यें त्यांचें लिहून झालें आहे. त्याचप्रमाणें " नाट्यशास्त्र आणि संस्कृत मराठी नाटककार व त्यांचें कल्पनाप्रागल्भ्य व रचनाप्रागल्भ्य " ह्या विषयावरही एक पुस्तक ह्यांनीं लिहिलें आहे; पण तें अप्रसिद्ध आहे.

---

## ५९. नामदार यादव माधव काळे.

" किर्लोस्कर खबर " या मासिकांत सप्टेंबर १९२६ च्या अंकांत यांची माहिती आली आहे, तिचा सारांश खालीं दिला आहे.

यांचा जन्म सन १८७९ मध्यें वऱ्हाडांत **लोणार** येथें झाला. यांचें मूळ घराणें भिक्षुकांचें. यांच्या आईनें मुलाला खांद्यावर पडशी टाकून देणार नाहीं, अशा ईर्षेनें, जवळचें किडूक-मिडूक विकून मेहेकर येथें शिक्षणासाठीं पाठविलें. तेथें त्यांचें इंग्रजी ५ वी पर्यंत शिक्षण झालें. कांहीं दिवस तेथील नाझर तुकाराम-

पंत देशपांडे हे यादवरावांच्या वडिलांचे स्नेही होते, म्हणून त्यांजकडे त्यांची सोय लागली; पण लौकरच देशपांडे यांची बदली झाल्यामुळे यादवरावांना पुनः पंचाईत पडली. आईनें दिलेले पैसेही संपले; व ३।४ दिवस तर त्यांस नुसतें डाळें खाऊन काढावे लागले. पुढें त्यांना एक उपाय सुचला. त्यावेळीं वऱ्हाडांत व्हर्नाक्युलर स्कॉलरशिपची मराठी विषयाची परीक्षा असे. तींत पहिल्या व दुसऱ्या नंबराच्या विद्यार्थ्यांना दरमहा १० रुपयांच्या स्कॉलरशिपा मिळत. ती परीक्षा देण्याचें त्यांनी ठरवून, अवघे २ महिने असतां मनस्वी परिश्रम करून, ते परीक्षेस बसले; आणि त्यांचा त्या परीक्षेंत दुसरा नंबर येऊन, त्यांस स्कॉलरशिप् मिळाली. ह्याप्रमाणें स्वतःच्या हिमतीवर ते अभ्यास करून मॅट्रिक पास झाले.



ना० यादवराव काळे.

यानंतर त्यांना नोकरी करणें भाग पडले; व प्रथम १५ रु० वर शाळाखात्यांत ते लागले. त्यावेळीं अलाहाबाद युनिव्हर्सिटींत, टर्म्स न भरितां. बसण्याची मोकळीक असल्यानें, ते घरींच अभ्यास करून बी० ए० व एल्० एल्० बी० ही झाले. नंतर प्रथम त्यांनीं १९१० पासून मेहेकर येथें वकिली सुरू केली; परंतु त्या कोर्टाचा अधिकार कमी झाल्यानें, **यादवराव** हे अकोल्यास वकिली करूं लागले; आणि झपाट्यानें चांगल्या लौकिकास चढले.

ह्यांची वाङ्मयाविषयक कामगिरी म्हणजे बखरी, इतिहास, पुराणें ह्यांच्या आधारावर त्यांनीं "**लोणारवर्णन**" नांवाचें पुस्तक लिहिलें. त्यांनीं "**वऱ्हाडच्या इतिहास**" हें एक ऐतिहासिक माहितीनें भरपूर असें पुस्तक लिहिलें आहे; त्यायोगें इतिहास-संशोधक म्हणून त्यांची प्रसिद्धि झाली-आहे. वऱ्हाडला पूर्वेतिहास नाहीं, ही समजूत त्यांनीं ह्या पुस्तकाच्या द्वारें चांगली खोडून काढली. याशिवाय 'कळंब' येथील शिलालेखाचा अर्थ, 'वाशीम' चे राजे उदा-

राम ह्यांच्या घराण्यांतील शूर स्त्री “ राजव्याघ्री ऊर्फ रायवागीण ” हिच्या-संबंधीं माहिती, मालोजीच्या मृत्यूसंबंधीं निबंध, इत्यादिकांवर संशोधनात्मक दृष्टीनें लिहिलें आहे. हल्लीं गोंडांचा व नागपूरकर भोसल्यांचा इतिहास लिहिण्याच्या खटाटोपांत ते आहेत.

हे वऱ्हाडांत अनेक चळवळींत पुढाकार घेणारे असून, नागपूरच्या कायदे-कौन्सिलमध्यें यंदा ते प्रतिसहकार-पक्षातर्फे निवडून आले आहेत; इतकेंच नव्हे, तर त्या कौन्सिलाचे ते अध्यक्षही झाले आहेत; इतकी लोकप्रियता त्यांनीं संपादिली आहे. “वऱ्हाड शालापत्रका”च्या ज्युबिलीच्या अंकांत “ वऱ्हाडांतील मराठी भाषेचें स्वरूप ” हा उत्कृष्ट लेख आला आहे; त्यामुळें व वऱ्हाडांतील जाडे संशोधक या नात्यानें त्यांचें चरित्र येथें दाखल केलें आहे.

---

## ६०. कविभूषण बळवंत गणेश खापर्डे.

**श्री० खापर्डे** ह्यांचे घराणें मूळचें निजामशाहींतील इंगोलीचें असून वऱ्हाडांत ते वाशीम येथें प्रथम रहावयास आले. मागें इतिहास उपलब्ध आहे तों-पर्यंत ह्यांचे पूर्वज फार श्रीमंत सावकार होते, असा दाखला सांपडतो. ह्यांच्या पणजोबांच्या म्हणजे **नरहर नाइकांच्या** आकस्मिक निधनानंतर घरचें पहावयास कोणीहि नसल्यानें आलेली अत्यंत हलाखीची स्थिति ह्यांचे आजोबा **श्रीकृष्ण नरहर** ऊर्फ **बापूसाहेब** ह्यांनीं आपल्या पिढींत आपल्या कर्तबगारीनेंच घालविली. **श्री० बापूसाहेब** ह्यांस उर्दू, फारशी, संस्कृत,व इंग्लिश, ह्या भाषांचें ज्ञान चांगलें असून, वैद्यक व ज्योतिष ह्या शास्त्रांची उत्तम माहिती होती. ते आपल्या तरुणपणीं इ० सन १८५७ सालच्या स्वातंत्र्य-युद्धाचे वेळीं समरभूमीवर होते. ते अव्वल इंग्रजींत अगदीं लहान दर्जापासून एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या हुद्यापर्यंत चढले. **श्री० बापूसाहेबांचे** कनिष्ठ चिरंजीव **भारतरत्न नामदार श्रीमंत गणेश श्रीकृष्ण** ऊर्फ **दादासाहेब खापर्डे**, हे होत. ह्यांचें नांव सर्वत्र महशूरच आहे व त्यांचें चरित्र सर्वांचे समोरच आहे. **श्री० बळवंतरावजी** ( ऊर्फ ) **आण्णासाहेब** हे **ना० श्री० दादासाहेब खापर्डे**, ह्यांचे सर्वांत कनिष्ठ म्हणजे तिसरे चिरंजीव होत. ह्यांचा

जन्म वऱ्हाडांत इलिचपूर कँप [ परतवाडा ] येथें ता० ६ नोव्हेंबर सन १८९० इ० रोजीं झाला. ह्यांचें मॅट्रिकपर्यंतचें सर्व शिक्षण उमरावती येथेंच झालें. लोकमान्यांची चतुःसूत्री निर्माण झाली त्याच वेळीं, इ० सन १९०६ सालीं, तिला अनुसरून इंग्रजी चवथ्या इयत्तेपासून सरकारी शाळा सोडून राष्ट्रीय शाळेंतच त्यांनीं शिक्षण घेतलें; व ते 'बंगाल–काउन्सिल–ऑफ एज्युकेशन्'चे मॅट्रिक झाले; पण ह्यामुळेंच त्यांस पुढें सरकारी कॉलेजांत वगैरे जातां आलें नाहीं. म्हणून कलकत्याच्या नॅशनल मेडिकल कॉलेजांत ते गेले, व दोन–अडीच वर्षें त्यांनीं तेथें अभ्यास केला; पण मुळींच कलकत्याची हवा मानवेना म्हणून त्यांना तो अभ्यासहि सोडून द्यावा लागला; आणि सरकारी शिक्षणांतील कोणताहि मार्ग त्यांना मोकळा



कविभूषण व० ग० खापर्डे

नव्हताच; म्हणून एक–दोन वर्षें स्वतःची प्रकृति सुधारून घेण्यांत खर्च केल्यावर ते इसवी सन १९१५ सालीं कांहीं दिवस मुंबईच्या एका दैनिकांत, व त्यानंतर सन १९१६ मध्यें पुण्यास 'केसरी' ऑफिसांत वर्तमान–पत्राच्या कामाची माहिती घेण्याकरितां राहिले होते. ह्यापुढें निवांतपणें दोन–तीन वर्षें वाचनांत व अध्ययनांत घालविल्यावर इसवी सन १९१९ सालीं त्यांनीं उमरावती येथें 'अरुण' नांवाचा स्वतःचा छापखाना काढला, व पाठोपाठ इसवी सन १९२० च्या जानेवारींत 'उदय' नांवाचें टिळक पक्षीय मराठी साप्ताहिकहि सुरू केलें. गेलीं सुमारें सात वर्षें हें पत्र तेच चालवीत आहेत. ह्यांस लहानपणापासून काव्य, तत्त्वज्ञान, व मानसशास्त्र, ह्यांची आवड असून इसवी सन १९०९ पासून, ते कविता करूं लागले; व मराठी–थिऑसॉफिकल् फेडरेशन्‌तर्फे पुण्यास निघणाऱ्या 'धर्म–जागृति' मासिकांत इसवी सन १९१३

त त्यांची कविता प्रसिद्ध होऊं लागली. त्यानंतर वेगळाल्या मासिकांमधून त्यांचे लेख व त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेंच अनेक काव्य-संग्रहकारांनीं आपआपल्या संग्रह-ग्रंथांत त्यांची कविता आतां घेतलेली आहे. **श्री० व० ग० खापर्डे**, त्यांची ' काव्य-कांतार, प्रथम खंड '; 'काव्य-कांतारांतील फुलें ', व ' सर्वस्वाची गद्यगाणीं ': ह्या नांवांचीं तीन पुस्तकें छापून प्रसिद्धही झालीं आहेत. ह्याशिवाय आणखी बरेंचसें अप्रकाशित लेखन आहे. त्यांची कविता ऐकून व प्रसन्न होऊन श्रीमत्जगद्गुरु श्रीशंकराचार्य, करवीर-संकेश्वरपीठ, **डॉ० कुर्तकोटी**: ह्यांनीं ' कवि-भूषण ' ही पदवी सन १९२२ सालीं त्यांस दिली. काव्यविषयावर व इतर कांहीं विषयांवर ह्यांचे विचार त्यांच्या स्वतःच्या पुस्तकांच्या प्रस्तावनेंत, व इतरांच्या पुस्तकांस त्यांनी लिहून दिलेल्या प्रस्तावनांत, व्यक्त झाले असले, तरी त्यांचा 'वऱ्हाड शालापत्रका'च्या ज्युबिलीच्या अंकांत "**मराठी भाषेची लेखनशुद्धि**" हा व्याकरणविषयक आलेला लेख अतिशय महत्त्वाचा व मननीय असल्यानें त्यांचें चरित्र येथें घेतलें आहे.

---

## ६१. प्रो० वामन मल्हार जोशी.



यांचा जन्म माणगांव तालुक्यांत ( जि० कुलाबा) तळें येथें त्यांच्या आजोळीं झाला. त्यांचें मूळ गांव, त्याच तालुक्यांतील **गोरेगांव** हें होय. तेथें प्राथमिक शिक्षण झालें. त्यानंतर ते पुण्यास आले; व ' न्यू प्रिपरेटरी क्लासेस ' मध्यें त्यांचें इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झालें. त्यांच्या वेळीं **शंकर गणेश लवाटे, सदाशिव श्रीधर करंदीकर, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर**, इ० मंडळी तेथें शिक्षक होती; त्यांच्या शीलसंवर्धक अशा अध्यापनाचा यांस लाभ मिळाला. नंतर त्यांचे बंधु प्रसिद्ध संस्कृत स्कॉलर प्रो० **महादेव मल्हार जोशी**, यांस नगरच्या हायस्कूलमध्यें हेडमास्तरची जागा मिळाल्यामुळें, **वामनराव** हे पुढील शिक्षणासाठीं नगरास आपल्या बंधूकडे गेले; व त्या हायस्कूलमधून ते सन १९०० मध्यें मॅट्रिक पास झाले. नंतर ते पुढील शिक्षणासाठीं पुण्यास डेक्कन्

कॉलेजमध्यें राहिले. त्या ठिकाणीं त्यांस दरवर्षी वरच्या नंबराच्या स्कॉलरशिप्स् मिळत. सेकंड् क्लासमध्यें पास होत होत, ते १९०४ मध्यें बी० ए० झाले; व लगेच त्यांस त्या कॉलेजमध्यें ( डेक्कन् कॉलेज् ) 'दक्षिणा फेलोशिप्' मिळाली. १९०६ मध्यें तें एम्० ए० झाले; व १९०७ च्या जूनमध्यें कोल्हापुरास **प्रो० विष्णु गोविंद विजापूरकर** त्यांनीं काढिलेल्या '**समर्थ-विद्यालया**'स जाऊन मिळाले; आणि त्याचे ते आजन्म सेवकही झाले. पुढें समर्थ-विद्यालय तळेगांवास आल्यावर, त्यांनीं 'विश्ववृत्त' नांवाच्या मासिकाचें सहसंपादकत्व पत्करिलें. १९०८ च्या ऑगस्टमध्यें कोल्हापुरास 'विश्ववृत्ता'वर खटला भरण्यांत आला; त्यावेळीं **प्रो० विजापूरकर** यांस ३ वर्षे साधी कैद व **वामनराव जोशी** यांस ३ वर्षे सक्त मजुरीची कैद, याप्रमाणें शिक्षा झाल्या. १९११ त सुटून आल्यानंतर त्यांनीं एक वर्षपर्यंत एक इंग्रजी शब्दांचा मराठींत व इंग्रजींत अर्थ देणारा असा कोश करण्याचे कामीं, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचे **एस्० व्ही० वझे** यांस साहाय्य केलें. त्यांतील ३।४ अक्षरें छापून झालीं; पण पुढील भाग तसाच राहिला. कोल्हापुरास कैदेंत असतांना महाराजांच्या ( शाहू छत्रपति ) सांगण्यावरून **वामनरावांनीं** "दशकुमार चरिता"चें भाषान्तर केलें होतें; परंतु त्यांना कोल्हापुराहून दुसरीकडे नेण्यांत आल्यानें, त्या भाषांतरित हस्तलिखिताचें काय झालें याचा पत्ता नाहीं ! नंतर "मराठा" ऑफीसमध्यें २।३ वर्षे त्यांनीं काम केलें; व त्या पत्राचे ते साहाय्यक संपादक होते. त्यानंतर मुंबईस अच्युत बळवंत कोल्हटकर यांच्या 'मेसेज' मध्येंही त्यांनीं १-१॥ वर्षपर्यंत असिस्टंट एडिटरचें काम केलें.

पुढें **वामनराव** हे १९१८ त हिंगणें येथील **महिलापाठशाळे**मध्यें प्रोफेसर म्हणून काम करूं लागले; १९२० सालीं ते अनाथबालिकाश्रमाच्या मंडळीचे "लाइफ मेंबर" झाले. कैदेंतून सुटल्यानंतर **वामनरावांनीं** ( १ ) रागिणी, ( २ ) नीतिशास्त्रप्रवेश, ( ३ ) नलिनी, ( ४ ) आश्रमहरिणी, ( ५ ) नवपुष्पकरंडक, ( ६ ) सॉक्रेटिसाचे संवाद, इ० पुस्तकें प्रसिद्ध केलीं. यापैकीं रागिणी, नलिनी, व आश्रमहरिणी ह्या कादंबऱ्या आहेत; आणि नीतिशास्त्रप्रवेश व सॉक्रेटिसाचे संवाद हीं उच्चतम तात्त्विक विचाराचीं पुस्तकें आहेत. मराठींतील विविधज्ञानविस्तार, मनोरंजन, नवयुग, इ० बहुतेक मासिकांतून त्यांचे वेळोवेळीं लेख येत असतात; विविधज्ञानविस्तारांत कादंबऱ्यांच्या परीक्षणात्मक अलीकडे

लिहिलेले लेख पुष्कळांना आवडले होते. या लेखांपैकीं कांहीं लेख ' **विचार-विलास** ' या नांवाच्या ग्रंथांतून नुक्तेच प्रसिद्ध झाले आहेत.

ह्यांचें भाषाप्रभुत्व अप्रतिम आहे; व या आणि दुसऱ्या गुणांमुळें वाङ्मय-ग्रंथकारांत त्यांचा लौकिक मोठा झालेला आहे. आधुनिक गद्य-वाङ्मयांत ज्याप्रमाणें ( १ ) भाषान्तरित, ( २ ) जांभेकरी, ( ३ ) चिपळूणकरी, ( ४ ) आगरकरी, ( ५ ) केसरी, ( ६ ) ' करमणुकी, ' इ० भाषेचे प्रकार आतां स्वतंत्र पाडितां येतील; त्याचप्रमाणें " **वामनरावी** " किंवा 'रागिणी' काव्य-शास्त्र-विनोद-प्रचुर भाषा-प्रकार, हाही एक भारदस्त व सफाईदार वळणाच्या मराठी भाषेचा प्रकार होऊन बसेल, असें आम्हांस वाटतें. त्यांची "रागिणी" ह्याच भाषाकौशल्या-मुळें सर्वमान्य होऊन, सरकारी परीक्षांसही नेमली जाते. ' आश्रमहरिणी ' लहानशी कादंबरी खरी, पण तींतिल भाषावैशिष्ट्य व मनोहारित्व ट्रेनिंग् कॉलेजांतील विद्यार्थिनींस ' रॅपिड् रीडिंग 'ला नेमिलें असतां शिकविल्यामुळें आमच्या प्रत्ययास आलें आहे. त्या कादंबरींतील उच्च शैक्षणिक तत्त्वेंही मनन करण्यासारखीं आहेत. असो.

"**मराठींतील अप्रत्यक्ष-निवेदन-पद्धति**"हा थोड्याच दिवसांपूर्वी विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेला व्याकरण-विषयक व ह्या मराठींत रूढ होत असलेल्या नवीन भाषाप्रकाराकडे विद्वानांचें प्रथम लक्ष वेधविणारा **वामनरावांचा** लेख, त्यांस आमच्या व्याकरण-प्रबन्धकारांत ओढण्यास पुरेसा झाला आहे.

---

## ६२. बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर.

यांचा जन्म नाशिक येथें १८८३ मध्यें झाला. प्राथमिक व हायस्कूल-मधील शिक्षण नाशिक येथेंच झालें. नंतर ते फर्ग्यूसन कॉलेजमध्यें शिकण्यास आले; व सन १९०६ मध्यें बी० ए० झाले. कॉलेजांत असतांनाच, वक्तृत्वा-बद्दल व उत्कट देशाभिमानाबद्दल त्यांची प्रसिद्धि होती. बी० ए० झाल्यावर ते मुंबईस कांहीं दिवस एल्० एल्० बी० चा अभ्यास करीत होते. १९०७ मध्यें ते बॅरिस्टरीच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासाठीं विलायतेस गेले व ती परीक्षा पासही झाले; परंतु इंग्लंडमध्यें असतांनाच, नाशिक केसच्या बाबतींत त्यांच्या-वर कांहीं संशय येऊन, त्यांना लंडन येथें पकडण्यांत आलें. हिंदुस्थानांत आणीत

असतां, **मार्सेलिस** येथें, त्यांनीं बोटींतून उडी टाकून, फ्रेंच हद्दींत जाण्याचा व सुटका करून घेण्याचा धाडसी प्रयत्न केला; परंतु तो यशस्वी झाला नाहीं. मुंबईस आणल्यावर १९०९ मध्यें त्यांच्यावर खटला भरण्यांत येऊन, त्यांस दोन जन्मठेपींची शिक्षा देण्यांत आली! अंदमानांत सुमारें १५ वर्षें काढल्या-नंतर त्यांची तेथून सुटका करण्यांत आली; व हिंदुस्थानांत कांहीं विशिष्ट स्थलीं, व कांहीं विशिष्ट अटी संभाळून, मोकळें राहण्याची त्यांना परवानगी देण्यांत आली आहे. वाङ्मयविषयक, जातिसंघटनाविषयक, आणि धर्मविषयक, इंग्रजी व मराठी लेख लिहून, लोकजागृति करण्याकडे हल्लीं त्यांचा कल दिसतो. गेल्या वर्षींच ह्यांनीं मुंबईच्या कायदे-कौन्सिलकरितां उभें राहण्याची परवानगी सर-कारकडे मागितली होती; पण ती मिळाली नाहीं.

मराठी भाषेच्या **लेखन-शुद्धी**संबंधानें त्यांना फार आस्था वाटते; व ह्या भाषेंतलि अनावश्यक असे आरबी, फारसी, व इंग्रजी शब्द टाळण्याविषयीं त्यांच्या लेखनामध्यें मोठा कटाक्ष दिसतो. लोकांनींही अशाच दिशेनें प्रयत्न करावा, म्हणून त्यांनीं **केसरी**मध्यें जे लेख लिहिले होते, ते नुक्तेच पुस्तक-रूपानें प्रसिद्ध झाले आहेत. हे चांगले **कवि** आहेत व यांनीं १।२ महाकाव्येंही लिहिलेलीं आहेत; पण तीं त्यांच्या नांवावर प्रसिद्ध नाहींत. "**सिंहगडचा पोवाडा**" व कांहीं इंग्रजी, मराठी, पुस्तकेंही यांनीं लिहिलीं आहेत. त्यांच्या लेखनामध्यें एकप्रकारचें तेज व मनोवेधकता असून, वक्तृत्वही परिणामकारक व श्रोत्यांच्या मनावर छाप पडेल असें असतें. "**माझी जन्मठेप**" हें त्यांचें पुस्तक अत्यन्त हृदयद्रावक आहे.



**बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर.**

यांचे बंधु डॉ० **नारायण दामोदर सावरकर** यांनींही '**श्रद्धानंद**' वर्त-मानपत्रांत **लेखन-शुद्धी**संबंधानें जे कर्तव्यबुद्धीनें व धडाडीचे प्रयत्न चालविले आहेत, तेही येथें उल्लेखण्यायोग्यच आहेत.

# ६३. नारायण गोविंद चापेकर.



हे एक कसलेले लेखक असून, विविधज्ञानविस्तारादि निरनिराळ्या मासिकांत यांचे लेख नेहमीं येत असतात. यांचा जन्म सन १८६९ मध्यें झाला; व शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन् कॉलेजांत झालें. हे एल्० एल्० बी० झाल्यावर सरकारी नोकरींत शिरले; व निरनिराळ्या ठिकाणीं यांनीं सवजजचे काम केलें. यांनीं **रामचंद्र भिकाजी जोशी** यांचें व्याकरण प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर परीक्षणात्मक असा लेख ' विविधज्ञानविस्तारा ' च्या ४० व्या पुस्तकांत लिहिला आहे; व तो अत्यंत कांटेतोल, थोडक्यांत सुन्दर चिकित्सात्मक व विचार-परिपूर्णतेनें लिहिला असल्यानें व्याकरण-विषयक प्रबन्धांत अत्यन्त मोलाचा आहे. या त्यांच्या लेखामुळेंच **नारायणराव** यांस आमच्या चरित्र–मालिकेंत गुंफिलें आहे. ( १ ) बर्क, ( २ ) पैसा, ( ३ ) चांदण्यांतील गप्पा, इ० ह्यांचीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत. हल्लीं ते पेन्शन् घेऊन ठाणें जिल्ह्यांत **बदलापुर** येथें स्थायिक होऊन राहिले असून, त्यांनीं " आमचा गांव " या नांवाचे जे लेख अलीकडे विविधज्ञानविस्तारांतून प्रसिद्ध केले आहेत, ते **रा० ब० काशीनाथ नारायण साने** यांच्या " एका सरकारी कामगाराच्या रोजनिशींतील उतारे " या लेखांच्या प्रमाणेंच, चौकसयुक्त माहितीपूर्ण, साधार व महत्त्वाचे असेच आहेत. अद्यापि यांचा लेखनव्यवसाय चालूच आहे.

---

# [ ख ] छन्दःशास्त्रकार.

## ६४. रामजोशी.

हे **सोलापूर**चे देशस्थ ब्राह्मण. जन्म सन १७६२ त झाला. शरीरानें हे काळसर होते. आरंभीं विद्या कांहींच केली नाहीं; उलट तमाशांत डफ वाजविण्याचें काम करूं लागले. यांचे पूर्वजांकडे सोलापूरच्या जोशीपणाची वृत्ति होती. यांचे पूर्वज **धोंडभट जोशी** म्हणून होते, त्यांस मुसलमान अमदानींत **फत्तर जोशी** असें थट्टेनें म्हणत. **रामजोशी** यांच्या वडिलांचें नांव **जगन्नाथ जोशी**, व वडील बंधूचें नांव **मुद्गल जोशी**. फक्त **रामजोशी**च कायते ह्या कुलांत आरंभीं विद्याहीन होते, ह्यामुळें **मुद्गल जोशांचा** त्यांजवर फार राग असे. **मुद्गल जोशांनीं** एकदां तर त्रासून **रामजोशी** यांस घरांतून हांकलून दिलें; तेव्हां ते पंढरपुरास गेले; व तेथें त्यांनीं **बाबा पाध्ये** यांजकडे अध्ययन केलें. यांची बुद्धि कुशाग्र असल्यामुळें अवघ्या दोन वर्षांतच **रामजोशी** यांनीं संस्कृत भाषा आपलीशी केली; ते महापंडित झाले नाहींत, परंतु त्यांनीं संस्कृत भाषा चांगलीच अवगत केली होती, हें त्यांच्या पुढील चारित्र्यावरून स्पष्ट दिसून येतें.

दोन वर्षांच्या अध्ययनानंतर **रामजोशी** हे घरीं सोलापुरास गेले. **मुद्गल जोशी** त्यावेळीं आजारी होते. त्यांजकडे एका देवळांत भारतावर पुराण सांगण्याचें काम होतें. **रामजोशी** भेटीस गेल्यावर **मुद्गल जोशी** एकदम त्यांस म्हणाले,—" तूं आमचे कुलांत कुलांगार निपजला आहेस; दोन संस्कृत अक्षरें शिकतास, तर आज उपयोगी पडला असतास." हें ऐकून लागेच **रामजोशां**नीं पोथी मागून घेतली; व देवळांत जाऊन पुराण सांगण्यास आरंभ केला. हा छंदीभंगी माणूस व्यासपीठावर पाहतांच सर्वांनीं आरंभीं कुचेष्टा केली; पण आपल्या मोहक वाणीनें **रामजोशांनीं** अखेर मंडळींवर विलक्षण छाप पाडिली; हें **मुद्गल जोशांना** कळल्यावर त्यांस त्यांतल्या त्यांत समाधान वाटलें.

**रामजोशी** हे पंढरपुरास कीर्तन करावयासही शिकले होते. त्यांच्या गोड लकेऱ्यांनीं आबालवृद्ध मोहून जात; त्यांच्या कीर्तनांवर लोक खूष होण्याचीं आणखीही कारणें होतीं; त्यांपैकीं एक त्यांची स्वतःची अलंकार, यमक, प्रास, अनुप्रास, इ०नीं भूषिलेली सुन्दर पद्यरचना; व अत्यन्त मोहक अशा **लावणी**च्या छन्दांत त्यांनीं ती पद्यरचना केली, हें दुसरें. शिवाय, "महाराष्ट्र-भाषा–कण्ठमणि" अशा **मोरोपंता**ची आर्या त्यांस लाभली हें तिसरें; अशा अनेक कारणांनीं "अधिकस्याधिकं फलम्" या न्यायानें **रामजोशी** यांचीं कीर्तनें रंगत; व त्या कीर्तनांचे प्रसंगीं लोकांच्या उड्या पडत.

पुण्यास धाकट्या **बाजिरावाच्या** वेळीं छटेल, रंगेल, अशी बरीच गुणिजन मंडळी उदयास आली. किंबहुना अशीच मंडळी उदयास येण्याचा तो काल होता, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. कारण, त्या थोर **तुकारामा**ची भक्ति कोणीकडे, त्या **रामदासाची** विरक्ति कोणीकडे, आणि ह्या रंगेल **रामजोशा**चें–तमासगिरांचें कीर्तनरूपी ' नाटक कोणीकडे ! खरोखर तत्कालीन समाजाच्या नीतिमत्तेचा अभाव ह्यामुळें प्रतीत होतो. नाहींतर उच्चवर्णीयां-तील बड्या बड्या धेंडांसही हे तमाशांचे चाळे खपले असते कशाला ? परवां परवां पर्यंत तमाशांचे असले शोकी पांढरपेशांतही पाहण्यांत येत होते ! असो. **रामजोशी** यांनींही पोटाकरितां म्हणून ' गोसाव्या 'चा म्हणजे हरिदासाचा पेहेराव स्वीकारिला होता, पण त्यांची राहणी विलासी, रंगेल, व थाटामाटाची अशी होती. ते देशोदेशीं हिंडून ह्या धंद्यावर खूप पैसा मिळवीत, पण जवळ एक कपर्दिकही रहावयाची नाहीं कारण, स्वभाव उधळ्या. यांच्या स्वारीबरो-बर नेहमीं नायकीण म्हणून एक राख असावयाचीच. ती रूपानें सुन्दर होती. तिला व स्वतःला बसण्यासाठीं **रामजोशी** बुवा हे रेशमी काढण्यांचा एक झोंपाळा बरोबर बाळगीत असत बरोबर शिष्यमंडळी, मोठा घोडा, दोन कुत्रीं, दोन माकडें, दोन राघू. हें सर्व लचांड असावयाचेंच. शिवाय, ते **शाक्त** असल्यामुळें, मद्यही पीत; व गांजा, तंबाखू, हीं तर त्यांचीं नित्याचींच व्यसनें होतीं. **रामजोशी** बावांचें अशा प्रकारचें चित्र कोणीं रेखाटल्यास, तें मोठें मौजेचें दिसेल, यांत शंका नाहीं.

**रामजोशी** यांचें येथें चरित्र देण्याचें कारण, ते एरव्हीं कसेही असले, तरी त्यांनीं "**छंदोमंजरी**" नांवाचा छन्दःशास्त्रावरील जो उत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे, तो आमच्या कार्यक्षेत्रांत येतो, हें होय. ह्या ग्रंथाची शुद्ध अशी प्रत

सापडली नसल्यानें किंवा त्यांत दुरुस्ती करण्याचें काम पूर्ण झालें नसल्यानें, ग्रंथांत बरींच न्यूनें आहेत, तरी त्यांतील विस्खळीतपणा बाजूस ठेविल्यास, मराठींतील **छन्दःशास्त्रावरील** हा **पहिलाच** ग्रंथ होय; यांत शंका नाहीं. **रामजोशी** बोवांचा हा मान कोणी हिरावूं शकत नाहीं. श्री० **रंगाचार्य रड्डीशास्त्री** ह्यांनीं हा ग्रंथ प्रकाशित केला असून, त्यावरून **रामजोशी** बावांची बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारें दिसून येते.

यांना अखेरी अखेरीस काशीस जाण्याची इच्छा झाली; पण वरीलप्रमाणें लवाजम्यासह पैशाच्या अभावीं जाणें अशक्य होतें. मग त्यांनीं पुण्यांत एक याद फिरविली, तेव्हां १४ हजारांची रक्कम झाली; पण त्यांना शेवटीं काशीवास घडला नाहींच; मध्यन्तरींच सन १८१२ त ते मृत्यु पावले.

यांनीं शृंगारपर व वैराग्यपर अशा दोन्ही प्रकारच्या उत्कृष्ट लावण्या केल्या आहेत. छन्दी असतां, त्यांच्यावर श्रोतृसमुदाय जो लुब्ध होत असे, त्याचें कारण, कीर्तनांत त्यांच्या लावण्यांनीं क्रान्ति घडवून आणली; व लोकांस कीर्तन हा जो नीरस विषय वाटावयाचा, त्याऐवजीं तो रंजक व आल्हादक वाटेल, असें आपल्या गानमाधुर्यानें व शब्दरचना-माधुर्यानें प्रतीत केलें. **सरदार घोरपडे** यांच्या येथील कीर्तनप्रसंगीं **रामजोशी बावांच्या** समयसूचकतेबद्दलची आख्यायिका प्रसिद्धच आहे. त्याचप्रमाणें " भला जन्म हा तुला लाधला० ", " नरजन्मामधि नरा करुनि घे० ", " दों दिवसाची तनु ही साची० ", "भज भज भवजलधिमाजि० ", इ० त्यांचीं पद्यें सर्वतोमुखीं असून, " राधा सखि संवादे **छेकापन्हुति** ही आयका । रसिकहो किती चतुर बायका "॥ हें पद्य तर अत्यन्त रसाळ असें आहे; हें सुज्ञांस माहीत आहेच. पण हें पद्य फाजील सभ्यतेमुळें बहुतेक ठिकाणीं सर्व दिलें जात नाहीं; त्यांतला तुकडा तुकडा मात्र आढळतो. विषयान्तरामुळें आम्हांसही तें पद्य येथें देण्याचा मोह आवरणें भाग आहे.

---

## ६५. परशुरामपंत तात्या गोडबोले.

---

यांचे पूर्वज मूळ रत्नागिरी जिल्ह्यांतील ' पावसगोळ ' नांवाच्या गांवचे राहणारे. तेथून, **तात्यांचे** पणजे बळवंतराव, वाईस जाऊन रास्त्यांच्या पदरीं

नोकरीस राहिले. त्यांचे चिरंजीव म्हणजे तात्यांचे आजे परशुरामपंत रास्त्यांच्या बरोबर कर्नाटक आणि म्हैसूरच्या स्वाऱ्यांत हजर होते. तिकडून त्यांनीं पुष्कळ पैसा आणिला म्हणतात; पण तो त्या घराण्याकडे फार दिवस टिकलासें दिसत नाहीं. मात्र, ह्या तात्पुरत्या श्रीमंतीमुळें, गोडबोल्यांची **रास्ते** आणि **जोग** ह्या श्रीमत घराण्यांशीं सोयरीक झाली; परंतु पुढें चंचल लक्ष्मीची उलटी नजर फिरली; आणि तात्यांचे वडील बळवंतराव यांस नोकरीच्या शोधार्थ पुण्याचा रस्ता धरावा लागला

**तात्यांचा** जन्म सन १७९९ मध्यें वांई येथें झाला. त्यांचें बाळपण तेथेंच गेलें; आणि **नारायणशास्त्री देव** यांचे जवळ तेथेंच त्यांनीं संस्कृतचा अभ्यास केला. तात्यांचें मोडी अक्षर फार चांगलें होतें, असें म्हणतात. दाजीबा नांवाचे तात्यांचे एक वडील बंधु होते व त्यांच्यामुळेंच तात्यांस मराठी कविता वाचण्याची गोडी लागली.

प्रपंचाच्या निर्वाहार्थ **तात्या** लौकरच पुण्यास गेले, व तेथें आपले मामा **जोग** यांच्या पेढीवर कारकून राहिले. यानंतर थोड्याच दिवसांत, "बाँबे नेटिव्ह एज्युकेशन् सोसायटी"मार्फत, मराठी कोशाच्या कामाला सुरुवात होऊन, त्या कामीं नेमिलेल्या शास्त्री-मंडळांत तात्यांची नेमणूक करण्यांत आली मेजर **कँडी** आणि तात्या यांचा प्रथम परिचय याच वेळीं झाला. शास्त्र्यांचा हा कोश१८२९सालीं तयार झाला. यानंतर कँडी साहेबांचा इंग्रजी-मराठी आणि मोल्स्वर्थ व कँडी यांचा मराठी-इंग्रजी हे कोश तयार झाले.

कोशांच्या कामांतून मोकळे झाल्यावर कँडीसाहेब कांहीं दिवस पुण्याच्या पाठशाळेचे ( Poona college ) प्रिन्सिपल होते. पुढें १८५५ सालीं जेव्हां ते मराठी ट्रॅन्सलेटर झाले,तेव्हां त्यांनीं आपल्या खास पंडितांच्या जागीं **तात्यांची** नेमणूक करून घेतली. कँडी साहेबांचीं मराठी क्रमिक पुस्तकें म्हणून प्रथम जीं तयार झालीं, तीं करण्यांत मेजर साहेबांना तात्यांची फार मदत झाली; व पेन्शन् घेईपर्यंत ते त्याच कामावर होते. तात्यांचा **फोटो** उपलब्ध असून वेळेवर मिळविण्याच्या विस्मृतीमुळें आम्हांस घालतां आला नाहीं, याबद्दल वाईट वाटतें !

नोकरी संभाळून मिळणारा वेळ **तात्या** ग्रंथलेखनाच्या कामीं लावीत. वेणीसंहार ( १८५७ ), उत्तररामचरित्र ( १८५९ ), शाकुंतल ( १८६१ ), मृच्छकटिक, नागानंद, आणि पार्वतीपरिणय, इ० संस्कृत नाटकांचीं मराठीमधील तात्यांचीं भाषांतरें फारच उत्तम साधलीं आहेत. त्यांचीं वेणीसंहार व मृच्छकटिक हीं नाटकें प्रयोगरूपानेंही एका काळीं फारच लोकप्रिय झालेलीं होतीं.

मराठी प्रमुख कवींच्या काव्यांतील उत्कृष्ट उतारे एकत्र ग्रथित करून, तात्यांनीं जो **'काव्यामृताचा नवनीत भेला'** महाराष्ट्र-जनतेला अर्पण केला ( १८५४ ), तो गेलीं सत्तर वर्षें जनता मोठ्या प्रेमानें सेवन करीत आहे. **तात्यांच्या** हयातींतच **नवनीता**च्या आठ आवृत्ति निघाल्या; आणि त्यानंतर आणखी आठ निघाल्या. ह्यावरून ह्या ग्रंथाची लोकप्रियता सहज ध्यानीं येईल.

कवि **मोरोपंता**च्या काव्यांचा अभ्यास **तात्यां**नीं अत्यन्त परिश्रमपूर्वक केला होता. यामुळें एकादी आर्या लागली नाहीं, तर **कृष्णशास्त्री चिपळूणकरां**-सारखे पंडितही तिचा अर्थ लावून घेण्याकारितां तात्यांकडे जात. संस्कृत नाट-कांचीं भाषान्तरें चालू असतां, तात्या आपणांस येणाऱ्या शंका कृष्णशास्त्री यांच्या मदतीनें दूर करून घेत; असा ह्या दोघां पंडितांचा परस्पर संबंध * होता. प्राकृत ग्रंथांचें आस्थापूर्वक अवलोकन करणारे पंडित फारच विरळा सांपडतात, असें म्हणून **दादोबा पांडुरंगां**नीं अशा पंडितांत त्यांची गणना केली आहे. तात्यांनीं मराठी कवितेचाच जन्मभर व्यासंग केला होता, व त्यांनीं तिच्या प्रीत्यर्थ जे श्रम केले, ते जर केले नसते, तर मराठी कवितेचें ज्ञान आमच्या लोकांस आज कित-पत असतें,याची शंका आहे; असें निबंधमालाकार **विष्णुशास्त्री** यांनीं तात्यां संबंधानें म्हटलें आहे ( नि० माला अंक ९ ). सन १८६५ सालीं **मोरोपंता**च्या सुप्रसिद्ध केकावलीवर दादोबा पांडुरंग यांची बरीच विस्तृत अशी ' यशोदा पांडु-रंगी ' नांवाची टीका प्रसिद्ध झाली; व तीवर खूप वादविवादात्मक चर्चा झाली. तींत तात्यांनीं भाग घेतला नाहीं; परंतु मोरोपंतांच्या कवितेकडे लक्ष वेधण्यास तिचा फार उपयोग झाला; आणि तात्यांनीं लगेच दुसऱ्या वर्षीं म्हणजे १८६६ मध्यें, त्याच काव्यावरील आपली ' केकादर्श ' नांवाची सरळ टीका प्रसिद्ध केली.

सन १८६२ मध्यें सरकारी मदतीनें **माधव चंद्रोबा डुकले** यांनीं ' सर्व-संग्रह ' नांवाचें मासिक पुस्तक शिळाछापावर काढून त्याच्या द्वारें **मोरोपंता**ची

---

* " वेणी संहरणाख्य नाट्य कविनें केलें असें संस्कृतीं ।
तें म्यां पाहुनियां तसें उतरिलें भाषांतरीं प्राकृतीं ॥
तें **कृष्णें रविसत्तमें बुधवरें** अत्यादरें शोधिलें ।
कीं तेणें रसिकांचिया निजरसें चित्तासि संशोधिलें ॥ "

बहुतेक कविता प्रथमच प्रसिद्ध केल्या. ह्या कामांत त्यांचे मुख्य मदतनीस **परशुराम-तात्याच** होते. सरकारी मदतीनें इंदुप्रकाश छापखान्याचा म्हणून जो तुकारामाचा गाथा वेदार्थयत्नकर्ते **रा० ब० शंकर पांडुरंग पंडित** यांनीं प्रसिद्ध केला, तो तयार करण्याच्या कामीं पंडितांस **रसिक तात्यांची** मोठीच मदत झाली.

बाणाच्या कादंबरीचा सारांश ‘ कादंबरीसार ’ या नांवानें १८७२ मध्यें तात्यांनीं प्रसिद्ध केला. याशिवाय कवितावद्ध मराठ्यांचा इतिहास ( १८६४ ); संक्षिप्त भूगोलविद्या ( १८६५ ); निघंटप्रकाश; बालबोधामृत सोप्या आर्या ( १८७४ ); वृत्तदर्पण ( १८६१ ); पंचांगदर्शन ( १८६३ ); नामार्थदीपिका ( १८६६ ); वगैरे त्यांचीं पुस्तकें आहेत.

हे आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी म्हणजे सन १८७४ त गोकुलाष्टमीच्या दिवशीं पुणें येथें मृत्यु पावले; ( संपूण गोडबोले—सा० प्र० मं० ठाणें, यावरून ).

**तात्यांचें** ज्यास्त गौरवयुक्त चरित्र **ओकांनीं** बालबोधांत लिहिलें आहे; व तेंच “ महाराष्ट्रीय नाटककार ” ह्या पुस्तकांत **मुजुमदारांनीं** अवतरिलें आहे. त्यांत खालील मजकूर आहेः—

“ **तात्यांनीं** मराठी भाषेची मोठी लज्जा राखिली आहे: कारण, आमच्या प्राचीन नाटककारांच्या बहुतेक नाटकांचीं भाषान्तरें अगोदरच परभाषेंत होऊन गेलीं होतीं; आणि मराठी भाषेंत एकही नव्हतें; हा कमीपणा **तात्यांनीं** भरून काढिला; व हें काम त्यांनीं केलें नसतें, तर मराठी कोशाचें व मराठ्यांच्या इतिहासाचें काम जसें इंग्रज पंडितांनीं केलें, त्याचप्रमाणें हेंही काम करण्याचा प्रसंग युरोपियन पंडितांवर आला असता ! ”

“ **तात्यांचीं** मृच्छकटिक व वेणीसंहार हीं नाटकें रंगभूमीवर पुष्कळ वेळां आलीं आहेत. कॉलेजांतील विद्यार्थी अजूनही त्यांपैकीं कांहीं भाग हौसेनें करीत असतात. “नागानंद” हें नाटक पुण्यास एकदांच रंगभूमीवर आलें. १८७८ त पुण्यास सांगलीकर मंडळीकडून “ मृच्छकटिक ” नाटकाचे प्रयोग प्रथम पुण्यास करविण्यांत आले; त्यावेळीं ह्या नाटकांनीं पुणेंकरांस वेड लाविलें होतें, असें म्हणतात. असेंच दुसरें लोकप्रिय नाटक “वेणीसंहार” आर्योद्धारक मंडळीनें रंगभूमीवर आणिलें होतें. त्यांतील पद्याचा एकच मासला पहा—

**भीम**—“ जी ही गदा मम करांत सदैव नाचे ।
घातें इच्या चुरिन ऊरु सुयोधनाचे ॥

रक्तें तयांतिल विलेपिन मी स्व-पाणी ।
त्यांहींच बांधिन सखे तव मुक्त-वेणी । ''

**तात्यांची** प्रकृति पहिल्यापासून चांगली सुदृढ व निकोप होती. ते मिताहारी होते. राहणी अगदीं साधी. ते देवभोळे, सत्यवादी, भाविक व भक्तिमान् होते. ते अगदीं खरे खरे हिंदु होते. प्रेमळ व नम्र. त्यांचे पहिल्या कुटुंबास अपत्य होईना, म्हणून आई व पत्नी ह्यांच्या आग्रहास्तव ४० व्या वर्षी त्यांनीं दुसरें लग्न केलें. दुसऱ्या कुटुंबापासून यांस तीन मुलगे झाले.

**परशुरामपंततात्यांनीं** " वृत्तदर्पण " केलें, त्यानंतर मराठींत छंदःशास्त्रासंबंधानें अधिक विचार फारसा कोणीं महाराष्ट्रांत केलेला दिसत नाहीं. छंदःशास्त्र हा विषयही व्याकरणाच्या प्रदेशांतच येतो; अर्थात् ह्यासंबंधीं जे दोन-चार प्रयत्न झाले आहेत, त्यांच्या कर्त्यांविषयीं ह्या पुस्तकांत अपवाद करूनही उल्लेख करणें भाग होतें; परंतु अपवाद न करितांही छंदःशास्त्र हें व्याकरणाच्या पोटांत येऊं शकत असल्यामुळें, आम्हीं **तात्यांचें** व दुसऱ्या आधुनिक छंद-शोधकांचीं चरित्रें येथें देत आहोंत. **तात्यांच्या** " वृत्तदर्पणाची नवीन आवृत्ति थोड्या दिवसांपूर्वी आमचे गुरुवर्य **विष्णु वासुदेव नाटेकर** यांनीं संशोधिली असून, तींत कांहीं अर्वाचीन नवीन वृत्तेंही त्यांनीं दाखल केलीं आहेत.

---

## ६६. कै० गणेशशास्त्री लेले.

गणेश शास्त्री लेले हे सुप्रसिद्ध ग्रंथकार व कवि नासिक जिल्ह्यांत श्रीत्र्यंबकेश्वर या क्षेत्रीं इ० स० १८२५ सालीं जन्मले. यांच्या वडिलांचें नांव **सदाशिव शास्त्री**. धर्म आणि ज्योतिष यांत सदाशिव शास्त्री पारंगत होते. हे भडोच येथें व त्यानंतर मुंबईच्या सदर अदालतींत हिंदुधर्मशास्त्र्याच्या जागेवर होते. शास्त्रीबुवा चांगले वक्ते व पुराणीक होते. **जगन्नाथ शंकरशेट**, **विनायक वासुदेव**, **दादोबा पांडुरंग**, **आबासाहेब पटवर्धन**, **सदाशिव काशिनाथ छत्रे**, **बाळशास्त्री जांभेकर** इत्यादि थोर माणसांशीं शास्त्रीबोवांचा चांगला स्नेह होता. मुंबईचा सप्ताह, नर्मदास्तोत्र, संस्कृत इसापनीति, संस्कृत मराठी पाठ, इत्यादि मराठी व संस्कृत गद्यपद्य रचना त्यांनीं केली. **गणेश शास्त्री** यांचे

मराठीचें शिक्षण त्र्यंबक येथील मराठी शाळेंत झालें. गणेश शास्त्री फार बुद्धिमान व कल्पक होते. त्यांची ग्रहणशक्ति व धारणाशक्ति असामान्य होती. **मेजर कँडी** हे शाळाखात्याचे सर तपासनीस असतां, त्र्यंबक येथील मराठी पाठशाळा पहावयास गेले होते. तेव्हां विद्यार्थी गणेशशास्त्री यांजकडे त्यांचें विशेष लक्ष गेलें. कँडी साहेबांनीं शाळेची परीक्षा घेतली. तिच्यांत गणेश शास्त्री पहिले आले. तेव्हां साहेब प्रसन्न झाले व त्यांनीं गणेशशास्त्री यांस तेव्हांच्या चालीप्रमाणे एक पागोटें बक्षीस देऊन शिवाय ग्रँट डफच्या इतिहासाची मराठी आवृत्ति व दुसरीं कांहीं पुस्तकें दिलीं. हा मुलगा पुढे नांव काढील, असें साहेबांनीं गणेशशास्त्री यांच्यासंबंधानें भविष्य केलें व तें पुढें अगदीं खरें ठरलें! मराठीचा अभ्यास झाल्यावर गणेशशास्त्री यांस त्यांच्या वडिलांनीं पुणें येथें संस्कृत पाठशाळेंत व्युत्पत्ति व शास्त्राध्ययन याकरितां ठेविलें. **श्री० आबासाहेब पटवर्धन** यांच्या आश्रयानें गणेशशास्त्री विश्रामबागच्या पाठशाळेंत अध्ययन करूं लागले. त्यावेळीं **कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री राजवाडे** वगैरे विद्यार्थी पाठशाळेंत पढत होते. गणेश शास्त्री व्युत्पत्ति व अलंकारशास्त्र यांत लवकर पारंगत झाले. पुढें गणेशशास्त्री यांस त्यांच्या वडिलांनीं मुंबई येथें इंग्रजी शिकण्याकरितां आपल्यापाशींच ठेवून घेतलें. गणेशशास्त्री यांचे भाषा, गणित, इतिहास वगैरे सर्व विषय मराठींत पूर्ण तयार होते. त्यांना फक्त इंग्रेजी भाषा शिकावयाची होती. एल्फिस्टन् इन्स्टिट्यूट् नामक इंग्रजी शाळेंत गणेशशास्त्री प्रविष्ट झाले. सुमारें तीन वर्षांच्या अवधींत त्यांनीं हायस्कूलचा अभ्यास संपविला. या शाळेंतही गणेशशास्त्री नेहमीं पहिले असून आपल्या गुरुजनांना प्रिय असत. तथापि अभ्यासाकडे जितकें लक्ष त्यांनीं दिलें तितकें शरीराकडे दिलें नाहीं, या गोष्टीमुळें त्यांचें जन्माचें नुकसान झालें. **गणेशशास्त्री** प्रवेश परीक्षा उत्तम रीतीनें पास झाले. **विश्वनाथ नारायण मंडलीक, भास्कर दामोदर पाळंदे, नारायण विष्णु बापट, वासुदेव बापूजी कानिटकर, विष्णु मोरेश्वर भिडे** इत्यादि विद्यार्थी या वेळीं गणेशशास्त्री यांच्या बरोबर होते. प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर **गणेशशास्त्री** यांस मासिकान्त वेतन मिळूं लागलें. **दादाभाई** नवरोजी, **बाळशास्त्री** जांभेकर इत्यादि विद्वान् देशी प्रोफेसर त्यांस अध्यापक मिळाले. **दादाभाई** व **बाळशास्त्री हे गणेशशास्त्र्यांवर** प्रसन्न असत. पुढें दुर्दैवानें **गणेशशास्त्री** यांची प्रकृति बिघडली. मुंबईची हवाही त्यांस मानवे-

नाशी झाली. यामुळें त्यांस आपल्या जन्मस्थानाकडे परत जावें लागलें. शास्त्रीबोवांची प्रकृति पुन्हां पूर्ववत् होण्याचा रंग दिसेना; तेव्हां त्यांनीं पुढील इंग्रजी शिक्षणाला कायमची रजा दिली. ते त्र्यंबकेश्वरींच घरचा कारभार पाहूं लागले. मुंबईस जें इंग्रजी शिक्षण मिळालें, तेवढ्याच्या जोरावर **गणेशशास्त्री** यांनीं तीन चार इंग्रजी ग्रंथांचें मराठी भाषान्तर केलें व त्यांस तेव्हांच्या विद्योत्तेजक मंडळाकडून पारितोषिकेंही मिळालीं. **तेलमेकस्**, **कॅप्टन् कुक्**, **कोलंबस**-इत्यादिकांचे वृत्तांत **शास्त्री**बोवांनीं इंग्रजीवरून मराठींत उतरले. यापुढें त्यांचा इंग्रजीचा व्यासंग सुटला. **सदाशिव शास्त्री** मुंबईस वर सांगितलेल्या नोकरीवर असत व **गणेशशास्त्री** त्र्यंबकेश्वर येथें घराची व्यवस्था पहात; त्यामुळें **गणेश शास्त्री** यांस फुरसत पुष्कळ मिळूं लागली. तिचा त्यांनीं ग्रंथरचनेच्या कामीं उपयोग केला. दक्षिणा प्राइज कमिटीनें जाहिर रीतीनें मागविलेले अनेक ग्रंथ **गणेश शास्त्री** यांनीं लिहिले व बक्षिसें मिळविलीं. जानकीपरिणय, रघुवंश, मालविकाग्निमित्र, विद्धशालभंजिका, कर्पूरमंजरी या ग्रंथांचीं त्यांचीं भाषान्तरें प्रसिद्ध आहेत. शिवाजीचरित्र आणि कृष्णाकुमारी हीं त्यांचीं स्वतंत्र काव्यें आहेत. **साहित्यशास्त्र** हा त्यांचा लहानसाच परंतु फार उपयोगी असा ग्रंथ आहे. यांत रस, अलंकार, शब्दशक्ति, दोष इत्यादि विषय असून, शिवाय छंद व प्रस्तार यांचीही माहिती आहे. 'तीर्थयात्राप्रबंध' या नावाचा शास्त्रीबोवांचा ग्रंथ आहे; यांत **कै० अण्णासाहेब विंचूरकर** यांच्या तीर्थयात्रांची हकीकत दिली आहे. अकबर, गंगानदी, हिंदूंचे सण व इतर अनेक स्फुट काव्येंही त्यांनीं रचिलीं. इ० स० १८७१ सालीं शास्त्रीबोवा त्र्यंबक सोडून नासिक येथें येऊन राहिले. शास्त्रीबोवा फार रसिक व समयोचित वक्ते होते. इंग्रजी शिक्षण लाभल्यामुळें त्यांना जुन्या व नव्या अशा दोन्ही पक्षांशीं समतोलपणानें व चातुर्यानें वागतां येत असे; यामुळें ते उभय पक्षांस मान्य असे गृहस्थ होते. नासिकच्या सभांना बहुधा शास्त्रीबोवा अध्यक्ष असत. **माधवराव रानडे**, **गोपाळराव हरि देशमुख**, **गंगाधर नरसिंह केतकर** इत्यादि सर्व प्रकारच्या व दर्जाच्या लोकांत शास्त्रीबोवांना मोठा मान असे. थोडक्यांत असेंही म्हणतां येईल कीं, **गणेश शास्त्री** हे नासिकचे **कृष्णशास्त्री चिपळूणकर** होते. नासिकजवळ गोदातीरावर लाखलगांव नांवाचें लहानसें क्षेत्र आहे, त्या ठिकाणीं इ० स० १८९८ सालीं शास्त्रीबोवा कैलासवासी झाले. **गणेश शास्त्री** यांचे थोरले चिरं-

जीव **लक्ष्मण शास्त्री** हे पुण्याच्या न्यू पूना कॉलेजमध्यें मराठीचे प्रोफेसर आहेत. यांनींही आपल्या कवित्वानें व ग्रंथकर्तृत्वानें वडिलांच्या कीर्तींत सुंदर भर घातली आहे. यांचें चरित्र 'शालोपयोगी व्याकरणकार' यांत मागें आलेंच आहे.

---

## ६७. वे० रंगाचार्य बाळकृष्णाचार्य रड्डीशास्त्री.



**रड्डी शास्त्री** यांचें घराणें मूळ दक्षिण हिंदुस्थानांतून इकडे महाराष्ट्रांत आलें. यांचें हल्लींचें घरदार सातारा जिल्ह्यांत श्रीक्षेत्र वाई येथें असून, तेथून ४–५ मैलांवर असलेला 'मुगांव' हा या घराण्यांत वंशपरंपरा इनाम चालू आहे. या इनामाच्या सनदा **छत्रपति श्रीशाहू-महाराज** यांच्या वेळच्या आहेत. म्हणजे आज जवळ जवळ दोनशें वर्षे हें घराणें महाराष्ट्रांत स्थानिक झालें आहे. **रड्डी** हें मूळ दक्षिणेंतील वतनी आडनांव असून महाराष्ट्रांत ज्याप्रमाणें पाटील, कुल-कर्णी, देशपांडे वगैरे वतनदार गांवोगांव असतात, त्याप्रमाणेंच या घराण्याचा मूळ दक्षिणेंतील कोठल्या तरी गांवाशीं वतनी संबंध असावा; परंतु या तर्का-पलीकडे विशेष निश्चित अशी हकीकत मिळत नाहीं. हल्लीं वाईस व इतरत्र या **रड्डी** घराण्याच्या ज्या चार–पांच शाखा आहेत, त्यांपैकीं औरस संतति चालू असलेली अशी **वे० रंगाचार्य** यांचीच एक शाखा असून, बाकीच्या ठिकाणीं पर-गोत्रातील वगैरे दत्तक घेऊन वंश चालू आहे.

**छत्रपतींच्या** वेळेपासून **रड्डी** यांचें घराणें व्याकरणशास्त्रांत निष्णात अस-ल्याचा लौकिक आजमितीला शास्त्रीबोवांनींही उत्तम रीतीनें राखला आहे. घरींच राहून गृहस्थाश्रमधर्म पाळीत असतां, जवळ विद्यार्थी ठेवून घेऊन त्यांना पाठ सांगून शास्त्रांत तयार करावयाचें, ही जुनी परंपरा **रड्डी शास्त्री** यांचे येथें गेल्या पिढीपर्यंत चालत होती. पुढें नोकरीच्या निमित्तानें, **वे० रंगाचार्य** यांचें

आपल्या गांवीं रहाणें सुटल्यामुळें, अध्यापनाचा जुना क्रम वाईस चालविणें त्यांना अशक्य झालें; तथापि पूर्व संस्काराला अनुसरून **शास्त्रीबोवां**च्या जवळ —ते असतील तेथें—एकादा दुसरा विद्यार्थी अध्ययनासाठीं म्हणून घरीं असतोच.

व्याकरण—शास्त्राशिवाय वेदान्त, धर्मशास्त्र, यांचेंही उत्तम प्रकारें अध्ययन यांचे घराण्यांत चालू आहे; त्यामुळें सातारा प्रांतीं **रट्टी** घराण्याची अशी अपूर्व छाप बसली कीं, हे सांप्रदायानें **श्रीमध्वाचार्यां**च्या द्वैतमताचे अनुयायी असले, तरी वाईक्षेत्राच्या सीमेपुरते, **श्रीमध्वाचार्य** व **श्रीशंकराचार्य** या दोन्ही मठाधीशांनीं या घराण्याला आपलें मठाधिकारी नेमलें आहे. हा मोठा विलक्षण मान होय; व या अधिकाराला अनुसरून, दोन्ही सांप्रदायांतील धार्मिक गुंतागुंतीचे प्रश्न **रट्टी शास्त्री** यांचे विद्यमानेंच सोडविले जाऊं लागले. अलीकडे मठांतील दुही माजल्यापासून पीठासंबंधीं अनास्था झाल्यामुळें धर्माधिकारी या पदवीचें महत्त्व विशेष वाटणार नाहीं; परंतु गेल्या पिढीपर्यंत प्रत्येकाच्या गृहकृत्यांत—लग्नाकार्यांत वगैरे—या पदावरील व्यक्तीला विशेष पूज्यतेचा मान देण्याची वहिवाट होती; यावरून **द्वैत** व **अद्वैत** या दोन्ही मठांतून मान्यता मिळविणाऱ्या या घराण्याचा अधिकार केवढा होता, हें लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. सर्व बाजूंनीं मानमान्यता झाल्यामुळें या घराण्याचे शरीरसंबंधही महाराष्ट्रांतील मोठमोठ्या इतिहास-प्रसिद्ध घराण्यांत झाले. कोल्हापूरचे श्रीमंत राजोपाध्याय यांचे **रट्टी** हे निकटचे आप्त असून, साताऱ्च्या **गजेंद्रगडकर** घराण्याशीं तर यांचा तीन—चार पिढ्यांचा शरीरसंबंध चालत आला आहे.

अशा उत्तम लौकिकाच्या शास्त्रीय घराण्यांत **वे० रंगाचार्य** हे श्रावण वद्य ११ शके १७९२ रोजीं जन्मले. शास्त्रीबोवांचें व्याकरणाचें सर्व प्राथमिक अध्ययन घरींच वडिलांजवळ झालें; व नंतर पुढील आकर ग्रंथ, त्याचप्रमाणें साहित्य, अलंकार व वेदांतादि इतर शास्त्रें, यांचें अध्ययन साताऱचे **वे० अनंताचार्य गजेंद्रगडकर**, व महामहोपाध्याय **वासुदेवशास्त्री अभ्यंकर**, यांचेजवळ झालें. अध्ययन पूर्ण झाल्यानंतर लौकरच **वे० रंगाचार्य** यांना सरकारी हायस्कूलमध्यें संस्कृत अध्यापकाची जागा मिळाली, व त्या जागेवर सोलापूर, सातारा, मुंबई येथील हायस्कुलें, पुणे फीमेल ट्रेनिंग् कॉलेज्, हायस्कूल फॉर इंडियन् गर्ल्स्, ' अशा निरनिराळ्या ठिकाणीं कामें करून, त्यांनीं उत्तम शिक्षक म्हणून लौकिक संपादन केला, व लौकरच या कामगिरीचें पारि—

तोषिक म्हणून सन १९२० सालीं शास्त्रीबोवांची नेमणूक धारवाड येथील कर्नाटक कॉलेजमध्यें झाली. **शास्त्रीबोवा** महाराष्ट्रीय असल्यामुळें कानडी भाषेला पूर्णपणें अनभिज्ञ, आणि धारवाडांत तर मराठी जाणणारे कॉलेजचे विद्यार्थी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेही सांपडणें कठीण; कॉलेजांतील शास्त्री मंडळींची नेहमींची अध्यापनाची पद्धति म्हणजे मातृभाषेंतूनच चालू असलेली; अशा परिस्थितींत शास्त्रीबोवांचें कर्नाटकांतील काम कसें काय होतें इकडे त्यांच्या स्नेही मंडळींचें व कांहीं हितशत्रूंचेंही, निरानिराळ्या हेतूंनीं, लक्ष्य लागून राहिलें. परंतु शास्त्रीबोवांनीं विद्यार्थ्यांना पढवितांना सर्व विषय सोप्या व सरळ संस्कृत भाषेंतूनच समजावून देण्याचा उपक्रम सुरू करून, मित्रांची चिंता दूर केली; व हितशत्रूंचीं तोंडें बंद केलीं. लौकरच सर्व विद्यार्थीवर्गही शास्त्रीबोवांशीं समरस होऊन, त्यांना धन्यवाद देऊं लागला. अशा रीतीनें धारवाडास सहा वर्षें यशस्वी रीतीनें काम केल्यानंतर, गेल्या वर्षापासून त्यांची नेमणूक पुणें येथील डेक्कन् कॉलेजांतील संस्कृत अध्यापकाचे जागीं झाली; व तेथें त्यांचें काम पूर्व लौकिकास साजेशा प्रकारानें अद्यापही चालू आहे.

संस्कृत ही मराठी भाषेची आद्य जननी या नात्यानें संस्कृतांत प्रवीण असलेला महाराष्ट्रीय मनुष्य मराठी भाषेला फारच सुलभ रीतीनें वश करून घेऊं शकतो, हें तत्त्व **वे० रंगाचार्य** यांच्या बाबतींत चांगलेंच प्रत्ययास आलें. शास्त्रीबोवा सातारा येथें नोकरीवर असतां, मराठी शुद्धलेखनाच्या पद्धतीसंबंधीं बराच मोठा वाद उपस्थित होऊन त्यांत **डॉ० भांडारकरां**सारख्या मोठमोठ्या पंडितांनींही भाग घेतला होता त्यावेळीं **रा० शंकरराव हातवळणे** प्रभृति मंडळींनीं, मराठी भाषेंतील अधिकारी **पंडित** या नात्यानें **वे० रंगाचार्य** यांचें मत विचारलें; व तें त्यांनीं सप्रमाण मांडून दाखविलें. शास्त्रीबोवांचीं हीं मतें **कै० बाबासाहेब साने** यांनाही विशेष पसंत पडलीं; व पुढें या विषयाची चर्चा करण्याकरितां म्हणून, मि० कॉव्हर्नटन-पुढें जे शाळाखात्याचे डायरेक्टर झाले-त्यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली असतां, शास्त्रीबोवांचें म्हणणें विस्तृत रीतीनें छापून सभेंत वाटण्यांत आलें. त्यांतील विचारसरणी वगैरेबद्दल त्यावेळीं त्यांच्या प्रतिपक्ष्यांनींही समाधान व्यक्त केलें. हा सर्व वादविवाद त्या वेळच्या ज्ञानप्रकाशच्या अंकांतून प्रसिद्ध झाला आहे. अशा रीतीनें संस्कृतांत रमलेल्या शास्त्रीबोवांची, मराठीशीं पहिली सलामी झाली; व तेव्हांपासून त्यांचे निरानिराळ्या विषयांवरील लेख महाराष्ट्रांतील प्रमुख मासिकांतून वगैरे येऊं

लागले. हलके हलके मराठीच्या क्षेत्रांत यांनीं चांगलेंच स्थान पटकाविलें; व त्यांच्या ग्रंथांची महाराष्ट्रांत चोहोंकडे वाहवा होऊं लागली.

कवि **रामजोशी** यांची **छंदोमंजरी** शास्त्रीबोवांनीं विस्तृत टीपांसह प्रसिद्ध केली; तसेंच भवभूति, कालिदास, वेणीसंहाराचा कर्ता **भट्ट नारायण** या कवींच्या नाटकांवर विवेचनात्मक व टीकात्मक निबंध लिहिले. भासाचीं नाटकें उजेडांत आल्यावेळीं, त्या नाटकांच्या कर्तृत्वासंबंधीं जो मोठा वाद उपस्थित झाला, त्यांतही 'भास कीं आभास ?' हा लेख लिहून शास्त्रीबोवांनीं भाग घेतला; व पुढें जर्मन पंडितांमध्यें या विषयावर चर्चा चालू असतां त्यांत **शास्त्रीबोवांच्या** या लेखाचा आदरपूर्वक निर्देश करण्यांत आला. त्याच-प्रमाणें **रा० पंतपराडकर** यांनीं **मोरोपंतांचे** काव्यग्रंथ प्रकाशित केले, त्यांत **पंतांच्या** कांहीं रामायणांवर **शास्त्रीबोवांनीं** टीपा दिल्या. धार्मिक वाङ्मयां-तील यांची मुख्य सेवा म्हणजे यांनीं आज बरींच वर्षे चालविलेले 'श्रीमध्व-सिद्धांतसुधाकर' हें नियतकालिक होय. **शास्त्रीबोवा** द्वैतसांप्रदायाचे अनुयायी, व महाराष्ट्रांत या सांप्रदायासंबंधीं माध्व म्हणविणाऱ्यांनासुद्धां माहिती नाहीं; यासाठीं, मराठींत द्वैत-सिद्धांताचीं तत्त्वें, धर्माचार, वगैरे सामान्य लोकांना समजेल अशा रीतीनें लेख लिहून मताचा प्रसार करण्याच्या हेतूनें **शास्त्रीबोवांनीं** हें नियतकालिकाचें काम आंगावर घेतलें.या मासिकाचा लौकिक चांगला असून याच निमित्तानें पंजाबमधील 'चतुःसूत्री वैष्णवसभा' या संस्थेने **शास्त्री-बोवांना** 'विद्याभूषण' ही पदवी अर्पण केली.

याशिवाय, कांहीं वर्षांपूर्वी बी० ए० च्या परीक्षेला नेमलेला भावसर्वज्ञ याचा '**न्यायसार**' हा ग्रंथ, शास्त्रीबोवांनीं मराठी भाषांतर, व विषयविवे-चनात्मक विस्तृत टीका लिहून प्रसिद्ध केला; त्यावरून न्यायशास्त्राचीं तत्त्वें कोणा-लाही सहज समजण्यासारखीं आहेत. नाट्यसृष्टींत शास्त्रीबोवांचा विहार वर निर्दिष्ट केलाच आहे,परंतु त्याशिवाय '**मालविकाग्निमित्र**'व'**मृच्छकटिक**' या दोन नाटकांवर त्यांनीं अत्यंत सरस अशा संस्कृत टीका लिहिल्या व पुढें मुंबई सरकारच्या संस्कृत ग्रंथमालेंतून '**काव्यादर्श**' हा दण्डी कवीचा अलंकार-शास्त्रावरील ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें जेव्हां ठरलें, तेव्हां त्यावर टीका लिहिण्याची कामगिरी सरकारांतून शास्त्रीबोवांवर सोंपविण्यांत आली, व ती त्यांनीं आपल्या विद्वत्तेला साजेशी पार पाडली.

वरील सर्वांपेक्षां मराठी भाषेला चिरंतन भूषण होण्याजोगा शास्त्रीबोवांचा ग्रंथ म्हणजे त्यांनीं गेलीं कांहीं वर्षे सतत परिश्रम करून नुकताच संपविलेला, '**श्रीब्रह्मसूत्र-भाष्य-भाषांतर**' हा होय. मराठींत हा ग्रंथ अपूर्व आहे. ब्रह्मसूत्रावरील **श्रीमध्वाचार्यांचें** भाष्य व त्यावरील **श्रीजयतीर्थ** यांची टीका या सर्वांचें मराठी भाषांतर शास्त्रीबोवांनीं करून त्यांत जागोजाग विषयस्पष्टीकरणार्थ टीपा जोडल्या आहेत. या ग्रंथाचें संपूर्ण कार्य शास्त्रीबोवांच्या हातून पार पडलें, हें त्यांस भूषणावह आहे; व हा ग्रंथ त्यांचें नांव पुढील कित्येक पिढ्यांपर्यंत मराठी वाङ्मयांत कायम राखील, यांत कांहीं शंका नाहीं.

**शास्त्रीबोवांची** मराठी व संस्कृत लेखनशैली अत्यंत सहज व रसाळ अशी आहे. निरनिराळ्या प्रसंगानें झालेल्या त्यांच्या संस्कृत कवितांचा संग्रह चार पांचशेंवर होईल. त्याचप्रमाणें यांची मराठी कविताही बरीच आहे. जशी लेखणी तशीच वाणीही शास्त्रीबोवांना वश आहे, हें विशेष लक्षांत घेण्यासारखें आहे. मराठी किंवा संस्कृत भाषेंत सारख्याच ओजस्वितेनें व्याख्यान देणारे लोक महाराष्ट्रांत विरळा सांपडतील; त्यांत शास्त्रीबोवांची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे.

कालमाहात्म्याची छाप शास्त्रीबोवांनीं स्वतःवर विशेष बसवून घेतली नाहीं. ते आपल्या घराण्याच्या परंपरेला धरून संस्कृत **पंडित** म्हणूनच नांवाजले गेले. त्याचप्रमाणें, पूर्णांशानें नाहीं तरी, संस्कृतापुरता वडिलांचा लौकिक पुढेंही चालविणारे त्यांचे चिरंजीव निघाले आहेत. वडील चिरंजीव हल्लीं मुंबईंतील शिक्षकांच्या कॉलेजांत संस्कृत लेक्चरर असून, धाकट्यांनीं येदांच्या बी० ए०त पहिला नंबर पटकावून संस्कृतमधील **भाऊ दाजी** प्राइज मिळविलें.

शास्त्रीबोवांच्या घराण्यांतील विद्याव्यासंगाची पूर्वपरंपरा वर सांगितल्याप्रमाणें असल्यामुळें, व हें महाराष्ट्रांतील जुनें प्रसिद्ध पंडित-घराणें असल्यामुळें, त्याविषयीं येथें थोडी विस्तृत माहिती दिली आहे. शास्त्रीबोवांचा '**छन्दोमंजरी**' हा ग्रंथ व त्यांची **लेखनशुद्धि**विषयक कामगिरी ह्यांमुळें आमच्या पुस्तकांत त्यांस स्थान देणें भाग पडलें आहे.

भाण्डारकर रिसर्च् इन्स्टिट्यूटमधील रा० रा० **श्री० ना० ताडपत्रीकर** यांनीं वरील माहिती कृपा करून लिहून पाठविली, ती जशीच्या तशीच आभारपूर्वक येथें उद्धृत केली आहे.

## ६८. प्रो० माधव त्रिंबक पटवर्धन.



माझा जन्म बडोदें येथें आजोळीं ता० २१ जानेवारी १८९४ या दिवशीं झाला. बाळपणांत स्थलान्तरामुळें कधीं मराठी शाळेंत, तर कधीं गुजराथी शाळेंत, तर कधीं इंग्रजीचें ज्ञान अकालीं लौकर व्हावें अशी इच्छा धारण करणाऱ्या वडिलांच्या करड्या शिस्तीखालीं, मिळून बराच काळ वांया गेला. पुढें १९०४ सालीं बडोदें येथें आजोळीं राहून शिक्षणाला सुरुवात केली. १९०९ सालीं माझी प्रवेशपरीक्षा उतरली. शाळेंतच ऐच्छिक भाषा **फार्शी** घ्यावी लागली. संस्कृत घेतल्यास परीक्षेंत नापासच होण्याचा संभव अशी भीति वाटून, वडिलांनीं **फार्शी** घेण्याची माझ्यावर जबर्दस्ती केली होती: आणि प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाल्यावर तावडतोब मीं नोकरींत शिरुन मार्गाला लागावें, असा त्यांचा आग्रह होता; परन्तु माझे थोरले मामा **रा० महादेव विश्वनाथ सहस्रबुद्धे** यांच्या प्रोत्साहनानें आणि माझ्या (कदाचित् आनुवंशिक) आग्रही व महत्त्वाकांक्षी स्वभावामुळें मीं पदवीधर होण्याचें ठरविलें. मामांच्या व दुसऱ्या एका उदार नातलगाच्या सक्रिय सहानुभूतीमुळें अंशतः परन्तु मुख्यत्वेंकरून शिष्यवृत्त्या व शिकवण्या मिळवून, विद्यापीठांतील अभ्यासक्रम पार पाडून, इ० स० १९१८ सालीं **फार्शी** व **इंग्रजी** हे विषय घेऊन एल्फिन्स्टन् कॉलेजांतून एम्० ए० ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत पास झालों. माझ्या **फार्शी** भाषेच्या प्राविण्याविषयीं अनुकूल अभिप्राय परीक्षकांनीं आपल्या अहवालांत नमूद करुन ठेविला आहे. त्या वर्षी **फार्शी** विषयांत तिघे बसले होते व मी एकटाच उत्तीर्ण झालों; परन्तु हें प्राविण्य संपादण्यांत शाळेंतील वा महाविद्यालयांतील शिक्षण माझ्या उपयोगीं मुळींच पडलें नाहीं. चार-पांच ओळी सुद्धां धड वाचून भाषान्तरितां येत नसूनही, भाषान्तरें व टिप्पण्या घोंकून उदार परीक्षकांना झुकांड्या देऊन, मी निसटून जात होतों: इतकेंच नव्हे, तर पहिल्या वर्गाचे गुण मिळवून १९११ सालीं इंटरच्या परीक्षेंत महाविद्यालयांतीलच फार्शीचें **फरीदुद्दीन अहमद** बक्षीस मीं मिळविलें ! १९१४ सालच्या डिसेम्बर महिन्यांत, फार्शीचे मराठीवर काय संस्कार झाले, या विषयावर पदवीधरीनन्तर काम करावयाचें असें ठरवून, **फार्शी** हा ऐच्छिक विषय घेऊन अभ्यासाला पुनश्च **अलिफ् बे** पेपासून सुरुवात केली; आणि व्याकरण-

कोशादि ग्रंथांना गुरु करून स्वावलम्बी व्यासङ्ग करूं लागलों. त्याच सुमारास, संस्कृतांत ज्यांनीं मुम्बई विश्वविद्यालयाच्या प्रवेश–परीक्षेपासून स्नातक परीक्षेपर्यंत सर्व परीक्षांतील संस्कृताचीं पहिलीं पारितोषिकें मिळविलीं होतीं, अशा एका माझ्या गुरूस **फार्शी** शिकविण्याचा प्रसंग माझ्यावर आला. त्याचा मला तयारीच्या दृष्टीनें फायदा बराच झाला.

१९१८ सालीं मी डेक्कन् एज्युकेशन् सोसायटींत दाखल झालों आणि फर्ग्युसन् कॉलेजांत **फार्शी**च्या **प्रोफेसरा**चें काम केल्यावर कांहीं सभासदांशीं निकराचा बेबनाव झाल्यामुळें १९२५ सालीं राजीनामा दिला. पुणें येथें भरलेल्या पहिल्या प्राच्यविद्यापरिषदेंत " फार्शींतून मराठींत आलेल्या शब्दांच्या परिणतीचे नियम " या विषयावर निबंध वाचला व तो पुढें परिषदेच्या अहवालांत प्रसिद्ध झाला. पुढें बडोदें येथें भरलेल्या मराठीसाहित्यसम्मेलनांत " मराठी लिपीची सुधारणा" या विषयावर निबन्ध वाचला; तो फर्ग्युसन् कॉलेजच्या त्रैमासिकांत प्रकाशित आहे. तदनन्तर "मराठींतील नवीन चलनी वृत्तें" या विषयावर चर्चा व्हावी या हेतूनें एक कच्चा लेख विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध केला. यावेळीं ऐतिहासिक **फार्शी–मराठी कोशा**च्या कामाला मीं सुरवात केली. हा कोश भारतइतिहाससंशोधक–मंडळानें १९२६ सालीं प्रसिद्ध केला. स्थूल मानानें **एकनाथा**पासून **प्रभाकरा**पर्यंत होऊन गेलेल्या लेखकांच्या लिखाणांत, वा ऐतिहासिक कागदपत्रांत आढळणाऱ्या आणि आजच्या बोलींत ऐकूं येणाऱ्या सर्व फार्शी शब्दांचा संदर्भ पाहून व तौलनिक व ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास करून, हा कोश तयार केलेला आहे व मिळविलेल्या सामग्रीच्या आधारें **फार्शी-मराठी** संबंधाचें विस्तृत विवेचन उपोद्घातांत केलें आहे.

फार्शी छन्दःशास्त्राचाही अभ्यास मीं स्वयंस्फूर्तीनें व स्वावलम्बनानें केलेला होता. त्याचें फल म्हणजे अल्मूजम्, दुर्रइ नादिर वगैरे ग्रन्थांच्या आधारें लिहिलेला परन्तु विषयाची मांडणी नव्या तऱ्हेनें करणारा Persian Prosody हा निबंध होय. हा भाण्डारकर विक्तसंशोधनमन्दिराच्या त्रैमासिकांत ( वर्ष ८ अंक ३ ) प्रसिद्ध झाला आहे.

मराठी छन्दःशास्त्रांत मीं जें काम वेळोवेळीं केलें त्याचा समावेश '**छन्दोरचना**' या पुस्तकांत केलेला आहे. रविकिरणमण्डळाचें नववें पुस्तक म्हणून हें पुस्तक नुक्तेंच बाहेर पडलें आहे. यांत संस्कृत व प्राकृत वृत्तें, मराठी अक्षरसङ्ख्याक छन्द, मात्रासङ्ख्याक जाति, यांचा एकमेकांशीं सम्बन्ध व त्याविषयीं माहिती सोदाहरण आहे. ज्यांना चालीवरील पदें म्हणतात त्यांची, व मराठी छन्दांची रचना यांविषयीं केलेलें विवेचन, व बसविलेले सिद्धान्त हें काम अभिनव आहे.

# विभाग पांचवा.

## मराठी भाषेचे युरोपियन व्याकरणकार.

### ६९. फादर थॉमस् स्टीफन्स, (Father Thomas Stephens)

यांचा जन्म इंग्लंडमध्यें विल्टशायर परगण्यांत वुल्स्टन नांवाच्या गांवीं सन १५४९ त झाला. या गांवाहून त्याचा बाप लंडन येथें येऊन राहिला; व तेथें त्यानें व्यापार आरंभून मोठा नांवलौकिक मिळविला; त्यामुळें थॉमसच्या अंगींही त्याच्या वडिलांचे धाडस वगैरे गुण उतरले होते. त्याच्या लहानपणची माहिती फारशी उपलब्ध नाहीं. त्याचें शिक्षण ऑक्सफर्ड येथें न्यू कॉलेजांत झालें. कॉलेजांत तो चांगला हुशार विद्यार्थी होता व त्या कॉलेजचा तो मेंबरही होता; असें कांहीं उपलब्ध माहितीवरून कळतें; परंतु त्या कॉलेजच्या रेकार्डांत त्याचें नांव सांपडत नाहीं. कॉलेज-कोर्सनंतर **थॉमस पौंडे** नांवाच्या एका गृहस्थाशीं त्याचा स्नेह जमला; व हिंदुस्थानांतील मिशनरी लोकांची कामगिरी ऐकून, त्या दोघांच्या मनांत आपणही अशा प्रकारचें कार्य करावें, अशी तीव्र भावना उत्पन्न झाली; आणि म्हणून रोम येथील सेंट् ॲंडिया येथील "सोसायटी ऑफ जझिस्" नांवाच्या संस्थेस जाऊन मिळावें, असें त्यांनीं ठरविलें. त्यावेळीं इंग्लंडमधील कॅथोलिक लोकांना विरुद्धपक्षीयांकडून फार त्रास सोसावा लागत होता; त्यामुळें दुर्दैवानें **पौंडे** यास तेथील राणीच्या अधिकाऱ्यांनीं पकडून भयंकर अशा प्रकारच्या शिक्षा दिल्या. आपल्या मित्राची अशा प्रकारची अवस्था झालेली पाहून थॉमस् स्टीफन्स **रोम** येथें एकटाच निघून गेला. तेथील वर सांगितलेल्या सोसायटीनें सन १५७५ त त्यास आपल्या संस्थेंत दाखल करून घेतलें. तेथें तो जेसुइट म्हणजे कॅथोलिक पंथाचा एक धर्मप्रचारक बनला.

नंतर धर्मप्रसारासाठीं हिंदुस्थानांत पाठविण्याबद्दल त्यानें त्या संस्थेच्या जनरलकडे अर्ज केला. तो मंजूर होऊन त्यास प्रथम लिस्बन येथें पाठविण्यांत आलें. तेथून तो सन १५७९ च्या एप्रीलमध्यें हिंदुस्थानांत येण्याकरितां निघालेल्या पांच जहाजांपैकीं एकांत बसून, ऑक्टोबरमध्यें गोवें येथें येऊन पोंचला. त्यानंतर सुमारें एक महिन्यानें त्यानें आपल्या भावास लिहिलेल्या पत्रांत खालीलप्रमाणें गोव्याच्या मिशनरी लोकांच्या परिस्थितीबद्दल लिहिलें आहे:—

"येथील रहिवासी ख्रिस्ती धर्माच्या अगदीं विरुद्ध आहेत; व आज कित्येक वर्षे ते येथील ख्रिस्ती लोकांचा कांहीं उघडपणें व कांहीं गुप्त रीतीनें छळ करीत आहेत. ( १ ) **रूडाल्फ** नांवाचा एक ख्रिस्ती एका मोगल बादशहाच्या आश्रयास होता, तो गोव्यास आला, तेव्हां येथील कांहीं रहिवाशांनीं त्यास ठार केलें.(२) **पीटर वर्नो** नांवाच्या ख्रिस्त्याचे दोन साथीदारही असेच ठार करण्यांत आले होते.(३) **आल्फान्सो** नांवाचा एक स्पॅनिश गृहस्थ रोममधून हिंदुस्थानांत आला होता, त्यानें आपल्या बरोबर १३ साथीदार आणिले होते. त्यानें येथें आल्याबरोबर Cuncolim Temple (कणकवली?) नांवाच्या एका हिंदूंच्या देवालयास आग लाविली आणि तेथील मूर्तीपुढें एक गाय मारिली; ( पणजीहून उत्तरेकडे वेंगुर्लें ५ मैल व लगेच देवगड आणि देवगड तालुक्यांत कणकवली देवस्थान आहे तें हेंच असावें काय ? ) तेव्हां तेथील रहिवाशांनीं त्यास पकडून त्याचे डोळे काढिले; व डोक्याची कवटी फोडून त्यास ठार केलें. (४) **फादरॲंटनी फ्रान्सिस्को** हा पोर्तुगीज गृहस्थ गोव्यास आला; त्यावेळीं कांहीं लोकांची कत्तल करण्यांत आली, त्यांत हाही होता.'

**थॉमस् स्टीफन्स**च्या वेळची कांहीं अंशीं धार्मिक परिस्थिति मराठी वाचकांच्या ध्यानांत यावी म्हणून हा उतारा दिला आहे. या उताऱ्यावरूनसुद्धां मूळच्याच परमतसहिष्णु अशा हिंदु लोकांचीं देवळें फोडणें, त्यांसमोर गाई मारणें व लोक बाटविणें, यांत विशेष किंवा अयोग्य असें कांहींच नसून, त्याचा हिंदु लोकांनीं प्रतिकार करणें म्हणजे मात्र ख्रिस्त्यांचा अमानुष छळ होय; असा गवगवा किंवा कांगावा मात्र या लोकांचा तेव्हांपासून स्पष्ट दिसून येतो. असो.

पुढें **थॉमस् स्टीफन्स्** ह्यास गोव्याचा प्रीस्ट करण्यांत आलें. त्याला ज्याच्या जागेवर नेमण्यांत आलें, त्यानें एक ब्राह्मण मुलगा बाटवून ख्रिस्ती केलेला त्याच्या स्वाधीन केला. त्याजवळून त्याच्या नातेवाइकांनीं त्यास पळवून नेलें; व त्यास पुनः स्वधर्मांत आणण्याची पुष्कळ खटपट केली; पण तो परत पळून गेला.

ह्याप्रमाणें फादर स्टीफन्सचे ३० वर्षेंपर्यंत अशा प्रकारचे धर्मप्रसाराचे उद्योग तेथें चालू होते; व त्या जागेवर तो ३० वर्षें काम करीत होता. त्यानें गोव्यास सेंट् पाल नांवाची एक ख्रिस्ती लोकांची वसाहत स्थापन केली. हा धर्मानें कॅथोलिक होता, तरी त्याची प्रॉटेस्टंट पंथीयांविषयीं अनुदार वृत्ति नव्हती. तो फादर असतांना २।३ वेळां त्यास धर्माकरितां मरण्याचा प्रसंग आला होता असें म्हणतात; पण त्या प्रसंगांची माहिती उपलब्ध नाहीं.

त्यानें आपल्या देशबांधवांकरितां व बाटून ख्रिस्ती झालेल्या बांधवांकरितां अनेक प्रकारचे प्रयत्न केले; त्यांत कांहीं पुस्तकेंही लिहिलीं. त्यांपैकीं उपलब्ध अशीं थोडींच आहेत; ह्याचें कारण त्यांची सोसायटी १७७३ त मोडली; आणि तेव्हांपासून सुमारें १०० वर्षें तेथील कोंकणी लोकांना बाटविण्याचा व्यवसाय बंद राहिला; त्याबद्दल फादर स्टीफन्साविषयीं लिहीत असतांना त्या लेखकानें दुःखोद्गार काढिले आहेत. फादर स्टीफन्स हा सन १६१९ मध्यें, म्हणजे सर **टॉमस रो**च्या जहांगीरच्या कारकीर्दीतील वकिलातीनंतर मृत्यु पावला. हिंदुस्थानांत जलमार्गानें आलेला हाच पहिला इंग्रज गृहस्थ होय, असें म्हणतात. त्याचें महत्त्वाचें जें कार्य मानितात तें हें कीं, त्यानें आपल्या वडिलांस हिंदुस्थानासंबंधीं जीं उत्साहपूर्ण वर्णनपर अशीं पत्रें पाठविलीं आहेत, त्यांयोगानेंच इंग्लंडांतील लोकांना हिंदुस्थानांत व्यापार करण्यास येण्याची स्फूर्ति उत्पन्न झाली.

**ख्रिस्त-पुराण, कोंकणी मराठीचें व्याकरण,** वगैरे त्याचे ग्रंथ आहेत. त्याच्या त्या पुस्तकांवरून त्याचा उद्योग मात्र अचाट दिसतो. **ख्रिस्तपुराण** हा सुमारें ६०० पानांचा ओंवीबद्ध मराठी ग्रंथ असून, तो ख्रिस्ती बाटलेल्या लोकांकरितां आहे; आणि तो सर्व रोमन लिपींत लिहिलेला आहे. नमुन्याकरितां त्याच्या आरंभींच्या कांहीं ओळी येथें देतों. या ख्रिस्तपुराणांतील व त्याच्या चरित्राचा भाग येथें सारांशरूपानें उद्धृत केला आहे; आणि कोंकणी मराठीचें त्यानें स्व–कार्याकरितां का होईना, व्याकरण केलें, म्हणून " मराठी भाषेच्या व्याकरणकारांत " त्याचा समावेश करणें व त्याचें येथें अल्प चरित्र देणें आवश्यक झालें आहे.

| PAILEM PURANNA | **पैलें पुराण** |
|---|---|
| VO NAMO VISVABHARITA | वो नमो विश्वभरिता । |
| DAVA BAPA SARVA SAMARATHA | देवा बापा सर्व समर्था । |
| PARAMESVRA SATEUANTA | परमेश्वरा सत्यन्ता । |
| SVARGA PRATHVICHEA RACHANNARA | स्वर्ग पृथ्वीचिया रचणारा १ |

अथपासून इतिपर्यंत हें पुराण अशाच प्रकारच्या लिपींत आहे. अद्यापिही गोव्याकडे मराठी लिहिण्यांत या लिपीचा उपयोग तिकडील किरिस्तांव लोक करितात, असें आढळून येतें. कर्त्यानें आपल्या व्याकरणाच्या पुस्तकास "कोंकणी मराठीचें व्याकरण" असें नांव दिलें आहे. परंतु गोव्याकडील मराठी व कोंकणी रत्नागिरीकडील मराठी यांत अन्तर आहे; म्हणून तें कोंकणी मराठीचें व्याकरण नसून, गोवानीज मराठीचें आहे; असें **रामभाऊ जोशी** म्हणतात.

**फादर स्टीफन्स्**संबंधानें **राजारामशास्त्री भागवत** ह्यांनीं 'विस्तारा'च्या ३७ व्या पुस्तकांतील १२ व्या अंकांत वरच्यापेक्षां कांहीं निराळी माहिती दिली आहे. " मराठीचा एक कॅथोलिक भक्त " या मथळयाखालीं शास्त्रीबोवांनीं खालील माहिती दिली आहेः—

[ **फादर स्टीफन्स्** यानें जुन्या कराराच्या आधारावर पहिलें पुराण रचिलें, व नव्याच्या आधारावर दुसरें रचिलें. पहिल्याचे ३६ व दुसऱ्याचे ५९ अवस्वरू आहेत. सगळा ग्रंथ ११०१८ चार चरणीं अभंग आहेत. या पुराणाची प्रथमावृत्ति १६१६ त, दुसरी १६४९ त, व तिसरी १६५४ त प्रसिद्ध झाली. **स्टीफन्सनें** गोमांतक प्रांतांतल्या साष्टी तालुक्यांत (त्यावेळीं साष्टी प्रांत गोमांतकांत पोर्टुगीजांच्या अमलाखालील म्हणून मोडत असावा, असें दिसतें.) आपलें वय घालविलें. हे लोक आपल्यास ख्रिश्चन मराठे म्हणवीत असले पाहिजेत. **स्टीफन्स्** मराठी भाषेबद्दल पहिल्याच अवस्वरांत म्हणतोः—

परमशास्त्र जगीं प्रगटावया। बहुता जनां फळसिद्धी व्हावया। भाषा वांचोनि मराठिया। कथा निरोपिली (ओवी १२१). पुढें १२२ ते १२५ ह्या चार चरणी अभंगांत **मराठीच्या पोवाडा** ह्या इंग्रजानें खालीलप्रमाणें गाइला आहे—

" जैशी हरळांमाजी रत्नकुइळा। कीं रत्नांमाजी हिरा निळा। तैसी भाषांमाजी चोखळा। भाषा मराठी ॥ १२२ ॥ जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी। कीं परिमळामाजी कस्तूरी। तैसी भाषांमाजी साजिरी। मराठिया ॥ १२३ ॥ पखियांमध्यें मयोरु। वृखियांमध्यें कल्पतरु। भाषांमध्यें मानूं थोरु। मराठिये ॥ १२४ ॥ तारांमध्यें बारा राशी। सप्त वारांमाजी रवी-शशी। या द्वीपींचिया भाषांमध्यें तैशी। मराठीया ॥ १२५ ॥"

याप्रमाणें ह्या कॅथोलिक इंग्रजास मराठीचा केवढा तरी अभिमान होता. त्यानें वरील रचनेस '**अभंग**' म्हटलें आहे. ओवी व चार चरणी अभंग यांच्यामधलें अन्तर फारच सूक्ष्म असतें, त्यामुळें त्यानें ह्या ओव्यांस अभंग म्हटलें असावें.

हा जन्मानें इंग्रज असून मराठा बनला होता. जेसुइट फादरांपैकीं असल्या-मुळें, ब्रह्मचर्य व अपरिग्रह हीं दोन महाव्रतें घेतलेल्यांपैकीं तो होता. यांस ब्राह्म-णांच्या परमहंस परिव्राजकांमध्यें किंवा जैनांच्या संवेगीमध्यें कां न घालावें ? **एकनाथ** व **स्टीफन्स्** हे दोघे एकाच वेळीं मराठीचे सारखेच कैवारी होते. आपण तिच्या पदरीं पडून, **स्टीफन्सनें** तिचा कैवार घेतला; जिच्या मांडीवर हा आपण होऊन बसला, त्या आईची ह्या दत्तक पुत्रानें तीन तपांवर सांगोपांग शुश्रूषा करून, धन्यता मिळविली. ]

परिव्राजक **फादर स्टीफन्स्** ह्याच्याहून जुनें गद्य मराठींत उपलब्ध नाहीं; त्याच्या त्या गद्य प्रस्तावनेचा परिच्छेद भागवत ह्यांनीं दिला आहे; परन्तु महा-नुभावीयांचें गद्यवाङ्मय आतां कितीं तरी उपलब्ध झालें असल्यानें **राजाराम-शास्त्री** यांचें हें विधान अर्थात् चुकीचें ठरलें आहे.

---

## ७०. डॉ० वुइल्यम केरी. ( Dr. William Carey ).

" मराठींत छापिलेला पहिला ग्रंथ " ह्यासंबंधाची चर्चा सुमारें दहा वर्षां-पूर्वीं केसरी, नवयुग, विविधज्ञानविस्तार,यांत चालू होती. त्यांत कलकत्त्याचे राय-बहादुर **बाळकृष्ण आतमाराम गुप्ते**, मुंबईचे **सुंदरराव भास्कर वैद्य**, इत्या-दिकांनीं संशोधनपूर्वक बरीच माहिती दिली आहे; तींतील डॉ० **केरीसंबंधीं** निवडक तेवढीच माहिती खालीं दिली आहे.



डॉ० **वुइल्यम केरी** हे एक इंग्रज गृहस्थ असून सन १७९२ मध्यें विधर्मी लोकांस पवित्र शास्त्राचा उपदेश करण्याकरितां जी " बॅप्टिस्ट मिशनरी सोसायटी " विलायतेंत काढण्यांत आली होती, तिनें 'ईस्ट इंडिया' कंपनीचे शिप् सर्जन् डॉ० **टॉमस्** हे बंगालमधून इंग्लंडास परत गेले होते, त्यांस आपलें मिशनरी नेमिलें; आणि परत येतांना डॉ० **केरी** यांस त्यांच्या बरोबर हिंदुस्थानास पाठविलें. हे प्रथम बंगालमध्यें मदनाबत्ती येथें निळीची लागवड करणारे शेतकरी म्हणून


राहिले होते. त्यांजवर सरस्वती देवीचा वरदहस्त होता. लहानपणींच त्यांस लॅटिन्, हिब्रू, ग्रीक, फ्रेंच, डच, व इटालियन् इतक्या भाषा येत होत्या. जहाजांत असतांनाच ते टॉमस यांचेजवळ बंगाली भाषा शिकले व मदनावत्ती येथें संस्कृत शिकले. त्यांस मिशनरी असें आपणांस म्हणवून घेतां आलें नाहीं. कारण, त्यावेळीं हिंदुस्थानांतील कोणत्याही धर्मांत ब्रिटिश कामगारांनीं हात घालूं नये, असा कंपनी सरकारचा सक्त हुकूम होता. त्यावेळीं कांहीं पाद्री लोकांस कंपनीकडून ह्या कायद्याअन्वयें कलकत्त्यांतून हाकूनही देण्यांत आलें होतें; म्हणून डॅनिश् सरकाराची वसाहत कलकत्त्याजवळच '**श्रीरामपुर**' येथें होती, त्या ठिकाणीं **टॉमस्** व **केरी** हे येऊन राहिले. **टॉमस्** हे वेड लागून १८०० मध्यें लौकरच मृत्यु पावले.


**केरी** यांच्या संबंधानें **रायबहादुर** गुप्ते यांचा असाही उल्लेख आढळतो— हे **प्रो० केरीसाहेब** होते तरी कोण ? ते इंग्रजच होते, पण आपल्या गांवीं त्यांस फाटके जोडे शिवण्याची पाळी आली होती. जोडे चांगले शिवतां येईनात, काम पडलें घाणेरडें, तेव्हां पश्चात्ताप पावून साहेबांस उपरति झाली. त्यांचें मन धर्माकडे वळलें. परमात्म्याकडे लय लागल्यामुळें भगवान् यांस प्रसन्न झाला ! त्यानें गजानन महाराजांस आज्ञा केली कीं, आपला वरदहस्त **केरी** साहेबांच्या मस्तकावर ठेव. त्यानें तत्काल सरस्वतीमातेस आज्ञापिलें कीं, बैस यांच्या जिव्हाग्रीं ! मग काय विचारतां ! टोणग्याच्या तोंडून वेद म्हणविणारा परमात्माच प्रसन्न झाला तेथें काय कमी !

हे १७९२।१७९३ चे सुमारास इकडे आल्यावर इतक्या लौकर संस्कृत शिकले कीं १८०२ चे सुमारास ते वेदांचा अभ्यास करूं लागले. त्यापूर्वी १७९८ च्या सुमारास त्यांनीं एक जुना लाकडी छापखाना विकत घेतला होता. तो पुढें जळला. पुढें १८०० मध्यें लॉर्ड वेल्स्ली यानीं कलकत्त्यास फोर्ट वुइल्यम् किल्यांत इंग्रज लोकांस देशी भाषा शिकविण्याकरितां एक कॉलेज काढिलें, त्यांत डॉ० **केरी** यांस बंगाली, मराठी, संस्कृत ह्या तीन भाषांचे प्रोफेसर नेमिलें! त्यांनीं ह्या भाषा शिकवून शिवाय त्यांजकडे गव्हर्नमेंट् ट्रान्सलेटरचेंही काम होतें. डॉ० केरी ह्यांच्या पूर्वी संस्कृतांत अस्खलित बोलणारा युरोपियन पंडित एकटा **कोल्ब्रुक** साहेब हाच होता. वेल्स्लीच्या ह्या कॉलेजाचे उद्देश अतिशय धोरणाचे व शहाणपणाचे होते. हिंदी लोकांच्या भाषा व विद्या यांत आपले लोक निष्णात करून, त्यांचीं शास्त्रें व कायदे-कानू तद्द्वारा समजून घेऊन, त्यांजवर आपली

छाप पाडण्याचें कार्य व ज्यांच्यांवर राज्य करावयाचें ते लोक अपल्या हुकमतींत राहूं शकतील याची तजवीज, या कॉलेजच्या द्वारें वेल्स्लीनें केली.

**डॉ० केरींच्या मराठी व्याकरणाचे अन्तर्भाग व मुखपृष्ठ.**





सन १८०३ मध्यें **श्रीरामपूरच्या** मिशनरींनीं हिंदुस्थानांतील जितक्या भाषांत बायबलाचें भाषान्तर करितां येईल, तितक्या भाषांत तें करावयाचें, असा निश्चय केला व लगेच त्या कामास सुरवातही केली. ह्या कामाकरितां त्यांनीं कांहीं देशी पंडितांची मदत घेतली. एकंदर ४० भाषांत या साहेबांनीं बायबलचें भाषांतर करून छापिलें !

**श्रीरामपुर** कॉलेजचे प्रिन्सिपॉल जॉर्ज् **बेल्साहेब** ह्यांनीं १९१३ त तेथील कॉलेजांतील लायब्ररींत **केरी** साहेबांच्या अमलांत छापलेलीं मराठी पुस्तकें पुढील प्रमाणें दिलीं आहेत. (१) मराठी व्याकरण १८०५त छापलेलें.हें इंग्रजींत छापलेलें मराठी भाषेचें व्याकरण आहे. ( २ ) सेंट मॅथ्यू, १८०५. ( ३ ) बायबल पांच भाग, १८०७ ते १८२१ व (४) न्यू टेस्टामेंट दुसरी आवृत्ति १८२४.

डॉ० **केरी** यांस मदत करणारा मराठी पंडित **वैजनाथ** किंवा **वैद्यनाथ** हा होता. सुमारें ४० वर्षें सक्त मेहनत करून, व ह्या देशांत पुस्तकांचा एकंदरींत त्या वेळच्या मानानें पाऊस पाडून, डॉ० **केरी** १८३४ त ख्रिस्तवासी झाले. याप्रमाणें **मराठीचा इंग्रज व्याकरणकार** म्हणून यांची कामापुरती माहिती येथें देण्यांत आली आहे.

---

## ७१. कॅप्टन् जॉर्ज् जर्व्हिस् ( George Gervis ).

पुस्तक–प्रकाशकांच्या आरंभींच्या प्रमुख मंडळींत पेशवाईनंतर यांचें नांव वारंवार येतें. त्यांची सामान्य माहिती खालीलप्रमाणें:–

**मॉट् स्टुअर्ट् एल्फिन्स्टन्** साहेब हे पुण्याचे रेसिडेंट् म्हणून होते; त्यांनीं अखेरीस पेशवाई खालसा केल्यानंतर, त्यांसच मुंबई इलाख्याची सुभेदारी म्ह० गव्हर्नरशिप् प्राप्त झाली. त्यांच्या सात वर्षांच्या कारकिर्दींत राज्यक्रान्तीबरोबर महाराष्ट्रांत दुसऱ्याही पुष्कळ घडामोडी झाल्या. त्यांत "नेटिव्ह एज्युकेशन् सोसायटी" ची स्थापना ही एतद्देशीयांच्या विद्यावर्धनास चालन देणारी व नवयुगास प्रारंभ करणारी मोठी घडामोड होय. या सोसायटीची स्थापना ता० ११ ऑगस्ट १८२२ रोजीं झाली. एल्फिन्स्टन् साहेबांनीं या सोसायटीस वार्षिक

५ हजार पौंडांची सरकारी मदत चालू केली; व **कॅप्टन् जॉर्ज् जर्व्हिस्** यांना त्यांनीं सोसायटीचे पहिले सेक्रेटरी नेमिलें. हे सुमारें ७ वर्षें ह्या कामावर होते; आणि सोसायटीचे अध्यक्ष प्रथम **एल्फिन्स्टन्** गव्हर्नर व नंतर माल्कम् गव्हर्नर हे होते. एकंदर सहा उपाध्यक्ष होते; पण त्यांत सुरतचे नबाब हे एकटेच देशी गृहस्थ होते. व्यवस्थापक-मंडळांत १३ युरोपियन व ११ एतद्देशीय गृहस्थ होते. सदाशिव काशीनाथ उर्फ **बापू छत्रे** हे नेटिव्ह सेक्रेटरी होते व त्यांच्या मागून डे०ने०से० **बाळशास्त्री जांभेकर** यांस पेन्शनींत जाण्यापूर्वी ती जागा मिळाली होती. युरोपियनांत **मोल्स्वर्थ, कॅंडी** व **जर्व्हिस्** ही प्रमुख मंडळी होती. या सोसायटीचा आरंभींचा इतिहास म्हणजेच एकप्रकारें **जर्व्हिस्** साहेबांच्या कामगिरीचा इतिहास होय; म्हणून सोसायटीसंबंधाचीही वरील माहिती येथें देणें योग्यच आहे.

या सोसायटीकडून जीं पुस्तकें प्रथम प्रथम प्रसिद्ध झालीं, तीं बहुतेक सर्व कॅ० **जर्व्हिस्** साहेब व **बापू छत्रे** यांनीं तयार केल्याचें नमूद आहे. यांत कोशादिकांमिळून २०१२५ ग्रंथ आहेत. या सोसायटीच्या पंडितमंडळाकडून एक मराठी व्याकरण तयार झालें होतें; व दुसरें एक "व्याकरण" पंडितमंडळाकडूनच छापण्यास तयार असें झालेलें होतें; एवढाच व्याकरण-ग्रंथासंबंधीं उल्लेख रिपोर्टांतून आहे.

स्वतः **जर्व्हिस्** यांनीं (१) अंकगणित, (२) कर्तव्यभूमिति, (३) अधिकरण भूमिति, (४) बीजगणित, (५) त्रिकोणमिति, (६) क्षेत्रफळ-घनफळ, (७) प्रिलिमिनरी ट्रीटिज्, (८) लाग्रतम, (९) शिक्षामाला, इ० गणित-विषयक ग्रंथ तयार केले होते; त्याचप्रमाणें सोसायटीनें गुजराथी, संस्कृत, फारसी, इंग्रजी, तुर्की, ब्रह्मी, इ० ग्रंथही छापविले; तिच्या कामाचा असा दांडगा पसारा होता; व जमा-खर्चाची पाऊण लाखांपर्यंत वार्षिक उलाढाल होती.

"गणितमार्ग" म्हणून १८२६ त छापलेलें एक **जर्व्हिस**चें पुस्तक ठाण्याच्या मराठी ग्रंथसंग्रहालयांत आहे. तें **जगन्नाथशास्त्री क्रमवंत** यांचे साह्यानें केल्याचा त्यावर उल्लेख आहे. **जर्व्हिस्** हा शिल्पशाळेवर म्हणजे School of Engineering वर मुख्य होता; ह्यामुळें त्यास ह्या ग्रंथांवांचून काम चालविणें अवघड पडलें असावें; म्हणून हे ग्रंथ उदयास आलेसें दिसतें.

ग्रंथप्रकाशनाच्या उत्तेजनासाठीं मंडळानें १०० ते ४०० रु० पर्यंतचीं बक्षिसें भाषान्तरें किंवा नवीन बालबोध ग्रंथ लिहिणारांकरितां ठेविलीं होतीं. "दोन ते पांच हजारांपर्यंत किंवा याहूनहीं विशेष केल्यास **गौरनर** यांस विशेष शिफारस होईल" असें प्रसिद्धिपत्रकांतून जाहीर केलें होतें.

या ग्रंथासंबंधानें एक विशेष असा कीं, **जर्व्हिस्** यास **जगन्नाथशास्त्री क्रमवंत** यांनीं; **केपिन** यास **बाबा साने** यांनीं; **मॅकलेनान्** यास **सोहनी शास्त्री** यांनीं; साह्य केल्याचा ग्रंथांच्या आरंभींच्या प्रतींतून उल्लेख तरी आहे, पण पुढील आवृत्तींतून हीं नांवें गाळण्यांत आलीं आहेत.

**जर्व्हिस**साहेबांबद्दल आणखी माहिती मिळाली नाहीं.

---

## ७२. जॉन् बीम्स्. ( John Beames).

**जॉन् बीम्स्** यांचा जन्म ' ग्रेनिज ' येथील हॉस्पिटलमध्यें इंग्लंडांत झाला; ( २१ जून १८३७ ). 'Merchant Taylor's school' मध्यें त्यांचें शिक्षण झालें. नंतर इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें नेमणूक झाली. हेलिबरी (Haileybury) येथें १८५६।१८५७ मध्यें त्यांस संस्कृतमध्यें बक्षिस व पर्शियनमध्यें प्रावीण्य दाखविल्याबद्दल पदक मिळालें होतें. १८५८ त ते हिंदुस्थानांत आले. १८५९ ते १८६१ मध्यें ते पंजाबमध्यें कामावर होते; व नंतर त्यांची बंगालमध्यें नेमणूक झाली. १८६६ त त्यांनीं पहिले लेख लिहिले. " हिंदुस्थानांच्या सरकारी स्वरूपांत आरबी शब्द ठेवावे कीं नाहीं, " या विषयावर ते लेख होते. १८६८ त हिंदी भाषाशास्त्राची रूपरेषा, नेपाळी भाषा व भोजपुरी भाषा, यांवर त्यांनीं लेख लिहिले. १८६७ मध्यें ते कलेक्टर व १८८१ त कमिशनर झाले बिशप Caldwell चें द्राविडी भाषांचें तुलनात्मक व्याकरण या ग्रंथानें भाषाशास्त्राकडे त्यांचें चित्त वेधलें. १८७२ त आर्य भाषांचें व्याकरण प्रसिद्ध झालें. १८८५ पर्यंत बंगाल ऐतिहासिक सोसायटीशीं त्यांचा संबंध होता; व ' चंदवरदाई ' यावर त्यांनीं लेख लिहिला. १८९१त त्यांनीं बंगाली भाषेचें व्याकरण लिहिलें व१८९३त पेन्शन् घेतलें.पंजाबी जाटांची भाषा, उरिया, बंगाली शेतकऱ्यांची भाषा, व बिहारची भोजपुरी भाषा, यांत ते प्रवीण होते. यांनींच **डॉ० ग्रीयर्सन** यांस बरेंच उत्तेजन दिलें. हे २४ मे १९०२ रोजीं मरण पावले.

---

## ७२. होर्न्ले. (Augustas Frederick Rudolf Hoernle.)

ऑगस्टस् फ्रेड्रिक् रुडाल्फ होर्न्ले साहेब यांचा जन्म आग्र्याजवळ शिकंदरा येथें १९ ऑक्टोबर १८४१ मध्यें झाला. यांचे वडील " चर्च मिशनरी " सोसायटीमध्यें नोकर होते. यांस सन १८४८ त युरोपमध्यें शिक्षणासाठीं पाठविलें. Wurtemburg (वुर्टेंबुर्ग) येथें त्यांचे प्राथमिक शिक्षण झालें. १८५८ त Basle येथें युनिव्हर्सिटीच्या शिक्षणाचा आरंभ होऊन, १८६० त Gold-Stucker (संस्कृत 'पाणिनी' संबंधीं निबन्धकार) यांजवळ लंडन येथें पुढील शिक्षण झालें. १८६५ त ते हिंदुस्थानांत परत आले; व बनारस येथें " जयनारायण " कॉलेजांत तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर म्हणून त्यांनीं काम केलें. १८७२ त " गौडी भाषांचें तुलनात्मक व्याकरण " हा निबन्ध त्यांनीं प्रथमतः लिहिला. ह्यानंतर "उत्तर-हिंदुस्थानांतील भाषांचें तुलनात्मक व्याकरण" हा निबन्ध १८७३-७७या कालांत रजेवर असतांना इंग्लंडांत लिहिला.हे दोन्ही निबन्ध त्यांनीं हिंदुस्थानांत पुनः परत आल्यावर प्रसिद्ध केले. त्याच वेळीं 'Beames'चें-ही व्याकरण प्रसिद्ध झालें होतें. १८७२ ते ७९ पर्यंत 'एशियाटिक सोसायटी-बंगाल' चे ते सेक्रेटरी होते. १८७८ ते १८८१ मध्यें ते'कॅथिड्रल मिशन कॉलेज-कलकत्ता येथें प्रिन्सिपॅल होते. नंतर ' कलकत्ता-मदरसा ' चे प्रिन्सिपल झाले. **डॉ० ग्रियर्सन्** बरोबर यांनीं ' बिहारी भाषांचा कोश ' लिहिण्यास आरंभ केला; पण तो पुरा झाला नाहीं. १८८१ त वायव्य सरहद्दीवर '**बख्शाली**' येथें त्यांस भूर्ज-पत्रावर लिहिलेले कांहीं त्रुटित लेख सांपडले; त्यांचें त्यांनीं अध्ययन केलें.१८९१ त त्यांनीं एशियाटिक सो०-बंगालच्या सेक्रटरीच्या जागेचा राजीनामा दिला व इंग्लंडमध्यें त्यांनीं प्रयाण केलें. नंतर त्याच वर्षी परत आल्यावर Bower साहेबांनीं भूर्जपत्रावरील ग्रंथ आणिला; तो मध्य-आशियांत "कुचा" (Kuchs) या गांवीं सांपडला होता;तो जुन्या लिपींतील असल्यामुळें कोणास लागत नव्हता; पण होर्न्ले साहेबांनीं बरीच मेहनत घेऊन तो वाचला व त्यामुळें होर्न्ले साहेबांची कीर्ति फार झाली. हा ग्रन्थ वैद्यकपर असल्यानें त्यांनीं वैद्यकाचाही अभ्यास सुरू केला. त्यांस १८९७ त C. I. E. हा किताब मिळाला; व १८९९ त त्यांनीं पेन्शन् घेतलें. ' रॉयल् एशियाटिक् सोसायटी"चे ते इंग्लंडांत असतांनाही कौन्सिलर व व्हाइस् प्रेसिडेन्ट् होते. पूर्वतुर्कस्थानांत सांपडलेल्या हस्तलिखित

ग्रंथांचें वाचन व प्रसिद्धि त्यांनीं केली. त्यांनीं संस्कृत व पाली प्राकृत, जैनधर्म, निरनिराळीं प्राचीन नाणीं, शिलालेख, आधुनिक प्राकृत भाषा, बख्शाली व इतर ठिकाणीं सांपडलेले हस्तलिखित ग्रंथ, व हिंदी वैद्यक, इत्यादिकांवर सुमारें १२५ लेख प्रसिद्ध केले. गेल्या जर्मन युद्धामुळें त्यांस फार दुःख झालें व शांतता होण्यासाठीं ते फार उत्कंठेनें वाट पहात होते. अखेरीस युद्ध थांबल्याचें ऐकल्या-वर ता० १२ नोव्हेंबर १९१८ रोजीं ते मृत्यु पावले.

---

## ७४.सर जॉर्ज ग्रियर्सन् (Greirson, Sir George Abrham.)

यांचा जन्म १८५१ त डब्लिन परगण्यांत 'ग्लेनागरी' या गांवीं जानेवारी ता०७ रोजीं झाला. हे जॉर्ज अब्राहाम ग्रीयर्सनचे वडील चिरंजीव होत. यांच्या आईचें नांव लुसी एलिझाबेथ जीन हें होय. ह्यांचें शिक्षण सेंट् बीज आणि श्रूज-बरी व डब्लिन येथील ट्रिनिटी कॉलेजांत झालें. यांना गणित-विषयांतील प्राविण्याबद्दल त्या परीक्षांत प्रशंसापत्र मिळालें. डाब्लिन युनिव्हर्सिटीमध्यें हिंदुस्थानी आणि संस्कृत भाषांचें दिग्दर्शक ( Exhibitioner ) म्हणून त्यांस नेमिलें. हे हाल युनिव्हर्सिटीचे पी० एच्० डी० १८९४ त झाले. १९०२ मध्यें डब्लिन् युनिव्हर्सिटीनें त्यांना डी० लिट्ची पदवी दिली. केंब्रिज युनिव्हर्सिटीकडून त्यांना १९२० सालीं एल्० एल्० डी० ची पदवी मिळाली. बिहार व ओरिसा मधून त्यांना "**वागीश**" ही पदवी देण्यांत आली. ते कलकत्ता युनिव्हर्सिटीचे कांहीं काल फेलो होते. हे प्रथम १८७३ सालीं इंडियन सिव्हिल सर्व्हिसमध्यें नेमले गेल्यामुळें हिंदुस्थानांत आले. १८८० सालीं बिहार भागामध्यें ते शाळाधिकारी म्हणून नेमले गेले. १८८७ सालीं ते गया येथें मॅजिस्ट्रेट व कलेक्टर होते. १८९२ सालीं त्यांस हावरा येथें मॅजिस्ट्रेट नेमण्यांत आलें. १८९६ मध्यें पाटणा येथें ते जादा कमिशनर होते. १८९६ त बिहार भागापुरते ते अफूचे एजंट म्हणून होते. १८९८ ते १९०२ पर्यंत गव्हर्नमेंट् ऑफ इंडियानें त्यांची खास नेमणूक हिंदुस्थानांतील भाषाविषयक पाहणीकरितां केली. बंगाली व संस्कृत ह्या भाषांत

ते चांगले प्रवीण आहेत. ब्रिटिश अकॅडमी, बंगालची एशियाटिक् सोसायटी, आणि रॉयल डॅनिश अकॅडमी ऑफ् सायन्सीस् ह्या संस्थांचे ते फेलो आहेत. त्याचप्रमाणें अमेरिकन् ओरिएंटल् सोसायटी, बनारस येथील नागरी प्रचारिणी सभा, फ्रान्समधील प्राच्यविद्यामंदिर, इंटरनॅशनल् फोनेटिक् असोसिएशन्, बिहार व ओरिसा येथील संशोधन-संस्था व मॉडर्न लँग्वेज् असोसिएशन् वगैरे संस्थांचे ते सभासद आहेत. रॉयल एशियाटिक् सोसायटीकडून १९०९ सालीं त्यांना एक सुवर्णपदक देण्यांत आलें. त्या संस्थेचे हल्लीं ते उपाध्यक्ष आहेत. यांनीं लिहिलेलीं पुस्तकें खालीलप्रमाणें:—

( १ ) हँड् बुक ऑफ धि कयाथी कॅरेक्टर ( प० आ० १८८०, दु० आ० १८९९ ).

( २ ) मैथिली भाषेचें इंट्रोडक्शन् (प० आ० १८८१, दु० आ० १९१० ).

( ३ ) बिहारी भाषा व उपभाषा यांचीं व्याकरणें.

( ४ ) बिहारमधील शेतकऱ्यांचा जीवनक्रम ( १८८५ ).

( ५ ) हिंदुस्थानांतलि देशी भाषांमधील अर्वाचीन वाङ्मय ( १८८९ ).

( ६ ) सत्सय्या बहारी ( १८९६ ).

( ७ ) काश्मिरी व्याकरणावरील निबंध ( १८९९ ).

( ८ ) हिंदुस्थानांतील भाषा ( १९०४ ).

( ९ ) हिंदुस्थानची भाषाविषयक पाहणी ( १९०४ ते १९०७ ).

( १० ) वायव्य हिंदुस्थानांतील पैशाची भाषा ( १९०६ ).

( ११ ) काश्मिरी भाषा ( १९११ ).

( १२ ) मराठी भाषेचें व्याकरण.

हे गृहस्थ हयात असून, राथफॉर्न हॅम, कॅंबर्ले सरे, लंडन, येथें राहतात; व ह्यांची अधिक माहिती आणि फोटो वेळेवर हातीं न आल्यानें हेतां आलीं नाहींत.

---

## ७५. प्रो० ज्युल् ब्लोक. ( Jules Block )

हे एक फ्रेंच गृहस्थ असून, जातीनें ज्यू आहेत. लेव्ही ( Levi ) व मेयेर (Meyer)यांचे शिष्य. हल्लीं यांचें वय सुमारें ४८ असावें. हे पॅरिस युनिव्हर्सिटींत

भाषाशास्त्राचे प्रोफेसर असून, मराठी व तामिळ भाषांच्या अधिक परिचयासाठीं ते हिंदुस्थानांत १९०८ सालीं येऊन येथें एक वर्ष राहिले. "**मराठी भाषेचा विकास**" La Formation de la Langue marathe या नांवाचें त्यांनीं एक पुस्तक १९१४ त लिहिलें असून, १९२० मध्यें प्रसिद्ध केलें. त्यांत मराठी शब्दांचा उत्पत्तिदृष्ट्या व रूपदृष्ट्या सूक्ष्म विचार केला आहे; व आपल्या पद्धती-प्रमाणें अपभ्रंशाच्या पायऱ्या बसविल्या आहेत. वर्णविपर्ययासंबंधीं व रूपभेदाविषयीं फोनॉलॉजी व मॉर्फॉलॉजी या दोन्ही पद्धतींनीं विचार आपल्याकडे कोणी करीत नाहींत. तो यांनीं आपल्या पुस्तकांतून केला आहे. संस्कृतावरून प्राकृतांत येतांना होणारे फरक यांचें विवरण तुलनात्मक दृष्टीनें केलें असून, मराठीच्या व्युत्पत्ती-संबंधीं शब्दसूचि यांनीं आपल्या पुस्तकांत स्वतःच्या सिद्धांतांच्या पुष्टीकरणार्थ दिली असून, ती व्याकरण व व्युत्पत्तीचा जवळ जवळ कोशच आहे असें म्हटल्यास चालेल. ह्या पुस्तकाखेरीज हिंदुस्थानांतील चालू भाषांसंबंधीं व आधुनिक भाषास्वरां-संबंधीं त्यांचे लेख 'les Langues de monde' ह्या भाषाकोशांत व पॅरिस व हानोइ येथील नियतकालिकांत आले आहेत.



**प्रो० ज्यूल्स ब्लोक.**

फर्ग्युसन कॉलेजमधील प्रोफेसर **व्हीo जीo परांजपे** यांनीं कृपा करून **प्रो० ब्लोक** यांची थोडक्यांत दिलेली माहिती व फोटो हीं वर दिलीं आहेत; हीं माहिती दिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. प्रो० परांजपे हे **प्रो० ब्लोक** ह्यांच्या "मराठी भाषेचा विकास" या पुस्तकाचें भाषान्तर करीत असून, तें सध्यां मुद्रणावस्थेंत आहे.

---

वरील सर्व युरोपियन व्याकरण-व्युत्पत्ति-प्रबन्धकांच्या कामगिरीसंबंधीं स्वतंत्रपणें बरेंच लिहावें लागेल; परन्तु स्थलाभावी येथें ज्यास्त लिहितां आलें नाहीं; त्यास आमचा उपाय नाहीं.

# पुरवणी.

## डॉ० विष्णु गोविंद चिपळोणकर.

यांचा जन्म पुणें येथें ज्येष्ठ व० ८ शके १७८४ रोजीं ( सन १८६२ ) झाला; परंतु त्यांचा विद्याभ्यास बडोदें येथेंच झाला. **श्रीमंत गायकवाड सरकार** यांचे आश्रयाखालील " Verancular Collage " मध्यें सुप्रसिद्ध सर " **भालचंद्र** " यांचे हाताखालीं यांनीं वैद्यक-विषयाचा अभ्यास करून, त्यांत चांगलेंच प्राविण्य मिळविलें. बडोदें येथें उत्तम डॉक्टर असा त्यांचा नांवलौकिक होता.



वैद्यकीचा धंदा संभाळून यांनीं फोटोग्राफींत सुद्धां चांगलेंच नैपुण्य मिळाविलें होतें. त्यांनीं केलेल्या कामाविषयीं "हीं काम युरोपांतील उत्तम फोटोग्राफ रांच्या कामांपेक्षां कोणत्याही रीतीनें कमी दर्जाचीं नसून, त्यांच्या तोडीचीं आहेत" अशी तिकडील उत्तम तज्ज्ञांनीं देखील कबुली दिली होती.

**डॉ० चिपळोणकर** ह्यांच्या बुद्धिमत्तेचा हा एक विशेष असे कीं, जें काम हातीं घ्यावें, त्यांत ती सारख्याच उत्तम तऱ्हेनें चालत असे. आपले वरील धंदे संभाळूनहीं त्यांचा लेखनव्यवसाय अव्याहत चालू असे. मराठी भाषा व तींतील प्राचीन कवि व ग्रंथकार यांविषयीं त्यांना पूर्ण अभिमान असे. त्यांनीं विविध

विषयांवर ग्रंथ लिहून, मराठी भाषेंत चांगलीच भर घातली आहे. '**हिंदुस्थानांतील सर्प**' हें त्यांचें पुस्तक इतकें माहितीनें परिपूर्ण आहे कीं, या विषयावरील त्यांचें ज्ञान धंदेवाल्या गारुड्यांसही मागें सारील. **श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड** यांजबरोबर स्टेट फोटोग्राफर या नात्यानें वारंवार शिकारीस जाण्याचा त्यांस प्रसंग येत असे; व त्यांनीं त्याही विषयावर पुस्तकें लिहिलीं आहेत: अलीकडील विद्यार्थीवर्गाचा होत असलेला शारीरिक ऱ्हास पाहून त्यांस फार खेद होत असे; व शाळांतून दिल्या जाणाऱ्या इतर शिक्षणाबरोबर याही शिक्षणाची किती आवश्यकता आहे, तें कोणत्या तऱ्हेनें देतां येईल, इत्यादि सोपपत्तिक माहिती त्यांनीं '**शारीरिक शिक्षण**' या पुस्तकांत दिली आहे. त्यांचा '**मृगयाकुतूहल**' हा ग्रंथ अगदीं अप्रतिम व महाराष्ट्रवाङ्मयांतील तर पहिलाच प्रयत्न आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

अर्वाचीन कविता व अलीकडील पौराणिक व ऐतिहासिक नाटकें यांपासून भाषेची अभिवृद्धि मुळींच होत नाहीं, उलट भाषेची अवनतिच होऊन वाचकांच्या नीतिमत्तेस धक्का बसत आहे, असें त्यांचें ठाम मत असे; व तें ते लोकांपुढें स्पष्ट व निर्भीड रीतीनें मांडण्यास तयार असत. त्यांनीं **शिवछत्रपति** यांचे चरित्रांतील प्रसंगांवर दोन व **संभाजी महाराज** यांचे चरित्रावर एक, अशीं तीन ऐतिहासिक नाटकें लिहिलीं आहेत. हीं नाटकें म्हणजे महाराष्ट्रभाषेंत शुद्ध व निर्दोष वाङ्मयाची उत्तम भरच होय. हे नोव्हेंबर १९१५ मध्यें मृत्यु पावले. हे उत्तम वक्ते असून, यांचे मराठी भाषा व व्युत्पत्तिविषयक लेख व वसंतव्याख्यानमाला आणि हेमंतव्याख्यानमाला यांतील व्याख्यानें श्रवणीय असत. बडोद्याच्या " सहविचारिणी " सभेचे हे आरंभापासूनचे प्रवर्तक होते.

**डॉ० चिपळोणकर** यांची माहिती सरदेसाई-दंडवते-नेने-आपटे व डॉक्टर चिपळोणकरांचे " बडोदा कॉलेज " मध्यें डेमॉन्स्ट्रेटर असलेले बंधु यांजवळ मागितली होती; रा० **विष्णु पांडुरंग नेने** यांनीं कृपा करून फोटो पाठविला, पण अन्य माहिती वेळेवर हातीं न आल्यानें, " चित्रमयजगत् " मधील वरील माहितीवरच भागवावें लागलें आहे; व हें चरित्र पुरवणीमध्यें दाखल करावें लागलें आहे. **साने** प्रभृतींच्या **शुद्धलेखन कॉन्फरन्स**" विरुद्ध यांनीं "सहविचारिणीसभे" मार्फत जी जळवळ उडवून दिली, तिचा उल्लेख मागें आलाच आहे; तसेंच **कै० राजवाडे** यांच्या ज्ञानेश्वरीवरही त्यांनीं टीकात्मक लेख लिहिले आहेत.

# विभाग सहावा.

## उ ता रे.

[ १ ]

### १. पूर्व-व्याकरणकारांची संभावना.

१. ह्या वर्षीचा नामांकित ग्रंथ म्हटला म्हणजे रा० रा० **मोरो कृष्ण** ( केशव हर्वे ) **दामले** यांचा " शास्त्रीय मराठी व्याकरण " हा होय. पाणिनीय सूत्रासारखा हा सिद्धन्त-ग्रंथ नाहीं; किंवा पातञ्जल-भाष्यासारखा निर्णय-ग्रंथ नाहीं. हा ग्रंथ केवळ उद्घाटन व ऊहापोह यांचा आहे. ह्याची पुढली पायरी सिद्धान्त-ग्रंथ होय.

२, मद्रासच्या Oriental library त मराठीचें संस्कृतांत सूत्रबद्ध असें एक छोटेसें व्याकरण आहे. तें पेशवाईच्या अखेरीस लिहिलें गेलें. तें अद्याप छापलें नाहीं छापलें तर पांच-सहा अष्टपत्री पृष्ठें व्हावीं.

३. ह्या सूत्रबद्ध व्याकरणाची वार्ता **दादोबा पांडुरंग तर्खडकर** ह्यांना नव्हती. दादोबांचें व्याकरण बरेंचसें इंग्रजी व्याकरणाच्या धर्तीवर गेलें आहे. वैदिक व्याकरण दादोबांना मुळींच येत नव्हतें. संस्कृत व प्राकृत व्याकरणाचाही गंध दादोबांना फारसा असल्याचें दिसत नाहीं. अशा स्थितींत दादोबांनीं इतकें चांगलें व्याकरण लिहिलें, हें त्यांस भूषणावह आहे.

४. **कृष्णशास्त्री चिपळूणकर** संस्कृत-व्याकरण-शास्त्रज्ञ होते. त्यांना प्राकृत भाषांचें व्याकरण विशेषसें सशास्त्र अवगत होतेंसें दिसत नाहीं; त्यामुळें दादोबांच्या ग्रंथांतील व्यंगें त्यांच्या लक्षांत चांगलींशीं येण्याचा संभव नव्हता. तत्रापि संस्कृत व्याकरणाच्या जोरावर दादोबांचे थोडेफार दोष त्यांनीं यथामति दाखविले आहेत; व ही त्यांची कामगिरी जमेस धरिली पाहिजे.

५. **कृष्णशास्त्री गोडबोले** हे संस्कृत व्याकरणशास्त्राभिज्ञ असून, प्राकृत भाषांकडे त्यांचें लक्ष्य असे. शिवाय सिंदी चांगली, व फारसी कामापुरती ते जाणत असत. ह्या सामुग्रीचा उपयोग त्यांनीं आपल्या मराठीच्या व्याकरणांत थोडाबहुत केला आहे: परंतु नांव घेण्यासारखा एकही शोध त्यांच्या हातून झाला नाहीं.

६. ह्या तीन वैय्याकरणांच्या नंतर **रामचंद्र भिकाजी जोशी** आले. संस्कृत, प्राकृत किंवा फारसी, अगर इंग्रजी, बंगाली, किंवा सिंदी ह्या भाषांपैकीं कोणत्याही एकीचें किंवा अनेकांचें त्यांना शास्त्रशुद्ध ज्ञान नाहीं. भाषाशास्त्र किंवा प्रमाणशास्त्र यांचीही ओळख सामान्य मनुष्याला व्यवहारापुरती जेवढी असावी, तेवढ्यापेक्षां जास्ती यांना नाहीं. तत्रापि स्वभाषेचा अभिमान यांचे ठायीं बाळपणापासून असल्याकारणानें व टापटापीनें नित्याचा लहान सहान व्यवहार करण्याचा स्वभाव पडल्यामुळें मराठी भाषेची यथाशक्ति सेवा करण्याचें स्तुत्य कृत्य त्यांनीं आरंभिलें व तें मराठी भाषेच्या व्याकरणाची बालबोध मांडणी करण्याच्या रूपानें फलद्रूप केलें. कोणत्याही भाषाशास्त्रज्ञा (ना) च्या अभावीं टापटिपीचा माणूस व्याकरणाची मांडणी कशी करील व ती करितांना कोठें गोत्यांत पडेल, हें जोशी यांच्या कृतीवरून चांगलें कळतें. **खेर** व **नवलकर** नांवाच्या दुसऱ्या एक दोन अशाच इंग्रजी पंतोजींनीं एक दोन शालोपयोगी व्याकरणें लिहिलीं आहेत. तींही जोशी यांच्या व्याकरणाच्याच कोटींत पडतात. अवलोकन, वर्गीकरण, परिभाषा, परिस्फोट, इत्यादि बाबतींत ह्या दोघा तिघा लेखकांचा उल्लेख केला नाहीं तरी चालेल.

७. जोशी यांच्या व्याकरणावर टीका करणारे जे **गुंजीकर** त्यांचाही संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश वगैरे भाषांचा मोठा गाढ अभ्यास झाला होता, असें त्यांच्या लेखांवरून दिसत नाहीं. एका आंधळ्यानें दुसऱ्या आंधळ्याशीं खऱ्या वाटेसंबंधानें तंडत बसण्यापैकींच गुंजीकरांची स्थिति होती. ह्या हि टीकाकाराच्या हातून मराठी व्याकरणांत कोणताही म्हणण्यासारखा शोध होण्याचा संभव नव्हता.

८. सारांश, भाषाशास्त्र माहीत नाहीं, व्याकरणशास्त्र माहीत नाहीं, वैदिक भाषा माहीत नाहीं, पाणिनीय माहिती नाहीं, प्राकृत भाषांशीं गाढ परिचय नाहीं, अशा स्थितींत मराठीचें व्याकरण रचिलें जाण्याची जितपत शक्यता होती, तितपत ती ह्या सर्व लेखकांच्या लेखांतून गोचर झाली आहे. सगळेच

आंधळे पडल्यानें, एक ज्या शब्दाला कर्ता म्हणतो, त्यालाच दुसरा कर्म म्हणतो, तिसरा क्रियापद म्हणतो व चवथा क्रियाविशेषण म्हणतो ! अशा मौजेच्या स्थितींत मराठीचें व्याकरण आजपर्यंत गुंगत आहे. चमत्कार आहे कीं, एकच मराठी शब्द चार वैय्याकरणंमन्यांना चार प्रकारचा भासावा ! एक तर, हे वैय्याकरण तरी भंगट असले पाहिजेत: नाहीं तर, मराठी भाषा तरी लवाड असली पाहिजे.

९. ती लवाड नाहीं, इतर भाषांप्रमाणें साळसूद आहे, हा सिद्धान्त प्रस्थापिण्याकरितां **दामले** यांचें 'शास्त्रीय व्याकरण' यंदांच्या साली ( १९१२ ) अवतीर्ण झालें आहे. हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांन विद्याधरांना सर्वसाधारणपणें जेवढें संस्कृताचे व्याकरण माहीत असतें, तेवढ्याहून जास्त **दामल्यांना** माहीत आहे, असें त्यांच्या व्याकरणावरून दिसत नाहीं. वैदिक भाषा, प्राकृत भाषा, अपभ्रंश, जुनें मराठी, वगैरेशीं हि त्यांचा परिचय अत्यन्त बेताचा आहे. फारशी त्यांना येतेंसें दिसत नाहीं तात्पर्य, शास्त्रदृष्ट्या संस्कृत किंवा प्राकृत किंवा वैदिक व्याकरणाचा त्यांचा अभ्यास इतर मराठी वैय्याकरणांच्या इतकाच बहुतेक आहे. अर्थात् जी प्रतिकूलता इतर वैय्याकरणंमन्यांना मारक झाली, तीच **दामल्यांना** हि मारक झाली आहे. मात्र, एका उपकरणाच्या अनुकूलतेमुळें, त्यांची बाजू बरीच सावरलेली दिसते. ती बाजू म्हणजे युरोपियन न्यायशास्त्राचा बराच चांगला अभ्यास ही होय. ह्या उपकरणानें ज्या विषयाचा आपण ऊहापोह करूं पाहतों, त्याची मर्यादा काय व तो उकलण्याची पद्धति कोणती, ह्यांचा उदय त्यांच्या हृदयांत किंचित् झाला आहे; आणि ही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं. कोणत्याही विषयाचा जो ऊहापोह करावयाचा त्या ऊहापोहाला कोणती पद्धति लागू पडते, हें चक्क ध्यानांत येणें हें शतकृत्यच आहे. हें पद्धतिनिर्णयाचें शतकृत्य केवळ बुद्धिमत्तेचेंच नव्हे, तर अंगीकृत कार्याला विजयानें वश करण्याचें सूचक आहे.

( राजवाडे—तिङन्तविचार, पृष्ठें १ ते ३ ).

---

## २. मतामतांचा गलबला !

शब्दांचें वर्गण:—प्रथम शब्दांचे व्ययी व अव्ययी असे दोन भेद पडले. नंतर व्ययी शब्दांचे सुबन्त व तिङन्त अथवा नामाविभक्तिक व धातुविभक्तिक

असे दोन पोटभेद झाले. ह्या तीन भेदांत आखिल मराठी शब्दजात विभागली जाते न जाते तों इतक्यांत वाटेंत एक भली लहानशी धोंड येऊन पडली. कित्येक शब्द नाम आहेत कीं धातु आहेत कीं अव्यय आहेत कीं कृदन्त आहेत ह्याची शंका उत्पन्न झाली. कित्येक धातुरूपें कर्तरि कीं कर्मणि कीं भावे यांचा पत्ता लागेना. कित्येक नामरूपें प्रथमेचीं कीं द्वितीयेचीं कीं चतुर्थीचीं हेंच समजेनासें झालें. असा मोठा प्रळय उसळला. वैय्याकरण वैय्याकरणांशीं झगडों लागले. कर्तृवादी कर्मवाद्यांस मूर्खांत काढूं म्हणाले. द्वितीयावाल्यांनीं प्रथमावाद्यांच्या थोत्रीत लगावल्या. कार्दान्तिकांनीं अव्ययांच्या शिष्यांना परीक्षेंत हुकविण्याचा क्रम आरंभिला. अशी सर्वत्र बेबंदशाही झाली. जो तो म्हणूं लागला कीं, महाराष्ट्र व मराठी भाषा बुडण्याची वेळ आली. कित्येक महात्म्यांनीं ह्या लबाड भाषेला व खट्याळ देशाला कायमचा रामराम ठोकून भोळ्या, सोध्या व साध्या आंग्लभाषेचें द्वामुष्यायणत्व पत्करिलें. वैय्याकरणांच्या ह्या गलबलीचा संताप येऊन, कित्येक मुज्ञांनीं संन्यास घेतले कित्येकांनीं भक्तिमार्गाचे टाळ कुटून नादब्रह्मांत प्रवेश केला आणि कित्येकांनीं योगभस्मानें परमात्मस्वरूपांत विरून जाण्याचा उपक्रम केला. असें सर्वत्र औदासीन्य पसरलें आणि हा सर्व गोंधळ कशानें झाला ? तर शब्दांचें वर्गीकरण कोणत्या यंत्राच्या साहाय्यानें विनचूक करितां येईल हें वैय्याकरणांना समजेना म्हणून. वर्गीकरणाला साहाय्यक असें हें यंत्र कोणतें ? तर तें शब्दांचा इतिहास ऊर्फ व्युत्पत्ति होय. ह्या इतिहासाचें साहाय्य घेतल्याशिवाय जो कोणी शब्दांचें वर्गण करण्यास जाईल, तो पदोपदीं विपन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं.

( राजवाडे—तिङन्तविचार, पृष्ठें ३ व ४ ).

---

## ३. संयुक्त–क्रियापद.

हीं बाब मराठी वैयाकरणांनीं कोठून आणिली ? इंग्रजींतून आणिली हें उघड आहे. He is going या वाक्यांत is going हें संयुक्त क्रियापद आहे असें इंग्रज वैय्याकरण म्हणतात; आणि तें अत्यन्त अशास्त्र आहे. स गच्छन् अस्ति या वाक्यांत गच्छन् अस्ति याला संस्कृत वैय्याकरण संस्कृत क्रियापद म्हणत नाहींत. संस्कृत व्याकरणांत संयुक्त क्रियापद हा शब्दच नाहीं. मग मराठी वैय्याकरणांनीं तरी

तो कां घ्यावा ? तो जात आहे, ती जात आहे, ते जाते आहेत, ह्या वाक्यांतील जात, जाते, जात्या, जातीं, ह्या धातुरूपांचीं जर लिंग–वचनें स्पष्ट व्याकरतां येतात, तर जाते आहेत, जाती आहे, जात आहे, ह्यांना संयुक्त–क्रियापद म्हणणें अत्यन्त अशास्त्र नव्हे काय ? व्याकरण म्हणजे बोलून चालून फोड. या फोडीचें शास्त्र. फोड होणें शक्य नाहीं तेथपर्यंत न्यावयाचें असतें. जेथें अन्वय लागत नाहीं, जेथें लिंग–वचन–विभक्ति कळत नाहीं, तेथें व्याकरणशास्त्र इतर शास्त्रां-प्रमाणें थांबतें. ज्यापलीकडे लिंग–वचन–विभक्ति कळत नाहीं, त्या रूपाला सबंद रूप समजण्याची पद्धति आहे. ......प्रयोगांचें पृथक्करण करून फोड करितां करितां लिंग–वचन–विभक्त्यादि विकार जेथें दिसेनासे किंवा समजेनासे होतात, तेथें व्याकरणकारानें थांबून उपलब्ध सीमान्त अवशिष्ट रूप मान्य करणें सशास्त्र आहे. मात्र पृथक्करणाच्या कामांत त्यानें हयगय करितां किंवा निरुक्ताचें अज्ञान दाखवितां कामा नये.......बोलावयास, गेलें, जाऊं, जायचा, यावें, उडतां, वगैरे शब्द लिंग-वचन–विभक्त्यादींनीं विकृत होतात, तेव्हां त्यांना संयुक्त क्रियापदत्वाची पदवी कशी शोभेल ? मराठी किंवा संस्कृत व्याकरणांत क्रियापदें म्हणून ज्यांना म्हणतात तीं सारीं निर्भेळ साधींच आहेत.

( राजवाडे—तिङंत–विचार, पृष्ठें ११ व १४ ).

---

## ४. मराठीच्या धातुपाठाची आवश्यकता.

"शास्त्रीय मराठी व्याकरणां"त एक मोठें व्यंग राहिलेलें आहे. शालोपयोगी व द्रव्यार्थक व्याकरणांत हा दोष राहिला असतां, त्याकडे लक्ष देण्याची हि आवश्यकता नसते; परंतु उद्घाटन व ऊहापोहक बुद्धीनें लिहिलेल्या ग्रंथांत तो दोष अक्षम्य होय. तो दोष कोणता ? 'शास्त्रीय व्याकरणांत' मराठी भाषेचा धातुपाठ नाहीं. प्रायः भाषेंत असा शब्द नाहीं कीं जो सीमान्त अशा कोणत्या तरी धातूला नेऊन भिडावितां येत नाहीं. यास्काचें निरुक्त तर या एका प्रमाणभूत कारणाकरितां निर्माण झालें. पाणिनीनें धातुपाठ एवढ्याच करितां रचिला. कित्येक सौत्र धातु तर बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या किंवा ग्रंथाच्या भाषेंत कधींच उपयोगांत येत नसून, ते हि या भाषापृथक्कारांना नमूद करून ठेवणें हिताचें वाटलें.........मराठी भाषा कांहीं शब्द, प्रत्यय

निपात, अपभ्रंशांतून घेते: कांहीं महाराष्ट्रींतून घेते; कांहीं शौरसेनींतून घेते: कांहीं संस्कृतांतून घेते; कांहीं वैदिक भाषेंतून घेते; व कांहीं तर पूर्व-वैदिक भाषेंतून घेते. इतकेंच नव्हे, तर वेदकालीन प्रांतिक किंवा प्राकृत भाषांतूनहि कांहीं शब्द, प्रत्यय व निपात मराठींत उतरले आहेत. तेव्हां मराठींतील धातुपाठ निर्माण होणें अगत्याचें आहे.

( राजवाडे—तिङन्तविचार, पृष्ठ ३७ ).

---

## ५. मराठींतील स-ला-तें प्रत्यय.

सम्, प्रति आणि परा हे निपात संस्कृतांत कर्मप्रवचनीय आहेत, उपसर्ग आहेत व गति हि आहेत. ते जेव्हां कर्म-प्रवचनीय असतात तेव्हां त्यांच्या पासून मराठींत द्वितीयेचे प्रत्यय उत्पन्न होतात. आतां, ते जेव्हां उपसर्ग किंवा गतिसंज्ञक असतात, तेव्हां त्यांच्यापासून मराठींत काय कार्य निष्पन्न होतें तें सांगतों.

रामः रावणं मारयति=राम रावण किंवा रावणा मारितो.
रामः रावणं घातयति=राम रावण किंवा रावणा घातितो.
रामेण रावणः घातितः=रामानें रावण मारिला, घातिला.

कर्तरि—

(प्रवच०) रामः रावणं प्रति घातयति=राम रावणातें घातितो ( द्वि० )
( ,, ) रामः रावणं सम् घातयति=राम रावणास घातितो ( ,, )
( ,, ) रामः रावणं परा घातयति=राम रावणाला घातितो ( ,, )

कर्मणि—

( ,, ) रामेण रावणं प्रति घात्यते=रामानें रावणातें घातिलें ( भावे )
( ,, ) रामेण रावणं सम् घात्यते=रामानें रावणास घातिलें ( ,, )
( ,, ) रामेण रावणं परा घात्यते=रामानें रावणाला घातिलें,मारिलें ( ,, )

कर्तरि—

( गति) रामः पुत्रिकां प्रतिमारयति=राम मुलगी नेमारितो ( द्वितीया )
( ,, ) रामः पुत्रिकां संमारयति = राम मुलगी समारितो ( ,, )
( ,, ) रामः पुत्रिकां परामारयति=राम मुलगी लामारितो ( ,, )

कर्मणि —

( ,, ) रामेण पुत्रिका प्रतिमारिता=रामानें मुलगी तेमारिली ( प्रथमा )

( ,, ) रामेण पुत्रिका संमारिता= रामानें मुलगी समारिली ( ,, )

( ,, ) रामेण पुत्रिका परामारिता= रामानें मुलगी लामारिली ( ,, )

गतियुक्त क्रियापदांचे कर्मणि प्रयोग होतांना, नामांना 'इदम्' सर्वनामापासून निघालेलीं 'आ' व 'ई' हीं सर्वनामें लागून प्रयोग होतातः—

त्यानें पुत्र आ समारिला=त्यानें पुत्रासमारिला ( संधि )

त्यानें मुलगी ई समारिली=त्यानें मुलगीसमारिली ( ,, )

त्यानें चांगलें आ समारिलें=त्यानें चांगल्यासमारिलें ( ,, )

हीं वाक्यें अशींहि लिहितां येतीलः—

रामानें रावण यासमारिला ( आ=या )

रामानें सीता ईसमारिली

त्यानें चांगलें यासमारिलें

( राजवाडे-सुबन्त विचार, पृष्ठ १६ ).

## ६. कार्योत्साहकांस इशारा.

प्रस्तुत कालीं आपल्या देशांतली परिस्थिति च अशी आहे कीं, कोणते हि शास्त्रीय काम करण्याला ह्या देशांत, प्रायः अनेक तर सोडूनच द्या, पण अर्धा हि माणूस निर्माण झालेला नाहीं. तेव्हां श्रमविभाग होण्याची आशा करणें आणिक पन्नास शंभर वर्षे ह्या देशांत अयुक्त होय कधीं काळीं चुकून माकून एकाद्याच्या मनांत कांहीं शास्त्रीय कृत्य उठविण्याचें सुदैवानें मनांत आलें व मनांत येऊन त्या कृत्याचा अंत पाहाण्याचा उत्साह त्याच्या ठाईं वर्षोनवर्ष कायम राहिला, तर त्यानें ह्या देशांत इतर कोणाच्या हि साहाय्याची अपेक्षा करूं नये. हें उत्तम. कारण, साहाय्य होण्यासारखी परिस्थिति च नाहीं. एका काळच्या ह्या शास्त्रीय भूमींत सध्यां शास्त्राचा अत्यन्त लोप झालेला आहे. प्रायः ह्या देशांतील यच्चयावत् लोकांची स्थिति आफ्रिकेंतील नीग्रोंच्या स्थितीच्या जवळ जवळ आलेली आहे. ज्यांना ग्रॅज्युएट म्हणून म्हणतात, त्यांच्या जवळ हि शास्त्र नाहीं व ज्यांना शास्त्री म्हणून म्हणतात त्यांच्या जवळ हि शास्त्र नाहीं. एक पाश्चात्य सटरफटर पुस्तकें घोकून घरंघाऱ्या गुलाम बनलेला आहे व दुसरा पौर्वात्य ग्रंथ घोकून मद्दड झालेला आहे.

अशा ह्या दुहेरी कंगाल समाजाला सुधारण्याचें म्हणजे शास्त्रीय स्थितीला नेण्याचें विकट कृत्य कोणाचें हि साहाय्य मिळण्याची आशा न करितां पार पाडावयाचें आहे. सबब, राजकीय, सामाजिक, वाङ्मयात्मक वगैरे कोणतें हि कृत्य ह्या देशांत ज्या कोणाला करण्याची उमेद आली असेल, त्यानें अंगिकारिलेल्या कृत्याच्या विस्ताराचा अंदाज घ्यावा, त्यांत व्यंगें व दोष कोठें आहेत त्याची विचक्षणा करावी, व ते दोष, व्यंगें काढण्यास स्वता च लागावें, इतर कोणाची वाट पाहूं नये. कारण ममतेनें मदतीला धावून येण्यास कोणी च नाहीं. स्वजन हि नाहींत व परजन तर नाहींत च नाहींत. अशी एकंदर फार हलाकीची स्थिति आहे; आणि ही स्थिति कांहीं उत्साहविघातक नाहीं. संकट यावें तर असेंच यावें. ह्या संकटांतच आपल्या कर्तबगारीची खरी परीक्षा आहे. ( **मोरो केशव दामले** यांस अनुलक्षून हें विवेचन असून, त्यांत पूर्ण स्वानुभव भरला असल्यानें हा उतारा दिला आहे.)

( राजवाडे--सुबंतविचार, पृष्ठ ८८ ).

---

[ २ ]

## १. अ--संयुक्त क्रियापदांविषयीं हट्ट.

या देशांत प्रस्तुत कालीं मराठी व्याकरणापेक्षांहि इंग्रजी व्याकरणाचा अभ्यास विशेष काळजीनें करणें पुष्कळांस भाग पडत आहे; व इंग्रजी व्याकरणांत संयुक्त क्रियापदें व काळाचे अनेक प्रकार ठाम होऊन बसले आहेत; त्या अर्थी मराठींत संयुक्त क्रियापदें आणि काळाचे अनेक प्रकार राहूं देण्याचा प्रयत्न चालेल, असें वाटतें. दुसरें असें आहे कीं. जेव्हां कोणतीही गोष्ट अस्तित्वांत येऊन सर्वमान्य होऊं लागते, तेव्हां तसें होण्यास कांहीं तरी योग्य कारणें असलीं पाहिजेत, असें मानावें लागतें.... .संस्कृतांत किंवा इंग्रजींत तरी भूतादिकांचे पोटभेद कशासाठीं अस्तित्वांत आले ? कोणी म्हणतील कीं, हे सगळे व्याकरणकारांचे प्रताप आहेत ! नाहीं नाहीं ते प्रकार कल्पून व्यारणकार व्याकरणास काठिण्य आणितात ! आमच्या मतें हें बोलणें बरोबर होणार नाहीं. भाषेंत नवीन शब्द करून घालणें किंवा असलेल्या शब्दांचीं रूपें फिरविणें, हें काम व्याकरणकार करीत नसतात. व्याकरणकारांहूनही ज्यांची योग्यता व उपयुक्तता मोठी आहे, अशा उत्तम उत्तम कवींचें, वक्त्यांचें व शास्त्रीय ग्रंथ लिहिणारांचें तें काम आहे. ते भाषेस हवी तशी नाचविनात; व हवे तसले प्रयोग योजून जातात. त्यांनीं योजिलेले प्रयोग रूढ झाले

म्हणजे त्यांचे वर्ग करून त्यांना नांवें देणें, व नवीन शिकणारास ते समजण्यास सुलभ होतील अशा प्रकारची त्यांची व्यवस्था लावणें, हें व्याकरणकारांचें नम्र कर्तव्य आहे. याहून पलीकडे तो जाऊं इच्छित नाहीं व त्यानें तशी इच्छा केली, तरी ती सफल होण्याचा संभव नाहीं. ' खरडे लिहिण्यास बसत जा, ' ' तो मुलगा साताऱ्याहून पळून गेला, ' ' आम्ही असलीं कामें आज कित्येक वर्षें करीत आलों आहों, ' ' रामशास्त्र्याच्या हातून सुद्धां असले क्षुल्लक प्रमाद नित्य होत जात असले पाहिजेत. ' इत्यादि वाक्यांत ' जा ' ' गेला ' 'आहों' व ' पाहिजेत ' या शब्दांस क्रियापदें मानून त्यांच्यांशीं लगटलेल्या ' बसत, ' ' पळून, ' ' करीत आलों, ' ' होत जात असले ' वगैरे शब्दांस विशेषणांखालीं किंवा क्रियाविशेषणांखालीं आणून टाकल्यास, क्रियापदास साधेपणा व व्याकरणास सुलभता आणल्यासारखें होईल खरें; पण तसें करण्यांत अर्थाचा अनर्थ न होऊं देण्याबद्दलही काळजी घेतली पाहिजे. नामें, विशेषणें, क्रियाविशेषणें, इत्यादिकांचे अर्थ ज्याप्रमाणें कधीं कधीं एकाच शब्दानें स्पष्ट होत नसल्यामुळें, दोन अथवा अधिक शब्दांचा उपयोग करावा लागतो; म्हणजे ज्याप्रमाणें अनेक प्रसंगीं मिश्र किंवा संयुक्त अर्थ प्रदर्शित करण्यासाठीं नामार्थक, विशेषणार्थक आणि क्रियाविशेषणार्थक वाक्यांश किंवा वाक्यें यांचा उपयोग करावा लागतो; त्याप्रमाणें मिश्र किंवा संयुक्त क्रियार्थ दाखविण्यासाठीं एकाहून अधिक शब्द योजण्याची मोकळीक कां नसावी व अशा प्रकारें योजिलेल्या शब्दसमूहास संयुक्त क्रियापदें म्हणण्यास प्रत्यवाय कां असावा ? दोन अथवा अधिक शब्द एकांत एक लपेटले जाऊन जर त्यांपासून एकाच क्रियार्थाचा बोध होत असेल, तर त्या सर्वांस क्रियापद कां मानूं नये ? या दृष्टीनें विचार करितां कोणत्याही भाषेंत संयुक्त क्रियापदें येणें ही यादृच्छिक गोष्ट नाहीं, तर आवश्यक गोष्ट आहे; व तीं मराठींतही आलीं आहेत; ही खेदाची तर नाहीं, तर उलट आनंदाची बाब आहे, असें मानिलें पाहिजे. मात्र व्याकरणकारांनीं एवढें केलें पाहिजे कीं, **एकदां संयुक्त क्रियापदें कबूल केल्यावर तीं कितीही मोठी झालीं तरी तीं पत्करण्यास डगमगतां कामा नये**.... 'ती पुण्यास जावयाची.' यांत 'जावयाची ' हें क्रियापद कां न करावें हें समजत नाहीं. ' जावयाची ' हें विशेषण करून, ' आहे ' हें अध्याहृत क्रियापद सांगत बसण्यांत काय नफा आहे ? इतर ठिकाणीं किंवा इतर वाक्यांत असले शब्द इतर शब्द-वर्गांत पडत असले, म्हणून ज्या वाक्यांत संयुक्त क्रियांनींच पूर्ण क्रियार्थ उत्पन्न होत असेल, त्यांत त्यांस क्रियापदें

न करणें म्हणजे व्याकरणाचें अर्थानुगामित्व काढून घेऊन, अर्थाला व्याकरणगामी करण्यासारखें आहे. असा प्रकार कोणालाही पसंत होण्यासारखा नाहीं; व म्हणून तो रूढ होण्यासारखाही नाहीं. तेव्हां मराठींत संयुक्त क्रियापदांचें जें प्रकरण आलें आहे, तें ठीकच आहे.

( आगरकर—वाक्यमीमांसा, पृष्ठें ४० ते ४४ ).

## २. वाक्यांतील उद्देश्य–व्यवस्था.

( १ ) इंग्रजी वाक्य–संप्रदायाप्रमाणें वाक्याचा कर्ता, म्हणजे ज्याविषयीं वाक्यांत विधान होत असतें, तो शब्द **प्रथमान्त** पाहिजे; मग तो शब्द त्या वाक्यांतील क्रियेच्या खऱ्या **कर्त्याचा** दर्शक असो किंवा नसो; ( Ravana was killed by Rama ) ( २ ) इंग्रजी व संस्कृत वाक्यांतील उद्देश्य मात्र नेहमीं प्रथमान्त असतें;मात्र संस्कृत वाक्यांतील कर्ता प्रथमान्त असला किंवा नसला तरी चालतो. ( ३ ) मराठी वाक्यांतील ‘ कर्ता ’ किंवा ‘ उद्देश्य ’ प्रथमान्त असेलच पाहिजे असा नियम नाहीं......‘ जा ’ धातूच्या साहाय्यानें सकर्मक धातूंपासून मराठींत जे कर्मणि प्रयोग साधले आहेत, ( ज्यांना कित्येक लोक **कर्म–कर्तरि** प्रयोग म्हणतात ) ते इंग्रजींतील Passive Voice व संस्कृतांतील कर्मणीच्या, धर्तीवर गेले आहेत...... मराठींत त्यांच्या जागीं बहुधा कर्त्याशिवाय ( अध्याहृत कर्ता ) कर्मणि प्रयोग घालतात. अशा वाक्यांचें व्याकरण करितांना अध्याहृत कर्ते स्पष्ट करून सांगण्याची चाल आहे. क्रियेच्या **कर्त्याला** ‘ कडून ’ सारखें एकादें शब्दयोगी अव्यय लावलें असेल, तरच त्याचें उद्देश्यत्व नाहींसें होतें असें मानावें; असें कित्येकांचें म्हणणें आहे. परंतु तें सर्वथैव ग्राह्य दिसत नाहीं. ( कारण ) कांहीं वाक्यांतील उक्त तृतीयान्त कर्तेही व पुष्कळ वाक्यांतील अध्याहृत तृतीयान्त कर्ते, त्या त्या वाक्याचे ‘ उद्देश्य ’ नाहींत, हें त्यांच्या अर्थाच्या झोंकावरून स्पष्ट दिसत असतें. तेव्हां व्याकरण करितांना ज्याला उक्त किंवा अध्याहृत कर्ता म्हणतात, तोच ‘ उद्देश्य’ही असला पाहिजे हा आग्रह धरणें बरोबर नाहीं. “असें म्हणतात कीं, मध्य–आशियांत केरोसीनच्या खाणी सांपडतात ” या वाक्यांतील ‘ म्हणतात ’ ह्या क्रिया

पदाचा 'लोक' हा अध्याहृत कर्ता सांगण्यांत येईल; म्हणून त्याचें पृथक्करण करितांना 'लोक' हा शब्द उद्देश्यस्थानीं ठेवणें बरोबर होणार नाहीं. केरोसीनच्या उत्पत्तीविषयीं **लोक** काय म्हणतात, हें सांगण्याचा या वाक्याचा हेतु दिसत नाहीं, तर केरोसीनच्या उत्पत्तीविषयीं लोकांचें **काय म्हणणें आहे** तें पुढें आणण्याचा हेतु दिसतो. **'लोक'** ह्या शब्दावर **अवसान** नसल्यामुळें त्याचा अध्याहार केला आहे......ज्या वाक्यांत कर्त्यावर **अवसान** नसल्यानें तें गाळून कर्मणिप्रयोग केले असतील, म्हणजे कर्माच्या अनुरोधानें विधेय असेल, त्या वाक्यांतील अध्याहृत कर्तें आवश्यकता असेल, तरच (प्रयोगाकरितां वगैरे) स्पष्ट करावें; नाहींतर कर्मेंच उद्देश्य मानून पृथक्करण करणें योग्य होईल. 'रांगोळ्या घातल्या', 'पानें वाढलीं,' अशा ठिकाणी **'बायकांनीं'** अथवा **'ब्राह्मणांनीं'** असे अध्याहृत कर्तें घेऊन ते उद्देश्य-स्थानीं मांडण्याची गरज नाहीं. 'रांगोळ्या' व 'पानें हीं उद्देश्यें आणि 'घातल्या' व 'वाढलीं' हे शब्द विधेयें केल्यानें वाक्यपृथक्करण यथार्थ होईल.

(आगरकर—वाक्यमीमांसा, पृष्ठें ११६ ते ११९).

---

## ३. शब्दांचा सप्तसंख्यात्मक जाति-विभाग.

नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय व उभयान्वयी अव्यय, हे वैय्याकरणांनीं शब्दांचे जे मुख्य **सात** वर्ग केले आहेत. ते कांहीं तरी अनुमान धक्क्यानें केले नाहींत. भाषेंत त्या त्या अर्थाच्या शब्दांची आवश्यकता पडत असल्यामुळें, सर्व सुधारलेल्या भाषांत त्यांची उत्पत्ति आपोआप झालेली आहे. ते व्याकरणकारांनीं केलेले नाहींत. त्यांनीं जें काय केलें तें हेच कीं, त्यांची उत्पत्ति होऊन ते सर्वत्र उपयोगांत येऊं लागल्यावर त्यांचें त्यांनीं मनन केलें व त्यांकडून होत असलेलीं कामें व त्यांचा अर्थ ह्या दोहोंच्या अनुरोधानें त्यांनीं त्यांच्या जाति किंवा वर्ग कल्पून त्यांस पारिभाषिक नांवें दिलीं. हीं पारिभाषिक नांवें ठाऊक असोत किंवा नसोत, सुधारलेली भाषा लिहिणारा किंवा बोलणारा प्रत्येक इसम, प्रत्येक दिवशीं, अनेकशः असल्या शब्दांचा बोलण्यांत व लिहिण्यांत उपयोग करीत असतो. या **सात** वर्गांशिवाय 'उद्गारवाची' किंवा 'केवलप्रयोगी' अव्ययें

म्हणून शब्दांचा आणखी एक **आठवा** वर्ग कल्पिला आहे. यांचा बारकाईनें विचार केला, तर त्यांपैकीं प्रत्येकास समग्र वाक्याचा अर्थ असतो, असें दिसून येईल. यांचा वाक्य-मीमांसेंत एकवार उल्लेख करण्यापलीकडे विशेष चर्चा करण्याची आवश्यकता नाहीं; व शब्दवर्गांत त्यांचा समावेश करण्याची जरूरी नाहीं.

केवलप्रयोगी अव्ययांशिवाय शब्दांच्या **सात** जाति होतात, असें वर सांगितलें आहे; पण कित्येक व्याकरणकार शब्दांच्या **सात** जाति न मानतां त्यांच्या **दोन** किंवा **तीन** जाति कल्पून बाकीच्यांचा त्यांखालीं अन्तर्भाव करितात. मराठी भाषेचे आद्यव्याकरणकार कै० **दादोबा पांडुरंग** यांनीं, आपल्या व्याकरणाच्या जुन्या आवृत्तींत असेंच केलें होतें. कै० **कृष्णशास्त्री चिपळूणकर** ह्यांनीं आपल्या निबंधांत, व कै० **कृष्णशास्त्री गोडबोले** ह्यांनीं आपल्या व्याकरणांतही कांहीं अंशीं हाच मार्ग अवलंबिलेला आहे. कांहीं इंग्रजी व्याकरणकारही हीच पद्धति अनुसरतात; व व्याकरणांच्या पुस्तकांत त्याबद्दल सबळ कारणेंही दाखवितां येतील; पण वाक्य-मीमांसेंत तसें करण्याची गरज नाहीं; इतकेंच नव्हे तर तसें करूं गेलें असतां, शब्दांच्या मुख्य जाति व पोटजाति दाखविण्यासाठीं योजिलेल्या सांकेतिक पारिभाषिक संज्ञांची निष्कारण गर्दी होते; व त्यांचा अर्थ समजून घेण्याचे कष्ट वाचकांस निरर्थक पडतात. वाक्य-मीमांसा सुगम करण्यास तसें जरूर असतें, तर केलेंही असतें. ....... ..सुज्ञ वाचकांच्या हें ध्यानांत येईल कीं, पाहिजे तेवढी हातचलाखी केली, तरी ह्या **सात** जातींपैकीं कोणत्याही जातींत पडणारा शब्द त्याच अर्थानें दुसऱ्या कोणत्याही जातींत घालतां येणार नाहीं; तसेंच ज्याला ह्या सात जातींपैकीं एकाही जातींत घालतां येणार नाहीं, असा शब्द भाषेंत सांपडावयाचा नाहीं. यावरून हा सप्तसंख्यात्मक जातिविभाग आवश्यक आहे व पूर्णही आहे, असें मानिलें पाहिजे. (आठवा भेद वाटल्यास व्याकरणांत मानावा).

---

## ४. लेखनशुद्धिसंभ्रम !

हें पुस्तक ( वाक्यमीमांसा ) लिहीत असतां मराठी भाषेंत शुद्धलेखनाच्या संबंधानें माझें मन द्विधा झालें होतें. एकदां असें वाटे कीं, कै० कृष्णशास्त्री चिपळोणकरांनीं आपल्या "**निबंधांत**" सुचविल्याप्रमाणें संस्कृत शब्द संस्कृत

नियमांप्रमाणें न लिहितां, मराठींतील प्रघाताप्रमाणें व उच्चाराप्रमाणें लिहावें; फिरून असें वाटे कीं, **संस्कृत शब्दांस मराठीचे वळणावर नेल्यास गोंधळ होईल,** अशा प्रकारच्या घोळांत पडलों असल्यामुळें, कोठें संस्कृत पद्धतीस अनुसरून व कोठें मराठी पद्धतीस अनुसरून शब्द-लेखन आलें आहे. 'कर्तरी', 'कर्मणी', 'भावी', 'संबंधी', वगैरे शब्दांस मराठी विशेषणें मानून, शेवटची 'ई' नेहमीं दीर्घ घातली आहे. रूढि, 'पद्धति', रीति, 'धातु', वगैरे शब्द कोठें मराठी पद्धतीप्रमाणें लिहिण्यांत आले आहेत; सर्वांस ग्राह्य व मान्य अशी एक मराठी लेखन-पद्धति पडेपर्यंत असल्या अस्थिरत्वाबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करतील, अशी उमेद आहे.

( आगरकर—वाक्यमीमांसा, पृष्ठ ९ ).

---

## [ ३ ]

## १. प्रौढी !!

मराठीचें व्यवस्थीत व्याकरण १८३५ सालीं दा दो बा पां डु रं ग यांनीं लिहिलें. यांत त्यांनीं संस्कृत व्याकरणाची पद्धत केवळ कारणापुरती घेऊन, इंग्रजी व्याकरण-पद्धतीचें अनुकरण केलें आहे; आणि सर्व प्रकरणें व्यवस्थीत व सुसंगत लिहिलीं आहेत. यामध्यें साहजीक च इंग्रजी आणि संस्कृत या दोन पद्धतींचा घोटाळा झाला आहे. दा दो बा हे हुषार ग्रंथकार असून स्वभाषेचे अभिमानी होते, परंतु आढ्यतेचा प्रकार बरा च होता (?) यामुळें त्यांनीं व्याकरणांत उत्तरोत्तर सुधारणा करण्याचें धोरण ठेविलें नाहीं. या व्याकरणावर कृ ष्ण शा स्त्री चि प ळू ण क र यांनीं विस्तृत टीका करून ती माजी शालापत्रांत छापली आहे. हींत दादोबांच्या व्याकरणांतील दोष दाखवून शिवाय ते कसे सुधारतां येतलि याचें दिग्दर्शन केलें आहे; पण खरोखरी सुधारणा कोणत्या कराव्या हें सांगितलें नाहीं. या टीकेच्या अनुरोधानें कृ ष्ण शा स्त्री गो ड बो ले यांनीं नवीन मराठी व्याकरण तयार केलें. या व्याकरणांत व्युत्पत्तीसंबंधानें थोडेंसें ऐतिहासिक दृष्ट्या विवेचन केलें आहे. तरी प्रातिपदिकें, क्रियापदें व प्रयोग वगैरे गोष्टींचें तसें विवेचन झालेलें नाहीं. वाक्यपृथक्करणपद्धतीची तर

सुरुवातही झालेली नाही. या सर्व गोष्टी विचारांत घेऊन संस्कृताच्या पायावर शब्दांचीं **रूपें** वगैरे व्यवस्था कायम ठेवून, आणि **मराठी ही चालू भाषा इंग्रजीच्या धर्तीवर गेली पाहिजे** हें ध्यानांत घेऊन, इंग्रजी ग्रंथकारांच्या व्याकरणविषयक शास्त्रीय पद्धतीस अनुसरून, माझ्या प्रौ ढ बो ध व्या क र णा ची रचना मीं केली आहे. यांत प्रत्यय, प्रयोग, प्रातिपदिकांचीं आणि क्रियापदांचीं रूपें, यांची ऐतिहासीकदृष्ट्या छाननी करून त्याचें मूळ ठरविण्याचा प्रयत्न जागोजाग केला आहे. वाक्यपरिच्छेदाचें विवेचन तर प्रथमतः मराठींत पूर्णपणें केलेलें याच पुस्तकांत पाहावयास सांपडेल.

या नंतरचा व्याकरणविषयक ग्रंथ म्हटला म्हणजे **मो रो के श व दा म ले** यांचा शास्त्रीय मराठी व्याकरण हा होय. या पुस्तकांत शास्त्रीय या नांवाखालीं पुष्कळ अशास्त्रीय गोष्टी दडपून दिल्या आहेत, व आढ्यतेमुळें पूर्वीच्या व्याकरणकारांनीं व्याकरणाच्या शास्त्रीयतेसाठीं जे जे प्रयत्न केले, त्यांचें नीटपणें अवलोकन देखील केलें नाहीं. या पुस्तकांतील कित्येक प्रकरणें वाचून ग्रंथकारांना व्याकरणशास्त्र म्हणजे काय हें सुद्धां नीट कळत नव्हतें, असें मोठ्या खेदानें म्हणणें भाग पडत आहे. या मोठ्या पुस्तकात दुसऱ्याचें खंडण आणि उपहास करण्याचा प्रयत्न यांपलीकडे दुसरें कांहीं नाहीं. आपल्याखेरीज दुसऱ्या कोणास स्वतंत्र मत देण्याचा अधिकारच नाहीं, अशी दामल्यांची समजूत होती. या पुस्तकानें मराठी व्याकरणासंबंधीं गोष्टींचा निकाल तर लागला नाहींच, पण उलट बऱ्या च नवीन भानगडी मात्र उपस्थित झाल्या आहेत.

( रा० भि० जोशी—मराठी भाषेची घटना, पृष्ठें ४१३–१४ ).

---

## २. लोकाग्रहास्तव !

या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तींत वाक्यांतील मुख्य शब्द, ज्याच्या योगानें वाक्यांत ज्याबद्दल आपण बोलतों, तो पदार्थ (?) प्रदर्शीत होतो आणि ज्याला अनुलक्षून क्रियापदाचें रूप असतें, त्याला ' **कर्ता** ' असा शब्द योजिला होता; परंतु ही व्यवस्था **पुष्कळांस नापसंत** आहे असें दिसून आल्यामुळें अगोदर बराचसा उपयोगांत असलेला शब्द जो ' **उद्देश्य** ' तो च या आवृत्तींत कायम ठेविला आहे. तसेंच, वाक्यांत कर्मपद प्रथमेप्रमाणें असतां, म्हणजे त्याचें रूप

प्रत्यय लागून वदललेलें नसतां, त्यास कर्मणि प्रथमा म्हणावें, असा जुना प्रघात होता. ही चाल अशुद्ध व अशास्त्रीय आहे.........माझ्या व्याकरणाचीं पुस्तकें शाळांत चालत असल्यामुळें ही रीत बदलण्याची इष्ट सुधारणा घडत आलीच आहे.

( रा० भि० जोशी.-प्रौढबोध, आवृत्ति ५ वी, प्रस्ता० पृष्ठ ९ वें ).

---

## ३. भावप्रयोगांत उद्देश्यच नाहीं !

उद्देश्य म्हणजे ज्याबद्दल आपण बोलतों, तद्दर्शक शब्द. वाक्यांत क्रियापद त्या शब्दाप्रमाणें म्हणजे त्याला जुळून असतें; आणि कर्ता म्हणजे क्रियेचा व्यापार ज्याचेकडून घडला किंवा घडत असेल तो; अर्थात् तद्दर्शक शब्द.

कर्तरि प्रयोगांत उद्देश्य आणि कर्ता हीं एक असतात. कर्मणि प्रयोगांत कर्मपद क्रियापदाचें उद्देश्य म्हणजे त्याचीं रूपें फिरविणारें असतें.[रूपें फिरविण्याशीं उद्देश्य त्वाचा संबंध काय ? ] आणि ज्या शब्दानें मूळ क्रिया करणारा म्हणजे कर्ता दाखविला जातो, त्या शब्दाची तृतीया विभक्ति होते, त्यास कर्तृपद म्हणावें.

भावे प्रयोगांत क्रियापद कर्तृपद किंवा कर्मपद यांप्रमाणें फिरत नाहीं; पण त्याचें निरन्तर एक ठरीव रूप ( तृतीय पुरुषीं, नपुंसकलिंगीं, एक वचनीं ) असतें. क्रिया करणाराचा दर्शक शब्द तृतीया किंवा चतुर्थी विभक्तींत असतो. तोच शब्द **कर्तृपद** होय.**भावे प्रयोगांत उद्देश्य नसतें.**[भाषा म्हणजे बोलणें.अर्थात् बोलणाराचें वाक्य उच्चारण्यांत म्हणजेच बोलण्यांत कांहीं उद्देश्यच नसेल तर भाषा, बोलणें किंवा वाक्य संभवतील तरी कशीं ? ]

टीप-भाव म्हणजे स्वाभाविक स्थिति, तृतीय पुरुष, नपुंसलिंग, एकवचन, हीं, कियापदाची स्वाभाविक स्थिति मानिली आहे. भावेप्रयोगयुक्त वाक्यांत क्रियापद ज्याच्याशीं जुळतें असा शब्द असत नाहीं, म्हणून त्याचें हें स्वाभाविक रूप घालितात. [ **राजवाडे** म्हणतात. घोडा-घोडी-घोडें यांत कोणी ' घोड ' हें मूळ रूप मानितात; पण ती चूक आहे. वस्तुतः हे तिन्ही शब्द स्वतंत्र मूळरूपें आहेत. त्याचप्रमाणें तृ० पु०, नपुं० लिं०, एकवचनीं, हेंच काय तें क्रियापदाचें स्वाभाविक रूप ठरविलें कोणीं ? ]

उदाहरणें—'रामा पुस्तक वाचितो.' यांत वाचणें ही क्रिया करणारा 'रामा' आहे; व क्रियापदाचें रूप फिरविणारा शब्दही तोच आहे, म्हणून कर्ता तोच व उद्देश्यही तोच आहे. हा प्रयोग कर्तरि होतो. परंतु '**रामानें** पुस्तक वाचिलें. किंवा वाचावें ?' या वाक्यांत क्रिया करणारा जो 'रामा' तो 'वाचिलें' या क्रियापदाचें उद्देश्य नव्हे. कारण त्याच्यामुळें क्रियापदाच्या रूपांत पालट होत नाहीं. या वाक्यांत 'पुस्तक' या कर्मपदाप्रमाणें क्रियापद असतें. अर्थात् 'पुस्तक' हा शब्द उद्देश्य आहे; व कर्मपद उद्देश्य आहे; म्हणून हा कर्मणि प्रयोग होतो. यांत 'रामानें' हें कर्तृपद होय. '**रामानें** रावणास मारिलें किंवा मारावें' या वाक्यांत क्रियापदास वागविणारा शब्द नाहीं; म्हणजे त्या क्रियापदास **उद्देश्य** नाहीं. 'रामानें' हें कर्तृपद व रावणास हें 'कर्मपद' असून क्रियापद त्याच्या स्वाभाविक स्थितींत ( तृ० पु०, नपुं० लिं०, ए० व० ) आहे. [!]

वरील विवेचनावरून उद्देश्य आणि कर्तृपद यांचे संबंधानें पुढें लिहिल्याप्रमाणें नियम बांधितां येतातः—

( १ ) उद्देश्य नेहमीं **प्रथमा** विभक्तींत असावयाचें.

( २ ) कर्त्याचा दर्शक शब्द म्हणजे कर्तृपद प्रथमा, तृतीया किंवा चतुर्थी या विभक्तींत असेल; किंवा त्यास कडून, करवीं, द्वारें, इत्यादि तृतीया विभक्त्यन्त अव्ययें लागतील; उदा०–'रामानें पुस्तक वाचिलें' ( तृ० ),' मला हें रुचत नाहीं' (च०), 'माझ्यानें हें काम करवत नाहीं,' ( संबंधी विशेषणाची तृतीया ). कर्तृपद क्वचित् पंचम्यन्तही असतें.

[ कर्माची नेहमीं सप्रत्यय किंवा अप्रत्यय द्वितीया मानावी; ( पृ० ११७ ). या जोशीबोवांच्या विधानास, 'उद्देश्य नेहमीं प्रथमा विभक्तींतच असतें' हा त्यांचाच वरील पहिला नियम अत्यन्त सुसंगत आहे म्हणावयाचा ! ]

( रा० भि० जोशी—प्रौढबोध, आवृत्ति ५ वी, पृष्ठ ३७१–७२–७३ ).

---

## ४. शुद्धाशुद्ध-विचार.

परकी भाषेंतून शब्द घेतला असतां, त्याची व्यवस्था ज्या भाषेंत तो घेतला असेल, त्या भाषेंतल्या नियमांप्रमाणेंच झाली पाहिजे; असा ज्या भाषा आम्हांस माहीत आहेत, त्या सर्वांमध्यें नियम दिसून येतो. यासाठीं—

( १ ) मराठींत शब्दांच्या अन्तीं ऱ्हस्व स्वर नाहीं; आणि संस्कृत शब्द जसेच्या तसे मराठींत घेतले, तरी त्यांचा मराठींत उपयोग झाल्यावर त्यांचे अन्त्य दीर्घ च लिहिले पाहिजेत; असा नियम ठरविणें रास्त आहे.

( २ ) ज्यांचा अन्त्य ' अ ' असून उपान्त्य ' इ–उ ' आहे, अशा शब्दांचे उपान्त्य मराठींत दीर्घ च लिहिले पाहिजेत. कारण, मराठीच्या उच्चाराच्या नियमाप्रमाणें उपान्त्य जोरदार असतो, तेव्हां आपण उच्चार दीर्घ च करितों. जसें:––विपूल; गूण; वीष; गरूड, कृत्रीम, शकून, अंकूर, इत्यादि.

हे स्वरही ऱ्हस्व लिहावे असा पुष्कळांचा आग्रह असतो. इतका कीं, ' शिरस् ' शब्दांतील ' स ' चा लोप होऊन, तो शब्द ' शीर ' असा पूर्ण मराठी बनल्यावरही ' शिर ' असा लिहावयास सांगतात ! तसेंच, वस्तू हा शब्द मूळचा नपुंसकलिंगी असलेला पूर्ण मराठी बनून, स्त्रीलिंगी झाला, तरी ' वस्तु ' असाच लिहावयाचा ! असले प्रकार मराठीच्या दृष्टीनें अगदीं अशास्त्रीय अतएव अशुद्ध होत. हा केवळ मराठीवर जुलूम आहे; आणि तो कधींही चालूं देतां कामा नये.

इंग्रजी भाषेंत ल्याटीन, फ्रेंच वगैरे भाषांतील शब्द किंवा वाक्यखंड जसेच्या तसे च घेतात; त्यामध्यें इंग्रजीच्या स्वभावाप्रमाणें बदल करीत नाहींत. तथापि ते निराळ्या तऱ्हेनें ( इटालिक्‌स्‌मध्यें ) लिहितात. मराठींत अगदी न फिरलेल्या शब्दांच्या संबंधानें अशी तडजोड हवी तर सोईची वाटल्यास करावी.

( **रा॰भि॰जोशी**––म॰ भा॰ घटना, पृष्ठें ११३–११४ ).

( ३ ) अन्त्य व उपान्त्य यांमागील ( इकार–उकारात्मक ) अक्षरें मराठींत ऱ्हस्व होतात. [ हा नियम प्रौढबोध पृष्ठ ९२ ते ९४ पर्यंत पाल्हाळानें आहे ].

**टीपः**––मराठींत आलेले संस्कृत व परभाषेंतील शब्द यांना हे नियम लागू होत नाहींत. त्या शब्दांपैकीं जे भाषेंत विशेष प्रचारांत नाहींत, त्यांचें उपान्त्याक्षर जसेंच्या तसेंच राहतें. **उदा॰**––गीत, गीतें; सूत्र, सूत्रें; मयूर, मयूरास; अमीर, अमीरास; मुनीम, मुनीमानें; इ॰.

[ येथें तरी लवचिकता कशाला ? जर मराठीच्या उच्चराप्रमाणेंच केवळ लिहावयाचें, अन्य कांहीं पहावयाचें नाहीं, तर खालीलप्रमाणें लेखन बेधडक रूढ करण्यास काय प्रत्यवाय आहे ?

( १ ) **पुर्वीं** लोक दारू पीत नसत; असें **भुगोलांत** लिहिलें आहे.
( २ ) **सुर्य**, चंद्र, पृथ्वी, तारे, हींच जयाचीं लेंकुरें.
( ३ ) शुद्धलेखनशास्त्र रामभाऊ जोशांनींच **पुर्णतेस** आणिलें.
( ४ ) **सितेनें** रामचंद्राला वरिलें.
( ५ ) **सुशिला** ही आपल्या नांवाप्रमाणेंच चांगला फत्तर आहे.
( ६ ) चांगल्या **नितीनें** वागणें हें भल्या मनुष्याचें लक्षण नाहीं काय ?
( ७ ) रामाला काळोखांत **भिती** वाटली.
( ८ ) **तृतिया** विभक्तीचीं **रुपें** ( कीं चांदी ? ) कोणतीं ?
( ९ ) अनेक **आशिर्वाद्** विशेप.
(१०) दशरथाचा **सूत** राम याचे **गूण** व **किर्ती** सर्वत्र पसरली.
इत्यादि. ]

---

## ५. टिळकादिकांचे भाषा गुरू.

[ भाषेच्या व लेखन-शुद्धीच्या बाबतींत, 'मराठी' भाषेच्या घटने'त प्रथमावृत्तींत खालील शेरे आढळले; ते वाचकांकरितां येथें देतों ].

(१)पुण्याची **चिपळूणकर** आणि मंडळी यांनीं महाभारताचें भाषान्तर प्रसिद्ध केलें. त्यांत शेवटचा भाग " महाभारताचा उपसंहार " हा **चिंतामण विनायक वैद्य** यांच्या हातून निपजला, हें चांगलें झालें. या उपसंहारांत सर्व महाभारताचें नवीन दृष्टीनें निरीक्षण करून नवीन विचाराच्या अनेक गोष्टी वाचकांपुढें मांडल्या आहेत. त्यांतही पाल्हाळ, असंबद्धता, पौराणिक गोष्टींचें समर्थन मतभेदावर उगाच वाद-विवाद हे प्रकार आहेतच......पण भाषेच्या संबंधानेंहि या ग्रंथाला बरेंच खालच्या प्रतींत ढकलावें लागेल, असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागत आहे ! ( म०भा० घटना, १ ली आवृत्ति, पृष्ठ ३४० ).

(२)विद्यमान् ग्रंथकारांमध्यें **आपटे**, **महाजनी**, आणि **परांजपे** हे विशेष काळजीनें लिहिणारे आहेत. **केळकर**, **कोल्हटकर**, आणि **खाडिलकर** याचेंहीं इकडे लक्ष असतें. मासिक पुस्तकांमध्यें विविधज्ञानविस्तार हें जुनें पुस्तक सर्वांना कित्यादाखल आहे; परंतु यामध्यें भाषाशुद्धी व भाषेची सुव्यवस्था याकडे असावी तितकी दृष्टी नसते......अन्य मासिकांत मनोरंजनाचें त्यानें ठरविलेल्या पद्धतीप्रमाणें का होईना इकडे लक्ष असतें.

( घटना १ ली आ०, पृष्ठें ४३९-४० )

( ३ )टिळकांनीं भ ग व द् गी ता र ह स्य अथवा क र्म यो ग शा स्त्र हा सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला.हा ग्रंथ त्यांच्या बुद्धिमत्तेस, विद्वत्तेस आणि बहुश्रुतपणास शोभण्यासारखा आहे..............परंतु भाषेच्या दृष्टीनें हा ग्रंथ नांवाजण्यासारखा नाहीं. पाल्हाळ आणि चर्वितचर्वण फार आहे. शुद्धाशुद्धतेकडे लक्ष नाहीं. ( कोणत्या प्रकारच्या ? ) शब्दांची निवडही फारशी काळजीनें केलेली नाहीं. मागल्या-पुढल्या प्रतिपादनामध्यें मेळ नाहीं आणि एकंदर भाषाही विषयास व ग्रंथकाराच्या लौकिकास शोभेशी नाहीं. या कारणासाठीं या ग्रंथानें वाङ्मयांत चांगलीशी भर पडली असें म्हणतां येत नाहीं ! [नव्या दुसऱ्या आवृत्तींतून हा भाग गाळिला आहे ].

--( मराठी भाषेची घटना, १ ली आवृत्ति, पृष्ठ ३८२ ).

[ टिळकांचें शुद्धलेखन व भाषा यांवरील हा अभिप्राय ऐकल्याबरोबर आमचे एक: मित्र ताडकन् उद्गारले-" टिळकांनीं मंडालेहून आल्यावर एकाद्या विधवेशीं पुनर्विवाह केला नाहीं, हें त्यांचें दुर्दैवच येथें ओढवलेलें दिसतें. " ]

---

[ ४ ]

## १. महाराष्ट्र भाषेचें व्याकरण.

इसवी सन १८१८ त हा महाराष्ट्र देश शहाण्या इंग्लिश सरकारच्या हातीं आल्यावर पुढें सात-आठ वर्षांनीं त्यांणीं आपलें लक्ष इतर लक्षावधि राजकीय विषयांत निमग्न असतां, आजपर्यंत कोणत्याही सरकारनें ज्याकडेस विशेषेंकरून लक्ष दिलें नाहीं त्या देशभाषेकडेस, व एतद्देशीय लोकांत सद्विद्येचा प्रसार व्हावा या विचाराकडेस लाविलें; हें या सरकारचें उदार कृत्य परम स्तुत्यार्ह होय. या उद्देशानें सन १८२६ त मुंबईची " हैंद शाळा पुस्तक मंडळी " या नांवानें एक सभा स्थापित झाली. पुढें या सभेच्या कर्तृत्वाची बरीच घडामोड होऊन तिचें " मुंबईची शिक्षा मंडळी " या नांवानें रूपान्तर झालें. पुढें ही मंडळी मोडून, इचें काम सांप्रत, तत्स्थानापन्न सरकारनें स्थापित केलेली जी " बोर्ड आफ् एज्युकेशन् " या नांवाची सभा, ती करीत आहे. पहिली सभा स्थापून आज अठ्ठावीस वर्षें झालीं; इतक्या काळाच्या अवधींत व्हावे तितके जरी ग्रंथ

झालें नाहींत, तरी या महाराष्ट्र भाषेंत कांहीं कांहीं उपयोगी विषयांवर बरेच ग्रंथ झाले आहेत. या देशांत पूर्वीपासून पद्यात्मक ग्रंथ लिहिण्याची चाल होती. सरकारी कामकाजाशिवाय गद्यात्मक लेख लिहिण्याची चाल अगदीं नव्हती. मराठ्यांच्या अमलांत मात्र कोणीं कोणीं बखरा लिहून, ही चाल नुकतीच पाडली होती, परंतु तिचा प्रसार थोडा. ती तेव्हां होती नव्हती सारखीच म्हटल्यास चिंता नाहीं. महाराष्ट्र भाषेंत शुद्ध रीतीनें वाक्ययोजना करून रसभरित असे पहिले ग्रंथ **सदाशिव काशिनाथ छत्रे** यांणीं रचिले; म्हणोन यांस गद्यात्मक ग्रंथांचे जनक म्हटल्यासहि साजेल. याच काळीं कित्येक पंडितांनीं मिळून एक महाराष्ट्र कोश केला. हें एक मोठें उपयोगीं काम झालें. यानंतर **हरि केशवजी व बाळ गंगाधरशास्त्री** यांणींहि सरकारी शाळांकरितां चार-पांच ग्रंथ चांगले तयार केले; व यांशिवायहि लहान लहान असे पुष्कळ ग्रंथ तयार झाले आहेत व होताहेत.

सन १८३६ त मीं आपलें **महाराष्ट्र भाषेचें व्याकरण** प्रसिद्ध केलें, त्याचा उद्देश व तें कोणत्या स्थितींत असतां रचिलें, याविषयीं कांहींशी सूचना त्याच व्याकरणाच्या प्रस्तावनेंत केली आहे. अलिकडेस 'दर्पण' व तदनंतर 'प्रभाकर' हीं वर्तमानपत्रें निघाल्यापासून मोठा लाभ हा झाला कीं, त्यांच्या द्वारें लोकांस ज्ञान होऊन येथील लोकांत मराठींत गद्यरूपानें लिहिण्याचा प्रचार चांगला वाढत चालला आहे. तेव्हां अशा समयीं व्याकरणद्वारानें भाषेचें नियमन करणें किती आवश्यक आहे, हें सुज्ञ पुरुष जाणतच असतील. हाच हेतु मनांत धरून मीं ही दुसरी आवृत्ति सिद्ध केली. तिचा मुख्य उद्देश हाच कीं, जितकें साधेल तितकें करून आजपावेतों जिला नियमांत आणण्याविषयीं कोणीं प्रयत्नच केला नाहीं, म्हणोन अत्यन्त विस्खळीत झालेली व व्याकरणरूप फणीनें जिला कोणीं विंचरलेंच नाहीं, म्हणून जींत अनेक ग्रंथि जमून फारच गुंतलेली अशी जी ही मराठी भाषा तिला कांहीं तरी नियमांत आणावी; आणि दीर्घकाळग्रथित जी तिची गूत ती हातीं घेऊन तिचे पदरें कांहीं सोडवून कांहीं तरी उकलण्याच्या धोरणांत आणून बसवावी. आतां हें कार्य मीं कसें व कोठपर्यंत सिद्धीस नेलें, ह्याचा विचार करणें सुज्ञांकडेस आहे.

ही महाराष्ट्र भाषा आजपावेतों नियमांत नव्हती, म्हणून इचे प्रकारहि फार आढळतात. दहा-बारा कोशांवर भाषा बदलते म्हणून जी लोकांची म्हण

आहे, ती अक्षरशः खरी आहे. इतकेंच नाहीं, परंतु जे भाषाभिज्ञ आहेत, त्यांच्या ऐकण्यांत शब्द-वैचित्र्यावरून, स्वरभेदावरून व जातिपरत्वेंहि निरनिराळे प्रकार येतात. कोंकणांतच या भाषेचे चार-पांच प्रकार आढळतात. दमणपासून मुंबईपर्यंत एक प्रकार. यांत कांहीं गुजराथी शब्दांची मिसळ आहे. यांत वर्तमानकाळीं एकवचनीं रूपें तृतीय पुरुषाचीं पुल्लिंगीं स्त्रीलिंगाप्रमाणें; व प्रथम पुरुषाचीं स्त्रीलिंगीं पुल्लिंगाप्रमाणें होतात. मुंबईच्या दक्षिणेस अष्टागर प्रांताच्या भाषेचा प्रकार निराळा; पुढें रत्नागिरी प्रान्ताची शुद्ध कोंकणी भाषा यापेक्षां विशेष निराळी; राजापूर प्रांताच्या भाषेचा प्रकार निराळा; तेथून मालवणी भाषा निराळी; ईत गोमंतकी शब्द व क्रियापदांचीं कांहीं कांहीं रूपें निराळ्या प्रकारचीं आढळतात. पुढें शुद्ध गोमंतकी भाषा; ही मराठी भाषेहून निराळी भाषा म्हटल्यासहि चिंता नाहीं. देशस्थ भाषेंतहि याचप्रमाणें प्रकार आढळतात. ज्या ज्या देशांच्या सीमेवर महाराष्ट्र देशाची सीमा मिळाली आहे, त्या त्या प्रांतीं त्या त्या भाषेचे शब्द यांत मिसळून स्वरभेदहि निराळा होतो. कर्नाटक देशाच्या सीमेजवळच्या प्रांतीं म्हणजे करवीरापासून सोलापुरापर्यंत जो प्रदेश त्यांत वेगळ्या प्रकारची भाषा आढळत्ये. वऱ्हाड प्रांताच्या थेट देशस्थी भाषेचा प्रकार निराळा; वऱ्हाणपुरापासून नंदुर्बारपर्यंत खानदेशाच्या समीप भागाच्या भाषेचा प्रकार निराळा; पुढें खानदेशाची भाषा गोमंतकी भाषेप्रमाणें मराठी भाषेहून निराळी म्हटल्यास चिंता नाहीं. "साहेबा तूं खैं वेता?" हें जितकें शुद्ध महाराष्ट्र भाषेपासून निराळें, तितकेंच "नानाभाऊ तूं कठ जास?" हेंहि निराळें होय. आतां हे सर्व प्रकार वजा घालून महाराष्ट्र भाषेचे मुख्य दोनप्रकार मानिले आहेतः—देशस्थ भाषा आणि कोंकणस्थ भाषा; त्यांत या व्याकरणांत, महाराष्ट्र देशाचा मध्यभाग जो पुणें प्रांत, त्यांत, जी भाषा राजकीय आणि विद्वान् लोक बोलतात, तिचें अनुकरण केलें आहे. त्यांत माझ्या वडिलांचा जन्म कोंकणांतला, म्हणून यांत कदाचित् कोंकणी प्रकारचें यत्किंचित् आधिक्य असलें, तरी मला क्षमा मागावयास कांहीं अवकाश आहे.

(दादोबा—म० भा० चें व्याकरण, प्रस्ता० आं० ३ री, पृष्ठें ९ ते १२).

# [ ५ ]

## १. पुणेरी मराठीचें वैशिष्ट्य.

एकंदर मराठी भाषेचें व्याकरण म्हटलें म्हणजे तींत त्या भाषेच्या सर्व प्रकारांचें उपपादन पाहिजे; परंतु कोणत्याहि भाषेचें व्याकरण घेतलें तरी बहुतकरून त्यांत त्या भाषेच्या सर्व प्रकारांचें प्रतिपादन नसतें; तर विद्या, अधिकार, प्रतिष्ठा, इत्यादि कारणांनीं इतरांपेक्षां विशेष वजनदार अशा लोकांच्या बोलण्यांत व विशेषेंकरून लिहिण्यांत, जो भाषेचा प्रकार असतो, त्या प्रकाराचें उपपादन व्याकरणांत असतें. तो प्रकार इतर प्रकारांपेक्षां स्वरूपतः श्रेष्ठ नसला, तरी त्याचा उपयोग करणारांच्या श्रेष्ठत्वानें त्यास श्रेष्ठत्व येतें. त्यांत मोठमोठे उपयुक्त किंवा मनोरंजक ग्रंथ होतात. न्यायमनसुबीचीं वगैरे सरकारी व दरबारी कामें त्यांत चालतात. मोठमोठ्या सभांत वक्त्यांचीं भाषणें, पंडितांचे वादविवाद, उपदेशकांचे उपदेश, त्यांत होतात. या व यांसारख्या दुसऱ्या कितीएक कारणांनीं तो प्रकार श्रेष्ठ होऊन पुढें सरसावतो; व बाकीचे अडाणीपणाचे ठरून मागें पडतात; व कधीं कधीं नाहींतसेही होतात.

याचप्रमाणें मराठी व्याकरणावर जे ग्रंथ आहेत, त्यांतही मराठी भाषेच्या सर्व प्रकारांचें उपपादन नाहीं; परंतु पुणें प्रांतांत व त्यांतही ब्राह्मण वगैरे वरच्या जातींच्या लोकांत ज्या प्रकारची मराठी भाषा चालू आहे, तिचें उपपादन यांत आहे. पुणें शहर कितीएक वर्षेंपर्यंत महाराष्ट्र देशाचीच नव्हे, तर कितीएक अंशीं ह्या हिंदुस्थानांतील मुलखाच्या मोठ्या भागाची राजधानी होतें; ह्यामुळें व ब्राह्मण लोक विद्येनें व अधिकारानें वगैरे कितीएक दिवस श्रेष्ठ असल्यामुळें, त्यांमध्यें जो भाषाप्रकार चालू होता, तो विशेष उदयास आला; व हल्लीं ग्रंथ वगैरे याच भाषा-प्रकारांत उत्तरोत्तर होत असल्यामुळें तोच पुढें बळावून, याची भाषा तीच प्रतिष्ठित भाषणांची व लेखांची भाषा होत चालली आहे. यास्तव आमच्या व्याकरणाविषयींच्या या निबंधमालेंतही त्याच भाषा-प्रकाराचें मुख्यत्वेंकरून निरूपण आहे. तथापि इतर सारे भाषा-प्रकार सर्वथैव अडाणीपणाचे व अशुद्ध असें आमचें मत नाहीं. आम्हांस वाटतें कीं, त्या इतर सर्व भाषा-प्रकारांतील किंवा त्यांतले मुख्य मुख्य जे असतील, त्यांतील विशेष गोष्टी निवडून काढून कोणीं शोधक पुरुषांनीं त्यांचें प्रतिपादन केल्यास, त्यापासून एकंदर मराठी भाषेचें स्वरूप

समजण्यास वरेंच साह्य होईल. भाषेचे अवान्तर भेद मोडून एक प्रकारची चांगली प्रौढ व व्यापक भाषा सर्व देशांत चालू झाल्यावर कितीएक मोठमोठे फायदे आहेत; व अवान्तर निरनिराळे व कोते भाषा-प्रकार चालू असल्यानें विद्येचा वगैरे प्रसार होण्यास अडचण होते; या गोष्टी आम्ही जाणत आहों. तथापि, ती गोष्ट थोड्या कांहीं व्याकरणकर्त्यांनीं स्वकपोलकल्पित कांहीं नियम ठरवून, त्या नियमांस न अनुसरणाऱ्या शब्दांस व प्रयोगांस अशुद्ध म्हटल्यानें सिद्ध होते असें नाहीं; तर तसें होण्याचा वास्तविक मार्ग म्हटला म्हणजे वर सांगितलाच आहे. जो भाषा-प्रकार बोलणारे लोक विद्येनें वगैरे थोर असतात, ज्या प्रकारच्या भाषेंत अनेक ग्रंथ वगैरे होतात, तो भाषा-प्रकार अर्थातच विशेष प्रवृत होतो; व बाकीचे मोडतात.

( **कृष्णशास्त्री चिपळूणकर,**—"म० व्या० निबंध," पृष्ठें २४ ते २६ ).

---

# [ ६ ]

## १. सुबोध व्याकरणाची आवश्यकता.

भाविकांस यात्रांस जाण्यास साह्य करणें हें जसें महत्पुण्य आहे, तसें अल्पवयस्क विद्यार्थ्यांस ज्ञानसंपादनाच्या कार्यांत साह्य करणें हेंही मोठें पुण्य-कर्म आहे; ही गोष्ट अलीकडील पाश्चात्य देशांतील विद्वान् लोकांच्या मनांत उभी राहून, त्या दिशेनें त्यांचे प्रयत्न पुष्कळ चालले आहेत. तिकडे कांहीं वर्षांपूर्वी 'भूमिति" हाल अँड **स्टीव्हन्स** यांची चालत असे; ती सगळी रेखात्मक होती ती सशास्त्र होती. तींत अशास्त्र असें कांहींही नव्हतें. परंतु रेखांची मिळवणी, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, हीं स्वभावतः मनांत भरण्यास कठीण असल्यामुळें मुलांस त्या पद्धतीचा अभ्यास अतिशयित जड जात असे तो इतका कीं, त्या विषयांत त्यांची बरीच गति होईपर्यंत त्यांना त्यांतले कितीएक सिद्धान्त तोंडपाठ करावे लागत. ही गोष्ट आमच्यांतल्या सध्यांच्या पदवीधर मंडळींस चांगली आठवत असेल; आणि तो एक मोठा त्रास होता, हेंही ते अद्याप विसरले नसतील हा त्रास टाळण्याकरितां अलीकडे त्याच विद्वान् ग्रंथकारांनीं कांहीं विद्वत्सभांच्या पसंतीवरून भूमितीस देवळ तितकें अंकगणिताचें रूप दिलें आहे. तीस मोजपांमध्यें संख्यांची मदत दिली आहे

तेणेंकरून तो विषय पुष्कळ सुलभ झाला आहे; आणि त्या इंग्रजी ग्रंथांचीं भाषान्तरें देशभाषांत करून तीं इकडे उच्चप्रतीच्या शिक्षणाच्या वर्गांत चालू केलीं आहेत; हें फार चांगलें झालें आहे. त्याबद्दल आपण प्रजाजनांनीं राज्यकर्त्यांचे उपकार मानिले पाहिजेत. हें इतकें आज येथें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, ही सोय जशी भूमितीविषयीं झाली आहे, तशी आमच्या देशभाषांतील व्याकरणांविषयीं—विशेषेंकरून **मराठी भाषेंतील व्याकरणां**विषयीं—लहान मुलांच्या संबंधानें लौकर झाली पाहिजे. सांप्रतकाळीं जीं लहान व्याकरणें मुलांस शाळांतून शिकवीत असतात, तीं सगळीं मोठ्या मराठी व्याकरणशास्त्रांचे संक्षेप आहेत; ते शास्त्रशुद्ध आहेत; ते नियमांनीं खच्चून भरलेले आहेत: परंतु त्यांमध्यें स्वभावतःच असें कांहीं कठिण्य आलें आहे कीं, त्यांतल्या व्याख्या आणि नियम मुलें तोंडपाठ करितात, त्यांचा अर्थ त्यांस मुळीं कळत नसतो; आणि त्यांचे श्रम अगदीं व्यर्थ जात असतात; ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. हिची साक्ष पुष्कळ चांगले शिक्षक लोक देतील; हें थोडें उदाहरणद्वारा स्पष्ट केलें पाहिजे.

कोणत्याही विषयाचें पाहिलें तरी असें दिसून येईल कीं, त्याचे कांहीं भाग अगदीं सोपे असतात; कांहीं मध्यम असतात; आणि कांहीं कठीण असतात. सूर्य आकाशांत असतो; पृथ्वी हा एक ग्रह आहे; आणि चंद्र हा एक उपग्रह आहे; हीं तिन्ही वाक्यें ज्योतिष–शास्त्रांतलीं आहेत. त्यांतलें पहिले वाक्य सात–आठ वर्षांच्या मुलास सहज कळण्यासारखें आहे. दुसरें वाक्य कळावयास मुलगा जरा प्रौढ असून, त्याला आधीं ग्रह म्हणजे काय, हें कळलें पाहिजे; आणि तिसरें वाक्य 'उप' ह्या शब्दाचा अर्थ आणखी कळून त्याच्या योगानें नुसत्या ग्रह शब्दाच्या अर्थांत काय फरक पडतो, हें त्यास समजलें पाहिजे. हा प्रकार व्याकरण–शास्त्रांतही आहे. ज्यांनीं मराठी व्याकरणाचा अभ्यास स्वतः केला आहे, अथवा तो विषय विद्यार्थ्यांस पढविला आहे, त्यांच्या लक्षांत सहज आलें असेल कीं, सध्यांच्या लहान व्याकरणांत स्वर, व्यंजनें, संधिस्वर, जोडाक्षरें, इत्यादिकांचें भारूड लहान मुलांस पाठ करावयास लावितात. त्यांस नुसते ऋ, ॠ, ऌ ह्यांचे उच्चारही करितां येत नसतात. त्याप्रमाणें क आणि ख ह्यांच्या उच्चारांतला भेदही त्यांस दाखविल्यावांचून येत नसतो; आणि श, ष, स, ह्यांच्या उच्चारांचा जो एक गोंधळ त्यांच्या वाणींत होत असतो, त्याचें वर्णनही करितां येत नाहीं. ह्या सगळ्या

बाजारापेक्षां अगदी आरंभीं त्याख्या वगैरे कांहीं एक न सांगतां नाम म्हणजे काय, एवढें मुलाला नांव शब्दावरून सांगून, नामांचीं लिंगें आणि वचनें शिकविण्याचा जर आरंभ केला, तर तें त्यांस लौकर येणार नाहीं काय? ज्याची मातृभाषा मराठी आहे, तो स्वभावतः बोलतांनाही 'ती दगड' किंवा 'तो मांजर' असें कधीं म्हणावयाचा नाहीं. ह्या अल्पज्ञानांत उदाहरणद्वारा थोडीशी भर घातली म्हणजे त्याला शब्दांच्या लिंगांचें ज्ञान अल्पकाळांत आणि अल्पश्रमांत नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद, ह्या चोहोंच्याही संबंधानें उपयोगीं पडेल. तो कधीं 'जातो' ह्याला **स्त्रीलिंग** म्हणावयाचा नाहीं; कीं, 'निजते' ह्याला **पुल्लिंग** म्हणावयाचा नाहीं. हाच प्रकार वचनाच्या संबंधानें अगदीं सहजीं होण्यासारखा आहे; आणि हें सगळें व्याकरणच आहे. तर असे व्याकरणाचे अगदीं सोपे सोपे भाग मूळ व्याकरणाच्या पुस्तकांत अगदी आरंभीं घातले, आणि कठीणपणाच्या मानानें पुढचे भाग शेवटपर्यंत घालीत गेलें, तर विद्यार्थ्यांस आणि शिक्षकांस व्याकरण-विषय पुष्कळ सोपा जाणार नाहीं काय?

आणखी ह्या विषयाच्या संबंधानें दुसरें एक उदाहरण द्यावेंसें वाटतें. घरामध्यें लहान-मोठीं माणसें अनेक असतात; त्यांची माहिती कोणासही द्यावयाची म्हटली म्हणजे दोन प्रकारची असते. पहिल्या प्रकारची म्हटली म्हणजे त्यांच्या अंगचे स्वतःचे गुण आणि दुसरा प्रकार म्हटला म्हणजे त्यांचे जे संबंध इतर माणसांशीं असतात, ते होत. समजा, एक मुलगा घरांत उभा आहे, तर तो काळा आहे, गोरा आहे, शहाणा आहे, वेडा आहे, बुद्धिवान् आहे, बुद्धिमंद आहे, इत्यादि सगळे गुण त्याचे स्वतःचे आहेत; आणि तो अमक्याचा मुलगा आहे, अमक्याचा भाऊ आहे, अमक्याचा पुतण्या आहे, अमक्याचा भाचा आहे, अमक्याचा मावस-भाऊ आहे, हे त्याचे संबंध होत. ह्यापैकीं त्याचे स्वतःचे जे **गुण** आहेत ते समजायास फारसें शहाणपण लागत नाहीं; पण **संबंध** लक्षांत येण्यास बरेंचसें शहाणपण लागतें. हीच अवस्था वाक्यांतल्या शब्दांची असते. त्यांचे स्वतः ते लिंग-वचनादि **गुण** सहज कळण्यासारखे असतात; परंतु कर्ता, कर्म, समास, प्रयोग, इत्यादि यांचे **संबंध** लक्षांत येण्यास बराच समंजसपणा आवश्यक असतो. ह्या दोन उदाहरणांवरून मुलांना शिकविण्याच्या व्याकरण-पुस्तकांची रचना आणि शिकविण्याची पद्धति कशी असावी, म्हणजे हा विषय सहज कळेल, हे चांगल्या शिक्षकांच्या सहज लक्षांत येईल.

असें स्वल्पीकरण विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या अभ्यासांत होणें इष्ट आहे. हें करण्यास चांगले अनुभविक शिक्षकच पाहिजेत. त्यांची एक कमिटी सरकारनें नेमली, तर तिच्या हातून पुष्कळ चांगलें काम होईल; आणि त्यापासून विद्यार्थ्यांस मोठी मदत होईल, अशी आमची खात्री आहे.

( वि० कों० ओक—विविधज्ञानविस्तार: एप्रील १९१४).

[ आजही **बारा वर्षांपूर्वीचे** हे उद्गार तंतोतंत लागू पडत आहेत; आणि मुलांकरितां अजूनही ' **सुबोध व्याकरणा**'ची आवश्यकता वाटत असल्यामुळें, सरकारनें प्राथमिक शाळांकरितां कोणत्या धर्तीवर मराठीचें व्याकरण रचलें जावें ह्याबद्दल अभिप्राय देण्यासाठीं व योजना किंवा कांहीं तरी मार्ग सुचविण्यासाठीं नुकतीच एक " व्याकरण कमिटी" नेमिलेली आहे. ]

---

[ ७ ]

## २. अ–प्रत्यक्षनिवेदनपद्धति.

एका सुशिक्षित आंग्ल भाषाप्रवीण महाराष्ट्रीयाबरोबर एक दिवस बोलत असतां How have you done to day in your Examination ? या वाक्याबद्दल " तुम्हीं आज परीक्षेंत कसें काय केलें आहे ? " अशा प्रकारचे दुष्ट प्रयोग आपण निष्काळजीपणानें अलीकडे करूं लागलों आहोंत; असें आमचें बोलणें चाललें होतें. तो मित्र म्हणाला,–'या चुकांबद्दल **रामभाऊ** लिहिणार आहेत, असें **रामभाऊ** मला म्हणाले.' त्यांचें हेंही वाक्य मला चुकीचें वाटलें, व त्यांची चूक त्यांच्या नजरेस आणून दिल्यावर त्यांनीं ती कबूल केली. आपल्या मराठींत इंग्रजीसारखी अप्रत्यक्ष–निवेदन–पद्धति' नाहीं; अर्थात् इंग्रजींत 'अप्रत्यक्ष–निवेदन' करितांना काळ, स्थळ, पुरुष, इत्यादिकांत जसा फरक करावा लागतो, तसाच मराठींत करणें उचित नाहीं.

" Rama said that he was going to stay there that day." याचें भाषान्तर ' मी आज येथें राहणार आहे, असें रामा म्हणाला' असें केलें पाहिजे. ' तो त्या दिवशीं तेथें राहणार होता असें रामा म्हणाला' असें भाषान्तर शाळेंतल्या मुलानें देखील वास्तविक करूं नये; पण अलीकडे इंग्रजीचा अंमल इतका जारी झाला आहे कीं, न कळत तुमच्या–आमच्या

तोंडून वरीलसारखें जरी नाहीं, तरी त्याच जातीचें भाषान्तर बोलण्या-चालण्यांत केलें जातें. बायकांची तरी भाषा शुद्ध असावी ना, कॉलेजांतील एक-दोन मुलींनीं, " मी उद्यां येईन, असें तो म्हणाला " या ( किंवा अशाच ) वाक्याबद्दल " तो दुसऱ्या दिवशीं येईल असें तो म्हणाला " अशा प्रकारचें वाक्य लिहिलें. एका मुलीनें तर " तो दुसऱ्या दिवशीं आला, असें तो म्हणाला " अशा प्रकारचें इंग्रजी नियम लाविलेलें वाक्य लिहिलें. मुंबई विश्वविद्यालयाच्या एका परीक्षेमध्यें या प्रकारची उघड उघड चूक शुद्ध करण्याकरितां मीं घातली; पण सांगण्यास वाईट वाटतें कीं, शेंकडा ५० हून अधिक विद्यार्थ्यांच्या ती चूक ध्यानांतच आली नाहीं.

भाषेच्या बाबतींत काय, किंवा सामाजिक बाबतींत काय, मी सोंवळयाचा आग्रह धरणाऱ्यांपैकीं नाहीं. कांहीं फारशी, आरबी, इंग्रजी शब्द, मराठीमध्यें आले तर चालतील, किंबहुना त्यामुळें शब्दांची संपत्ति व सामर्थ्य यांमध्यें भर पडेल, असें मला वाटतें. पण मराठींत रूपें साधण्याची प्रक्रिया व वाक्यरचना यांमध्यें म्हणजे तिच्या **प्रकृती**मध्यें **विकृति** झालेली मला प्रिय नाहीं. भाषेमध्यें कालान्तरानें थोडाबहुत फरक होणें अपरिहार्य असतें, हें मी जाणून आहें. फार काय, आपल्या डोळ्यांदेखत आपण कांहीं बाह्य शब्द मराठींत रूढ झालेले पाहतों ( उदाहरणार्थ-टाईम, ट्रॅम, इ० ); बोलतां बोलतां कांहीं अशिष्ट शब्द शिष्ट झालेले दिसतात ( उ०---' मजा ' ); कांहीं शिष्ट शब्द अशिष्ट बनत आहेत ( उदा०---' गंगाभागीरथी ' ); फार काय, एखादा प्रत्ययही रूढींतून जाऊं लागून, त्याऐवजीं दुसरा प्रत्यय आपल्यासमोर व आपल्या सहानु-भूतीनें आणि सहचारितेनें येऊं पाहत आहे, हेंही मी जाणून आहें उदा०--- ' आईनें मला मारिलें ' असें न म्हणतां, 'आईनीं मला मारलें' असें आपण म्हणतों व अशा रीतीनें तृतीयेच्या एकवचनाच्या ' नें ' प्रत्ययाबद्दल ' नीं ' या प्रत्ययाला आपण रूढ करीत आहोंत; व भूतकाळचा इडागमही बोलण्यांत लुप्त करीत आहोंत. **ज्ञानदेव, मोरोपंत,** वगैरे ग्रन्थकारांना ' तो ' असें इंग्रजी धर्तीवर आपण म्हणूं लागलों, हेंही मला चालतें. ' **विठ्ठल शिवदेव,** ' ' **नारो शंकर,** ' इ० प्रकारचीं नांवें सोडून आपण आपलें व आपल्या वडिलांचें नांव **गमावून** बसलों आणि **आडनांवा**चेच केवळ राहिलों, ही गोष्ट वाईट खरी; पण तीही अपरिहार्य म्हणून मान्य करण्याशिवाय मला गत्यंतर दिसत

नाहीं. अलीकडच्या सुशिक्षित युवतींतदेखील आपलीं नांवें टाकून, एकमेकींना आडनांवानें ओळखण्याची व संबोधण्याची रूढि पडूं पहात आहे, व त्याही इंग्रजीच्या दास्यांत पुरुषांची बरोबरी करीत आहेत, हीही अनिष्ट गोष्ट मान्य केल्याशिवाय मला गत्यन्तर राहिलेलें नाहीं. पण इंग्रजी 'अ-प्रत्यक्ष-निवेदन-पद्धति' मराठींत येऊं लागली, तर 'मराठी भाषेची प्रकृती'च दूषित होईल व या दूषितपणामुळें, दुसरेही भाषेमध्यें दोष उत्पन्न होऊं लागतील; अशी मला भीति वाटत असल्यामुळें, या प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न करणें, मी आपलें कर्तव्य समजतों.

**हरिभाऊ आपटे, गडकरी, नरसिंह चिंतामण केळकर**, इत्यादि अभिजात लेखकांच्या लेखांमध्यें सुद्धां क्वचित् असे अप-प्रयोग आढळतात. ज्या वातावरणांत हीं सर्व मंडळी राहिली व वाढली, त्यांतच या अप-प्रयोगाचे विषारी जंतु असल्यामुळें, त्यांचीदेखील भाषा दूषित झाली; मग सामान्य लेखकांची गोष्ट कशाला पाहिजे ? हे अप-प्रयोग इतके रूढ होत चालले आहेत कीं, ते अपप्रयोग आहेत किंवा नाहींत, याबद्दलच मुळीं शंका उत्पन्न होते. उदा०—**गडकऱ्यांच्या** भावबंधनांतील घनश्यामाला उत्तर म्हणून दिलेलें महेश्वराचें पुढील भाषण पहा:—

**घनश्याम**—आपल्याला काय करावें लागणार, तें मी एकदां नीटपणें ठरवून टाकितों.

**महेश्वर**—असें का म्हणतोस कीं आपल्या ह्या कपटनाटकाचें तूं आतां प्लॉटिंग जमविणार **आहेस** !

**हरिभाऊ आपट्यां**च्याही बहुतेक कादंबऱ्यांत दोन-चार स्थळें अशीं सांपडतात, असें माझ्या अनुभवाला आलें आहे. उदा०—' भयंकर दिव्य' पान २९४ वर " माझ्या आईला पाह्यला येऊ का ? असें म्हणून **आपणच** आले आहेत. " हें वाक्य चुकीचें आहे. '**तुझ्या** आईला इ० ' असें तें पाहिजे होतें. पान ४११ मध्यें " सांग कीं मीच येणार होतों " हें वाक्य " सांग कीं **तेच** येणार होते " असें पाहिजे होतें.

मुद्दा इतकाच कीं, अनेक मराठी लेखकांच्या हातून इंग्रजींतील 'अप्रत्यक्ष-निवेदन-पद्धतीं'च्या बुद्धिपुरःसर अनुकरणानें अपप्रयोग लिहिले जातात; व प्रकृति-बिघाडाच्या दृष्टीनें हें अनिष्ट आहे.

' तो त्याच्या घरीं गेला ' ही बोलण्याची पद्धति जी थोडी थोडी प्रचारांत येऊं पहात आहे, तीं मात्र अशुद्ध व अनुकरणजन्य आहे. मराठीमध्यें " तो **आपल्या** घरीं गेला " असें म्हटलें पाहिजे

( वा० म० जोशी—विविधज्ञानविस्तार–आक्टोबर, १९२५ ).

---

## [ ८ ]

## रेव्हरेंड् नवलकर.

[ यांच्या ' नवीन मराठी व्याकरणां'तील कांहीं स्वतंत्र गोष्टी येथें दिल्या आहेत ].

( १ ) अर्थावरून शब्दांच्या जाति–नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी, **वाक्ययोगी** व केवलप्रयोगी ( पृष्ठ १२ ).

( २ ) व्याख्या—" कोणत्याही पदार्थाचें नांव म्हणजे नाम. " यासारख्याच सदोष आहेत ( पृ० १२ ).

( ३ ) " पदार्थाची **क्रिया** म्हणजे कृति ही ज्या शब्दानें समजते, तें क्रियापद " [ यांत क्रियावाचक अन्य शब्दही येऊं शकतील; स्थिति इ० दर्शक क्रियापदांचा व वाक्यपूर्णत्वाचा समावेश नाहीं. ] ( पृ० १२ ).

( ४ ) नामांचे भेद—" विशेषनाम व सामान्यनाम. सामान्यनामाचे भावभाववाचक आणि **समुदायवाचक** असे भेद आहेत. समुदायवाचक नामें—कळप, सैन्य, मंडळी. " ( पृ० १९ व २० ).

( ५ ) विभक्ति—" यांच्या **प्रथमा, द्वितीया**, अशा संख्यावाचक नामांवरून त्यांच्या अर्थाचें कांहीं ज्ञान होत नाहीं, आणि मुलांस अशा अर्थहीन नामांनीं त्रास मात्र होतो " ( प्रस्तावना ).

एकंदर विभक्ति आठ–नांवें–१कर्त्तरी, २ कर्मणी, ३ करणी, ४ दानी, ५ अपादानी, ६ संबंधी, ७ अधिकरणी, ८ संबोधनीं, ( पृष्ठ २४ ).

( ६ ) सर्वनामांचे प्रकार–पुरुषवाचक, सामान्यपुरुषवाचक, संबंधी, दर्शक, प्रश्नार्थक आणि सामान्य, असे ६ आहेत ( पृ० ३६ ).

सामान्यपुरुषवाचक सर्वनाम–**आपण**. टीप–**स्वतः** या क्रियाविशेषणाचा उपयोग **आपण** या सर्वनामाबद्दल करितात ( पृष्ठ २९–४० ).

असा, इतका; तसा; तितका; एवढा, तेवढा;–दर्शकसर्वनामें (पृ० ४२).

जसा, जितका, जेवढा:–संबंधी सर्वनामें ( पृ० ४३ ).

कोणता, किती, केवढा, कसला, कसा,–प्रश्नार्थक सर्वनामें (पृ० ४४).

( ७ ) प्रयोग–कर्तरि प्रयोगांत कर्ता कर्तरि विभक्तींचा (प्रथमान्त) असतो; कर्मणि प्रयोगांत कर्म नेहमीं कर्मणि विभक्तींचें ( प्रथमेसारखेंच ) असतें; आणि भावे प्रयोगांत कर्ता व कर्म हीं दोन्हीं विभक्तिप्रत्यययुक्त असतात. जें नाम विभक्तिप्रत्यययुक्त असतें, त्याच्या धोरणानें क्रियापद कधीं वागत नाहीं ( पृ० ५० ).

( ८ ) स, ला, तें, हे प्रत्यय ' **दानी** ' इ० विभक्तीचे ( चतुर्थीचे ) आहेत.

---

[ ९ ]

## १. भाषा–दूषण.

**१. परकीय शब्दः—**

आतां पहिल्यानें भाषेचें हें दूषण म्हणजे काय? तर अर्थातच आपल्या भाषेत परभाषेंतील म्हणजे प्रस्तुत प्रसंगीं इंग्रजी भाषेंतील शब्दांचा अनिवार संकर होणें व तिची मूळची रचना सुटून, ती अगदीं परकी जी इंग्रजी भाषा तिच्या धर्तीवर पडणें. वर इंग्रजी भाषेंतील शब्द म्हणून म्हटलें, तर त्याचा अर्थ केवळ अक्षरशः घ्यावयाचा नाहीं; तसा कांहीं अंशींच घ्यावयाचा. कारण, इष्टेट, इस्कूर, पाइंट, रजिष्टर, वगैरे पुष्कळ मंजुळ शब्द इतक्यांतच घरोघर होऊन बायकांपर्यंत व पोरांपर्यंत मुद्धां गेले आहेत! पण आमचा मुख्य रोख त्यांवर नव्हे. वरील कितीही शब्द मराठींत आले, तरी त्यापासून तीस तादृश भय नाहीं. एक तर ते बोलून चालून परकी पडले; तेव्हां त्यांस खुद्द मराठीच असें कोणी म्हणणार नाहीं व त्यांचीही तींत घुसण्याची इच्छा नाहीं. शिवाय, दुसरें असें कीं, त्यांतून कित्येकांचें मराठींत असणाऱ्या शब्दांनीं कामही होणारें नव्हे.

यास्तव लांबलचक नवे शब्द जे उगीच श्रम घेऊन ओतून काढावे, त्यापेक्षां हेच का असेनात. इंग्रजांस जर आमचे Khutput, bondobast, pacca, Ghee, असे शब्द चालतात, तर आम्हांसही 'बुक,' 'टेबल,' 'नाटपेड,' वगैरे शब्द खुशाल चालवून घेतां येतील. पण या शब्दांविषयीं आम्हांस विशेषतः बोलणें नाहीं; तर जे धड इंग्रजी नव्हेत धड मराठी नव्हेत: ज्यांचा अर्थ इंग्रजी आणि उच्चार मराठी, असे अर्धकच्चे मराठींत उतरलेले जे शेंकडा शब्द सध्यां मोठाल्या ग्रंथांतून, मासिक पुस्तकांतून, वर्तमानपत्रांतून, हजारों नवीन तरुण लोकांच्या भाषणांत हंमेश आढळतात, अशा शब्दांवर मुख्यतः आमचें धोरण आहे.

\+ \+ \+ \+ \+

२. परकीय वाक्प्रचारः—

नुसते निरनिराळे शब्दच असे अर्धजातीय असतात, असें नाहीं; तर एकंदर वाक्याची किंबहुना एकंदर ग्रंथाची रचनाही शुद्ध इंग्रजीच असते. म्हणजे लिपी पाहिली, तर मराठी. अक्षरांचा उच्चार मराठीसारखाच; पण अर्थ पाहूं जावें तो अर्धामुर्धा कळतो; किंवा कधीं कधीं मुळींच कळत नाहीं. कायद्याचीं जीं मराठींत कांहीं पुस्तकें झालीं आहेत, त्यांची मौज पुष्कळांस अनुभवावरून किंवा निदान ऐकून तरी माहीत असेलच! त्यांतील भाषान्तर इतकें सुरेख झालें असतें कीं, कोठें कोठें तें समजण्यास फार जड जातें; इतकेंच नव्हे, तर जेथें अर्थ करण्याची अतिशय मुष्कील पडते, तेथें मूळचें इंग्रजी जेव्हां कोणापासून समजून घ्यावें, तेव्हा अर्थ कळतो! आमच्यांत असे फर्डे बोलणारे शेंकडों सांपडतील कीं, त्यांच्या बोलण्याचा अर्थ पुनः नीट मराठींतच करण्यास दुभाष्या ठेविल्यावांचून सोय नाहीं. खरेंच, ज्यांनीं अष्टौप्रहर इंग्रजीचा ध्यास घेऊन, तीस केवळ आपलीशी करून टाकिली, ज्यांच्या जिव्हाग्रीं त्या भाषेनें सतत वास करावा, तिच्या प्रसादेंकरून ज्यांचें मन सुप्रकाशित झाल्यामुळें, एका द्राड काळ्या रंगाखेरीज त्यांच्या ठायीं इकडचा म्हणून दुसरा मागमूसही उरला नाहीं, त्यांच्या हातीं मराठी पुस्तक किंवा वर्तमानपत्र दृष्टीस पडलें, किंवा एक शुद्ध मराठी वाक्य त्यांच्या तोंडून निघालें, तर मग राहिलें काय? त्यांच्या इंग्रजी ज्ञानास कलंक लागला नाहीं काय? असो. वरील समजूत केवढी थोर आहे, ह्याविषयीं येथें वाद करण्याचें प्रयोजन नाहीं. इंग्रजींत थोडी-बहुत गति होतांच, पाद्र्यांच्यासारखें किंवा

बाटथासारखें वेडगुजरीं बोलण्यांत ज्यांस प्रतिष्ठा वाटत असेल, त्यांस वाटो; आम्हांस तर हा प्रकार मूर्खतेचा व अत्यन्त लज्जास्पद असा वाटतो.

+ ÷ ÷ + ÷

**३. स्वाभिमानशून्यता:—**

परभाषेचा केवळ संसर्गच मराठी भाषेस बाधक झाला, असें म्हणतां येत नाहीं. तिच्या दुर्दशेचें कारण, अर्थातच आपल्या लोकांत तिजविषयीं मुळींच अभिमान नसणें हें होय. जे आमचे लोक विलायतेस गेले कीं, तेथें डोळे चक्क होऊन, आपल्या देशाची बहुतेक आठवणही विसरून जातात: आणि निरुपायास्तव पुन: माघारीं आले असतां, येथील सर्व गोष्टींची त्यांस लाज वाटूं लागते. त्यांसच इंग्रजी भाषेचें ज्ञान झालें असतां, मराठीची सर्वपरी लाज वाटूं लागते, हें अनुरूपच आहे ! त्यांस साहेबी तुमान, साहेबी बूट, साहेबी डगला, साहेबी दाढी, यांचा वियोग जसा केवळ दुःसह होतो, त्याप्रमाणेंच यांसही विलायती शब्द, विलायती वाक्यरचना, यांचा सहसा त्याग करवत नाहीं; पण इंग्रज पहा, त्यांचें भ्रमण साऱ्या जगभर आहे; हव्या तेवढ्या उलाढाल्या त्यांच्या जेथें तेथें चाललेल्या आहेत: पण आपल्या देशास माघारीं आले कीं, पुन: इंग्रज ते इंग्रजच ! त्याचप्रमाणें व्यवहारामुळें अनेक भाषांचा संबंध इंग्रजीशीं असतांही ती आपली कायमच्या कायमच! असो. तर ज्या अभिमानहीनतेनें व इतर प्रकारांनीं एकंदर देशाची दुर्दशा होऊन गेली आहे, तीमुळेंच आमच्या भाषेचीही अशी दशा झाली आहे. !

× × × × ×

**४. उपेक्षा व दुर्लक्ष:—**

आणखी एक कारण उपेक्षा किंबहुना तिरस्कारही म्हटला असतां चालेल. ज्या गोष्टीविषयीं आपणांस लवलेशही अभिमान नसतो, तिजविषयीं उपेक्षेची किंवा तिरस्काराचीही बुद्धि मनांत वागत असल्यास कांहीं नवल नाहीं. असाच आमच्या लोकांचाही प्रकार आहे. त्यांस मराठी भाषेविषयीं केवढी कळकळ आहे, हें त्या भाषेंत ग्रंथ करून ज्यांनीं प्रसिद्ध केले असतील, त्यांच्या अनुभवास बहुतकरून पक्केपणीं आलें असेल. तसेंच, ग्रंथांची पारखही त्यांस मोठी उत्तमच आहे, असें म्हटलें पाहिजे. हल्लीं पुस्तकांचा जो खप होतो, तो तादृश त्यांच्या गुणांवरून होतो, असें नाहीं; तर अर्ज व शिफारस यांनीं एरवीं जशीं कामें होतात, तसेंच येथेंही चालतें. सर्व लोकांच्या आश्रयास पात्र असून

केरांत पडलेलीं पुस्तकें आम्हांस पुष्कळ दाखवितां येतील; व तसाच त्याच्या उलटही प्रकार दाखविण्यास कांहीं कठीण पडणार नाहीं. मोठी उठाठेव करून लोकहितार्थ श्रम केले असतांही त्याप्रमाणें प्राप्ति तर कांहींच नाहीं; पण उलटा भुर्दंड भरावा लागला, असे हतभाग्य ग्रंथकार आम्हांमध्यें थोडे-थोडके असतीलसें नाहीं. एकच सर्वप्रसिद्ध उदाहरण घेतों. "**राणीचें पुस्तक**" म्हणून एक ग्रंथ सुमारें तीन-चार वर्षांमागें प्रसिद्ध झाला, तो सर्वांस माहीत असेलच. तें त्याचें गोड नांव, सोनेरी पुठ्ठा, ग्रंथार्पणपत्र, मधून मधून नामी चित्रें,शेवटीं बड्या बड्या आश्रयदात्यांच्या नांवांची लांब मालिका, हीं सर्व पाहिलीं असतां, डोळे दिपून जाऊन एकाद्या बड्या दरबाराची आठवण होते; पण आंत वाचूं लागावें, तों मजकूर काय, ती भाषापद्धति काय, कविता काय, बडा दरबार पाहून डोळे चक्क झाल्यावर बड्या स्टार ऑफ इंडियांचीं, बड्या खानबहादुरांचीं भाषणें ऐकून अंतःकरण जितकें गार होऊन जातें, तितकेंच वरील मजकुरानें होतें. एवढा थाटमाट ज्या पुस्तकाचा, त्याचा आदर केवढा झाला असेल, तें वाचकांनींच मनांत आणावें. "राणीचें पुस्तक!" मग काय, साऱ्या जगास व त्यांत हिंदुस्थानास तें सर्वपरी वंद्य झालें !! आतां याच्याच उलट दुसरा प्रकार पहाः– थोड्या दिवसांमागें कैलासवासी झालेले **परशुरामपंत तात्या गोडबोले**; ज्यांच्या विद्वत्तेस्तव, सुस्वभावास्तव, व मराठी भाषेवर आणि कवितेवर जे त्यांनीं मोठे उपकार करून ठेविले आहेत, त्यांस्तव, वरील गोष्ट ऐकून सर्व हळहळले असतीलः ते "सर्वसंग्रह" मासिकाचें काम करीत असत; ह्या कामास यांच्याइतका वाकबगार पुरुष दुसरा कोणी नव्हता, हें सर्वांस माहीत आहेचः याचें कारण मराठी कवितेचाच सर्व जन्मभर त्यांनीं मुख्यत्वें व्यासंग केला होता, हें होय. पण हें अत्यन्त उपयुक्त मासिक सहा-सात वर्षें चालून, अखेरीस बंद झालें! अशा उत्कृष्ट पुस्तकाचा सरकारनें आपला आश्रय तोडला, हें त्यास कितीहि भूषणार्ह असो; परंतु लोकांस लांछनास्पद आहे, खास !! --( धाकटे शास्त्रीबोवा, **निबंधमाला** )

\+ \+ \+ \+ \+

## २. भाषा–दूषणाचे प्रकार.

१. **मराठी शब्दांचा इंग्रजी अवतार—**

( अ ) ग्रंथकाराच्या विद्वत्तेची हा ग्रंथ **साक्ष** देत आहे.
( आ ) मी आपले विचार सभेपुढें **ठेवितों** किंवा **मांडतों**.
( इ ) त्याच्या भाषणाचा **ठसा** सर्वांवर उठला.
( ई ) हा निराळा **प्रश्न** आहे.
( उ ) परीक्षेचा **परिणाम**.
( ऊ ) मुलांचें **भक्ष्य**.

२. **संस्कृत शब्दांचा अपप्रयोग--**

( १ ) **स्वकपोलकल्पित** ग्रंथ ( आमच्या खुद्द गालांतून काढलेला ).
( २ ) तूं त्याजवर कां नेहेमीं **अवलंबून** राहतोस ?
( ३ ) **निरुपद्रवी.**
( ४ ) **प्रत्यक्ष.**

३. **नवीन दुष्टार्थक संस्कृत शब्दघटना—**

( क ) **महत्त्वाकांक्षा** ( शिवाजीस राज्यलोभ होता ).
( ख ) **साल्हादाश्चर्य** वाटलें ( लोकांनीं वाहवा केली ).
( ग ) आईबापाशीं आज्ञाधारकपणानें वागावें, हें मुलांचें मुख्य **कर्तव्य-कर्म** आहे.

४. **भर न्यायकोर्टांत शब्दार्थांचे खून !**

( A ) त्यानें तुला मारलें, तर तूं त्यावेळीं **आवाज** कां केला नाहींस ?
( B ) तूं त्या वेळेस **सूर्यांत** उभा होतास ? ( ! ! )
( C ) अमुक **आक्टान्वयें**.
( D ) कैदीस **संशयाचा** फायदा दिला पाहिजे.
( E ) या साक्षीदाराच्या जबानीस पुष्कळ **वजन** दिलें पाहिजे.

५. **नाटककार कंपन्यांच्या भाषा–लीला.**

( I ) नारायणरावाच्या मृत्यूचा **फार्स.**

६. देशी भाषांचे प्रोफेसर व घेडगुजरी मराठी.—

( श्री ) पिवळा वामनमूर्ति ! ( The yellow dwarf ).

( ग ) येथील झाडांस व पुस्पांस कोणीं हात लावूं नये !

( णे ) माझ्या पातकापासून आपलें मुख आवरून घे व माझे सर्व अन्याय पुसून टाक.

( शा ) देवाचे यज्ञ म्हणजे फुटलेला आत्मा, फुटलेलें व नम्र झालेलें हृदय हे देवा, तूं तुच्छ मानणार नाहींस.

---

## ३. भाषा-दूषणाचे समर्थक !

वरीलप्रमाणें अनेक प्रकारांनीं हल्लीं मराठी भाषा दूषित होत चालली आहे. या दूषणासही भूषण मानणारे कांहीं लोक आहेत. ते म्हणतात कीं, ' विचार मांडतों, ' ' ग्रंथ साक्ष देत आहे, ' वगैरे प्रयोग अप्रशस्त कां मानावे ? इंग्रजींतही जर तोच अर्थ त्या शब्दांनीं व्यक्त होतो, आणि इंग्रजींत जर ते वाईट दिसत नाहींत, व तशी रूढि पडून गेली आहे, तर मग मराठींतही ते आणल्यास काय विघडेल ? हें म्हणणें सकृद्दर्शनीं समंजस वाटतें; पण हें गोड तत्त्वज्ञान यथेच्छ चालविलें असतां, साऱ्या भाषांचा एकदम लय होणार आहे. मराठींत आपण म्हणतों, ' थंडी वाजते, ' ' मी वाट पहात आहे, ' ' त्यानें मार खाल्ला ' , मग इंग्रजींत, ' Frost rings ' ' I am looking ' ' at your way, ' ' He ate beating , ' असें म्हणण्यास काय हरकत आहे ? मराठींत जर तोच अर्थ व्यक्त होतो, वाक्य वाईट दिसत नाहीं, व अगदीं रूढ होऊन गेलें आहे, तर लंडनांत भर पार्लमेंट सभेंत अशीं वाक्यें बोलण्यास काय हरकत आहे ? पण इतकेंच नव्हे, तर साऱ्या पृथ्वीवर जेवढ्या म्हणून भाषा आहेत, त्यांत वरील अर्थ ज्या शब्दांनीं व्यक्त करीत असतील, त्यांचे हव्या त्या भाषेंत शब्दशः भाषांतर करून बोलल्यास काय बिघडेल ?

### भाषेचा प्रयोग-विशेष.

पण, भाषेंत जें शुद्धाशुद्ध ठरवितात, तें केवळ अर्थावरच कधीं ठरत नसते. प्रत्येक भाषेला ' इडियम ' म्हणजे शब्दांचा किंवा वाक्यांचा प्रयोग-विशेष म्हणून एक निराळेंच तंत्र असतें; तें भाषेचा जीव-प्राण होय. त्यांत लवमात्रही इकडचें

तिकडे होतां कामा नये. भाषेचा शुद्धाशुद्धपणा मुख्यतः त्यावर धरितात; व तिचें स्वारस्यही त्यावरच सर्वस्वीं असतें. ह्यास्तव तत्त्वज्ञानांत शिरून त्याची इयगय लवमात्रही करितां येत नाहीं.

## अभिजात मराठीचा खरा उपयोग !

वरील समर्थनकार-प्रशंसित पुस्तकांतील भाषेपासून दोन-चार चांगले उपयोग होतील. एक, ज्यास झोंप येत नसेल, त्यानें हें हातीं घ्यावें, म्हणजे दोन-चार वाक्यांत झोंप ठेवलेली ! कोणास जर करमेनासें झालें, तर चार घटका खो खो खो खो हंसविण्यास यासारखें साधन नाहीं ! कोणास जर वर्ष-सहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा द्यावयाची असली, व तो तर प्रकृतीनें अशक्त आहे, तर हें पुस्तक सबंध वाचणें हें, त्या शिक्षेच्या मोबदला दिल्यास चालेल. किंवा अशुद्ध वाक्यें शुद्ध करावयास जर विद्यार्थ्यांस द्यावयाचीं असलीं, तर हें पुस्तक बाळगिलें असतां, दुसरीकडे बघण्याची बिलकुल गरज राहणार नाहीं.

( भाकटे शास्त्रीबोवा, निबन्धमाला ).

---

## [ १० ]

## शुद्धलेखन-परिषदेची कुळकथा !

मराठी शब्द लिहिण्याच्या बाबतींत जो फार घोटाळा व अनिश्चितपणा आहे, तो असणें इष्ट नाहीं. सुलभ व ठरीव लेखनपद्धति असणें, हें शिष्य, शिक्षक, ग्रंथकार, वर्तमानपत्रकार व सामान्य लोक ह्या सर्वांस हितावह आहे. मराठी भाषेचा प्रसार कर्तव्य आहे, व तिचा अभ्यास करण्यास सामान्य लोकांस सुलभ पडावें, अशी आपली इच्छा आहे, तर ही पद्धत सोपी व ठरीव असणें फार अवश्य आहे. लेखन-पद्धतीच्या संबंधानें आमचें असें मत आहे कीं, लिहिण्याची भाषा व बोलण्याची भाषा ह्या दोहोंत जितका मेळ ठेववेल, तितका ठेवण्याविषयीं यत्न करावा. निदान विद्वान लोक जी भाषा बोलतात व जी लिहितात, त्यामध्यें तरी बराच मेळ असावा. बोलण्याची भाषा कांहीं अंशीं अनियंत्रित असते, तेव्हां सर्वांशीं ही गोष्ट शक्य नाहीं; तथापि, परस्परांचें बंधन परस्परांस

राहून दोहोंमध्यें बराच मेळ राहील, अशी योजना करणें इष्ट आहे. भाषेच्या संबंधानें विचार करतांना देशस्थांनीं अमूक केलें, कोंकणस्थांनीं तमूक केलें, असा वाद उपस्थित करणें ह्यांत तात्पर्य नाहीं. मराठी भाषेच्या उन्नतीस देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, मराठे, वाणी, शिंपी, वगैरे सर्वांनीं मदत केली आहे. चुक्या झाल्या असतील, तर त्याही सर्वांच्या हातून झाल्या आहेत. मग नसता वाद उपस्थित करण्यांत काय अर्थ ? आजमित्तीस विचार असा करावयाचा आहे कीं, शब्दाचा उच्चार करण्याचा समंजस लोकांचा प्रघात कसा आहे, बहुजनसमाजाला कमी त्रासाची पद्धत कोणती, व भाषेचें एकंदरीनें धोरण कसें आहे. तात्पर्य, बऱ्याच दिवसांच्या अनुभवानें जें सौकर्य, जी सोय, व जो फायदा कळून आला आहे, त्याविषयीं मुख्यत्वें विचार करून, लेखनपद्धति ठरविण्यास उद्युक्त होणें बरें, असें आम्हांस वाटतें.

इंग्रजी स्पेलिंग जसें अनियंत्रित आहे, तसें मराठी लिंगप्रकरणही अनियंत्रित आहे; ह्यामुळें भाषेस अगोदरच कठीणपणा आला आहे. हा कठीणपणा कमी करणें फार कठीण झालें आहे. मग त्यांत आणखी भर घालणें बरें नाहीं. लेखनपद्धति सोपी करतां येण्यासारखी आहे, व ती करणें अवश्य आहे. हें काम एकट्या-दुकट्याचें नाहीं. भाषाभिज्ञ व कळकळ बाळगणाऱ्या गृहस्थांनीं ह्या बाबतींत लक्ष पोहोंचविल्याशिवाय ह्या गोष्टीचा लौकर निकाल लागावयाचा नाहीं, हें समजून आम्ही आपले विचार दोन-तीनशें मित्रांस पुस्तरूपानें कळविलें, व त्यांचे अभिप्राय मागविले. ह्यांपैकीं कांहीं मित्रांनीं आपले अभिप्राय लागलीच कळविले. ह्या अभिप्रायांवरून आमच्या विचारांच्या बाबतींत कांहीं थोड्या विद्वान मित्रांचा गैरसमज झाल्याविषयीं समजून आलें. हा गैरसमज दूर करण्यासाठीं शालापत्रकांत व केसरी पत्रांत आम्हांस खुलासा करावा लागला; व तो मित्रमंडळीस कळविणें अवश्य वाटल्यावरून शें-दीडशें प्रती काढून, त्या त्यांकडे पाठविण्यांत आल्या. मराठी भाषेच्या लेखनपद्धतीविषयींचा वाद हा आजकालचा नाहीं. तो शालापत्रक, विविधज्ञानविस्तार, वगैरे कांहीं मासिक पुस्तकांतून कित्येक वर्षांपासून चालू होता. ह्या वादाचा निकाल लागल्यास बरें, असें वाटल्यावरून हा विषय आम्हीं हातीं घेतला व मित्रमंडळीचे अभिप्राय मागविले. तें अशाकरतां कीं, सुशिक्षित लोकांची सभा ( कॉन्फरन्स ) पुण्यांत भरवून, तींत वादग्रस्त मुद्यांचा निर्णय करून घेण्यास साधन असावें. असा निर्णय करण्यास सुलभ पडावें, म्हणून लेखनपद्धतीच्या सामान्य तत्त्वांचा मसुदा प्रथम तयार

करून त्याच्या छापील प्रती वाटण्यांत आल्या. जे अभिप्राय आले होते, त्यांचा गोषवारा काढून, तो सुधारक पत्राच्या अंकांतून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था चालविली: व अनुस्वार व ऱ्हस्व-दीर्घ ह्यांविषयीं जे अभिप्राय आले होते, त्यांविषयीं व जीं अन्य साधनें उपलब्ध होतीं त्यांविषयीं, पुनः विचार करून, व येथील कांहीं विद्वान मित्रांबरोबर वाटाघाट करून, अनुस्वाराविषयीं एक व ऱ्हस्व-दीर्घाविषयीं एक, असे दोन मसुदे तयार करून त्यांचा प्रकं शेंसव्वाशें निवडक सुशिक्षित गृहस्थांकडे पाठविलीं: व अभिप्राय कळविण्याविषयीं त्यांस विनंति केली. त्याप्रमाणें कांहीं अभिप्राय आले: व १८९९ च्या मे महिन्यांत कॉन्फरन्स भरवावें, असा विचार ठरविला. येथपर्यंत पूर्वसंकल्पानुरूप बहुतेक व्यवस्था झाली; पण फेब्रुवारी महिन्यांतच तिसऱ्या खेपेस एथें प्लेग सुरू झाला: व तो आक्टोबर अखेर राहिल्यामुळें, कॉन्फरन्स भरविण्याचा विचार जागच्याजागीं राहिला. आर्यभूषण छापखान्याचे मॅनेजरांनीं केवळ आमच्या मुरवतीखातर पांच-सहा महिने टाईप तसेच ठेवून दिले. प्लेग कमी होईना, शेवटीं जास्ती दिवस वाट पाहात बसण्यांत अर्थ नाहीं असें समजून, लेखन-पद्धतीविषयींची सर्व सामुग्री पुस्तकरूपानें लोकांपुढें ठेवावी, म्हणजे त्यांस विचार करण्यास व अखेरचा अभिप्राय देण्यास बरें पडेल, असें वाटून, ह्या विषयावर स्वतंत्र पुस्तक काढण्याचा विचार ठरविला; व त्याप्रमाणें प्रस्तुतचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे.
—( का०ना०साने, इ०—'मराठी भाषेची लेखनपद्धति' प्रस्तावना, पृष्ठें ६ ते ९ ).

---

## [ उत्तरार्ध ].

लेखनपद्धति आणि भाषेंतील शुद्धाशुद्ध मुख्यत्वेंकरून अन्त्य आणि उपान्त्य स्वरांचें ऱ्हस्व-दीर्घत्व यासंबंधानें मराठीच्या स्वभावाप्रमाणें सर्व व्यवस्था असावी, असा प्रघात पडण्याचे प्रयत्न वारंवार झाले आहेत. पुणें पाठशाळेंत शिकून तयार झालेलें शास्त्रीमंडळ मराठीला स्वातंत्र्य देण्याच्या मताचें होतें. परंतु क्यांडीसाहेब यांनीं जुन्या शास्त्री लोकांच्या सांगण्यावरून, हल्लींची सक्तीची व्यवस्था काढली मराठींत ठरलेली व्यवस्था कांहीं नाहीं. संस्कृतांत

तशी व्यवस्था आहे. तीच घ्यावी; हा शास्त्री लोकांचा उपदेश त्यांना पटला. त्यावेळीं क्यांडीसाहेब व मराठीच्या स्वातंत्र्याचे अभिमानी यांच्यामध्यें एक लेखी वाद चालला होता. हा वाद मनोरंजक होता; आणि त्यामध्यें मराठीच्या अभिमान्यांचें मत स्थापित होत होतें. परंतु तो वाद मध्येंच एकाएकीं बंद पडला. **कृष्णशास्त्री चिपळूणकर** यांनीं आपल्या व्याकरणावरील निबंधामध्यें याविषयीं चर्चा करून योग्यायोग्य प्रकार स्पष्टपणें दाखविले आहेत **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांनीं यासंबंधानें विशेष प्रयत्न केला नाहीं; तथापि त्यांचा भाषेच्या स्वातंत्र्याकडे ओढा होता. तसेंच त्यांनीं भाषाशुद्धि व लेखनपद्धति ह्या दोन निबंधांमध्यें ह्यासंबंधानें सामान्य विवरण केलें आहे. प्रस्तुत ग्रंथकारानें मराठी शालापत्रकांमध्यें ऱ्हस्व-दीर्घ-लेखनसंबंधीं शुद्धाशुद्ध आणि इतर व्यवस्था, तसेंच, व्याकरणव्यवस्थेसंबंधीं अनेक अव्यवस्थेच्या गोष्टी व त्यांचें निराकरण, यांवर पुष्कळ लेख लिहिले आहेत.

सन १८९० सालीं **हातवळणे, साने** आणि **गोडबोले** यांनीं विशेषतः शुद्धलेखनाच्या सुधारणेसंबंधानें पुस्तकें आणि लेख लिहून प्रसिद्ध केले; आणि अवश्य त्या सुधारणा सुचवून, त्यांवर विद्वान मंडळींचें अभिप्राय घेतले. या सर्व अभिप्रायांचे नवीन सुधारणांच्या बाजूला बहुमत होतें. **भाण्डारकर, महाजनी, टिळक, सहस्रबुद्धे, करंदीकर**, इत्यादि मंडळी नवीन सुधारणांना अनुकूल होती. पुढें सन १९०३ सालीं क्रमिक पुस्तकें तयार करण्यासाठीं एक कमेटी नेमली अखेर विचारासाठीं तज्ज्ञ मंडळींचे कॉन्फरन्स भरलें. त्यामध्यें चर्चा होऊन, नवीन सुधारणेचे नियम ठरले; आणि ते उपयोगांत आणण्याविषयीं शाळाखात्यानें ठरावही केला, परंतु संस्कृताच्या अभिमान्यांनीं, विशेषतः मुंबईतल्या मंडळींनें सरळ मार्गानें आपला हेतु सिद्धीस जात नाहीं असें पाहून, **डॉ० म्याकिकन** ह्या युरोपियन गृहस्थाच्या मध्यस्थीनें मुंबई सरकारकडे तक्रार केली. सरकार सामाजिक सुधारणांविषयीं तटस्थ असतें; तोच न्याय येथेंही लाविला गेला. " सरकारी नात्यानें त्यांत पडण्याचें आपणांस कारण नाहीं, लोक आपली आपण सुधारणा करतील, तेव्हां पाहतां येईल; " असें सरकारनें ठरविलें. आणि क्यांडी साहेबांची पद्धत चालू आहे, ती तूर्त चालू ठेवावी; असा हुकूम झाला!

अशा प्रकारें मराठी भाषेला स्वराज्य मिळण्याची आलेली सुसंधी वायां जाऊन तिचें पारतंत्र्य, परावलंबन, व तिच्यावरील सक्ती ह्या गोष्टी कायम राहिल्या.

—( **रा० भि० जोशी**, "मराठी भाषेची घटना," ४१६ व ४१७ ).

---

## शुद्धलेखन व सरकार-यन्त्र !

" विविधज्ञानविस्तार " च्या २२ व्या पुस्तकांत खालील आश्चर्याची बातमी आढळली:- मुंबई व वऱ्हाड शाळाखात्याकडून ' विस्तारा 'चें शुद्ध-लेखन न पटल्यानें, ह्या मासिकाचा १०० प्रतींचा आश्रय सरकारनें बंद केला !

पुढें एका ठिकाणीं असें वाचण्यांत-आलें कीं, सरकारनें ठरविल्याप्रमाणें शुद्ध-लेखनास मान्यता लोकांकडून मुळींच मिळाली नाहीं; सबब सरकारनें पूर्वीचा शुद्धलेखनसंबंधीं ठराव रद्द केला आहे !

---

## [ ११ ]

## पूर्वींच्या अप्रसिद्ध शब्दांचें पुनरुज्जीवन.

व्यापार बळावला, व्यवहार वाढला, आणि मोसमांत नगदी नाण्यांची चण-चण भासूं लागली, म्हणजे कागदी चलन अगर हुंडी चालवूनही व्यवहार चालू ठेवावा लागतो; भाषेची तीच स्थिति आहे व्याप वाढणें हा भाषेचा सहज-धर्म आहे; त्यामुळें हरिश्चंद्राच्या फुटक्या रांजणासारखी तिची स्थिति आहे. प्रत्यहीं प्राप्त होणाऱ्या नवीन शब्दांचें कितीही गंगाजळ त्यांत ओतलें, तरी तीं भरण्याचें म्हणून चिन्ह त्यांत दिसत नाहीं. कारण विस्मृतीच्या झिरण्यांतून पाझरून जाणाऱ्या शब्दांची संख्याही कांहीं थोडी थोडकी नसते. सजीव जीव-सृष्टींमध्यें काळाच्या पोटांत राहूनही चिरंजीव होण्याची धडपड, हाच पुरुष-प्रयत्न; व तो स्पृहणीय मानिला आहे. त्याप्रमाणेंच निर्जीव शब्दसृष्टीचेंही आहे. भाषेंतील शब्दासंबंधानेंही, त्यांस चिरंजीव राखण्याची धडपड हाही प्रयत्न वरच्या-सारखाच कां गणला जाऊं नये ? जे नवीन जन्माला यावयाचे, त्यांची काळजी आधीं कोणी करीत नाहीं जे जन्माला आले, ते चिरंजीव करण्याचा प्रयत्न करणें हेंच योग्य होय.

असे जुने पुनरुज्जीवन करून जिवन्त राखण्यासारखे कांहीं शब्द खालीलप्रमाणें:—

गुंडगिरी, पुंडावा, लठियाळपणा, या शब्दांच्या जोडीला तितकाच समर्पक आणि नादमाधुर्यांत किंचित् सरसच असा **मूठमदाई** हा शब्द आहे. निशाणबाजी या शब्दाइतकाच **चांदमार** हा शब्द चांगला आहे. 'पेन्शन् किंवा इनाम करून दिलें' ह्याऐवजीं '**स्वास्थ्य करून दिलें**' हा शब्दप्रयोग उत्तम आहे. चेटकी ह्या शब्दाला **भुताळी** हा समर्पक शब्द कितीकांना ठाऊक असेल ? सन्स्टोक याबद्दल **उन्हाची लूक** हा जुना पण पर्याय-शब्द-प्रयोग प्रचारांत कां आणूं नये ? **चिमणचेटकें** हा तर जुना फारच सुन्दर शब्द आहे. ह्या शब्दानें चिमण्या चिंव चिंव करितात, त्या रम्य प्रभातकालाचा बोध होतो. तितकाच व त्याच अर्थाचा नादमधुर शब्द **झुंजुरकें** हा आहे. **रातवा** म्हणजे 'रात्रीं पडणारा पाऊस' हें किती सुटसुटीत दिसतें ? त्याचप्रमाणें दीपगृह याला **दीपदांडी**, प्रेमकलह याला **लाड-झगडा**, राजमान्य मार्ग ह्याशब्दाला **शाही-शिरस्ता**, माजघराला **चाफेखण**, इ० जुने सुन्दर प्रतिशब्द हजारों टिकविल्यास, सहस्रार्जुनाप्रमाणें भाषा बलवान् होईल, व तिचे विलास ही विविध होऊं शकतील.

सारांश, अशा जुन्या शब्दांचें फिरून प्रवर्तन सुरू झाल्यास, शब्दाला प्रतिशब्द मिळतील; कित्येक आगंतुक परकीय शब्दांना उत्तम देशी शब्द सांपडून, नवीन रूढ होऊं घातलेल्या अशा कांहीं परक्या शब्दांची हकालपट्टी करितां येईल; आणि विपुलार्थक्षम असे अनेक शब्द प्रचारांत येऊन, भाषेची खरी श्रीमंती वर्धन पावेल.

वर दिलेले हे शब्द पूर्वी प्रसिद्ध होते. त्यांत आपलेपणा आहे. **रामभाऊ जोशी** 'घटनें'त म्हणतात—"रामदास, तुकाराम, ह्यांच्या ग्रंथांत पुष्कळ शब्द साधे, सोपे व उपयोगी आहेत; पण ते आज **लोकमान्य** होणार नाहींत." पण हें म्हणणें बरोबर नाहीं. कारण, **गडकऱ्यांनीं** आतां आतांच असे जुने शब्द कितीतरी प्रचारांत आणले आहेत, व ते **लोकमान्य** केले आहेत. 'जुनें तें सोनें' म्हणून जुना कसाही शब्द रूढ करावा, असें म्हणणें नाहीं. गडकरी ह्यांचा वरील धाडशी प्रयत्न आहे; व तो त्यांनीं सर्वांआधीं केला आहे, त्याबद्दलचें श्रेय त्यांसच द्यावयास पाहिजे. गडकऱ्यांच्याही आधीं "**दुर्दैवी रंगू**"त, **चिन्तामणराव वैद्यांनीं** कादंबरीला ऐतिहासिक स्वरूप आणण्यापुरता तो केला-

आहे. ( बेबंदशाही नाटकांतही हा प्रकार थोडासा आढळतो. ) गडकऱ्यांनंतर **माटे, पोतदार**, इ०यांनीं असे प्रयत्न केले आहेत. जुन्या शब्दांचें महत्त्व पटविण्याकरितां, जुने शब्द उपयोजून लिहिलेली एक गोष्टही 'चित्रमय जगतां'त प्रसिद्ध झाली आहे. चांगल्या कोंकणी शब्दांचा उपयोग करूनही लिहिलेली दुसरी एक गोष्ट पुष्कळांनीं वाचली असेल.

परंतु अशा प्रयत्नांत योग्यायोग्य शब्द निवडावयास हवेत. **नकलनवीस** हा पोतदारांचा शब्द हास्यास्पद वाटतो. **देव तुमचें गोमटें करो** हेंही त्यांच्याच वाक्संप्रदायाचें उदाहरण थोडें गौण वाटतें. गडकरी स्वतःच्या स्वभावाच्या वळणावर जाऊन, असल्या शब्दांची कंटाळा व चीड येण्याइतकी लेखनांत जबरदस्ती करितात; पण त्यांच्या प्रतिभेच्या जोरावर ते शब्द ऐकून घ्यावे लागतात. ह्या गडकरी-पंथांतील अन्य लेखक मात्र स्वतः अर्थ पाहत नसल्यानें, त्यांनीं योजिलेल्या अशा शब्दांचा मात्र जुलूम वाटतो. ह्याकरितां जुन्या चांगल्या शब्दांचा कोश होणें जरूर आहे; व हरप्रयत्नानें वरच्यासारखे जुने शब्द फिरून रूढ करणेंही आवश्यक व भाषेला वैभवदायक आहे.

( यशवन्त नरसिंह केळकर; वि० ज्ञा० वि० पु० ५६ अं० ७ ).

---

[ १२ ]

## फारशीचा मराठी भाषेवर परिणाम.

**शाहूचें यशवंतराव कदम यांस पत्र**—

" कोट मजकुरी हसमे नामजाद आहे व एक जिन्नसही शिलक थोडा बहुत आहे. ऐशीयासी त्याच्या लिहिणीयासी लिहिणार पाहिजे. म्हणून त्यावरी तिमाजी नारायण यासी जमा करून पाठविले आहे. तैनात दर माहे होन भार ३ रास केले असे. इ॥ म॥ पासून वजावाटा उखेटीप्रों वजा करून बाकी बेरीज माहे दर माहे आदा करीत जाणे. "

मराठी भाषा वरीलप्रमाणें इतकी फारसीच्या कचाट्यांत सांपडण्यास राज्यसत्तेबरोबर येणारी इतर कारणें होतीं, हें उघड आहे. एका राज्यसत्तेबरोबर

राज्याचीं खातीं, दरबार, कारागिरी, धंदे, फौजफाटा, वगैरे बाबी येतातच; आणि त्या सर्वांचा भाषेवर परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. मुसलमानांच्या बाबतींत इतर लोकांपेक्षां कांहीं विशेष गोष्टी होत्या. त्यांच्यांत धर्मवेड विलक्षण असल्यामुळें, ते नुसते राज्य करूनच थांबले नाहींत; तर बळजबरीनें कित्येक हिंदु लोकांस त्यांनीं धर्मांतर करावयास लाविलें; व त्या बाट्या लोकांनीं आपले आधिभौतिक फायदे साधण्याकरितां, मुसलमानपणांत प्रत्यक्ष मुसलमानांसही लाजविलें. त्यामुळें घरा-घरांत भाषा फारशीमय झाली. दुसऱ्या मार्गानें मुसलमान फकीर व्याख्यानें देऊन आपलें धर्मवेड लोकांत पसरीत असत. इतर परकी भाषांचे परिणाम आणि फारसी भाषेचे परिणाम ह्यांत फार अन्तर आहे. इतर भाषांनीं मराठींत कांहीं शब्द आणून सोडले एवढेंच; वाक्यरचनेच्या वगैरे गोष्टींत फार हात घातला नाहीं; पण फारसीची गोष्ट तशी नाहीं. तिनें शब्द तर अपरंपार घुसडलेच; पण वाक्य-रचनेंतही ढवळाढवळ केली. पुष्कळ म्हणी व वाक्प्रचार मराठींत रूढ होऊन बसले. फारसी प्रत्ययांची मदत नवे शब्द सिद्ध करण्याकडे घेण्यांत येऊं लागली. पण पुढें मराठीनें जेत्यांची भाषा म्हणून भीडभाड न धरितां, तिजवर आपला मराठीपणाचा छाप मारिला.

फारशी शब्द मराठीशीं किती एकरूप झाले आहेत, तें कळण्यासाठीं त्यांपैकीं कांहीं खालीं देत आहें—

( १ ) नामें—इनाम, तारीख, मजकूर, खुर्द, बुद्रुक, कौल, जिन्नस, बाब, मिळकत, सरकार, किल्ला, जमीन, इ०

( २ ) विशेषणें—फलाणा, माफक, वजा, बाकी, बराबर, इ०

( ३ ) अव्ययें—व, अगर, सबब, देखील, शिवाय, बद्दल, नजीक, ऐवजीं, शाबास, बस, खूप, बिलकुल, खबरदार, हमेष, जल्द, छान, इ०

( ४ ) जोडशब्द—नजरचूक, राजरस्ता, बाजारभाव जगजाहीर गैरमर्जी, धनदौलत, पांढरासफेत, पिवळाजर्द, नफा-तोटा, दम घेणें, जादू करणें, इ०

( ५ ) प्रत्यय—पिळदार, टुमदार, कायदेबाज, माहितगार, दारूबाज, घड्याळजी, दवाखाना, मच्छरदाणी, इ०

[प्रथम दिलेल्या शाहूच्या पत्रांत फारशी शब्दांचें ज्या प्रकारचें वर्चस्व आढळतें. किंबहुना ज्या भाषेला मराठी तरी म्हणतां येईल कीं नाहीं, याची शंकाच आहे; तसला परकी शब्दांचा स्वैरसंचार मराठींत चालू देणें किती योग्य आहे, हें सुज्ञांनींच ठरवावें ].

( कृ० पां० कुळकर्णी, वि० ज्ञा० विस्तार, पु० ५६ अं० १२ ).

---

## [ १३ ]

## " कांहीं मराठी शब्दांच्या व्युत्पत्तीचे माग अथवा मराठी भाषेच्या माहेराचें सिंहावलोकन. "

हें पुस्तक **परशुराम नारायण पाटणकर**, एम्० ए०; बनारसच्या सेंट्रल हिंदु कॉलेजांतील संस्कृताचे प्रोफेसर ह्यांनीं काशी येथें १९०७ मध्यें छापिलें. पृष्ठें ५८. शब्दांच्या तुलनात्मकतेच्या दृष्टीनें हें एक चांगलें पुस्तक झालें आहे. प्रस्तावनेंत लेखकानें म्हटलें आहे कीं, " माझीं गेलीं सोळा वर्षे उत्तर-हिंदुस्थानांत वस्ती झाली. त्या भाषा व मराठी भाषा यांचा विचार करितां उत्तरेकडील प्रांतांशीं मराठीचा निकट सम्बन्ध असावा, किम्बहुना येथूनच मराठीचें दक्षिणेकडे संक्रमण झालें असावें, ह्या अनुमानाच्या पूर्ततेसाठीं मीं शोधन केलें. तेव्हां १०।१२ वर्षांत असे शब्द २००।२५०जमले. " मराठीच्या उत्तरेकडील मूलस्थानासम्बन्धानें जीं अनुमानें पुढें आलीं आहेत, तीं ह्यावरून बळकट ठरतील;असा लेखकाचा समज होता.ह्यासाठीं त्यांनीं खालील प्रमाणें दिलीं आहेतः-

( १ ) अमेरिकन इंडियन यांच्या पुरातन रानटी भाषेंत नारळांतील "गीर" या शब्दास " कोपरा " म्हणतात; व आम्ही " खोबरें " म्हणतों. मध्यदेशांत ' खोपरा " म्हणतात; व संस्कृतांत " कर्पर " हा शब्द याच अर्थास लक्षून आहे. ( २ ) आफ्रिकेंत एका जातीच्या वानरास " बांदरू " म्हणतात; आम्ही वानर जातीस " बांदर " म्हणतों; व मध्यदेशांत " बंदर " म्हणतात. ( ३ ) आइसलँडच्या प्राचीन भाषेंत " बुर्क " म्हणजे झाडाची साल, इंग्रजींत " बार्क, " संस्कृतांत "वल्कल" आणि मराठींत व उर्दूत यासच धरून "बर्ख" असा एकच शब्द आढळतो. ( ४ ) लंडनमध्यें " कॅडेवर " म्हणजे प्रेत, संस्कृतींत " कलेवर " म्हणजे मृतशरीर. याचप्रमाणें ( ५ ) " ओनामासिधं " हें आम्हां जैन धर्मांतून उचललें; ( ६ ) " बेकं बे, बे दुणें चार " हा आमचा मूळ घरचा पाढा; ( ७ ) आट्यापाट्यांच्या खेळांतील " मुरदुंग्या " हा कोण ? असें मनांत आणतांच, आळंदी-पंढरीच्या छबिन्यांतील " मुरदुंग्या " ( मृदंग वाजविणारा ) मनांत आल्यावांचून राहत नाहीं. तो मुरदुंग्या, टाळकरी गण दोहों बाजूंस रांगा करून, भजनाचा घोष करीत असतां, यांच्या लंब-वर्तुळ रंगणामध्यें, या केन्द्रापासून त्या केन्द्रापर्यंत, मधली पाटी संभाळून; सर्वांस

मदत देत असतो; तेव्हां हें नांव प्रचारांत आल्यावर आट्या-पाट्यांचा खेळ प्रचारांत आला असावा, असा ऐतिहासिक सम्बन्ध जोडणें आपणांस साधार वाटतें. ( ८ ) क्रोश म्ह० कोस, यावरून पूर्वीच्या लोकांची आरोळी किती लांब-पर्यंत पोंचत-असे, ह्याचा बोध होतो. ( ९ ) " पल्ला " म्हणजे मध्यदेशांत वस्त्राचा पल्लव म्ह० पदर; ह्यावरून वस्त्रांत १२० शेर धान्य मावण्याइतकें गाठोडें करून तें नेलें जात-असावें; व यावरून तत्कालीन मनुष्यांच्या ताकदीचें अनुमान होतें; (?) व कांहीं समाजशास्त्रीय अनुमानांसही मदत होते.

( ९ ) खरें-खोटें=( हिं० ) खारें-खाटें, ( गु० ) खारूं-खाटुं.
( १० ) किडा-माकोडा=( हिं० ) कीडामकोडा, ( मकोडा म्ह० मुंगळा, हा माळवी शब्द आहे ).
( ११ ) काहणी=( हिं० ) कहानी, कथा.
( १२ ) खण=खंड.
( १३ ) चांगला=( हिं० ) चंगा.
( १४ ) चवाठा=( हिं० ) चौ-हाटा, ( हाट म्ह० बाजार ).
( १५ ) कोरा=( हिं० ) कुंआरा, कुमार.
( १६ ) तान्हा=कान्हा ( ? )
( १७ ) रिकामा=( हिं० ) निकम्मा.
( १८ ) रिकाम-टेंकडा=( हिं० ) निकाम्मा टेंगडा; ( टेंगडा म्ह० कुत्तरा, कोठें तरी पडलेला ).
( १९ ) पंत=पंडत, पण्डित.
( २० ) बागेसरी=वार्गाश्वरी.
( २१ ) खुर्दा=खुदरा, क्षुद्र.
( २२ ) व्याही=विवाही.
( २३ ) भाचा=बहानजा, भगिनीज.
( २४ ) मेहुणा=बेहनोआ.
( २५ ) ब्याद=व्याधि.
( २६ ) यंव=( हिं० ) यूं, एवम्.
( २७ ) हंबरी-तुंबरो=( हिं० ) हमरी-तुमरी.

इत्यादि पुष्कळ उदाहरणें देऊन, लेखकानें मराठीचें मूळ गुजराथी व हिंदी यांशीं फार साम्य असल्यानें, ''उत्तरीय प्रदेशाकडे आहे'' असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

---

३४५६ [ १४ ]

# व्याकरण व निरंकुशाः कवयः !

कांहीं शब्दसृष्टीचे ईश्वर तर स्फूर्तीच्या आवेशांत लिहिलें तें लिहिलें-- काळ्या दगडावरची रेघ ! सुधारणेची बात अब्रह्मण्यम् ! व्याकरणाच्या चुका, वृत्ताचें शैथिल्य, सारे खून माफ, कारण निरङ्कुशाः कवयः ! कवि हा एक निरङ्कुशः प्राणी असतो, म्हणूनच ना तो म्हणतो—

"अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
साङ्गावया कोण तुम्ही कवीला
आहांत मोठे पुसतों तुम्हांला" ( केक० ६ ).

" हीं ' ही' दीर्घ करा, सुधारुन जरा येथें अनुस्वार द्या,
कां हो चालवितां तुम्ही मजपुढें ही व्यर्थ वाचाळता ?
शास्त्रांची असली अम्हांवर तुम्ही लावूं नका बन्धनें,
हें चालेल असेंच रोज अमुचें काव्यें नवीं गुम्फणें,
आम्हां व्याकरणांतले नियम हो होतील लागू कसे,
पाळाया अवधान देउं तर तें सत्काव्य होणें नसे,
जे जे व्याकरणावरून बघती काव्यांतली माधुरी,
त्या ज्ञात्यांस्तव जन्मते न अमुची केव्हांच कारागिरी, "

हल्लींचा काळ मतस्वातंत्र्याचा व घौशेगिरीचा आहे; परंतु स्वातंत्र्य म्हणजे निरर्गल स्वैराचार नव्हे. कवीचा स्वातंत्र्याचा पुकार इष्ट आहे; परंतु तेवढ्यानें त्याची अपरिहार्य बद्धता चुकत नाहीं......ज्या भाषेंत कवि रचना करितो, ती त्याची एकट्याची नसून, राष्ट्राची असते. अर्थात् तो जर तिचे हाल करूं लागला, तर त्याला शिक्षा झाल्यावाचून राहत नाहीं. जुलमी अप्रिय सत्ता उलथून टाकण्याकरितां बंडखोरीची जरूरी असते; परंतु ती बंडखोरी जनतेस मान्य व्हावी लागते.

व्याकरणाच्या व इतर बंधनांचें वाजवीपेक्षां अधिक स्तोम माजविण्याचा आमचा इरादा नाहीं; परंतु या बंधनांचें योग्य महत्त्व जाणणें जरूर आहे. समाज म्हटला कीं बंधनें आलींच. भाषा ही समाजाची असल्याकारणानें तिच्या स्वरूपांत फरक होत जाणें अपरिहार्य आहे; त्याप्रमाणें व्याकरणाच्या बंधनांतही फरक पडत जातोच. मृत भाषा झाली कीं मात्र तिचा शब्द-कोश व व्याकरण हीं अविकार्य होतात. आम्ही बंधनातीत सदा स्वतंत्र आहों, असें ओरडणें म्हणजे शुद्ध अर्थशून्य बडबड होय. ( ' छन्दोरचना '-प्रो० मा० त्रिं० पटवर्धन. )

REFBK-0003456

REFBK-0003456